
माणसाच्या ऐहिक सुखाची गोष्ट



लिओ ह्युबरमॅन

माणसाच्या ऐहिक सुखाची गोष्ट

लेखक

लिओ ह्युबरमॅन

अनुवाद

कांचन निजसुरे / रमेश पाध्ये

एल्गार प्रकाशन, मुंबई

माणसाच्या ऐहिक सुखाची गोष्ट

आवृत्ती पहिली
नोव्हेंबर १९८४

प्रकाशक
एल्गार प्रकाशन,
द्वारा, रमेश पाध्ये
५९, जयप्रकाशनगर,
मुंबई ४०० ०६३.

मुद्रक
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय,
२७१, नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

किंमत पंचवीस रुपये

लिओ ह्युबरमॅन यांच्याविषयी थोडेसे

अमेरिकेमध्ये न्यू जर्सीजवळ राहणाऱ्या एका मध्यमवर्गीय कुटुंबात १७ ऑक्टोबर १९०३ रोजी लिओ ह्युबरमॅन यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण चालू असतानाच उन्हाळयाच्या सुट्टयांमध्ये वयाच्या अकराव्या वर्षापासून त्यांना औद्योगिक जीवनाचा अनुभव मिळाला. अगदी लहान वयातच कामगारांच्या जीवनाशी त्यांचा परिचय झाला. शालेय शिक्षणानंतर दोन वर्षांचा शिक्षकी पेशाचा अभ्यासक्रम पूर्ण करून वयाच्या अठराव्या वर्षीच त्यांनी शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम करायला सुरुवात केली. ही नोकरी सांभाळून त्यांनी शिक्षण पुढे चालू ठेवले आणि वयाच्या तेविसाव्या वर्षी १९२६ साली न्यूयॉर्क विद्यापीठाची पदवी संपादन केली.

त्यानंतर न्यूयॉर्कमधील एका खाजगी शाळेत नोकरी करण्यासाठी ते न्यूयॉर्कला राहायला गेले. १९२९ च्या जागतिक अरिष्टचा तो काळ होता. अमेरिकेतील कामगारांमध्येही असंतोषाला उधाण आले होते. त्या वातावरणाचा लिओ ह्युबरमॅन यांच्यावर परिणाम झाला नसता तरच नवल. १९३२ साली प्रसिद्ध झालेल्या "वुई, द पीपल" या त्यांच्या पहिल्यावहिल्या पुस्तकाचे स्फूर्तिस्थान अमेरिकन कामगारवर्गच होता. म्हणूनच अमेरिकन इतिहाससंबंधीचे हे पुस्तक नेहमीच्या पुस्तकांपेक्षा वेगळे होते. याच्या केंद्रस्थानी राज्यकर्ते, पुढारी नव्हते तर जनसमुदाय होते. अमेरिकेमध्ये लोक कोठून आले, त्यांनी वस्ती कशी केली, त्यांचे व्यवसाय काय होते, त्यांच्या वर्गसंघर्षाचे स्वरूप कसे होते याचे अत्यंत बोलके चित्र त्यात रेखाटले होते. हे पुस्तक बरेच गाजल्यामुळे त्यांच्या प्रकाशकाने त्यांना जागतिक इतिहासाचे क्रमिक पुस्तक लिहिण्याची विनंती केली. या कामासाठी आपली नोकरी सोडून देऊन त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' आणि 'ब्रिटिश म्युझियम' येथील ग्रंथालये पालथी घातली. या परिश्रमांची फलश्रुती "मॅन्स् वर्ल्डली गुड्स्" (माणसाच्या ऐहिक सुखाची गोष्ट) यामध्ये झाली. ही दोन्ही पुस्तके अद्ययावत् आणि व्यासंगपूर्ण संशोधनावर आधारित होती.

लंडनहून परत आल्यावर १९३६ ते १९५१ पर्यंतच्या चौदा वर्षांच्या कालखंडात अमेरिकेतील कामगार चळवळीशी त्यांचा अत्यंत जवळचा संबंध आला. "द लेबर स्पाय रॅकेट" आणि "द ग्रेट बस स्ट्राइक" यासारख्या पुस्तिका त्यातूनच जन्माला आल्या. या काळात प्राध्यापक, संपादक, वृत्तपत्राचे स्तंभलेखक, नॅशनल मॅरिटाइम युनियनच्या शिक्षण व जनसंपर्क खात्याचे संचालक, अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पेलल्या. प्रचंड व्यासंग आणि सामर्थ्य असलेल्या या विचारवंताने एक मार्क्सवादी कार्यकर्ता म्हणून शिरावर आलेली प्रत्येक जबाबदारी परिश्रमपूर्वक पार पाडली.

१९४९ साली पॉल स्वीझी यांच्याबरोबर त्यांनी ' मंथली रेव्हयू ' या मार्क्सवादी मासिकाची मुहूर्तमेढ रोवली. तो शीतयुद्धाचा काळ होता. काही वर्षांतच अमेरिकन सरकारची वक्रदृष्टी ह्युबरमॅन व स्वीझी यांच्याकडे वळली. स्वीझी यांच्यावर राजद्रोहाचा खटला झाला. या खटल्यामध्ये स्वीझी–ह्युबरमॅन यांनी जोडीने लढत देऊन अखेर अमेरिकन सुप्रीम कोर्टापुढे ५ विरुद्ध ४ मतांनी खटला जिंकला. या संदर्भात १९५३ साली सिनेटच्या मॅकार्थी समितीसमोर साक्ष देण्यासाठी ह्युबरमनना बोलावण्यात आले. त्या खुनशी राजवटीसमोर त्यांनी दिलेली साक्ष म्हणजे मनोधैर्य आणि स्पष्टवक्तेपणा यांचा आदर्श मानावा लागेल :

" मी मार्क्सवादी-समाजवादी आहे. माझी उद्दिष्टे आणि मार्ग मान्य असणाऱ्या, कम्युनिस्टांसकट सर्व लोकांबरोबर, त्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी काम करत राहण्याचा माझा निर्धार आहे.

" माझे विचार आणि माझी भूमिका लपविण्याचा मी कधीही प्रयत्न केलेला नाही. सर्वाधिक लोकांपर्यंत माझे विचार पोहोचावेत यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्नशील असतो. माझी पुस्तके आणि ' मंथली रेव्हयू ' वाचून कोणीही माणूस स्वतःची जिज्ञासा पूर्ण करून घेऊ शकतो. लपवाछपवी करण्यासारखे माझ्याकडे काहीही नाही—वस्तुस्थिती त्याच्या नेमकी उलट आहे.

" हे सगळे मी शपथेवर सांगितले याचा अर्थ अशा प्रकारची माहिती विचारण्याचा या समितीचा हक्क मी मान्य करतो असा होत नाही. या खटल्यामध्ये कम्युनिझम हा वादाचा मुद्दा नसल्याचे सुस्पष्ट करण्यासाठीच मी हा उपद्व्याप केला आहे. सरकार किंवा सरकारच्या कोणत्याही समित्यांना न जुमानता, एक लेखक आणि संपादक म्हणून माझे काम करत राहण्याचा मला पूर्ण अधिकार आहे हाच या खटल्यामधील महत्त्वाचा मुद्दा आहे. हा हक्क बजावण्यासाठीच माझी मते, माझ्या निष्ठा किंवा माझे सहकारी यासंबंधी मॅकार्थी समितीने विचारलेल्या आणखी कोणत्याही प्रश्नांना उत्तरे देण्यास मी स्पष्ट नकार दिला आहे. आपल्या अमेरिकन परंपरेला अनुसरून सांगायचे तर या माझ्या सर्वस्वी वैयक्तिक बाबी आहेत. मला योग्य वाटेल त्यांच्याशीच मी त्याविषयी चर्चा करीन. मला मॅकार्थी समितीशी याबाबत चर्चा करायची नाही. "

या शीतयुद्धाच्या कालखंडात ह्युबरमॅन-स्वीझी यांची योगायोगाने आय्. एफ्. स्टोन यांच्याशी भेट झाली. या गृहस्थाने " द हिडन हिस्टरी ऑफ द कोरियन वॉर " नावाचे पुस्तक लिहिले होते आणि त्यामधील स्फोटक व वादग्रस्त आशयामुळे कोणीही प्रकाशक ते छापायला तयार नव्हता. या पुस्तकात लेखकाने अमेरिकन साम्राज्यवादाचा बुरखा फाडून अमेरिकन सरकारवर कोरडे ओढले होते. ह्युबरमॅन आणि स्वीझी यांनी ते पुस्तक प्रकाशित करण्याचे तात्काळ मान्य केले आणि अशा तऱ्हेने ' मंथली रेव्हयू प्रेस 'चा जन्म झाला.

अमेरिकेच्या साम्राज्यवादी आणि युद्धखोर धोरणांना ह्युबरमॅननी सतत विरोध केला. त्याचे दोन नमुने :

" हिटलरच्या खाटिकखान्यातील भयानकतेमुळे माझ्या अनेक देशबांधवांच्या अंगावर

काटा उभा राहतो हे मला समजू शकते. ४ लाख माणसांना जिवंत जाळण्याचे काम करणारा अणुबॉंब अमेरिकन विमानातून टाकण्यात आला होता, त्याचे काय ! रासवट फॅसिस्टांच्या भट्ट्यांमध्ये मेलेल्या माणसांचे मुडदे जाळण्यात येत असत; अमेरिकन अणुबॉम्बने जिवंत मुले-माणसे जाळली. ”

“ परंतु युद्धामुळे कोणत्याही गोष्टीवर कायम स्वरूपाचा तोडगा निघू शकत नाही. टेबलापाशी युक्तिवाद करून ज्या शत्रुत्वावर तोडगा काढता येत नाही त्यावर स्फोटक द्रव्ये, विषारी वायू, लुळी-पांगळी माणसे आणि छिन्नविछिन्न प्रेते अशा पद्धतीने केलेल्या युक्तिवादामुळेही तोडगा निघू शकत नाही. ”

अमेरिकन साम्राज्यवाद आणि क्युबामधील क्रांतिवीर यांचे हाडवर तर सर्वश्रुतच आहे. क्युबाविरोधी प्रचार अमेरिकेत शिगेला पोहोचला असतानाच ह्युबरमॅन आणि स्वीझी अनेकदा क्युबामध्ये गेले. क्युबान क्रांतीच्या नेत्यांशी—फिडेल कॅस्ट्रो, चे गुव्हारा —त्यांचे जवळचे संबंध होते. यामधून “ क्युबा : ॲनॅटॉमी ऑफ द रेव्हॉल्युशन ” या पुस्तकाचा जन्म झाला. क्युबान क्रांतीबद्दल त्यांनी मांडलेले विचार असे आहेत :

“ निवडणुकांचे स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य यांचे महत्त्व मी अजिबात नाकारत नाही. पोटाला पुरेसे अन्न, निवाऱ्याला बऱ्यापैकी घर, शिक्षणाची सोय व वैद्यकीय सेवा मिळणाऱ्या लोकांच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची स्वातंत्र्ये आहेत. परंतु भुकेल्या, रोगजर्जर, अशिक्षित, शोषित लोकांसाठी ही स्वातंत्र्ये विशेष निकडीची नाहीत. आपल्यापैकी काही लोक जेव्हा भरल्यापोटी भुकेल्या लोकांना निवडणूक-स्वातंत्र्याची निकड पटवून देण्याचा प्रयत्न करतात तेव्हा भुकेले लोक त्याकडे लक्ष देत नाहीत. स्वतःला कशाची अधिक गरज आहे याची त्यांना पुरेपूर जाण असते. पोटाला पुरेशी भाकरी, ल्यायला कपडेलत्ते, निवाऱ्याला घर, आजाऱ्याला औषधपाणी आणि मुलांना शिक्षण या गोष्टी अधिक निकडीच्या आहेत, हे त्यांना समजते. क्युबाच्या इतिहासात प्रथमच क्युबन जनतेला या जीवनावश्यक वस्तू आता मिळत आहेत आणि या जीवनास्वादामुळे त्यांना स्वत्वाची ओळख पटत आहे. ”

लेखक, पत्रकार, युनियन कार्यकर्ता, संपादक, प्रकाशक, क्रांतिकारक या बहुढंगी व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंना जोडणारा धागा होता शिक्षणाचा. वयाच्या अठराव्या वर्षी स्वीकारलेले शिक्षकाचे काम विविध क्षेत्रांमध्ये ह्युबरमॅननी शेवटपर्यंत चालू ठेवले. या आजन्म शिक्षकाचे मार्गदर्शक तत्त्व होते : “ आपले विचार सुस्पष्ट असले पाहिजे. ”

पॉल स्वीझी यांच्या मते, “ ... लिओ वेगवेगळ्या कामांमध्ये अडकल्यामुळे अनेक वेळेला संपादकीय लिहिण्याची पाळी माझ्यावर येत असे. आम्ही चर्चा केल्यानंतर मी पहिला मसुदा लिहून आणत असे ... त्यावर लिओने केलेल्या सूचना म्हणजे मी वरील तत्त्वाचा भंग केल्याची निशाणी असे .... कालांतराने मात्र, एखाद्या मुलाने आई-वडिलांचे अनुकरण करावे त्याप्रमाणे लिओची तत्त्वे व नियम मी आत्मसात केले. ”

“ ...समाजविज्ञानाच्या विविध शाखांमधील संशोधनाचा उपयोग करून सामान्य लोकांपर्यंत ते ज्ञान सोप्या भाषेमध्ये पोहोचविणे हे लिओचे अत्यंत महत्त्वाचे ध्येय होते. इतिहास आणि अर्थशास्त्र या विषयांमध्ये लिखाण करणाऱ्यांमध्ये या देशात आणि

कदाचित जगातही लिओचा अग्रक्रम लागेल...लोकप्रिय लिखाणाला तज्ञांच्या लिखाणापेक्षा कमी लेखण्याची अलिकडे फॅशन दिसते. असे समजणे हा मूर्खपणा आहे. चांगले लोकप्रिय लिखाण करणारा माणूस ऐऱ्या-गैऱ्या तज्ञापेक्षा कितीतरी पटीने अधिक प्रतिभाशाली असावा लागतो...आणि हजारो लोकांना ज्ञानसंपन्न करण्याचे काम एखाद्या विशिष्ट विषयात थोडीशी भर टाकण्यापेक्षा फारच जास्त महत्त्वाचे आहे...आपल्या लिखाणाद्वारे हजारो वाचकांना मार्क्सवादी-समाजवादी दृष्टी देणारा इतका समर्थ लेखक गेल्या चाळीस वर्षांमध्ये दुसरा कोणीही झाला नाही."

'मंथली रेव्ह्यू' मासिक इतक्या समर्थपणे चालविल्याबद्दल लिओ ह्युबरमॅन व पॉल स्वीझी यांना इटालीमधील क्रांतिकारकांच्या एका गटातर्फे मार्च १९६७ मध्ये 'ओमेग्रा ॲवॉर्ड' देण्यात आले. त्यावेळी ह्युबरमॅननी आपले विचार पुढील शब्दात व्यक्त केले :

"...समजू लागल्यापासून पॉल स्वीझी आणि मी मार्क्सवादी समाजवादी आहोत. आमची व्याख्याने, पुस्तके आणि 'मंथली रेव्ह्यू' या माध्यमांतून आम्ही आमचे विचार जाहीरपणे आणि अभिमानाने मांडलेले आहेत. या विद्रोही भूमिकेबद्दल बक्षिसे देऊन नव्हे तर सजा देण्याच्या उद्दिष्टाने सरकारी समित्यांसमोर आमचा छळ करून सरकारने आमचा सत्कार केला आहे. म्हणूनच ओमेग्रा ॲवॉर्डचे आम्हाला विशेष महत्त्व वाटते. त्यामुळे सत्यकथन करण्याचा आमचा निर्धार अधिकच बळावला आहे."

वयाच्या ६४ व्या वर्षी हे पारितोषिक मिळाल्यावर आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असे समजून लिओ ह्युबरमॅन सुखासीन बनले नाहीत. खऱ्या क्रांतिकारकाची "इतिकर्तव्यता" क्रांती आणि साम्यवाद यातच असते. म्हणूनच हे पारितोषिक मिळाल्यावर त्यांनी 'मंथली रेव्ह्यू'बाबतच्या आजवरच्या चुका आणि त्रुटी यांचा आढावा घेतला आणि ते मासिक अधिक चांगले करण्याची योजना आखली.

परंतु त्यांच्या मानसिक जिद्दीला शरिराने साथ दिली नाही. आणि ९ नोव्हेंबर १९६८ रोजी त्यांचा अंत झाला.

० ०

अनुवादकांची प्रस्तावना

दुष्काळ. लाखो लोकांची उपासमार. पूर. घरदारांची विल्हेवाट. अन्नासाठी दाहीदिशा भ्रमंती. जंगलजमिनींची लुबाडणूक. आदिवासींवर खुनी हल्ले. दलितांची अस्मिता. त्यांच्या वस्त्यांची जाळपोळ. श्रीमंत शेतकऱ्यांची लक्षभोजने. छोटे शेतकरी देशोधडीला. स्त्रियांवर बलात्कार. हुंडाबळींची वाढती संख्या. जातीयवादाचा उसळलेला आगडोंब. महागाईचा भस्मासूर. वेतनवाढीसाठी लढे. कारखान्यांची टाळेबंदी. आशियाई क्रीडा-सामने. रंगीत दूरदर्शन. औद्योगिक कामगार रस्त्यावर. मोर्च्यांवर लाठीहल्ले. पोलिसांचा बेछूट गोळीबार.

आपल्या देशातील आजचे सामाजिक वास्तव असे आहे. हे जाणून घेण्यासाठी कोणत्याही ग्रंथाची पारायणे करायला नकोत. केवळ डोळे उघडे ठेवल्यास येथे संघर्ष सुरू आहे आणि तो दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र होत आहे ही गोष्ट सहज नजरेत भरेल. हा संघर्ष ‘ अ ’ विरुद्ध ‘ ब ’ इतका सोपा नाही. तो व्यामिश्र आहे, पण अनाकलनीय खासच नाही.

एका बाजूला देशातील श्रमिक संघर्षांमध्ये उतरत आहेत तर दुसऱ्या बाजूला देशातील अनेक समस्यांच्या संदर्भात श्रमिकांच्या विविध संघटनांची, विशेषतः संघटित कामगारवर्गाची मानगूट पकडणे हा या देशातील काही विचारवंतांचा एक आवडीचा खेळ बनला आहे. हे विचारवंत कामगारांना ‘ शिस्त ’ लावण्याचे विविध उपाय सुचवितात. पण गेल्या जवळपास दोनशे वर्षांत अनेक देशांमध्ये अशा उपाययोजना करूनही मालक–मजूर संघर्ष मिटलेला नाही. भर उन्हात रस्त्यावरून घोषणा देत जायला मजा वाटते म्हणून कामगार निदर्शने करत नाहीत वा काम करायचा कंटाळा आला म्हणून उपासमार सहन करीत ते संप सुरू ठेवत नाहीत. या कृतींमागची कारणे आणि कामगारांचे या संदर्भातील विचार नीट जाणून घेण्यासाठी आपल्याला आजचे समाजवास्तव कसे निर्माण झाले याचा शोध घ्यावा लागेल. आजचे प्रश्न जाणून घेण्यासाठी इतिहासाचा मागोवा घ्यावा लागेल.

इतिहासाच्या बहुतेक पुस्तकांमध्ये —मग तो इतिहास युरोपचा असो, चीनचा असो नाही तर भारताचा —आपल्याला राजेरजवाडे आणि सरदार–दरकदार यांच्या खेळशिकारी, त्यांचे दातृत्व, त्यांचे शौर्य, त्यांच्याकडील मेजवान्या यांची पाने भरभरून वर्णने आढळतात. पण अशी वर्णने करणारे लोक हे विसरतात की लढवय्यांसाठी लागणारी चिलखते काही जमिनीतून उगवत नाहीत; आणि शाही मेजवान्यांना लागणारे धान्य जरी जमिनीतून उगवत असले तरी ते पेरावे लागते, त्याला खतपाणी घालावे लागते. राजवाडे आणि किल्ले मजुरांनी बांधावे लागतात. अशारीतीने ऐतखाऊंच्या ऐषारामासाठी

[illegible] करणारा श्रमिकांचा वर्ग बहुतेक इतिहासकार विसरलेले दिसतात.

एकदा श्रमिकांचा आणि पर्यायाने त्यांनी केलेल्या उत्पादनकार्याचा विसर पडला की इतिहासातील अनंत घटनांना गुंफणारा कोणताही धागा अस्तित्वात राहात नाही. मग या घटना म्हणजे केवळ अपघात असतात, तो योगायोग असतो किंवा इतिहासाचा प्रवाह महान व्यक्तींच्या प्रतिभेमुळे दिशा बदलतो यासारखे निष्कर्ष काढणे इतिहास-काराला सोपे जाते.

परंतु असले निष्कर्ष काढून श्रमिकांचे अस्तित्व नाकारता येत नाही. कारण ऐतिहासिक काळात गुलाम बंडाचे निशाण रोवतात आणि रोमन साम्राज्याचा अंत होतो. शेतकऱ्यांच्या रणगर्जना सरंजामशाही नामशेष करतात. कामगारांचे हातोडे भांडवल-शाहीवर घणाघाती घाव घालतात. हा वर्गलढा नाकारण्याचा सत्ताधारी वर्गांनी कितीही प्रयत्न केला तरीही वर्गसंघर्ष लोप पावत नाही. कारण या संघर्षाची कारणे मूलभूत असतात.

प्रत्येक समाजामधील आर्थिक व्यवहार, राजकारण, कायदेव्यवस्था, धर्मसंस्था, शिक्षणपद्धती हे सर्व व्यवहार एकमेकांशी संबंधित असतात. यातील आर्थिक व्यवहार इतर सर्व व्यवहारांना पायाभूत असतात. म्हणजे माणसामाणसांमधील उत्पादनसंबंध या आकाशात उंच चढलेल्या मनोऱ्याचा मूलाधार असतात. माणसे कशी जगतात हे जीवनास आवश्यक असलेल्या गोष्टी ती कशा प्राप्त करतात यावरून, म्हणजेच समाजात त्या विशिष्ट वेळी प्रचलित असलेल्या उत्पादनपद्धतीवरून निश्चित होते.

निसर्गावर विजय मिळवण्याच्या प्रक्रियेत माणूस आपली प्रगती साधतो. उत्पादनाच्या आणि विनिमयाच्या अधिकाधिक चांगल्या पद्धतींचा शोध लावतो. हे बदल जेव्हा मूलभूत असतात, व्यापक परिणाम करणारे असतात तेव्हा सामाजिक झगडे उद्भवतात. कारण उत्पादनाच्या जुन्या पद्धतीबरोबर विकसित झालेले सामाजिक संबंध स्थिरावलेले असतात. प्रस्थापित कायदे, राजकारण, धर्म, शिक्षणपद्धती अशा विविध व्यवहारांमध्ये जीवन जगण्याची पद्धत दृढमूल झालेली असते. आधीच्या सत्ताधारी वर्गाला आपली सत्ता टिकवून धरायची असते. त्यामुळे नवीन उत्पादनपद्धत आणण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या वर्गाशी त्यांचा संघर्ष सुरू होतो व शेवटी त्याचे पर्यवसान क्रांतीमध्ये होते.

जीवनावश्यक वस्तू मिळवण्याच्या माणसांच्या धडपडीतून वर्गसंबंध तयार होतात. हे वर्गसंबंध लक्षात घेऊन ऐतिहासिक घटनांकडे पाहिले तर आजवर अनाकलनीय वाटणारी गुपिते समजून घेता येतात; असंबद्ध वाटणाऱ्या घटनांची संगती लावून इतिहासाचे गतिनियम शोधता येतात. मग मानवाचा इतिहास म्हणजे असंबद्ध कल्पनांचे चक्रीवादळ न वाटता मानवाच्या उत्क्रांतीची प्रक्रिया असल्याचे जाणवू लागते. यामुळे आपल्याला सरंजामशाहीमधून भांडवलशाहीमध्ये झालेल्या आणि भांडवलशाहीमधून साम्यवादी समाजाकडे होऊ घातलेल्या बदलाची प्रक्रिया कळू शकते.

श्रमिकांचे जनसमुदाय आणि विशेषतः कामगारवर्ग म्हणजे साम्यवादी समाजाची निर्मिती करू शकणारे सृजनशील कारागीर असतात. साम्यवादी समाजनिर्मितीमध्ये सामाजिक उत्पादन आणि उत्पादनसंबंध यांची मूलभूत पुनर्रचना अभिप्रेत असते.

अशा पुनर्रचनेसाठी आवश्यक असलेली परिस्थिती भांडवली समाजात आपोआप निर्माण होत नाही. या पुनर्रचनेच्या उद्दिष्टांशी श्रमिकांनी सामुहिकरित्या एकात्मता साधणे ही या सामाजिक परिवर्तनाची पहिली अट असते. अशी एकात्मता वर्गलढ्यांद्वारे आणि वर्गलढ्याच्या आकलनाद्वारेच साधता येते.

ही आकलनप्रक्रिया अनेक मार्गांनी विकसित करता येते. श्रमिकांना श्रमिकांचा इतिहास समजावून देण्याचे कार्य हा त्यापैकी एक मार्ग होय. ही आजची गरज आहे. अर्थात श्रमिकांसाठी लिहावयाचा इतिहास हा पंडिती शैलीने लिहून चालणार नाही. त्याची शैली सुबोधच हवी.

अशा प्रकारचा जनसामान्याचा सामान्य जनांसाठी लिहिलेला इतिहास ही तशी दुर्मिळच बाब आहे. लिओ ह्युबरमॅन यांचे " मॅनूस् वर्ल्डली गुडस् " (माणसाच्या ऐहिक सुखाची गोष्ट) हे पुस्तक अशा दुर्मिळ पुस्तकांपैकी एक आहे या पुस्तकात गेल्या हजार वर्षातील युरोपचा आर्थिक व सामाजिक इतिहास अत्यंत सोप्या भाषेत मांडलेला आहे. परंतु इतिहास सोपा करताना ह्युबरमॅन यांनी त्याच्या वळणांच्या पायवाटा पुसण्याचा किंवा चढउतार सपाट करण्याचा उद्योग केलेला नाही. तसेच त्यांनी आर्थिक व सामाजिक घटनांच्या अनुषंगाने अर्थशास्त्रीय सिद्धांतांचे स्पष्टीकरण केल्यामुळे हे सिद्धांत कंटाळवाणे न राहता उद्‌बोधक बनले आहेत. यामुळेच जगातील अनेक भाषांमध्ये हे पुस्तक अनुवादित करण्यात आले आहे.

भारतामध्येही हिंदी, बंगाली, गुजराथी, तेलगु, कन्नड आणि मल्याळम् या भाषांमध्ये या पुस्तकाचा अनुवाद आधीच उपलब्ध आहे. मराठीमध्ये या विषयावर एवढे व्यासंग-पूर्ण तरीही सोपे असे पुस्तक नाही. म्हणून आम्हाला या पुस्तकाचा अनुवाद मराठी वाचकांना उपलब्ध करून द्यावासा वाटला. कोणी म्हणेल की युरोपच्या इतिहासाशी आपला काय संबंध ? या संदर्भात आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्या संघर्षमय समाजामध्ये आपण वावरतो तो समाज आकाश फाडून येथे आलेला नाही. किंवा " आपल्या " इतिहासाची ती पुढची पायरीही नाही. " आपला " इतिहास केवळ अकबर आणि शिवाजी यांचाच नाही तर गेल्या २०० वर्षांच्या ब्रिटिश वसाहतवादाचा आणि त्यापूर्वी विविध युरोपियन सत्तांनी उभ्या केलेल्या व्यापारी युद्धांचाही आहे.

पण हे युरोपियन लोक भारतात कशासाठी आले ? आपण काही त्यांना आमंत्रण दिले नव्हते. तसेच केवळ आपल्याच देशात नव्हे तर ब्रह्मदेश, थायलंड, इराण, ब्राझील, आफ्रिका, अमेरिका यांसारख्या विविध प्रदेशांमध्ये ते पसरले. ग्लॅक्सो, फिलिप्स, एच. एम्. व्ही. यासारखी नावे आज आपल्याला कितीही परिचित वाटली तरी ती नावे ज्या देशांचे प्रतिनिधित्व करतात त्या देशांशी आपले संबंध कधीही गोडीगुलाबीचे नव्हते. आपण वापरतो ती औषधे एवढी महाग का ? आपल्या शहरांमधील हवा इतकी प्रदूषित कशी ? स्वातंत्र्य मिळून ३७ वर्षे लोटल्यावरही खत-कारखाने उभारण्यासाठी आपण युरोपियन किंवा अमेरिकन कंपन्यांनाच पाचारण का करतो ? कारण आजही या देशातील बाजारपेठेवर त्यांची पकड मजबूत आहे. त्यांचे इथल्या भांडवलदारांशी घनिष्ट संबंध आहेत.

हे ' घनिष्ट संबंध ' प्रस्थापित करणारे युरोपियन लोक व्यापारी म्हणून भारतात आले. तसेच साऱ्या जगाचे चित्र पालटून टाकणारी औद्योगिक क्रांती आणि तिला पायाभूत असलेली भांडवली क्रांती सर्वप्रथम युरोपमध्ये झाली. या प्रक्रियेमुळे तेथील समाज-जीवनातील संघर्षाची तीव्रता शतपटीने वाढली. उत्पादनशक्तींमध्ये झपाट्याने वाढ घडून आली. भांडवलसंचय अतिशय वेगाने होऊ लागला. या प्रक्रियेला चालना देण्यासाठी बाजारपेठा म्हणून वसाहतींवर कब्जा करण्यात आला. यातून भांडवल-शाहीचे लोण जगभर पसरले.

या औद्योगिक भांडवलशाही पाठोपाठ औद्योगिक कामगारांचा वर्गही जगभर निर्माण होऊ लागला. स्वतःवरील अन्यायाचे निराकरण करण्यासाठी देशोदेशींच्या श्रमिकांनी दंड थोपटले. ही बंडे मोडण्यासाठी वेळोवेळी श्रमिकांना शिक्षा करण्यात आल्या. पण याद्वारे भांडवलदारांना अपेक्षित परिणाम साधता आला नाही. परिणामी ऐतखाऊंविरुद्धचा श्रमिकांचा वर्गकलह अधिकाधिक तीव्र होऊ लागला. या एकूण प्रक्रियेचाच भाग म्हणून शास्त्रीय समाजवाद ही संकल्पना विकसित झाली. कामगारांना ऐतिहासिक विकास प्रक्रियेतील स्वतःचे स्थान समजू लागले. या आकलनामुळे खाजगी मालमत्तेला मूठमाती देण्यास आणि त्याचबरोबर वर्ग आणि वर्गसत्ता यांचे विसर्जन करण्यास कामगार सज्ज होऊ लागले. कामगारवर्गाने स्वतःला घडविण्याची प्रक्रिया अशा तऱ्हेनें आकार घेऊ लागली.

जगभर आज ही प्रक्रिया सुरू आहे. या विविध संघर्षामध्ये विजयी होण्यासाठी काम-गारवर्गाला स्वतःच्या वर्गीय जाणिवा प्रगल्भ कराव्या लागतील. मानवाला सर्वनाशापासून वाचवण्याचा तो एकमेव उपाय आहे. हे प्रयत्न यशस्वी झाले तर इतिहासात प्रथमच इतर जीवजंतूंच्या साम्राज्यापासून मानवाचे साम्राज्य एका परीने वेगळे दिसू लागेल. जनावरांचे जीवन सोडून देऊन खरेखुरे माणसांचे जीवन जगायला सुरुवात होईल. त्या क्षणापासून माणूस अधिकाधिक जाणीवपूर्वक स्वतःचा इतिहास घडवू लागेल. त्याच क्षणापासून मानवाने केलेल्या सामाजिक कृतींचे, सतत वाढत्या प्रमाणावर, त्याला अपेक्षित असेच परिणाम घडतील. गरजेच्या साम्राज्यामधून स्वातंत्र्याच्या साम्राज्यामध्ये जाताना मानवाची अशी पदोन्नती होईल.

मुंबई,
२५ ऑक्टोबर १९८४

कांचन निजसुरे
रमेश पाध्ये

लेखकाची प्रस्तावना

या पुस्तकाचे उद्दिष्ट दुहेरी आहे. अर्थशास्त्रीय सिद्धांतांच्या साहाय्याने इतिहास, आणि इतिहासाच्या साहाय्याने अर्थशास्त्रीय सिद्धांत विशद करणे असा हा दुहेरी प्रयत्न आहे. या दोन्ही गोष्टींची सांगड घालणे आवश्यक आणि महत्त्वाचे आहे. आर्थिक बाजूकडे फारसे लक्ष दिले नाही तर इतिहासाचे आकलन तोकडे होते आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीपासून विलग केलेले अर्थशास्त्रीय सिद्धांत कंटाळवाणे बनतात. जोपर्यंत इतिहासाच्या प्रकाशझोतात हे "कंटाळवाणे विज्ञान" शिकले आणि शिकवले जात नाही तोपर्यंत ते कंटाळवाणेच राहील. रिकार्डो याचा खंडविषयक नियम समजण्यास कठीण आणि कंटाळवाणा आहे. परंतु त्याला इतिहासाची पार्श्वभूमी द्या; एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस चाललेल्या, जमीनमालक आणि उद्योगपती यांच्यातील एक संघर्ष म्हणून त्याच्याकडे पहा. मग तोच नियम अर्थपूर्ण बनतो आणि विचारशक्ती चेतवतो.

हे पुस्तक सर्वसमावेशक आहे असा माझा दावा नाही. हा केवळ आर्थिक इतिहास नव्हे किंवा केवळ अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा इतिहासही नव्हे — या दोन्हींपैकी थोडे थोडे आहे. विशिष्ट प्रकारचे सिद्धांत विशिष्ट काळात का निर्माण झाले, समाजमानवाच्या हाडामांसातूनच त्यांचा जन्म कसा झाला आणि त्या हाडामांसाची संरचना बदलू लागल्यावर त्या सिद्धांतांमध्ये विकास, बदल व अंत हे टप्पे कसकसे आले हे आर्थिक संस्थांच्या विकासप्रक्रियेमधून स्पष्ट करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

या पुस्तकाच्या संदर्भात काही लोकांचा ऋणनिर्देश करणे मला आवश्यक वाटते. माझ्या पत्नीने मला केलेली मदत शब्दबद्ध करता येणार नाही; हस्तलिखित अत्यंत बारकाईने वाचून डॉ. मेयर शापिरो यांनी प्रोत्साहनपर सूचना केल्या, श्रीमती सिबिल मे आणि श्री. मायकेल रॉस यांनी सतत विधायक टीका करून वेळोवेळी सल्ला दिल्यामुळे घटना पारखताना आणि मत तयार करताना अनेक चुका टाळता आल्या. श्रीमती जेन टॉब्रस्की यांच्या इतिहास आणि अर्थशास्त्र यांमधील व्यासंगाची आणि अत्यंत बारकाईने केलेल्या संशोधनाची मला अतिशय मोलाची मदत झाली, याबद्दल मी त्यांचा विशेष ऋणी आहे. त्यांच्या मदतीशिवाय हे पुस्तक लिहिणे मला शक्य झाले नसते.

न्यू यॉर्क
मार्च १९३६

लिओ ह्युबरमॅन

ऋणनिर्देश

या पुस्तकाच्या अनुवादाच्या कामामध्ये मंगला पाध्ये, अरुणा कालेलकर, भालचंद्र मुणगेकर, शारदा साठे, राजीव कालेलकर आणि जेनेसिस डिसिल्व्हा यांनी बहुमोल मदत केली. मराठी सुबोध व शुद्ध करण्यासाठी दिगंबर पाध्ये व चंद्रकांत मर्गज यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य दिले. प्रा. कुमुद पोरे यांनी संपूर्ण मुद्रणप्रत वाचून सूचना केल्या. पुस्तकाचे शीर्षक डॉ. अशोक केळकर यांनी सुचविले. श्री. रमेश नाईक यांनी पुस्तकातील नकाशे आणि आकृत्या काढून दिल्या. श्री. सुभाष अवचट यांनी पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले.

मुद्रणप्रत तयार झाल्यावर हे पुस्तक वाचकांना परवडेल अशा किंमतीत उपलब्ध करून देण्याचा प्रश्न आमच्यापुढे होता. त्यासाठी काही प्रमाणात मदत गोळा करून व काही प्रमाणात आगाऊ प्रती नोंदवून पैसे उभे करावेत असा आम्ही विचार केला. सर्व श्रमिक संघाचे कॉ. यशवंत चव्हाण यांनी ही कल्पना उचलून धरली व १०० प्रतींची मागणी नोंदवली. डॉ. दत्ता सामंत यांनीही १०० प्रती नोंदवल्या. त्याप्रमाणे सर्वश्री डी. बी. म्हात्रे, मनोहर कदम, एन. डी. कांबळे, व्यंकप्पा पत्की, अनंत फडके, प्रकाश बुरटे यांनी व इतर अनेकांनी पैसे उभे करण्यासाठी अत्यंत मोलाची मदत केली. कॉ. नारायण सुर्वे यांनी पुस्तक-प्रकाशनासाठी केवळ प्रोत्साहन नव्हे तर सर्वतोपरी सहाय्य केले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने पुस्तकास अनुदान देऊन पुस्तकाची किंमत कमी ठेवण्यास मदत केली.

' मंथली रेव्ह्यू प्रेस 'तर्फे पॉल स्वीझी व ज्युडी रुबेन यांनी हा अनुवाद प्रकाशित करण्यास परवानगी तर दिलीच, पण त्याचबरोबर लिओ ह्युबरमॅन यांच्याविषयी माहिती देणारी पुस्तिकाही उपलब्ध करून दिली.

भंडारी मुद्रणालयाचे श्री. सा. रा. भंडारी व त्यांचे सहकारी यांनी मुद्रणाची जबाबदारी सांभाळली. श्री. हेमंत गोळे यांनी पुण्यातील कामे हाताळली. आमचे निकटचे सहकारी राजीव आठल्ये व भालचंद्र मुणगेकर यांनी प्रकाशनाच्या कामात किती प्रकारे मदत केली हे शब्दांत सांगणे कठीण आहे.

या सर्वांच्या सहकार्यामुळेच पुस्तक वाचकांपर्यंत पोहोचविणे शक्य झाले.

◇ ◇

अनुक्रम

भाग : १ सरंजामशाहीकडून भांडवलशाहीकडे


भाग २ : भांडवलशाहीकडून कुठे?


० ०

भाग १

सरंजामशाहीकडून भांडवलशाहीकडे


मध्ययुगीन युरोप
(इ स ९०० ते इ. स. १३००)






प्रदेश : फ्लॅंडर्स
शहरे पॅरिस
ोनिया
कीव्हचे
साम्राज्य
कीव्ह
न्सिल्व्हानिया
कॉन्स्टॅन्टिनोपल
लॅटिन
साम्राज्य
इस्लामी सत्ता
(खलिफत)
जेरुसलेम

युरोपमध्ये प्लेगचा फैलाव




प्लेगचा फैलाव
१३४७ १३४८ १३४९ १३५० आणि नंतर
रशिया
ऑटोमान साम्राज्य (तुर्कस्थान)

१

धर्मगुरू, योद्धे—आणि कष्टकरी

चित्रपटकलेच्या सुरुवातीच्या काळातील चित्रपट म्हणजे मोठा विचित्रच प्रकार होता. शहरांमध्ये बग्गीतून मजेत फिरणारे आणि बग्गीवाल्याला पैसे न देता सरळ चालू लागणारे लोक त्यामध्ये दाखवलेले असत. हे लोक सर्व शहरभर फिरत, आपला उद्योग-धंदा पाहात, मौजमजा करत आणि बस्स. पैशाची त्यांना गरजच भासत नसे. मध्ययुगीन काळाबद्दल लिहिल्या जाणाऱ्या अनेक पुस्तकांप्रमाणेच त्यांची गोष्ट होती. झगमगणारी चिलखते आणि ऐटबाज पोशाख अंगावर चढवून, शर्यतीला आणि खेळ-शिकारीला जाणारे सरदार व उच्चवर्गीय स्त्रिया यांची पाने भरभरून वर्णने या पुस्तकांमध्ये असत. ते नेहमीच भव्य किल्ल्यांमध्ये राहात आणि त्यांची खायची-प्यायची अगदी चंगळ असे. परंतु त्यांच्या या चैनीच्या गोष्टी त्यांना कोणीतरी पुरवत असे याची या वर्णने वाचताना आपल्याला क्वचितच जाणीव होते. चिलखते काही जमिनीतून उगवत नाहीत आणि धान्य जरी उगवत असले तरी ते पेरावे लागते, जमिनीची मशागत करावी लागते आणि रोपांची देखभाल करावी लागते.

ज्याप्रमाणे आपल्याला बग्गीतून किंवा टॅक्सीतून जाण्यासाठी पैसे भरावेच लागतात, त्याचप्रमाणे दहाव्या ते बाराव्या शतकांमधील सरदार आणि उच्चवर्गीय स्त्रिया यांची मौजमजा आणि चैन यांची किंमत कोणाला तरी मोजावीच लागत होती. पूजापाठ करणारे पुजारी आणि धर्मगुरू यांच्यासाठी, तसेच लढणाऱ्या सरदारांसाठी कोणीतरी अन्न आणि वस्त्र पुरविणे आवश्यकच होते. मध्ययुगीन काळातील समाजात या धर्मगुरू आणि योद्ध्यांव्यतिरिक्त आणखी एक घटक होता : कष्टकरी. सरंजामी समाज या तीन घटकांनी मिळून बनलेला होता : धर्मगुरू, योद्धे आणि कष्टकरी. चर्चमधील पुजाऱ्यांचा वर्ग आणि लढवय्यांचा वर्ग यांना जीवनावश्यक वस्तू पुरवण्यासाठी काम करणारा राबणारा वर्ग. त्याकाळच्या किमान एका माणसाला तरी ही गोष्ट पक्की उमगली होती आणि त्याबद्दल तो म्हणतो :

> सरदार, दरकदार, धर्मगुरू आणि पुजारी
> त्यांच्यासाठी राबणाऱ्या जीवाचे नाव शेतकरी.

कशा प्रकारचे काम होते ते ? कारखान्यातले की गिरण्यांमधले ? छे, छे, कारण या गोष्टी तेव्हा नव्हत्याच मुळी. ते काम होते जमिनीवर राबण्याचे. अन्नासाठी शेती करायची किंवा कपड्यांसाठी लोकर मिळवायला मेंढपाळीचा उद्योग करायचा. ते शेतीकाम होते खरे, पण आजच्यापेक्षा ते इतके वेगळे होते की आपल्याला आज ओळखूही येणार नाही.


पश्चिम आणि मध्य युरोपातील बहुतेक शेतजमीन 'मनोर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वस्त्यांमध्ये विभागलेली होती. एक गाव आणि त्या गावातील लोक ज्यावर काम करत अशी आजूबाजूची शेकडो एकरांची शेतीयोग्य जमीन म्हणजेच एक 'मनोर'. शेतीयोग्य जमिनीच्या हद्दीपाशी कुरण, निचऱ्याची जागा आणि जंगल यांचा पट्टा असे. प्रत्येक मनोरचा आकार, त्याची घडण आणि त्यावर राहणाऱ्या लोकांमधील परस्परसंबंध यात वेगवेगळ्या ठिकाणच्या मनोरमध्ये थोडाफार फरक होता; परंतु त्यांचे महत्त्वाचे घटक जवळपास सारखेच होते.

प्रत्येक मनोर इस्टेटीचा एक सरंजामदार असे. सरंजामशाही काळाबद्दल सर्वसाधारणपणे असे म्हटले जात असे की त्या काळी "जमिनीशिवाय सरंजामदार आणि सरंजामदाराशिवाय जमीन" ही जवळपास अशक्य कोटीतील गोष्ट होती. मध्ययुगीन काळातील सरंजामदारांच्या घरांची चित्रे अनेक पुस्तकांमध्ये आढळतात. त्यांची घरे ओळखणे अगदीच सोपे आहे. कारण तो एखादा मोठा किल्ला असो किंवा छोटेखानी वाडा असो, त्याला नेहमीच तटबंदी असे. प्रत्येक मनोरचा सरंजामदार आपला परिवार, नोकर-चाकर आणि इस्टेटीची देखभाल करण्यासाठी असलेले अधिकारी यांच्यासह या तटबंदीने मजबूत केलेल्या घरामध्ये राही. ज्या सरंजामदारांच्या मालकीचे अनेक मनोर असत ते सरंजामदार वेगवेगळ्या मनोरना भेटी देत. काही सरंजामदारांकडे तर शेकडो मनोरांची मालकी होती.

कुरण, जंगल आणि निचऱ्याची जागा यांचा सर्वजण मिळून उपयोग करीत; परंतु शेतीयोग्य जमीन दोन तुकड्यांमध्ये विभागलेली असे. त्यातील एक भाग, सर्वसाधारणपणे तिसरा हिस्सा, सरंजामदाराचा असे आणि त्याला 'डिमेन्' असे म्हणण्यात येई; तर दुसरा भाग जमीन कसणाऱ्या कुळांकडे असे. या मनोर व्यवस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कसणाऱ्या कुळाकडे जमिनीचा एक सलग तुकडा नसे. तर त्याच्याकडील जमीन आकृती १ मध्ये (पुढील पानावर) दाखवल्याप्रमाणे पट्ट्यांमध्ये विभागलेली असे.

'अ' या कुळाची जमीन तीन क्षेत्रांमध्ये विभागलेली आहे आणि प्रत्येक क्षेत्रामध्ये पुन्हा ती पट्ट्यांमध्ये वाटलेली आहे हे आकृती-१ वरून लक्षात येते. ही वाटणीदेखील अशी की कोणत्याही दोन पट्ट्या एकास एक लागून नाहीत. तीच गोष्ट 'ब' या कुळाची आणि तशी सगळ्यांचीच. सरंजामशाहीच्या सुरुवातीच्या काळात सरंजामदाराच्या 'डिमेन्'चीसुद्धा अशीच अवस्था होती; शेतकऱ्यांच्या जमिनीबरोबरच पट्ट्यापट्ट्यांमध्ये गुंतलेली अशी ती जमीन असे. पण नंतरच्या काळात सरंजामदार आपली जमीन एका सलग तुकड्यामध्ये बांधून घेऊ लागले.

पट्ट्यांची शेती हा सरंजामशाहीचा एक विशेष पैलू होता. अर्थातच हा अतिशय नासधुशीचा प्रकार होता आणि काही शतकांनंतर ही पद्धत पार सोडून देण्यात आली.



आकृती : १

जमिनीमधून अधिक पीक काढण्यासाठी पिके बदलणे, खते वापरणे असे एक ना अनेक प्रकार आज आपल्याला ठाऊक आहेत. पण सरंजामी काळातील शेतकऱ्याला ते ठाऊक नव्हते. द्विक्षेत्र पद्धत सोडून त्रिक्षेत्र पद्धतीचा उपयोग हाच त्याकाळी झालेला फार मोठा बदल होता. जमिनीतील सगळी पोषक द्रव्ये निघून जाऊ नयेत यासाठी पीकबदलणी करताना पिकांचा क्रम काय असावा याबद्दल त्यावेळच्या शेतकऱ्याला पुरेशी माहिती नसली तरी एकच पीक त्याच जमिनीत प्रत्येक वर्षी घेणे चांगले नाही हे त्याला ठाऊक होते. म्हणून प्रत्येक वर्षी एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रामध्ये तो पिके हलवत असे. एका वर्षी पहिल्या क्षेत्रामध्ये गहू किंवा राय असे अन्नाचे पीक, त्याच्या बाजूला दुसऱ्या क्षेत्रामध्ये मद्यासाठी लागणारे सातूचे पीक आणि तिसरे क्षेत्र मध्यंतरी एका वर्षासाठी पडीत ठेवण्यात येई. (त्या क्षेत्राला ‘ ले-ऑफ ’ देण्यात येई). त्रिक्षेत्र पद्धतीचा उपयोग अशा तऱ्हेने करण्यात येई :

तक्ता १

	पहिले वर्ष	दुसरे वर्ष	तिसरे वर्ष
१	गहू	सातू	पडीत
२	सातू	पडीत	गहू
३	पडीत	गहू	सातू

आणखी मनोरव्यवस्थेची दोन वैशिष्ट्ये होती. पहिले म्हणजे शेतीयोग्य जमीन दोन भागांमध्ये वाटलेली होती. सरंजामदाराचा आणि फक्त त्याच्यासाठीच लागवड केला जाणारा भाग; आणि कुळांमध्ये विभागलेला दुसरा भाग. दुसरे म्हणजे छोट्या, आखीव जागेत लागवड न करता पट्ट्यांमध्ये जमीन विभागलेली होती. तिसरे एक वैशिष्ट्य

होते—ते म्हणजे कुळे फक्त स्वतःच्याच जमिनीवर नव्हे तर सरंजामदाराच्या ‘ डिमेन् ’वर देखील **विनामोबदला** काम करीत.

अत्यंत कंगाल आणि गचाळ अशा खोपटामध्ये शेतकरी राहात असे. पट्टयामध्ये विभागलेल्या जमिनीवर दिवसभर कष्टाचे काम करून, (सर्वसाधारणपणे सगळे पट्टे मिळून ती जमीन इंग्लंडमध्ये सुमारे पंधरा ते वीस एकर असे, तर फ्रान्समध्ये चाळीस ते पन्नास एकर असे) जमिनीमधून जेमतेम पोटापुरते त्याला मिळवणे शक्य होई. अधिक चांगले जीवन तो जगू शकला असता, परंतु आठवड्यातील दोन किंवा तीन दिवस त्याला सरंजामदाराच्या जमिनीवर विनामोबदला काम करावे लागे. अर्थात सरंजामदाराकरता करावे लागणारे हे एकच काम नव्हते. सुगीची घाई असली की त्याला सरंजामदाराच्या ‘ डिमेन ’वरील पिकाची कापणी प्रथम करावी लागे. नेहमीच्या कामाशिवाय विशेष ताबडवून घेण्याचा हा खास प्रकार असे. एवढेच नाही, तर कोणाची जमीन महत्त्वाची हा प्रश्नच उदभवत नसे. सरंजामदाराच्या जमिनीवर नांगरणी, पेरणी आणि कापणी ही आधी झाली पाहिजे. वादळामुळे पीक नष्ट होण्याची भीती आहे का ? मग सरंजामदाराचे धान्य प्रथम वाचविले पाहिजे. सुगीचे दिवस आहेत म्हणून झटकन कापणी केली पाहिजे का ? मग स्वतःच्या जमिनीवरील काम सोडून देऊन शेतकऱ्याने सरंजामदाराच्या पिकाची कापणी केली पाहिजे. जवळच्याच स्थानिक बाजारामध्ये विकता येईल असे गरजेपेक्षा थोडे अधिक पीक आले आहे का ? मग सरंजामदाराचे धान्य आणि मद्य शेतकऱ्याने प्रथम बाजारात नेऊन विकले पाहिजे. एखाद्या रस्त्याची किंवा पुलाची दुरुस्ती करायला हवी आहे का ? मग स्वतःचे काम सोडून शेतकऱ्याने तिकडे लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्याला आपले गहू गिरणीमध्ये दळायचे आहेत किंवा चरकामध्ये द्राक्षांचा रस काढायचा आहे का ? ते तो करू शकतो, पण सरंजामदाराच्या गिरणीमध्ये किंवा चरकामध्येच ते केले पाहिजे आणि त्यासाठी पैसे द्यावेच लागतील. सरंजामदार शेतकऱ्यावर कशाची जबरदस्ती करेल याला कसलीच मर्यादा नव्हती. बाराव्या शतकातील एका निरीक्षकानुसार, शेतकऱ्याला “ स्वतःच्या दारूची चव घेता येत नाही किंवा चांगल्या अन्नाचा तुकडा कधी त्याच्या वाट्याला येत नाही; आपला काळा पाव, थोडेसे लोणी आणि चीज स्वतःसाठी राखता आले तरी तो स्वतःला सुखी समजतो ” :

> “ भरघोस पीक आले असेल त्याच्या शेतात
> किंवा लठ्ठ कोंबडी असेल त्याच्या झोपडीत
> तर द्यावी ती सरदाराला, हीच होती रीत. ”

म्हणजे त्या काळचा हा शेतकरी गुलाम होता का ? वास्तविक बहुतेक सर्व शेतकरी लोकांना ‘ सर्फस् ’ म्हणण्यात येई. सर्फ हा शब्द लॅटिन भाषेमधील ‘ सर्व्हस ’ या [illegible] आला होता. सर्व्हस म्हणजे गुलाम. पण आपण गुलाम हा शब्द ज्या अर्थाने वापरतो त्या अर्थाने त्याकाळचे शेतकरी गुलाम नव्हते. त्या मध्ययुगीनकाळी वृत्तपत्रे [illegible], **चार्लस्टन कूरियर** या वृत्तपत्रात १२ एप्रिल १८२८ रोजी

आलेल्या पुढील जाहिरातीप्रमाणे जाहिरात तेव्हा सापडली नसती : " पूर्वी कधीही विक्रीकरता देण्यात आला नसेल असा मौल्यवान परिवार....या परिवारात ३५ वर्षांचा आचारी असून त्याची १४ वर्षांची मुलगी आणि ८ वर्षांचा मुलगा आहे. **ग्राहकाच्या सोयीप्रमाणे संपूर्ण परिवार किंवा त्याचे घटक विकण्यात येतील.**"

ज्या तऱ्हेने मालकाच्या इच्छेनुसार (अमेरिकेतील) निग्रो गुलामाच्या परिवाराचे तुकडे पाडण्यात येत त्याप्रमाणे सर्फच्या म्हणजे भूदासाच्या परिवाराची गोष्ट नव्हती. मनोरच्या सरंजामदाराची इच्छा असो वा नसो, आपला परिवार एकत्रित ठेवण्याचा भूदासाला हक्क होता. गुलाम हा संपत्तीचा एक भाग होता. त्याला कोठेही, केव्हाही विकणे किंवा खरेदी करणे शक्य होते. परंतु जमिनीपासून तोडून भूदासाची विक्री करता येत नसे. सरंजामदार त्या मनोरचा ताबा दुसऱ्या सरंजामदाराला देऊ शके, पण याचा अर्थ एवढाच होता की भूदासावर आता नवा सरंजामदार येई; पण तो स्वतः मात्र त्या जमिनीच्या तुकड्यावर कायम राही. हा फरक महत्त्वाचा होता, कारण यामुळे भूदासाला एक प्रकारची सुरक्षितता मिळत असे. अशी सुरक्षितता गुलामाला कधीच नव्हती. भूदासाला वाईट वागवण्यात येत असले तरीही त्याचा स्वतःचा असा परिवार होता, घर होते आणि उपयोगासाठी थोडीशी जमीन होती. भूदासाला ही सुरक्षितता असल्यामुळेच ज्याच्यापाशी घर, जमीन किंवा अन्न नाही असा एखादा स्वतंत्र परंतु कंगाल माणूस "एखाद्या सरंजामदाराचे स्वामित्व मान्य करून, भूदास बनण्यास तयार होई आणि अशा रीतीने तो स्वतःच्या गळ्याभोवती फास अडकवून घेऊन पोटाला अन्न मिळवी."

भूदासाचे वेगवेगळे प्रकार होते, परंतु त्या प्रकारांमधील फरक पूर्णपणे शोधणे इतिहासकारांना कठीण झाले आहे. सरंजामदाराच्या परिवाराला कायमचे बांधलेले असे काहीजण होते. त्यांना 'डिमेन-सर्फस्' म्हणत. आठवड्यातील दोन-तीन दिवसच नव्हे तर नेहमीच ते सरंजामदाराच्या जमिनीवर काम करत. 'बॉर्डर्स' म्हणून काही अत्यंत गरीब भूदास होते. त्यांच्यापाशी गावाच्या हद्दीजवळ जेमतेम दोन-तीन एकराची जमीन असे. तर काहीजण 'कॉटर्स' म्हणून होते. त्यांच्याकडे अशी जमीनसुद्धा नसे; तर फक्त एक खोपटे असे आणि सरंजामदाराकडे ते अन्नावारी राबत.

'व्हिलन्स' म्हणून ओळखले जाणारे, अधिक वैयक्तिक आणि आर्थिक स्वातंत्र्य असलेले काही भूदास होते. (त्यांना आपण खंडकरी म्हणूया) स्वातंत्र्याच्या वाटेवर हे खंडकरी इतर भूदासांपेक्षा खूपच पुढे होते त्यांना अधिक हक्क होते आणि सरंजामदारासाठी त्यांना करावी लागणारी कामे कमी होती. तसेच त्यांची कामे अधिक निश्चित स्वरूपाची असत, तर इतर सर्फची ती तशी नसत. हा फरक महत्त्वाचा होता; कारण यामुळे त्यांना समाजामध्ये आपले स्थान नेमके कोठे आहे हे ठाऊक असे. सरंजामदार मन मानेल त्या पद्धतीने त्यांच्यावर अधिक कामे लादू शकत नसे. काही खंडकरी कामांच्या विशेष तावडगुकीतून मुक्त होते. त्यांना फक्त नियमित श्रमसेवा करावी लागे. काहीजण कुठल्याही प्रकारची श्रमसेवा करत नसत. त्याऐवजी ते आजच्या खंडकऱ्याप्रमाणे आपल्या उत्पन्नाचा एक भाग सरंजामदाराला देत. काही खंडकरी तर हा खंड पैशाच्या रूपाने देत. काळ जसा पुढे सरकला तशी ही शेवटची पद्धतच महत्त्वाची बनली.

काही खंडकरी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र माणसांइतके सबळ असत आणि स्वतःच्या जमिनी-खेरीज सरंजामदाराच्या जमिनीचा काही भाग ते खंडाने घेत. सरंजामदारासाठी कसलेही काम न करणारे आणि स्वतःचा स्वतंत्र धंदा असलेले काही लोक होते. सरंजामदाराला केवळ कर भरणारे हे मालक-शेतकरी होते. असे मालक-शेतकरी, खंडकरी आणि भूदास ही कुळे अनेक टप्प्याटप्प्यांनी एकमेकांत बरीच मिसळून गेली. त्यामुळे शेतकरी त्यांचा प्रकार कोणता होता आणि अशा प्रत्येकाचे सामाजिक स्थान नेमके काय होते हे निश्चितपणे ठरवणे आज कठीण आहे.

मनोरव्यवस्थेचे कुठलेही चित्रण काटेकोरपणे अचूक होणार नाही, कारण ठिकठिकाणची स्थिती वेगवेगळी होती. परंतु तरीही सरंजामशाही काळातील जवळपास सर्व पराधीन कष्टकऱ्यांबद्दल काही मूलभूत मुद्दे आपल्याला निश्चितपणे मांडता येतील.

सर्व शेतकरी कमी-अधिक प्रमाणात सरंजामदारांवर अवलंबून होते. सरंजामदारांना त्यांच्यासाठीच शेतकरी अस्तित्वात असतात असे वाटे. सरंजामदार आणि भूदास यांच्यामध्ये समानतेचा प्रश्न उद्‌भवतच नव्हता. भूदास जमिनीवर राबत असे आणि सरंजामदार त्याला राबवीत असे. सरंजामदाराच्या दृष्टीने भूदास आणि त्याच्या स्वतःच्या डिमेन्वरील गुरेढोरे यांच्यामध्ये विशेष असा फरक नव्हताच. अकराव्या शतकामध्ये एका फ्रेंच शेतकऱ्याची ३८ सू (एक फ्रेंच नाणे) किंमत केली गेली होती, तर एका घोड्याची किंमत होती १०० सू ! ज्याप्रमाणे जमीन कसायला लागणारे घोडे गेले तर सरंजामदाराला वाईट वाटे, त्याचप्रमाणे जमिनीवर काम करणारी मानवी गुरे, म्हणजे भूदास सोडून गेले तर त्याला वाईट वाटे. यामुळेच भूदासाला जमिनीपासून अलग करून विकून टाकणे सरंजामदाराला शक्य नव्हते आणि भूदास जमीन सोडून जाणे शक्य नव्हते. " भूदासाला ही जमीन ' टेन्युअर ' (लॅटिन ' टेनेअर ' म्हणजे बांधून ठेवणे या शब्दावरून) म्हणून [टेन्युअरला आपण कूळसंबंध म्हणूया] कसण्यासाठी मिळत असे. कायद्याप्रमाणे भूदास कूळसंबंधांनी बांधलेला होता. कूळसंबंध ठरवण्याचे स्वातंत्र्य त्याला नव्हते. " त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला आणि तो पकडला गेला तर त्याला जबर शिक्षा होत असे—परत येण्यावाचून त्याला गत्यंतर नव्हते. १३४९–१३५८ च्या ब्रॅडफोर मनोरच्या दप्तरामध्ये खालील उल्लेख आहे : " सरंजामदाराची वेठबिगार असलेली, विल्यम चिल्डयोंगची मुलगी ॲलिस्, यॉर्क येथे राहात आहे. म्हणून तिला परत आणावे (अटक करावी). "

याचप्रमाणे कष्टकऱ्यांना सोडण्याची सरंजामदाराची तयारी नसल्यामुळे विशेष परवानगीशिवाय भूदासच्या मुलांनी ' डिमेन् 'बाहेरील कोणाशीही विवाह करू नयेत असे नियम होते. एखादा भूदास मेल्यावर, त्याच्या नजिकच्या वारसाला त्या जमिनीचा ताबा मिळे, पण त्यासाठी त्याला काही कर भरावा लागे. आधीच उल्लेखलेल्या दप्तरामध्ये नोंदवलेली ही एक घटना पाहा : " रिचर्डचा मुलगा रॉजर याचा मुलगा रॉबर्ट याच्याकडे कूळसंबंधामुळे आलेली आठ एकर जमीन होती. तो मरण पावला. यापुढे त्याचा भाऊ व वंशज जॉन याच्याकडे ती जमीन कूळसंबंधाने येईल आणि मनोरच्या प्रथेनुसार त्या

जमिनीची तो इतर वंशजांसहित व्यवस्था पाहील ... आणि या खातर सरदारला तो तीन शिलिंग्ज् देणार आहे. "

वरील उताऱ्यातील 'मनोरच्या प्रथेनुसार' हे शब्द महत्त्वाचे आहेत. सरंजामी व्यवस्था समजून घेण्यासाठी ते गुरुकिल्लीप्रमाणे उपयोगी आहेत. शहरातील किंवा जिल्ह्यातील व्यवस्थापनाने केलेल्या कायद्यांचे आज असणारे स्थान त्या वेळी मनोरच्या प्रथेचे होते. विसाव्या शतकामध्ये कायद्याला जे बळ आहे तेच बळ त्यावेळी प्रथेला होते. सर्व गोष्टींवर ताबा असणारे शक्तिमान सरकार मध्ययुगीनकाळी अस्तित्वात नव्हते. ती संपूर्ण व्यवस्था व्यक्तीव्यक्तीमधील कर्तव्ये आणि सेवा यानी वरपासून खालपर्यंत श्रेणीबद्ध होती. आज एखाद्याकडे जमिनीची मालकी असते याचा अर्थ त्या जमिनीचे तो काय पाहिजे ते करू शकतो. परंतु त्याकाळी मिळणाऱ्या जमिनीच्या ताब्याचा अर्थ असा नव्हता. जमिनीच्या ताब्याबरोबरच ज्याच्याकडून ती जमीन कूळसंबंधांनी मिळाली त्याच्याबद्दलची कर्तव्येही कुळाला पार पाडावी लागत. कूळ कर्तव्याला चुकल्यास त्याच्याकडून जमीन काढून घेतली जाई. भूदासाने सरंजामदाराची करायची सेवा आणि सरंजामदाराने त्या बदल्यात पार पाडायची कर्तव्ये — उदाहरणार्थ युद्धाच्या काळात भूदासाला संरक्षण देणे — या गोष्टी प्रथेनुसार मान्य होत्या आणि त्या अंमलात आणल्या जात. अर्थात आज जसे कायदे मोडले जातात त्याचप्रमाणे कधी कधी प्रथाही तोडल्या जात. अशा वेळी दोन भूदासांमधील भांडण सरंजामदाराच्या दरबारामध्ये–प्रथेनुसार–सोडवण्यात येई. सरंजामदार आणि भूदास यांच्यामधील तंट्याचा निकाल बहुंशी सरंजामदाराच्याच बाजूने होई, कारण सरंजामदारच न्यायाधीश असे. परंतु एखाद्या सरंजामदाराने प्रथा अनेक वेळा तोडल्याचे आढळल्यास त्याच्या वरिष्ठ–सरंजाम-दाराकडून त्याला शासन झाल्याची काही उदाहरणेंही त्याकाळच्या कागदपत्रांमध्ये आहेत. विशेषतः इंग्लंडच्या बाबतीत ही गोष्ट अधिकच खरी होती. कारण तेथे राजाच्या दरबारामध्ये शेतकऱ्यांचा न्यायनिवाडा होत असे.

एका मनोरचा सरंजामदार आणि दुसऱ्या मनोरचा सरंजामदार यांच्यामधील झगड्याच्या वेळी काय होत असे ? या प्रश्नाचे उत्तर हा सरंजामशाहीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. भूदासाप्रमाणेच मनोरच्या सरंजामदाराची जमिनीवर पूर्ण मालकी नसे, तर सामाजिक शिडीमधील वरिष्ठ–सरंजामदाराला परस्पर कर्तव्यांच्या बंधनांनी तो बांधलेला असे. भूदास, खंडकरी किंवा मालक–शेतकरी ज्याप्रमाणे मनोरच्या सरंजामदाराचे " कूळ " असत, त्याचप्रमाणे तो सरंजामदार एका काऊंटचा कनिष्ठ–सरंजामदार असे; तो काऊंट एका ड्यूकचा कनिष्ठ–सरंजामदार आणि तो ड्यूक राजाचा कनिष्ठ–सरंजामदार असे. काही वेळा ही साखळी आणखीही पुढे जात असे. एक राजा दुसऱ्या राजाचा कनिष्ठ–सरंजामदार असे ! सरंजामशाहीमधील कनिष्ठ–वरिष्ठ सरंजामी संबंधांच्या या जाळ्याचे चित्र १२७९ मधील इंग्लिश न्यायासनाच्या दप्तरातील उताऱ्यामध्ये चांगले उमटले आहे. " सेन्ट जर्मेनच्या रॉजरकडे तीन पेनीच्या देय-कराराने बेडफोर्डच्या रॉबर्टकडून जमिनीचा एक तुकडा आला आहे. हाच रॉबर्ट, रिचर्ड हिल्बेरटरचा कनिष्ठ–सरंजामदार असल्याने त्याला रॉजरकडून सहा पेनी देय

रक्कम मिळते. तोच रिचर्ड, ॲलन द् चार्त्रेचा कनिष्ठ-सरंजामदार असून त्याला वर्षाला दोन पेनी देतो. हा ॲलन, विल्यम द् बटलरचा कनिष्ठ–सरंजामदार असून हा विल्यम, सरदार गिल्बर्ट द् नेव्हिलचा कनिष्ठ–सरंजामदार आहे. त्याच गिल्बर्टकडे लेडी देव्हॉर्गिला द् वाल्यॉलकडून देय-कराराने आलेली जमीन आहे. आणि देव्हॉर्गिलाकडे स्कॉटलंडच्या राजाकडून देय-कराराने आलेली जमीन आहे आणि स्कॉटलंडच्या राजाकडे इंग्लंडच्या राजाकडून देय-कराराने आलेली जमीन आहे. ”

अर्थात याचा अर्थ — ॲलन, विल्यम किंवा गिल्बर्ट वगैरेंच्याकडे देय-कराराने आलेली ही एवढीच जमीन होती का ? मुळीच नाही. मनोरचा नजिकचा सरंजामदार एखादा नाइट असे किंवा त्यावर अशा अनेक मनोरांनी बनलेल्या इस्टेटीच्या सरंजामदाराचे — काऊंटचे अधिपत्य असे किंवा अशा अनेक इस्टेटींची मालकी असलेल्या ड्यूकचा त्यावर अधिकार चाले. काही उमरावांकडे थोडेफार मनोर होते, काहींकडे कित्येक इस्टेटी होत्या, तर काही जणांकडे अनेक सरंजामी होत्या. उदाहरणार्थ, इंग्लंडमधील एका श्रीमंत उमरावाची इस्टेट जमिनीच्या वेगवेगळ्या ७९० तुकड्यांनी बनलेली होती. इटालीमधील काही श्रीमंत सरंजामदारांपाशी १०,००० मनोर होते. राजा हा देशातील सर्व जमिनींचा नामधारी मालक होता, त्याचप्रमाणे अनेक जमिनींचा तो खराखुरा मालकही होता. राजाचे कूळ असलेल्या लोकांना–मग ते उमराव असोत किंवा सामान्य मालक-शेतकरी असोत त्यांना शाहीकुळे (‘ टेनन्ट्स् –इन–चीफ –’) म्हणून संबोधण्यात येई.

बदलत्या काळानुसार मोठमोठ्या इस्टेटी छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये जवळपास सामान्य स्तरातील अनेक उमरावांमध्ये वाटल्या जाऊ लागल्या. कारण प्रत्येक सरंजामदाराला जेव्हा आपले अधिकाधिक कनिष्ठ-सरंजामदार असण्याची गरज भासू लागली तेव्हा त्यासाठी आपल्याजवळ असलेल्या जमिनीपैकी काही भाग कनिष्ठ-सरंजामदारांना देणे हेच त्याला शक्य होते.

आजकाल आपण ज्या गोष्टींचा उपयोग करतो त्या निर्माण करण्यासाठी जमीन, कारखाने, गिरण्या, रेल्वे, बोटी आणि अनेक प्रकारची यंत्रसामुग्री यांची आवश्यकता असते. आणि या गोष्टी एखाद्या माणसाकडे किती प्रमाणात आहेत यावर तो श्रीमंत आहे की नाही ते आपण ठरवतो. परंतु सरंजामी काळामध्ये माणसांना लागणाऱ्या बहुतेक गोष्टी जमिनीतूनच निर्माण केल्या जात आणि जमीन व फक्त जमिनच माणसाच्या भाग्याची गुरुकिल्ली होती. माणसाच्या श्रीमंतीचे ते एकच एक माप होते. साहजिकच त्याकाळी जमीन मिळवण्यासाठी सतत चढाओढ लागलेली असे. यामुळे सरंजामशाहीचा काळ हा युद्धाचा काळ होता असे सांगितले तर कोणाला आश्चर्य वाटायला नको. युद्धे जिंकण्यासाठी अधिकाधिक माणसे आपल्या बाजूला वळवून घेणे आवश्यक होते आणि त्यासाठी त्यांना मोबदला द्यावा लागे. काही पैसे देण्याचे आणि लागेल तेव्हा मदत देण्याचे वचन त्यांच्याकडून घ्यायचे आणि त्याच्या बदल्यामध्ये जमिनीच्या एका तुकड्यावरील खंडवसुलीचा अधिकार त्यांना द्यायचा अशी पद्धत तेव्हा रूढ होती. या संदर्भात १२०० सालच्या फ्रेंच दप्तरातील उतारा पाहा : “ मी ट्रॉयस्‌चा

काऊंट थिबॉल्ट जाहीर करतो की गिलेनकोर्ट नावाचा मनोर मी जॉस्लीन् दाव्हलॉन आणि त्याच्या वंशजांना खंडवसुलीसाठी देत आहे. तो जॉस्लीन् आता माझा कनिष्ठ–सरंजामदार (लीग मॅन) झाला आहे. ''

एक कनिष्ठ–सरंजामदार म्हणून इतर कर्तव्यांखेरीज वरिष्ठ–सरंजामदाराला युद्धामध्ये मदत करण्याची जॉस्लीन्‌कडून अपेक्षा होती. काही विशिष्ट दिवसांकरता शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेली काही माणसे पुरवण्याची त्याच्यावर जबाबदारी असावी.

इंग्लंड आणि फ्रान्समध्ये एका नाइटची लष्करी सेवा चाळीस दिवसांची असे. परंतु त्याच्या निम्मी किंवा एकचतुर्थांश लष्करी सेवा देण्याचा करारही केला जाई. १२७२ साली फ्रान्सचा राजा युद्धामध्ये गुंतलेला होता. म्हणून त्याने आपल्या लष्करी कनिष्ठ सरंजामदारांना राजसेनेमध्ये दाखल होण्यास फर्मावले. काहीजणांनी स्वतः येऊन आपली सेवाकर्तव्ये बजावली तर काहीजणांनी पर्यायी माणसे पाठवली. '' रेगिनाल्ड ट्रिहान हा नाइट स्वतः आला असून सैन्यामध्ये दाखल झाला आहे. विल्यिम द कॉयनिअर्स या नाइटने स्वतःऐवजी थामस कॉरवेला याला दहा दिवसांकरता पाठविले आहे. जॉन द शान्तेल्यू हा सरदार स्वतःकरता दहा दिवस आणि गोडार्डस् द गोडार्डव्हिल या सरदारासाठी चाळीस दिवस आला आहे. ''

ज्या अमीर-उमरावांना लष्करी सेवेच्या मोबदल्यात अशी जमीन मिळत असे ते इतरांना तशाच स्वरूपाच्या अटींवर ती सरंजामी म्हणून देत. त्यापासून मिळणारे हक्क आणि बजावावी लागणारी कर्तव्ये यात ठिकठिकाणी फरक होता, पण युरोपच्या मध्य-भागापैकी काही भाग आणि पश्चिम युरोप यामध्ये त्यांचे स्वरूप साधारणपणे सारखेच होते. स्वतःला हवी त्याप्रमाणे दुसऱ्याला जमीन देण्याची कनिष्ठ–सरंजामदारांना मुभा नव्हती, त्यासाठी त्यांना वरिष्ठ–सरंजामदाराची परवानगी घ्यावी लागे. जमीन दुसऱ्या कोणाला दिल्यास त्याबद्दल वरिष्ठ–सरंजामदाराला काही पैसे द्यावे लागत. ज्याप्रमाणे सर्फच्या वंशजाला वारसाहक्काने जमिनीचा ताबा घेताना मनोरच्या सरंजामदाराकडे कर भरावा लागे, त्याचप्रमाणे सरंजामदाराच्या वंशजाला वारसाहक्काने जमिनीचा ताबा घेताना वरिष्ठ–सरंजामदाराला कर द्यावा लागे. एखादा कनिष्ठ–सरंजामदार मेल्यानंतर त्याचा वंशज जर अल्पवयीन असेल तर तो वयात येईपर्यंत त्या जमिनीचा ताबा वरिष्ठ–सरंजामदाराकडे राही. अल्पवयीन वंशजाला इस्टेटीचा कारभार सांभाळणे शक्य होणार नाही असा त्यामागचा सिद्धान्त होता. म्हणूनच वरिष्ठ–सरंजामदार इस्टेटीची व्यवस्था पाही, आणि त्या काळात आलेला खंडही अर्थातच तो गडप करी.

स्त्री-वंशजांना लग्नासाठी त्यांच्या वरिष्ठ–सरंजामदाराची परवानगी घ्यावी लागे. नेव्हर्सच्या काऊंटेसने १२२१ साली या गोष्टीची ग्वाही दिली आहे : '' मी नेव्हर्सची काऊंटेस माटिल्डा, देवाला स्मरून सर्व प्रजाजनांना हे जाहीर करू इच्छिते की, माझे परमप्रिय महाराज फिलिप आणि फ्रान्सचे महान राजेसाहेब यांची मी सेवा करीत राहीन आणि त्यांच्या संमतीशिवाय लग्न करणार नाही. ''

एखाद्या विधवेला जर पुनर्विवाह करायचा असला तर तिला आपल्या वरिष्ठ सरंजामदाराकडे दंड भरावा लागे. शाही कुळाच्या विधवेसंबंधीचा १३१६ सालचा

सरकारी दप्तरातील हा उल्लेख पाहा : " वॅलिंगफोर्डचा दिवंगत सरदार सायमन डार्क्स् याच्या पत्नीने १०० शिलिंग्ज दंड भरला आहे. त्याखातर तिला पुन्हा लग्न करण्यास परवानगी देण्यात येत आहे. परंतु ज्याच्याशी ती लग्न करील तो राजेसाहेबांच्या आज्ञेत राहण्यास तयार असला पाहिजे. "

याउलट एखाद्या विधवेला जर पुनर्विवाह करायचा नसेल तर वरिष्ठ-सरंजामदाराने तिच्यावर लग्नाची सक्ती करू नये म्हणून तिला कर भरावा लागे. " वार्विकची काऊंटेस ॲलिस १००० पौंड भरून तिला वाटेल तोपर्यंत विधवा म्हणून राहण्यासाठी आणि लग्न करण्याची राजेसाहेबांनी सक्ती करू नये यासाठी परवानगी मागत आहे. "

जमीन आणि संरक्षण यांच्या बदल्यात कनिष्ठ-सरंजामदारांना वरिष्ठ-सरंजामदारांसाठी काही कर्तव्ये पार पाडावी लागत. जर वरिष्ठ-सरंजामदाराला शत्रूने पकडले तर कनिष्ठ-सरंजामदाराने त्याच्या सुटकेसाठी स्वतः जावे किंवा पैसे द्यावेत हा रिवाज होता. जेव्हा वरिष्ठ-सरंजामदाराच्या मुलाची नाइट म्हणून नियुक्ती होत असे तेव्हा त्याच्या मदतीसाठी कनिष्ठ-सरंजामदारांनी पैसे द्यावेत अशी रीतच होती. कदाचित समारंभाच्या खर्चासाठी त्याची आवश्यकता असेल. बाल्डविन नावाच्या एका माणसाने १२५४ मध्ये असे पैसे देण्यास नकार दिला, कारण त्याच्या म्हणण्याप्रमाणे ज्या राजाच्या मुलाला 'नाइट' करण्यात येत होते, तो राजा काही त्याचा नजिकचा वरिष्ठ-सरंजामदार नव्हता. बाल्डविनने तो खटला जिंकला असे आपल्याला इंग्लंडच्या सरकारी दप्तरावरून दिसते. " बाल्डविन द फ्रिविल हा शाहीकूळ नसून अलेक्झांडर द ॲबेटॉटचा कनिष्ठ सरंजामदार आहे. अलेक्झांडर द ॲबेटॉट हा विलियम द बोचाम्पचा कनिष्ठ सरंजामदार आहे. विलियम द बोचाम्प हा वोर्सेस्टरच्या बिशपचा कनिष्ठ-सरंजामदार आहे. हे खरे असेल तर राजाच्या मुलाला 'नाइट' करण्यासाठी द्यायच्या करामधून बाल्डविनची सुटका करण्यात यावी असा वोर्सेस्टरच्या शेरीफना आदेश देण्यात येत आहे. "

वरील उताऱ्यावरून लक्षात येईल की बाल्डविन आणि राजा यांच्यामध्ये नेहमीचीच वरिष्ठ-सरंजामदारांची साखळी होती. त्याचप्रमाणे त्यांच्यापैकी एकजण वोर्सेस्टरचा बिशप होता हेदेखील महत्त्वाचे आहे. कारण चर्चसंस्था हा सरंजामी व्यवस्थेचा एक आंतरिक घटक होता असे त्यावरून स्पष्ट होते. काही बाबतीत सरंजामी पिरॅमिडच्या शिखरावर असलेल्या राजापेक्षा त्याचे महत्त्व कमी असले तरी काही बाबतीत ते अधिकही होते. कारण चर्च ही सर्व खिश्चन जगतामध्ये पसरलेली संस्था होती. कोणत्याही सिंहासनापेक्षा ती अधिक सनातन, सलग, व्यापक आणि शक्तिमान होती. ते धार्मिक युग होते आणि चर्चची प्रतिष्ठा आणि पारमार्थिक शक्ती फार प्रचंड होती. त्यावेळी संपत्ती ही जमिनीच्या स्वरूपातच शक्य होती व चर्चकडे भरपूर जमीन होती. सरंजामी काळामधील चर्चसंस्था हा सर्वात मोठा जमीनदार होता. जीवनात केलेल्या पापी कृत्यांबद्दल खंत वाटणारे आणि मरण्यापूर्वी पापक्षालन करून स्वर्गप्राप्ती व्हावी असे वाटणारे लोक चर्चला जमीन देत. तसेच आजारी आणि गरीब यांची सेवा करण्याचे चांगले काम करणाऱ्या चर्चला त्या कामात मदत करावी असे वाटणारे लोक चर्चला जमीन देत. युद्धामध्ये शत्रूच्या जमिनी जिंकल्यावर त्यातील काही भाग चर्चला देण्याची काही

अमीर–उमरावांनी प्रथाच पाडली होती. या आणि अशा अनेक प्रकारांनी चर्चने बरीच जमीन गोळा केली होती. यामुळे अखेर पश्चिम युरोपातील जवळपास एक-तृतीयांश ते निम्मी जमीन चर्चच्या हाती एकवटली होती.

काऊंटस् आणि ड्यूक्स यांचे सरंजामी व्यवस्थेमध्ये जसे स्थान होते त्याचप्रमाणे बिशप आणि ॲबट यांचेदेखील होते. बोव्हे येथील बिशपला 'दिलेल्या सरंजामी हक्कांचा ११६७ मधील हा दाखला पाहा : " मी फ्रान्सचा राजा लुई देवाला स्मरून हे जाहीर करतो की आपल्या सर्वांच्या उपस्थितीमध्ये मान्ते येथे शॅम्पेनच्या काऊंट हेन्रीने सॅव्हिनीची सरंजामी बोव्हेचा बिशप बार्तोलोमिओ आणि त्याच्या वंशजांना दिली आहे. या सरंजामीच्या मोबदल्यात हेन्रीच्या सेवेसाठी एका नाइटची व्यवस्था करण्याचे त्या बिशपने कबूल केले आहे आणि आपले वंशजही पुढे ते काम करतील हे त्याने मान्य केले आहे. "

ज्याप्रमाणे एखाद्या वरिष्ठ–सरंजामदाराकडून चर्चसंस्थेला जमीन मिळत असे त्याच-प्रमाणे चर्चसंस्थासुद्धा वरिष्ठ–सरंजामदार म्हणून काम करत असे. " विलियम माऊदयूचा मुलगा रॉबर्ट याला ॲबट फाऊरिथिअसनी वेस्टनमधील चार बिघ्यांची जमीन सरंजामी म्हणून दिली आहे. याखातर त्याने ॲबटची सेवा पत्करावी. जेव्हा जेव्हा ॲबिंग्डनच्या चर्चला नाइटची सेवा द्यावी लागेल, तेव्हा अर्ध्या नाइटची सेवा देण्याचे रॉबर्टने मान्य करावे."

सरंजामशाहीच्या सुरुवातीच्या काळात चर्च ही सुधारणावादी, जिवंत संस्था होती. रोमन साम्राज्याच्या संस्कृतीचा मोठा वारसा तिच्याकडे होता. तिने शिक्षणावर भर दिला आणि शाळांची स्थापना केली. चर्चसंस्थेने गरिबांना मदत केली, अनाथ मुलांची काळजी वाहिली आणि आजाऱ्यांसाठी दवाखाने उघडले. सर्वसाधारणपणे धर्मोपदेशक-सरंजामदार हे इतर सरंजामदारांपेक्षा आपल्या इस्टेटीची अधिक चांगली देखभाल करीत आणि त्याद्वारे अधिक संपत्ती निर्माण करीत.

परंतु याच नाण्याची दुसरीही बाजू होती. आपल्या बाजूला अधिकाधिक लोक मिळविण्यासाठी उमराव त्यांच्या अखत्यारीतील जमिनीचे अधिकाधिक तुकडे पाडीत. तर याउलट चर्चने अधिकाधिक जमीन मिळवायला सुरुवात केली होती. चर्चच्या अधिकाऱ्यांच्या मुलांमध्ये संपत्तीचे वाटप होऊ नये असे धर्मोपदेशकांचे मत होते. म्हणूनच चर्चमधील अधिकाऱ्यांवर लग्न न करण्याचे बंधन होते. तसेच ' टाइथ ' (दशमांश कर) नावाच्या करामार्फतही चर्च स्वतःची संपत्ती वाढवी. सर्वांच्या मिळकतीवर दहा टक्के एवढे या कराचे प्रमाण होते. एक प्रसिद्ध इतिहासकार म्हणतात : " अर्वाचीन युगाला ठाऊक असलेल्या आयकर, जमीनमहसूल किंवा मृत्यूकर अशा कोणत्याही करापेक्षा हा कर भयंकर होता. शेतकरी आणि खेडूत यांना त्यांच्या उत्पन्नाच्या दहा टक्के भाग चर्चला या करापोटी द्यावा लागे. एवढेच नव्हे, तर प्राण्यांच्या लोकरीचा दहावा हिस्सा, वा रस्त्याच्या कडेला वाढणाऱ्या गवताचाही हिस्सा त्यांना चर्चकडे सुपूर्द करावा लागे. हा दशमांश कर देण्यापूर्वी आपली मिळकत खर्च करणारा शेतकरी नरकात जाई. "

चर्चसंस्थेची संपत्ती जसजशी वाढू लागली तसतसे पारमार्थिक महात्म्यापेक्षा तिचे आर्थिक महत्त्व वाढू लागले. काही इतिहासकारांच्या मते एक सरंजामदार म्हणून चर्चसंस्था इतरांपेक्षा चांगली तर सोडाच पण काही वेळा कांकणभर वाईटच होती. " सेंट लुईच्या काळामध्ये नॉत्र दाम द पॅरिसच्या परगण्यामधील भूदासांची पिळवणूक जबरदस्त होती. राणी ब्लान्चने अत्यंत विनम्रपणे ही गोष्ट निदर्शनास आणली असता धर्मोपदेशकांनी उत्तर दिले की, त्यांच्या भूदासाना हवे तर ते भुकेले मरतील."

काहीजणांचे असेही मत आहे की चर्चसंस्थेच्या धर्मादाय कामाचा जास्तच उदोउदो करण्यात येतो. गरीब व आजारी लोकांना चर्चने मदत केली ही गोष्ट ते मान्य करतात; पण त्यांच्या मते मध्ययुगीन काळातील सर्वात श्रीमंत आणि शक्तिमान जमीनदार चर्चसंस्थाच होती. हे लक्षात घेता उमराव–सरंजामदारांनी जेवढी मदतीची कामे केली तेवढीही चर्चसंस्थेने केली नाहीत असेच म्हणावे लागते. आपण करीत असलेल्या धर्मादाय कामाला मदत करण्याची या धर्मसंस्थेने श्रीमंतांना जरी विनंती केली तरी स्वतःच्या संपत्तीचा फारसा भाग खर्च न करण्याचीही तिने काळजी घेतली. त्याचबरोबर हे टीकाकार असेही दाखवून देतात की चर्चने आपल्या भूदासांची एवढी जबरदस्त पिळवणूक केली नसती तर अशा धर्मादाय कामाची मुळात जरूरच पडली नसती.

चर्चसंस्था आणि अमीर–उमराव हे सरंजामदार म्हणजे राज्यकर्ते होते. जमीन आणि त्याबरोबर येणाऱ्या सत्तेचे ते धनी होते. लोकांना चर्च पारमार्थिक मदत करी तर उमराव लष्करी संरक्षण देत आणि कामाची भरपाई म्हणून कष्टकरी वर्गाकडून ते श्रमसेवेच्या रूपाने खंड वसूल करत. मध्ययुगीन काळाचा गाढा व्यासंग असणारे एक इतिहासकार प्राध्यापक बॉइझॉनाद यांनी या साऱ्याचा असा निष्कर्ष काढला आहे : " सरंजामी व्यवस्थेमध्ये कसेल त्याच्या हाती नव्हे तर बळकावेल त्याच्या हाती जमीन होती. खोट्या भासमान संरक्षणाच्या मोबदल्यात कष्टकरी वर्गांना आळशी वर्गाच्या मर्जीची शिकार बनवणारी ती समाजव्यवस्था होती "

◇ ◇ ◇

२

आणि व्यापाऱ्याचे आगमन

आजकाल फारच थोडे श्रीमंत लोक सोने आणि चांदी यांनी भरलेले हंडे घरामध्ये ठेवतात. स्वतःजवळचे पैसे लोक कुजवत नाहीत. त्यांना त्या पैशाचा स्वतःकरता उपयोग व्हावा असे वाटते. यामुळेच किफायतशीर मार्गांनी पैसे गुंतवण्याचा ते प्रयत्न करतात. ज्या ठिकाणी सर्वांत अधिक व्याज मिळण्याची संधी असते तेथे ते आपले पैसे गुंतवतात. मग ते आपले पैसे एखाद्या धंद्यात घालतील किंवा एखाद्या पोलाद कंपनीचे समभाग विकत घेतील, नाहीतर सरकारी कर्जरोखे घेतील वा आणखीन काही करतील. पैसे गुंतवून अधिक पैसे मिळवण्याचे आज एकच नव्हे तर हजारो मार्ग उपलब्ध आहेत.

परंतु मध्ययुगाच्या सुरुवातीला पैसेवाल्या लोकांना अशा संधी उपलब्ध नव्हत्या. तेव्हा फारच थोड्या लोकांकडे वापरण्यासाठी पैसा होता आणि ज्यांच्याकडे तो होता त्यांना त्याचा फारसा उपयोग नव्हता. चर्चची भांडारे सोन्या-चांदीने भरलेली असत आणि त्याभोवती कडेकोट बंदोबस्त केलेला असे. काही प्रमाणात वेदीचे दागिने खरेदी करण्यासाठी या संपत्तीचा उपयोग केला जाई. चर्चजवळ मोठा धनसाठा होता, पण ते निरुपयोगी भांडवल होते. आज जशी पैशाची चलती आहे तशी स्थिती त्यावेळी नव्हती. चर्चचा पैसा अधिक संपत्ती निर्माण करण्यासाठी वापरता येत नसे; कारण त्यासाठी मार्गच उपलब्ध नव्हते. अमीर-उमरावांकडे असलेल्या पैशांचीही हीच स्थिती होती. खंडाच्या किंवा दंडाच्या रूपाने त्यांच्या हातात जरी पैसा आला तरी त्यांना तो उद्योग-धंद्यांमध्ये गुंतवता येत नसे. कारण त्यावेळी फारच थोडे उद्योगधंदे चालू होते. अशा परिस्थितीत धर्मोपदेशक आणि सरदार मंडळीकडे जे काही भांडवल होते ते निरुद्योगी, स्थिर आणि अनुत्पादक होते.

त्यावेळी खरेदी करण्यासाठी प्रतिदिनी पैशाची गरज नव्हती का? नव्हती. कारण तेव्हा जवळपास काहीच विकत घेतले जात नसे. कदाचित थोडेफार मीठ आणि कधीमधी लागणारे लोखंड सोडून लोकांना लागणारे बाकीचे जवळपास सर्व पदार्थ—म्हणजे अन्न आणि कपडे मनोरवरच उपलब्ध होते. सरंजामशाहीच्या सुरुवातीच्या काळात पैशाचा जवळपास वापर न करता समाजातील आर्थिक व्यवहार केला जाई. दैनंदिन गरजा भागवणारी

ती अर्थव्यवस्था होती आणि मनोरमधील गाव जवळपास स्वयंपूर्ण होते. आज तुम्हाला जर कोणी विचारले की तुमचा नवा ओव्हरकोट तुम्ही केवढ्याला घेतलात, तर हजार हिश्श्यांनी तुमचे उत्तर रुपये आणि पैशात असेल. पण हाच प्रश्न तुम्हाला मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळात विचारला असता तर तुम्ही उत्तर दिले असतेत, " मी स्वतःच कोट तयार केला. " भूदासाचे कुटुंब ज्याप्रमाणे स्वतःला लागणारे धान्य स्वतःच पिकवत असे त्याचप्रमाणे स्वतःला लागणारी भांडीकुंडी आणि इतर सामानसुमान स्वतःच तयार करीत असे. स्वतःला लागणाऱ्या गोष्टी मिळवण्यासाठी सरंजामदार चांगली कारागिरी जाणणारे भूदास स्वतःच्या परिवाराला बांधून घेत. थोडक्यात मनोरमधील गाव जवळपास स्वयंपूर्ण होते. लोक आपल्याला आवश्यक त्या गोष्टी तयार करीत आणि त्यांचा उपभोग घेत

अर्थात, काही प्रमाणात तेथे वस्तूंचा विनिमयही होत असे. उदाहरणार्थ, ओव्हरकोट तयार करण्यासाठी तुमच्याकडे पुरेशी लोकर नसेल किंवा तुमच्या कुटुंबात पुरेसा वेळ आणि कसब असलेली व्यक्ती नसेल तर मग अशा परिस्थितीत वर विचारलेल्या ओव्हरकोटबद्दलच्या प्रश्नाला तुमचे उत्तर असेल, " मी पाच गॅलन वाइनच्या बदल्यात तो घेतला." हा विनिमय किल्ल्याच्या किंवा चर्चच्या बाहेरील आठवड्याच्या बाजारामध्ये होत असे, किंवा जवळपासच्या तालुक्याच्या वा जिल्ह्याच्या गावी होत असे. हा बाजार बिशप किंवा सरदाराच्या अधिपत्याखाली असे आणि त्यांच्या भूदासांनी किंवा कारागिरांनी केलेले वरकड उत्पादन तेथे विकण्यात येई. परंतु व्यापाराचे प्रमाण फारच कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वरकड उत्पादन करण्याची तेव्हा जरूरच नव्हती. बाजार-पेठेत नियमित मागणी असेल तरच माणसे त्यांच्या गरजेपेक्षा अधिक उत्पादन करतात. अशी मागणीच नसेल तर वरकड उत्पादन करण्यासाठी काही प्रेरणाच नसते. म्हणूनच आठवड्याच्या बाजारातील व्यापार हा नेहमी लहान प्रमाणावर आणि स्थानिक स्वरूपाचा असे. व्यापार वाढविण्यात नादुरुस्त आणि गैरसोयीचे रस्ते हा एक आणखी अडथळा होता. त्यावेळचे रस्ते अरुंद तर होतेच पण त्याचबरोबर खाचखळगे आणि चिखलाची डबकी यामुळे ते प्रवासाला अयोग्य होते. याशिवाय दोन प्रकारच्या लुटारूंपासून प्रवाशांना सतत धोका असे. एक म्हणजे सामान्य चोर तर दुसरे सरंजामदार ! स्वतःच्या भागातील रस्त्यांवरून प्रवास करण्याबद्दल सरंजामदार व्यापाऱ्यांकडून कर वसूल करीत. सरदारांकडून घेतला जाणारा हा कर ही एवढी नित्याची बाब होती की " टूर्समधील ओडो यानी अकराव्या शतकामध्ये लुआर नदीवर पूल बांधून तो सर्वांना मोफत पार करण्यास परवानगी दिली तेव्हा लोकांना आश्चर्यच वाटले." व्यापार करण्यामध्ये आणखीही अनेक अडचणी होत्या. उदाहरणार्थ, पैसा हा दुर्मिळ होता आणि वेगवेगळ्या ठिकाणी त्याचे परिमाण वेगवेगळे होते वजने आणि मापे देखील विविध ठिकाणी निरनिराळी होती. अशा परिस्थितीत दूर अंतरावर वस्तू हलवणे अर्थातच धोकादायक, त्रासाचे आणि मनस्वी खर्चिक होत असे. या सर्व कारणांमुळे या स्थानिक सरंजामी बाजारामधील व्यापार अतिशय मर्यादित होता.

पण तो तसाच राहिला असे समजणे चुकीचे ठरेल. काळाच्या ओघाबरोबर व्यापार वाढू

लागला आणि नंतर तो इतका वाढला की त्याने मध्ययुगीन जीवन पार पालटून टाकले. अकराव्या शतकामध्ये व्यापाराने मोठीच उचल घेतली, त्यामुळे बाराव्या शतकामध्ये पश्चिम युरोपचा चेहरामोहराच बदलून गेला.

'धर्मयुद्धां'मुळे व्यापाराला चांगली बरकत आली. मुसलमानांच्या हातून 'पवित्र भूमी' (जेरुसलेम) जिंकून घेण्यासाठी हजारो युरोपियन लोकांनी भूमार्गाने वा समुद्र-मार्गाने युरोप खंड पार केला. या दूरच्या मार्गावर ठिकठिकाणी त्यांना रसद पुरवण्याची गरज होती आणि यामध्ये व्यापाऱ्यांनी त्यांना साथ दिली. पूर्वेच्या मोहिमेवर असताना धर्मयोद्ध्यांनी ऐश्वर्य पाहिले होते; पंचपक्वान्नांचा आणि ऐषारामी राहणीचा उपभोग घेतला होता. परतताना त्याची भूकही ते बरोबर घेऊन आले. त्यांच्या या नवीन गरजांमुळे अशा वस्तूंना मागणी निर्माण झाली. तसेच दहाव्या शतकानंतर युरोपच्या लोकसंख्येतही चांगली वाढ झाली होती. या वाढलेल्या लोकसंख्येला अधिक वस्तूंची गरज होती. आता या नवीन लोकांपैकी काहीजणांकडे जमीन नव्हती आणि त्यांना स्वतःचे जीवन सुधारण्याची संधी या धर्मयुद्धांमध्ये दिसली. अनेकदा भूमध्य समुद्रावरील मुसलमान आणि पूर्व युरोपातील जमाती टोळ्या यांच्याशी होणाऱ्या सरहद्दीबाबतच्या लढायांना धर्मयुद्धांचे मोठे गोंडस नाव देण्यात आले असले तरी वास्तवात त्या लुटालूट करण्या-साठी वा भूप्रदेश बळकावण्यासाठी केलेल्या लढाया होत्या. या चढायांना चर्चने प्रतिष्ठेची झूल चढविली व प्रेषिताच्या शिकवणीचा प्रसार करणे किंवा अश्रद्धांना नेस्तनाबूत करून पवित्र भूमीचा बचाव करणे हे हेतू असल्याचा आभास निर्माण केला.

'पवित्र भूमी'कडे फार पूर्वीपासूनच यात्रा निघत. (आठव्या ते दहाव्या शतकांमध्ये अशा ३४, तर अकराव्या शतकामध्ये अशा ११७ यात्रा निघाल्या होत्या.) पवित्र भूमीची सुटका करण्याची ऊर्मी सामान्य जनांना खरोखरच होती आणि स्वार्थ साधण्याचे इतर काहीच साधन नसणाऱ्या अनेकांनी त्याला पाठिंबा दिला होता. परंतु धर्मयुद्धां-मागील खरी शक्ती आणि ज्या उत्साहाने युद्धे लढवली गेली तो उत्साह मात्र काही विशिष्ट सामाजिक गटांच्या फायद्यावरच आधारित होता.

सर्वात पहिला वाटा चर्च संस्थेचा होता. चर्चच्या मनात प्रामाणिक धार्मिक हेतूच होता पण तो लढायांचा आणि लढवय्यांचा काळ होता याचीही चर्चला जाणीव होती. आणि योद्ध्यांच्या हिंसक भावनांचा उद्रेक दुसऱ्या देशातील लोकांशी लढताना व्हावा हे उद्दिष्ट चर्चने मनात बाळगले. योद्धे जिंकले तर पराजितांना ख्रिश्चन करता येईल हा दुसरा हेतूही त्यांच्या मनात होता. १०९५ साली फ्रान्समधील क्लेरमॉन्ट येथे पोप अर्बन (दुसरे) सत्तास्थानी आले. त्यांचे भाषण ऐकायला आलेल्या सर्व लोकांना सामावून घेईल एवढी मोठी इमारत तेथे नसल्यामुळे खुल्या मैदानात झालेल्या सभेत त्यांनी श्रोत्यांना धर्मयुद्ध पुकारण्याचे आवाहन केले. फुलकेअर ऑफ चार्त्र हे त्या सभेस हजर होते. त्यांनी पोपचे भाषण टिपलेले आहे : "श्रद्धावंतांविरुद्धच्या दुष्ट खाजगी लढायांत गुंतलेल्यांनी आता अश्रद्धांविरुद्ध युद्ध पुकारावे...आजवर चोऱ्यामाऱ्या करणाऱ्यांनी सैनिक बनावे. आजवर स्वतःचे भाईबंद आणि नातेवाईक यांच्याविरुद्ध लढलेल्यांनी आता रानटी लोकांविरुद्ध तलवार उपसणे आवश्यक आहे. आजवर कमी

मजुरीवर भाडोत्री सैनिक म्हणून काम केलेल्यांच्या जन्माचे आता सार्थक व्हावे..." चर्चला स्वतःची सत्ता वाढवायची होती. ख्रिश्चन धर्माच्या अधिपत्याखालील प्रदेश जेवढा जास्त तेवढी चर्चची सत्ता आणि संपत्ती जास्त!

आशियामधील मुसलमानांच्या सत्ताकेंद्राजवळच कॉन्स्टॅन्टिनोपल ही राजधानी असलेले बायझॅन्टाइन चर्च आणि साम्राज्य हा धर्मयुद्धामधील दुसरा हितसंबंधी गट होता. स्वतःची सत्ता वाढवण्याची संधी या दृष्टीने रोमन चर्च धर्मयुद्धांकडे पाहात होते, तर मुसलमानांना आपल्या प्रदेशात येण्याला वचक बसावा अशी बायझॅन्टाइन चर्चची इच्छा होती.

लूट मिळवण्याची इच्छा असलेले अमीर-उमराव हे तिसरे हितसंबंधी होते. त्यांच्यापैकी काही जणांना कर्जे झाली होती, तर काही वंशजांना फारच थोडी वडिलोपार्जित संपत्ती मिळाली होती. अशा सर्वांनाच भूप्रदेश आणि संपत्ती मिळवण्याचे एक साधन या धर्मयुद्धांमध्ये दिसले.

चौथा हितसंबंधी गट होता व्हेनिस, जिनीव्हा आणि पिसा या इटलीमधील शहरांचा! व्हेनिस हे नेहमीच व्यापाराचे शहर म्हणून प्रसिद्ध होते. बेटांच्या समूहावर वसलेले कोणतेही शहर तसे असेल, तर त्यात नवल ते काय? शहरातील रस्ते जर कालव्यांचे बनलेले असतील तर तेथील लोक जमिनीइतक्याच सहजपणे बोटीवरही राहातात. व्हेनिसच्या रहिवाश्यांच्या संदर्भातही हे खरे होते. भूमध्य समुद्राकडील पूर्वेचा व्यापार त्यावेळी अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे व्हेनिस तर अत्यंत मोक्याच्या जागी वसलेले होते. नकाशाकडे केवळ एक नजर टाकली तरी व्हेनिसप्रमाणेच इटालीमधील इतर शहरे ही महत्त्वाची व्यापारी केंद्रे का बनली ही गोष्ट सहज कळून येते. परंतु असा नकाशा त्यावेळचे एक ऐतहासिक सत्य मात्र मुळीच सांगत नाही. रोमन साम्राज्याच्या अंतानंतर पश्चिम युरोपचा पूर्वेशी असणारा संबंध तुटला असला तरीही व्हेनिस मात्र नेहमीच कॉन्स्टॅन्टिनोपलशी आणि पूर्वेशी संपर्क साधून होते. भूमध्य प्रदेशातील कॉन्स्टॅन्टिनोपल हे अनेक वर्षे सर्वात मोठे शहर असल्यामुळे हा एक विशेषच फायदा होता. याचा अर्थ असा की पूर्वेकडील मसाल्याचे पदार्थ, रेशीम, मलमल, औषधे आणि गालिचे युरोपमधील अंतर्गत रस्ते ठाऊक असलेल्या व्हेनिसच्या नागरिकांकडून युरोपमध्ये आणले जात. त्यामुळे मुख्यत्वे व्यापाराची केंद्रे असलेल्या व्हेनिस, जिनीव्हा आणि पिसा या शहरांना आशिया मायनरच्या किनाऱ्यावरील शहरांबरोबर व्यापार करण्यासाठी विशेष सवलती हव्या होत्या. या शहरांमध्ये राहाणाऱ्या मुसलमानांचा ख्रिस्ताचे शत्रू म्हणून अतिशय द्वेष केला जात असे. पण व्हेनिसच्या नागरिकाच्या कृतीत यामुळे काही फरक पडला नाही. इटालीमधील व्यापारी केंद्राच्या दृष्टीने ही धर्मयुद्धे म्हणजे व्यापारी फायद्याची एक संधी होती. म्हणूनच तिसरे धर्मयुद्ध हे काही गेलेली पवित्र भूमी पुन्हा जिंकून घेण्यासाठी नव्हते, तर इटालीमधील शहरांना व्यापारी फायदे मिळवून देण्यासाठी होते. धर्मयोद्ध्यांना जेरूसलेम नको होते; किनाऱ्यावरील व्यापारी शहरे हवी होती.

१२०१ साली चौथे धर्मयुद्ध सुरू झाले. यावेळी व्हेनिस शहराने सर्वात महत्त्वाची भूमिका बजावून भरपूर नफा उकळला. धर्मयोद्ध्यांना नेण्यासाठी व्हेनिसच्या डोगेकडे

मदत मागायला आलेल्या सहा राजदूतांपैकी विलहार्दोइन हा एक होता. त्यावर्षी मार्चमध्ये केलेल्या एका करारनाम्याबद्दल तो सांगतो :

" ' महाराज, क्रॉसचे ब्रीद घेतलेल्या फ्रान्सच्या उमरावांच्या वतीने आम्ही आलेले आहोत...त्यांची आपल्याला विनंती आहे की देवाधर्माखातर...युद्धनौका आणि जहाजे यांचा पुरवठा करण्याची आपण कृपा करावी.'

" ' त्यांची अपेक्षा काय आहे ? ' डोगेने विचारले.

" ' आपण सुचवाल आणि त्यांना पुऱ्या करता येतील अशा कोणत्याही अटी मानायला ते तयार आहेत, ' राजदूतानी उत्तर दिले...

" ' ४,५०० घोडे आणि ९,००० योद्ध्यांसाठी आम्ही व्हेनिसवासी ' व्हिसिअर्स ' (म्हणजे गलबताच्या मागच्या बाजूने घोडे आत आणण्याची सोय असलेल्या नौका) पुरवू आणि ४५०० नाइट्स (घोडदळातील कनिष्ठ अधिकारी) व पायदळातील २०,००० सैनिक यांच्यासाठी नौका पुरवू. तसेच करारपत्रानुसार या सर्व घोड्यांना आणि माणसांना ९ महिने पुरेल एवढे अन्न आम्ही पुरवू. आम्हाला प्रत्येक घोड्यामागे चार आणि माणसामागे दोन मार्क्स (जर्मन नाणे) देण्यात आले तर एवढे तरी आम्ही निश्चितच करू ...

" '...यापेक्षाही अधिक आम्ही देऊ...देवाधर्माखातर आम्ही आणखी पन्नास लष्करी गलबते देऊ. मात्र अट अशी राहील की आपले करारपत्र आहे तोपर्यंत पैसा आणि जमीन यांच्या मिळकतीमधील अर्धा वाटा आमचा आणि अर्धा वाटा तुमचा राहील...'

" राजदूत ... म्हणाले : ' महाराज, हे करारपत्र करण्यास आम्ही तयार आहोत. ' "

या करारपत्रावरून एक गोष्ट सहज तुमच्या लक्षात येईल की, " देवाधर्माखातर " जरी व्हेनिसचे लोक या धर्मयुद्धाला मदत करण्यास तयार होते तरीही त्या देवाच्या महान प्रेमाखातर त्यांनी मिळणाऱ्या लुटीतील त्यांचा हिस्सा मात्र सोडला नाही. ते पक्के धंदेवाईक लोक होते. धर्माच्या दृष्टिकोनातून विचार करायचा तर धर्मयुद्धांचा परिणाम हा तात्पुरताच होता. कारण लौकरच संधी मिळताच जेरुसलेमचे राज्य मुसलमानांनी परत घेतले. परंतु व्यापाराच्या दृष्टीने धर्मयुद्धाचा परिणाम हा अतिशय महत्त्वाचा ठरला. सरंजामशाहीच्या काळझोपेत असलेल्या पश्चिम युरोपाला जागे करण्यास त्याची मदत झाली. सर्व युरोपखंडात या धर्मयुद्धांनी धर्मगुरू, योद्धे, कष्टकरी आणि व्यापारी यांचा वाढता वर्ग फैलावण्यास सहाय्य केले. परदेशी मालाची मागणी यामुळे वाढली. मुसलमानांकडून भूमध्य समुद्राच्या व्यापारी मार्गावर त्यांनी ताबा मिळवला आणि प्राचीन काळाप्रमाणेच ' पूर्व ' आणि ' पश्चिम 'यामध्ये पुन्हा व्यापार सुरू झाला.*

---

* [प्राचीन काळ म्हणजे खिस्तपूर्व ३०० ते इ. स. ५०० पर्यंतचा रोमन साम्राज्याचा कालखंड होय. इटालीमध्ये रोम हे केंद्र असलेल्या रोमन साम्राज्याने संपूर्ण पश्चिम युरोप व मध्य युरोपचा भूभाग व्यापला होता. या भागाचे ' पूर्वेशी ' म्हणजे इजिप्तसह आशिया मायनरजवळील भागाशी व्यापारी तसेच लष्करी संबंध होते. व्यापार आणि युद्धे यांचे उद्दिष्ट एकच होते : अधिकाधिक गुलाम मिळवणे.]

अकराव्या आणि बाराव्या शतकामध्ये ज्याप्रमाणे दक्षिणेकडील भूमध्य समुद्रामध्ये व्यापाराचे पुनरुज्जीवन झाले, त्याचप्रमाणे उत्तरेकडील समुद्रामध्येही व्यापाराची अधिक शक्यता निर्माण झाली. या ठिकाणी व्यापार प्रथमच अस्तित्वात आला

मासे, लाकडाचे ओंडके, कातडी, चामडी आणि लोकर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे वाहून नेणारी गलबते उत्तर आणि बाल्टिक समुद्रामध्ये दिसू लागली. उत्तरेकडील या सागरी व्यापाराचे एक महत्त्वाचे केंद्र फ्लॅन्डर्समधील ब्रूजिस हे शहर होते. पूर्वेबरोबरील व्यापाराचे दक्षिण युरोपमधील व्हेनिस शहर हे जसे महत्त्वाचे केंद्र होते, त्याचप्रमाणे रशिया व स्कॅन्डिनेव्हियन जगताशी असलेल्या व्यापाराचे ब्रूजिस हे केंद्रस्थान होते. उत्तरेकडील अवजड जीवनोपयोगी वस्तू आणि पूर्वेकडील चैनीच्या महाग वस्तू यांचा विनिमय करण्यासाठी या दोन टोकाच्या शहरांना जोडणारे ठिकाण अजून तयार झाले नव्हते. व्यापाराला एकदा का चांगली सुरुवात झाली की डोंगरावरून गडगडत जाणाऱ्या बर्फाच्या गोळ्याप्रमाणे तो वाढत जातो. म्हणून लौकरच अशी अनेक व्यापारी केंद्रे स्थापन झाली. उत्तरेकडील वस्तू घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्यांना दक्षिणेकडून आल्प्स पर्वत पार करून आलेले व्यापारी शॅम्पेन्च्या मैदानामध्ये भेटत असत. या भागात अनेक शहरांमध्ये जत्रा भरविण्यात येत. त्यापैकी काही महत्त्वाची शहरे लॅग्नी, प्रॉव्हिन्स, बारसुर–ऑब आणि ट्रॉयस् अशी होती.

आज चहूकडे, सदासर्वकाळ व्यापार चालू आहे. वाहतुकीची साधने आता इतकी सुयोग्य झालेली आहेत की जगातील दूरच्या टोकाकडून येणाऱ्या वस्तू सुलभतेने मोठ्या शहरांमध्ये येतात. आपल्याला केवळ बाजारात जाऊन हवी ती वस्तू निवडायची असते. परंतु आपण पाहिले त्याप्रमाणे बाराव्या आणि तेराव्या शतकांमध्ये वाहतुकीची साधने इतकी विकसित झाली नव्हती. त्याचप्रमाणे नियमित मागणी असलेली बाजारपेठ नव्हती. वा तेथे दिवसभर विक्री करणाऱ्या दुकानांची आवश्यकता भासावी एवढ्या प्रमाणात मागणी वाढली नव्हती. यामुळेच बहुतेक शहरात नियमित व्यापार होत नव्हता. इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी आणि इटाली येथे विशिष्ट कालावधीने होणाऱ्या जत्रा हे नियमित व कायमचा व्यापार विकसित करण्याच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल होते.

नेहमीच्या सामान्य गरजा भागविण्यासाठी ज्या ठिकाणी पूर्वी आठवड्याचा बाजार पुरेसा होता त्या ठिकाणचे बाजार आता व्यापाराची वाढती गरज पुरी करण्यास अपुरे पडू लागले. फ्रान्समधील प्वा ही अशीच एक जागा होती. तेथील सरदाराने तेथे आठवड्याचा बाजार आणि वर्षातून दोनदा जत्रा भरविण्याची परवानगी राजाकडे मागितली. राजाचे उत्तराचे पत्र पुढीलप्रमाणे होते :

" कनाप्ले आणि प्वा येथील आमच्या मर्जीतील सरदार, जेहां–द–क्रेकी यांची विनंती आम्हाला पोहोचली. . .वर उल्लेखिलेल्या गावाकडे चांगली कसदार जमीन असून तेथील व्यवस्थित बांधलेल्या घरांमध्ये अनेक माणसे राहात आहेत ही गोष्टही आम्हाला समजली आहे. या ठिकाणाहून ये-जा करताना देशातील आसपासचे व इतर ठिकाणचे अनेक व्यापारी एकत्र येतात. त्यामुळे येथे दर आठवड्याला एकदा बाजार भरविणे आणि वर्षाकाठी दोन जत्रा भरविणे आवश्यक झाले आहे....म्हणूनच प्वा या

गावात आठवड्याचा बाजार भरविण्यास आणि दोनदा जत्रा भरविण्यास आम्ही परवानगी देत आहोत."

शॅम्पेन् येथील अधिक महत्त्वाच्या जत्रा तर अशा रीतीने आयोजित करण्यात येत की त्या वर्षभर चालत-एक संपली की दुसरी सुरू होई. आपल्या वस्तू घेऊन व्यापारी या जत्रेहून त्या जत्रेला जात.

मध्ययुगीन काळातील सुरुवातीचे आठवड्याचे स्थानिक बाजार आणि या बाराव्या ते पंधराव्या शतकांमधील मोठ्या जत्रा यामधील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. आठवड्याचे बाजार हे व्याप्तीने लहान होते व तेथे मुख्यत्वेकरून शेतीमधील स्थानिक वस्तूंचा विनिमय होई. याउलट जत्रांची व्याप्ती मोठी असे आणि तेथे जगातून आलेल्या वस्तूंचा घाऊक व्यापार चाले. अशी जत्रा म्हणजे उलाढालीचे मोठे ठिकाण असे. छोटे कारागीर आणि फेरीवाले नव्हे तर मोठमोठे व्यापारी त्या ठिकाणी पूर्व आणि पश्चिम, उत्तर आणि दक्षिण येथील दूरदूरच्या देशांतून आणलेल्या मालाची खरेदी-विक्री करीत.

शॅम्पेन् येथील जत्रांबाबतचे १३४९ सालचे हे जाहीर निवेदन पाहा : "व्यापाऱ्यांच्या सर्व कंपन्या, सर्व व्यापारी तसेच इटाली, ट्रान्सअल्पाइन, फ्लॉरेन्स, मिलान, जिनीव्हा, व्हेनिस, जर्मनी, प्रॉव्हेन्काल आणि आमच्या राज्याबाहेरील इतर देशांतील लोकांनी इच्छा असल्यास या जत्रांना यावे, राहावे आणि परत जावे. या सर्वांसाठी जत्रेचे दार नेहमीच खुले राहील. जत्रेमध्ये त्यांच्या चीजवस्तू सुरक्षित राहातील, त्यांच्या वाटाड्यांना संरक्षण मिळेल आणि लोकांना चांगली वागणूक देण्यात येईल. जत्रेचे संरक्षक शिपाई सोडता त्यांना कोणाकडून कसलाही त्रास होणार नाही..."

यातून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. शॅम्पेन्चा राज्यकर्ता सर्व ठिकाणच्या व्यापाऱ्यांना जत्रेला तर बोलावतोच पण त्याचबरोबर येताना व परतताना त्यांना सुरक्षितता व चांगली वागणूक मिळण्याचे आश्वासनही देतो. रस्त्यांवर नेहमी लूटमार चालणाऱ्या त्या काळात या गोष्टी किती महत्त्वाच्या होत्या हे कोणीही समजू शकेल. अनेक वेळेला या जत्रेला जाणारे व्यापारी वाटेवरील सरंजामदारांकडून नेहमी घेतल्या जाणाऱ्या त्रासदायक करांपासून मुक्त होते. ज्या परगण्यामध्ये जत्रा भरविण्यात येई, तेथला सरंजामदार सर्व गोष्टींची व्यवस्था करी. जर रस्त्यामध्ये व्यापाऱ्यांच्या एखाद्या गटावर लुटारूंकडून हल्ला झाला तर...? तर ज्या परगण्यामध्ये असा हल्ला झाला त्या परगण्यामधील व्यापाऱ्यांना जत्रेमध्ये भाग घेण्यास बंदी करण्यात येई. ही महाभयंकर शिक्षा होती. कारण यामुळे त्या भागातील व्यापार पूर्णपणे थंड पडत असे.

पण ज्या ठिकाणी जत्रा भरवली जात असे तेथील सरंजामदाराने ही व्यवस्था करण्याचा भार का उचलावा ? याचे साधे कारण असे होते की अशा जत्रेमुळे त्याच्या भागात आणि व्यक्तिशः त्याच्याकडे अधिक संपत्ती जमा होई. धंदा करणारे व्यापारी या जत्रांमध्ये मिळणाऱ्या सोयींपोटी त्याला पैसे मोजत. येण्याजाण्यासाठी, चीजवस्तू साठवण्यासाठी व्यापाऱ्यांना कर भरावा लागे. त्याशिवाय विक्रीकर असे आणि ज्या ठिकाणी गाळा उभारला जाई त्यावर कर असे. या करांना व्यापाऱ्यांची हरकत नव्हती; कारण ते फारसे जाचक नव्हते, ठराविक होते तसेच ते सर्वांना ठाऊक होते.

या जत्रा इतक्या मोठ्या होत्या की शहराचे नेहमीचे शिपाई तेथील बंदोबस्तासाठी अपुरे पडत. म्हणून या जत्रांसाठी खास सैनिक आणि न्यायालये असत. एखादा तंटा उद्भवताच जत्रेचे शिपाई त्यात लक्ष घालीत आणि जत्रेच्या न्यायालयामार्फत तो तंटा सोडविण्यात येई. हा सर्व व्यवहार अतिशय काळजीपूर्वक आणि कार्यक्षमतेने हाताळला जाई.

या जत्रांचा कार्यक्रम सर्वसाधारणपणे सारखाच असे. काही दिवसांच्या तयारीनंतर वस्तूंचे गठ्ठे सोडण्यात येत, नंतर विक्रीसाठी गाळे उभारले जात, तसेच पैसे देऊन बाकी सर्व गोष्टींची काळजी घेतली जाई आणि ती मोठी जत्रा सुरू होई. एका गाळ्याकडून दुसऱ्या गाळ्याकडे जाणाऱ्या लोकांचे मनोरंजन करण्याकरता अनेक कलाकार तेथे उपस्थित असत आणि या साऱ्याबरोबर तेथे मालाची विक्रीही चाले. जरी सर्व प्रकारच्या वस्तूंची विक्री तेथे होत असली तरी, काही दिवस मात्र कापड, कातडी, चामडी अशा विशिष्ट वस्तूंच्या विक्रीसाठीच राखून ठेवण्यात येत.

लील येथे झालेल्या एका जत्रेबद्दलच्या १४२९ मधील कागदपत्रांवरून या गजबजलेल्या व्यापारी केंद्रांच्या आणखी एका महत्त्वाच्या पैलूबद्दल आपल्याला माहिती मिळते : " जेहां-द्-लान्सुतेला आम्ही एक विशेष परवाना देत आहोत...आमच्या लील शहरामध्ये बाजाराच्या ठिकाणी कुठेही किंवा जेथे पैशाचा व्यवहार चालू आहे अशा कोणत्याही ठिकाणी तो चलन-रूपांतरासाठी एक गाळा उभारू शकतो आणि आमची मुभा आहे तोपर्यंत तो सदर धंदा सुरू ठेवू शकतो...याच्या बदल्यात लील येथील आमच्या दलालामार्फत तो आम्हाला दर वर्षी पॅरिसचे २० लिव्हर्स देईल. "*

चलन-रूपांतर करणारे हे लोक जत्रेचा अत्यंत महत्त्वाचा भाग होते. ज्याप्रमाणे कापड आणि कातडी यांच्या विक्रीसाठी जत्रेचे काही दिवस खास राखून ठेवण्यात येत. त्याचप्रमाणे जत्रेचे शेवटचे दिवस चलन-रूपांतरासाठी राखून ठेवण्यात येत. म्हणजे केवळ व्यापाराच्या दृष्टीने अशा जत्रा महत्त्वाच्या नव्हत्या तर तेथे चलनाचे रूपांतरही चालत असे. जत्रेच्या मध्यभागी चलन-विक्रेत्यांच्या न्यायालयामध्ये अनेक प्रकारच्या नाण्यांचे वजन करण्यात येई आणि त्यांचे मूल्य निश्चित करून विनिमय करण्यात येई. कर्जासाठी बोलणी चालत, जुनी कर्जे फेडली जात, हुंड्या मान्य केल्या जात आणि विनिमय-रोख्यांचे हस्तांतर होई. प्रचंड प्रमाणावर नाण्यांचा व्यवहार करणाऱ्या या सावकारी पेढ्या होत्या. त्या एकत्र आल्यामुळे त्यांच्या हातात संपत्तीचा प्रचंड साठा होता. लंडनपासून लेव्हान्तपर्यंतचा संपूर्ण युरोप खंडातील धंदा त्यांच्या अखत्यारीत येत असे. त्यांच्या गिऱ्हाईकांमध्ये धर्मगुरू आणि सम्राट, अमीर आणि उमराव यांचा समावेश होता. दूरदूरच्या शहरांमध्ये व राज्यांमध्ये त्यांचे हात पोहोचले होते. आता नाण्यांचा व्यवहार एवढा वाढला होता की तो एक स्वतंत्र व्यवसायच झाला होता.

* [आजच्या आधुनिक काळात वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळ्या चलनपद्धती अस्तित्वात असल्या तरीही देशांतर्गत चलनपद्धती एकच असते. परंतु मध्ययुगीन काळात तशी स्थिती नव्हती. एकाच देशातील विविध शहरांच्या आणि प्रांतांच्या विभिन्न चलनपद्धती होत्या. सरंजामशाही विकेंद्रित राजसत्तेचे विनिमयाच्या माध्यमात उमटलेले हे नेमके प्रतिबिंब होते.]

पैशाची फारशी गरज न पडणाऱ्या प्राचीन नैसर्गिक अर्थव्यवस्थेत या व्यापाराच्या विकासाने केवढा आमूलाग्र बदल घडवून आणला होता हे समजून घेण्यासाठी वरील गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. मध्ययुगीन काळात सुरुवातीला चालणाऱ्या वस्तु-विनिमयाच्या व्यापारामध्ये अनेक गैरसोई होत्या. एका ओव्हरकोटसाठी पाच गॅलन वाइन अत्यंत सोपे आहे असे वरवर वाटते; पण प्रत्यक्षात ती एवढी सोपी गोष्ट नव्हती. असा विनिमय होण्यासाठी आपल्याजवळ असलेली वस्तू ज्याला हवी आहे आणि आपल्याला पाहिजे असलेली वस्तू ज्याच्याजवळ आहे असा माणूस शोधावा लागे. पण याऐवजी विनिमयाचे साधन म्हणून पैशाचा उपयोग करा आणि मग काय होते ते पाहा. स्वतःची गरज काहीही असली तरी पैसा घ्यायला कोणीही तयार असते. कारण पैशाचा विनिमय कशाबरोबरही होऊ शकतो. विनिमयासाठी पैशाचा सर्वसाधारण वापर सुरू झाला की ज्याच्याकडे एक ओव्हरकोट आहे आणि ज्याला ५ गॅलन वाइन घेऊन फिरावे लागत नाही. पैशाच्या उपयोगामुळे आता एकाऐवजी दोन वेळा खरेदी-विक्रीचा व्यवहार करावा लागला तरीही एकूण काम सोपेच होते. यामुळे व्यापाराला चालना मिळते. त्याचबरोबर वाढत्या व्यापारामुळे पैशाची चलती वाढत जाते.

कालपरवापर्यंत बाजारपेठ नसलेल्या अर्थव्यवस्थेचे बाराव्या शतकानंतर अनेक बाजारपेठा असणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतर घडून आले होते. या व्यापाराच्या वाढी-बरोबरच मध्ययुगाच्या प्रभातकालीन स्वयंपूर्ण नैसर्गिक अर्थव्यवस्थेचे रूपांतर आता वाढता व्यापार असलेल्या चलनी अर्थव्यवस्थेत झाले.

◇ ◇ ◇

३

शहराकडे....

व्यापाराच्या छोट्याशा झऱ्याचे मोठ्या प्रवाहात रूपांतर झाले तेव्हा शेतकी, व्यापारी आणि औद्योगिक जीवनाच्या प्रत्येक भागाचे पोषण होऊन त्यांची वाढ होऊ लागली. व्यापाराच्या वाढीचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे शहरांची वाढ हा होय.

अर्थात् व्यापाराच्या वाढीपूर्वीही लष्कर आणि न्यायासन यांची केंद्रे असणारी शहरे अस्तित्वात होती. या शहरांमध्ये राजाचा दरबार भरत असे आणि तेथे बऱ्याच लोकांची वर्दळ सुरू असे. परंतु खरे तर ही ग्रामीण शहरे होती. अशा शहरांमध्ये देशातील इतर भागांपेक्षा निराळे असे शहराचे म्हणून व्यवस्थापन नसे वा त्यांना विशेष सवलती नसत. पण व्यापाराच्या वाढीबरोबर जी नवीन शहरे वाढली किंवा व्यापाराच्या प्रेरणेने जुन्या शहरांचे जे नूतनीकरण झाले त्यांचे स्वरूपच वेगळे होते.

जेथे व्यापार वेगाने वाढत होता तेथे शहरे वाढत होती. यामुळेच मध्ययुगीन काळामध्ये इटाली आणि नेदरलॅण्डस् या देशात नवी शहरे भरभराटीस आली असावीत असाच कोणीही अंदाज बांधेल. अगदी त्याच ठिकाणी ती प्रथम अस्तित्वात आली. व्यापार वाढू लागला तशी शहरे वाढू लागली. दोन रस्ते एकत्र मिळत त्या ठिकाणी किंवा नदीच्या मुखाजवळ वा जमिनीचा उतार सोयीचा असेल त्या जागी शहरे वसू लागली. व्यापारी नेहमी अशा ठिकाणांच्या शोधात असत. शिवाय अशा ठिकाणी बहुधा एखादे महत्वाचे चर्च असे वा संकटापासून संरक्षण करण्यासाठी ‘ बुर्ग ’ नावाची बंदिस्त जागा असे. लांबवरच्या प्रवासात थकलेले, गोठलेली नदी वितळण्याची वाट पाहाणारे किंवा चिखलाचा रस्ता पुन्हा प्रवासायोग्य होण्याची प्रतीक्षा करणारे व्यापारी साहजिकच किल्ल्याच्या तटबंदीजवळ किंवा मुख्य चर्चच्या सावलीला विश्रांतीसाठी येत. अशा ठिकाणी जसे अधिकाधिक व्यापारी जमू लागले तसा ‘ फो-बुर्ग ’ किंवा ‘ बाहेरील बुर्ग ’ तयार होऊ लागला. थोड्याच काळात जुन्या ‘ बुर्ग ’पेक्षा हा ‘ फो बुर्ग ’च अधिक महत्त्वाचा होऊ लागला. लवकरच फो-बुर्गमधील व्यापाऱ्यांनी त्यांच्या वस्तीभोवती संरक्षक तटबंदी बांधली. ती अमेरिकेतील वसाहतवाद्यांनी वसाहतींभोवती उभारलेल्या कुंपणासारखी दिसे. त्यामुळे जुन्या भिंती अनावश्यक होऊन पडू लागल्या. अशा रीतीने

जुन्या बुर्गचा विकास झाला नाही, तर नव्या फो-बुर्गमध्ये घडत असलेल्या नवनवीन गोष्टीत सामावला गेला. जुनी मनोर-गावे सोडून या नव्या वाढत्या शहरामध्ये नवे जीवन सुरू करण्यासाठी लोक येऊ लागले. वाढत्या व्यापारामुळे अधिकाधिक लोकांना काम मिळू लागले. या मोलमजुरीसाठी लोकांची शहरांकडे रीघ लागली.

एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे. वरील सर्व गोष्टींपैकी निश्चित सत्य काय हे आपल्याला ठाऊक नाही. उपरोक्त वर्णन हा केवळ काही इतिहासकारांचा दावा आहे. विशेषतः हेन्री पिरेन् यांनी, मध्ययुगीन काळात शहरे अशाच प्रकारे वाढली हे सिद्ध करण्यासाठी जमा केलेला पुरावा हा एखाद्या गुतहेरकथेप्रमाणे सुरस आणि चमत्कारिक आहे. व्यापारी आणि शहरे वसवणारे लोक एकच होते याबद्दल त्यांचा एक अत्यंत महत्त्वाचा पुरावा असा की बाराव्या शतकापर्यंत 'मेरकॅटर' म्हणजे व्यापारी आणि 'बुर्जेन्झी' म्हणजे शहरवासी हे शब्द समानार्थी म्हणून आलटून-पालटून वापरले जात.

पहिल्या प्रकरणातील सरंजामी व्यवस्थेची चौकट विचारात घेता, व्यापाराच्या वाढीमुळे होणारी शहरांची वाढ आणि व्यापाऱ्यांचा वाढता वर्ग यामुळे त्यावेळच्या समाजात संघर्ष निर्माण होणार होता ही गोष्ट कोणाच्याही सहज ध्यानात येईल. सरंजामशाहीचे एकूण वातावरण बंदिस्तपणाचे होते तर शहरांमधील वातावरणावर व्यापारी जीवनाचा ठसा असल्यामुळे स्वातंत्र्याचे होते. सुरुवातीला शहरातील जमीन सरंजामदार, बिशप, सरदार आणि राजे यांच्या मालकीची होती आणि हे सरंजामदार त्यांच्या इतर जमिनीप्रमाणेच शहरातील जमिनीकडे पाहात. म्हणजे येथेही कर आणि श्रमसेवा लादणे, स्वतःची एकछत्री हुकूमत ठेवणे आणि न्यायालये चालविणे इत्यादी गोष्टी अगदी मनोरप्रमाणे करण्याचा त्यांचा मनसुबा होता. पण शहरांमध्ये हे शक्य नव्हते. या सर्व गोष्टी जमीन-मालकीवर आधारित म्हणजे सरंजामी पद्धतीच्या होत्या. पण शहरवासियांना हे सर्व प्रकार बदलायचे होते. जुने सरंजामी नियम आणि न्याय हे रूढीने ठरत. त्यामुळे त्यात बदल करणे जवळपास अशक्य होते. याउलट व्यापार हा मूलतःच क्रियाशील, बदलता आणि अडथळे न मानणारा असतो. पक्क्या सरंजामी चौकटीत तो बसणे शक्य नव्हते. शहरातील जीवन मनोरच्या जीवनापेक्षा वेगळे होते आणि त्यासाठी नवीन चौकट निर्माण करण्याची गरज होती.

किमानपक्षी व्यापाऱ्यांना तरी तसे वाटत होते. आणि हे साहसी व्यापारी आपले विचार झटक्यात कृतीत आणीत. एकतेमध्ये शक्ती असते हा धडा ते शिकले होते. दूरदूरच्या रस्त्यांवरून प्रवास करताना लुटारूंपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी ते एकत्र येत. तसेच दर्यावर सफरी करताना चाच्यांपासून स्वसंरक्षण करण्यासाठी ते एकत्र येत. बाजारात आणि जत्रेमध्ये विक्री करताना त्यांच्या वाढत्या आमदनीच्या जोरावर ते एकत्रितपणे अधिक चांगला सौदा करीत यामुळे आता सरंजामी नियमांचा त्यांच्या जीवन-पद्धतीवर घाला येताच त्यांनी शहरांमध्ये 'गिल्डस्' किंवा 'हॅन्सेस्' नावाच्या संघटना उभ्या केल्या. शहरांच्या वाढीसाठी तेथील स्वातंत्र्य अबाधित राखणे हा त्यांचा हेतू होता. झगडा न करता त्यांना जेथे सवलती मिळत होत्या तेथे ते समाधानी होते; पण जेथे झगडणे आवश्यक होते तेथे त्यांनी लढा दिला.

व्यापाऱ्यांना निश्चितपणे काय हवे होते? या वाढणाऱ्या शहरांतील व्यापाऱ्यांच्या मागण्या तरी काय होत्या? त्याच्या या बदलणाऱ्या जगाचा जुन्या सरंजामदारी जगताशी संघर्ष होता तरी कशासाठी?'

शहरांतील लोकांना बंधमुक्तता हवी होती. त्यांना मन मानेल तसा व्यवहार करण्याची मुभा हवी होती. "शहराची हवा माणसाला बंधमुक्त बनवते" या अर्थाच्या एका जुन्या जर्मन म्हणीवरून – ही म्हण संपूर्ण पश्चिम युरोपभर खरी होती – त्यांना हवे ते मिळाले असे सिद्ध होते. बाराव्या आणि तेराव्या शतकांमधील काही शहरांच्या जाहीरनाम्यां-वरून या म्हणीच्या सत्यतेची प्रचीती येते – उदाहरणार्थ, लॉरिस् शहराला सातवा लुई या राजाने ११५५ मध्ये दिलेली सनद पुढीलप्रमाणे होती:

"एक वर्ष आणि एक दिवस लॉरिस् शहरामध्ये राहिला आहे आणि ज्याच्यावर कसलेही बंधन नाही किंवा आमच्या आज्ञेची अंमलबजावणी करायला ज्याने नकार दिलेला नाही तो तेथे स्वतंत्रपणे आणि सन्माननीयरीत्या राहू शकतो." बाराव्या शतकात शहरांमध्ये आजच्यासारखी हमरस्त्यांवर जाहिराती लावण्याची पद्धत असती तर ... तर त्यांनी निश्चितच "लॉरिस्ला या आणि मुक्त व्हा" असा फलक लावला असता.

या बंधमुक्तीखेरीज शहरी लोकांना आणखी काही गोष्टी हव्या होत्या. सरंजामी निर्बंधांपासून मुक्त असलेली जमीन त्यांना हवी होती. एखाद्याचा कनिष्ठ–सरंजामदार म्हणून एकाकडे जमीन, त्याचा कनिष्ठ–सरंजामदार म्हणून आणखी एकाकडे त्यातील काही भाग असा सरंजामी रूढीचा प्रकार त्यांना अमान्य होता. जमीन आणि त्यावरील घरे याकडे पाहाण्याची शहरवासियांची दृष्टी सरंजामदारांपेक्षा वेगळी होती. शहरी लोकांना एखाद्या धंद्यासाठी पटकन काही पैसा उभा करण्याची जरूर भासे. अशावेळी अनेक वरिष्ठ–सरंजामदारांची परवानगी न घेता जमीन गहाण ठेवण्याची वा ती विकून टाकण्याची मुभा त्यांना हवी होती. वर उल्लेखलेले लॉरिस्चे निवेदनपत्र आपल्याला याबद्दलही काही माहिती देते: "कोणाही शहरवासियाला स्वतःची संपत्ती विकण्याचा अधिकार आहे." पहिल्या प्रकरणामध्ये वर्णन केलेल्या जमीनव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर शहरे आणि व्यापार यांनी घडवलेला हा बदल अधिकच उठून दिसतो.

स्वतःच्या न्यायलयांमध्ये न्यायनिवाडा व्हावा अशी शहरी लोकांची इच्छा होती. संथ जीवनव्यवहारासाठी घडवलेली मनोरची न्यायव्यवस्था त्यांना साफ नामंजूर होती. कारण अत्यंत गजबजलेल्या व्यापारी शहरातील नवे प्रश्न सोडवण्याची क्षमता तिच्यात नव्हती. उदाहरणार्थ, जमीन गहाण ठेवणे, हुंडी देणे व घेणे किंवा सर्वसाधारण धंद्याचे नियम याबद्दल सरंजामदाराला काय ठाऊक होते? अर्थातच काही नाही. आणि त्याला ठाऊक असले तरीही त्या ज्ञानाचा आणि त्याच्या सत्तेचा उपयोग तो शहरवासियांसाठी नव्हे, तर आपमतलबासाठी करणार ही गोष्ट तर स्पष्टच होती. यामुळेच स्वहिताचे रक्षण होईल अशा पद्धतीने स्वतःचे प्रश्न सोडविण्याची सोय असलेली शहरी न्यायालये स्थापन करण्याची शहरवासियांची मागणी होती. यासाठी वेगळा गुन्हेगारी कायदा तयार करण्याची आकांक्षा त्यांनी जोपासली होती. एका छोट्या मनोर गावामध्ये शांतता आणि

सुव्यवस्था राखण्यापेक्षा वाढती आणि वाहती लोकसंख्या असलेल्या शहरामध्ये शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचा प्रश्न हा निश्चितच वेगळया स्वरूपाचा होता. अर्थातच शहरी लोकांना या प्रश्नाची चांगली ओळख होती, तर सरंजामी सरदाराला नव्हती. यामुळेच शहरवासियांना त्यांचे स्वतःचे शहरी व्यवस्थापन हवे होते.

शहरवासियांवर हव्या त्या पद्धतीने कर बसवण्याची मुभाही शहरवासियांना हवी होती. सरंजामी करपद्धतीला आणि दंडपद्धतीला त्यांचा विरोध होता, कारण त्यांच्या मते ही पद्धत म्हणजे शुद्ध डोकेदुखी होती. त्यांना धंदा करायचा होता आणि त्याच्या आड येणाऱ्या सर्व प्रकारच्या अडथळ्यांना ठोकरून दूर करण्याची त्यांची तयारी होती. हे कर आणि दंड पूर्णपणे नामशेष करणे जरी त्यांना जमले नाही तरी त्यांचा जाच कमी होईल इतक्या प्रमाणात त्यामध्ये बदल करणे त्यांना नक्कीच शक्य झाले.

शहरांवरील ताबा त्यांना एका झटक्यात व पूर्णपणे मिळाला नाही तर आस्ते आस्ते मिळाला. प्रथम सरंजामदाराने शहरावरील त्याचे थोडे हक्क शहरवासियांना विकले, नंतर आणखी थोडे विकले आणि या प्रक्रियेत हळूहळू शहर पूर्णपणे सरंजामदारांपासून मुक्त झाले. जर्मनीमधील डॉर्टमंड शहरामध्ये असाच प्रकार घडला. डॉर्टमंडच्या काऊंटने १२४१ साली त्या शहराच्या रहिवाश्यांना त्याचे काही सरंजामी अधिकार विकले :

" मी डॉर्टमंडचा काऊंट कॉनरॅड आणि माझी पत्नी गिझेल्ट्रूड आणि आमचे सर्व कायदेशीर वंशज बाजारपेठेजवळील आमचे घर डॉर्टमंडच्या रहिवाश्यांना विकून टाकत आहोत. त्याचप्रमाणे पवित्र रोमन साम्राज्याच्या काळापासून आमच्या अधिकारात असलेले कत्तलखाने आणि चांभारांची घरे आम्ही त्यांना कायमची देऊन टाकत आहोत. ते आम्हाला कत्तलखान्यांसाठी आणि चांभारांच्या घरांसाठी सालिना दोन दिनार तर भटारखाना आणि न्यायालयाच्या इमारती यासाठी प्रत्येकी सालिना एक रत्तल मिरी देतील."

ऐंशी वर्षांनंतर दुसऱ्या एका काऊंट कॉनरॅडने—" डॉर्टमंडच्या नागरिकांना आणि कौन्सिलला सरंजामीचे पूर्ण हक्क आणि डॉर्टमंडचा अर्धा परगणा विकून टाकला." त्या विकलेल्या हक्कांमध्ये शहरातील करवसुली करणे, न्यायालये चालवणे इत्यादी गोष्टींचा समावेश होता. या करारातून काऊंटचे स्वतःचे घर, त्याचे वरगडी आणि सेन्ट मार्टिनचे प्रार्थनागृह अशा गोष्टी वगळण्यात आल्या होत्या.

हे फार महत्त्वाचे सामाजिक बदल घडत असल्याची उमराव आणि धर्मोपदेशक यांना जाणीव झाली असेल आणि आपण ऐतिहासिक शक्तींच्या आड येऊ शकत नाही याची त्यांना जाण असेल असा एखाद्याचा समज होईल. काही जणांना तशी जाणीव झालेली होती पण अनेकांना ती झाली नव्हती. काही हुषार होते. वाऱ्याची बदलती दिशा त्यांनी हेरली होती. आणि त्याचा चांगल्या रीतीने उपयोग करून घेऊन त्यांनी अखेर स्वतःचे स्थान मजबूत केले. परंतु नेहमीच्या व्यवहाराप्रमाणे शांतपणे आणि सुरळीतपणे ही गोष्ट घडली नाही. ज्यांच्याकडे सत्ता असते, ज्यांची परिस्थिती चांगली असते ते ती टिकवण्यासाठी सगळे प्रयत्न करतात हे इतिहासक्रमात नेहमी दिसून येते. स्वतःजवळील हाडूक टिकवण्यासाठी कुत्रा नेहमीच झगडा करतो. त्याचप्रमाणे

उमराव आणि विशेषतः धर्मोपदेशक आपले अधिकार सोडायला तयार नव्हते. अनेक-वेळा शहरवासियांनी हिंसेचा अवलंब केल्यावर, दात-ओठ खातच ते त्या गोष्टीला तयार झाले. काहीजणांसाटी हा केवळ मानमरातब आणि प्रतिष्ठा यांना चिकटून राहण्याचाच प्रश्न नव्हता. जर व्यवहाराच्या पद्धती तशाच राहिल्या नाहीत तर संपूर्ण समाजव्यवस्थाच मोडकळीस येईल अशी भीती समाजामध्ये उच्च स्थान असणाऱ्यांना खरोखरच भेडसावत असते. इतिहासक्रमात असे अनेकदा घडते. परंतु शहरवासियांना तशी भीती वाटत नसल्यामुळे त्यांनी हिंसेचा वापर केला आणि त्यानंतर अनेक शहरांना स्वातंत्र्य मिळाले. " जेव्हा मतभेद फार टोकाचे असतात तेव्हा दुसऱ्या माणसाला मन मानेल तसे वागू देण्याऐवजी त्याला ठार मारण्याचाच आपण निश्चय करतो, " या जस्टिस ऑलिव्हर वेन्डेल होम्स् यांच्या विधानातील सत्याचा पडताळा शहरवासियांच्या कृतीमधून येतो.

वास्तविक पाहता, व्यापाऱ्यांच्या गिल्ड्स् या संघटना ज्यांचे नेतृत्व करत होत्या ते शहरवासी लोक आपण ज्या अर्थाने समजतो, त्या अर्थाने क्रांतिकारक नव्हते. सरंजामदारांना उलथवून टाकण्यासाठी ते लढत नव्हते तर व्यापारवृद्धीमध्ये अडथळा होणाऱ्या कालबाह्य सरंजामी पद्धतींचा जाच कमी करण्याची ते मागणी करत होते. यामुळेच अमेरिकन क्रांतिकारकांप्रमाणे त्यांनी " सर्व माणसे जन्मतःच समान आणि स्वतंत्र असतात." असे ब्रीदवाक्य अंगिकारण्याची शक्यताच नव्हती. " वैयक्तिक स्वातंत्र्य हा नैसर्गिक अधिकार न मानता केवळ त्यापासून होणाऱ्या फायद्यासाठीच त्याची कास धरण्यात आली होती एकाच उदाहरणाने ही गोष्ट स्पष्ट होईल. सेन्ट व्हास्ट येथील धर्मपीठाचे भूदास म्हणून आपल्याला मान्यता देण्यात यावी अशी 'अरास' येथील व्यापाऱ्यांनी मागणी केली होती. तेथील भूदासांना बाजारपेठेतील करामधून मिळणारी सवलत हे यामागील कारण होते."

शहराच्या वाढीमध्ये अडथळा येऊ नये यासाठी शहरांना स्वातंत्र्य हवे होते आणि काही शतकांनंतर त्यांना ते मिळाले. प्रत्येक शहराच्या स्वातंत्र्याच्या प्रमाणात बराच फरक होता. त्यामुळे मनोरप्रमाणेच मध्ययुगीन कालातील शहरांचे स्वातंत्र्य आणि अधिकार यांचे संपूर्ण चित्र रंगविणे कठीण आहे. इटाली आणि फ्लॅण्डर्स येथील प्रजासत्ताक शहरांप्रमाणे काही शहरे पूर्णपणे स्वतंत्र होती. स्वातंत्र्याचे वेगवेगळे प्रमाण असलेली काही कॉम्युन्स् होती, तर सरंजामी सरदारांकडून थोड्याशा सवलती मिळवून परंतु बऱ्याच प्रमाणात त्यांच्याच अधिपत्याखाली असलेलीही काही शहरे होती. अशा शहरांचे प्रत्यक्ष अधिकार काहीही असले तरी ते नमूद केलेली सनद मिळवण्याची शहरवासी काळजी घेत. सरंजामदाराने किंवा त्याच्या पित्यांनी ते अधिकार डावलण्याचा प्रयत्न केला तर उद्‌भवणारा वाद मिटवण्यासाठी त्याचा उपयोग होई. ॲबेव्हिल शहराला पॉन्थ्यूच्या काऊंटने ११८४ मध्ये दिलेल्या सनदीची सुरुवात पहा : " मी पॉन्थ्यूचा काऊंट माझे पितामह काऊंट गिल्लोम तालवास यांनी ॲबेव्हिलच्या शहर-वासियांना कॉम्युन म्हणून राहण्याचा अधिकार दिला होता हे येथे हजर असलेल्या सर्वांना जाहीर करू इच्छितो. या विक्रीचे अस्सल प्रमाणपत्र त्यांच्याजवळ आहे. सर्वसाधारणपणे

लिहून ठेवलेली गोष्ट माणसांच्या अधिक चांगली लक्षात राहाते. यामुळे मी त्यांना ही सनद देत आहे ..." शहरवासी त्या सनदीला इतके महत्त्व का देत आणि ते तिला अगदी कडीकुलुपात जपून का ठेवीत, याचे एक कारण काउंटने या सनदीच्या सुरुवातीलाच दिले आहे. अनेकदा शहरातील सभागृहाच्या किंवा चर्चच्या भिंतीवर सनद सुवर्णाक्षरांनी खोदून ठेवण्यात येई.

१८६ वर्षांनी म्हणजे १३७० साली खुद्द फ्रान्सचे राजेसाहेब ॲबेव्हिलचे नवे वरिष्ठ–सरंजामदार झाले. मध्यंतरीच्या काळात शहरस्वातंत्र्याची चळवळ चांगलीच फोफावलेली होती असे दिसते. कारण स्वतःच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या हुकुमपत्रामध्ये राजाने केलेल्या घोषणा पाहा : " ॲबेव्हिल शहर किंवा पॉन्थ्यू परगण्यातील इतर कोणतेही शहर यांना आम्ही काही सवलती दिल्यामुळे आता यावर आम्ही स्वतः कर किंवा दंड लादणार नाही किंवा त्यासाठी कारणीभूतही होणार नाही. त्या शहराला फायदा होणार नसेल किंवा शहरवासियांची संमती नसेल असा कोणताही कर त्यांच्यावर लादण्यात येणार नाही. म्हणूनच अर्जकर्त्यांनी आमच्याबद्दल दाखवलेले प्रेम आणि आज्ञाधारकपणा लक्षात घेऊन आम्ही तुम्हाला आज्ञा करतो की या परगण्यामध्ये मीठ आणि व्यापाराच्या इतर वस्तू खुलेपणाने येऊ द्याव्यात. येणाऱ्या किंवा जाणाऱ्या मालावर कोणत्याही प्रकारचा कर, दंड, जकात आकारून त्याची शहरवासियांकडून वसुली करू नये...."

फ्रान्सच्या राजाने करातून दिलेली वरील सवलत ही व्यापारी मागत असलेल्या अनेक सवलतींपैकी एक होती. शहरस्वातंत्र्याच्या लढ्याचे नेतृत्व व्यापाऱ्यांनी केले होते. शहरातील सर्वात शक्तिशाली गट त्यांचाच होता आणि त्यांच्या गिल्डस किंवा हॅन्सेस् यासाठी त्यांनी अनेक सवलती जिंकून घेतल्या होत्या. शहरातील व्यापारावर अनेक वेळा व्यापाऱ्यांची एकाधिकारी हुकुमत असे. व्यापाऱ्यांच्या गिल्डचे सभासद नसणाऱ्या व्यापाऱ्यांचे भवितव्य एकंदरीत कठीणच होते. न्यू कॅसल शहरातील रिचर्ड नावाच्या एका माणसाने १२८० मध्ये त्याच्या दहा फ्लीसेस लोकरीवर व्यापाऱ्यांनी जप्ती आणली म्हणून राजाकडे तक्रार केली. त्याला त्याची लोकर परत हवी होती. राजाने व्यापाऱ्यांना बोलावून त्याची लोकर का घेण्यात आली याबद्दल विचारणा केली. तेव्हा आपल्या बचावात व्यापाऱ्यांनी सांगितले, " राजा तिसरा हेन्री याने त्यांना शहरातील व्यापाऱ्यांची ' मर्चंट गिल्ड ' नावाची संघटना करण्यास मुभा दिली होती. अशी संघटना पूर्णपणे स्वतंत्र होती. " या संघटनेचे अधिकार काय होते असे विचारता ते म्हणाले की, " या गिल्डचा सभासद नसलेल्या कोणालाही शहरात विकण्यासाठी कापड कापता येणार नाही किंवा मांस आणि मासे विकता येणार नाहीत वा नवी कातडी अथवा लोकर विक्रीस आणता येणार नाही..." रिचर्ड या गिल्डचा सभासद नसल्यामुळे त्याला एकाधिकारी हुकुमत असलेल्या या गिल्डच्या परवानगीशिवाय मेंढीची लोकर विकता येणार नव्हती.

साऊथ ॲम्पूटनमध्ये सभासद नसलेले लोक वस्तू विकत घेऊ शकत पण तेथेही खरेदी करण्याचा पहिला मान मर्चन्ट गिल्डच्या सभासदांचाच असे. " शहरामध्ये विक्रीसाठी येणारी कोणतीही वस्तू जोपर्यंत मर्चन्ट गिल्डने खरेदी केलेली नाही तोपर्यंत

शहरातील दुसऱ्या कोणाही सामान्य माणसाला किंवा एखाद्या उपऱ्याला ती विकत घेण्याचा अधिकार नाही. कोणी तसे केल्याचे आढळल्यास त्याने विकत घेतलेली चीजवस्तू राजाकडून जप्त करण्यात येईल."

ज्याप्रमाणे सभासद नसलेल्या स्थानिक लोकांना आपल्या मलिद्यातील अंशही मिळू न देण्याचा गिल्ड्स् प्रयत्न करीत त्याचप्रमाणे परदेशी व्यापाऱ्यांनाही आपल्या परगण्यामध्ये नाक खुपसण्यास ते मज्जाव करीत. बाजारपेठेवर संपूर्ण ताबा मिळवणे हाच त्यांचा हेतू होता. शहरामध्ये येणारी किंवा शहराबाहेर जाणारी प्रत्येक वस्तू त्यांच्या हातातूनच गेली पाहिजे असा त्यांचा दंडक होता. परकीयांची स्पर्धा त्यांना नको होती. वस्तूंच्या किंमती गिल्ड्स् ठरवत. या मृगयेच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना स्वतःची हुकमत हवी होती. बाजारपेठेवर त्यांना स्वतःची एकाधिकारशाही प्रस्थापित करायची होती.

वेगवेगळ्या शहरांमध्ये व्यापारावर एकाधिकारी हुकुमत प्रस्थापित करण्यासाठी सत्ता निर्माण करायची, तर त्यासाठी शासनाबरोबर व्यापारी गिल्ड्स्चे संधान जुळणे आवश्यक होते ही गोष्ट तर स्पष्टच आहे. शहरामधील सर्वात महत्त्वाचा गट व्यापाऱ्यांचा असल्यामुळे शहराचे व्यवस्थापक कोण असावेत याबद्दलच्या त्यांच्या मताला वजन प्राप्त होई. यामुळे काही ठिकाणी अधिकारी त्यांच्या प्रभावाखाली असत तर काही ठिकाणी ते स्वतःच अधिकारपदाची सूत्रे हाती घेत. काही ठिकाणी तर कायदाच अशा तऱ्हेचा होता की फक्त गिल्डचे सभासदच शहराच्या व्यवस्थापनामध्ये सहभागी होऊ शकत. अर्थात अशी स्थिती क्वचितच असे. परंतु असे होत असे हे प्रेस्टन शहराच्या १३२८ मधील कागदपत्रांवरून सिद्ध होते. " ज्यांचे नाव गिल्ड मर्चेन्टमध्ये नमूद केलेले नाही अशा शहरवासियांना महापौर, 'बेलीफ' किंवा 'सार्जंट' होण्याचा अधिकार नाही. केवळ मर्चंट गिल्डचे सभासद असणाऱ्यांनाच राजाने ते स्वातंत्र्य बहाल केले आहे."

एकाधिकारी विशेष हक्क मिळविण्यासाठी मर्चंट गिल्डची सतत धडपड चालू असे. स्वतःच्या हक्कांवर त्यांचे बारीक लक्ष असे. त्यांच्या सभासदांवर ते अनेक प्रकारची बंधने लादत आणि प्रत्येकाला या नियमांचे पालन करावेच लागे. गिल्डच्या सभासदांना काही फायदे जरूर मिळत पण त्यासाठी त्यांना संघटनेचे नियम काटेकोरपणे पाळावे लागत. असे नियम अनेक होते व त्यांची अंमलबजावणी अतिशय कडक होती. हे नियम तोडल्यास शिक्षा म्हणून गिल्डच्या सभासदाला गिल्डमधून हाकलूनही लावण्यात येई. तीनशे वर्षांपूर्वी चेस्टरच्या गिल्डमध्ये अंमलात आणत असलेली शिक्षेची पद्धत विशेष मनोरंजक आहे. टी. ॲल्डर्सली याने नियमांचा भंग केला आहे असे लक्षात येताच चेस्टर येथील कंपनी ऑफ मर्सर्स ॲन्ड आयर्न-मॉंगर्सने त्याला त्याचे दुकान बंद करण्यास सांगितले. टी ॲल्डर्सलीने त्यास नकार दिला. " तेव्हा प्रत्येक दिवशी त्या कंपनीतील दोघे जण त्या दुकानासमोर जात आणि ग्राहकांना खरेदी करण्यास मज्जाव करीत."

विसाव्या शतकातील रीतीप्रमाणे कोर्टाचा मनाईहुकूम आणून ही निदर्शने थांबवणे ॲल्डर्सलीला शक्य नव्हते हे आपण सहज समजू शकतो. कारण त्याकाळी गिल्ड्स् या अतिशय शक्तिमान होत्या. त्या केवळ स्वतःच्या विशिष्ट वस्तीमध्येच सत्ताधारी होत्या

असे नव्हे तर त्यांची सत्ता दूरवर पसरलेली असे. एकत्रित येण्याच्या त्यांच्या जुन्याच पद्धतीमुळे त्यांना हे शक्य होते. विखुरलेल्या हॅन्सेसूची एक ताकदवान संघटना होऊ शकते याचे जर्मनीची सुप्रसिद्ध हॅन्शियाटिक लीग हे एक उत्तम उदाहरण होते. हॉलंडपासून रशियापर्यंत पसरलेली किल्लेवजा कोठारे ही त्यांची व्यापारी केंद्रे होती. या लीगची सत्ता परमावधीला पोहोचली होती. त्या काळात संपूर्ण उत्तर युरोपचा बाह्य जगाबरोबर जो व्यापार सुरू होता त्यावर एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याएवढी, १०० शहरांमध्ये त्यांची संघटना होती. एखाद्या शासनसंस्थेप्रमाणेच तिचे स्वरूप होते. ती व्यापारी करार करी, तिच्या व्यापारी नौका होत्या व त्यांच्या संरक्षणासाठी युद्धनौकाही होत्या. तिने उत्तर समुद्रातील चांचेगिरी समूळ नष्ट केली. एवढेच नव्हे, तर कायदे करण्यासाठी तिची विधिमंडळेही होती.

व्यापाऱ्यांनी आणि शहरवासियांनी जे अधिकार जिंकून मिळवले त्यावरून संपत्तीचा उगम म्हणून व्यापाराचे वाढते महत्त्व लक्षात येते. तसेच शहरांमधील व्यापाऱ्यांच्या वाढत्या महत्त्वावरून जमिनींऐवजी पैशाचे वाढते महत्त्वही आपल्या ध्यानात येते.

सरंजामशाहीच्या सुरुवातीच्या काळात जमीन हेच माणसांच्या श्रीमंतीचे एकमेव परिमाण होते. व्यापाराच्या वाढीनंतर तेथे एका नव्या प्रकारच्या संपत्तीचा प्रवेश झाला. ही पैशाच्या रूपातील संपत्ती होय. सरंजामशाहीच्या काळात पैसा हा प्राणहीन आणि अचल होता. तर आता तो चल, प्रवाही आणि सजीव झाला होता. पूर्वी सरंजामी पिरॅमिडच्या तळाला भूदास होते तर त्याच्या कळसावर विराजमान झालेले आणि त्यांच्या श्रमावर जगणारे, धर्मगुरू आणि योद्धे हे जमीन मालक होते. यामध्ये आता एका नव्या गटाने प्रवेश केला होता. खरेदी आणि विक्री करून एका नव्या पद्धतीचे जीवन जगणारा मध्यमवर्ग* अस्तित्वात आला होता. सरंजामी काळामध्ये संपत्तीचे एकमेव उगमस्थान जमिनीची मालकी हेच होते. या मालकीच्या जोरावर धर्मगुरू आणि अमीर-उमराव यांच्या हाती सत्ता एकवटली होती. आता पैशाच्या वर्चस्वामुळे, एका नव्या प्रकारच्या संपत्तीमुळे, शासनसत्तेमध्ये एक वाटेकरी म्हणून मध्यमवर्ग पुढे आला.

◇ ◇ ◇

* [हा मध्यमवर्ग म्हणजे आजच्या समाजात रूढ अर्थाने ओळखला जाणारा मध्यमवर्ग नव्हे. हा मध्यमवर्ग म्हणजे आजच्या भांडवलदारवर्गाचे बाळरूप होते. त्या वेळच्या सरंजामी पिरॅमिडमध्ये धर्मगुरू-उमराव आणि भूदास यांच्या अध्येमध्ये स्थान असलेला तो एक समाजगट होता; एक वर्ग म्हणून त्याला अस्तित्वच नव्हते. धर्मगुरू आणि उमराव यांची सत्ता उलथवून टाकण्याच्या प्रक्रियेत हा समाजगट भांडवलदारवर्ग म्हणून कालांतराने अस्तित्वात आला.]

४

जुन्याच्या जागी नव्या संकल्पना

आजकाल व्याजाने कर्जाऊ घेतलेल्या पैशावर बहुतेक धंदे चालतात. युनायटेड स्टेट्स् स्टील कंपनीला पोलादाचे उत्पादन करणाऱ्या दुसऱ्या एखाद्या कंपनीची मालमत्ता विकत घ्यायची असेल तर ती त्यासाठी लागणारे भांडवल कर्ज काढून उभे करू शकते. किंवा पैसे कर्जाऊ देणाऱ्यांना व्याजासहित मुद्दल परत करण्याचे आश्वासन देणारे कर्जरोखे विक्रीस काढूनही सदर कंपनी तीच गोष्ट करू शकते. आपल्या घराजवळील कोपऱ्यावरच्या हलवायाला त्याच्या दुकानाच्या सजावटीसाठी काही महागड्या वस्तू खरेदी करायच्या असतात. तेव्हा तो बँकेकडून कर्ज काढतो. बँक त्याला पैसे कर्जाऊ देते आणि त्यावर व्याज आकारते. जमिनीजवळील दुसरा एखादा जमिनीचा तुकडा विकत घेण्यासाठी रक्कम उभी करताना शेतकरी स्वतःची जमीन गहाण ठेऊ शकतो. जमिनीच्या तारणावर शेतकऱ्याला कर्ज मिळते आणि अशा कर्जावर तो सालिना व्याज भरतो. अशा रीतीने कर्जाऊ घेतलेल्या रकमेवर द्यायच्या व्याजाची आपल्याला एवढी सवय झाली आहे की ती गोष्ट म्हणजे आजवर नेहमीच अस्तित्वात असलेली एक 'नैसर्गिक' गोष्ट आहे असे आपल्याला वाटते.

परंतु आपल्याला वाटणारे ते नेहमीच खरे नसते. कर्जाऊ दिलेल्या पैशाच्या उपयोगासाठी व्याज आकारणे हा एक महाभयंकर गुन्हा आहे असे समजले जाणाराही एक काळ होता. मध्ययुगाच्या सुरुवातीच्या काळात व्याजाने पैसे कर्जाऊ देण्याला बंदी करणारी एक सत्ता होती. संपूर्ण खिश्चन जगतामध्ये ही सत्ता म्हणेल तीच पूर्व दिशा होती.

ती सत्ता म्हणजे चर्चसंस्था होय. चर्चच्या म्हणण्यानुसार जबरदस्त व्याजाने पैसे कर्जाऊ देऊन धनसंचय करणे हा लुटारूपणाचा प्रकार होता, आणि असा लुटारूपणा करणे हे **महापाप** होते. हे ठळक अक्षरात छापले आहे. कारण चर्चने केलेली धर्माज्ञा त्याकाळी तशीच वजनदार होती आणि तिचा भंग करणाऱ्यांना नरकवासाची धमकी देणारी धर्माज्ञा तर विशेषच महत्त्वाची होती. त्या सरंजामी काळामध्ये माणसांच्या मनोव्यापारावरील चर्चची पकड आजच्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त होती.

परंतु या लुटारूपणाचा तिरस्कार करणारी चर्च ही काही एकच संस्था नव्हती. नगरपालिकांनी आणि नंतर शासनानेदेखील त्याविरुद्ध कायदे केले होते. इंग्लंडमधील जबर व्याज–आकारणी विरुद्धचे एक विधेयक म्हणते : "या जबर व्याज–आकारणीवर देवाच्या नावाने बंदी घालण्यात आली आहे. परंतु केवळ देवाच्या सांगाव्याने आणि शिकवणीने या राज्यातील हावरट, आसक्त आणि दानतशून्य माणसांच्या मनातून हा सर्वांत तिरस्करणीय दुर्गुण जायचा नाही. यामुळेच कोणत्याही श्रेणीतील किंवा कोणत्याही स्तरातील माणसाने कोणतीही युक्ती-प्रयुक्ती लढवून पैसे व्याजी लावण्याचा लुटारूपणा करू नये असा कायदा करण्यात येत आहे. हा कायदा तोडल्यास व्याजाने दिलेली रक्कम तर जप्त करण्यात येईलच आणि वर सावकाराला तुरुंगात जावे लागेल." मध्ययुगीन काळामध्ये व्याज-आकारणीबद्दल बहुसंख्य लोकांच्या विचारांचे प्रतिबिंब आपल्याला या कायद्यामध्ये उमटलेले दिसते. व्याज आकारणी मुळातच वाईट आहे याबद्दल लोकांमध्ये एकमत होते. पण त्यांना असे वाटण्याचे कारण काय ? व्याज-आकारणीबद्दलची ही मनोवृत्ती कशी तयार झाली ? या गोष्टी समजून घेण्यासाठी आपण सरंजामी समाजातील माणसा-माणसांमधील संबंधांचा विचार करणे अगत्याचे आहे.

ज्या समाजामध्ये व्यापार अत्यंत मर्यादित होता आणि नफ्यासाठी पैसे गुंतवण्याचे मार्ग उपलब्ध नव्हते, तेव्हा एखाद्या माणसाला श्रीमंत होण्यासाठी नव्हे तर जगण्यासाठी कर्ज काढावे लागे. त्याच्यावर दुर्दैवाचा घाला आल्यामुळेच तो कर्ज काढी. कदाचित गुरे मृत्युमुखी पडली किंवा दुष्काळात पीक नष्ट झाले अशा प्रकारच्या आपत्तींमुळे त्याला मदतीची जरूर भासे. तेव्हा त्याच्या दुर्दैवाचा फायदा घेऊन त्याला मदत देणाऱ्या माणसाने नफेखोरी करता कामा नये ही मध्ययुगीन काळाची धारणा होती. चांगला ख्रिश्चन माणूस नफ्याची आशा न धरता त्याच्या शेजाऱ्याला मदत करी. एखाद्याने जर कोणाला एक पोते पीठ उसने दिले असेल तर केवळ तेवढेच परत मागणे उचित असे, अधिक नाही. त्याने त्यापेक्षा जर अधिक पीठ घेतले तर ती फसवणूक समजली जाई – तो अन्याय ठरे. प्रत्येकाच्या हक्काचीच गोष्ट प्रत्येकाला मिळणे योग्य होते, त्याहून अधिक नाही वा कमी नाही.

माणसाच्या सर्वच व्यवहारांमध्ये काही योग्य आणि काही अयोग्य असते अशी चर्चची शिकवण होती. माणसाच्या धार्मिक कार्याबद्दलच्या योग्यायोग्यतेचे मोजमाप त्याच्या सामाजिक आणि प्रामुख्याने आर्थिक व्यवहाराच्या मोजमापापेक्षा वेगळे नव्हते. या सर्व व्यवहारांकरता चर्चचे योग्यायोग्यतेचे नियम सारखेच होते.

आजकाल धंद्यामध्ये एखाद्या तिऱ्हाइताबरोबरचा व्यवहार आणि मित्र किंवा शेजाऱ्याबरोबरचा व्यवहार यामध्ये आपण फरक करतो. धंद्याच्या बाबतीत आपण ज्या गोष्टी प्रमाणभूत मानतो त्याच इतर कामांच्या बाबतीत मानत नाही म्हणूनच एखादा उद्योजक त्याच्या स्पर्धकाची धंद्यातून उचलबांगडी करण्यासाठी जमतील ते सर्व प्रयत्न करतो. यासाठी तो कमी किंमतीस आपला माल विकील, व्यापारी युद्ध सुरू करील किंवा आपल्या कंपनीसाठी विशेष सूट मिळवेल. आपल्या प्रतिस्पर्ध्याला कोंडीत पकडण्यासाठी जे जे म्हणून शक्य असते ते सर्व तो करील. या प्रकारांमुळे त्याचा स्पर्धक मेटाकुटीस

येईल. याची उद्योजकाला जाणीव असते, पण तरीही तो हे करतोच. कारण, " धंदा म्हणजे धंदा " अशी त्याची धारणा असते. पण हाच माणूस आपला मित्र किंवा शेजारी यांना पळभरही उपाशी ठेवणार नाही. अशा रीतीने आर्थिक व्यवहाराकरता एक, तर इतर व्यवहाराकरता दुसरे प्रमाण लावणे हा आजचा प्रकार मध्ययुगीन काळातील चर्चेच्या शिकवणीविरुद्ध होता आणि चर्चेच्या शिकवणीनुरूपच बहुतेक लोकांच्या समजुती असत.

माणसाच्या शरिराकरता चांगली असलेली गोष्ट जर त्याच्या आत्म्याकरता चांगली नसेल तर त्याने पारमार्थिक सुखच अधिक महत्त्वाचे मानले पाहिजे अशी चर्चेची शिकवण होती. " संपूर्ण जग जिंकूनही स्वतःचा आत्मा स्वतःला पारखा होणार असेल तर त्याचा काय फायदा ? " एखाद्या व्यवहारात एखाद्याला त्याच्या योग्य वाट्यापेक्षा अधिक मिळाले तर त्याची भरपाई दुसऱ्या कोणाला तरी करावीच लागते. म्हणूनच कोणालाही अधिक मिळणे चुकीचे होते. मध्ययुगीन काळातील एक मोठे धार्मिक विचारवंत सेन्ट थॉमस आक्विनास यांच्या मते " प्राप्तीची हाव " तिरस्करणीय होती. व्यापार ही उपयुक्त बाब आहे हे जरी त्या काळी दात ओठ खात मान्य केले जाई, तरीही व्यापाऱ्यांना खरेदी-विक्रींमधून त्यांच्या मोलमजुरीपेक्षा अधिक नफा मिळवण्याचा अधिकार नव्हता.

डिझ्राएलीच्या व्याख्येप्रमाणे " एका बाजूला गटवणारा आणि दुसऱ्या बाजूला ठकवणारा " असे काही शतकानंतर ज्याचे वर्णन केले जाई, तो दलाल मध्ययुगीन काळातील चर्चेच्या लोकांनी अतिशय कठोरपणे दोषी ठरवला असता. स्वतःचा फायदा होईल असा धंद्याचा कोठलाही व्यवहार न्याय्य असल्याचा आधुनिक विचार हा मध्ययुगीन विचारसरणीचा भाग नव्हता. कमीतकमी किंमतीला माल खरेदी करून तो जास्तीत जास्त किंमतीला विकून यशस्वी होणारा आजचा उद्योगपती किंवा व्यापारी यांच्यावर मध्ययुगामध्ये आग पाखडण्यात आली असती. एक आवश्यक सार्वजनिक सेवा करण्याखातर व्यापाऱ्याला न्याय्य मिळकत होणे तेव्हा मंजूर होते—पण त्यापेक्षा अधिक नाही.

स्वतःच्या गरजेपेक्षा अधिक पैसा जमा करणे हे त्याकाळी अनैतिक मानले जाई. बायबलमध्ये याबद्दल स्पष्टच उल्लेख आहे : " सुईच्या नेढ्यामधून उंट जाणे एक वेळ शक्य आहे पण श्रीमंत माणूस स्वर्गात जाणे शक्य नाही."

त्या काळच्या एका लेखकाने या संदर्भात व्यक्त केलेले मत पहा : " स्वतःच्या गरजा भागवण्याएवढी मिळकत असूनही अधिक संपत्ती मिळविण्याकरता धडपडणारा माणूस —मग त्याची ही हाव उच्चतर सामाजिक स्थान मिळवण्याकरता असो, वा भविष्यकाळात श्रमाविना जगण्याकरता असो किंवा स्वतःची मुलेबाळे श्रीमंत आणि प्रतिष्ठित व्हावीत यासाठी असो—त्याची अपरिमित हाव, सुखलोलुपता आणि गर्व या कारणास्तव तो तिरस्करणीयच म्हटला पाहिजे."

नैसर्गिक अर्थव्यवस्थेची परिमाणे अंगवळणी पडलेल्या माणसांनी तीच परिमाणे नव्या परिस्थितीतील बदललेल्या चलनी अर्थव्यवस्थेला लावण्याचा उद्योग आरंभला

होता. म्हणूनच त्यांच्या मते जर एखाद्याने कोणाला १०० रुपये दिले असतील तर केवळ १०० रुपयेच परत घेण्याचा नैतिक अधिकार त्याला पोहोचतो. स्वतःच्या पैशाच्या उपयोगासाठी कोणी व्याज आकारले तर स्वतःच्या अखत्यारीत नसलेला वेळ तो विकत आहे असा त्याचा अर्थ होतो. वेळेवर देवाची अधिसत्ता आहे आणि तो विकण्याचा कोणालाही कसलाही अधिकार नाही.

शिवाय पैसे कर्जाऊ दिल्यावर केवळ मुद्दलच नव्हे तर व्याजही घेतल्यामुळे काही-जणांना काम न करता जगता येईल आणि हे चुकीचे होते. (मध्ययुगीन काळाच्या संकल्पनेप्रमाणे धर्मगुरू आणि योद्धे हे देखील त्यांना साजेसे काम करतात असे मानले जाई.) आमचा पैसा आमच्यासाठी काम करतो आहे असे सांगितल्यास चर्चच्या पाठीराख्यांना राग आला असता. पैसा ही अनुत्पादक चीज आहे, त्यातून काहीही निर्माण करता येत नाही असे त्यांनी बजावले असते. थोडक्यात, व्याज आकारणे हे निश्चितच चुकीचे आहे असे चर्चचे ठाम मत होते.

अर्थात चर्चसंस्था असे म्हणत असे. पण तिची उक्ती आणि कृती यात फरक होता. धर्मगुरू आणि अमीर-उमराव यांनी व्याज-आकारणीविरुद्ध कितीही वादळ उठवले आणि कायदे केले असले तरीही हे कायदे मोडणाऱ्यांमध्ये पहिला नंबर त्यांचाच होता. त्यांनी स्वतःच व्याजाने पैसे कर्जाऊ दिले आणि अगदी त्याच वेळेला व्याज आकारणाऱ्या इतर लोकांविरुद्ध ते कायदे करत होते. तेव्हा ज्यू लोकांचा छोट्या प्रमाणावर सावकारीचा धंदा चाले. पैसे गमावण्याचा मोठा धोका असल्यामुळे ते प्रचंड दराने व्याज आकारत. या कृत्याबद्दल लुटारू म्हणून त्यांचा द्वेष आणि छी थू करण्यात येई. याउलट इटाली-मधील बँकर्स हाच धंदा प्रचंड प्रमाणावर करणारे बडे सावकार होते. बऱ्याच वेळा त्यांच्या कर्जावरील व्याज दिले गेले नाही तर ऋणकोला पारमार्थिक शिक्षेचा धाक दाखवून पोप स्वतःच ते वसूल करी! अशा रीतीने स्वतःच एक नंबरचे पापी असणाऱ्या चर्चने लुटारूंविरुद्ध बोंबाबोंब चालूच ठेवली होती.

युरोपमध्ये व्यापाराच्या कक्षा रुंदावत असताना, व्याज आकारणे हे पाप ठरवणारा सिद्धान्त नव्या व्यापारीवर्गाच्या कार्यपद्धतीला मारक होता ही गोष्ट कोणाच्याही सहज लक्षात येईल. आर्थिक व्यवहारामध्ये पैशाचे महत्त्व जसे वाढू लागले तसा हा सिद्धान्त अधिकच जाचक होऊ लागला

व्यापाऱ्यांचा हा वाढता मध्यमवर्ग आपला पैसा भल्यामोठ्या तिजोऱ्यांमध्ये साठवून ठेवत नसे. (पैसे गुंतवण्याचे मोजकेच मार्ग उपलब्ध असलेल्या सरंजामी काळातील ती सवय होती.) हातात येईल तेवढा पैसा वापरणे आता या नव्या वर्गाला शक्य होते. चालू असणाऱ्या धंद्याच्या स्थैर्यासाठी आणि त्या धंद्याचा पसारा अधिकाधिक वाढवून जास्त नफा मिळवण्यासाठी आता व्यापाऱ्याला अधिक पैशाची जरूर भासे. पण त्याला तो कोठून मिळणार? अँन्टोनिओ या व्हेनिसच्या व्यापाऱ्याने जसे शायलॉक या ज्यू सावकाराचे दार ठोठावले, त्याप्रमाणे आता व्यापारी सावकाराकडे किंवा बड्या व्यापाऱ्यां-कडे जाऊ शकत असत. तसेच वस्तूंचा व्यापार न करता चलनाचा व्यापार करणाऱ्या

त्या काळच्या बड्या सावकारांकडेही ते जात. परंतु हे काम सोपे नव्हते. पैसे व्याजाने देण्यास बंदी करणारा चर्चचा कायदा त्यांच्या वाटेत आडवा येत असे.

जुन्या अर्थव्यवस्थेशी संयुक्तिक असलेला चर्चचा हा सिद्धान्त वाढत्या व्यापारी ऐतिहासिक शक्तींच्या आमनेसामने आला तेव्हा त्या सिद्धान्ताचे काय झाले? सिद्धान्ताने माघार घेतली. अर्थात एका झटक्यात नव्हे. हळूहळू नवे कायदे म्हणू लागले : "व्याज आकारणे हे पाप आहे—परंतु काही वेळेला..." किंवा "जबर व्याज आकारणे हे जरी पाप असले तरी विशेष परिस्थितीमध्ये..." वगैरे वगैरे.

व्याज-आकारणीला विरोध करणाऱ्या या सिद्धान्ताला धाब्यावर बसवणाऱ्या या विशेष परिस्थितीकडे आपण लक्ष देणे उद्‌बोधक ठरेल. जर 'स' या सावकाराने 'व' या व्यापाऱ्याला पैसे कर्जाऊ दिले तर त्यावर व्याज आकारणे चुकीचे आहे अशी आधी चर्चची भूमिका होती. पण नंतर वारा बदलताच चर्चने आपली पाठ फिरवली. आता चर्चचा युक्तिवाद असा झाला की 'व' हा व्यापारी 'स' या सावकाराकडून कर्जाऊ घेतलेला पैसा व्यापाराकरता उपयोगात आणणार आहे. या व्यापारात तो सर्व पैसा गमावणेही शक्य आहे. यामुळे या व्यवहारात 'स'ने जो धोका पत्करला आहे, त्याखातर त्याला 'व'ने कर्जाऊ घेतलेल्या रकमेपेक्षा थोडेसे अधिक पैसे देणे उचितच ठरेल.

किंवा 'स' या सावकाराने हा पैसा स्वतःकडेच ठेवला असता तर त्याचा वापर करून त्याला नफा मिळवता आला असता. अशा वेळी 'स'ने हा पैसा स्वतः वापरला नाही याची भरपाई करण्यासाठी 'व' या व्यापाऱ्याकडून त्याने थोडे अधिक पैसे घेणे वाजवीच म्हणावे लागेल

अशा परिस्थितीनुसार व्याज-आकारणी सिद्धान्तामध्ये बदल करण्यात आले. "मर्यादित आणि वाजवी व्याज-आकारणी" कायदेशीर करण्यासाठी फ्रेंच वकील श्री. चार्ल्स् द्युमोलीं तो "नेहमीचाच व्यापारी व्यवहार" असल्याचा दावा करतात ही एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. त्यांचा युक्तिवाद असा होता : "पैशाच्या साठ्याचा उपयोग थोडाथोडका नाही हे नेहमीच्या व्यापारी व्यवहारावरून दिसून येते. पैसा अनुत्पादक आहे हे म्हणणेही बरोबर नाही. तसे पाहिले तर शेतामध्ये देखील माणसाने श्रम केल्याशिवाय पीक येत नाही. त्याचप्रमाणे कर्जाऊ घेतलेले पैसे जरी शेवटी परत दिले, तरीही मध्यंतरीच्या काळात माणसाच्या उद्यमशीलतेमुळे पैशापासून संपत्ती निर्माण होऊ शकते. काही वेळेला ऋणकोएवढे धनकोलाही मिळू शकत नाही. त्यामुळे व्याज घेणाऱ्याचा तिरस्कार करणे, त्याला दोषी ठरवून शिक्षा देणे या गोष्टी केवळ अमर्यादित आणि अवाजवी व्याज आकारणी करणाऱ्यालाच लागू कराव्यात, इतरांना नव्हे."

आणि अशा रीतीने, हळूहळू चर्चचा व्याज-आकारणीविरोधी सिद्धान्त जाऊन त्याजागी "नेहमीचा व्यापारी व्यवहार" रूढ झाला. समाज विकासाच्या एका नव्या पायरीवर येऊन ठेपला आणि माणसांच्या श्रद्धा, कायदे, जगण्याच्या पद्धती, वैयक्तिक नातीगोती या सर्व गोष्टींमध्ये बदल घडून आला.

◇ ◇ ◇

५

शेतकरी बंधने झुगारून देतो

आता शेतकऱ्याच्या सामाजिक स्थानामध्ये एक महत्त्वाचा बदल घडून आला. कालपर्यंतच्या स्थिर सरंजामी समाजव्यवस्थेत जमीनमालक आणि भूदास यांच्यातील संबंध रूढीने निश्चित होत असत. तेथे शेतकऱ्याला स्वतःची स्थिती सुधारणे जवळपास अशक्यच होते. आर्थिक आणि सामाजिक बंधनांमध्ये तो पूर्णपणे जखडलेला होता. परंतु व्यापाराची वाढ, चलनी अर्थव्यवस्थेची सुरुवात आणि शहरांचा उदय यामुळे आजवर घट्ट बांधून ठेवणारी बंधने तोडण्याची संधी त्याला उपलब्ध झाली.

आपला बहुतेक सर्व वेळ व्यापार किंवा उद्योग यांसाठी उपयोगात आणणाऱ्या माणसांची वसतिस्थाने म्हणून शहरे उदयाला येतात तेव्हा अशा शहरवासियांना अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी ग्रामीण विभागावर अवलंबून राहावे लागते. यातून शहरी भाग आणि ग्रामीण भाग यांमध्ये श्रमविभागणी होते. औद्योगिक उत्पादन आणि व्यापार यावर एकीकडे लक्ष केंद्रित केले जाते आणि या धान्योत्पादन न करणाऱ्या लोकांमुळे वाढणाऱ्या बाजारपेठेला शेतीमाल पुरवण्याचे काम मुख्यतः ग्रामीण विभागात [illegible]त करण्यात येते. या बाजारपेठेच्या वाढीमुळे इतिहासक्रमात सर्व ठिकाणी उत्पादन-[illegible] उत्तेजन मिळाले आहे. पण शेतीमालाचे उत्पादन वाढण्याच्या पद्धती कोणत्या? [illegible]ने दोन. एक म्हणजे सघन शेती. याचा अर्थ जुन्याच जमिनीची अधिक चांगली [illegible] करून, खतांचा वापर करून आणि अधिक शास्त्रोक्त पद्धतीने कामे करून [illegible] वाढवणे. दुसरी पद्धत म्हणजे शेती क्षेत्राचा विस्तार करणे. यामध्ये पूर्वी कधीही [illegible]खाली न आणलेली जमीन लागवडीखाली आणण्यात येते. वाढत्या बाजारपेठें-[illegible] या दोन्ही पद्धतींनी उत्पादनवाढ करण्यास सुरुवात झाली.

[illegible]केतील साहसी शोधकांनी स्वतःची आमदनी वाढण्यासाठी ज्याप्रमाणे [illegible] लागवडीखाली नसलेल्या जमिनीकडे नजर वळवली, त्याचप्रमाणे बाराव्या [illegible] पश्चिम युरोपच्या महत्त्वाकांक्षी शेतकऱ्यांनी सरंजामी दमनाच्या दुष्टचक्रातून [illegible]ण्यासाठी लागवडीखाली नसलेल्या जमिनीकडे धाव घेतली. त्या शतकाच्या [illegible] होऊन गेलेल्या एका जर्मन लेखकाने या प्रक्रियेचे वर्णन केले आहे:

"सत्ताधारी लोकांच्या हावरटपणामुळे व लुटालुटीमुळे शेतकरी आणि गरीब यांचे दमन होत आहे, त्यांच्यावर खोटेनाटे खटले भरले जात आहेत. या पापी शक्तींच्या दडपणामुळे शेतकऱ्यांना आपले वडिलोपार्जित अधिकार विकून टाकून दूर प्रदेशाकडे स्थलांतर करणे भाग पडत आहे."

अमेरिकेस वस्ती करण्यासाठी गेलेल्या साहसी शोधकांसाठी जवळपास संपूर्ण खंड मोकळे होते. पण या बाराव्या शतकातील युरोपमधील पीडित शेतकऱ्यांना मोकळी जमीन मिळणार होती कुठे ? तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण त्याकाळी फ्रान्समधील जमिनीचा दुसरा हिस्सा, जर्मनीतील तिसरा हिस्सा तर इंग्लंडमधील केवळ पाचवा हिस्सा एवढीच जमीन लागवडीखाली होती. उर्वरित भूप्रदेशावर जंगल नाही तर दलदल होती. म्हणजे लागवडीखाली असलेल्या छोटया भूभागाच्या भोवतालची ही पडीक जमीन लागवडीसाठी मोकळी होती. सतराव्या शतकातील अमेरिकेप्रमाणेच बाराव्या शतकातील युरोपला खुणावून बोलावणारी ती सरहद्द होती. काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांनी निचरा, दलदल आणि जंगल यांचे आव्हान स्वीकारले. "स्वातंत्र्य आणि संपत्तीच्या आमिषाने हजारो शोधकांनी खुरटी झाडी, दाट झुडपे व बांडगुळे जाळून टाकून, कुऱ्हाडीने जंगल साफ करून लाकडांचे ओंडके हलवून शेतीयोग्य जमीन तयार करायला सुरुवात केली." अशा रीतीने अमेरिकेच्या पूर्वी पाच शतके युरोपचे "पश्चिमायन" सुरू झाले. अमेरिकेमध्ये सतराव्या आणि एकोणिसाव्या शतकांच्या दरम्यान शोधकांनी झाडांवर कुऱ्हाडीचे घाव घालायला सुरुवात केली तेव्हा त्यांना ऐकू आलेला आवाज हा युरोपने तशाच परिस्थितीत पाचशे वर्षांपूर्वी ऐकलेल्या आवाजाचा प्रतिध्वनी होता. अमेरिकेतील शोधकांनी जंगलाखालील जमिनीचे शेतजमिनीत रूपांतर केले. त्यापूर्वी युरोपियन शोधकांनी दलदल संपुष्टात आणून, समुद्राचे जमिनीवरील अतिक्रमण थोपविण्यासाठी बांध घालून आणि जंगले साफ करून पडीक जमिनीचे शेतजमिनीमध्ये रूपांतर केले होते. सतराव्या शतकाप्रमाणेच या बाराव्या शतकातील शोधकांचा लढा मोठा बिकट होता. पण यामध्ये यशस्वी झाल्यास त्यांना स्वातंत्र्य मिळणार होते. भागिदारीने का होईना पण जमिनीचा एक तुकडा त्यांना आपल्या मालकीचा करता येणार होता. मुख्य म्हणजे ही जमीन श्रमसेवेतून माफ होती. यामुळे अनेक शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा उठवला यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. जमिनी इनाम मिळविण्यासाठी त्यांनी कळकळीची विनंती केली यातही नवल नाही. यासंबंधी ११०६ साली दिलेल्या एका सनदेमध्ये हाम्बुर्गचा बिशप विशद करतो :

" १. हॉलंडवासी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, ऱ्हाइनच्या या तीरावर राहाणाऱ्या लोकांनी आमच्याबरोबर केलेला एक करार आम्ही जाहीर करू इच्छितो.

२. आमच्या बिशप-परगण्यातील पडीक, दलदलीच्या आणि आपल्या लोकांना निरुपयोगी अशा काही जमिनी आपल्याला इनाम म्हणून मिळाव्यात यासाठी त्यांनी आमच्याकडे याचना केली. या संदर्भात आम्ही आमच्या प्रजाजनांची मते विचारात घेऊन आम्हाला व आमच्या वंशजांना किफायतशीर ठरणारी त्यांची ही मागणी मान्य केली आहे.

३. जमिनीच्या प्रत्येक बिघ्यापोटी त्यांनी आम्हाला सालिना एक डिनॅरिअस द्यावा असे करारपत्रात नमूद करण्यात येत आहे. त्या भूभागातून वाहणाऱ्या नाल्यांचाही उपयोग करायला आम्ही त्यांना परवानगी दिली आहे.

४. आमच्या हुकुमानुसार खंड द्यायचे त्यांना मान्य केले आहे. म्हणजे धान्याचा अकरावा हिस्सा, मेंढ्यांचा दहावा हिस्सा, डुकरे, शेळ्या आणि बदके यांचा दहावा हिस्सा, मध आणि जवसाचा दहावा हिस्सा ...

५. सर्व धार्मिक गोष्टींमध्ये आमचा सल्ला घेण्याचे त्यांनी मान्य केले आहे.

६. ऐहिक गोष्टींच्या न्यायनिवाड्याबाबत त्यांनी स्वतःची न्यायालये स्थापन करण्याची सवलत देण्याखातर दर १०० बिघे जमिनीसाठी दोन मार्क्स (जर्मन नाणे) देण्याचे त्यांनी कबूल केले आहे ..."

" आम्हाला व आमच्या वंशजांना फायदेशीर होईल " यासाठी हाम्बुर्गच्या बिशपने हॉलंडवासियांबरोबर हे करारपत्र केले. अनुत्पादक जमिनीचे उत्पादक शेतजमिनीत रूपांतर करून त्यावर शेती करण्याची सवलत दिल्याखातर शोधक शेतकरी वार्षिक खंडही देणार असल्याने हा करार फायदेशीर आहे असे धर्मगुरू आणि अमीर–उमराव यांना वाटले. त्यांच्यापैकी अनेकजण तर इच्छुक कामकरी येऊन " कळकळीची विनंती " करण्याची वाट पहात शांत बसले नाहीत. तर जमीन साफ करून शेती करू इच्छिणाऱ्या व त्यापोटी खंड देणाऱ्या कोणालाही आपण जमीन कसायचा हक्क देऊ ही गोष्ट त्यांनी जगजाहीर केली. जी पूर्वी निकऱ्याची जमीन होती ती खंडाने देण्याच्या या उद्योगात काही सुपीक डोक्याचे सरंजामदार चांगलेच यशस्वी झाले. त्यानी पडीक जमिनीवर गावे वसवून वर नफा मिळवला. शेती विस्ताराच्या या वाढत्या चळवळीमुळे हजारो एकर पडीक जमीन नांगरटीखाली आली. सिलेसियामध्ये १३५० साली अशा दीड ते दोन लाख बसाहत-वाल्यांनी वसविलेल्या १,५०० नवीन वस्त्या होत्या. हा विस्तृत विकास महत्त्वाचा होता. आता जाचक श्रमसेवेऐवजी केवळ रोख खंडाचे बंधन स्वीकारून सर्फना जमीन मिळाली ही देखील तेवढीच महत्त्वाची गोष्ट होती. जुन्या मनोरमधील सर्फवर प्रभाव पाडण्याएवढा या नव स्वातंत्र्याचा विस्तार होणे क्रमप्राप्तच होते आणि प्रत्यक्षात तसेच झाले !

तोपर्यंत वर्षानुवर्षे शेतकरी परिस्थितीच्या जाचक जाळ्यामध्ये गुरफटला होता. सुस्पष्ट सामाजिक विभागणी असलेल्या त्या समाजव्यवस्थेमध्ये जन्माला आलेल्या शेतकऱ्याला स्वर्गाचे राज्य मिळणार असल्याची ग्वाही देण्यात येत असे. परंतु त्यासाठी त्याने धर्मगुरू, योद्धे आणि कष्टकरी अशा तीन वर्गांनी बनलेल्या समाजामध्ये दिलेले काम स्वच्छेने आणि व्यवस्थितपणे पूर्ण केले पाहिजे अशी अट होती. त्यामुळे उलट प्रश्न न विचारता तो आपले काम करीत होता भूदास त्या सरंजामी पिरॅमिडच्या शिखराच्या आसपासही जाण्याची शक्यता त्या व्यवस्थेत जवळपास अस्तित्वातच नसल्यामुळे, त्याला उदरनिर्वाहाहून अधिक काहीही करण्याला तेथे उत्तेजन नव्हते. म्हणूनच रूढीनुसार तो आपले नेहमीचे काम करीत असे. नवीन बियाणी विकसित करणे वा पिके घेण्याच्या नव्या पद्धतीचे प्रयोग करणे यामुळे त्याचा काहीही मतलब साध्य होणार नव्हता. कारण, एक तर

बाजारपेठ मर्यादित होती आणि दुसरे म्हणजे झालेल्या उत्पादनवाढीमध्ये सरंजामदाराने सिंहाचा वाटा मागितला असता.

परंतु आता परिस्थिती पार बदलली होती. बाजारपेठेच्या कक्षा रुंदावल्या होत्या. आता आपली गरज आणि सरंजामदाराचा वाटा वजा जाता उरणारे पीक तो बाजारात विकू शकत होता. त्याच्या बदल्यात त्याला पैसा मिळणार होता. या पैशाचा उपयोग करण्याची त्याला अजून सवय झाली नव्हती पण ती हळूहळू होत होती. त्याचबरोबर जुन्या चौकटीमध्ये न बसणारा व्यापाऱ्यांचा वर्ग अस्तित्वात आल्याची समज त्याला आली होती. या व्यापाऱ्यांची आज चलती होती आणि जवळपासच्या शहरामध्ये कधीमधी भटकत गेलेल्या भूदासानी नशीब काढले होते. आता या बदलत्या जगामध्ये त्यांच्यासारख्या माणसांना खरोखरच एक संधी उपलब्ध होती. पूर्वीपेक्षा थोडे अधिक कष्ट केले, आपल्या गरजेपेक्षा थोडे जास्त पीक काढले तर थोडे पैसे मिळण्याची आता शक्यता होती. या पैशाचा उपयोग करून त्याला सरदाराने लादलेल्या श्रमसेवा रद्दबातल करता आल्या असत्या. त्याच्या सरंजामदाराने त्याचा भार हलका करण्याचे नाकारले तर तो देखील शहराकडे वा निर्जन भू-भागाकडे जाऊ शकणार होता. तेथे त्याच्या-सारखे भूदास जंगल साफ करून श्रमसेवेपासून मुक्त असलेल्या जमिनीवर राहात होते.

पण आता भूदासाच्या श्रमसेवेचे रोख खंडामध्ये रूपांतर करण्यास सरंजामदार-देखील तयार होता. कारण पैसा आणि त्या बदलत्या जगातील पैशाची कार्यप्रवणता यांच्याशी त्याचा परिचय झाला होता. काही महिन्यांपूर्वीच जत्रेमध्ये विकत घेतलेल्या, पूर्वेकडील त्या सुंदर कपड्यांसाठी त्याला पैशाची फार जरुरी होती. त्याच्या नवीन स्वारीसाठी त्याने चिलखतकर्त्याकडून करवून घेतलेल्या चिलखताचे पैसे त्याला द्यायचेच होते. यासाठी सरंजामदाराला त्याच्या शेतकऱ्याने वाचविलेल्या पैशाची फार जरूर होती. त्याच्या भूदासाने–जॉन जोन्सने–पूर्वीप्रमाणे आठवड्यातील दोन किंवा तीन दिवस त्याच्या शेतावर फुकट राबण्याऐवजी यापुढे दर वर्षी एकरामागे चार पेन्स् खंड म्हणून देण्याचे मान्य केल्यास त्याची ना असण्याचे आता काहीच कारण नव्हते. अशा रीतीने भूदासा-वरील ओझे हलके करण्यावाचून सरंजामदाराला पर्यायच नव्हता. कारण तसे न केल्यास त्यांच्यापैकी काहीजण पळून गेले असते. म्हणजे ' तेल गेलं तूप गेलं हाती धुपाटणं आलं ' अशी स्थिती झाली असती. त्यापेक्षा पूर्वीप्रमाणे श्रमसेवेची सक्ती न करता, शेतकऱ्यांकडून पैशाच्या रूपात खंड घेणे निश्चितच सोयीचे होते.

शिवाय बऱ्याच काळापासून सरंजामदाराच्या एक गोष्ट लक्षात आली होती की ऐच्छिक–श्रम हे श्रमसेवेपेक्षा अधिक उत्पादक असतात. स्वतःच्या जमिनीचा तुकडा सोडून सरंजामदाराच्या जमिनीच्या पट्ट्यावर काम करायला आलेले शेतकरी अनिच्छेने कसे तरी काम करतात ही बाबही त्याच्या ध्यानात आली होती.

म्हणूनच तेराव्या आणि चौदाव्या शतकामध्ये पश्चिम युरोपातील अनेक गावांच्या दप्तरांमध्ये स्टीव्हनेज गावी घडला तसा प्रकार नोंदवला जाऊ लागला : " सर्व श्रमसेवा आणि रूढींच्या ऐवजी १३ सॉलिडी आणि ४ दिनार देऊन वरील जमीन एस् . जी. ने खडाने कसावी ही गोष्ट सरंजामदाराने मान्य केली आहे. "

त्या काळातील भूदासानी स्वतःची जमीन श्रमसेवेतून मुक्त केल्याचे हक्क विकत घेतले तसेच काहींनी ते घेण्याबरोबरच स्वतःचे वैयक्तिक स्वातंत्र्यही विकत घेतले ही गोष्ट इतर कागदपत्रांवरून दिसून येते. वूलस्टन न्यायालयाच्या दप्तरातून घेतलेला एका खंडकऱ्या-बद्दलचा उतारा असा आहे : “ स्वतःचा भू-भाग सोडून स्वतंत्र माणूस म्हणून ओळखला जाण्यासाठी त्याने १० सॉलिडीचा दंड भरला. ”

परंतु सर्वच सरंजामदार भूदासांना स्वातंत्र्य देणे चांगले असे मानणारे नव्हते. वाढणाऱ्या शहरांवरील सरंजामी कर सोडून देण्यास जसे सर्वच सरंजामदार तयार नव्हते, त्यातलाच हाही प्रकार होता. जे आजवर चालत आले आहे ते पुढे चालणार नाही हे समजून घ्यायला तयार नसणारे लोक इतिहासाच्या सर्व कालखंडामध्ये पाहावयास मिळतात. नव्या परिस्थितीला अनुरूप असे बदल घडून येणाऱ्या काळामध्ये पूर्वीच्या गोष्टींना अधिकच चिवटपणे चिकटून राहण्याची त्यांची सवय असते. थोडक्यात आपल्या भूदासांना स्वातंत्र्य नाकारणारेही काही सरंजामदार होते.

शेतकऱ्यांना स्वतंत्र करण्याच्या या चळवळीमध्ये चर्चने पुढाकार घेतला असेल असे तुम्हाला वाटेल. पण खरा प्रकार तर उलटाच होता. शहरी आणि ग्रामीण भागात या बंधमुक्तीचे प्रमुख विरोधक अमीर-उमराव नव्हते तर चर्चसंस्था होती. सर्फना स्वातंत्र्य देऊन त्यांच्याऐवजी कामासाठी दिवसाच्या मजुरीवर राबणारे स्वतंत्र कामकरी नेमणे हे फायदेशीर असल्याचे जेव्हा उमरावांच्या ध्यानात आले होते तेव्हा धर्मसंस्था मात्र या मुक्तीच्या विरोधात ठामपणे उभी होती. क्लुनिॲक या एका धार्मिक संस्थेची कलमे या वृत्तीच्या प्रभावाची निदर्शक आहेत. “ आमच्या संस्थेमधील ज्या लोकांनी भूदास, बांधील मजूर किंवा स्त्री-मजूर यांना दास्यमुक्तीची वा स्वातंत्र्याची प्रमाणपत्रे दिली आहेत वा सवलती दिल्या आहेत त्यांच्यावर आम्ही बहिष्कार घालत आहोत.”

ही १३२० सालची गोष्ट होती. त्यानंतर १३८ वर्षांनी, म्हणजे १४५८ मध्येदेखील क्लुनिॲकचा हुकूम होता : “ या संस्थेचे ॲबट्स, प्रायर, डीनस् आणि इतर अधिकारी यांनी आम्ही आमच्या भूदासांना आणि बांधील मजुरांना बंधमुक्त करणार नाही अशी शपथ घेतली पाहिजे.” अशा स्वरूपाच्या कागदपत्रांची नीट छाननी केल्यावर दोन प्रसिद्ध इंग्लिश इतिहासकार अशा निर्णयाप्रत पोहोचतात की, “ सर्व सरंजामदारांमध्ये धर्मोपदेशक-सरंजामदार हे सर्वात जाचक होते. या संदर्भात अमाप पुरावा उपलब्ध आहे. ते सर्वात अधिक दमनकारी नसले तरी स्वतःच्या अधिकारांना पक्के चिकटून राहाणारे होते. निखळ खंडकरी कूळपद्धती आणि वैयक्तिक श्रमसेवा या गोष्टी कायम राखण्याच्या संदर्भात ते ठाम होते. सर्व कागदपत्रे व्यवस्थित राखणारी ती अमर पण हृदयशून्य धर्मसंस्था एक तसूभरही मागे हटायला, एकही भूदास किंवा जमिनीचा तुकडा मुक्त करायला तयार नव्हती. प्रत्यक्ष व्यवहारात उमराव-सरंजामदार अधिक माणुसकी दाखवायचा, कारण तो अधिक मानवी होता, निष्काळजी होता. त्याला तावडतोबीने पैसा हवा होता आणि एक दिवस तो मरणार होता....पण याउलट धर्मोपदेशक-सरंजामदारांविरुद्ध शेतकरी सर्वात जास्त तक्रार करत. ”

शेतकरी केवळ तक्रारी करून थांबले नाहीत. त्यांनी प्रसंगी चर्चच्या मालमत्तेवर हल्ला चढवला, खिडक्यांवर दगडफेक केली, चर्चच्या महाद्वारांवर धडका दिल्या आणि धर्मगुरूंना चोपून काढले. सरंजामदारांशी—मग ते धर्मगुरू असोत वा उमराव असोत.... वितुष्ट असलेले शहरवासी (बूर्ज्वाझी, व्यापारी, भांडवलदार) अशा लढ्यांमध्ये अनेकदा शेतकऱ्यांना मदत करीत.

ते मुक्तीचे वारे होते आणि मुक्ती मिळवण्यासाठी कोणाचीही पर्वा करायला शेतकरी तयार नव्हते. जेथे बऱ्या बोलाने मुक्ती मिळाली नाही तेथे ती बळाच्या जोरावर मिळवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आडमुठे वरिष्ठ-सरंजामदार आणि चर्चसंस्था यांची मुक्तिविरोधी लढाई व्यर्थ होती. आर्थिक शक्तींचा जोर विरोध करण्यापलीकडचा होता. स्वातंत्र्य येणे अखेर अपरिहार्यच होते.

हे स्वातंत्र्य आणण्यामध्ये प्लेगच्या (ब्लॅक डेथ) साथीने महत्त्वाची भूमिका बजावली. आज आपल्या देशात आरोग्यासंबंधी खूप प्रचार केला जातो आणि त्यानुसार प्रत्यक्ष व्यवहारही करण्यात येतो. आता वैद्यकशास्त्रानेही खूप प्रगती केली आहे. अशा वेळी आधुनिक आणि सुसंस्कृत देशातील लोकांना मध्ययुगीन काळात संपूर्ण भूखंडाला ग्रासून टाकणाऱ्या प्लेगची कल्पना येणे अशक्य आहे. फारच झाले तर मृत्यूची संख्या काही शेकड्यांवर नेऊन आपल्याला हादरविणारी लोहितांग ज्वराची किंवा शीतज्वराची कधीमधी उद्भवणारी साथ लोकांना ठाऊक असेल. विसाव्या शतकात अतिशय युक्तिबाज लोकांनी मृत्यूचे सापळे लावून चार वर्षे सुरू ठेवलेल्या संघटित खाटिकखान्यात, म्हणजे पहिल्या महायुद्धात जेवढे लोक मारण्यात आले त्याच्या दुप्पट लोक चौदाव्या शतकात युरोपमध्ये प्लेगच्या साथीत मृत्युमुखी पडले. त्या साथीनंतर काही वर्षांनी बोकासियो या इटालियन लेखकाने केलेले या साथीचे वर्णन पहा :

"इटालीमधील फ्लॉरेन्स या सर्वात सुंदर शहरात १३४८ साली प्लेगची लागण सुरू झाली. अपग्रहांच्या प्रभावामुळे किंवा आचरण केलेल्या पापांपोटी देवाने दिलेल्या शिक्षेमुळे, लेव्हांतमध्ये काही वर्षांपूर्वी लागण झालेला हा रोग ठिकठिकाणी पसरला आणि सगळीकडे मृत्यूचे भयानक थैमान घालीत अखेर पश्चिमेला येऊन ठेपला. घाणीपासून शहर स्वच्छ ठेवणे, संशयास्पद लोकांना शहराबाहेर काढणे, आरोग्य राखण्यासंबंधीच्या सूचनांना प्रसिद्धी देणे यासारख्या मानवी दूरदर्शीपणाला सुचतील तेवढ्या सर्व गोष्टी तेथे करण्यात आल्या. एवढेच नाही, तर देवाच्या मिरवणुकीमध्ये प्रार्थना करण्यात आल्या; बळीही देण्यात आले. परंतु असे सर्व उपाय थकले. त्या वर्षाच्या वसंत ऋतूमध्ये रोगाने आपला भयानक आणि विस्मयकारक प्रताप दाखविण्यास सुरवात केली. या रोगावर वैद्यकीय ज्ञान किंवा औषधे यांचा काहीही परिणाम होत नव्हता. कारण काहीही असो, पण या रोगाच्या तडाख्यातून फारच थोडे लोक बचावले. रोगाची पहिली लक्षणे दिसण्यापासून तिसऱ्याच दिवशी लागण झालेल्यांचा सर्व खेळ खलास होई. जळाऊ वस्तूंना अग्नीचा स्पर्श होताच आग जशी दूरवर पसरत जाते त्याचप्रमाणे दिवसागणिक रोग्यांपासून निरोगी माणसांमध्ये हा रोग फैलावत गेला आणि त्याचा जोर बळावला. ही प्राणघातक साथ एवढी भयंकर होती की केवळ माणसाकडून माणसालाच नव्हे तर

त्याच्या सान्निध्यात येणाऱ्या इतर प्राण्यांनाही हा रोग ग्रासत असे आणि अल्पावधीतच ते प्राणी मृत्युमुखी पडत. अशा प्रकारच्या एका घटनेची मला चांगलीच आठवण आहे. रोगामुळे मरण पावलेल्या एका गरीब माणसाचे कपडे रस्त्यावर टाकून देण्यात आले. दोन डुकरांनी ते कपडे उलटेसुलटे केले, तोंडाला लावले आणि बस्स. एका तासाच्या आत त्यांनी त्याच ठिकाणी पाय उलटे केले."

ती डुकरांची कथा खरी असेल किंवा नसेलही, पण सगळीकडे माश्यांसारखी माणसे मरत होती यात शंकाच नाही. बोकासियो ज्या शहराचा उल्लेख करतात त्या फ्लॉरेन्स-मध्ये एक लाख लोक रोगाला बळी पडले; तर लंडन आणि पॅरिसमध्ये प्रतिदिनी दोनशे ते आठशे लोक मरण पावले. फ्रान्स, इंग्लंड, नेदरलॅण्डस् आणि जर्मनीमध्ये संपूर्ण लोकसंख्येचा दुसरा किंवा तिसरा हिस्सा या साथीत गारद झाला ! १३४८ ते १३५० च्या सुमारास हा रोग जरी युरोपखंडातून निघून गेला तरी पुढील दशकांमध्ये त्याचे पुनरागमन होत राहिले आणि पूर्वी साथीमध्ये वाचलेल्या नशिबवंतांवर त्याचा घाला आला. ही प्राणहानी इतकी भयावह होती की त्या काळातील एका आयरिश धर्मगुरूच्या लेखनावरही त्याची छाया पडलेली दिसते : "लेखकाबरोबर त्याचे हे लिखाणही नष्ट होऊ नये यासाठी ... मी माझे चर्मपत्र सोडत आहे आणि **ॲडमच्या वंशातील कोणी व्यक्ती मृत्युपासून बचावलीच** तर मी सुरू केलेले काम तिने पुढे चालू ठेवावे."

प्लेगमधून कोणी वचावेल की नाही ही शंका त्या विद्वान माणसाच्या मनात उत्पन्न व्हावी एवढ्या प्रचंड प्रमाणावर प्राणहानी करणाऱ्या त्या साथीचे समाजजीवनावर काय काय परिणाम झाले ? पश्चिम युरोपातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थानामध्ये या प्लेगच्या साथीने काय बदल घडविला ?

इतकी माणसे मेल्यानंतर साथीतून बचावलेल्या लोकांच्या श्रमाची किंमत वाढणार हे तर स्पष्टच होते. यामुळे कष्टकरी पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक मोबदला मागू लागले. या अरिष्टाचा जमिनीवर काहीही परिणाम झाला नाही हे खरे— पण जमिनीची किंमत तिच्या उत्पादकतेवर ठरत होती आणि या कामात श्रमाचा वाटा सर्वात महत्त्वाचा होता. श्रमाचा पुरवठा घटला तशी सापेक्षतेने त्याची मागणी वाढली. आणि आपल्या कामाचे मूल्य पूर्वी कधीही नव्हते एवढे वाढले आहे हे शेतकऱ्याला पक्के ठाऊक होते.

सरंजामदारालाही हे ठाऊक होते. ज्या उमरावांनी पूर्वी श्रमसेवेचे रोख खंडात रूपांतर करण्यास नकार दिला होता त्यांचा पूर्वावस्था कायम ठेवण्याचा निर्धार आता बळावला. ज्यांनी भूदासाच्या श्रमसेवेचे खंड म्हणून पैशात रूपांतर केले होते त्यांना मजुरांचा रोज वाढलेला दिसला. त्यामुळे त्यांना आता खंडाच्या मिळकतीमधून कमी श्रम विकत घेता येत. प्लेगच्या साथीनंतर मजुरीचे दर दीडपट झाले. यामुळे पूर्वी खंडाच्या रकमेचा वापर करून ३० मजूर कामाला लावू शकणारा सरंजामदार आता केवळ २० मजुरांनाच रोजावर ठेवू शके. शेतकरी वा मेंढपाळांना पूर्वीच्या दरापेक्षा अधिक मजुरी देणाऱ्या सरंजामदारांना दंड ठोठावण्याचे शासनाचे प्रयत्न व्यर्थ ठरले. त्या काळच्या आर्थिक शक्तींचे आक्रमण सरकारच्या कायद्यांना थोपविता येणारे नव्हते.

सरंजामदार आणि कष्टकरी यांच्यामधील संघर्ष आता अटळ होता. कष्टकऱ्यांनी स्वातंत्र्याची चव चाखली होती आणि म्हणूनच त्यांची भूक वाढली होती. त्यांचे कंबरडे मोडून टाकणारी दडपणूक आणि त्यातून निर्माण झालेल्या घृणेपोटी पूर्वी सर्फचे हिंसक उठाव झाले होते. पण त्यांचे स्वरूप केवळ स्थानिक होते आणि म्हणूनच हिंसक असूनही ते सहजरीत्या दडपण्यात आले होते. पण चौदाव्या शतकातील शेतकऱ्यांचे ते उठाव फार वेगळे होते. आता मजुरांच्या तुटवड्यामुळे कष्टकऱ्यांची बाजू मजबूत झाली होती आणि स्वतःच्या शक्तीची त्यांना जाणीव झाली होती. ज्या सवलती मिळविणे किंवा राखणे दुसऱ्या कोणत्याही मार्गांनी शक्य झाले नव्हते. तेव्हा सर्व युरोपभर चढायांचा धूमधडाका लावून बळाच्या जोरावर त्या सवलती घेण्याचा शेतकऱ्यांनी प्रयत्न केला.

शेतकरी–उठावांच्या कारणांबद्दल इतिहासकारांमध्ये दुमत आहे. एक गट म्हणतो की सरंजामदार पूर्वीची श्रमसेवा पुन्हा सुरू करण्याची शेतकऱ्यांवर सक्ती करू लागले. दुसऱ्या गटाच्या म्हणण्याप्रमाणे या काळात सरंजामदारांनी श्रमसेवेचे रोख खंडामध्ये रूपांतर करण्यास नकार दिला तेव्हा स्वतःच्या शक्तीची जाणीव झालेल्या शेतकऱ्यांनी उठाव केला. कदाचित् दोन्ही पक्ष बरोबर असतील. पण काहीही असले तरी उपलब्ध कागदपत्रांवरून हे निश्चितपणे स्पष्ट होते की हिंसक प्रकार दोन्ही बाजूंकडून झाले. संपत्ती आणि कागदपत्रे जाळून बेचिराख करण्यात आली; शेतकरी आणि त्यांचे दमनकर्ते यांचे खून पडले आणि दुर्दैवाने पकडल्या गेलेल्या क्रांतिकारक शेतकऱ्यांना 'कायदेशीर'रीत्या ठार मारण्यात आले. एली बेटावरील सरकारी दप्तरानुसार ॲडम क्लिम हा एक असाच शेतकरी होता :

"सेन्ट मार्गारेट द व्हर्जिन (जुलै २०), ५, दुसरा रिचर्ड यांच्या केंब्रिज काउंटी-मधील एली या बेटावरील न्यायाधिशांसमोर बंडखोरांना त्यांच्या अपराधाचे शासन करण्यासाठी भरवलेला खटला.

"ॲडम क्लिमला देशद्रोही बंडखोर म्हणून पकडण्यात आले आहे. कारण त्याने इतरांबरोबर एली येथे उठाव केला होता. त्याने जबरदस्तीने थॉमस सोमेनूर यांच्या घरात प्रवेश केला, एलीचा बिशप आणि राजेसाहेब यांची कायदेविषयक कागदपत्रे पळवून नेली आणि राजाच्या इच्छेविरुद्ध ती जाळून टाकली.

"त्याच्याही पुढे जाऊन या ॲडमने राजाचे काम करणारा कोणताही अधिकारी शिरच्छेद केल्याशिवाय सोडू नये अशी द्वाही रविवार व सोमवार या दोन्ही दिवशी फिरवली होती.

"हाच ॲडम त्या वर्षी स्वतःजवळ शस्त्रास्त्रे बाळगून फिरत असे, बंडखोरांची जमवाजमव करत असे आणि कोणाही कष्टकऱ्याने सरंजामदारांच्या आज्ञा पाळू नयेत आणि श्रमसेवा करू नये, नाहीतर त्यास मुंडके तोडण्याची शिक्षा फर्माविण्यात येईल असे त्याने जाहीर केले होते. अशा रीतीने द्रोह करून त्याने राजसत्ता स्वतःच्या हातात घेतली. यामुळे शेरिफने त्याला पकडून आणले आणि त्याच्यावर आरोपपत्र ठेवण्यात आले...आणि यावर आरोपीने त्याच्यावर लादण्यात आलेले आरोप खोटे असून तो निरपराध आहे असे सांगितले...तेव्हा महाराजांनी बारा व्यक्ती ज्यूरी म्हणून नेमल्या.

त्यांनी ॲडम दोषी असल्याचा निर्वाळा दिला. तेव्हा न्यायाधीश महाराजांच्या आदेशानुसार ॲडमला फासावर चढवण्यात आले. तसेच ॲडमची शहरामध्ये असणारी ३२ शिलिंग्जची मालमत्ता राजाच्या वतीने ॲट वाइक या अधिकाऱ्याने जप्त केली.''

ॲडम क्लिमला फासावर चढवण्यात आले. त्याचप्रमाणे इतर हजारो शेतकऱ्यांचेही गळे घोटण्यात आले. परंतु सरंजामदारांनी असे शर्थीचे प्रयत्न करूनसुद्धा शेतीक्षेत्रातील बदलाची प्रक्रिया उलट फिरविणे त्यांना शक्य झाले नाही. आर्थिक शक्तींच्या जोरापुढे सरंजामी व्यवस्था टिकाव धरणे शक्य नव्हते. त्यामुळे ती मोडू लागली. पंधराव्या शतकाच्या मध्यापर्यंत पश्चिम युरोपच्या बहुतेक प्रदेशावर श्रमसेवेच्या जागी रोख खंड रूढ होऊ लागला, आणि अनेक शेतकऱ्यांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले. (व्यापारी मार्गापासून व शहरी स्वातंत्र्याच्या प्रभावापासून दूरवरच्या प्रदेशांमध्ये सरंजामी व्यवस्था तशीच राहिली.) शेतीमधील कष्टकऱ्यांचे स्थान आता राबणाऱ्या घोड्यासारखे राहिले नाही. तो आता मान ताठ करून जगू शकणार होता.

सरंजामी समाजाला अज्ञात असणारा व्यवहार आता प्रचलित झाला. पूर्वी परस्पर सेवेची बंधने स्वीकारूनच कसण्यासाठी जमीन मिळविण्यात येई, याउलट आता जमीनमालकीसंबंधी नवा विचार उदयास आला. आता शेतकरी मनात येईल तेथे जाण्यास स्वतंत्र होते आणि जरी खंड द्यावा लागत असला तरीही स्वतःची जमीन विकून टाकण्याची त्यांना मुभा होती. स्टीव्हनेज कोर्टाची १३८५ सालची कागदपत्रे एका खंडकऱ्याबद्दल पुढील माहिती देतात: ''त्याच्याकडे जन्मभराच्या वायद्याने एक घर-वाडी आणि अर्धा व्हर्गेट क्षेत्रफळाची जमीन होती आणि तो जमीनदाराला खंड म्हणून वर्षाला १० सॉलिडी रक्कम देत असे. या जमिनीचे हक्क त्याने दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावाने केले आणि हा करार सरकारी दप्तरात नोंदण्यासाठी त्याने ६ दिनार फी दिली.''

इतर कोणत्याही क्रयवस्तूप्रमाणे जमिनीची विक्री-खरेदी आणि मुक्त विनिमय होणे म्हणजेच सरंजामी युगाचा अंत होता. संपूर्ण पश्चिम युरोपला परिवर्तनाच्या शक्तींनी झपाटले होते आणि त्यामुळे त्याचा चेहरामोहराच पार बदलला होता.

◇ ◇ ◇

६

" आणि कोणी परका काम करणार नाही ..."

आता औद्योगिक व्यवस्थेतही बदल घडून आला. पूर्वी शेतकरी स्वतःच्या घरामध्येच सर्व उद्योग करीत असे. त्याला फर्निचरची जरूर भासली तर त्यासाठी सुताराला बोलाविण्याचा किंवा हमरस्त्यावरील फर्निचरच्या दुकानातून ते विकत घेण्याचा तेव्हा प्रश्नच उद्भवत नसे. कारण तेव्हा शेतकऱ्याच्या कुटुंबातील माणसेच लाकडाच्या फळ्या चिरून, तुकडे पाडून, त्यापासून आपल्याला हवे तसे सामान तयार करून घेत. त्यांच्या परिवारातील लोकांना कपड्यांची गरज भासे तेव्हा ती माणसे स्वतः सूत कातून, कापड विणून त्याचे कपडे शिवत. अशा रीतीने तेव्हा शेतकऱ्यांच्या घराघरातून उद्योग संघटित केला जाई आणि केवळ परिवाराची गरज भागवणे हेच या उत्पादनाचे उद्दिष्ट असे. तेव्हा सरंजामदारांच्या डिमेन् – सर्फमधील काहीजण केवळ कारागीर म्हणून काम करत तर इतर शेती करत. धर्मगुरूंच्या घरामध्येही काही विशिष्ट कसब असणारे कारागीर ठेवण्यात येत. ते विणकाम, लाकूडकाम किंवा धातुकाम करण्यात अतिशय प्रवीण असत. पण हे देखील बाजारपेठेसाठी उत्पादन करणारे उद्योगधंदे नव्हते. तर केवळ कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी येथे उत्पादन केले जाई. यामधून विशिष्ट उद्योगांना संपूर्णपणे वाहून घेतलेले व्यावसायिक कारागीर आणि वैशिष्टयपूर्ण कारागिरी विकसित होण्यापूर्वी बाजारपेठेची वाढ होणे आवश्यक होते.

शहरांची वाढ आणि पैशाचा वाढता उपयोग यामुळे कारागिरांना शेती सोडून केवळ कारागीर म्हणून जीवन जगण्याची एक संधी उपलब्ध झाली. सुरुवातीला खाटीक, बेकरीवाले आणि मेणबत्त्या तयार करणारे लोक शहरात गेले आणि तेथे त्यांनी आपली दुकाने थाटली. आता केवळ स्वतःच्या परिवाराच्या गरजा भागविण्यासाठी नव्हे तर लोकांची मागणी पुरवण्यासाठी अशा लोकांनी शहरात खाटिकखाना, बेकरी किंवा मेणबत्त्या तयार करणे यासारखे उद्योग सुरू केले. छोटयाच परंतु वाढत्या बाजारपेठेला मालाचा पुरवठा करण्यासाठी ते धंदा करीत होते.

त्यांना फारशा भांडवलाची गरज नव्हती. कारण कारागिराला त्याचे निवासस्थानच कार्यशाळा म्हणून उपयोगी पडे. त्याचे कामातील कौशल्य आणि त्याने तयार केलेल्या

वस्तूंना मागणी या दोनच गोष्टींची त्याला मूलतः गरज होती. तो कुशल कारागीर असल्यास शहरात त्याचे नाव होई आणि त्याच्या वस्तूंना मागणी येई. अशा वेळी एक दोन मदतनीस ठेवून तो आपले उत्पादन वाढवू शकत असे.

मदतनिसांचे दोन प्रकार असत—ॲप्रेन्टिस आणि जर्नीमॅन. कारागिराबरोबर राहून, काम करून कामधंदा शिकणारे मदतनीस म्हणजे ॲप्रेन्टिस. हरएक उद्योगात हा उमेदवारीचा काळ वेग वेगळा असे, कुठे एक वर्ष तर कुठे बारा वर्षे. तरीही ॲप्रेन्टिस म्हणून सर्वसाधारणपणे दोन ते सात वर्षे उमेदवारी करावीच लागे. तेव्हा ॲप्रेन्टिस होणे ही गंभीर बाब मानली जाई. एखादा मुलगा आणि त्याचे आईवडील यांनी मालक-कारागिराबरोबर केलेला तो एक करारनामा असे. रोख रक्कम किंवा धान्याच्या रूपाने शिकाऊ उमेदवार काही फी भरी तसेच आज्ञाधारकपणे राबण्याचे तो वचन देई. त्याच्या बदल्यात मालक-कारागीर त्याला धंद्याची गुपिते शिकवत. अर्थात अशा वेळी शिकाऊ उमेदवार कुशल कारागिराबरोबरच जेवून खावून राही.

ही विद्यार्थीदशा संपल्यावर घेण्यात येणाऱ्या चाचणीत उत्तीर्ण झाल्यास आणि जवळ पैसा असल्यास तो ॲप्रेन्टिस; मालक-कारागीर म्हणून स्वतःचे दुकान थाटी. पण स्वतःचा धंदा सुरू करण्यासाठी पुरेसे भांडवल नसल्यास तो जर्नीमॅन होई आणि त्याच किंवा दुसऱ्या मालक-कारागिराकडे मजुरीच्या बोलीने काम सुरू करी. अशा रीतीने कष्ट करून आणि मिळणारा पैसा काळजीपूर्वक वाचवून त्यातून काही वर्षांनी स्वतःचे दुकान सुरू करणे त्याला शक्य होई. त्याकाळी दुकान थाटून त्यासाठी उत्पादन सुरू करायला फारशा भांडवलाची गरज नसे. मध्ययुगीन काळच्या सर्वसाधारण कारखान्याचे स्वरूप आज दोनतीन मदतनीसांच्या सहाय्याने कुटिरोद्योग चालविणाऱ्या मालकाच्या वर्कशॉपसारखे असे. तेव्हाचा मालक विक्रीसाठी असलेल्या वस्तू स्वतः तयार करी एवढेच नव्हे, तर त्या विकण्याचे कामही तो स्वतःच करी. त्याच्या वर्कशॉपची एक खिडकी शहराच्या रस्त्यावर उघडत असे. जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांच्या सहज दृष्टीस पडतील अशा रीतीने त्यामध्ये विकावू वस्तू मांडून ठेवण्यात येत. तसेच दुकानातील काऊंटरवर त्यांची विक्रीही चाले.

उद्योग-व्यवस्थेचा हा नवा टप्पा आपण समजून घेणे महत्त्वाचे आहे. यापूर्वी बाजारात विकण्यासाठी नव्हे, तर कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी वस्तूंचे उत्पादन होई. याउलट आता बाजारपेठेत विक्री करण्यासाठी उत्पादन होऊ लागले. कच्चा माल आणि अवजारे यांच्यावर मालकी असणारे व्यावसायिक कारागीर वस्तूंचे उत्पादन करीत आणि तो माल ते बाजारात विकीत. (आज उद्योगात राबणाऱ्या कामगारांकडे कच्चा माल किंवा अवजारे यापैकी कशाचीही मालकी नसते. ते बाजारपेठेत उत्पादित माल विकत नाहीत तर आपली श्रमशक्ती विकतात.)

या कारागिरांनी त्यापूर्वीच्या व्यापाऱ्यांचा कित्ता गिरवला आणि आपल्या गिल्ड्स् स्थापन केल्या. शहरातील विविध उद्योगांमध्ये त्या त्या उद्योगात काम करणारे सर्व कारागीर 'क्राफ्ट गिल्ड' नावाच्या संघटनेत एकत्र येऊ लागले. आजकाल एखादा राजकीय पुढारी किंवा उद्योगपती "भांडवल आणि कामगार यांच्या भागीदारीबद्दल"

भाषण देऊ लागतो तेव्हा प्रेक्षकांमध्ये बसलेला अनुभवी कामगार खांदे उडवत ' सब बकवास है ' असे म्हणतो. त्याचा अशा भागीदारीवर विश्वासच बसत नाही. जो माणूस पैसे देतो आणि ज्याला पैसे दिले जातात या दोघांच्यामध्ये प्रचंड दरी आहे आणि त्यांचे हितसंबंध एकच नाहीत हे तो जाणून असतो. यामुळेच त्या दोघांच्या भागीदारीबद्दल कोणीही कितीही बडबड केली तरी त्यामुळे परिस्थितीत काहीही फरक पडणार नाही हे त्याला ठाऊक असते. म्हणूनच कंपनी पुरस्कृत युनियनबद्दल तो साशंक असतो. मालकाचे वजन असणाऱ्या कामगार संघटनेचा सभासद व्हायला तो सहजासहजी राजी होत नाही.

परंतु मध्ययुगीन क्राफ्ट गिल्ड्सूचे स्वरूप वेगळे होते. एकच काम करणारे ॲप्रेन्टिस, जर्नीमेन आणि मालक-कारागीर असे सर्वजण एकाच गिल्डचे सभासद असत. अशा रीतीने मालक आणि त्यांचे मदतनीस एकाच संघटनेचे सभासद होत आणि एकाच गोष्टीसाठी झगडत. याचे कारण कामगार आणि त्यांचा मालक यांच्यातील अंतर फार नव्हते. जर्नीमॅन त्याच्या मालकाबरोबरच राही. सारखेच अन्न खाई. त्याचे शिक्षणही तसेच झालेले असे. त्यांचा सारख्याच गोष्टींवर विश्वास होता आणि त्यांचे विचारही सारखेच होते. ॲप्रेन्टिस आणि जर्नीमेन हे काही काळानंतर मालक बनणे हा अपवाद नव्हे तर नियम होता. जोपर्यंत हे खरे होते तोपर्यंत मालक आणि कामगार एकाच गिल्डचे सभासद असणे शक्य होते. कालांतराने यामध्ये वैयक्तिक हितसंबंधांचा शिरकाव होऊ लागला. मग परिस्थिती बदलल्यावर जर्नीमेननी केवळ स्वतःच्याच अशा वेगळ्या गिल्डस स्थापन करण्यास सुरुवात केली. परंतु गिल्डच्या सुरुवातीच्या काळात घोड्याचा सरंजाम करणाऱ्या कारागिरांच्या गिल्डमध्ये त्या उद्योगातील सर्वजण सभासद असत, तर तलवारीला पाणी देणाऱ्या कारागिरांच्या गिल्डमध्ये त्या उद्योगात काम करणारे सर्वजण सभासद होत. गिल्डमधील प्रत्येक ॲप्रेन्टिसला दुसऱ्या ॲप्रेन्टिससारखे, प्रत्येक जर्नीमॅनला दुसऱ्या जर्नीमॅनसारखे, आणि प्रत्येक मालक-कारागिराला इतर कोणाही मालक-कारागिरासारखे अधिकार होते. या क्राफ्ट गिल्डसूमध्ये श्रेणी होत्या, परंतु या श्रेणीच्या अंतर्गत समानता होती. तसेच तळच्या ॲप्रेन्टिसपासून सुरुवात करून मालक-कारागीर होणे बहुतेकांना शक्य होई.

' टॅायर ' हा शब्द आता प्रचलित नाही; कारण ज्या धंद्याशी तो संबंधित होता, तो धंदाच आता अस्तित्वात नाही. पांढऱ्या कातड्याचे कपडे शिवणारा कारागिर म्हणजे टॅायर होय. लंडनमध्ये चौदाव्या शतकात हा एक महत्त्वाचा धंदा होता आणि टॅायर्सनी आपली गिल्ड संघटित केली होती. त्या गिल्डच्या १३४६ मधील नियमावलीवरून आपल्याला क्राफ्ट गिल्डबद्दल काही गोष्टी समजू शकतील :

" (१) .... वार्धक्यामुळे वा इतर काही कारणामुळे काम करणे अशक्य होऊन या धंद्यातील कोणी भला माणूस जर दारिद्र्यात ढकलला गेला तर अशा व्यक्तीस दर आठवड्याला ७ पेन्स मदत म्हणून मिळतील.

(२) .... ॲप्रेन्टिस नसलेल्या किंवा शहरातील प्रौढ रहिवासी म्हणून ज्याच्या नावाची नोंद झालेली नाही अशा कोणाही परक्या माणसाला या धंद्यात काम करता येणार नाही.

(३) .... सत्र चालू असताना मालक-कारागिराच्या परवानगीशिवाय त्याच्या कोणत्याही नोकराला दुसरा कोणीही कामावर घेऊ शकणार नाही. तसेच या धंद्यात एखाद्याकडे त्याला एकट्याला निभावता येणार नाही एवढे काम असेल तर....ते संपवण्यासाठी इतर कारागीर त्याला मदत करतील, म्हणजे हाती आलेले काम निघून जाणार नाही.

(४) आणि कोणाही नोकराने जर त्याच्या मालक–कारागिराबरोबर गैरवर्तणूक केली वा उद्दामखोरपणा केला तर महापौर आणि ज्येष्ठजन यांच्यासमोर माफी मागेपर्यंत त्याला कोणीही काम देणार नाही.

(५) या धंद्यातील काम आणि इतर संबंधित गोष्टींवर वर्षभर देखरेख करण्यासाठी या धंद्यातील माणसे दोन व्यक्तींना निरीक्षक म्हणून निवडतील. कोणाची मैत्री वा तिरस्कार या गोष्टी आड येऊ न देता ते या धंद्यातील दृष्टोत्पत्तीस येणारे दोष महापौर व ज्येष्ठजन यांच्यापुढे मांडतील.

तसेच लबाडी करून मिळविलेली कातडी जप्त करण्यात येईल.

(६) त्याचप्रमाणे ज्याने उमेदवारी केलेली नाही किंवा उमेदवारीचे सत्र पूर्ण केलेले नाही अशा व्यक्तीला या धंद्यामध्ये स्वतंत्र कारागीर म्हणून काम करता येणार नाही. "

अशा हजारो कागदपत्रांच्या सहाय्याने शेकडो वर्षांनंतर इतिहासकारांना क्राफ्ट गिल्ड्स्ची कथा व्यवस्थितपणे जुळविणे शक्य झाले आहे.

सभासदांचे कल्याण गिल्डला अभिप्रेत असावे असे पहिल्या नियमावरून दिसते. ज्ञातिबांधवांप्रमाणे ते अडल्या-नडल्यांची काळजी वाहात असत. संकटाच्या काळात एकमेकांना मदत करावी याच हेतूने कदाचित अनेक गिल्ड्स्ची सुरुवात झाली असावी. बेकारभत्ता आणि वृद्धपणी निवृत्तिवेतन या गोष्टींची आज जी मोठी जाहिरात केली जाते त्या गोष्टी क्राफ्ट गिल्ड्स् त्यांच्या सभासदांना सुमारे ६०० वर्षांपूर्वी पुरवत होत्या ही एक गंमतीदारच गोष्ट नाही का ?

एकमेकांमध्ये स्पर्धेची भावना न राहता, मैत्री राहावी या दृष्टीने गिल्ड्स्चे नियमन करण्यात येत असे, याचा नियम क्रमांक तीन हा आणखी एक पुरावा आहे. एखाद्या टॅनरकडे अधिक काम असल्यास त्याच्या हातून ते जाऊ नये म्हणून इतरांनी ते पूर्ण करण्यास मदत करावी या नियमाकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे. अर्थातच सभासदांचे व्यावसायिक हित सांभाळणे हाच गिल्डचा प्रमुख उद्देश होता.

आपल्या धंद्याची सूत्रे आपल्याच हातात ठेवण्यासाठी गिल्ड्सचे सभासद एकमेकांना बांधलेले होते. नियम क्रमांक दोन पुन्हा वाचा. पूर्वीच्या व्यापारी गिल्ड्स्प्रमाणे या क्राफ्ट गिल्ड्स्नी शहरामधील त्या विशिष्ट कामावर एकाधिकारशाही प्रस्थापित केली होती हे त्या नियमावरून लक्षात येते. म्हणूनच तो नियम महत्त्वाचा आहे. कुठल्याही शहरामध्ये एखादा उद्योगधंदा सुरू करायचा असेल तर उद्योजकाला संबंधित क्राफ्ट गिल्डचे सभासद होणे आवश्यक होते. गिल्डच्या परवानगीशिवाय इतर कोणाही परक्या माणसाला तो धंदा करण्यास तेव्हा परवानगी नव्हती. फ्रँकफुर्ट आणि बासले या शहरांतील भिकाऱ्यांची सुद्धा एक गिल्ड होती आणि वर्षातील दोन दिवसांखेरीज इतर दिवशी ते गिल्डबाहेरील

भिकाऱ्यांना त्या शहरांत भीक मागू देत नसत! आपल्या एकाधिकारशाही हुकमतीमध्ये गिल्ड्स् कोणाचीही ढवळाढवळ चालू देत नसत. असे अधिकार त्यांच्या फायद्याचे होते आणि ते टिकवण्यासाठी ते झगडत. प्रभावशाली चर्चलादेखील गिल्डच्या नियमांपुढे मान तुकविणे भाग पडे. सेंट जोहान या एका जर्मन शहरातील चर्चच्या धर्मगुरूंना १४९८ साली त्यांच्या शेतात पिकणाऱ्या गहू आणि राय या धान्यापासून पाव करून घ्यायचा होता. त्यासाठी त्यांना तेथील बेकरीवाल्यांच्या गिल्डची परवानगी घेणे भाग पडले. काही अटींवर त्यांना ही परवानगी देण्यात आली. "बेकरी–गिल्डच्या सभासदांनी धर्मगुरूंना गिल्डमधून एक भटारी घेऊन, त्यांच्याकडील गहू, बार्ली व राय या धान्यांचा पाव करण्यास परवानगी दिली. परंतु आता गिल्डचे सभासद त्यांना पाव विकणार नसल्यामुळे सभासदांना नुकसानभरपाई म्हणून चर्चने १६ जर्मन मार्क्स दिले."

स्वतःच्या शहरामध्ये आपल्या गिल्डची एकाधिकारशाही हुकुमत राखण्यासाठी गिल्डचे सभासद झगडत. स्वतःच्या बाजारपेठेवर ते उपऱ्यांना घाला घालू देत नव्हते. इतिहासाच्या पुस्तकामध्ये मध्ययुगीन काळात झालेल्या दोन शहरांमधील कडव्या युद्धाबद्दल माहिती वाचताना अशा युद्धाचे कारणही आपण समजून घेतले पाहिजे. एका शहरामधील गिल्डस्चे सभासद दुसऱ्या शहरातील स्पर्धकांना रोखण्यासाठी अशी युद्धे सुरू करत.

एखाद्या वस्तूचे नव्या किंवा अधिक चांगल्या पद्धतीने उत्पादन करण्याच्या शोधाचे आज संशोधक पेटंट घेऊ शकतो. अशा रीतीने त्याच्या शोधाचा परवानगीवाचून इतर कोणीही वापर करणार नाही याची काळजी त्याला घेता येते. मध्ययुगीन काळामध्ये पेटंटचे कायदे नव्हते आणि तरीही धंद्यातील आपली एकाधिकारशाही कायम ठेवण्यासाठी स्वतःच्या धंद्याची गुपिते इतरांना समजू नयेत याबद्दल कारागीर अतिशय सावध असत. पण ही गोष्ट त्यांना तेव्हा कशी साध्य होई? इतरांनी त्यांच्या धंद्यातील युक्त्या शिकू नयेत याची खबरदारी ते कशी घेत? १४५४ सालच्या व्हेनिसच्या एका कायद्यामध्ये आपल्याला किमान एका पद्धतीचे धागेदोरे सापडतात. "या प्रजासत्ताकाच्या हितसंबंधाविरुद्ध जर एखाद्या कारागिराने दुसऱ्या देशामध्ये एखादी कला किंवा कारागिरी यांचा प्रसार केला तर त्याला परत बोलाविण्यात येईल. त्याने अवज्ञा केल्यास त्याच्या अत्यंत जवळच्या नातेवाईकांना तुरुंगात टाकण्यात येईल म्हणजे परिवाराच्या बंधनामुळे परत येण्यासाठी त्याचे मन वळेल. तरीही तो न परतल्यास त्याला असेल तेथे ठार करण्यासाठी गुप्त हालचाली करण्यात येतील."

ज्याप्रमाणे आपल्या एकाधिकारशाहीवर उपऱ्यांनी घाला घालू नये यासाठी गिल्डस् सावध असत त्याचप्रमाणे आपल्या सभासदांपैकी एकाने दुसऱ्याचा धंदा बुडवू नये याचीही त्या काळजी घेत. टॉयर्सच्या तिसऱ्या नियमाचा खरा अर्थ मित्रांचा केसांनी गळा कापू नये असा आहे. एखाद्या मालक–कारागिरापासून त्याच्याकडे काम करणाऱ्या जर्नीमॅन किंवा शिकाऊ उमेदवाराला पळवून नेण्याची गिल्डच्या कोणत्याही सभासदास परवानगी नव्हती. त्याचप्रमाणे ग्राहकाला आकृष्ट करण्यासाठी त्याला लाच देणे किंवा भेटवस्तू देणे यासारख्या आजच्या प्रचलित पद्धतीला त्याकाळी सक्त मनाई होती.

फ्रान्समधील कॉर्बी येथील बेकरीवाल्यांच्या गिल्डने १४४३ मध्ये दिलेला निवाडा पाहा : " स्वतःचा पाव विकण्यासाठी कोणीही ग्राहकाला कोणतेही पेय देणार नाही, किंवा इतर प्रकारांनी त्याला वश करण्याचा प्रयत्न करणार नाही. याउपर कोणी तसे केल्यास त्याला ६० सोल्सचा (फ्रेंच नाणे) दंड भरावा लागेल. "

नियम पाच आणि सहा पुन्हा वाचा. त्यावरून एकाधिकारशाहीच्या बदल्यात गिल्ड्स् समाजाला चांगल्या सेवा पुरवत होत्या, तसेच आपल्या सभासदांनी केलेल्या कामाची गुणवत्ता चांगली असावी याची काळजी घेत होत्या हे स्पष्ट होईल. प्रत्येक गिल्ड सभासदाने प्रशिक्षण पूर्ण केलेच पाहिजे असा नियम करून प्रत्येकाला आपल्या धंद्याचे कौशल्य अवगत आहे याची त्या काळजी घेत. त्याचप्रमाणे आपल्या सभासदांच्या कामावर नजर ठेवून ग्राहकांना कमी प्रतीचा माल दिला जाणार नाही याची त्या खबरदारी घेत. आपल्या नावाचा गिल्ड्स्ना अभिमान होता. प्रत्येक कारागिराचा माल योग्य प्रतीचा आहे असे गिल्डचे प्रशस्तीपत्र त्या मालाबरोबर पाठविले जाई. उच्च गुणवत्तेच्या कसोट्यांचे पालन व्हावे आणि कामात गलथानपणा येऊ नये यासाठी गिल्डचे हजारो नियम असत आणि हे नियम तोडणाऱ्याला कडक सजा फर्मावण्यात येई. लंडनच्या चिलखतकर्त्यांनी १३२२ मध्ये केलेली नियमावली पाहा : " जर एखाद्या घरामध्ये अयोग्य प्रतीचे चिलखत सापडले तर ते तात्काळ जप्त करून महापौर आणि ज्येष्ठजनांसमोर आणण्यात येईल आणि त्यांच्यासमोर चांगल्या-वाईटाची शहानिशा करण्यात येईल. "

गिल्डने नेमलेले तपासनीस नियमितपणे दौरे काढून सभासद वापरत असलेली वजने आणि मापे, त्यांचा कच्चा माल आणि उत्पादित माल यांची तपासणी करत. अशावेळी प्रत्येक वस्तूची काटेकोरपणे तपासणी करून त्यावर शिक्का मारण्यात येई. गिल्डचे नाव बद्दू होऊ नये आणि धंद्यावर अनिष्ट परिणाम होऊ नये यासाठी वस्तूंची ही कडक तपासणी महत्त्वाची मानली जाई. ग्राहकांना संरक्षण मिळण्यासाठी शहराच्या व्यवस्थापनाचीही तशीच मागणी असे. ग्राहकांच्या हितसंबंधांचे अधिक रक्षण करण्यासाठी काही गिल्डस् वस्तूंवर ' वाजवी किंमतीचे ' शिक्के मारीत.

वस्तूची ' वाजवी किंमत ' म्हणजे काय, हे समजण्यासाठी मध्ययुगीन काळातील व्याज-आकारणीसंबंधीचा सिद्धांत लक्षात घेता आजच्यापेक्षा त्या काळी आर्थिक विचारामध्ये चांगल्या-वाईटाची कल्पना किती खोलवर रुजली होती याचे प्रत्यंतर आपल्याला येते. पूर्वीच्या नैसर्गिक अर्थव्यवस्थेमध्ये चालणारा वस्तु-विनिमयाचा व्यापार हा नफ्याकरता न चालता ग्राहक आणि विक्रेता यांच्या गरजा पुरविण्याकरता चाले. या विनिमयातून कोणा एकाला दुसऱ्यापेक्षा अधिक फायदा मिळता नये अशी तेव्हा अपेक्षा असे. आपल्याकडील ओव्हरकोटचा दुसऱ्याच्या पाच गॅलन वाइनशी विनिमय होई; कारण लोकरीचा खर्च + त्यावर खर्च केलेला श्रमकाल आणि द्राक्षांचा खर्च + त्यावर खर्च केलेला श्रमकाल हे सारखेच होते. आता पैशाचा उपयोग सुरू झाला तरी

विनिमयामध्ये अजूनही केवळ याच बाबी अंतर्भूत होत्या. कारागिराला त्याच्या मालाचा आणि श्रमाचा खर्च ठाऊक होता आणि त्यावरून त्याच्या उत्पादित मालाच्या विक्रीची किंमत ठरत होती. अशा रीतीने खर्चाची बेरीज करून निश्चित केलेली मालाची किंमत ही ' वाजवी ' असे आणि त्यापेक्षा एक पैसाही अधिक न घेता ती विकणे हे कारागिराला बंधनकारक असे. याच मुद्द्यावर सेंट थॉमस आक्विनासनी भर दिला आहे. " आता सर्वांच्या हितासाठी ज्या व्यापाऱ्याला मान्यता देण्यात आली आहे त्याचा एकापेक्षा दुसऱ्यावर अधिक भार पडू नये. . .एखाद्या वस्तूची किंमत तिच्या मूल्यापेक्षा कमी किंवा जास्त असेल तर न्यायासाठी आवश्यक ठरणारी समानता तेथे नाही असेच म्हणावे लागेल. म्हणूनच एखादी वस्तू तिच्या मूल्यापेक्षा अधिक किंमतीला विकणे किंवा स्वस्तात विकत घेणे हे अन्याय्य आणि बेकायदेशीर आहे. "

वस्तूच्या वाजवी किंमतीपेक्षा ती अधिक किंमतीला विकणाऱ्या लबाडांचे त्याकाळी काय होई ? झटपट श्रीमंत होऊ पाहणाऱ्या व्यापाऱ्यांपासून मध्ययुगीन काळातील नागरिक स्वतःचे संरक्षण कसे करत ? एका घटनेवरून आपल्याला ही गोष्ट समजते. " पावाची किंमत वाढते किंवा स्वतःच्या साधेपणामुळे आपण सारे गरीब आहोत अशा विचाराने पछाडलेले लंडनचे फळविके श्रीमंत आणि सत्ताधीश होण्यासाठी संघटना बांधतात. अशावेळी त्यांनी केलेल्या भाववाढीमुळे नुकसान व त्रास होणारे शहरवासी आणि शेतकरी हे मागणी आणि पुरवठ्याचे नियम किंमती पुन्हा खाली आणतील असा विचार करून गप्प बसत नाहीत तर, ख्रिश्चन सुजनांच्या मान्यतेनुसार ते बेकरीवाल्याला खोड्यात टाकतात आणि महापौरांच्या न्यायालयात फळविक्यांबरोबर वादंग करतात. अशावेळी तेथील धर्मपीठाचे धर्मगुरू सहाव्या देवाज्ञेवर प्रवचन देतात आणि निरूपणा साठी ' आम्हाला श्रीमंती नको वा गरिबीही नको तर केवळ जगण्यापुरते देवाने द्यावे ', हे वचन निवडतात.

वाजवी किंमतीपेक्षा अधिक किंमत मागणाऱ्या फळविक्यांचा निषेध करणाऱ्या नागरिकांनी त्यांना महापौरांच्या न्यायालयात आणले म्हणजे वाजवी किंमत आकारली जाते हे पाहण्याची जबाबदारी केवळ गिल्डच्या सभासदांवर सोडण्यात येत नसे. चर्चने हावरटपणाचा निषेध केला होता तरीही फळविक्यांना श्रीमंतीचे आश्वासन देणारा " धाडसी विचार " एकट्या दुकट्याचा नव्हे तर अनेकांचा होता. साहजिकच तेव्हा व्यापाऱ्यांवर संपूर्ण विश्वास ठेवला जात नसे. " विनिमय " या अर्थाचा जर्मन शब्द " टाउशेन " आणि फसवणे या अर्थाचा जर्मन शब्द " टॉयशेन " या शब्दांमध्ये असणारे साधर्म्य सूचक आहे. वस्तू अवाजवी किंमतीला विकल्या जात नाहीत याची खबरदारी घेणे हे शहर-व्यवस्थापनाने महत्त्वाचे कर्तव्य समजून व्यवहार करण्याचा पायंडा पडू लागला. उदाहरणार्थ, कार्लाईलच्या बेलिफाला कचेरीत प्रवेश करण्यापूर्वी अशी शपथ घ्यावी लागली : " या बाजारपेठेमध्ये येणाऱ्या सर्व वस्तू चांगल्या असतील व त्या वाजवी किंमतीला विकल्या जातील याची मी खबरदारी घेईन. " एखाद्या ठिकाणी एखाद्या गिल्डने स्वतःच्या एकाधिकारशाहीचा नफेखोरीसाठी उपयोग केला तर शहर-

व्यवस्थापनाला त्या गिल्डला दिलेल्या सवलती काढून घेण्याचा अधिकार होता.

व्यापाराच्या वाढीपूर्वी आणि शहरे मोठी होण्यापूर्वी वस्तूंची वाजवी किंमत ही संकल्पना अगदी नैसर्गिक स्वरूपाची होती. परंतु वाढत्या बाजारपेठेबरोबर आणि त्यासाठी सुरू झालेल्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनामुळे आर्थिक विचारांमध्ये बदल घडून आला आणि वाजवी किंमतीऐवजी बाजारभावाची संकल्पना रूढ होऊ लागली. पूर्वी व्याज-आकारणीसंबंधीची जुनी संकल्पना आर्थिक शक्तींनी जशी बदलली तीच गोष्ट आता 'वाजवी किंमत' या संकल्पनेच्या संदर्भात घडली. नव्या आर्थिक शक्तींनी जुनी संकल्पना पूर्णपणे झुगारून दिली.

मध्ययुगीन काळाच्या सुरुवातीला शहरवासी आणि आजूबाजूच्या परिसरातील ग्रामस्थ यांच्या गरजा भागविणारा बाजार हा स्थानिक स्वरूपाचा होता. देशाच्या दूरच्या भागामध्ये किंवा शहरांमध्ये घडणाऱ्या घडामोडींचा त्यावर परिणाम होत नसे आणि वस्तूंच्या किंमती केवळ स्थानिक परिस्थितीवरूनच निश्चित होत. पण स्थानिक परिस्थितीत बदल होत आणि त्यानुसार बाजारातील वस्तूंच्या किंमतीही बदलत. उदाहरणार्थ, आसपासच्या परिसरातील द्राक्षाच्या वेलावर रोग पडला, तर त्यामुळे त्यावर्षी बाजारात पुरेशी दारू उपलब्ध होत नसे. अशा टंचाईच्या काळी अधिक किंमत द्यायला तयार होणाऱ्या थोड्याशा लोकांनाच दारू विकण्यात येई. अर्थात एखाद्या गटाने किंवा काही लोकांनी साठेबाजी करून नफेखोरीसाठी भाववाढ करण्यापेक्षा ही गोष्ट फारच वेगळी होती. आकस्मिक परिस्थितीत होणारी भाववाढ आणि व्यापाऱ्यांच्या नफ्याच्या अतिलोभामुळे होणारी भाववाढ यात फरक आहे. दुष्काळात किंमती वाढतात हे सर्वसामान्यपणे मान्य केलेले होते. अशी भाववाढ 'अनैसर्गिक' आणि विलक्षण परिस्थितीमुळे झालेली आहे असे मानले जाई. परंतु त्यामुळे " नैसर्गिक " किंमतीचे स्थान असलेल्या वाजवी किंमतीमध्ये फरक पडत नसे आणि नफेखोरीला चालना मिळत नसे. दुष्काळामध्ये शेतकऱ्याने धान्याचे भाव वाढविणे योग्यच समजले जाई, कारण नेहमीपेक्षा अशावेळी धान्याची कमी पोती विक्रीसाठी बाजारात आणली जात. अशा रीतीने छोट्या स्थानिक स्वरूपाच्या स्थिर बाजारपेठेला साजेशीच वाजवी किंमतीची संकल्पना होती.

परंतु ही संकल्पना बाहेरच्या मोठ्या आणि अस्थिर बाजारपेठेला मानवणारी नव्हती. आता आर्थिक परिस्थितीत घडून आलेल्या बदलाने आर्थिक विचारातही परिवर्तन घडून आणले. आता बाजारपेठेमध्ये केवळ त्याच शहरातील विक्रेते आणि ग्राहक यांची वर्दळ राहिली नाही तर जवळपासच्या विभागातील उत्पादित मालही तेथे येऊ लागला त्यानंतर दूरवरचे व्यापारी, दूरच्या देशातील चीजवस्तू, विस्तारित जगतातील विक्रेते आणि ग्राहक यांचा बाजारपेठेवर प्रभाव पडला तेव्हा स्थानिक परिस्थितीतील स्थानाला हादरे बसले. वाजवी किंमतीचे नियम लागू नसलेल्या व्यापारी जगामध्ये प्रथम या गोष्टीला सुरुवात झाली. वाढत्या व्यापारामुळे बाजारपेठेवर परिणाम करणाऱ्या

गोष्टींची संख्या आणि गुंतागुंत वाढत गेली आणि वाजवी किंमतीचे व्यावहारिकपण संपुष्टात येऊन अखेर तिची जागा बाजारभावाने घेतली. परंतु त्यावेळी घडत असलेली ही गोष्ट लोकांना उमजायला बराच वेळ लागला आणि ते मान्य करायला त्यांनी त्याहूनही अधिक वेळ घेतला. ज्या परिस्थितीमधून संकल्पना आणि रूढी अस्तित्वात येतात ती परिस्थिती बदलल्यावर बराच काळ त्यांचा जनमानसावरील पगडा कायम राहातो. दोन माणसांनी वाहून नेण्याच्या डोलीमधून जेव्हा लोक ये-जा करत तेव्हा त्या डोलीला आधार देण्यासाठी वाहकाच्या कपडयांना बंद लावण्यात येत. प्रत्यक्षात तशा डोल्या नाहीशा झाल्या तरीही संबंधित व्यक्तींचे कपडे बदलले नाहीत. वाहकांच्या कपडयांचे हे बंद पूर्वी आवश्यक होते परंतु त्यांची उपयुक्तता संपल्यावरही शिंपी तसेच कपडे शिवत.

संकल्पना व रूढी यांची हीच तर गंमत असते आणि वाजवी किंमतीबद्दलच्या संकल्पनेचीही तीच तऱ्हा होती. जुन्या, स्थैर्याच्या स्थितीमध्ये ही संकल्पना जन्माला आली होती आणि किंमतीवर परिणाम करणाऱ्या सर्व गोष्टींची स्थानिक लोकांना चांगली माहिती होती. दूरवरच्या आणि अपरिचित प्रभावांनी स्थानिक बाजारात शिरकाव केल्यावरही जनमानसातील ही कल्पना कायम राहिली. परंतु काळाच्या ओघात नव्या परिस्थितीमुळे लोकांच्या वृत्तीमध्ये बदल घडून आला. पॅरिस विश्वविद्यालयाचे चौदाव्या शतकातील प्रमुख जेहां बुरिदान यांच्या लिखाणामध्ये आपल्याला या नव्या वृत्तीचे प्रतिबिंब पाहावयास मिळते : " एखाद्या वस्तूच्या अंगभूत मूल्यावरून तिची किंमत ठरविणे योग्य नाही…माणसांच्या गरजा लक्षात घेऊनच वस्तूंची किंमत ठरवली पाहिजे."

म्हणजे बुरिदान पुरवठा आणि मागणी याबद्दल बोलत होते. कोठल्याही परिस्थितीत लागू असणारे असे वस्तूचे स्थिर मूल्य नसते असा त्यांचा दावा होता. अशा रीतीने वाजवी किंमत त्याज्य ठरवून त्याजागी बाजारभाव पर्याय म्हणून अस्तित्वात आला.

जसा किंमतीच्या संकल्पनेमध्ये बदल घडून आला तसा गिल्ड्सच्या संरचनेमध्येही फरक होत गेला. वास्तविक पाहाता इतिहास म्हणजे बदलांची नोंदवहीच होय. म्हणूनच या प्रकरणाची सुरुवात गिल्ड व्यवस्थेच्या वर्णनाने होते आणि पुढे ती व्यवस्था कशी मोडकळीस आली त्याच्या वर्णनाने या प्रकरणाची समाप्ती होते.

मालक-कारागिरांमधील समानता आणि मदतनीसाला बढती मिळून तो मालक-कारागीर होण्यामधील सहजता हे गिल्ड व्यवस्थेचे दोन महत्त्वाचे पैलू होते. सर्वसाधारणपणे गिल्डव्यवस्थेचा सूर्य मध्यान्हीला होता तोपर्यंत म्हणजे तेराव्या आणि चौदाव्या शतकापर्यंत ही स्थिती कायम राहिली आणि त्यानंतर त्यात अपरिहार्य असे बदल घडून आले.

काही गिल्ड्समध्ये मालक-कारागिरांमधील समानता इतिहासजमा झाली. काही मालक-कारागीर श्रीमंत झाले, त्यांनी अधिक सत्ता बळकाविली आणि ते आता त्यांच्याप्रमाणे सुदैवी न ठरलेल्या आपल्या बांधवांकडे तुच्छतेने पाहू लागले. त्यांनी स्वतःच्याच

अशा वेगळ्या गिल्ड्स् स्थापन केल्या. यामुळे " उच्च " आणि " नीच " अशा दोन प्रकारच्या गिल्ड्स् अस्तित्वात आल्या आणि नीच गिल्ड्स्मधील मालक-कारागीर अनेकदा उच्च गिल्ड्स्मधील मालक-कारागिरांकडे मजूर म्हणूनही काम करू लागले! पूर्वी व्यापाऱ्यांच्या गिल्ड्स्कडे शहरातील व्यापाराची एकाधिकारशाही असे, हे आपण आधीच पाहिले आहे. त्याजागी आता आपण उत्पादित केलेल्या वस्तूंचा व्यापार करणाऱ्या कारागिरांच्या गिल्ड्स् अस्तित्वात आल्या होत्या. आता काही गिल्ड्स्नी सर्वसाधारण व्यापाराला सोडचिठ्ठी दिली, त्याऐवजी विशिष्ट वस्तूंचा व्यापार सुरू केला आणि त्यामुळे मृतवत् होण्याऐवजी त्यांनी उच्च व्यापारी गिल्ड म्हणून वैभव मिळवले. तसेच क्राफ्ट गिल्ड्स्मधील श्रीमंत सभासदांनी उत्पादनाचे काम बंद करून आपले लक्ष केवळ व्यापारावर केंद्रित करण्यास सुरुवात केली. त्यांनी स्वतःची संपूर्णतया खाजगी संघटना बांधून कष्टकरी कारागिरांना वाटेला लावले. लंडनच्या बारा लिव्हरी कंपन्या, पॅरिसच्या सहा कॉर्प्स्-द-मोतियेर आणि फ्लॉरेन्सच्या आर्ती मॅगियोरि या त्याचे उदाहरण होत. सर्व गिल्ड्स्मध्ये या निवडक गिल्ड्स् सत्ताधीश आणि श्रीमंत होत्या आणि आपल्या भागात त्यांची झोटिंगशाही चाले. पूर्वी कोणीही गरीब वा श्रीमंत कारागीर गिल्डचा अधिकारी होई. आता त्यामध्ये फरक होऊ लागला. " आता फ्लॉरेन्सच्या रस्त्यावर कापड विकणाऱ्या कोणाही कापड विक्रेत्याला किंवा डोक्यावरून वाहून पाव विकणाऱ्या कोणाही बेकरीवाल्याला संबंधित गिल्ड्स्चे रेक्टरपद भूषविण्यास परवानगी नव्हती. "

गिल्डची सूत्रे स्वतःच्या हाती घेण्यापासून शहरी व्यवस्थापनाची संपूर्ण सूत्रे हाती घेणे यातील अंतर तसे थोडेसेच होते. त्यामुळे उच्च गिल्डच्या सभासदांनी तेवढे अंतर सहजतेने तोडले. शहरातील सर्व सत्ता त्यांच्या हाती आली आणि मग सर्वात श्रीमंत सत्ताधारी लोक म्हणजेच शहराचे व्यवस्थापन असा प्रकार सगळीकडे दिसू लागला. जन्मानेच अमीर-उमराव असणाऱ्या राज्यकर्त्या वर्गाची सत्ता ग्रामीण भागात होती तर शहरामध्ये पैशाची ताकद अनिर्बंध सत्ता उपभोगत होती. " हॉलंडच्या डॉर्डरेश्ट आणि इतर सर्वच शहरांमध्ये पंधराव्या शतकात शहरांचे व्यवस्थापन म्हणजे श्रीमंत परिवारांची मनगटशाही असे समीकरण बनले...शहरामध्ये व्यवस्थापकीय अधिकारी नेमणे, महापौराची निवड करणे याचे हक्क आणि त्यामार्फत शहर-व्यवस्थापनाची सारी सूत्रे, पैसा आणि ज्ञान असलेल्या लोकांच्या हातात एकवटली होती. "

हॉलंडमधील सर्व शहरांमध्ये जी स्थिती होती तीच जर्मनीमध्येही होती. लुबेकमध्ये " व्यापारी आणि श्रीमंत शहरवासीच शहरात राज्य करीत. शहरवासियांवर कर लादण्याचे अधिकार, न्याय व्यवस्थेची सर्वोच्च पदे आणि कायदे करण्याचे अधिकार नगर समितीच्या हातात होते आणि तिची शहरावर अमर्याद सत्ता होती. "

मालक-कारागिर आणि जर्नीमॅन यांच्यामधील वाढती दरी हे गिल्ड व्यवस्था कोलमडण्यामागचे आणखी एक महत्त्वाचे कारण होते. ॲप्रेंटिस-जर्नीमॅन-मालक-कारागीर अशी पूर्वीची श्रेणीबद्ध रचना आता ॲप्रेंटिस-जर्नीमॅन एवढीच राहिली.

कामगार म्हणून सुरुवात करून मालकाच्या पदाला जाऊन पोहोचणे दिवसेंदिवस कठीण होऊ लागले. जशी अधिकाधिक माणसे शहरांकडे धाव घेऊ लागली तशी जुन्या मालक-कारागिरांनी पदोन्नती अधिकाधिक बिकट करून स्वतःची एकाधिकारशाही कायम ठेवण्याचा घाट घातला. मग केवळ विशेष सवलती असलेल्या काही जणांनाच त्यांनी आपल्या कंपूत यायला परवानगी दिली. यासाठी त्यांनी मालक-कारागिराची परीक्षा अधिकच कठीण केली. तसेच काही विशिष्ट लोक वगळता इतरांना मालक-कारागीर होण्यासाठी भरावी लागणारी रक्कम त्यांनी वरीच वाढविली. अशा रीतीने आम जनतेकरता मालक-कारागीर होण्याचे नियम अधिक जाचक करण्यात आले, तर काही विशिष्ट लोकांना सवलती देऊन त्यांच्यासाठी मात्र तो मार्ग सुकर करण्यात आला. अमीन्स शहरातील रंगारी आणि शिल्पकार यांच्या गिल्डसनी १४०० साली असा नियम केला की सर्व-साधारण माणसाला हा धंदा सुरू करायचा झाल्यास तीन वर्षे उमेदवारी करावी लागेल. तसेच त्यांना आपल्या मालकाला २५ लिव्हर्स एवढी रक्कम द्यावी लागेल. परंतु " मालक-कारागिराच्या मुलांना त्या शहरामध्ये तो धंदा सुरू करायचा असेल तर त्यांना असणाऱ्या अनुभवाच्या जोरावर तो सुरू करता येईल आणि त्यांनी मालक-कारागिराला केवळ १० लिव्हर्स ही रक्कम द्यावी." याच्याही पुढे जाऊन शिडीच्या वरच्या पायऱ्यांवर जाण्याचा रस्ता आम जनतेसाठी कायमचा बंद करण्याचा टप्पा पॅरिसच्या नॅपेरी विणकरांनी गाठला. " मालक-कारागिराच्या मुलाशिवाय दुसऱ्या कोणालाही मालक-कारागीर होता येणार नाही, " असा त्यांनी नियम केला.

जर्नीमेनना मालक-कारागीर या पदावर जाणे अशक्य होऊ लागले तेव्हा अर्थातच ते नाखूष झाले. मालक-कारागिरांचे हितसंबंध आणि आपले हितसंबंध हे परस्परविरोधी आहेत ही गोष्ट त्यांना स्पष्ट झाली. तेव्हा त्यांनी जर्नीमेनच्या स्वतंत्र संघटना उभ्या केल्या. " याद्वारे कामावर एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मालकांच्या गिल्डने उत्पादनावर एकाधिकारशाही प्रस्थापित करण्यासारखाच तो प्रकार होता. पॅरिसमधील खिळे तयार करणाऱ्या जर्नीमेननी जिल्ह्यातील सर्व जर्नीमेनना काम मिळेपर्यंत बाहेरच्या जर्नीमॅनला मजुरीवर आणण्यास परवानगी नाकारली. टुलोजमधील कष्टकरी बेकरीवाल्यांनी, पॅरिसमधील कष्टकरी-चांभारांनी मालकांच्या संघटनांच्या विरोधात आपल्या संघटना उभारायला सुरुवात केली. "

आजच्या कामगार-संघटनांप्रमाणे या जर्नीमेनच्या संघटनांनी आपल्या सभासदांना अधिक मजुरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आजच्या प्रमाणेच तेव्हाही या प्रयत्नांना मालकांकडून विरोध झाला. शहर-व्यवस्थापनाने मालक-कारागिरांच्या तक्रारी विचारात घेऊन या जर्नीमेनच्या संघटना बेकायदेशीर असल्याचे जाहीर केले. लंडन शहराच्या जुन्या दप्तरानुसार तेथील खोगीरे बनविणारे जर्नीमेन व त्यांचे मालक यांच्यामध्ये १३९६ साली तंटा उद्भवला होता : " महापौर व ज्येष्ठजन यांच्यासमोर अशी तक्रार करण्यात येत आहे...हक्कांच्या नावाने काही लोकांनी या धंद्यामध्ये काम करणाऱ्या जर्नीमेनना भडकविले आहे. (आज कदाचित अशा लोकांना ' लाल बावटेवाले ' म्हणून संबोधण्यात

आले असते.) आणि आपली मजुरी वाढवून घेण्यासाठी त्यांनी संघटना उभ्या केल्या आहेत. शेवटी महापौर आणि ज्येष्ठजन यांनी असा निवाडा दिला की या धंद्यातील जर्नीमेननी या धंद्यातील मालकांच्या आधिपत्याखाली काम करावे. हाच निवाडा शहरातील इतर धंद्यांमधील जर्नीमेननाही लागू आहे. याउपर जर्नीमेननी संघटना बांधण्याचा वा सभा घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना दंड करण्यात येईल."

फ्रान्समध्येही अशीच घटना घडली. लिऑनच्या शहरसमितीचे सभासद, ज्येष्ठजन आणि रहिवासी यांनी १५४१ साली पहिल्या फ्रान्सिसकडे तक्रार केली की, "गेल्या तीन वर्षांत काही कामकऱ्यांनी, छपाई–उद्योगातील काही जर्नीमेननी इतरांना बंड करायला उद्युक्त केले आहे. अशा रीतीने सर्वांनी संघटित होऊन त्यांच्या मालकांना अधिक मजुरी, तसेच जुन्या रूढीप्रमाणे कधीही दिले जात नसणारे जेवण देण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे लिऑन शहरातील छपाई-धंदा पूर्णपणे बसला आहे." संतापलेले फिर्यादी केवळ अशी तक्रार करून थांबले नाहीत, तर त्यांनी यावर उपायही सुचवला. त्याप्रमाणे पहिल्या फ्रान्सिसने लगेच एक कायदा जारी केला. त्या कायद्यात असे नमूद करण्यात आले की, "छपाई-धंद्यातील उपर्युक्त जर्नीमेन आणि शिकाऊ उमेदवार आपली एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणार नाहीत. त्यांचा कोणी नायक असणार नाही. त्यांच्या मालक-कारागिराच्या घराशिवाय अन्य ठिकाणी ते कोणत्याही ध्वजाखाली एकत्रित येणार नाहीत. न्यायालयाच्या मान्यतेखेरीज पाचापेक्षा अधिक संख्येने ते कोठेही जमा होणार नाहीत. या आज्ञेचा अवमान केल्यास त्यांना तुरुंगवासाची शिक्षा देण्यात येईल.. हे जर्नीमेन दिलेले काम पूर्ण करतील, अर्धवट टाकणार नाहीत वा संपावर जाणार नाहीत."

'ब्लॅक डेथ'नंतर मजुरी वाढवून घेण्यासाठी होणारे संघर्ष अधिकच तीव्र बनले असतील अशीच कोणाचीही अपेक्षा असेल. मजुरांना एवढी मागणी आल्याने मजुरीचे दर वाढणे अपरिहार्यच होते. ग्रामीण भागात प्लेगच्या साथीपूर्वी प्रचलित असणारे मजुरीचे दर कायम ठेवण्यासाठी जसे कायदे केले जात होते, तसेच कायदे त्याच कारणासाठी शहरांमध्येही करण्यात आले. इंग्लंडमध्ये १३४९ साली कामकऱ्यांसंबंधी काढलेल्या हुकुमनाम्यात नमूद करण्यात आले होते की, "रूढीने चालत आलेल्या मजुरीपेक्षा कोणीही अधिक मजुरी देणार नाही किंवा तशी देण्याचे वचनही देणार नाही... त्याचप्रमाणे तशी मजुरी कोणीही मागणार नाही आणि मागितल्यास त्याच्या दुप्पट पैसे त्याला दंड म्हणून भरावे लागतील... खोगीर करणारे, कातडी कमावणारे, टॉयर्स, चांभार, शिंपी, लोहार, सुतार, गवंडी, नावाडी आणि इतर कारागीर वा कामकरी त्यांच्या श्रमासाठी पूर्वीपेक्षा अधिक दराने मजुरी मागणार नाहीत."

तशाच प्रकारचा एक कायदा १३५१ साली फ्रान्समध्ये करण्यात आला : "द्राक्षे काढण्याचे काम करणारे लोक द्राक्षांच्या मळ्याची नीट काळजी घेतील. प्लेगच्या साथीपूर्वी त्या कामासाठी त्यांना मिळणाऱ्या मजुरीत आता तिसऱ्या हिश्श्याची वाढ मिळेल, परंतु त्यापेक्षा अधिक मजुरीची वचने त्यांना देण्यात आली असली तरीही प्रत्यक्षात अधिक

मजुरी मिळणार नाही....जे कोणी यापेक्षा जास्त मजुरी देतील किंवा घेतील त्यांना साठ सोल्स् इतक्या रकमेचा दंड भरावा लागेल...आणि त्यांच्याकडे दंड भरायला पैसे नसतील तर त्यांना तुरुंगात बंद करण्यात येईल व तेथे पाव आणि पाणी यावर दिवस काढावे लागतील." वरवर पाहाता हा कायदा जरी न्याय्य वाटत असला तरी तुरुंगवास केवळ पैसे नसलेल्या कामकऱ्यांच्याच वाट्याला येईल, मालकांच्या नव्हे ही गोष्ट तर उघडपणेच दिसते. पण माणसांना गजाआड बंद करून मजुरांचा तुटवडा संपणार नव्हता.

हे कायदे यशस्वी झाले नाहीत. कामकऱ्यांनी अधिक मजुरी मागितली व त्यांना ती मिळाली. जरी कामकऱ्यांच्या संघटना मोडून काढण्यात आल्या आणि त्यांच्या सभासदांना दंड वा कारावासाची शिक्षा करण्यात आली, तरीही आणखी नवीन संघटना उभ्या राहिल्या. मजुरी वाढवून घेण्यासाठी आणि कामकऱ्यांवरील बंधने शिथिल करून घेण्यासाठी संघ होतच राहिले. ज्या इतर कामकऱ्यांना या संघटनांचे सभासद होण्यास मज्जाव करण्यात आला होता, त्यांच्यापेक्षा जमीनीची स्थिती खूपच बरी होती. कारण त्या कामकऱ्यांना कोठल्याही गिल्डमध्ये कसलेही अधिकार नव्हते. श्रीमंत उद्योगपतींच्या मर्जीवर, पोटाला पुरेल न पुरेल एवढ्या तुटपुंज्या मजुरीवर ते दयनीय जीवन कंठत होते. हे लोक आरोग्यास अपायकारक अशा गलिच्छ कोठ्यांमध्ये राहात. ज्या कच्च्या मालावर ते प्रक्रिया करत तो कच्चा माल किंवा त्या कामासाठी लागणारी अवजारे त्यांच्या मालकीची नव्हती. स्वतःची श्रमशक्ती सोडून दुसऱ्या कशावरही मालकी नसणाऱ्या, मालक आणि बाजारपेठेतील अनुकूल स्थिती यावर अवलंबून असणाऱ्या आधुनिक सर्वहारावर्गाचे कामगारवर्गाचे ते पूर्वज होते. म्हणजे त्याकाळी शहरामध्ये दोन प्रकारच्या वस्त्या होत्या. एका प्रकारच्या वस्तीत अत्यंत भुकेकंगाल लोक राहात (फ्लॉरेन्स शहराच्या भरभराटीच्या काळात तेथे २०,००० भिकारी होते असे म्हणतात) तर अत्यंत ऐषारामात राहाणारे श्रीमंत लोक दुसऱ्या वस्तीत असत.

उमरावशाहीपासून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झालेल्या शहरी जनतेच्या लढ्यांमध्ये श्रीमंत आणि गरीब, व्यापारी, मालक आणि कामकरी असे सर्वजण एकत्र आले होते. परंतु मिळालेल्या विजयाची फळे मात्र केवळ उच्चवर्गीयांनाच चाखायला मिळाली. तळागाळातील जनतेला कळून चुकले की त्यांचे केवळ धनी बदलले आहेत. पूर्वी व्यवस्थापनाची सूत्रे सरंजामदारांच्या हाती होती, ती आता श्रीमंत नगरवासियांच्या हाती आली आहेत. या सत्ताधिशांविरुद्ध गरिबांचा संताप आणि भ्रमनिरास झालेल्या छोट्या कारागिरांचा द्वेष एकत्रित झाले आणि चौदाव्या शतकाच्या शेवटी जसे शेतकरी उठाव झाले, त्याचप्रमाणे संपूर्ण पश्चिम युरोपला व्यापून टाकणारे असे शहरातील गरीब जनतेचे उठाव झाले. तो वर्गलढा होता. गरीब विरुद्ध श्रीमंत, भुकेकंगाल विरुद्ध ऐषारामी. काही ठिकाणी गरिबांनी हा लढा जिंकला व काही वर्षांसाठी शहरांचा ताबा घेऊन त्यांनी तेथे अत्यावश्यक सुधारणा केल्या. पण शेवटी त्यांचा पराभवच झाला. इतर काही ठिकाणी विजय झाला तरीही त्यांच्यातील यादवीमुळे त्यांना सत्ता टिकवता आली नाही. बहुतेक ठिकाणी श्रीमंतांचाच विजय झाला, अर्थात पीडित वर्गांच्या

संघटित शक्तीच्या दडपणाखाली काही काळ घालवल्यानंतरच श्रीमंतांना विजय मिळवणे शक्य झाले.

या अंदाधुंदीच्या काळानंतर गिल्ड-व्यवस्थेचा अंतसमय समीप येऊ लागला. स्वतंत्र शहरांची सत्ता कमी झाली. पुन्हा एकदा त्यांच्यावर बाहेरून अंमल गाजवण्यात येऊ लागला. शहरांनी कधीही अनुभवली नव्हती अशी वरिष्ठ सत्ता आता ड्यूक, अमीर किंवा राजे यांच्याकडून लादली जात होती. ही राजघराणी आता असंघटित विभागांचे एका राष्ट्रीय शासनव्यवस्थेमध्ये रूपांतर करत होती.

◇ ◇ ◇

७

आणि राजा मैदानात उतरतो !

हे पुस्तक जर दहाव्या किंवा अकराव्या शतकामध्ये लिहिले गेले असते तर लेखकाचे काम कितीतरी सोपे झाले असते. या पुस्तकातील माहिती फार पूर्वी लिहिलेल्या कागदपत्रांवरून गोळा केलेली आहे. त्यापैकी अनेक कागदपत्रे परकीय भाषांमध्ये लिहिलेली आहेत— लॅटिन, जुनी किंवा आधुनिक फ्रेंच वा जुनी किंवा आधुनिक जर्मन-मध्ययुगीन कालातील इतिहासकाराला लॅटिन भाषा चांगली अवगत असे आणि लॅटिन भाषेमध्येच त्याला सर्व कागदपत्रे उपलब्ध झाली असती. मग तो लंडनमध्ये राहात असो पॅरिसमध्ये. त्याचे वास्तव्य हाम्बुर्ग, ॲमस्टरडॅम किंवा रोम असे कोठेही असले तरी त्याला भाषेची अडचण आली नसती. कारण लॅटिन ही सर्व विद्वानांची सार्वत्रिक भाषा होती. त्या काळच्या शाळांमधील मुले इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, डच किंवा इटालियन भाषा न शिकता लॅटिन शिकत. तेव्हा इंग्लिश, फ्रेंच, जर्मन वगैरे भाषा केवळ बोली भाषा होत्या. त्यामुळे स्पेनमधील स्पॅनिश धर्मगुरू आणि इंग्लंडमधील इंग्लिश धर्मगुरू एकाच भाषेत लिहिलेले बायबल वाचीत.

त्या काळच्या विश्वविद्यालयात संपूर्ण पश्चिम युरोपभरचे विद्यार्थी कुठल्याही अडचणी-शिवाय एकत्र बोलत व शिकत. म्हणजे त्या वेळची विश्वविद्यालये या खऱ्या आंतरराष्ट्रीय संस्था होत्या.

धर्मसुद्धा सार्वत्रिक होता. स्वतःला ख्रिश्चन म्हणवून घेणारा प्रत्येकजण कॅथॉलिक चर्चचे नाव लावत असे, दुसरे कोणतेही नाही. आणि लोकांची इच्छा असो वा नसो त्यांना चर्चसंस्थेला कर भरावाच लागे. तिचे नियम व कायदे सर्वांनाच बंधनकारक असत. साऊथॲम्प्टनमधील चर्चची सेवा जिनीव्हामधील सेवेसारखीच होती. धर्माला राष्ट्रांच्या सरहद्दी नव्हत्या.

आज अनेक लोकांना वाटते की राष्ट्रभक्तीची उर्मी माणसांना उपजतच असते. अर्थातच हे खरे नाही. राष्ट्रीय वीरांनी केलेल्या महान कार्याबद्दल सतत ऐकून आणि वाचूनच बहुतांशी राष्ट्रभक्ती निर्माण होते. दहाव्या शतकातील मुलांच्या शालेय पुस्तकात त्यांच्या राष्ट्राची जहाजे शत्रूराष्ट्राच्या जहाजांना बुडवत आहेत असे दृश्य दाखवणारी चित्रे

नसत. त्याला कारणही तसेच होते. आज आपल्याला ठाऊक आहेत त्या अर्थाने तेव्हा राष्ट्रे अस्तित्वातच नव्हती.

घरगुती चौकट सोडून देऊन उद्योगधंदे शहरात कसे आले ते आपण मागच्या प्रकरणात पाहिले. ही स्थानिक गोष्ट होती, राष्ट्रीय नव्हे. चेस्टरच्या गिल्ड्सुमेनच्या दृष्टीने लंडनमधून येणाऱ्या वस्तू पॅरिसमधून येणाऱ्या वस्तूंएवढ्याच "परकीय" होत्या. घाऊक व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्याला सगळे जग त्याचाच इलाखा वाटत असे— जगाच्या एका भागाप्रमाणे दुसऱ्या भागात पाय रोवण्याचा तो तितकाच हिरिरीने प्रयत्न करत असे.

परंतु पंधराव्या शतकाच्या सुमारास मध्ययुगीन कालाचा अंत समीप येताच हे चित्र बदलले. राष्ट्रे अस्तित्वात आली; राष्ट्रीय सरहद्दी आखल्या गेल्या; राष्ट्रीय साहित्य जन्माला आले; स्थानिक नियमांच्या जागी उद्योगधंद्यांसाठी राष्ट्रीय नियम आले; राष्ट्रीय कायदे, राष्ट्रीय भाषा एवढेच काय पण राष्ट्रीय चर्चसंस्थादेखील अस्तित्वात आल्या. आपण माद्रिद, केन्ट किंवा बर्गण्डीचे नागरिक नसून स्पेनचे, इंग्लंडचे किंवा फ्रान्सचे नागरिक आहोत असे लोकांना वाटू लागले. अमके शहर किंवा तमका सरंजामदार यांच्याशी आपले इमान नसून संपूर्ण राष्ट्राचा अधिपती असलेल्या राजाशी आपले इमान असल्याचे त्यांना वाटू लागले.

या राष्ट्रीय शासनव्यवस्थेच्या उदयाची राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक अशी विविध कारणे होती. या मनोरंजक विषयासंबंधी अनेक पुस्तके लिहिण्यात आली आहेत. परंतु येथे मुख्यत्वे आर्थिक कारणांचा विचार आपल्याला करायचा आहे.

मध्यमवर्गाचा उदय ही दहाव्या ते पंधराव्या शतकाच्या काळातील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया होय. जीवनातील परिवर्तनामुळे या नव्या वर्गाचा विकास झाला. आणि या वर्गाच्या आगमनामुळे समाजाच्या जीवनपद्धतीत आणखी बदल घडून आले. आधीच्या व्यवस्थेमध्ये ज्या जुन्या संस्था कार्यरत होत्या त्यांचा ऱ्हास झाला. आणि त्यांची जागा घेण्यासाठी नव्या संस्था जन्माला आल्या. असे होणे हा इतिहासाचा एक नियमच आहे.

ज्याच्याकडे बराच पैसा असतो अशाच माणसाला त्याच्या जिल्ह्यामध्ये पुरेसे पोलीस आहेत की नाहीत याची काळजी करावी लागते. हमरस्त्यांवरून ज्यांना आपली चीज-वस्तू किंवा पैसा दुसऱ्या जागी पाठवायचा असतो, तेच लोक वाटमारी होऊ नये वा भुर्दंड भरावा लागू नये यासाठी कंठशोष करतात. गोंधळ आणि असुरक्षितता या गोष्टी धंद्यासाठी हानिकारक असतात म्हणूनच त्या काळच्या मध्यमवर्गाला सुव्यवस्था आणि सुरक्षितता हवी होती.

ते कोणाकडे अपेक्षेने पाहू शकणार होते ? सरंजामी व्यवस्थेमध्ये सुव्यवस्था आणि सुरक्षिततेची हमी कोण देऊ शकत होते ? पूर्वी अमीर–उमरावांकडून संरक्षण मिळत असे. पण या सरंजामदारांच्या भुर्दंडाविरूद्धच तर शहरांनी लढा दिला होता. सरंजामी सेनाच लुटालूट, वाटमारी आणि नासधूस करत. अपुरा आणि अनियमित पगार मिळणारे सरंजामदारांचे सैनिक प्रत्येक शहरात धुमाकूळ घालत आणि हाताला लागेल ते

लुटून नेत. विजय कोणाचाही झाला तरी आपसात लढणाऱ्या सरंजामदारांमधील झगडा म्हणजे जवळपासच्या प्रजेसाठी आपत्तीच ठरायची. हमरस्त्यावर वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या वेगवेगळ्या सरंजामदारांमुळे व्यापार कठीण झाला होता. या अनागोंदीला पायबंद घालण्यासाठी एका केंद्रीय अधिपतीची जरूर होती. राष्ट्रीय शासनयंत्रणेची आवश्यकता होती. सरंजामी अव्यवस्थेमधून सुव्यवस्था निर्माण करणारी सर्वोच्च सत्ता आवश्यक होती. जुने सरंजामदार त्यांचे सामाजिक कार्य करायला पुरेसे समर्थ राहिले नव्हते. त्यांचे दिवस आता संपले होते. सर्वशक्तिमान केंद्रीय सत्तेसाठी आता परिस्थिती परिपक्व बनली होती.

मध्ययुगीन काळात राजाची सत्ता सैद्धान्तिक पातळीवर मान्य केलेली असली तरीही प्रत्यक्षात ती अतिशय क्षीण होती. मोठे सरंजामदार व्यावहारिकदृष्ट्या स्वतंत्र होते. म्हणून त्यांची सत्ता मोडून काढणे आवश्यक होते—आणि ते करण्यात आले.

ज्या मार्गाने केंद्रीय सत्ता राष्ट्रीय पातळीवर अधिकार गाजवू लागली तो मार्ग म्हणजे सरळसोट हमरस्ता नव्हता, तर वेडीवाकडी व उलटसुलट वळणे असणारा खडबडीत रस्ता होता. एक-दोन वर्षांत, किंवा पाच-पन्नास वर्षांतच काय पण शंभर वर्षांतही ही प्रक्रिया पूर्ण झाली नाही. त्यासाठी काही शतके खर्ची पडली, पण अखेर ते घडलेच.

भूदास आणि शेतजमीन यांच्या रूपातील बरीचशी संपत्ती गेल्यामुळे सरंजामदारांची ताकद कमी झाली होती. अशा वेळी शहरांनी त्यांच्या सत्तेला आव्हान देऊन काही प्रमाणात त्यांना नामोहरम केले होते. काही ठिकाणी आपापसातील लढायांमध्ये सरंजामदार एकमेकांचा नाश करत होते.

सरंजामदारांविरुद्धच्या शहरांच्या लढ्यामध्ये राजा हा त्यांचा एक महत्त्वाचा मित्र होता. जेवढी उमरावांची शक्ती कमी झाली तेवढीच राजाची वाढली. मदतीच्या मोबदल्यात राजाला कर्जे द्यायला शहरवासी तयार होते. आता पूर्वीप्रमाणे केवळ कनिष्ठ सरंजामदारांच्या लष्करी मदतीवरच राजाचे सत्तासामर्थ्य अवलंबून नव्हते. पैशाचा वापर करता येऊ लागल्यामुळे, प्रशिक्षण घेतलेले पगारी सैन्य तो आता आपल्या पदरी ठेवू शकत होता. त्यामुळे कनिष्ठ सरंजामदारांच्या इमानाची आता त्याला जरुरी नव्हती. शिवाय खडे सैन्य अधिक कार्यक्षम होते. कारण युद्ध हाच त्यातील सैनिकांचा एकमेव व्यवसाय होता. सरंजामी सैन्य प्रशिक्षित नव्हते वा त्या सैन्याला पद्धतशीर संघटनाही नव्हती. त्यामुळे सुविहीतपणे युद्धसंचलन करणे त्यांना जमत नसे. म्हणून प्रशिक्षण दिलेली शिस्तबद्ध पगारी सेना सतत हाताशी असणे ही एक मोठीच सुधारणा होती.

त्याचप्रमाणे शस्त्रास्त्रांमधील तांत्रिक सुधारणांमुळेही एका नव्या प्रकारच्या सेनेची गरज निर्माण झाली होती. बंदुकीची दारू आणि तोफा यांचा वापर सुरू झाला होता आणि त्यांच्या सुयोग्य वापरासाठी प्रशिक्षित सहकार्याची आवश्यकता निर्माण झाली होती. पूर्वीचा सरंजामी योद्धा स्वतःचे चिलखत बरोबर वागवू शकत असे, पण स्वतःची तोफ आणि बंदुकीची दारू बरोबर घेऊन येणे त्याला शक्य नव्हते.

अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वापरणारी खडी सेना पदरी ठेवण्यास मदत केल्याबद्दल राजा

हा व्यापारी आणि औद्योगिक गटांचा ऋणी होता. कर्जे आणि ठेवी देण्यासाठी तो सावकारांच्या वाढत्या वर्गाला पुनःपुन्हा आवाहन करीत असे. इंग्लंडच्या राजाने लंडन शहराची मदत मागितल्याचे हे चौदाव्या शतकातील उदाहरण पाहा : " सर-रॉबर्ट-द-अ‍ॅशबी हा आपल्या राजाचा दूत लंडनच्या गिल्ड सभागृहामध्ये आला आणि शहरातील सर्व ज्येष्ठजन व महापौर अ‍ॅण्ड्रू ऑबरी यांना त्याने राजाचा निरोप सांगितला....की, त्यांनी राजा आणि त्याचे मंत्रिमंडळ यांची भेट घ्यावी ... मग समुद्रापलीकडील भागांमध्ये केलेल्या युद्धखर्चाबद्दल राजाने त्यांना माहिती दिली आणि त्यासाठी पुढे होणाऱ्या खर्चाखातर २०,००० पौंड कर्जाऊ मागितले.... त्यांनी ५,००० मार्क्स द्यायला एकमुखाने संमती दिली पण त्यापेक्षा जास्त रक्कम देणे शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले... तेव्हा राजाने त्यांची रक्कम नाकारली आणि ज्येष्ठजन, महापौर व इतरांना, त्यांच्या राजकर्तव्याची जाण करून दिली आणि याबाबतीत त्यांनी योग्य विचार करावा असे बजावले... मग त्यांच्या जीवावर आले होते तरीही राजाला ५,००० पौंड द्यायला ते तयार झाले... हा सौदा राजाने मान्य केला... त्या शहरातील आणि शहराच्या उपनगरातील माणसांकडून सदर रक्कम गोळा करण्यासाठी बारा माणसे निवडण्यात आली आणि राजाला द्यायचे ५,००० पौंड त्यांनी जमा करायचे ठरले. "

स्वतःजवळ पैसा असलेल्या लोकांना तो दुसऱ्यांना देऊन टाकण्यात आनंद वाटत होता का ? नाही, तसे काही नव्हते. राजाला ते अशी कर्जे देत, कारण त्याच्या बदल्यात त्यांना निश्चित स्वरूपाचे फायदे मिळत. उदाहरणार्थ, केंद्रीय शासनाने खालील प्रकारचे कायदे करणे हे उद्योगधंद्यासाठी निश्चितच फायदेशीर होते (१३८९) : " सर्व इंग्लंडभर मापे आणि वजने एकच असली पाहिजेत अशी आज्ञा देण्यात येत आहे... आणि जो कोणी दुसरी वजनमापे वापरेल त्या गुन्हेगाराला सहा महिने तुरुंगवासाची सजा देण्यात येईल. "

याशिवाय, छोट्यामोठ्या सरंजामी सेनांच्या पुंडगिरीपासून सुटका व्हावी यासाठी शहरवासी धनिक राजाला पैसे देण्यास तयार होत. सरंजामी व्यवस्थेतील अगणित सरदार-दरकदारांच्या त्रासदायक मागण्यांपासून मुक्तता करणाऱ्या केंद्रीय शासनाला पाठिंबा म्हणून आर्थिक मदत देण्यास ते तयार होत. फ्रान्समध्ये १४३९ साली करण्यात आलेल्या कायद्याप्रमाणे कायदे करणाऱ्या आणि ते अंमलात आणणाऱ्या सर्वशक्तिमान नेत्याशी संधान बांधणे त्यांना अखेर अधिक फायदेशीर ठरणार होते. फ्रान्समधील या कायद्याचे स्वरूप पाहा : " लोकांच्या जिवावर जगणाऱ्या आणि त्यांना फार काळ त्रास देणाऱ्या सशस्त्र तुकड्यांनी केलेली लुटालूट आणि अत्याचार यांपासून लोकांची कायमची सुटका करण्यासाठी....

" राजाची संमती आणि परवानगी असल्याशिवाय कोणत्याही इस्टेटीचा मालक सशस्त्र दल उभारणार नाही आणि त्याचे नेतृत्व करणार नाही. याची अवज्ञा करणाऱ्यास कोर्टापुढे उभे करण्यात येईल. त्याला किंवा त्याच्या वंशजांना कुठलेही सामाजिक पद

भूषवता येणार नाही. त्याचे सरंजामीचे अधिकार आणि मानसन्मान काढून घेण्यात येतील. त्याची माणसे आणि संपत्ती ताब्यात घेण्यात येईल..."

आणि शिक्षेची तशीच धमकी देऊन राजा पुढे बजावत आहे की... ' कोणतेही सेनानी किंवा सैनिक यांनी व्यापारी, कष्टकरी यांना त्रास देता नये किंवा त्यांच्याकडून गुरे-ढोरे वगैरे जप्त करता नयेत. व्यापारी ज्या वस्तू वाहून नेत असतील त्या त्यांच्याकडून काढून घेऊ नयेत आणि लोकांना कुठल्याही प्रकारे वेठीस धरू नये. तर व्यापाऱ्यांची चीजवस्तू शांतपणे आणि सुरक्षितपणे जाईल याची त्यांनी काळजी घेतली पाहिजे. "

पूर्वी केवळ स्वतःच्या जमिनीचा खंड हेच राजाच्या उत्पन्नाचे एकमेव साधन होते. त्यावेळी करवसुलीची राष्ट्रीय व्यवस्था अस्तित्वात आली नव्हती. १४३९ साली फ्रान्सच्या राजाने " ताइल् " म्हणजे पैशाच्या रूपातील नियमित राष्ट्रीय कर प्रथमच अंमलात आणला. जमिनीवरील सरंजामी अधिकार बहाल करून त्याच्या बदल्यात पूर्वी कनिष्ठ सरंजामदारांची लष्करी सेवा मिळवण्यात येई. आता चलनी अर्थव्यवस्था वाढीस लागल्यानंतर ही पद्धत निकामी झाली. आता सर्व राज्यभर पैशाच्या रूपात कर-वसुली करणे शक्य झाले. हे काम करणाऱ्या लोकांना उदरनिर्वाहासाठी जमीन देण्यात येत नसे तर ते राजाचे पगारी नोकर असत. राजाच्या वतीने हे पगारी नोकर देशाच्या विविध भागांमध्ये महसूल गोळा करण्याचे काम पाहात. हे काम पूर्वी सरंजामी काळात प्रथेने जोडलेले सरंजामदार करी. हा बदल महत्त्वपूर्ण होता.

स्वतःची सत्ता राज्याच्या महसुलावर अवलंबून आहे हे राजांना पक्के ठाऊक होते. व्यापार आणि उद्योग यांच्या वाढीनेच त्यांच्या तिजोरीमध्ये पैशाचा भरणा होणार होता हे देखील स्पष्ट होत गेले. म्हणून व्यापार आणि उद्योग यांची वाढ होईल याची राजे काळजी घेऊ लागले. प्रत्येक शहरामध्ये एका छोट्याशा गटाची एकाधिकारशाही टिकवण्यासाठी गिल्डनी केलेले नियम व्यापार आणि उद्योग वाढवण्याच्या मार्गातील अडथळे होते हे देखील त्यांना स्पष्टपणे जाणवू लागले.

संपूर्ण राष्ट्राचा विचार करणाऱ्या प्रशासकाला स्थानिक, प्रांतीय असे लोड्यात खोडा घालणारे अवास्तव कायदेकानू बाजूस सारावे लागतात. शहराशहरांमधील तेढ मिटवावी लागते. उदाहरणार्थ, " बर्लिनमधील चांभारांना १४४३ मध्ये फ्रंकफुर्टमध्ये कातड्याची जत्रा भरविण्यासाठी अमीराचा हुकुमनामा लागणे " ही हास्यास्पद गोष्ट होती. राष्ट्रीय अधिसत्तेच्या वाढत्या प्रभावाबरोबर संपूर्ण राष्ट्राच्या हिताखातर राजांनी स्थानिक एकाधिकार-शाहांवर वरवंटा फिरवण्यास सुरुवात केली. १४४३ चा इंग्लंड राज्यामधील कायदा असा आहे : " गुन्हा ओळखणे, शिक्षा करणे आणि कायद्यात सुधारणा करणे या बाबी केवळ राजाच्याच अखत्यारीत असूनही गिल्ड्स्, समित्या आणि कंपन्या यांचे मालक, प्रमुख आणि सामान्य सभासद स्वतःच अनेक बेकायदेशीर आणि अवास्तव हुकुमनामे काढतात.... म्हणून धर्मोपदेशक-सरंजामदार आणि उमराव-सरंजामदार यांच्या सल्ल्या-

नुसार आणि संमतीनुसार आणि कायदेमंडळाच्या* हक्कानुसार राजा, प्रत्येक गिल्ड, समिती आणि कंपनी यांच्या सामान्य सभासदांना, प्रमुखांना आणि मालकांना आज्ञा देत आहे की ते त्यांच्या सर्व सनदा आणि अधिकारपत्रे नोंदीसाठी राष्ट्रीय न्यायासनासमोर आणतील... आणि त्याचप्रमाणे राजा असाही कायदा करत आहे की न्यायासनासमोर चर्चा केल्याशिवाय कोणीही मालक, प्रमुख किंवा सामान्य सभासद कुठलाही कायदा करणार नाहीत किंवा अंमलात आणणार नाहीत..."

आणि फ्रान्सच्या राजाने केलेल्या यापेक्षाही दूरलक्षी कायद्यावरून त्या देशातील राजाच्या वाढत्या अधिसत्तेची आपल्याला कल्पना येते. "फ्रान्सचा राजा चार्ल्स् देवाच्या नावाने आपल्या उमरावसभेमध्ये पुरेशी चर्चा करून अशी आज्ञा देत आहे की यापुढे पॅरिस शहरामध्ये गिल्ड्स् किंवा समित्या यांचे कोणीही मालक असणार नाहीत...प्रत्येक उद्योगधंद्यामध्ये आमच्या संमतीने निवडलेली काही ज्येष्ठ माणसे असतील आणि कुठल्याही प्रकारची सभा किंवा व्यावसायिक-समिती स्थापन करायला त्यांना बंदी असेल... त्याखातर त्यांना आमची आगाऊ परवानगी आणि संमती घ्यावी लागेल... आणि तसे न केल्यास त्यांना फ्रान्सच्या सिंहासनाची अवज्ञा करणारे बंडखोर मानण्यात येईल आणि त्यांची माणसे व चीजवस्तू ताब्यात घेण्यात येतील."

शक्तिशाली शहरांची एकाधिकारशाही सत्ता नष्ट करणे ही साधीसुधी करामत नव्हती. जिथे शहरे सर्वात अधिक शक्तिशाली होती अशा जर्मनी आणि इटाली या देशांमध्ये अनेक शतकानंतर त्यांना नमविणारी केंद्रीय अधिसत्ता अस्तित्वात आली. म्हणूनच बदलत्या आर्थिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी आवश्यक असलेल्या एकत्रीकरणामध्ये सर्वात शेवटी सामील होणारा हा सर्वात शक्तिशाली आणि श्रीमंत सामाजिक घटक होता. इतर ठिकाणी त्यांच्या सत्तेवरील या अतिक्रमणाला विरोध करण्यासाठी काही शहरांनी लढाही उभारला. परंतु अशा विभिन्न घटकांतील परस्परांविषयीचा द्वेष आणि तिरस्कार यांच्या भावनेमुळे ते एकत्रितपणे राष्ट्रीय शक्तींशी सामना करू शकले नाहीत—आणि राष्ट्रीय शक्तींच्या सुदैवाने — शहरांचा पराभव झाला. इंग्लंड, फ्रान्स, नेदरलँडस्,

*[इंग्लंडमधील कायदेमंडळाचा इतिहास हा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'कायदे-मंडळ' या शब्दामधून आज आपल्याला ध्वनित होणाऱ्या अर्थापेक्षा १४४३ मधील इंग्लंडच्या कायदेमंडळाचे स्वरूप फारच वेगळे होते. ती लोकांच्या सार्वभौमत्वाचे प्रतिनिधित्व करणारी संस्था नव्हती. त्या संस्थेवरील लोकांचा अधिकार हळूहळू वाढत गेला. सतराव्या शतकात या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आणि 'लोकसभा' (House of Commons) आणि 'उमरावसभा' (House of Lords) असे द्विस्तरीय रूप कायदेमंडळाला आले. तरीही लोकसभा म्हणजे सर्वसामान्य लोकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था असे तिचे स्वरूप नव्हतेच. ते स्वरूप यायला आणखी तीन शतके उलटावी लागली. अखेर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला सर्व प्रौढ, सुजाण मतदारांचे प्रतिनिधित्व कायदेमंडळ करू लागले.]

स्पेन या देशांमध्ये आर्थिक जीवनाचा पायाभूत घटक म्हणून शहरांच्या जागी शासनसंस्था अस्तित्वात आली.

काही शहरे आणि गिल्ड्स् यांनी त्यांचे वादातीत अधिकार कायम ठेवण्यासाठी जबर प्रयत्न केले ही गोष्ट देखील खरी आहे. परंतु हे सुद्धा केंद्रीय अधिसत्तेच्या नियमनाखालीच घडले. आर्थिक व्यवहाराचे विस्तृत क्षेत्र आणि शक्तिशाली केंद्रीय शासनव्यवस्था यांचे फायदे त्यावेळच्या मध्यमवर्गालाच मिळणार असल्यामुळे अखेर राष्ट्रीय शासनव्यवस्थेने जम बसवला. भांडवलदारांकडून मिळणाऱ्या पैशावर राजे अवलंबून असत. आणि स्वतःची वाढती राज्ये चालविण्यासाठी ते भांडवलदारांचा सल्ला आणि मदत यावर अधिकाधिक विसंबून राहू लागले. राजांचे मंत्री, न्यायाधीश आणि नोकरवर्ग यांचा भरणा सर्वसाधारणपणे याच वर्गातून होत असे. पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये लिऑन्समधील एक सावकार आणि त्या काळचे सर्वात श्रीमंत गृहस्थ श्री. जाडक् कुर हे राजाचा सल्लागार बनले. ट्यूडॉर इंग्लंडमध्ये थॉमस क्रॉमवेल नावाचे वकील आणि थॉमस ग्रेशॅम नावाचे रेशमाचे व्यापारी हे राजाचे मंत्री झाले. " राजसत्ता आणि औद्योगिक भांडवलदार यांच्यामध्ये एक अलिखित करार झाला आहे. भांडवलदारांनी त्यांचे राजकीय व सामाजिक वजन, त्यांची बुद्धिमत्ता व संपत्ती या गोष्टी राष्ट्रीय अधिसत्तेच्या सेवेसाठी रुजू केल्या आहेत. त्याच्या बदल्यात शासनाने त्यांना हव्या असलेल्या आर्थिक व सामाजिक सवलतीत वाढ केली आहे... सामाजिक स्थानाला करकचून बांधलेल्या आणि नियमांनी जखडलेल्या सामान्य कष्टकऱ्यांना त्यांनी दाबून ठेवले आहे. "

" तू माझी पाठ खाजव आणि मी तुझी खाजवतो " या प्रकाराचे ते उत्तम उदाहरण होते.

इंग्लंडमधील या काळातील एक मनोवेधक घटना म्हणजे स्टीलयार्ड नावाची वखार असलेल्या व्हेनिसवासी आणि हॅन्शिॲटिक लीगच्या जर्मन व्यापाऱ्यांची लंडनमधून हकालपट्टी ही होय. इंग्लंडचा आयात-निर्यात व्यापार हा नेहमीच परकीयांच्या हातात होता. प्रत्येक राजाकडून व्यापारी सवलती मिळवून परकीयांनी स्वतःचे उखळ पांढरे केले होते. आता पंधराव्या आणि सोळाव्या शतकात इंग्लिश व्यापाऱ्यांनी डोके वर काढायला सुरुवात केली. परकीयांच्या हातात असलेल्या या किफायतशीर व्यापारामध्ये घुसणारी मर्चन्ट ॲडव्हेन्चरर्स ही एक इंग्लिश लोकांची उद्यमशील साहसी कंपनी होती. परंतु परकीय व्यापाऱ्यांना दिलेल्या सवलतींच्या बदल्यात राजाला पैसे मिळत ही एक अडचणीची बाब होती. तसेच परकीयांविरुद्ध कडक उपाय योजल्यास इतर राजसत्तांशी वाकडे येण्याचीही शक्यता होती. म्हणूनच इंग्लिश मर्चन्ट ॲडव्हेन्चरर्सचे इंग्लंडच्या राजापाशी सुरुवातीला फारसे चालले नाही. परंतु इंग्लिश मर्चन्ट ॲडव्हेन्चरर्सनी नेट लावला आणि १५३४ मध्ये व्हेनिसवासियांच्या सवलती गेल्या. त्यानंतर सहा वर्षांनी हॅन्शिॲटिक लीगने राजाकडे तक्रार केली, " हॅन्सच्या व्यापाऱ्यांची माणसे आणि मालमत्ता यावर कुठल्याही प्रकारचा कर लादण्यात येणार नाही असे वचन महाराजांनी आजपर्यंत सवलती देताना दिले होते... ते विसरून लंडनचे फुलर्स आणि शीअरमेन

यांच्या फायद्याखातर आता हॅन्सच्या कोणत्याही व्यापाऱ्याने इंग्लंडच्या राज्यामधून कुठलेही कोरे कापडचोपड नेता नये असा हुकूमनामा काढण्यात आला आहे.... आणि तो न मानल्यास सदर मालावर जप्ती आणण्यात येईल असे म्हटले आहे."

हॅन्सचे व्यापारी इंग्लंडमधील लोकर विकत घेऊन तिचे कापड करण्यासाठी ती फ्लॅण्डर्स आणि जर्मनी या ठिकाणी पाठवत. त्या लोकरीची गरज असलेल्या इंग्लंड-मधील वाढत्या कापडउद्योगाने इंग्लिश मर्चन्ट ॲडव्हेन्चरर्सना साथ देण्याचे ठरवले. (राजाचे मंत्री असलेले रेशीम व्यापारी ग्रेशॅम यांच्या मदतीने) इंग्लिश कापडधंदेवाले आणि इंग्लिश मर्चन्ट ॲडव्हेन्चरर्स यांनी एकत्रितपणे बाजी जिंकली. जर्मन हॅन्सच्या सवलती हळूहळू कमी करण्यात आल्या आणि एके काळी शक्तिशाली असलेल्या हॅन्सची लंडनमधील 'स्टीलयार्ड' ही वखार, अखेर १५९७ मध्ये बंद पाडण्यात आली.

शेती करणारा शेतकरी, आपला व्यवसाय करणारा कारागीर आणि शांततेने व सुरळीत-पणे व्यापार करू इच्छिणारा व्यापारी यांनी अनेकांच्या जागी एकता आणणाऱ्या, अनेक स्थानिक नियमांच्या जागी एकच सर्वांगीण नियमन प्रस्थापित करणाऱ्या शक्तिशाली केंद्रीय शासनव्यवस्थेचे स्वागतच केले. राष्ट्रीयत्व निर्माण करणाऱ्या अनेक कारणांमधून राष्ट्रीयत्वाची भावना जन्माला आली. जोन ऑफ आर्कचे जीवन, लढा आणि मृत्यू याद्वारे याचे चांगले चित्रण करण्यात आले आहे. फ्रान्समध्ये अमीर-उमराव विशेषच शक्तिशाली होते. इग्लंडबरोबरच्या 'शंभर वर्षांच्या युद्धामध्ये' त्यांच्यामधील सर्वांत वजनदार असणाऱ्या बर्गंडीच्या ड्यूकने इंग्रजांशी हातमिळवणी केली आणि फ्रेंच राजाला अनेक जबरदस्त पराभव पत्करावे लागले. बर्गंडी हा फ्रान्सचा भाग असावा असे वाटणाऱ्या जोनने ड्यूकला लिहिले, "जीन द मेडची अशी इच्छा आहे की फ्रान्सच्या राजाबरोबर आपण सलोखा करावा... फ्रान्सच्या राजाशी यापुढे युद्ध न करण्याची मी आपल्याला अत्यंत विनम्रपणे विनंती करीत आहे."

फ्रेंच सैनिकाला आपण फ्रान्सचे नागरिक आहोत असा विश्वास देण्याच्या कामगिरी-मध्ये, तसेच राजाचे ध्येय हे सर्व फ्रेंच लोकांचे ध्येय बनविण्यामध्ये जोनचा वाटा मोठा होता. फ्रान्सच्या ध्येयासाठी तिने स्वतःप्रमाणेच अनेकांना वेडेपिसे करून सोडले. "फ्रेंच रक्त सांडलेले पाहून माझ्या अंगावर भीतीने काटा उभा राहातो" अशी जोनची स्फूर्तिदायक वचने ऐकल्यावर एखाद्या सरंजामदाराच्या सेवेतील सैनिक आपल्या धन्याच्या पलीकडे विचार करायला लागून, फ्रान्स हा माझा देश आहे अशी भावना त्याच्यामध्ये निर्माण व्हावी यात नवल ते काय ? अशा रीतीने प्रांतिकतेच्या जागी राष्ट्रीयता आली आणि सर्वंकष राजसत्तेचा अधिपती असलेल्या सर्वशक्तिमान राजाचा कालखंड सुरू झाला.

राष्ट्रवादाच्या या वाढत्या जाणिवेबद्दल बर्नार्ड शॉ यांच्या सेंट जोन या सुंदर नाटकामध्ये एक महत्त्वाचा उतारा आहे. एक इंग्लिश उमराव आणि एक इंग्लिश धर्मोपदेशक एका फ्रेंच सरंजामदाराच्या लष्करी कुवतीबद्दल चर्चा करीत आहेत असा हा प्रवेश :

"धर्मोपदेशक : महाराज, तो फक्त एक फ्रेंच माणूस आहे.

" उमराव : एक फ्रेंच माणूस ? हा शब्द तुम्ही कुठून उचललात ? आपले लोक जसे स्वतःला इंग्लिशमेन म्हणवून घेऊ लागलेत तसेच हे बर्गंडी, ब्रेटन, पिकार्ड आणि गॅस्कोनचे रहिवासीदेखील स्वतःला फ्रेंचमेन म्हणवून घ्यायला लागले आहेत की काय ? फ्रान्स आणि इंग्लंड हे त्यांचे देश असल्याप्रमाणेच ते बोलतात. म्हणे त्यांचा देश ! अशी वृत्ती प्रचलित झाली तर तुमच्याआमच्यासारख्यांचे काय होणार ?

" धर्मोपदेशक : महाराज, का बरे ? आपल्याला त्याने काही धोका आहे का ?

" उमराव : माणसे कधीही दोन मालकांची सेवा करीत नाहीत. आपल्या राष्ट्राची सेवा करण्याचे हे खूळ एकदा का त्यांच्या डोक्यात शिरले की त्यांचे सरंजामदार आणि चर्च यांना खुंटीवर टांगून ठेवायला ते कमी करणार नाहीत. "

या दूरदर्शी उमरावाचे म्हणणे अर्थातच खरे होते. सर्वंकष राजाला आता फक्त एकच प्रतिस्पर्धी उरला होता आणि तो म्हणजे चर्च. एक ना एक दिवस या दोघांचे वाजणे अटळच होते. शासनसंस्थेचे दोन अधिपती असावेत या गोष्टीला राष्ट्रीय राजाधिपतींची मान्यता नव्हती. तसेच पोपने बळकावलेल्या सत्तेमुळे कोणाही उमरावापेक्षा चर्चसंस्था अधिक धोकादायी झाली होती. पोप आणि राजा यांचा अनेकदा खटका उडे. उदाहरणार्थ, धर्मोपदेशकाची एखादी जागा रिकामी झाली की बिशप किंवा ॲबटची नेमणूक कोणी करायची याबद्दल तंटा सुरू होई. याला महत्त्व होते. कारण या पदांना भरपूर वेतन मिळे. हा पैसा अर्थातच चर्चला कर भरणाऱ्या सामान्यजनांकडून येई. या पदाशी पैशाचा घनदाट संबंध होता आणि म्हणूनच आपल्या अनुयायांना तो पैसा मिळावा असे राजा आणि पोप या दोघांनाही वाटे. या पैसा कमावणाऱ्या जागांवर राजांचा डोळा होता आणि म्हणूनच नेमणुका करण्याच्या पोपच्या अधिकाराबद्दल त्यांनी वाद उकरून काढायला सुरुवात केली.

चर्चकडे भरपूर संपत्ती होती. सर्व जमिनीचा दुसरा ते तिसरा हिस्सा जमीन चर्चकडे होती असा अंदाज आहे. तरीही राष्ट्रीय शासनाला कर भरायला चर्च-संस्थेचा नकार होता. राजांना पैशाची गरज होती. अशा स्थितीत आधीच मोठ्या प्रमाणावर असलेली आणि सतत वाढणारी चर्चची संपत्ती राज्यकारभाराच्या खर्चासाठी उपयोगात आणावी असे त्यांना वाटे.

काही खटले नेहमीच्या न्यायालयात न चालवता चर्चच्या न्यायालयात चालवण्यात येत. हा आणखी एक वादाचा मुद्दा होता. अनेक वेळा राजाच्या न्यायासनाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध चर्चचे न्यायासन निर्णय देई. दंड आणि लाच यामधून मिळणारा पैसा चर्चला मिळावा की शासनाला मिळावा यामधून निर्माण होणारा वादही महत्त्वाचा होता.

त्याचप्रमाणे एखाद्या राष्ट्राच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ करण्याचा पोपला बहाल केलेला अधिकार आणखी एक अडचण निर्माण करी. अशा तऱ्हेने चर्चसंस्था ही शासकीय अधिसत्तेची राजकीय प्रतिस्पर्धी संस्था होती.

जमीन आणि पैसा यांची गडगंज धनसंपदा असलेली, राजाच्या प्रजाजनांचे इमान विभागणारी ही एक राष्ट्रातील सत्ता होती. त्या संपत्तीपासून मिळणारे उत्पन्न राजाच्या

खजिन्यामध्ये जमा होण्याऐवजी देश सोडून रोमला खंड म्हणून जात असे. चर्चला विरोध करणारा एकटा राजाच नव्हता. पोप आठवा बॉनिफेस यांनी १२९६ मध्ये स्वतःच लिहून ठेवले आहे : " सामान्य माणसे धर्मगुरूंच्या कडव्या विरोधात आहेत ही परंपरागत बाब आहे आणि आधुनिक काळाच्या अनुभवावरून हे अधिकच स्पष्ट झाले आहे. "

चर्चने केलेले अनेक अत्याचार लोकांच्या नजरेतून सुटणे कठीणच होते. चर्चचा उपदेश आणि करणी यामधील फरक महामूर्खालाही कळावा इतका ठसठशीत होता. येनकेन प्रकारेण पैसा मिळवण्यावर चर्चने दिलेला भर सर्वांच्याच लक्षात आला होता. नंतर पोप दुसरा पायस् झालेल्या एनेस सिल्व्हियस्नी लिहिले आहे : " रोममध्ये पैशा-शिवाय काहीएक मिळत नाही. " आणि चॉसरच्या काळातील पिएर बरक्वारनी लिहिले आहे : " गरीब माणसांकरता चर्चचा पैसा खर्च होत नाही, तर धर्मगुरूंचे लाडके भाचे-पुतणे आणि परिवार यांच्यावर तो खर्च होतो. "

चौदाव्या शतकामध्ये र्मगुरूंच्याबद्दल समाजात धवरपासून खालपर्यंत सर्वसामान्य भावना काय होती हे एका शाहिराच्या रचनेमधून स्पष्ट झाले आहे :

करतो विश्वासघात धर्मगुरू पवित्र ठेव्याचा
नेहमीच असते श्रीमंतांवर त्याची मेहेरनजर
आणि राहातात वंचित गोरगरीब
संपत्ती जमा करण्यासाठी धडपडणारा धर्मगुरू !
सोनेरी वस्त्रे पांघरता यावीत म्हणून
येशूच्या मुलांना डोळे मिटून
आज्ञा पाळण्यास लावणारा धर्मगुरू !....

सन्मान्य धर्ममार्तंड नसे यापेक्षा निराळा
रात्रंदिन प्रत्येकाबरोबर
घाणेरडी सौदेबाजी करण्यातच
जातो त्यांचा वेळ ...

लोळत असतात ते अशान्त पापात
बळकावण्यासाठी आपल्याच धर्मबंधूंची संपत्ती
सोलून काढतात त्यांची कातडी निर्दय होऊन
सोने देऊन मिळवू शकाल तुम्ही
त्यांचा मोहोरबंद शिक्का कोणत्याही लेखी करारावर
चौर्यकर्मापासून त्यांना परावृत्त करू शकणारा फक्त परमेश्वर.

परमेश्वरसाक्ष,
आहेत धर्मप्रसारक आणि पुजारी अगणित
ज्यांची कर्मे, जीवन आणि शिकवण आहे विसंगत
असोत शिक्षित वा अशिक्षित असतात ते दंग
धार्मिक विधींचा व्यापार करण्यात
तरीही सुटत नाही त्यातून प्रार्थनेतील पवित्र त्याग...

संन्यासी आणि धर्मप्रसारक
करतात बडेजाव कर्मठ नियमांचा
पण ते तर नुसते फालतू ढोंग
घेतलेल्या शपथा बाजूला ठेवून
ऐष करणे हाच त्यांचा नियम... साचा
बाकी सारा नुसता देखावा संयमाचा...

१५१७ मध्ये विट्टेनबर्ग येथील चर्चच्या दरवाजावर मार्टिन ल्यूथरनी त्यांचे "पंचाण्णव सिद्धान्त" कोरले. त्यापूर्वी शेकडो वर्षे चर्चचे अत्याचार आणि लफडी-कुलंगडी ही सर्वसाधारणपणे लोकांना ठाऊक झाली होती. प्रॉटेस्टंट रिफॉर्मेशनच्या पूर्वी धर्मसुधारक झाले होते. मग याच वेळेला पश्चिम कॅथॉलिक चर्चमध्ये तट पडून एकाच सार्वत्रिक चर्चऐवजी राष्ट्रीय चर्चेसची स्थापना का झाली?

ल्यूथर, कॉल्व्हिन आणि नॉक्स यांच्याव्यतिरिक्त आधीच्या धार्मिक सुधारकांनी धर्मा-व्यतिरिक्त अधिक गोष्टी सुधारण्याची चूक केली होती. इंग्लंडमध्ये शेतकऱ्यांच्या बंडाचा वायक्लिफ् हा पारमार्थिक नेता होता. तसेच बोहेमियामधील हूसने केवळ रोमलाच विरोध दर्शविला नाही, तर सरंजामदारांची शक्ती आणि त्यांचे अधिकार यांना आव्हान देणाऱ्या कम्युनिस्ट धर्तीच्या शेतकऱ्यांना चळवळीला त्याने प्रेरणा दिली. याचा अर्थ या चळवळींना केवळ चर्चसंस्थेनेच नव्हे तर उमराव-सरंजामदारांनीही विरोध केला आणि त्या चिरडून टाकण्यात आल्या. पण ल्यूथर आणि त्यांच्यानंतरच्या धर्मसुधारकांनी समानतेच्या धोकादायक तत्त्वांचा उद्घोष करून सत्ताधारी वर्गाचा पाठिंबा घालवला नाही. ल्यूथर काही आमूलाग्र सुधारणा करू इच्छिणाऱ्यांपैकी नव्हते. पीडित लोकांची बाजू घेऊन त्यांना आपल्या यशाची शक्यता मातीस मिळवायची नव्हती. याउलट, त्यांच्या सुधारणा-नंतर, थोड्याफार प्रमाणात त्यांच्याच शिकवणीमुळे जेव्हा जर्मनीमध्ये शेतकऱ्यांचा व्यापक उठाव झाला तेव्हा तो चिरडून टाकण्यास त्यांनीच मदत केली. चर्चविरुद्ध बंडाचे निशाण उभारणारा हा बंडखोर असे म्हणू शकत असे: "बंडाचा निषेध करणाऱ्यांचीच मी नेहमी बाजू घेईन आणि बंड करणाऱ्यांविरुद्ध उभा राहीन." चर्चच्या वाढत्या प्रभावामुळे संतापणारा हा सुधारक असे लिहू शकत असे: "जमावाच्या कितीही न्याय्य असलेल्या उठावापेक्षा कितीही वाईट असलेले प्रस्थापित सरकार सहन करणेच देवाला अधिक आवडेल." १५२५ साली बंडखोर शेतकरी जेव्हा गर्जत होते की,

" ख्रिस्ताने सर्व माणसांना सारखे मानले आहे ", तेव्हा त्यांना ठार मारण्यासाठी सरंजामदारांना उत्तेजन देणाऱ्या ल्यूथरचे शब्द होते : " दंगा करणाऱ्यांना जो मारतो तो योग्यच काम करतो... म्हणूनच ज्याला शक्य आहे त्याने उघडउघड किंवा गुप्तपणे दंगेखोरांचा गळा घोटला पाहिजे. त्यांना भोसकले पाहिजे ... या लढ्यामध्ये तुम्ही कामी आलात तर तुमचा गौरवच केला पाहिजे. कारण यापेक्षा उदात्त मरण कोणालाच मिळणे शक्य नाही. "

सत्ताधाऱ्यांना आव्हान देण्याचा प्रयत्न करण्याची चूक ल्यूथरने केली नाही हे त्यांच्या यशाचे आणखी एक कारण आहे. त्याकाळी ज्या सुधारणा झाल्या. त्या त्याच काळात होण्याचे आणखी एक कारण म्हणजे ल्यूथर, कॅल्व्हिन आणि नॉक्स यांनी लोकांमधील राष्ट्रवादाच्या भावनेला आवाहन केले होते आणि राष्ट्रवादाच्या भरभराटीचा तो काळ होता. रोमच्या धार्मिक सत्तेला असलेला हा विरोध, विकसित होणाऱ्या राष्ट्रीय शासन-संस्थेच्या हितसंबंधांशी मिळताजुळता असल्यानेच तो यशस्वी होण्याची शक्यता होती.

धार्मिक सत्तेविरुद्ध राष्ट्रीय शासनसत्तेचा चाललेला लढा जेव्हा अधिकाधिक तीव्र होत होता तेव्हा ल्यूथरनी जर्मन अमीर उमरावांना पाठवलेल्या संदेशामध्येपुढील आल्हाददायक सांगावा होता : " चांगल्याच्या संरक्षणासाठी आणि वाईटाच्या विनाशासाठी देवाने आपल्याला ऐहिक सत्ता दिली असल्यामुळे सर्व ख्रिश्चन समाजाने तिचा उपयोग केला पाहिजे. तसेच तसा उपयोग करताना शासित व्यक्ती पोप आहे, बिशप आहे, धर्मगुरू आहे की नन् आहे याचा विचारही केला जाऊ नये. " त्याचप्रमाणे परकीयांच्या हातातून सूत्रे काढून घेणे म्हणजेच चर्चच्या जमिनी आणि खजिने जप्त करणे हा देखील त्या कर्तव्याचाच एक भाग आहे, असेही त्याने धूर्तपणे सुचविले. हा शेवटचा मुद्दा महत्त्वाचा आहे. " काही जणांना वाटते की प्रतिवर्षी जर्मनीहून रोमला तीन लाख गिल्डर्स [सोन्याचे नाणे] उगीचच पाठवले जातात....फार पूर्वी जर्मनीचे राजे आणि अमीर यांनी पोपला जर्मनीच्या भूप्रदेशावर इस्टेटी करण्याचा हक्क दिला आणि सर्व इस्टेटींच्या मिळकतीचा अर्धा हिस्सा चर्चला मिळू लागला...आणि तेव्हापासून अत्यंत निर्लज्जपणे या इस्टेटींची नासाडी केली जात आहे... आपल्या जनतेला देण्यात येणारी निर्दय वागणूक आणि आजवर चाललेली इस्टेटींची धूळधाण उमरावांनी सहन करू नये. राजकीय किंवा राष्ट्रीय कायद्याच्या बडग्याने त्यांनी या इस्टेटी राष्ट्रात सामावून घ्याव्यात किंवा पार निकालात तरी काढाव्यात "

त्यांच्या स्वतःच्याच देशामध्ये त्यांच्या सत्तेला आव्हान देणाऱ्या शक्तिमान परकीयांना हाकलून देणे हा त्यांचा केवळ हक्क नव्हे तर कर्तव्यच आहे असे काही लोकांना सांगा; त्या परकीयांना हाकलून देण्याचे बक्षीस म्हणून परकीयांची प्रचंड संपत्ती त्या लोकांच्या-समोर गाजरासारखी नाचवा – आणि मग काय, सुसाट धूमधडाका ! प्रॉटेस्टंट सुधारणा ज्या वेळेला आल्या त्या वेळी त्या आल्या नसत्या तर चर्चच्या हातून सत्ता पूर्णपणे निघून गेली असती. वास्तविक पाहता चर्चसंस्थेची उपयुक्तता कमी झाल्याने आधीच तिची सत्ता बऱ्याच प्रमाणात कमी झाली होती. पूर्वी सरंजामी युद्धांमधून सुटकेचा निश्वास

टाकण्यासाठी समाजाला चर्चचा उपयोग होत होता आणि ' देवाच्या न्यायाने ' चर्चची सत्ता चालत होती. परंतु आता अशी युद्धे थांबवायला राजा समर्थ होता. पूर्वी शिक्षणाची सूत्रे पूर्णपणे चर्चच्या हाती होती तर आता व्यापाऱ्यांनी सुरू केलेल्या स्वतंत्र शाळा अस्तित्वात आल्या होत्या. पूर्वी चर्चचा कायदा सर्वोच्च असे, तर आता व्यापारी समाजाला योग्य अशा रोमन कायद्याची पुनर्स्थापना करण्यात आली होती. शासन-यंत्रणेचा कारभार चालवण्यासाठी लागणारी सुशिक्षित माणसे पूर्वी केवळ चर्च पुरवू शकत असे तर आता व्यापारी व्यवहारांमध्ये तयार झालेल्या आणि राष्ट्राचा व्यापार आणि उद्योग यांची गरज समजू शकणाऱ्या नव्या वर्गावर राजा अवलंबून राहू शकत होता.

या नव्या गटाला, उगवत्या मध्यमवर्गाला त्याच्या विकासाच्या वाटेमध्ये कालबाह्य सरंजामी व्यवस्था उभी आहे असे दिसले. त्या सरंजामी तटबंदीचा एक महत्त्वाचा बुरूज असलेले कॅथॉलिक चर्च आपल्या प्रगतीच्या आड येत आहे हे मध्यमवर्गाला कळून चुकले. या मध्यमवर्गाच्या हल्ल्यापासून सरंजामी व्यवस्था वाचविण्याचा चर्चचा प्रयत्न होता. चर्चसंस्था ही सरंजामी व्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंग होती. सरंजामी उमरावांप्रमाणे सुमारे तिसरा हिस्सा जमीन चर्चच्या ताब्यात होती आणि देशाच्या संपत्तीचा बराच मोठा भाग लुटीच्या रूपाने तिच्याकडे येत होता. प्रत्येक वेगवेगळ्या देशांमध्ये सरंजामी व्यवस्था समूळ उपटून टाकण्यापूर्वी चर्च या केंद्रीय संघटनेवर हल्ला करणे उगवत्या मध्यमवर्गाच्या दृष्टीने आवश्यक होते आणि त्याने तसेच केले.

या लढ्याने धार्मिक बुरखा घेतला. ' प्रॉटेस्टंट सुधारणा ' [प्रॉटेस्टंट रिफॉर्मेशन] असे त्याला म्हणण्यात आले. त्याचा गाभा लक्षात घेता, सरंजामशाहीविरुद्ध उगवत्या मध्यमवर्गाचा हा पहिला निर्णायक लढा होता.

◊ ◊ ◊

८

श्रीमंत माणूस

३१ जानेवारी १९३४ रोजी दुपारी ३ वाजून १० मिनिटांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी डॉलरमधील सोन्याचा अंश २५·८ वरून १५·४२ वर आणावा असा आदेश दिला. तेव्हा एका जुन्याच स्पॅनिश रूढीचा ते उपयोग करत होते. जुन्या काळी इंग्लिश, फ्रेंच आणि जर्मन लोकांमध्येही अशी रूढी प्रचलित होती. चलनाचे अवमूल्यन करणे ही शेकडो वर्षांची जुनी पद्धत आहे. मध्ययुगीन काळातील राजांना जेव्हा परीस हवा असे परंतु तो मिळण्याची शक्यता नसे, तेव्हा सोने मिळवण्याला पर्याय म्हणून चलनाचे अवमूल्यन केले जाई.

डॉलरमधील सोन्याचा अंश राष्ट्राध्यक्ष रूझव्हेल्टनी कमी केला तेव्हा किंमती वाढविणे हा त्यांचा मुख्य हेतू होता. या अवमूल्यनामुळे अमेरिकेच्या खजिन्यात २७९ कोटी डॉलर्सची भर पडली ही एक योगायोगाची बाब होती. परंतु मध्ययुगीन काळातील राजांच्या बाबतीत मात्र असा नफा मिळविणे हाच अवमूल्यनाचा प्रमुख उद्देश असे. त्यांना किंमती वाढवायच्या नसल्या तरीही अवमूल्यनामुळे त्या वाढत.

चलनाचे अवमूल्यन म्हणजे काय? राजाला त्यातून तत्काळ नफा कसा होतो? किंमतीची पातळी त्यामुळे कशी काय वाढते?

अवमूल्यन याचा अर्थ नाण्यामधील सोने किंवा चांदीचा अंश कमी करणे. एका नाण्यामधील चांदी दोन नाण्यांमध्ये वाटून फारशी किंमत नसलेले धातू त्यात मिसळल्यावर राजाकडे एका ऐवजी दोन नाणी होत. नाण्यांचे दर्शनी मूल्य तेच राही. त्याला क्राऊन किंवा लिव्हरच म्हणत, पण प्रत्यक्षात त्याची किंमत पूर्वीपेक्षा निम्मी झालेली असे. जर बारा अंड्यांच्या बदल्यामध्ये एक पाव मिळत असेल तर सहा अंडी देऊन—त्या सहा अंड्यांना कोणी एक डझन म्हणाले तरीही—त्याच आकाराचा पाव मिळणे शक्य नाही. त्याचप्रमाणे अवमूल्यित पैशाने जुन्या पैशाइतक्याच वस्तू मिळणे शक्य नव्हते. दुसऱ्याला कमी चांदी दिल्यास त्या बदल्यात मिळणारा पावाचा तुकडा अर्थातच छोटा असणार. चलनामध्ये असलेल्या नाण्यांचे मूल्य त्यामध्ये असलेल्या धातूच्या मूल्यावर अवलंबून असे आणि नाण्याचे नाव कायम ठेवले तरीही जर त्यात चांदी वा सोने कमी असेल तर

त्याचे मूल्य कमीच असणार. नाण्याचे मूल्य कमी आहे याचा अर्थ त्याने कमी वस्तू खरेदी करता येतील. म्हणजेच वस्तूंच्या किंमती वाढतील.

अर्थात, चलनाच्या अवमूल्यनामुळे तात्काळ नफा होई. एवढीच गोष्ट राजांच्या दृष्टीने महत्त्वाची होती. पैशाचे मूल्य झटकन् बदलले की व्यापाराला धक्का बसतो, किंमती वाढल्या की गरीब माणसे आणि स्थिर वेतनदारांचे नुकसान होते, या सर्व गोष्टींना राजाच्या दृष्टीने फारशी किंमत नसली तरीही काही प्रजाजनांच्या दृष्टीने त्याला फार महत्त्व होते. चलनाचे अवमूल्यन आणि भाववाढ यातील नाते राजा धरून बहुतेक सर्व लोकांच्या ध्यानात येत नसे. पण काही जणांना मात्र ते ठाऊक होते. ऑक्टोबर १३५८ पासून मार्च १३६० पर्यंत फ्रान्समध्ये चांदीच्या नाण्यात सतरा वेळा बदल झाले तेव्हा एका पॅरिसवासियाने लिहिले : " सोने आणि चांदीच्या अतीव अवमूल्यनामुळे अन्नधान्य आणि दैनंदिन गरजेच्या इतर वस्तू इतक्या महाग झाल्या आहेत की सामान्य लोकांना हातातोंडाची मिळवणी करणे मुश्कील झाले आहे. "

१३७७ साली लिस्यूचे बिशप निकोलास ऑरेझ्म यांनी चलनासंबंधी एक प्रसिद्ध पुस्तक लिहिले. राजाला तापुरता नफा मिळवून देणारे चलनाचे अवमूल्यन हे एका दृष्टीने लोकांना फसवण्यासारखे आहे हे त्यांनी दाखवून दिले : " गहू, वाइन आणि इतर सर्वसाधारण वस्तूंच्या मापावर राजाचा नागरी शिक्का असतो आणि त्यामध्ये गफलत करणाऱ्या कोणाही माणसाची लबाड म्हणून नामुष्की होते. त्याचप्रमाणे एखाद्या नाण्यावर मारलेला शिक्का त्याचे वजन आणि दर्जा दाखवतो. मग स्वतःचाच शिक्का असलेल्या नाण्याचे वजन किंवा दर्जा कमी करणाऱ्या राजावर कोण विश्वास ठेवेल ? माझ्या मते पैशाच्या नैसर्गिक उपयोगाखेरीज त्यापासून नफा मिळवण्याच्या तीन पद्धती आहेत. पहिली म्हणजे पैशाच्या विनिमयाची कला, दुसरी म्हणजे जबरदस्त व्याज-आकारणी आणि तिसरी म्हणजे पैशाचे मूल्यच बदलणे. पहिली योग्य आहे. दुसरी वाईट आहे आणि तिसरी सर्वात वाईट आहे. "

जवळपास चारशे वर्षांनंतर रिचर्ड कॅन्टिलॉन या इंग्रज माणसाने चलनाच्या अवमूल्यनाचा किंमतीवर होणारा परिणाम सारांशरूपाने व्यवस्थितपणे सांगितला आहे : " जेव्हा जेव्हा राजांनी पैशाची दर्शनी किंमत कायम ठेवून त्याचे अवमूल्यन केले तेव्हा तेव्हा सर्व प्रकारचा कच्चा माल आणि उत्पादित वस्तू यांच्या किंमती अवमूल्यनाच्या प्रमाणात वाढल्या असे इतिहास दाखवितो.

पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा सिद्धान्त १५३० साली प्रथमच मांडणारे पोलंडचे महान शास्त्रज्ञ म्हणून कोपर्निकसचे नाव सर्वांनाच ठाऊक आहे. पण ते अर्थशास्त्राचेही अभ्यासक होते हे फारच थोड्या लोकांना ठाऊक आहे. त्यांनी पोलंडची नाणेपद्धती बदलावी असा सल्ला दिला. वेगवेगळी चलने व्यापाऱ्याला अडथळा निर्माण करतात, त्यामुळे अनेक छोट्यामोठ्या सरदारांना नाणी पाडू देण्याऐवजी केंद्रीय नाणेपद्धती असावी हे त्यांनी सुचवले. तसेच सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे चलनाचे अवमूल्यन करू नये असे त्यांचे ठाम मत होते : " परगणे, राज्ये, प्रजासत्ताके यांच्या विनाशाला कारणीभूत

होणाऱ्या आपत्ती अनेक असल्या तरीही माझ्या मते सर्वात धोकादायक असलेल्या चार गोष्टी म्हणजे झगडा, प्लेग, नापीक जमीन आणि पैशाचे अवमूल्यन." चलनाच्या अवमूल्यनाला या अभ्यासकांचा विरोध असण्याची काही महत्त्वाची कारणे ऑरेझमनी दिली आहेत : "स्वतःच्या राज्यामधील चलनाचे मूल्य अनिश्चित असणे आणि प्रतिदिनी ते बदलणे ही गोष्ट राजाला लांछनास्पद आहे... या बदलामुळे प्रत्येक वेळी सोन्याच्या किंवा चांदीच्या नाण्याचे मूल्य काय असेल हे सांगणे कठीण होऊन बसते आणि त्यांच्या चीजवस्तूंप्रमाणेच त्यांच्या पैशाचाही त्यांना सौदा करावा लागतो. हे अनैसर्गिक आहे. ज्या गोष्टीची निश्चिती अत्यावश्यक आहे तीच गोष्ट अनिश्चित आणि गोंधळाची झाली... तर अशा बदलांमुळे आणि अवमूल्यनामुळे त्या राज्यातील सोने आणि चांदी कमी होते आणि कितीही खबरदारी घेतली तरी, ज्या ठिकाणी त्यांची अधिक किंमत मिळते त्या ठिकाणी ती नेली जाते...म्हणून ज्या देशांमध्ये अवमूल्यनाची पद्धत अवलंबितात त्या देशातील मौल्यवान धातूचा पुरवठा कमी होतो... शिवाय असे बदल आणि अवमूल्यन यामुळे अशा देशांमध्ये परकीय देशांमधून व्यापारी त्यांचा माल अशा देशांमध्ये घेऊन येणे बंद होते.... ज्या देशांमध्ये अशा तऱ्हेचा हलका पैसा चलनात असतो आणि त्याचप्रमाणे जेथे असे बदल घडतात त्या देशाच्या व्यापारात खंड पडतो कारण कारागीर आणि व्यापारी यांना एकमेकांशी व्यवहार कसा करायचा हेच समजेनासे होते."

चलनअवमूल्यनाच्या या परिणामाची राजाच्या सल्लागारांना काळजी वाटत होती. व्यापाराची वाढ व्हावी असे त्यांना वाटत असल्यामुळे, व्यापारी आणि सावकर यांनी सोन्याचांदीची दुसऱ्या देशात निर्यात करून देशातील बहुमूल्य धातूचा पुरवठा आणखीनच कमी करणे त्यांना पसंत नव्हते. अस्थिर बाजारभावांमुळे सर्वसाधारणपणे गरीब माणसाचाच बळी जातो, कारण कामानेच तो इतका त्रासलेला असतो की स्वतःचे संरक्षण करण्यासाठी त्याच्यापाशी वेळ किंवा साधने यापैकी काहीच उपलब्ध नसते. याउलट अशा काळात पैशाचा व्यवहार करणारे सावकार स्वतःच्या संपत्तीची काळजी घेतात आणि वर नफासुद्धा कमावतात.

अनेक देशांमध्ये सोने आणि चांदी यांच्या निर्यातीवर बंदी घालणारे कायदे करण्यात आले, कारण व्यापारवाढीसाठी त्या धातूंची अतिशय गरज होती. इंग्लंडमध्ये १४७७ साली असा कायदा करण्यात आला : "सहाव्या हेन्रीच्या मृत्यूनंतर दुसऱ्या वर्षी, या राज्यातील सोने किंवा चांदी राज्याबाहेर नेण्यात येऊ नये असा कायदा करण्यात आला होता. या आणि अशाच अनेक कायद्यांचा भंग करून या देशातील सोन्या-चांदीची नाणी आणि मुद्रा व्यापारी वस्तू म्हणून या राज्यातून बाहेर नेण्यात येत आहेत. यामुळे या राज्याच्या खजिन्याची लूट होऊन तो रिकामा होत आहे आणि याबद्दल तत्काळ उपाय योजणे आवश्यक आहे. राजाच्या परवानगीशिवाय या देशाची किंवा इतर कोणत्याही देशाची वा राज्याची चलनी नाणी किंवा मुद्रा कोणत्याही माणसाला देशाबाहेर नेता येणार नाहीत."

केवळ देशातील सोन्याचांदीचा पुरवठा कायम ठेवण्याबद्दल उपाययोजना करून राजे

थांबले नाहीत तर कामगारांना विशेष सवलती देऊन तो पुरवठा वाढवण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. " आमच्या राज्यात चालू असलेल्या आणि पुढे उघडण्यात येणाऱ्या खाणीमध्ये सतत काम करणारे सर्व खाणकामगार-मालक-कारागीर आणि सर्वसाधारण कारागीर-यांना केवळ स्वखर्चाने खाणी शोधून त्यात काम करायला आमची परवानगी आहे आणि धर्मगुरू, सरदार, व्यापारी किंवा आमचेच अधिकारी यापैकी कोणीही त्या खाणींवर आपला अधिकार सांगून त्यांना त्रास देऊ नये. "

या काळात व्यापाराच्या वाढीसाठी सोन्याची आणि चांदीची अतिशय गरज होती. त्याचवेळी या धातूंच्या मोठ्या साठ्यांचा शोध लावण्यास व्यापाराची मदत झाली. त्यामुळे व्यापाराची अधिकच वाढ झाली. आज आपल्या चारशे वर्षांच्या अनुभवावरून आपण कोलंबसाच्या शोधाचे खरे महत्त्व समजू शकतो. पण भारत शोधण्यामध्ये कोलंबस यशस्वी झालेला नसल्याने पंधराव्या शतकातील लोकांच्या दृष्टीने तो अपयशीच ठरला. जेव्हा मेक्सिको आणि पेरूच्या खाणीमधून स्पेनकडे चांदीचा ओघ वाहू लागला तेव्हा सोळाव्या शतकामध्ये त्याच्या शोधाचे महत्त्व लोकांच्या ध्यानात आले.

पर्वत आणि वाळवंटांमधून घोडे, उंट आणि खेचरे यांच्या पाठीवरून हजारो मैलांवर वस्तू पाठवण्यात येणार असतील, प्रवासातील काही अंतर त्या वस्तू माणसांना पाठीवरून वाहाव्या लागणार असतील, मार्गावर जर घातकी टोळ्यांच्या हल्ल्यांचा सतत धोका असेल, सागरी मार्गामध्ये जर सतत भयंकर वादळे आणि खुनी चाच्यांचा धोका असेल, यापैकी कोणत्याही मार्गावर ठिकठिकाणची सत्ताधारी सरकारे करवसुली करणार असतील; प्रवासाच्या शेवटच्या टोकाला ज्यांची एकाधिकारशाही आहे अशा व्यापाऱ्यांच्या गटाला वस्तू विकाव्या लागणार असतील आणि आधीच्याच प्रचंड किंमतीवर ते आणखी मोठा नफा मिळणार असतील-तर त्या वस्तूंच्या किंमती गगनाला भिडणारच. पंधराव्या शतकामध्ये प्रचंड मागणी असलेल्या पूर्वेकडे येणाऱ्या वस्तूंच्या बाबतीत असाच प्रकार होऊ लागला. ज्या बंदरामध्ये व्हेनिसच्या बोटी माल चढविण्यासाठी वाट पाहात तेथे पोहोचेपर्यंत पूर्वेकडून येणारे मसाल्याचे पदार्थ, हिरे, माणके, औषधे, सुगंधी द्रव्ये आणि रेशीम यांची किंमत अफाट वाढलेली असे. युरोपमधील प्रमुख वितरक असलेल्या दक्षिण जर्मनीतील शहरांना व्हेनिसच्या लोकांनी तो माल विकल्यावर तर त्याच्या किंमती आकाशाला भिडत.

पूर्वेकडील व्यापाराचा प्रचंड नफा फक्त व्हेनिसच्या लोकांना मिळावा हे इतर देशातील व्यापाऱ्यांना मान्य नव्हते. त्यांना त्यामध्ये वाटा हवा होता. पूर्वेकडील व्यापारात पैसा मिळवणे शक्य होते हे त्यांना माहीत होते, पण व्हेनिसची एकाधिकारशाही त्यांना मोडता येत नव्हती. पूर्व भूमध्य समुद्र हा व्हेनिसचा खाजगी जलाशय होता आणि त्यामध्ये विहार करणे इतरांना शक्य नव्हते.

पण व्हेनिसचे वर्चस्व नसलेल्या दुसऱ्या एखाद्या मार्गाने भारताकडे पोहोचणे त्यांना शक्य होते. इटालियन खलाशांनी तेराव्या शतकामध्ये प्रथमच वापरलेल्या होकायंत्राचा वापर आता सार्वत्रिक झाला होता. तारका-उंचीमापन-यंत्र (ॲस्ट्रोलॅब) वापरून

अक्षांश ठरविणे आता शक्य झाले होते. इटालियन दर्यावर्दींनी प्रत्यक्ष पाहणीवर आधारित नकाशे करण्यास सुरुवात केली होती आणि पूर्वीप्रमाणे ऐकीव माहिती आणि कल्पनाशक्ती यावर ते आता अवलंबून राहात नव्हते. त्यामुळे अखेर आता अगदी किनाऱ्यालगत प्रवास करणे जरुरीचे राहिले नव्हते. हिंमत असेल तर मसाल्याचे पदार्थ, सोने आणि हिरे-माणके यांचे प्रचंड भांडार असलेल्या पूर्वेकडे जाण्याचा नवा मार्ग शोधणे लोकांना शक्य होते.

यामुळे सर्व दिशांनी नौका निर्भयपणे विहार करू लागल्या. कोलंबसाचे पश्चिमेकडील नौकानयन हे अशा अनेक प्रवासांपैकी केवळ एक होते. पूर्वेकडील देशांकडे जाण्यासाठी ईशान्य दिशेचा मार्ग शोधण्याच्या आशेने काही धाडसी खलाशांनी उत्तरेकडे म्हणजे आर्क्टिक समुद्राकडे त्यांचा होरा वळविला, तर काहीजण आफ्रिकेच्या किनाऱ्याने दक्षिणेकडे वळले. अखेर १४९७ मध्ये आफ्रिका खंडाला वळसा घालून या आग्नेय दिशेच्या मार्गाने वास्को-द-गामा यांनी १४९८ मध्ये भारतामधील कालिकत बंदरामध्ये नांगर टाकला. भारताकडे जाण्याचा पूर्णपणे सागरी मार्ग आता सापडला होता.

याचा अर्थ इतर दिशांकडील शोध थांबविण्यात आला का? मुळीच नाही. कोलंबसाने पुनः पुन्हा प्रयत्न केले—अमेरिका खंडाचा अडथळा पार करून जाण्यासाठी त्याने वारंवार सफरी केल्या. पश्चिमेकडील मार्गाने जाणाऱ्यांना तोच अडथळा आला आणि त्यांनी उत्तरेकडे प्रयाण केले तर काहींनी दक्षिणेकडे नजर वळविली, शोध अखंड चालूच होता. अगदी १६०९ सालीदेखील हेन्री हडसन पूर्वेकडे जाण्याचा मार्ग शोधतच होते.

तसे होणे स्वाभाविकच होते. पूर्वेकडील मार्गावर अपार धनसंपत्ती होती. वास्को-द-गामा यांच्या पहिल्या भारत सफरीचा नफा होता ६,००० टक्के! मग इतर दर्यावर्दींनी तो खडतर पण लाभदायक प्रवास केला यात नवल ते काय? पाहाता पाहाता व्यापारात प्रचंड वाढ झाली. व्हेनिसने इजिप्तच्या सुलतानाकडून दरवर्षी ४ लक्ष २० हजार पौंड मिरी आणली होती, तर आता मायदेशी परतणाऱ्या, पोर्तुगालच्या एकाच बोटीमध्ये दोन लक्ष पौंड मिरी होती! पूर्वेकडच्या जुन्या मार्गावर तुर्कांनी कबजा मिळविला होता तरी आता काही बिघडत नव्हते; व्हेनिसवासियांनी आकाशाला भिडणाऱ्या किंमती मोजायला लावल्या तरी हरकत नव्हती; कारण केप ऑफ गुड होपवरून पूर्वेकडे जाणाऱ्या मार्गामुळे तुर्कांची सिनाजोरी आणि व्हेनिसच्या लोकांची एकाधिकारशाही यापासून व्यापाऱ्यांना स्वातंत्र्य मिळाले होते.

व्यापाराच्या प्रवाहांची दिशा आता बदलली होती. पश्चिमेकडील देशांना न मिळणारे फायदे पूर्वी व्हेनिस आणि दक्षिण जर्मन शहरांना त्यांच्या भौगोलिक स्थानामुळे मिळाले होते, तर आता अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील देशांना ते मिळू लागले. व्हेनिस आणि त्याला व्यापारीदृष्ट्या जोडलेली इतर शहरे आता व्यापाराच्या मुख्य मार्गापासून दूर होती. पूर्वीचा व्यापारी हमरस्ता आता गल्लीबोळ झाला होता. अशा रीतीने अटलांटिक महासागर हा नवा हमरस्ता झाला आणि पोर्तुगाल, स्पेन, हॉलंड,

इंग्लंड आणि फ्रान्स हे देश व्यापारीदृष्ट्या नावारूपाला आले.

इतिहासामध्ये या काळाला " व्यापारी क्रांतीचा " काळ म्हणतात ते योग्यच आहे. आपण आधी पाहिल्याप्रमाणे जो व्यापार पूर्वी पायरीपायरीने वाढत होता, त्याने आता हनुमान उडी घेतली. आता साहसी व्यापाऱ्यांना युरोप आणि आशियाचे काही भाग एवढे जुने जगच उपलब्ध नव्हते तर आफ्रिका आणि अमेरिकेचे नवे जगही त्यांना गवसले होते. नद्या आणि भूभागाने बंदिस्त अशा भूमध्य आणि बाल्टिक समुद्रापर्यंत आता व्यापार मर्यादित राहिला नव्हता. पूर्वी आशियाच्या काही भागांबरोबर चालणाऱ्या युरोपच्या व्यापाराला " आंतरराष्ट्रीय व्यापार " म्हणत. तर, आता तेच नाव चारही खंडांचा समावेश असलेल्या आणि महासागरी मार्ग हे हमरस्ते असलेल्या एका विस्तृत प्रदेशातील व्यापाराला देण्यात आले. पश्चिम युरोपच्या आर्थिक जीवनाचा महाकाय विस्तार करणारा काळ या शोधांनी सुरू झाला. बाजारपेठेच्या विस्तारामुळे आर्थिक व्यवहाराला नेहमीच उत्तेजन मिळत आले आहे. पूर्वी कधीही झाला नव्हता एवढा बाजारपेठेचा विस्तार या काळात घडून आला. व्यापार करण्यासाठी नवी ठिकाणे, आपल्या देशाचा माल विकण्यासाठी नव्या बाजारपेठा, मायदेशी आणण्यासाठी नवा माल—लागण लागल्याप्रमाणे पसरत जाणारा तो प्रकार होता. यामुळे प्रचंड व्यापारी व्यवहार, नवे शोध आणि सुधारणा यांचा काळ उदयास आला

या धोकादायक, पण रोमहर्षक आणि अतिशय लाभदायक संधीचा फायदा उठविण्यासाठी व्यापारी कंपन्या स्थापन करण्यात आल्या. या नव्या कंपन्यांपैकी एका अगदी सुरुवातीच्या आणि प्रसिद्ध कंपनीचे नाव पाहा. " अनोळखी बेटे, स्थाने, राज्ये आणि प्रदेश यांच्या शोधात असलेली साहसी व्यापाऱ्यांची कंपनी. " हे एकच नाव बरेच काही सांगून जाते. पण त्यामुळे खरी तर अर्धी कथाही पुरी होत नाही. एकदा का " शोध " लागला की तेथे किल्ला बांधावा लागे, अशा वखारीवर शिपायांची चौकी उभारावी लागे, स्थानिक लोकांशी करार करून प्रत्यक्ष व्यापार करावा लागे, परकीयांना व्यापारातून वगळण्यासाठी उपाय योजावे लागत – आणि त्या अनिश्चित व धोकादायक प्रवासासाठी अन्नधान्य आणि इतर सामग्री जमा करणे, नौका बांधणे, खलाशांना नोकरीवर ठेवणे यासारख्या जगड्व्याळ आणि खर्चिक पूर्वतयारीची तर गोष्टच वेगळी.

या सगळ्याला पैसा लागतो आणि तोसुद्धा अगदी भरपूर. एकट्या-दुकट्या माणसाकडे असू शकेल किंवा अशा धोकादायक कामासाठी खर्चाचा धोका पत्करायला तो तयार होईल त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त.

जुन्या पद्धतीचा व्यापार आणि त्याचे मार्ग यासाठी उपयुक्त असलेल्या व्यापारी संघटनांचे प्रकार नव्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी सोयिस्कर नव्हते. अनोळखी प्रदेशात, अनोळखी परिस्थितीत, अनोळखी माणसांबरोबर प्रचंड अंतर कापून व्यापार करण्यासाठी नव्या धर्तीच्या व्यापारी संघटना उदयास आल्या.

एखाद-दुसरा माणूस एकएकटा जी गोष्ट करू शकणार नाही तीच गोष्ट अनेक माणसांनी स्थापन केलेली परंतु एकत्र केंद्रीय व्यवस्थापन असलेली संघटना करू शकते.

अमेरिका, आफ्रिका आणि आशिया यांच्याबरोबर व्यापार करण्यासाठी लागणारा पैशाचा प्रचंड साठा कसा उपलब्ध करायचा या प्रश्नाला सोळाव्या आणि सतराव्या शतकांमध्ये व्यापाऱ्यांनी दिलेले उत्तर होते : समाईक भांडवल कंपनी (जॉइंट स्टॉक कंपनी). मर्चंट अॅडव्हेन्चरर्स ही पहिली इंग्लिश समाईक भांडवल कंपनी होती. तिचे २४० भागधारक होते आणि त्यांनी प्रत्येकी २५ पौंड दिले होते. त्या काळी ही मोठीच रक्कम होती. अशा रीतीने अनेक भागधारकांना भांडवलाचे भाग विकून मोठ्या प्रमाणावरील व्यापार आणि वसाहतवादी सफरी यांच्याकरता लागणारे भांडवल उभे केले जाई. अशा सामाईक भांडवल कंपन्या म्हणजे आजच्या प्रचंड कॉर्पोरेशनचे पूर्वजच होत. आजच्या-प्रमाणेच तेव्हाही जवळ पैसा असलेली कोणीही व्यक्ती भाग-भांडवल विकत घेऊन सामाईक भांडवल कंपनीची भागधारक होऊ शके. चाचेगिरीच्या सफरीसुद्धा सामाईक भांडवल पद्धतीने संघटित करण्यात येत ! स्पॅनिश लोकाविरुद्धच्या ड्रेकच्या एका सफरीमध्ये काही नौका पुरवण्यासाठी खुद्द राणी एलिझाबेथने काही भाग भांडवल विकत घेतले होते. या एकाच सफरीमध्ये ४,७०० टक्के नफा झाला आणि त्यापैकी राणी इलिझाबेथला तिचा वाटा म्हणून दोन लक्ष पन्नास हजार पौंड मिळाले !

या लुटालूट करणाऱ्या सफरीमधील राणीची भागिदारी तितकीशी गुप्त नव्हती हे सेव्हिल येथील ७ डिसेंबर १५६९ च्या 'फुगर न्यूजलेटर'वरून दिसून येते : "आणि या प्रकरणाचा सर्वात क्लेशदायक भाग असा की या सफरीमध्ये एवढ्या मोठ्या संख्येने आणि एवढ्या सुविधा असलेली जहाजे राणीची मदत आणि गुप्त परवानगी असल्या-शिवाय येऊच शकली नसती. हे कृत्य राजाने खास दूत पाठवून इंग्लंडच्या राणीशी केलेल्या करारनाम्याविरुद्ध आहे. दिलेला शब्द न पाळणे ही या राष्ट्राची संवयच झालेली आहे आणि यामुळे आपल्याला अंधारात ठेवून आणि आपल्या इच्छेविरुद्ध सर्व काही बदले अशी बतावणी राणी करत आहे."

सोळाव्या आणि सतराव्या शतकातील या कंपन्यांच्या नावांवरून व्यापार आणि वसाहतवादी उद्योग त्या कुठे करत होत्या ते आपल्याला समजते. त्या काळी सात "ईस्ट इंडिया" कंपन्या होत्या व त्यापैकी सर्वात प्रसिद्ध होत्या ब्रिटिश व डच, तर चार "वेस्ट इंडिया" कंपन्या होत्या आणि त्या नेदरलँण्ड्स, फ्रान्स, स्वीडन आणि डेन्मार्क या देशांत संघटित करण्यात आल्या होत्या. "लेव्हांत" आणि "आफ्रिकन" कंपन्या-सुद्धा लोकप्रिय होत्या. अमेरिकन लोकांना विशेष रस असलेल्या "प्लायमाऊथ" आणि "व्हर्जिनिया" या कंपन्या इंग्लंडमध्ये संघटित करण्यात आल्या होत्या.

अशा प्रकारे खर्चिक आणि धोकादायक उद्योग करणारी कोणतीही कंपनी व्यापारासाठी आपल्या सरकारकडून अधिकाधिक सवलती उपटण्याचा प्रयत्न करणार हे उघडच आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वाची सवलत होती, व्यापाराचा एकाधिकारी हक्क ! आपल्या विशिष्ट प्रदेशामध्ये परकीय व्यापाऱ्यांनी घुसणे कंपनीला मंजूर नव्हते. मुख्यत्वेकरून या व्यापारी कंपन्यांच्या साहसी शोधांमुळेच व्यापारात प्रचंड वाढ झाली होती असे त्या काळी मानण्यात येई. आता काही इतिहासकारांना याविषयी शंका आहे. त्यांच्या मते या

कंपन्यांशिवाय बाकी अनेक व्यापारी अस्तित्वात होते. या कंपन्यांच्या व्यापारामध्ये घुसण्यासाठी ते प्रयत्नशील असत. यामुळे बंधनकारी एकाधिकारशाही नसती तर व्यापार अधिकच वाढला असता असा युक्तिवाद ते करतात.

ते काहीही असले तरी प्रामुख्याने आपल्या भागधारकांना नफा मिळवून देण्याच्या उद्देशाने या कंपन्या धंदा करत होत्या हे निश्चित. यामुळे उत्पादन वाढवून अधिक दूरवरच्या प्रदेशात विक्री करणे जेथे शक्य होते तेथे तो मार्ग, तर याउलट उत्पादनावर मर्यादा घालून जेथे नफा मिळवणे शक्य होते तेथे तो मार्ग त्यांनी अवलंबला. ए. ए. ए.*चा " नांगरणी रोको " कार्यक्रम ही तर जुनीच युक्ती होती असे पुढे नमूद केलेल्या अनुभवावरून स्पष्ट होते. " इतर बेटांवरील लवंग आणि जायफळ यांची लागवड नष्ट करण्यासाठी डचांनी स्थानिक राज्यकर्त्यांना ३,३०० पौंड दिले. ॲम्बॉयना-मध्ये स्वतःचा अधिकार चालवणे शक्य होते म्हणून तेथे फक्त लवंग आणि जायफळाची लागवड करण्यावर डचांनी भर दिला. पूर्व-भारताशी व्यापार वाढवण्यात त्यांना फारसा रस नव्हता तर भरमसाट दराने नफा मिळू शकेल एवढ्याच मर्यादेत व्यापार करण्याचा त्यांचा इरादा होता. "

या विशिष्ट बाबतीत जरी व्यापार वाढवण्याऐवजी मर्यादित करून " भरमसाठ दराने नफा " मिळणार असला तरी मुख्यत्वे व्यापारवृद्धीमुळेच भरमसाट दराने नफा होई. हे व्यापाराचे सुवर्णयुग होते. या काळात लोकांनी नशीब काढले - भांडवलसंचय केला. आणि सतराव्या-अठराव्या शतकांमधील औद्योगिक विकासाचा पाया यामुळेच घातला गेला.

इतिहासाच्या पुस्तकांत आपल्याला या किंवा त्या महान राजाच्या महत्त्वाकांक्षा, त्याने केलेली युद्धे, मिळवलेले विजय याबाबतची लांबलचक वर्णने वाचायला मिळतात. या गोष्टींवर ती पुस्तके अवास्तव भर देतात. खरे तर जितकी पाने भरून ते या राजांच्या कथांची वर्णने करतात तितकी पाने त्यांच्या सिंहासनांमागील खऱ्या शक्ती असलेले त्या काळचे व्यापारी व सावकार यांच्यावर खर्ची घालणे योग्य ठरले असते. सिंहासनांमागील खरी शक्ती व्यापारीच होते; कारण राजांना पावलागणिक त्यांच्या पैशाची मदत लागे सोळावे आणि सतरावे शतक ही दोनशे वर्षे जवळपास सतत युद्धे चालू होती. युद्धांकरता पैसा लागतो. मुबलक पैसा असणारे व्यापारी आणि सावकारच त्या युद्धांसाठी पैसा पुरवत होते.

पवित्र रोमन साम्राज्याचा मुकुट स्पेनच्या पाचव्या चार्ल्सने धारण करावा की फ्रान्सच्या पहिल्या फ्रान्सिसने, याचा निवाडा फुगर या महान सावकारी परिवाराचे प्रमुख जेकब फुगर यांनी केला. हा मुकुट प्राप्त करून घेण्यासाठी चार्ल्स् यांचे ८ लक्ष ५० हजार फ्लॉरिन्स् खर्चो पडले. त्यापैकी ५ लक्ष ४३ हजार फ्लॉरिन्स् फुगर यांनीच कर्जाऊ दिले होते. जेव्हा कर्जाची परतफेड करण्यास चार्ल्स् हयगय करू लागले तेव्हा जेकब फुगर

*युनायटेड स्टेट्समधील ॲग्रिकल्चरल ॲडजस्टमेंट ॲडमिनिस्ट्रेशन

यांनी लिहिलेल्या पत्राच्या सुरावरून या पडद्यामागील सूत्रधाराच्या प्रभावाची आपल्याला कल्पना येईल. जेकब फुगर यांना त्यांच्याकडील संपत्तीमुळेच इतकी प्रचंड शक्ती प्राप्त झाली होती आणि या सामर्थ्यामुळेच ते राजाला अशा प्रकारचे पत्र लिहू शकले : " . शिवाय महाराजांच्या दूताला आम्ही बरीच मोठी रक्कम देऊ केली आहे, त्यापकी बराच भाग आम्हालाही आमच्या मित्रांकडून उभारावा लागला आहे. तुमच्या महाराजांना माझ्या मदतीशिवाय रोमन मुकुट मिळूच शकला नसता आणि तुमच्याच दूतांनी मला लिहिलेल्या पत्रांच्या आधारे मी ही गोष्ट शाबीत करू शकतो. या बाबतीत मी माझ्या नफ्याकडे लक्ष दिलेले नाही. (विश्वास नाही बसत ?) कारण मी ऑस्ट्रियाच्या संस्थानाऐवजी फ्रान्सला पैसे दिले असते तर त्यापोटी मला देऊ करण्यात आलेली बरीच संपत्ती आणि इस्टेट मिळाली असती तसे झाले असते तर तुमच्या महा-राजांची आणि ऑस्ट्रियाच्या संस्थानाची केवढी पंचाईत झाली असती हे आपण जाणताच. "

सोळाव्या शतकातील बहुतेक सर्वच महत्त्वाच्या गोष्टींशी फुगर यांचा संबंध आला. पंधराव्या शतकामध्ये लोकर आणि मसाल्याचे पदार्थ यांचे व्यापारी म्हणून त्यांनी धंदा चालू केला. परंतु सावकारीतच त्यांचे नशीब उघडले. इतर व्यापारी, राजे आणि अमीर-उमराव यांना त्यांनी कर्जे दिली आणि त्याच्या बदल्यात खाणींवर, व्यापारी सौद्यांवर, राजाच्या जमिनीवर थोडक्यात म्हणजे ज्या उद्योगांतून कर मिळणे शक्य होते अशा जवळपास सर्व उद्योगांतून त्यांना महसूल मिळू लागला. ऋणकोने कर्जाची परतफेड केली नाही तर तारण म्हणून ठेवलेल्या चीजवस्तू—इस्टेट, खाणी, जमिनी—यांचे ते मालक होत. खुद्द पोपसुद्धा फुगर यांच्याकडून कर्ज घेत. त्यांच्या सावकारी पेढीच्या शाखा दूरवर पसरल्या होत्या. फुगर यांच्या १५४६ सालच्या जमाखर्चामध्ये जर्मन सम्राट, अॅन्टवर्प शहर, इंग्लंड आणि पोर्तुगाल येथील राजे, नेदरलॅन्ड्सची राणी यांना कर्जे दिल्याच्या नोंदी आहेत. त्यांचे त्या वर्षाचे भांडवल ५० लक्ष गल्डन इतके होते. यामुळेच इतिहासातील हा कालखंड या किंवा त्या राजाचा असे न ठरवता तो फुगर यांचा काळ होता असे म्हणणेच अधिक वास्तव होईल.

जरी फुगर्स ही त्या वेळची सर्वात महत्त्वाची सावकारी पेढी असली तरी जवळपास तेवढ्याच कुवतीच्या इतरही अनेक व्यक्ती होत्या. वेल्सर यांची अशीच एक सावकारी पेढी होती. त्यांनी पाचव्या चार्ल्सला १ लक्ष ४३ हजार फ्लॉरिन्सची मदत केली होती. व्यापारी कंपन्या, खाणी आणि जमिनी यामध्ये त्यांची गुंतवणूकही मोठी होती. हॉक्स्टेटर, हाऊग आणि इमहॉफ यांचाही व्यापार-सावकारीचाच धंदा होता. त्या काळच्या इटालियन सावकारांमध्ये फ्रेस्कोबॉल्डी, ग्वॉल्टरॉटी आणि स्ट्रॉझी हे बडे होऊ पाहात होते. या दोन शतकांपूर्वी पेरूझी आणि मेडिसी ही बडी नावे होती. या सावकारी पेढ्यांच्या नफ्याची फुगर्सबरोबर तुलना करणे हे सावकारी आणि व्यापारी या धंद्यातील प्रचंड वाढ मोजण्याचे एक परिमाण आहे.

तक्ता २

इ. सन	पेढीचे नाव	नफा डॉलर्समध्ये
१३००	पेरूझीज्	८ लाख
१४४०	मेडिसीज्	७५ लाख
१५४६	फुगर्स	४ कोटी

अशा सर्व सावकारी आणि व्यापारी धंद्यांचे केंद्रस्थान ॲण्टवर्प होते. व्यापाराचा प्रवाह भूमध्य समुद्राकडून जेव्हा अटलांटिककडे वळला तेव्हा एके काळची महान इटालियन शहरे लयाला गेली आणि त्यांची जागा ॲण्टवर्पने घेतली. त्या शहराचा आकार या दृष्टीने फारसा महत्त्वाचा नव्हता. कारण तेथे केवळ १ लाख लोक राहात होते. परंतु सर्व प्रकारच्या बंधनांपासून मुक्तता हेच या शहराचे महत्त्व होते. मध्ययुगीन काळात इतर शहरे परकीय व्यापाऱ्यांना आपल्या हद्दीमध्ये व्यापार करायला मज्जाव करत, तर ॲण्टवर्प त्यांचे खुल्या दिलाने स्वागत करी. खरोखरच ते आंतरराष्ट्रीय व्यापाराचे खुले केंद्र होते. तेथे कोणालाही व्यापार करण्यास मज्जाव नव्हता. ज्या सभागृहामध्ये धंद्याच्या निमित्ताने व्यापारी, दलाल आणि सावकार भेटत, तेथील भिंतीवर पुढील घोषवाक्य कोरून ठेवण्यात आले होते : "कोणतेही राष्ट्रीयत्व आणि भाषा असलेल्या व्यापाऱ्यांसाठी." जगभरच्या व्यापाऱ्यांनी हे आमंत्रण स्वीकारले होते. इंग्लिश कापड उद्योग तेथेच वसला होता आणि पूर्वेकडील मसाल्याच्या पदार्थांची ती महत्त्वाची बाजारपेठ होती. जेव्हा व्हेनिसवासियांची मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापारावरील एकाधिकारशाही संपुष्टात आली तेव्हा तो व्यापार पोर्तुगिजांच्या हाती आला आणि पोर्तुगीज त्यांचा जवळपास सर्व व्यापार ॲन्टवर्पमधून करत. तेथे एक अत्यंत महत्त्वाची प्रथा रूजू लागली. या प्रथेवरून व्यापार आणि उद्योग यांच्या हनुमान-उडीची कल्पना येते. ही प्रथा म्हणजे नमुना दाखवून मान्यताप्राप्त आणि प्रमाणबद्ध वस्तूंची विक्री करणे. ग्राहकाला सर्व वस्तू उघडून दाखवण्याऐवजी केवळ एक प्रमाण-नमुना दाखवून विक्री करणारा आधुनिक धर्तीचा विक्रेता-दलाल तेथे अस्तित्वात आला. व्यापारावरील बंधने तात्पुरती शिथिल केल्यामुळे पूर्वी जत्रांना महत्त्व आले होते. त्या जत्रांवर सतत मुक्त असलेल्या बाजारपेठेमुळे कुऱ्हाडीचा घाव बसला. आता आधुनिक विनिमयाने जुन्या बाजारपेठेची जागा घेतली होती.

व्यापारीदृष्ट्या ॲण्टवर्प इतके महत्त्वाचे असल्यानेच आर्थिक व्यवहाराचेही ते प्रमुख केंद्र बनले. त्या जगप्रसिद्ध जर्मन आणि इटालियन सावकारी पेढ्यांनी त्यांच्या महत्त्वाच्या पेढ्या येथेच उघडल्या होत्या आणि त्याचा चलन-रूपांतराचा व्यवहार प्रत्यक्ष व्यापारापेक्षाही अधिक महत्त्वाचा होऊ लागला होता. याच काळात ॲण्टवर्पमध्ये आधुनिक पद्धतीचा आर्थिक व्यवहार रूढ होऊ लागला. वस्तूंच्या विनिमयाकरता पैशाची देवाणघेवाण झटपट व्हावी यासाठी त्या काळच्या सावकारांनी वेगवेगळ्या पद्धती शोधल्या.

जेव्हा एका देशाचा (समजा इंग्लंडचा) व्यापारी दुसऱ्या एका दूर देशच्या (समजा इटालीच्या) व्यापाऱ्याकडून वस्तू खरेदी करतो तेव्हा त्याने त्याला पैसे कसे द्यावेत ? त्या इंग्रज माणसाने इटालियन माणसाला सोने किंवा चांदी द्यावी का ? तरा व्यवहार धोकादायक आणि खर्चिक होता. अशा रीतीने सोने किंवा चांदी पाठवण्याची जरुरी भासू नये यासाठी पतपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली. आता इंग्रज व्यापाऱ्याने प्रत्यक्ष पैशाऐवजी इटालियन माणसाला हुंडी द्यावी असे ठरवण्यात आले. मग दुसऱ्या अशाच सौद्यामध्ये दुसऱ्या एखाद्या इटालियन व्यापाऱ्याने इंग्रज व्यापाऱ्याकडून वस्तू विकत घेतल्या असतील तर त्या व्यवहारातही इटालियन व्यापारी इंग्रज व्यापाराला हुंडी देईल. आणि शेवटी इंग्लंडमधून इटालीला आणि इटालीमधून इंग्लंडला, एवढ्या प्रचंड अंतरावर एक पैसाही न पाठवता, केवळ एका केंद्रीय जमाखर्च खात्यामध्ये अशा हुंड्या रद्दबातल होतील. अशी व्यवस्था अनेक शतकांपूर्वी अस्तित्वात आली. सोळाव्या शतकातील एका लेखकाने तिचे असे वर्णन केले आहे : " लिस्बॉन शहरातील व्यापारी (अॅण्टवर्पसारखे आर्थिक व्यवहाराचे दुसरे केंद्र) आणि वेगवेगळ्या देशांतील आणि शहरांतील व्यापारी यांच्यामधील पैशाचा व्यवहार मुख्यत्वे केवळ कागदावरच होतो. एखाद्या व्यवहारात मी एकाचे देणे लागतो, तर दुसऱ्या व्यवहारात तो माझे देणे लागतो. ही परस्पर देणी कागदावरच रद्द करण्यात येतात. या व्यवहाराकरता पैशाचा वापर क्वचितच केला जातो. "

पैशाच्या प्रत्यक्ष वापराशिवाय धंदा करण्याचा चमत्कार कॅन्टिलॉननीही विशद केला आहे : " जर इंग्लंड फ्रान्सला व्यापारी शिल्लक म्हणून १ लाख औंस चांदी देणे लागत असेल, तसेच फ्रान्सचे नेदरलॅन्डला आणि नेदरलॅन्डचे इंग्लंडला तेवढेच देणे असेल तर या तिन्ही देशातून चांदी न पाठवता, केवळ त्या त्या सावकारांकडून हुंड्या घेऊन तिन्ही रकमा रद्दबातल करता येतील. "

तसे पाहिले तर ही माहिती फारशी महत्त्वाची नाही. वाढत्या व्यापारी गरजा भागवणारी आर्थिक व्यवहारासाठी आवश्यक ती यंत्रणा सोळाव्या शतकातील व्यापारी आणि सावकार यांनी उपयोगात आणली होती हे दाखवण्यापुरतेच तिचे महत्त्व आहे. अर्थात आज बदललेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी नव्या आणि अधिक चांगल्या पद्धती शोधण्यात आल्या आहेत. परंतु त्यांचा पाया तीनशे वर्षांपूर्वीच घालण्यात आला होता.

लुटालुटीसाठी नव्या प्रदेशांचा शोध, वाढता व्यापार आणि व्यापारी व सावकार यांचे वाढते ऐश्वर्य यामुळे फुगर्सचे हे युग इतिहासामध्ये मानवजातीकरता भरभराटीचे आणि सुखाचे सुवर्णयुग म्हणून नोंदले गेले असणार असेच वाचकांना वाटेल. परंतु असे समजणे ही घोडचूक ठरेल.

◇ ◇ ◇

९

.... गरीब माणूस, भिकारी, चोर

फुगर्सचे युग हे भिकाऱ्यांचेही युग होते. सोळाव्या आणि सतराव्या शतकातील भिकाऱ्यांची संख्या आश्चर्यकारकच होती. १६३० साली पॅरिसमधील लोकसंख्येच्या एकचतुर्थांश लोक भिकारी होते आणि ग्रामीण भागातही त्यांची संख्या तितकीच मोठी होती. इंग्लंडमधील परिस्थितीही फारशी वेगळी नव्हती; हॉलंडमध्ये भिकाऱ्यांचा महापूर लोटला होता आणि सोळाव्या शतकात स्वित्झर्लंडमध्ये "राहत्या घरांना घेरणाऱ्या आणि टोळकी करून रस्त्यांवरून फिरणाऱ्या कंगाल बेघर लोकांपासून सुटकेचा कोणताच मार्ग शिल्लक नाही असे पाहिल्यावर, त्यांना हाकलून देण्यासाठी श्रीमंतांनी संघटित उपाय योजायला सुरुवात केली."

मूठभर लोक अतिशय संपन्न असताना आम जनतेची अशी दुर्दशा असण्यामागची कारणे कोणती? नेहमीप्रमाणेच युद्धे हे एक कारण होते. १९१४-१९१८ च्या पहिल्या जागतिक महायुद्धामध्ये युद्धग्रस्त भागात दुर्दशा आणि दैन्यावस्था यांचा नवाच उच्चांक गाठला गेला असे काही लोकांना वाटते. पण सोळाव्या-सतराव्या शतकांतील युद्धे त्यापेक्षाही जास्त संहारक होती—कदाचित जर्मनीमधील 'तीस वर्षांच्या युद्धासारख्या' (१६१८-१६४८) भयानक युद्धाचा अनुभव पुन्हा क्वचितच आला असेल. "या युद्धामध्ये जर्मनीची जवळजवळ दोन-तृतीयांश लोकसंख्या नष्ट झाली आणि जगल्या-वाचल्यांचे हाल कुत्रा खाणार नाही अशी स्थिती ओढवली. या युद्धात साम्राज्यातील पाच-षष्ठांश गावे उद्ध्वस्त करण्यात आली. पॅलॅटिनेटमधील एक गाव दोन वर्षांत अठ्ठावीस वेळा लुटण्यात आल्याची माहिती आपल्याला मिळते. सॅक्सनीमध्ये कोल्ह्यांचे कळप इतस्ततः भटकत, कारण उत्तरेकडील जमिनीचा एकतृतीयांश भाग लागवडीस अयोग्य झाला होता."

लोकांची भयानक दैन्यावस्था आणि दुःख यामागील महत्त्वाच्या कारणांमध्ये युद्धा-प्रमाणेच अमेरिका खंडाच्या शोधाचाही समावेश होता. भिकाऱ्यांचे युग निर्माण करण्यात या 'नव्या जगाचा' अप्रत्यक्ष पण महत्त्वाचा सहभाग होता. तो कसा काय?

जेव्हा इंग्लंड, हॉलंड आणि फ्रान्स या देशांतील व्यापारी धनसंचय करण्यात मश्गुल होते, तेव्हा स्वतःच्या खजिन्यातील संपत्ती वाढवण्याचा एक अधिक सोपा मार्ग स्पॅनिश लोकांना गवसला होता. भारताकडे जाणारा मार्ग शोधण्यात आणि व्यापारामध्ये नफा कमावण्यात जरी त्यांच्या लोकांना अपयश आले असले तरीही उत्तर आणि दक्षिण अमेरिका खंड त्यांनी पादाक्रांत केले. मेक्सिको आणि पेरूमधील मौल्यवान, सोन्याच्या आणि चांदीच्या खाणी आपण लुटण्यासाठीच आहेत असे स्पॅनिश लोकांना वाटत असे. स्पॅनिश जहाजांमध्ये नफा मिळवण्यासाठी विकाऊ माल भरण्यात येत नसे, तर सोने आणि चांदी — विशेषतः चांदी भरून ती स्पेनमध्ये पाठवण्यात येई. सॅक्सनी आणि ऑस्ट्रियातील खाणींमधून मोठ्या प्रमाणावर चांदी बाहेर पडत होती, परंतु स्पॅनिश लोकांच्या ताब्यात असलेल्या ' नव्या जगातून ' स्पेनमध्ये येणाऱ्या संपत्तींच्या लोंढ्यांच्या मानाने ती काहीच नव्हती. १५४५ पासून १६०० पर्यंतच्या पंचावन्न वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी अमेरिकन खाणींमधून २० लाख पौंड संपत्ती स्पेनच्या खजिन्यात जमा होत असे असा अंदाज आहे. एका खाणीमधील पुरवठा संपत आला आहे असे वाटावे तोच नवी खाण दृष्टिपथात येई. १५०० ते १५२० या काळात स्पॅनिश टाकसाळीमधून ४२,००० किलो वजनाची चांदीची नाणी बाहेर पडली. तर १५४५ ते १५६० या पंधरा वर्षांत त्यांचे उत्पादन सहापट वाढून २,७०,००० किलो झाले. आणि १५८० ते १६०० या वीस वर्षांच्या कालखंडामध्ये चांदीच्या नाण्यांचे उत्पादन ३,४०,००० किलो म्हणजे १५२० मधील उत्पादनाच्या जवळपास आठपट झाले!

अमेरिकेमधून स्पेनमध्ये आणलेला हा चांदीचा प्रचंड साठा स्पेनमध्येच राहिला का? मुळीच नाही. जितक्या वेगाने तो जमा झाला तितक्याच वेगाने सर्व युरोपभर त्याचे चलन सुरू झाले. एकामागून एक निष्फळ युद्धांमध्ये, सैन्य आणि सामग्री यावर स्पेनच्या राजांनी ती संपत्ती उधळून टाकली. चांदी खाणे शक्य नसल्यामुळे स्पॅनिश लोकांनी विक्रीपेक्षा खरेदी जास्त केली आणि त्यांना माल विकणाऱ्या व्यापाऱ्यांच्या बटव्यांमध्ये तो पैसा जमा झाला.

युरोपमध्ये येणाऱ्या या अपूर्व अशा चांदीच्या लोंढ्याचे काय परिणाम झाले? त्यामुळे किंमतीमध्ये जबरदस्त वाढ झाली. केवळ काही वस्तूंच्या किंमतीत चारदोन पैशांची नव्हे तर सर्वच वस्तूंच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाली. गेल्या हजार वर्षांच्या जागतिक इतिहासात अशी अफाट भाववाढ फक्त तीन-चारदाच झाली आहे. १६०० साली किंमतींची पातळी १५०० सालच्या किंमतींच्या दुप्पट झाली आणि १७०० साली तर ती पातळी या जबर भाववाढीपूर्वी असलेल्या किंमतींच्या साडेतीनपट झाली होती.

चलनाचे अवमूल्यन केल्याने पैशाचे मूल्य कसे घसरते किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर वस्तूंच्या किंमती कशा वाढतात ते आपण अगोदरच पाहिले आहे. चलनामधील पैशाचा पुरवठा वाढल्यामुळेही अगदी तोच परिणाम होतो. लोकांच्या गरजेच्या इतर वस्तूंप्रमाणेच पैसा ही एक वस्तू आहे आणि पैशाचा पुरवठाही अमर्यादित नसतो. आपणा सर्वांनाच हवेची जरुरी असते. पण हवेचा पुरवठा अत्यंत विपुल

असल्यामुळे हवेला आर्थिक मूल्य नसते. म्हणूनच हवेसाठी आपल्याला पैसे मोजावे लागत नाहीत. पाण्याची खरेदीविक्री करण्याचा विचारही आपल्या मनात येत नाही. परंतु कोरड्या, उष्ण तपमानाच्या प्रदेशांमध्ये, वाळवंटांमध्ये मागणीच्या मानाने पाण्याचा पुरवठा फारच थोडा असल्याने तेथे पाणी विकले जाते. विनिमयाची एक पद्धत म्हणून जेव्हा वस्तुविनिमयाचा व्यापार चालत असे त्या काळात, एखाद्या वर्षी जर द्राक्षांचे किंवा सातूचे पीक चांगले आले आणि गव्हाचे उत्पादन घटले तर तेवढयाच गव्हासाठी अधिक दारू द्यावी लागे. पैशालादेखील तेच तत्त्व लागू आहे. ज्या वस्तूंच्या विनिमया-साठी पैसा वापरला जातो त्या वस्तूंच्या मानाने जर पैशाचा पुरवठा वाढला तर पैशांची किंमत कमी होते, म्हणजेच वस्तूंच्या किंमती वाढतात. पैशाच्या मूल्यातील घट म्हणजेच भाववाढ आणि पैशाच्या मूल्यात वाढ म्हणजेच किंमतीमध्ये घट. चलनामध्ये असलेल्या पैशाची सापेक्ष मुबलकता किंवा कमतरता यांच्या प्रमाणात हा बदल घडून येतो.

आणि म्हणूनच युरोपमधील या चांदीच्या लोंढ्यामुळे किंमती आकाशाला भिडल्या. त्यामुळे अखेर लोकांच्या संभाषणामध्ये किंमती हा नेहमीचाच मुद्दा बनला. “ आजच्या किंमतीच्या एक-चतुर्थांश किंमतीला लोणी मिळत असे ते सोन्याचे दिवस आठवतात मला; आणि अंडी—ती तर जवळजवळ फुकटच मिळत. ”

अमेरिकेतील मौल्यवान् धातूंचा लोंढा प्रथम स्पेनमध्ये आल्यामुळे सर्वप्रथम स्पेनमध्ये भाववाढ दिसून आली. १५३६ सालच्या स्पेन आणि पोर्तुगालमधील किंमती पाहून त्या देशांमधून प्रवास करणाऱ्या निकोलास क्लेनार्ट्स या डच्च माणसाच्या तोंडचे पाणीच पळाले. तेव्हा दाढी करण्यासाठी त्याला इतके पैसे मोजावे लागेल की त्याने घरी असा गंमतीदार निरोप पाठवला : “ सालामान्कामध्ये एक डेमी–रिअल मोजावा लागतो. त्यामुळे फ्लॅण्डर्सपेक्षा स्पेनमध्ये दाढी वाढवलेली अधिक माणसे सापडली तर नवल वाटायला नको. ”

अमेरिकन चांदीचा स्पेनमधून सर्व युरोपभर प्रसार झाल्यावर स्पेनमधील भरमसाट किंमतींचे फ्लॅण्डर्सच्या प्रवाशांना जे आश्चर्य वाटत होते ते वाटेनासे झाले. कारण सगळीकडे तशाच किंमती दिसू लागल्या. सामान्य माणसांना त्यामागची कारणे कळू शकली नाहीत. किंमतीमधील ही न भूतो न भविष्यति वाढ केवळ त्यांच्या इलाख्या-पुरती मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय आहे हे त्यांना ठाऊक नव्हते. त्यांचा चडफडाट झाला आणि कोणाला तरी दोष द्यायचा म्हणून या ना त्या लोभी माणसाच्या दुष्टपणावर ते राग काढू लागले. सोळाव्या शतकात लिहिलेल्या ‘ ए डिस्कोर्स ऑफ द कॉमन वील ऑफ धिस रेल्म ऑफ इंग्लंड ’ (इंग्लंडच्या राज्यातील सर्वसामान्यांच्या कल्याणासंबंधी भाष्य) या ग्रंथात लेखकाने तत्कालीन परिस्थितीचे वर्णन केले आहे. सरंजामदारी वर्गाने घेतलेल्या जीवघेण्या खंडामुळे किंमती वाढतात असा आरोप शेतकरी करतो, तर शेती-मालाच्या किंमती भरमसाठ वाढल्यामुळे अधिक खंड आकारावा लागतो असा युक्तिवाद सरंजामदार करतो.

" शेतकरी : महाशय, मला वाटते की तुम्ही लोक तुमच्या जमिनीवर भरमसाट खंड आकारता, जमीन कसणाऱ्या माणसाला एवढा खंड भरायचा असेल तर उत्पादित वस्तू अधिक किंमतीला विकणे त्याला भागच आहे.

" सरंजामदार : आणि शेतकऱ्यांनो, तुमच्या वस्तूंच्या – धान्य, गाईगुरे, डुकरे, बदके, कोंबड्या, अंडी आणि लोणी – किंमती इतक्या जबरदस्त असतात की खंड वाढवणे आम्हाला भागच पडते. गेल्या आठ वर्षांत तुम्ही दीडपटीने भाव वाढवले नाहीत अशी एकही चीज नाही. आठ वर्षांपूर्वी चांगले डुक्कर किंवा बदक ४ पेनीला मिळत होते; त्यालाच आज ८ पेनी लागतात हे इतरांना ठाऊक नाही असे तुम्हाला वाटते का? एका चांगल्या कोंबड्याला तेव्हा ३ ते ४ पेनी पडत, कोंबडीला २ पेनी तर पिल्लाला एक पेनी लागे. या वस्तूंसाठी आणि गोमांस आणि मटणासाठीही मला आज दुप्पट पैसा मोजावा लागतो. "

माणसाच्या पापी वृत्तीचा संबंध लावूनच आर्थिक बाबींचा विचार करण्याची मध्ययुगीन कालाची सवय सोडून दिलेले काही विचारवंतही त्या काळी होते. " चांगल्या " किंवा " वाईट " माणसांचा ज्यावर प्रभाव पडत नाही अशा अमानवी नियमाची शक्ती भाववाढीमागे आहे असे जां बोडिन आणि कॅन्टिलॉन यांचे मत होते. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात बोडिननी लिहिले : " आज आपल्याला भेडसावणारी महागाई, माझ्या मते तीन कारणांमुळे अस्तित्वात आली आहे. गेल्या चारशे वर्षांत कधीही नव्हता एवढा सोने-चांदीचा पुरवठा हे त्यामागील जवळपास एकमेव आणि सर्वांत महत्त्वाचे कारण आहे (हे आजवर कोणीही निदर्शनास आणलेले नाही.) ..."

बोडिन यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर, भरमसाट किंमती आणि सोने-चांदीचा प्रचंड पुरवठा यांचा संबंध आहे ही गोष्ट इतरांच्या मनात हळूहळू ठसू लागली. जेरार्ड द मेलिनेस या व्यापाऱ्याने १६०१ साली लिहिलेल्या ' ए ट्रीटिज ऑफ द कॅन्कर ऑफ इंग्लंड्स कॉमनवेल्थ ' [इंग्लंडच्या साम्राज्याला लागलेल्या किडीविषयीचा प्रबंध] या पुस्तकामध्ये पुढील उतारा आहे : " सर्वसाधारणपणे पैशाची मुबलकता वस्तू महाग करते, तर कमतरता वस्तू स्वस्त करते. वेस्ट इंडिजमधून ख्रिश्चन जगतामध्ये मोठ्या प्रमाणावर आलेल्या पैशामुळे सर्व वस्तू महाग झाल्या आहेत. "

जी गोष्ट सोळाव्या आणि सतराव्या शतकामध्ये मोठी वादग्रस्त होती ती अठराव्या शतकात सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ झाली असे कॅन्टिलॉन यांचे म्हणणे आहे : " सोने आणि चांदीच्या खाणींचा शोध लागल्यावर त्यातून निघणाऱ्या धातूपासून जो पैसा निर्माण केला जातो, तो कर्जाऊ दिला काय किंवा खर्च केला काय, शेवटी तो चलनात शिरतो आणि सर्व वस्तूंच्या किंमती वाढवतो .... पैशाची मुबलकता सर्व वस्तूंच्या किंमती वाढवते हे सर्वांना मान्य आहे. गेल्या दोन शतकांमध्ये अमेरिकेतून युरोपमध्ये आणलेल्या पैशाचे परिणाम हेच दर्शवतात. "

अशा महागाईचे परिणाम काय होतात? फायदा कोणाचा होतो आणि तोटा कोणाचा? फायदा झाला व्यापाऱ्यांचा. त्यांचा खर्च वाढला तरीही त्यांच्या धंद्यातील मिळकतीत

अधिकच वाढ झाली. खरेदी केलेल्या वस्तूंकरता त्यांना अधिक किंमत मोजावी लागली. पण त्यापेक्षाही वाढीव किंमतीला त्यांनी वस्तू विकल्या. ज्यांचा खर्च कायम राहूनही उत्पादित मालाची किंमत वाढली अशा एका सामाजिक गटाचाही फायदा झाला. जमिनीसाठी खंड म्हणून पूर्वी निश्चित केलेली रक्कम भरणारे आणि लोणी, अंडी, गहू, सातू वगैरे गोष्टी आता वाढीव किंमतीला विकू शकणारे शेतकरी यात मोडतात.

तर याउलट या भयानक भाववाढीचा दणका बसलेलेही अनेक लोक होते. जमाखर्चाची तोंडमिळवणी करणे आता शासनसंस्थेला अधिकाधिक कठीण होऊ लागले. तिचे उत्पन्न तेवढेच होते, पण खर्च मात्र सतत वाढतच होता. राष्ट्रीय शासनसंस्था निर्माण होण्याचे ते दिवस होते. त्या शासनसंस्थेपाशी नव्या परिस्थितीला अनुरूप अशी आर्थिक संघटना नव्हती, ती वास्तू अजून जुनीपुराणीच होती. तिच्यामध्ये हळूहळू बदल होत होते; पण ठिकठिकाणी तिचा पाया खचत होता; आणि या भाववाढीमुळे तिचे चिरे अधिकच ढासळत होते. आर्थिक अडचणीमुळे राजे सावकारवर्गाच्या कह्यात जात होते आणि याच काळात त्या सावकारांनी राजांकडून अनेक सवलती लाटल्या होत्या. भांडवलदारवर्गाला अधिकाधिक राजकीय सत्ता देणारे जे गतिमान बदल या काळात घडले त्यांचा या भयानक भाववाढीशी फार जवळचा संबंध होता.

वेतनावर काम करणाऱ्या मजुरांचेही नुकसान झाले. वाढत्या किंमतीच्या काळात मजुरीचे दरही वाढतात. तेव्हा शेवटी सगळे काही आपसूकच चांगले होते असे काही जणांना वाटते. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. कारण वरील युक्तिवादामध्ये एक मेख आहे. खरे तर किंमतींच्या प्रमाणात मजुरीचे दर वाढत नाहीत. तसेच वेतनवाढीकरता नेहमीच झगडा करावा लागतो. जनतेच्या हेतूपुरस्सर कृतीमधून—त्या कृतीला प्रस्थापितांकडून विरोध होत असूनही—वेतनवाढ मिळवण्यात येते, तर वस्तूंच्या किंमती बाजारपेठेच्या प्रक्रियेमधून आपोआप वाढतात. त्याकाळचा कष्टकरी या भाववाढीच्या विरोधात ठामपणे उभा होता. पंधराव्या शतकाच्या शेवटी फ्रान्समधील मजुराला एका दिवसाच्या मजुरीमध्ये ४·३ किलो मांस मिळत होते, तर एका शतकानंतर त्या मजुरीत केवळ १·८ किलो मांस मिळू लागले. शंभर लिटर धान्याला पूर्वी चार फ्रॅन्क्स् पडत, तर आता त्यासाठी वीस फ्रॅन्क्स् मोजावे लागत. रॉजर्सच्या अंदाजाप्रमाणे १४९५ साली इंग्लंडमधील शेतकरी पंधरा आठवडे काम करून त्याच्या कुटुंबासाठी वर्षभराची बेगमी करू शके; पण १६१० साली सर्व आठवडे काम करूनही त्यांना ही गोष्ट साधणे अशक्य होऊ लागले! आणि "१४९५ मध्ये रूटलँडमधील कारागिराला दहा आठवड्यांच्या श्रमापोटी जेवढी कमाई होई, त्यासाठी १६१० साली त्याला त्रेचाळीस आठवडे काम करावे लागले." कष्टकरी लोकांना याचा अर्थ स्पष्ट झाला : पोटाला अधिक चिमटा घ्यायचा किंवा वाढलेला खर्च भागवण्यासाठी वेतनवाढीचा लढा द्यायचा—नाहीतर भिकारी बनायचे. किंमतीमधील विस्मयकारक वाढीचे परिणाम या तिन्ही प्रकारांत दिसले.

स्थिर उत्पन्न असलेल्या समाजघटकाचेही या काळात नुकसान झाले. पेन्शन, वर्षासन किंवा गुंतवणुकीवर निश्चित दराने व्याज मिळणाऱ्यांचा तो गट होता. आयुष्यभर वर्षासन मिळावे म्हणून पैसे गुंतवणाऱ्या कुमारी रेनेर्सस् यांचे आपण उदाहरण घेऊ :

" आम्ही हाल्बर स्टाड्ट् शहराचे मालक-कारागीर, महापौर आणि ज्येष्ठजन असे जाहीर करतो की आम्हाला पाच लोडिगे मार्क्स [जर्मन नाणे] कर्जाऊ देण्याबद्दल कुमारी ॲल्हीड रेनेर्सस यांना अर्ध्या लोडिगे मार्क्सचे वर्षासन आम्ही देणार आहोत. "

कदाचित म्हातारपणी सुखाने राहाता यावे म्हणून कुमारी रेनेर्सस यांनी या वार्षिक उत्पन्नाची तरतूद केली असावी. त्या काळी ते चालले. पण वाढत्या किंमतींच्या या काळात त्या राहात असत्या तर त्यांच्यावर अधपोटी राहण्याचा प्रसंग ओढवला असता. कारण त्यांचे उत्पन्न जरी कायम राहणार असले तरीही जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती वाढत असल्यामुळे, त्यांना त्याच उत्पन्नात कमी वस्तू विकत मिळाल्या असत्या. त्यांचे दृष्टीनी उत्पन्न कायम राहूनही खरे उत्पन्न घटले असते. वाढत्या किंमतींच्या काळात स्थिर उत्पन्न असणाऱ्या लोकांची नेहमी हीच स्थिती होते.

त्याचप्रमाणे जमिनीचा खंड म्हणून स्थिर उत्पन्न मिळणाऱ्या लोकांनाही चांगलाच तडाखा बसला. जमिनीच्या उपयोगासाठी रूढीने चालत आलेल्या सेवांच्या जागी आता पैशाच्या रूपात खंड भरण्याची प्रथा रुजली होती हे आपण पाहिलेच आहे. भयानक भाववाढ होईपर्यंत सरंजामदारांच्या दृष्टीने ही व्यवस्था चांगली होती. पण आता वस्तूंसाठी नव्या वाढीव किंमती मोजताना त्यांच्या हाती खंड मात्र जुन्या दरानेच येत होता. ते पेचात पडले. काय करणे त्यांना शक्य होते ? राजाने चर्चसंस्थेकडून जप्त केलेल्या जमिनी मिळालेले किंवा त्या विकत घेतलेले हे अमीर–उमराव, खंड स्थिर असताना वाढणाऱ्या किंमतींबद्दल काय करू शकणार होते ? जमिनीमधून अधिक पैसा मिळावा असे त्यांना वाटे. पण तो कसा मिळवायचा ?

दोन मार्ग त्यांना उपलब्ध होते. एक म्हणजे शेत-बंदिस्ती करणे आणि दुसरा म्हणजे भरमसाट खंड-आकारणी करणे.

शेती क्षेत्रामध्ये शेत-बंदिस्ती सर्व युरोपभर झाली, पण विशेषतः इंग्लंडमध्ये त्याचे प्रमाण खूपच जास्त होते. पहिल्या प्रकरणात शेतीच्या खुल्या क्षेत्रपद्धतीबद्दल आपण माहिती करून घेतली आहे. अत्यंत नासधूस होत असल्याने ती व्यवस्था वाईट होती. कारण प्रगतिशील, जाणकार, उद्योगी शेतकरी स्वतःला हवे त्याप्रमाणे नवेनवे प्रयोग त्या जमिनीवर करू शकत नसे. त्याच्या जमिनीच्या आजूबाजूला शेतीचे तुकडे असणाऱ्या शेतकऱ्यांच्या गतीने त्याला जावे लागे. त्यामुळे काही मूठभर मूर्ख शेतकऱ्यांपायी सगळ्या गावाची प्रगती रोखली जाई. यावर उपाय म्हणून काही ठिकाणी शेतकऱ्यांनी त्यांच्या मालकीचे जमिनीचे तुकडे एकत्रित करण्याची पद्धती अंगिकारली होती. त्यामुळे अनेक तुकड्यांमध्ये विखुरलेल्या तीस एकरांच्या जमिनीऐवजी त्यांच्याकडे सहा-सात एकरांची सलग शेते येऊ लागली. एखादा नशिबवान किंवा हुशार शेतकरी तर सर्व तुकडे सोडवून घेऊन एक चांगले मोठे शेत तयार करी. शेतजमिनीभोवती कुंपण घालणे ही

त्याच्या पुढची पायरी होती. पूर्वीचे खुले क्षेत्र आता बंदिस्त झाले. नव्या इंग्लंडमध्ये प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताभोवती दगडाच्या भिंती बांधलेल्या दिसतात. जुन्या काळी इंग्लंडमध्ये जेथे दगड सहजपणे उपलब्ध होते तेथे दगडांनी कुंपण घालत; तर इतर ठिकाणी तारांचे कुंपण बांधत. ज्या ठिकाणी शेती चालू राहिली त्या ठिकाणी अशा शेत-बंदिस्तीमुळे कोणालाच त्रास झाला नाही आणि त्यामुळे त्याला कोणीच हरकत घेतली नाही. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली आणि श्रीमंत व गरीब दोघांनीही आपापला फायदा करून घेतला.

पण दुसऱ्या एका प्रकारच्या शेत-बंदिस्तीमुळे हजारो लोकांना मनस्वी त्रास सहन करावा लागला. मेंढपाळीसाठी शेत-बंदिस्ती करण्याचा हा प्रकार होता. लोकरीची किंमत वाढत असल्यामुळे (लोकर ही इंग्लंडच्या निर्यातीमधील प्रमुख बाब होती), जमिनी-मधून अधिक पैसा मिळवण्याची एक सुसंधी म्हणून शेतजमिनीचे मेंढपाळीच्या कुरणात रूपांतर करण्याचा उद्योग अनेक सरंजामदारांनी आरंभला होता. खरे तर अफाट भाववाढ होण्यापूर्वीच काही प्रमाणात हे घडले होते, पण आता वाढलेल्या किंमतीमुळे या प्रक्रियेला जोरदार चालना मिळाली. आता अधिकाधिक सरंजामदारांनी मेंढपाळीची कुरणे वाढवण्या-साठी शेत-बंदिस्ती करायला सुरुवात केली. यामुळे अमीर-उमरावांना अधिक पैसा मिळाला परंतु जमिनीवर राबणाऱ्या शेतकऱ्यांचा कामधंदा बुडाला आणि उत्पन्नही गेले. शेती करण्यासाठी जेवढे लोक लागतात त्यापेक्षा मेंढपाळीसाठी कमी लोक लागत असल्या-मुळे हे अतिरिक्त लोक देशोधडीला लागले. एखाद्या ठिकाणी ज्या कुळांच्या आकाराच्या जमिनी शेत-बंदिस्ती करण्याच्या मार्गात आड येत होत्या, त्या कुळांना हाकलणे सरंजाम-दारांना जरुरीचे वाटू लागले. त्यांनी तशी पावले उचलली आणि अधिक व्यापक प्रमाणावर गरिबांचे जगण्याचे साधन नष्ट झाले. त्या काळात पत्रके काढणाऱ्या लोकांच्या कडवट घोषणांवरून कुरणासाठी केलेल्या शेत-बंदिस्तीमुळे गरीब शेतकऱ्यांवर काय परिस्थिती ओढवली ते आपल्या ध्यानात येते.

काही ठिकाणी सार्वजनिक वापरासाठी असलेली कुरणाची जमीन सरंजामदार कुंपण घालून बंदिस्त करत असे. अर्थातच, त्यामुळे गरीब कुळांना गुरे चरण्यासाठी कुरणे राहिली नाहीत आणि त्यांच्यावर मरणच ओढवले. कुळांना याबाबत काहीच अधिकार नव्हते का? कायद्याचा आधार घेणे त्यांना शक्य नव्हते का? ते शक्य होते; परंतु खर्चाची तरतूद करू शकणाऱ्या श्रीमंत मालकांनाच आजवर कायद्याची मदत घेणे शक्य झाल्याचे आपल्याला आढळते. त्यामुळे कुळाची बाजू बरोबर असून जिंकण्याची शक्यता असता-नाही खटला लढवण्यासाठी लागणारा पैसा त्याच्याकडे नव्हता. पैसा असलेला सरंजामदार खटला लांबवी आणि अखेर कुळाला तो नाद सोडून द्यावा लागे. त्यानंतर सरंजामदार कुळाची जमीन विकत घेऊन ती स्वतःच्या बंदिस्त जमिनीला जोडून घेई. वूटन बॅसेट येथील शेतकऱ्यांनी "सामान्यांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी" लोकसभेपुढे केलेल्या अर्जात या प्रकारासंबंधीची एक कथा आहे :

" वर उल्लेखलेल्या नगराचे महापौर आणि स्वतंत्र कुळे यांच्या ताब्यात सगळ्यांना खुली असलेली सार्वजनिक कुरणे होती. सर फ्रान्सिस एंगलफील्ड यांनी त्या कुरणाच्या जमिनीची बंदिस्ती केली आणि अजूनही ती जमीन त्यांच्याच ताब्यात आहे. सरसाहेबांचे समाजात चांगलेच वजन असल्यामुळे त्यांची स्वतंत्र कुळे कायद्याची मदत घेऊ शकत नव्हती. न्यायालयात खटले रेंगाळत राहिल्यामुळे जॉन रूस या स्वतंत्र कुळाला त्याचे जमीन कसण्याचे अधिकार ५०० पौंडांना विकावे लागले. अशा तऱ्हेने अनेकजण कंगाल बनले...त्यामुळे आमच्यावर दैन्यावस्था ओढवली आहे...आता देवाच्या कृपेने या माननीय सभागृहानेच आमच्याकरता काही कायदा केला तर आमचा हक्क आम्हाला परत मिळू शकेल...

(ह्या खाली तेवीस सह्या आहेत.)

" ह्या निवेदनावर इतर अनेक जणांनी सह्या केल्या असत्या; परंतु ज्या सरंजामदारांकडे ते काम करतात ते सरंजामदार त्यांना देशोधडीस लावतील या भीतीपोटी त्यांनी सह्या करण्याचा धोका पत्करला नाही. "

सर्वच ठिकाणी मेंढपाळीच्या कुरणांसाठी शेत-बंदिस्ती केली जात नव्हती. असंख्य छोट्या छोट्या शेतांमध्ये पीक काढण्यापेक्षा एकाच मोठ्या शेतात पीक काढणे अधिक सोयीचे आणि किफायतशीर असल्यामुळे अनेकदा चांगली पिके काढण्यासाठी मनोरचे सरंजामदार शेत-बंदिस्ती करीत. सरंजामदाराला हव्या असलेल्या जमिनीमध्ये ज्या दुर्दैवी कुळांच्या जमिनींचे पट्टे येत, ते लौकरच भूमिहीन बनून बेघरांच्या कंपूत जमा होत.

ह्या काळातील भरमसाट खंड-आकारणीपेक्षा शेत-बंदिस्तीबद्दल आपल्याला अधिक माहिती मिळत असली तरीही त्या काळी खंड-आकारणीच अधिक परिणामकारक आणि महत्त्वपूर्ण ठरली. या काळापर्यंत जमिनीचा खंड आणि नव्या कुळास जमिनीचा ताबा घेताना भरावा लागणारा दंड जवळजवळ तेवढाच राहिला होता. या गोष्टी रूढीने निश्चित केलेल्या होत्या आणि पूर्वीच्या काळी रूढीला कायद्यासारखेच वजन होते. पण किंमतीमधील अभूतपूर्व वाढीमुळे जमिनीमधून अधिक उत्पन्न मिळणे अत्यावश्यक झाल्यावर पूर्वी ज्या रूढींचे शेतकऱ्याला संरक्षण मिळे त्या रूढी सरंजामदाराने निकालात काढल्या. जेव्हा खंडाने दिलेल्या जमिनीच्या कराराची मुदत संपे तेव्हा पुन्हा करार करताना, रूढीनुसार त्याच शर्तीवर करार करण्याऐवजी सरंजामदार त्या जमिनीचा खंड इतका वाढवी की कुळाला ते पैसे देणे अशक्य होई. मग कुळाला जमीन सोडून देणे भाग पडे. ठराविक वर्षांसाठी खंडाने जमीन घेणाऱ्यांची ही स्थिती झाली. पण ठराविक वर्ष जमीन खंडाने देण्याचे कायदेशीर करार हे जरी नंतर महत्त्वाचे झाले तरीही या काळात बहुतेक शेतकरी प्रथेनुसारच सरंजामदाराचे कूळ होते. " मनोरची प्रथा आणि सरंजामदाराची कागदपत्रांमध्ये व्यक्त केलेली इच्छा " यानुसार त्या कुळांकडे कसण्यासाठी जमीन होती. या कुळांच्या दुर्दैवाने, " मनोरची प्रथा " याचा सरंजामदाराने स्वतःला हवे ते करण्याचा अधिकार असा सोइस्कर अर्थ लावला. त्या क्षणी त्याला जमिनीतून अधिक पैसा हवा

होता. अधिक खंड देण्याची तयारी असलेल्या शेतकऱ्याला ठराविक वर्षांसाठी जमीन देता यावी म्हणून, असलेल्या कुळांना हाकलून देण्यासाठी सर्व प्रकारच्या युक्त्या-प्रयुक्त्यांचा अवलंब करण्यात आला. समजा एखाद्या कायदेशीर कुळातील कुटुंबप्रमुखाचा मृत्यू ओढवला. अशा वेळी पूर्वी रूढीप्रमाणे सरंजामदाराला छोटीशी रक्कम दंड म्हणून देऊन त्या मृत माणसाच्या मुलाला त्या जमिनीचा ताबा मिळे. पण आता तो दंड मामुली राहिला नाही. सरंजामदाराने तो दंड इतका वाढवला की शेतकऱ्याला ती रक्कम देणे अशक्य बनले आणि आपले अधिकार सोडून देणे भाग पडू लागले. त्यानंतर सरंजामदार ती जमीन विकून टाकी किंवा नव्या वाढीव दराने खंड देण्याची तयारी असणाऱ्या शेतकऱ्याला ती जमीन खंडाने देई.

१५५३ साली विहटवीच्या रहिवाशांनी केलेल्या अर्जावरून खंड आणि दंड यामध्ये घडून आलेल्या अभूतपूर्व वाढीची आपल्याला कल्पना येते :

तक्ता ३

कुळाचे नाव	जुना खंड	नवा खंड	आणि दंड
हेन्री रसेल	४२ शिलिंग्ज, ११½ पेनी;	४ पौंड, ७ शिलिंग्ज, ३ पेनी;	३ पौंड, ६ शिलिंग्ज, ८ पेनी;
थॉमस रॉबिन्सन	१२ शिलिंग्ज, ११½ पेनी;	४० शिलिंग्ज, ७ पेनी;	३३ शिलिंग्ज, ४ पेनी;
थॉमस कॉवर्ड	१४ शिलिंग्ज, ९ पेनी;	३१ शिलिंग्ज;	२ शिलिंग्ज, ६ पेनी;
विल्यम वॉकर	७ शिलिंग्ज, ३ पेनी;	१७ शिलिंग्ज	५ शिलिंग्ज
रॉबर्ट बार्कर	१४ शिलिंग्ज, ६ पेनी;	३० शिलिंग्ज	२ शिलिंग्ज, ८ पेनी.

सहाव्या एडवर्डच्या दरबारातील मान्यवर लोकांपुढे केलेल्या आपल्या भाषणामध्ये बिशप लॅटिमर यांनी स्पष्टवक्तेपणाचे धैर्य दाखवले : " जमीनदारांनो, धर्मोपदेशक-सरंजामदारांनो आणि उमराव–सरंजामदारांनो, तुम्हाला प्रतिवर्षा प्रचंड संपत्ती मिळते. पूर्वी खंड म्हणून तुम्ही वर्षाकाठी तीस ते चाळीस पौंड घेत होता (दुसऱ्याच्या श्रमातून निर्माण होणाऱ्या संपत्तीमधील सरंजामीपोटी घेतला जाणारा हा न्याय्य भाग होता), त्याऐवजी तुम्ही आता पन्नास ते शंभर पौंड घेता. "

ह्याच्या सरंजामदारांवर टीका करणारे लॅटिमर हे एकटेच गृहस्थ नव्हते. त्या काळातील इतर अनेक लेखक व वक्ते यांनीही शेत-बंदिस्ती, भरमसाट खंड आणि अवाजवी दंड याद्वारे भिकारी आणि भुकेकंगाल लोकांच्या संख्येमध्ये अधिकाधिक भर घालणाऱ्या सरंजामदारांविरुद्ध टीकेची झोड उठवली. या काळातच प्रसिद्धीस आलेल्या 'द प्रेअर फॉर लॅण्डलॉर्डस' [सरंजामदारांकडे प्रार्थना] या पुस्तिकेमध्ये आपल्याला पुढील गोष्ट आढळते. "(पृथ्वीवरील जमिनी, कुरणे आणि निवासस्थाने यावर मालकी असलेल्या) लोकांना आमची अशी आवर्जून विनंती आहे की त्यांनी त्यांची घरे आणि जमिनी यावर भरमसाट खंड आकारू नये, आणि अवास्तव दंडही वसूल करू नये... त्यांनी लोकांना थोडी सूट द्यावी, म्हणजे आहे त्यात लोक समाधानी राहातील. प्रत्येक घर आणि जमिनीचा तुकडा आपल्या जमिनीलाच जोडून घेऊन त्यांनी दुसऱ्यांना भुकेकंगाल करू नये..."

पण या प्रार्थनांना भीक न घालता शेत-बंदिस्ती आणि भरमसाट खंड-आकारणी करण्याचा उद्योग सरंजामदारांनी चालूच ठेवला. सगळी गावेच्या गावे देशोधडीला लागली. या प्रक्रियेत हुसकलेले गावकरी चोऱ्या करीत किंवा रस्त्यावर भीक मागत फिरू लागले वा उपाशी मरू लागले. तेव्हा प्रार्थनांपेक्षाही अधिक परिणामकारक ठरू शकतील असे उपाय योजण्यात आले. कायदे करण्यात आले. कारण राजाला खरोखरच चिंता वाटत होती. अशी गावेच्या गावे निर्मनुष्य होणे त्याला परवडत नव्हते. त्याच्या सैन्यामध्ये मुख्यत्वेकरून शेतकरी आणि छोटे जमीनमालक यांचाच भरणा असल्याने त्याने या प्रकाराचा धसका घेतला होता. शिवाय हे बेघर आणि भूमिहीन होत असलेले शेतकरी पूर्वी करदाते होते आणि असा कर राजाच्या उत्पन्नाचा एक महत्त्वाचा भाग होता. त्याचप्रमाणे भटके, भणंग भिकारीदेखील अतिशय धोकादायक होते—बंदिस्त शेतांची मोडतोड व जाळपोळ करण्यात आली होती व शेतकऱ्यांचे उठाव झाले होते. म्हणून शेत-बंदिस्तीविरोधी कायदे करण्यात आले. पहिला कायदा १४८९ मध्ये केला गेला आणि नंतर सोळावे शतकभर सतत असे कायदे करण्यात आले. पण अशा पुनरावृत्तीवरूनच त्या कायद्यांना कोणी भीक घालत नव्हते असे दिसते. नाहीतर तोच कायदा पुन्हा करण्याची गरजच नव्हती. खरे तर काही अतिशय वाईट रीती बदलण्यात आल्या, तरीही ज्या ज्या ठिकाणी स्थानिक सरंजामदारच न्यायाधीश होत असे त्या ठिकाणी हे कायदे सक्तीने अंमलात आणता आले नाहीत. शेतकऱ्यांनी शेत-बंदिस्त-विरोधी उठाव केले तेव्हा वास्तवात ते कायदा तोडत नव्हते तर सरंजामदार कायदा तोडत होते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परंतु शेतकऱ्यांच्या उठावांबद्दल सौम्य भूमिका घेण्यात आली नाही तर त्यांचे उठाव दडपण्यात आले. जनतेचे उठाव नेहमीच दडपले जातात.

ह्या काळातील एक महत्त्वाचा बदल लक्षात घ्या. जमिनीवर राबणाऱ्या श्रमिकांच्या प्रमाणामध्ये जमिनीचे महत्त्व असते ही जुनी संकल्पना आता नाहीशी झाली होती.

व्यापार आणि उद्योग यांचा विकास आणि किंमतीमधील अभूतपूर्व वाढ यामुळे माणसां-पेक्षा पैसा अधिक महत्त्वाचा झाला आणि उत्पन्नाचे केवळ एक साधन म्हणूनच जमिनी-कडे पाहिले जाऊ लागले. आता सर्वसाधारण संपत्तीप्रमाणेच जमिनीचाही विचार करण्यास लोक शिकले होते. म्हणजे अधिक पैसा मिळवण्याच्या आशेने वस्तू विकत घेणाऱ्या आणि विकणाऱ्या सट्टेबाजांच्या हातचे जमीन हे एक खेळणे बनले होते.

ह्या शेत-बंदिस्तीच्या प्रसारामुळे लोकांना अतिशय कष्ट सहन करावे लागले, पण शेतीसुधारणेची शक्यता त्यामुळे वाढीस लागली. त्याचप्रमाणे भांडवली उद्योगाला जेव्हा कामगारांची जरुरी होती तेव्हा अतिरिक्त श्रमिकांचा पुरवठा त्यांना उपलब्ध झाला. कारण जमिनीवरून हाकलून दिलेल्या या दुर्दैवी लोकांकडे आता स्वतःच्या श्रमशक्ती-व्यतिरिक्त जगण्याचे दुसरे कोणतेही साधन उरले नव्हते.

◇ ◇ ◇

१०

मदतनिसांची गरज आहे – अर्जासाठी किमान वयोमर्यादा – वय वर्षे दोन

बाजारपेठेची वाढ. हे शब्द तुमच्या जीभेवर पुनः पुन्हा घोळवा. तुमच्या मनात ते पक्के ठसवा. आपल्याला ठाऊक असलेले भांडवली उद्योगधंदे कसे अस्तित्वात आले हे समजून घेण्यासाठी ते गुरुकिल्लीप्रमाणे उपयोगी आहेत.

उत्पादनाच्या ठिकाणी येऊन ग्राहक मागणी करतो आणि उत्पादक त्याला पुरवठा करतो अशा छोट्या आणि स्थिर बाजारपेठेसाठी वस्तूंचे उत्पादन करणे ही एक गोष्ट झाली. परंतु शहराच्या मर्यादा ओलांडून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी वस्तूंचे उत्पादन करणे ही एक फारच वेगळी गोष्ट होती. गिल्ड-व्यवस्था छोट्या, स्थानिक बाजारपेठेसाठी अस्तित्वात आली होती. पण बाजारपेठेचे स्वरूप राष्ट्रीय आणि आंतर-राष्ट्रीय बनल्यावर गिल्डव्यवस्था अयोग्य ठरू लागली. एका शहराच्या व्यापारातील खाचाखोचा समजावून घेऊन तो व्यापार हाताळणे स्थानिक कारागिरांना शक्य होते. परंतु जागतिक व्यापार ही एक वेगळीच चीज होती. त्यामुळे बाजारपेठेच्या विस्ताराबरोबर कारागिरांनी केलेल्या वस्तू शेकडो, हजारो मैल दूर असलेल्या ग्राहकांना मिळतील याची जबाबदारी उचलणाऱ्या दलालाचा जन्म झाला.

गिल्डचा मालक-कारागीर केवळ वस्तू तयार करण्याचेच काम करत नसे. त्याची आणखी चार कामे होती. त्याच्या ठायी पाच व्यक्ती साकार झाल्या होत्या. कच्चा माल शोधून त्यासाठी सौदा करण्याची त्याच्यावर जबाबदारी असल्यामुळे तो व्यापारी होता. त्याच्या कार्यशाळेमध्ये जर्नीमेन आणि ॲप्रेन्टिसेस काम करत असल्याने तो मालक होता. त्यांच्या कामावर देखरेख करत असल्यामुळे तो फोरमन होता. तसेच उत्पादित वस्तू ग्राहकाला विकत असल्यामुळे तो दुकानदार किंवा विक्रेता होता.

अशा वेळी दलालाचे आगमन होते आणि मालक-कारागिराची पाच कामे जाऊन तीनच शिल्लक राहातात — कामगार, मालक आणि फोरमन. व्यापार आणि दुकानदारी ही कामे आता त्याच्या अखत्यारीमध्ये राहात नाहीत. त्याच्याकडे कच्चा

माल आणून देणे आणि उत्पादित माल घेऊन जाणे ही कामे आता दलाल करू लागतो. उत्पादक आणि ग्राहक यांच्यामध्ये दलाल उभा ठाकतो आणि मग ज्या वेगाने कच्चा माल येईल त्या वेगाने वस्तूंचे उत्पादन करत राहाणे एवढीच जबाबदारी आता मालक-कारागिरावर उरते.

दलालाने स्वतःच्या मालावर अनेक कारागिरांना त्यांच्याच घरांमध्ये काम करायला देणे या पद्धतीला " कंत्राटी " पद्धत असे म्हणतात. गिल्ड व्यवस्था आणि कंत्राटी पद्धत यामध्ये उत्पादनतंत्राच्या बाबतीत काहीच फरक नव्हता हे आपण लक्षात घेतले पाहिजे. कंत्राटी पद्धतीमध्येही मालक–कारागीर आणि त्याचे मदतनीस घरामध्ये तीच जुनी अवजारे वापरून उत्पादन करीत. पण उत्पादनपद्धती तीच राहिली तरीही व्यापाऱ्याचे काम करणाऱ्या दलालाच्या आगमनामुळे विक्रीपद्धती मात्र एका नव्या पायावर उभारली गेली.

या दलालाने जरी उत्पादनतंत्रामध्ये बदल घडवला नाही तरीही वस्तूंचे उत्पादन वाढवण्यासाठी श्रमसंचलन आणि श्रमविभागणी यामध्ये त्याने बदल घडवून आणले. विशेषीकरणाचे फायदे त्याच्या लौकरच ध्यानात आले. दलालाच्या कृतीला सतराव्या शतकातील विल्यम पेट्टि या नामवंत अर्थतज्ज्ञाने शब्दबद्ध केले आहे : " कापड तयार करण्याच्या प्रक्रियेत एकाच माणसाने सर्व कामे कशीतरी करण्यापेक्षा एकाने कापूस पिंजणे, दुसऱ्याने सूत कातणे, तिसऱ्याने कापड विणणे, चौथ्याने ते ओढणे, पाचव्याने कपडे तयार करणे आणि सहाव्याने त्याचे दाबून गठ्ठे बांधणे असे केल्यास कापड अधिक स्वस्तात तयार करता येते. " एखादी वस्तू तयार करण्यासाठी मोठ्या संख्येने माणसे नोकरीस ठेवल्यावर त्यांच्यामध्ये कामाची विभागणी करता येते. प्रत्येक कामगाराला एक विशिष्ट काम दिल्यास, पुनःपुन्हा तेच काम केल्यामुळे तो त्या कामात चांगला तज्ज्ञ बनतो. यामुळे वेळेची बचत होते आणि उत्पादनाचा वेग वाढतो. वाढत्या बाजारपेठेची वाढती मागणी पुरवण्यासाठी अधिकाधिक बदल करावे लागतात. त्या काळच्या उद्यमशील दलालाच्या डोक्यात असेच विचार घोळत.

पण गिल्डच्या सभासदांना मात्र वेगळेच वाटत असे. स्वतःच्या विशिष्ट वस्तूचे उत्पादन आणि विक्री यावरील एकाधिकारशाहीबाबत गिल्ड्स् किती आग्रही होत्या हे आपण पाहिलेच आहे. स्वतःच्या " हक्कांबाबत " गिल्डचे सभासद अतिशय जागरूक असत. ग्लासगो कॉर्पोरेशन ऑफ मेकॅनिक्स या संघटनेने जेम्स वॅट यांना त्यांच्या वाफेच्या इंजिनाच्या नमुन्यावर काम करायला त्यांनी बंदी केली होती असे पुरावे आढळतात — कारण ते कॉर्पोरेशनचा सभासद नव्हते. काम करण्याच्या जुन्या पद्धतीमध्ये बदल करायला दलालांनी सुरुवात केल्यावर, प्रत्येक विशिष्ट वस्तूच्या उत्पादनावर आपला सर्वंकष अधिकार आहे, असे मानणाऱ्या गिल्ड सभासदांनी त्याविरुद्ध ओरड करायला सुरुवात केली जाणार हे उघडच आहे. गिल्ड्स्मध्ये परंपरेची सत्ता होती. जुन्या पद्धती, जुनी बाजारपेठ, जुनी एकाधिकारशाही, नेहमीप्रमाणेच उद्योगधंदा — बहुतेक गिल्ड सभासदांना हेच हवे होते. पण साहसी, धाडसी आणि परिस्थितीचे भान असलेल्या

दलालाला ते सोयीचे नव्हते. वाढत्या मागणीच्या काळात परंपरेचे लाड करत बसायला त्याला वेळ नव्हता. त्याला जुन्या पद्धती बदलायच्या होत्या. नव्या बाजारपेठेकडे लक्ष पुरवायचे होते आणि जुन्या गिल्ड एकाधिकारशाहीशी सामना द्यायचा होता. असंख्य नियम आणि कायदे असलेली गिल्डव्यवस्था जुनीपुराणी होती, कालबाह्य झाली होती आणि उद्योगधंद्यांच्या विकासप्रक्रियेतील अडसर बनली होती. ती झुगारून देणे दलालाला भागच होते आणि ती झुगारून देण्यात आली.

अर्थात, ही गोष्ट एकाच झटक्यात आणि अगदी उघड उघड घडली नाही. (फ्रेंच राज्यक्रांतीपर्यंत फ्रान्समध्ये गिल्ड व्यवस्थेवर कायद्याने बंदी घालण्यात आली नव्हती. तर इंग्लंडमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळापर्यंत गिल्ड्सच्या सवलती अधिकृतरित्या शाबूत होत्या.) अनेकदा गिल्ड व्यवस्थेच्या चौकटीतच दलाल कार्यप्रवण असे. तर तिचे बाह्य रूप मान्य केल्याचे दाखवून प्रत्यक्षात तिची मुळे छाटण्याचा उद्योग दलाल चालू ठेवीत. काही काही वेळा एखाद्या गिल्डमधील श्रीमंत मालक–कारागीर दुसऱ्या गिल्डमधील मालक–कारागिरांना नोकरीस ठेवीत, तर कधी एखाद्या उद्योगातील एका गिल्ड व्यापाराचे काम हाती घेई आणि त्याच उद्योगातील इतर गिल्ड्सना " कंत्राटी " पद्धतीने काम देई. गिल्ड व्यवस्थेचा मूलाधार असलेली मालक–कारागिरांमधील समानता तर कधीच नष्ट झाली होती.

जरूर पडेल तेव्हा स्वतःचा उद्योग शहरांमधून ग्रामीण भागात, गिल्ड परगण्याच्या कक्षेबाहेर नेऊन, दलाल गिल्डचे नियम धाब्यावर बसवीत. अशा ठिकाणी मजुरी, ॲप्रेन्टिसेसची संख्या या बाबतीत गिल्डच्या नियमांची पर्वा न करता स्वतःला हव्या त्या पद्धतीने त्याला कारागिरांकडून काम करवून घेता येई. ॲम्ब्रोज क्रॉले या ग्रीनिचमधील लोखंडाच्या व्यापाऱ्याने डुऱ्हामला प्रयाण करून, कंत्राटी पद्धतीने मोठ्या प्रमाणावर हार्डवेअरचे उत्पादन सुरू केले. " पूर्वी एक छोटेसे गाव असलेल्या ठिकाणी क्रॉलेने १५०० वस्तीचे उद्योगधंद्याचे नगर उभारले आणि खिळे, कुलुपे, बोल्ट्स्, चिमटे, कुदळी आणि पोलादाची इतर अवजारे यांचे उत्पादन करायला सुरुवात केली. ती घरे क्रॉलेच्या मालकीची होती आणि ' कराराची अनामत रकम म्हणून भरपूर पैसे घेतल्यावरच ' त्याने कारागिरांना कच्चा माल आणि अवजारे पुरवली होती. ही रकम दिल्यामुळे, वर्कशॉप मांडून एक मालक–कारागिर म्हणून स्वतःच्या परिवारासह राहण्याचा आणि काम करण्याचा तसेच एखाद-दुसरा जर्नीमन आणि एखादा ॲप्रेन्टिस मजुरीवर ठेवण्याचा अधिकार कुशल कारागीराला मिळाला होता. मालक–कारागिराची कार्यशाळा हीच कामाची जागा होती आणि त्याला उत्पादनाच्या प्रमाणात मजुरी मिळे....१७०६ साली नाइट असलेले सर ॲम्ब्रोज क्रॉले नंतर अण्डोव्हरमधून लोकसभेचे सभासद बनले आणि तोपर्यंत त्याच्याकडे २ लाख पौंड एवढी संपत्ती जमा झाली होती. "

औद्योगिक व्यवस्थेतील या बदलाला गिल्ड सभासदांनी साहजिकच विरोध केला. स्वतःची सनातन एकाधिकारशाही कायम राखण्यासाठी त्यांनी लढा दिला. पण गिल्ड्सचा सुवर्णकाळ संपला होता. ते पराजितांची लढाई लढत होते. बाजारपेठेच्या

विकासामुळे त्यांची व्यवस्था जुनीपुराणी झाली होती, वस्तूंची वाढती मागणी पुरवायला ती असमर्थ होती. " ४ फेब्रुवारी १६४६ रोजी संबंधित गिल्ड सभासदांनी शासनकर्त्यांकडे केलेल्या एका तक्रारीमध्ये ग्रामीण भागातील रिबन उत्पादनवाढीबद्दल हरकती घेतल्या... दलालांनी त्याला उत्तर दिले की १६१२ सालापासून परिस्थिती फारच बदलली आहे. व्यापार फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आता केवळ एका दलालाची वर्षभराची मागणी पुरवायला गिल्ड सभासदांची संख्या फारच अपुरी आहे."

कापडाचा व्यापार करणारे दलाल उत्पादनवाढ करण्यासाठी विशेषच उत्सुक होते, कारण बऱ्याच काळापासून पूर्वेकडील युरोपच्या निर्यातीमध्ये कापड ही महत्त्वाची बाब होती. या वाढत्या मागणीला पुरवठा करण्यासाठी अधिकाधिक कारागिरांची आवश्यकता होती. त्यामुळे केवळ शहरातील गिल्ड सभासदांनाच नव्हे तर गावातील काम करण्याची तयारी असलेल्या पुरुष, स्त्रिया व मुले यांनाही दलाल कच्चा माल पुरवीत.

शेत-बंदिस्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना स्वतःच्या रोडावलेल्या उत्पन्नामध्ये किरकोळ भर टाकण्याची एक संधी ग्रामीण भागातील या वाढत्या उद्योगधंद्यांमुळे मिळाली. गाव सोडून जाण्याची पाळी आलेले अनेकजण दलालाने आणलेल्या कामामुळे गावलाच चिकटून राहिले. **रॉबिन्सन क्रूसो** या पुस्तकाचे लेखक डॅनियल डेफो यांनी १७२४ मध्ये (नंतर नावाजलेले) 'ए टूर थ्रू ग्रेट ब्रिटन' [ग्रेट ब्रिटनमधून एक सफर] नावाचे एक पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी दलालांनी दिलेले काम करणाऱ्या गावांचे वर्णन केले आहे. " उद्योजकांच्या घरांच्या आसपासच अगणित संख्येने छोट्या छोट्या झोपड्या पसरलेल्या होत्या. त्यामध्ये पिंजणे, कातणे यासारखी सातत्याने काही ना काही कामे करणारे कामगार आणि त्यांच्या स्त्रिया व मुले राहातात. अशा तऱ्हेने लहानापासून थोरापर्यंत सर्वजण काम करून स्वतःची भाकरी मिळवू शकतात. मूल चार वर्षांपेक्षा मोठे असेल–नसेल, पण त्याचे हात त्याचे पोट भरायला समर्थ होते म्हणूनच वस्तीमध्ये घराबाहेर शुकशुकाट असला तरी मालक–उद्योजकांपैकी एखाद्याच्या घराचे दार ठोठावल्यावर त्या घरात कामामध्ये व्यग्र असलेले लोक आम्हाला दिसले. काहीजण कापड रंगवण्याचे काम करत होते, तर काहीजण कपडे तयार करत होते. इतर काही लोक मागावर काम करत होते...सगळे जण अविरतपणे कामात गुंतलेले होते आणि सर्वांना भरपूर काम होते..."

आणि ज्याप्रमाणे हार्डवेअरचा उद्योग करणारे क्रॉले वाढत्या बाजारपेठेला आवश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा करून श्रीमंत झाले, त्याचप्रमाणे कापडाच्या धंद्यात असलेले दलालही श्रीमंत झाले. डेफो वाचकांना पुढे सांगतात :

" मला मिळालेल्या माहितीप्रमाणे ब्रॅडफोर्डच्या परिसरात दहा ते चाळीस हजार पौंडापर्यंत धनसंचय केलेले कापडाचे उद्योगपती सापडणे ही फारशी कठीण गोष्ट नव्हती. अशी अनेक कुटुंबे या उद्योगातूनच वर आली आहेत आणि त्यांनीच हा प्रचंड उद्योग उभा केला आहे...पण न्यूबेरीचा विचार करता हे काहीच नव्हते. जॅक ऑफ न्यूबेरी हा एक असा कापडसम्राट होता की लंडनकडे जाणाऱ्या त्याच्या कापडाने

भरलेल्या गाड्या राजा जेम्सने पाहिल्या आणि चौकशी केली तेव्हा त्याला उत्तर मिळाले की त्या सर्व गाड्या जॅक ऑफ न्यूबेरीच्या होत्या...आणि या कथेनुसार राजालाही असे वाटले की हा जॅक ऑफ न्यूबेरी आपल्यापेक्षा जास्त श्रीमंत आहे. ”

या जॅक ऑफ न्यूबेरीचे एवढे प्रस्थ असण्याचे एक कारण होते. इतर दलाल उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल कारागिरांना घरोघर पुरवत असत. पण याने मात्र स्वतःच्याच इमारतीमध्ये दोनशे माग बसवले होते त्यावर सहाशे पुरुष, स्त्रिया आणि मुले काम करत असत. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील ही घटना होती. त्यानंतर ३०० वर्षांनी विकसित झालेल्या कारखान्यांचे ते बाळरूप होते.

पिंजण्यासाठी, कातण्यासाठी, विणण्यासाठी कारागिरांच्याच घरामध्ये कच्चा माल पुरवणारे न्यूबेरी आणि इतर दलाल हे भांडवलदार होते. ते त्यांच्या मालकीच्या कापडाची विक्री करून नफा मिळवीत. त्यांच्या हाताखाली काम करणारे मालक-कारागीर आणि जर्नीमेन हे त्यांचे पगारी नोकर होते. असे कारागीर स्वतःच्याच घरात काम करीत. स्वतःच्या वेळेचा वापर कसा करायचा हे ते स्वतःच ठरवीत आणि त्यांची अवजारे त्यांच्याच मालकीची होती (हा नेहमीचाच प्रकार होता असे नव्हे). पण आता ते स्वतंत्र राहिले नव्हते. कचा माल त्यांच्या मालकीचा नव्हता. त्यांच्याकडे दलाल, उद्योजक कचा माल आणून देत. (यालाही काही अपवाद होते — काही जणांची कच्च्या मालावर मालकी होती.) ग्राहकांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध उरला नव्हता. आता त्यांची अवस्था कंत्राटाने काम करणारे कामगार अशी झाली होती आणि व्यापाराचे काम भांडवलदार-उद्योजकांनी हाती घेतले होते. म्हणजे ते खऱ्या अर्थाने हस्तोद्योगी (मॅन्युफॅक्चरर्स) (**मॅन्यु** म्हणजे हाताने + **फॅक्चरा** म्हणजे घडवलेली = हाताने घडवलेली वस्तू) बनले होते.

नागरी अर्थव्यवस्थेबरोबर उदयाला आलेल्या गिल्ड व्यवस्थेमध्ये भांडवलाची भूमिका फारशी महत्त्वाची नव्हती. परंतु राष्ट्रीय अर्थव्यवस्थेबरोबर उदयाला आलेल्या कंत्राटी पद्धतीमध्ये भांडवलाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. आता कारागिरांना कचा माल पुरवण्यासाठी आणि उत्पादित वस्तूंच्या विक्रीसाठीही बराच पैसा लागे. त्यामुळे पैसेवाला माणूस म्हणजेच भांडवलदार हा कंत्राटी पद्धतीचा सूत्रधार बनला.

आता वाढत्या मागणीमुळे महागडी साधनसामग्री लागणाऱ्या उद्योगांची रचना भांडवली पद्धतीने करणे आवश्यक झाले. सोळाव्या शतकातील इंग्लंडमधील कोळशाच्या खाणी हे याचे उत्तम उदाहरण होते. पृष्ठभागावरील कोळशाचे थर संपल्यावर आता खोल खाणकामाची आवश्यकता निर्माण झाली. त्यासाठी सढळ हाताने गुंतवणूक आवश्यक होती आणि त्यासाठी औद्योगिक रंगमंचावर भांडवलदाराचे आगमन अटळ होते.

त्याचप्रमाणे युद्धावर असलेल्या सेनांची आणि संबंधित उद्योगधंद्यांची लोखंड, पितळ, तांबे वगैरेंची मागणी पुरवण्यासाठी खनिज धातूंच्या उत्पादनामध्ये प्रचंड प्रमाणावर

भांडवल गुंतवणूक करण्यात आली. धातू-उद्योगांसाठी लागणाऱ्या पैशाचे प्रमाण इतके मोठे होते की एवढा पैसा जमा करण्यासाठी भांडवलदारांनी एकत्र येऊन अनेक समाईक भांडवल कंपन्या स्थापन केल्या. जी गोष्ट पूर्वी व्यापारी मोहिमांकरता करण्यात आली होती, तिची आता कारखानदारी क्षेत्रामध्ये पुनरावृत्ती झाली.

नव्या प्रदेशांच्या शोधामुळे साखर-शुद्धीकरण, तंबाखू इत्यादींसारखे संपूर्णपणे नवे उद्योग अस्तित्वात येणे स्वाभाविक होते. या नव्या धंद्यांमध्ये पैसे गुंतवण्याचा धोका पत्करणाऱ्या लोकांना सरकारने एकाधिकारशाही बहाल केली. हे नवे उद्योगधंदे सुरुवातीपासूनच भांडवली पायावर उभारण्यात आले.

सोळाव्या ते अठराव्या शतकाच्या कालखंडात मध्ययुगीन काळातील स्वतंत्र कारागीर लोप पावू लागले. त्यांच्या जागी भांडवलदार–व्यापारी–दलाल–उद्योजक यांच्यावर अधिकाधिक अवलंबून राहणारा मोलमजुरीवर काम करणाऱ्यांचा वर्ग अस्तित्वात येऊ लागला.

१. घरगुती व्यवस्था : परिवारातील माणसे स्वतःच्या उपयोगासाठी वस्तूंचे उत्पादन करत, विक्रीसाठी नाही. तेथे बाहेरील बाजारपेठेला पुरवठा करण्यासाठी काम करण्यात येत नसे. हा मध्ययुगातील सुरुवातीचा काळ.

२. गिल्ड व्यवस्था : बाहेरील छोट्या, स्थिर बाजारपेठेसाठी स्वतंत्र मालक–कारागिरांनी दोन-तीन माणसांना नोकरीस ठेवून केलेले उत्पादन. ज्यावर काम करायचे तो कच्चा माल आणि ज्यांनी काम करायचे ती अवजारे या दोन्ही गोष्टी कारागिरांच्या मालकीच्या होत्या. स्वतःचे श्रम नव्हे, तर त्या श्रमाचे फळ–उत्पादित वस्तू ते विकीत. हा संपूर्ण मध्ययुगीन काळ.

३. कंत्राटी पद्धत : बाहेरील वाढत्या बाजारपेठेसाठी गिल्ड व्यवस्थेप्रमाणेच मालक–कारागिरांनी मदतनिसांच्या सहाय्याने घरामध्ये केलेले उत्पादन. पण त्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे मालक-कारागीर आता स्वतंत्र नव्हते. अवजारे त्यांच्या मालकीची असली तरीही कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी आणि उत्पादित मालाच्या वितरणासाठी ते आता ग्राहक आणि त्यांच्यामधील दुवा असणाऱ्या उद्योजकावर अवलंबून होते. आता ते पीस-रेटने काम करणारे मजूर बनले होते. काळ : सोळावे ते अठरावे शतक.

४. फॅक्टरी किंवा कारखाना व्यवस्था : घराबाहेर, मालकाच्या इमारतीमध्ये कडक देखरेखीखाली अधिक व्यापक आणि अनिश्चित बाजारपेठेसाठी सुरू असणारे उत्पादन. यात कामगारांचे स्वातंत्र्य पूर्णपणे लयाला जाते. गिल्ड व्यवस्थेप्रमाणे आता कच्च्या मालावर कारागिरांची मालकी नव्हती की कंत्राटी पद्धतीप्रमाणे अवजारे त्यांच्या मालकीची नव्हती. यंत्रसामुग्रीच्या वाढत्या उपयोगामुळे कामातील कसब आता पूर्वीइतके महत्त्वाचे उरले नाही. पूर्वीपेक्षा आता भांडवलाचे महत्त्व शतपटींनी वाढले. काळ : एकोणिसाव्या शतकापासून आजपर्यंत.

एक सूचना:
थांबा
पहा
आणि
ऐका.

एक मार्गदर्शक म्हणून वरील आराखडा उपयोगी आहे. पाठ करायचा अध्याय म्हणून नव्हे. वरील आराखडा म्हणजे संपूर्ण सत्य आहे असे समजणे धोक्याचे होईल. काही मर्यादा लक्षात घेऊन त्याकडे पाहिले तर तो उपयोगी ठरेल. अगदी जसा आहे तसाच त्याचा वापर केला तर गाडी चुकीच्या मार्गावर जाईल.

उदाहरणार्थ, प्रत्येक उद्योग या चार अवस्थांमधून गेला असे समजणे चुकीचे ठरेल. काही उद्योगांबाबत ते खरे होते. पण सर्व उद्योगांबाबत नाही. काही उद्योग तिसऱ्या अवस्थेतच सुरू झाले, तर काही उद्योगांनी अनेक अवस्था ओलांडून पुढील अवस्थेमध्ये उडी मारली.

या आराखड्यामध्ये दर्शवलेला काळ एक ढोबळ अंदाज आहे. एक अवस्था चांगलीच प्रगत झाली की तिच्या ऱ्हासाचीही चिन्हे दिसू लागत आणि पुढील अवस्थेची बीजे

तक्ता ४

ताशी	मजुरीप्रमाणे	गृहकामगारांचे वाटप	परिवारांची संख्या
१ सेन्ट	आणि	२ सेन्टपेक्षा कमी	५
२ सेन्ट	आणि	३ सेन्टपेक्षा कमी	९
३ सेन्ट	आणि	४ सेन्टपेक्षा कमी	१५
४ सेन्ट	आणि	५ सेन्टपेक्षा कमी	९
५ सेन्ट	आणि	६ सेन्टपेक्षा कमी	१४
६ सेन्ट	आणि	७ सेन्टपेक्षा कमी	८
७ सेन्ट	आणि	८ सेन्टपेक्षा कमी	५
८ सेन्ट	आणि	९ सेन्टपेक्षा कमी	१५
९ सेन्ट	आणि	१० सेन्टपेक्षा कमी	१४
१० सेन्ट	आणि	११ सेन्टपेक्षा कमी	१३
११ सेन्ट	आणि	१२ सेन्टपेक्षा कमी	५
१२ सेन्ट	आणि	१३ सेन्टपेक्षा कमी	२
१३ सेन्ट	आणि	१४ सेन्टपेक्षा कमी	५
१४ सेन्ट	आणि	१५ सेन्टपेक्षा कमी	३
१५ सेन्ट	आणि	अधिक	७

एकूण ... १२९

मूळ धरत. तेराव्या शतकामध्ये गिल्ड व्यवस्था प्रगतीच्या ऐन शिखरावर असताना उत्तर इटालीमध्ये कंत्राटी पद्धतीची चिन्हे दिसू लागली होती. त्याप्रमाणे कारखाना व्यवस्थेची चिन्हेही कंत्राटी पद्धतीच्या काळातच मूळ धरू लागली होती. सोळाव्या शतकातील जॅक ऑफ न्यूबेरी आठवतो ना ?

याच्या उलट प्रकारही अस्तित्वात होता. औद्योगिक विकासामध्ये एका विशिष्ट कालखंडात एका विशिष्ट उत्पादन व्यवस्थेचा व्यापक प्रमाणावर प्रसार होतो याचा अर्थ आधीची व्यवस्था संपूर्णपणे नामशेष होते असा नव्हे. आरालख्यात सांगितल्याप्रमाणे कंत्राटीपद्धत येऊन बराच काळ लोटल्यावरही गिल्ड व्यवस्था टिकून होती. एक अवस्था दुसऱ्या अवस्थेमध्ये टिकून राहाते याचा अस्सल पुरावा कंत्राटी पद्धतीसंबंधीच्या पुढील उताऱ्यामध्ये मिळतो : "धातू उद्योगातील कंत्राटी व्यवस्थेची पाहाणी. उत्पादित वस्तूंमध्ये हूक, स्नॅप फासनर्स, सेफ्टी पिन्स, ब्रॉच पिन्स आणि धातूची बटणे यांचा समावेश होतो. या पाहाणीतील गृहकामगारांपैकी काहीजण एका टोकाला दोऱ्या किंवा वायर्स लावण्याचे काम करतात असे दिसून आले... (९९ पानावरील तक्ता पाहा.)

"... म्हणजे सर्वसाधारण परिवाराला दर आठवड्याला ३५ मनुष्यतास (मॅनअवर्स) काम करावे लागते आणि त्याबद्दल त्यांना १·७५ डॉलर्स मिळतात.

"पाहाणी केलेल्या घरांमध्ये दाटीवाटीची, आरोग्यास अपायकारक आणि मोडकळीस आलेली घरे, फाटके-तुटके कपडे, निकस अन्नाचा अपुरा पुरवठा या गोष्टींबद्दल सतत तक्रारी ऐकू आल्या...

"पाहाणी करण्यात आलेल्या १२९ परिवारांपैकी ९६ परिवारांमध्ये सोळा वर्षांखालील मुले काम करत होती...त्यापैकी निम्मी बारा वर्षांखालील होती...चौतीस मुले आठ वर्षांखालील, तर बारा मुले पाच वर्षांखालील होती....

"नोकरीवर ठेवलेल्या मुलांचे वयानुसार वाटप : (१०१ पानावरील तक्ता क्रमांक ५ पाहणे).

तुम्ही हादरलात, खरं ना ? दोन आणि तीन वर्षांची मुले कामाला जुंपलेली ठाऊक आहेत तुम्हाला ? सोळाव्या ते अठराव्या शतकातील कंत्राटी पद्धतीचा हा अहवाल आहे असेच तुम्हाला वाटत आहे ना ? तो अहवाल त्यासंबंधीचा नाही. मग या उताऱ्यामध्ये वर्णन केलेल्या परिस्थितीचे स्थळ आणि काळ कोणता ?

काळ : ऑगस्ट १९३४.

स्थळ : कनेक्टिकट, यु. एस्. ए. [अमेरिका]

तक्ता ५

वय	नोकरीवर ठेवलेली मुले
२ – ३ वर्षे	२
३ – ४	२
४ – ५	८
५ – ६	२
६ – ७	७
७ – ८	१३
८ – ९	१५
९ – १०	१९
१० – ११	२३
११ – १२	२१
१२ – १३	४०
१३ – १४	२६
१४ – १५	२९
१५ – १६	३५
माहिती नाही	४
एकूण	२४६

◇ ◇ ◇

मूळ धरत. तेराव्या शतकामध्ये गिल्ड व्यवस्था प्रगतीच्या ऐन शिखरावर असताना उत्तर इटालीमध्ये कंत्राटी पद्धतीची चिन्हे दिसू लागली होती. त्याप्रमाणे कारखाना व्यवस्थेची चिन्हेही कंत्राटी पद्धतीच्या काळातच मूळ धरू लागली होती. सोळाव्या शतकातील जॅक ऑफ न्यूबेरी आठवतो ना ?

याच्या उलट प्रकारही अस्तित्वात होता. औद्योगिक विकासामध्ये एका विशिष्ट कालखंडात एका विशिष्ट उत्पादन व्यवस्थेचा व्यापक प्रमाणावर प्रसार होतो याचा अर्थ आधीची व्यवस्था संपूर्णपणे नामशेष होते असा नव्हे. आराखड्यात सांगितल्याप्रमाणे कंत्राटीपद्धत येऊन बराच काळ लोटल्यावरही गिल्ड व्यवस्था टिकून होती. एक अवस्था दुसऱ्या अवस्थेमध्ये टिकून राहाते याचा अस्सल पुरावा कंत्राटी पद्धतीसंबंधीच्या पुढील उताऱ्यामध्ये मिळतो : " धातू उद्योगातील कंत्राटी व्यवस्थेची पाहाणी. उत्पादित वस्तूंमध्ये हूक, स्नॅप फासनर्स, सेफ्टी पिन्स, बॉबी पिन्स आणि धातूची बटणे यांचा समावेश होतो. या पाहाणीतील गृहकामगारांपैकी काहीजण एका टोकाला दोऱ्या किंवा वायर्स लावण्याचे काम करतात असे दिसून आले... (९९ पानावरील तक्ता पाहा.)

" ... म्हणजे सर्वसाधारण परिवाराला दर आठवड्याला ३५ मनुष्यतास (मॅनअवर्स) काम करावे लागते आणि त्याबद्दल त्यांना १·७५ डॉलर्स मिळतात.

" पाहाणी केलेल्या घरांमध्ये दाटीवाटीची, आरोग्यास अपायकारक आणि मोडकळीस आलेली घरे, फाटके-तुटके कपडे, निकस अन्नाचा अपुरा पुरवठा या गोष्टींबद्दल सतत तक्रारी ऐकू आल्या...

" पाहाणी करण्यात आलेल्या १२९ परिवारांपैकी ९६ परिवारांमध्ये सोळा वर्षांखालील मुले काम करत होती...त्यापैकी निम्मी बारा वर्षांखालील होती...चौतीस मुले आठ वर्षांखालील, तर बारा मुले पाच वर्षांखालील होती....

" नोकरीवर ठेवलेल्या मुलांचे वयानुसार वाटप : (१०१ पानावरील तक्ता क्रमांक ५ पाहणे).

तुम्ही हादरलात, खरं ना ? दोन आणि तीन वर्षांची मुले कामाला जुंपलेली ठाऊक आहेत तुम्हाला ? सोळाव्या ते अठराव्या शतकातील कंत्राटी पद्धतीचा हा अहवाल आहे असेच तुम्हाला वाटत आहे ना ? तो अहवाल त्यासंबंधीचा नाही. मग या उताऱ्यामध्ये वर्णन केलेल्या परिस्थितीचे स्थळ आणि काळ कोणता ?

काळ : ऑगस्ट १९३४.

स्थळ : कनेक्टिकट, यु. एस्. ए. [अमेरिका]

तक्ता ५

वय	नोकरीवर ठेवलेली मुले
२ – ३ वर्षे	२
३ – ४	२
४ – ५	८
५ – ६	२
६ – ७	७
७ – ८	१३
८ – ९	१५
९ – १०	१९
१० – ११	२३
११ – १२	२१
१२ – १३	४०
१३ – १४	२६
१४ – १५	२९
१५ – १६	३५
माहिती नाही	४
	एकुण २४६

◇ ◇ ◇

११

सोने, मोठेपणा आणि वैभव

एखादा देश कशामुळे श्रीमंत होतो ? काही सुचते का ? जरा गंमत म्हणून आपल्या कल्पनांची यादी करा आणि सतराव्या आणि अठराव्या शतकातील चाणाक्ष माणसांच्या कल्पनांशी त्यांची तुलना करून पहा. या विषयामध्ये त्यांना अतिशय रस होता. कारण केवळ एखाद्या शहराच्या नव्हे तर संपूर्ण देशाच्या, राष्ट्रीय शासनसत्तेच्या दृष्टिकोनातून विचार करताना त्यांच्यापुढे नवीन समस्या उभ्या राहिल्या होत्या. आता साऊथॲम्प्टन, लिॲान किंवा ॲमस्टरडॅम या शहरांकरता नव्हे तर इंग्लंड, फ्रान्स किंवा हॉलंड या देशांसाठी सुयोग्य काय याचा विचार करणे त्यांना आवश्यक वाटू लागले. शहरांना श्रीमंत आणि महत्त्वपूर्ण बनवणारी तत्त्वे त्यांना राष्ट्रीय पातळीवर व्यवहारामध्ये उतरवायची होती. राजकीय सत्ता काबीज केल्यावर त्यांनी आर्थिक सत्तेकडे लक्ष वळवले. संपूर्ण देशाविषयी लिखित आणि तशाच प्रकारच्या कायद्यांचा पुरस्कार करण्यावर त्यांनी भर दिला. म्हणूनच संपूर्ण राष्ट्राला सत्ता आणि संपत्ती प्राप्त होईल असे कायदे त्या काळच्या सरकारांनी केले. हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून दैनंदिन जीवनाच्या प्रत्येक पैलूवर सरकार नजर ठेवी. त्यानुसारच प्रजाजनांच्या जीवनक्रमाचे हेतुपुरस्सर नियमन करी आणि त्यामध्ये बदल घडवी. त्या काळी करण्यात आलेले कायदे आणि मांडण्यात आलेले सिद्धांत यांचे इतिहासकारांनी "व्यापारी व्यवस्था" असे वर्गीकरण केले आहे. पण खरे तर ती कोणत्याही प्रकारची व्यवस्था नव्हती. आपण ज्या अर्थाने समजतो त्या अर्थाने ही व्यापारशाही म्हणजे एक वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था नव्हती, तर सत्ता आणि संपत्ती मिळवण्यासाठी शासनसंस्थेने वेळोवेळी उपयोगात आणलेल्या अर्थशास्त्रीय सिद्धांताचा तो एक संग्रह होता. केवळ आढ्याकडे नजर लावून या ना त्या गोष्टीबद्दल विचार करत स्वस्थ बसण्याची राज्यकर्त्यांना आवड होती म्हणून या समस्येत त्यांना रस नव्हता. पण त्यांचा खजिना सदैव रिकामा असे आणि पैशाची तर त्यांना नितांत गरज असे. म्हणून ही समस्या सोडविण्यासाठी त्यावेळच्या शासनसंस्थांना कंबर कसणे भागच होते. देश संपन्न कशामुळे होतो हा एखाद्या निरुद्योगी माणसापुढील प्रश्न नव्हता. तर तो व्यवहारातील खराखुरा प्रश्न होता आणि त्याचे उत्तर शोधण्याखेरीज राज्यकर्त्यांना

गत्यंतर नव्हते.

सोळाव्या शतकात स्पेन हा जगातील सर्वात श्रीमंत व सामर्थ्यशाली देश होता. याचे कारण काय असा प्रश्न इतर देशांतील चाणाक्ष लोकांनी स्वतःला विचारला तेव्हा स्पेनच्या वसाहतींमधून स्पेनकडे वाहणाऱ्या संपत्तीच्या ओघामध्ये याचे मूळ आहे असे त्यांना वाटले. एखाद्या देशात सोने आणि चांदी जेवढी अधिक तेवढा तो देश अधिक श्रीमंत—व्यक्तींप्रमाणेच राष्ट्रांच्या बाबतीतही ही गोष्ट खरी आहे असे त्यांना वाटले. उद्योग आणि व्यापार यांची चक्रे अधिकाधिक वेगाने कशामुळे फिरतात ? सोने आणि चांदी यामुळे ! आपल्या देशाच्या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी पगारी सैन्य ठेवणे राजाला कशामुळे शक्य होते ? सोने आणि चांदी यामुळे. जहाजांकरिता लागणारे मजबूत लाकूड, भुकेल्या पोटात जाणारे अन्न किंवा लोकांना लागणारे लोकरीचे कापड कशाने विकत घेता येते ? सोने आणि चांदी यांच्या सहाय्याने. एखाद्या देशाला शत्रूवर विजय कशाच्या बळावर मिळवता येतो किंवा "युद्धाचे स्नायू" कोणते ? अर्थात सोने आणि चांदी ! देशातील सोने आणि चांदीचा साठा म्हणजे पैसा हेच तेव्हा देशाच्या संपत्तीचे आणि सत्तेचे द्योतक मानले जात असे.

"माणसांप्रमाणेच भरपूर पैसा असणारा देश श्रीमंत असतो. तेव्हा देशातील सोने आणि चांदीचा साठा वाढवणे ही त्या देशाला श्रीमंत करण्याची सर्वात सोपी पद्धत आहे." त्या काळच्या बहुसंख्य लेखकांनी या कल्पनेचा पाठपुरावा केलेला दिसतो.

अगदी १७५७ मध्ये देखील जोसेफ हॅरिस यांनी 'ॲन एसे अपॉन मनी ॲण्ड कॉइन्स' [पैसा आणि नाणी यावरील एक निबंध] या लेखामध्ये मांडलेले विचार पाहा. "साठा करण्यासाठी आजवर ठाऊक असलेल्या धातूंपैकी सोने आणि चांदी हे सर्वात चांगले धातू आहेत. कारण ते टिकाऊ आहेत; कुठल्याही प्रकारचे नुकसान न होता त्यांचा आकार बदलता येतो; त्यांच्या आकाराच्या मानाने त्यांचे मूल्य बरेच जास्त असते. तसेच सर्व जगभरच हे धातू पैशाचे परिमाण असल्याने कोणत्याही गोष्टीच्या विनिमया-साठी त्याचा वापर करता येतो आणि त्यांच्या वापराने कोणत्याही प्रकारच्या सेवा अगदी निश्चितपणे व सहजरित्या मिळविता येतात."

देशात सोने आणि चांदी जेवढी अधिक तेवढी श्रीमंती अधिक या सिद्धांतावर सरकारचा विश्वास बसला आणि देशाबाहेर सोने चांदी न्यायला लोकांना बंदी करणे हे सरकारचे पुढचे पाऊल स्पष्ट झाले. एकामागून एक सरकारांनी नेमके हेच केले. मग "सोने व चांदी यांच्या निर्यातीस बंदी घालणारे कायदे" ही नित्याची बाब झाली. इंग्लंडमधील हा कायदा पाहा : "राजाच्या परवानगीशिवाय कोणाही माणसाने इंग्लंड आणि वेल्सच्या कोणत्याही भागातून या राज्यातील नाण्यांच्या रूपातील पैसा किंवा इतर राज्ये, देश, उमरावशाह्या यांची नाणी किंवा सोन्याचांदीच्या लगडी, भांडीकुंडी वा दागदागिने देशाबाहेर नेऊ नयेत असा कायदा कायदेमंडळ करत आहे."

फुगर्स या सावकारी पेढीने प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणी बातमीदार ठेवले होते आणि असे बातमीदार महत्त्वाच्या घटनांचा सुगावा लागताच त्यांची कथा केंद्रीय कचेरीला

कळवीत. त्यांनी केंद्रीय सावकारपेढ्यांना दिलेली बातमीपत्रे आजच्या बातमीदार संस्थांशी तुलना करण्याजोगी आहेत. फुगर न्यूजलेटर्समधील या "आत्ताच हाती आलेल्या बातम्या" पाहा :

"व्हेनिस, १३ डिसेंबर १५९६. स्पेनच्या राजाचा असा सक्त हुकूम आहे की कोणीही त्यांच्या राज्यामधून सोने किंवा चांदी निर्यात करू नये किंवा व्यापारासाठी त्याचा उपयोग करू नये."

"रोम, २९ जानेवारी १६००. पोपच्या चेम्बर्लेनने परकीय चांदीच्या नाण्यांचे मूल्य पुन्हा निश्चित केले आहे आणि या पुढे कोणीही पाच क्राऊन्सपेक्षा अधिक नाणी येथून बाहेर नेऊ नयेत असा कायदा केला आहे."

अशा प्रकारचे उपाय केवळ देशामध्ये असलेले सोने आणि चांदी देशातच ठेवायचे काम करू शकतात. सोन्याचांदीच्या खाणी असणारे देश किंवा सोने व चांदी यांचा मुबलक पुरवठा करणाऱ्या वसाहती असलेले स्पेनसारखे सुदैवी देश आपल्या मौल्यवान धातूंच्या साठ्यामध्ये भर टाकू शकत. पण ज्या देशांकडे यापैकी काहीच नव्हते त्यांचे काय ? काही व्यापारवादी समजत त्याप्रमाणे (देशातील) पैसा म्हणजेच (देशाची) संपत्ती असेल तर ते देश श्रीमंत कसे होणार ?

या देशांसाठी व्यापारवाद्यांनी "अनुकूल व्यापारी शिल्लक" हा लाभदायी मार्ग दाखविला. अनुकूल व्यापारी शिल्लक म्हणजे काय ?

१५४९ साली लिहिलेल्या 'पॉलिसीज टू रेड्यूस धिस रेल्म ऑफ इंग्लंड अन् टू ए प्रॉस्परस वेल्थ अँड इस्टेट' [इंग्लंडचे राज्य ऐश्वर्यसंपन्न करण्यासाठी आखायची धोरणे] यामध्ये आपल्याला त्याचे उत्तर मिळते : "इतर राज्यांमधून आपल्या राज्याच्या टाकसाळीमध्ये अधिकाधिक सोने आणण्याचा एकमेव मार्ग म्हणजे निर्यात वाढवायची व आयात कपात करायची असा आहे. महाराज, आपण असा उपाय योजलात तर दरवर्षी वस्तूंच्या स्वरूपात अकरा लाख पौंड निर्यात करून फक्त सहा लाख पौंडाच्याच वस्तू आयात करणे ही गोष्ट काही अशक्य नाही. असे केले तर उरलेले पाच लाख पौंड आपल्याला सोने किंवा इंग्लिश नाणी या स्वरूपात मिळतील हे उघडच आहे."

आयात-निर्यातीचा व्यापार करून इतर देशांकडून जेवढे विकत घ्यायचे त्यापेक्षा त्यांना अधिक विकण्याची काळजी घेऊन आपल्या देशातील सोन्याचा पुरवठा वाढविता येतो, असा व्यापारवाद्यांचा युक्तिवाद होता. निर्यातीचे मूल्य आयातीच्या मूल्यापेक्षा जेवढे अधिक असेल तेवढे मूल्य देशाला मौल्यवान धातूंच्या रूपात मिळेल अशी त्यांची धारणा होती.

सोन्याची निर्यात करण्याचा अधिकार देणारे एक कलम इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेमध्ये होते. जेव्हा सतराव्या शतकामध्ये अनेक लेखकांनी आपल्या पुस्तिकांद्वारे इंग्लंडबाहेर संपत्ती पाठवण्याच्या या कृत्याबद्दल त्या कंपनीवर हल्ला चढविला, तेव्हा 'इंग्लंडस् ट्रेजर बाय फॉरिन ट्रेड' [परकीय व्यापारामधून इंग्लंडची

संपत्ती] या पुस्तकाद्वारे कंपनीचे एक संचालक, थॉमस मून यांनी कंपनीचा बचाव केला. पुस्तकाच्या नावावरूनच त्यांच्या बचावाचे स्वरूप स्पष्ट होते. ईस्ट इंडिया कंपनी जरी पूर्वेकडे माल विकत घेण्यासाठी सोने आणि चांदी पाठवत असली तरी इंग्लंडहून इतर देशांमध्ये हा माल पुनर्निर्यात होतो किंवा त्यापासून दुसऱ्या वस्तू बनवून मग इतर देशांना त्या विकण्यात येतात. या दोन्ही प्रक्रियांमुळे इंग्लंडमध्ये अधिक पैसा जमा होत असल्यामुळे मौल्यवान धातूंची आधीची निर्यात योग्यच ठरते असा मून यांचा युक्तिवाद होता. अनुकूल व्यापारी शिल्लक राखण्यासाठी एखादा देश परकीय देशाकडून जेवढी खरेदी करतो त्यापेक्षा अधिक विक्री करणे हाच देशाची संपत्ती वाढवण्याचा खरा मार्ग आहे हे मून यांच्या पुढील प्रतिपादनाचे सूत्र होते. “ विदेश-व्यापार हाच आपली संपत्ती वाढवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. या संदर्भात आपण एक पथ्य नेहमीच पाळले पाहिजे. परकीयांकडून आपण जितक्या मूल्याच्या वस्तू खरेदी करतो त्यापेक्षा अधिक मूल्य असलेल्या वस्तू आपण त्यांना विकल्या पाहिजेत...कारण वस्तूंच्या स्वरूपात न मिळणारा भाग आपल्याला सोन्याच्या स्वरूपात परत मिळतो...आपल्या देशात पैसा आणण्याचा आपण कितीही प्रयत्न केला तरी शेवटी व्यापारी शिलकीच्या रूपाने आपण जो भाग मिळवू तेवढाच पैसा आपल्या राज्यामध्ये कायम राहील. ”

मौल्यवान वस्तू निर्यात करणे, आयात आपल्या गरजेपुरती मर्यादित करणे आणि शिल्लक रोख नाण्यात मोजून घेणे अशी ती युक्ती होती. उद्योगधंद्यांना सर्व प्रकारे उत्तेजन देणे हाच त्याचा गर्भित अर्थ होता. औद्योगिक वस्तू शेतमालापेक्षा मौल्यवान होत्या आणि यामुळे परकीय बाजारपेठेत त्यांना अधिक किंमत मिळाली असती. त्याचप्रमाणे आपल्या लोकांना लागणाऱ्या वस्तू तयार करण्यासाठी देशातच आवश्यक उद्योगधंदे असणेही महत्त्वाचे होते. यामुळे परकीयांकडून कमी वस्तू विकत घ्याव्या लागत. परावलंबित्व संपुष्टात आणून स्वदेशाला स्वावलंबी बनवणे आणि अनुकूल व्यापारी शिल्लक मिळवणे यासाठी उचललेले ते एक पाऊल होते.

म्हणूनच एकामागून एक देशांनी आपल्या जुन्या उद्योगधंद्यांची भरभराट होईल आणि नव्या उद्योगधंद्यांची सुप्रभात उगवेल यासाठी लक्ष पुरवायला सुरुवात केली. पहिल्या मॅक्सिमिलियनच्या बव्हेरियामध्ये १६१६ साली या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक विशेष अभ्यासमंडळ स्थापन करण्यात आले. “ देशामध्ये वेगवेगळ्या उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी आणि ते चांगले चालण्यासाठी कोणते उपाय योजले जावेत... काही विशिष्ट माणसे प्रत्येक आठवड्यातील काही दिवस एकत्र जमून, विद्वत्तापूर्ण चर्चा करून यासंबंधी निर्णय घेतील. ”

या अभ्यासमंडळांनी किंवा इतर देशातील त्यांच्यासारख्या लोकांनी उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी बरेच उपाय सुचविले. उदाहरणार्थ, निर्यात करायच्या उत्पादनासाठी सरकारने आर्थिक सहाय्य देणे. समजा, सुऱ्यांच्या उत्पादकांना निर्यात केलेल्या प्रत्येक डझन सुऱ्यांबद्दल सरकारकडून रोख सहाय्य मिळणार असेल तर अधिकाधिक सुऱ्या बनवून त्या निर्यात करण्याचा ते खचितच प्रयत्न करतील. टोप्या, लोकरीचे कापड, दारूगोळा,

कापडचोपड, वगैरेंचे उत्पादकही आर्थिक साहाय्य मिळणार असेल तर तसाच विचार करतील. औद्योगिक उत्पादनाला चालना मिळावी हाच सरकारी अर्थसाहाय्याचा हेतू होता.

संरक्षणात्मक जकातीचाही तोच उद्देश होता. अमेरिकन वाचकांना इतरांपेक्षा अमेरिकेच्या इतिहासाची अधिक माहिती आहे. तेव्हा अमेरिकेने आयात वस्तूंवर संरक्षणात्मक जकात बसविण्याची कल्पना अलेक्झांडर हॅमिल्टन यांच्यापासून अस्तित्वात आली असे त्यांना वाटेल. परंतु तसे समजणे चुकीचे आहे. "बाल्यावस्थेतील" उद्योग-धंद्यांना प्रेरणा देण्यासाठी संरक्षणात्मक जकातीचा उपयोग व्यापारवाद्यांइतका किंवा त्यांच्याहीपेक्षा जुना आहे. हॅमिल्टन जन्माला येण्यापूर्वीच, बाल्यावस्थेतील उद्योगांना मदत करण्याची विनंती करणारे हे इंग्लंडमधील पत्र पहा: "महाराज, ब्रिटनमध्ये आणि आयर्लंडमध्ये कापड उद्योग बाल्यावस्थेत आहे हे मी माझ्यापरीने सिद्ध केले आहे. अशा परिस्थितीत या धंद्यात आधीपासून प्रस्थापित झालेल्या लोकांप्रमाणे आम्हाला स्वस्तात माल विकणे अशक्य आहे. यामुळे आम्हाला सरकारी मदतीशिवाय या धंद्यात झटपट आणि भरीव कामगिरी करता येणार नाही."

आयात केलेल्या औद्योगिक मालावर भरमसाठ जकात बसवल्यामुळे, स्वदेशीय उद्योजकाला परकीय स्पर्धेविरुद्ध हवी असलेली सरकारी मदत, संरक्षणाच्या रूपाने मिळाली. कधी कधी तर काही विशिष्ट वस्तूंच्या आयातीवर सरकारने कायम स्वरूपाची बंदी घातली.

सरकारी अर्थसाहाय्य आणि संरक्षणात्मक जकात यांचा उपयोग करून उद्योगाला चालना देण्याप्रमाणेच नवे उद्योगधंदे सुरू करणाऱ्या आणि नव्या पद्धतींचा वापर करणाऱ्या परकीय कुशल कारागिरांना विविध पद्धतीनी व आकर्षक सवलती देऊन आकृष्ट करण्याचा प्रयत्न तेव्हा केला जाई. उदाहरणार्थ, करातून सूट, मोफत घरे, विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनासाठी काही वर्षांचा एकाधिकारी हक्क किंवा आवश्यक ती यंत्र-सामुग्री उभी करण्यासाठी लागणारे कर्ज इत्यादी. जेव्हा अशा कारागिरांना गोडीगुलाबीने आकृष्ट करून घेणे जमत नसे तेव्हा क्वचित प्रसंगी त्यांना पळवून नेण्याचा उद्योगही सरकारतर्फे केला जाई. सतराव्या शतकात फ्रान्समध्ये अनेक मंत्रिपदे भूषविणारे कोल्बर्ट म्हणजे त्या काळचे मुसोलिनीच होते. परकीय कारागिरांनी फ्रान्समध्ये राहावे आणि काम करावे याबद्दल ते फारच आग्रही होते. कोणत्याही मार्गाने कारागिरांना मायदेशी आणणे हा एकमेव उद्योग करणारे हस्तक त्यांनी परदेशामध्ये पेरून ठेवले होते. ड्रेस्डेन-मधील फ्रेंच मंत्री श्री. चासान यांना त्यांनी २८ जून १६६९ रोजी लिहिले: "भरती करणाऱ्या हस्तकाचे काम यशस्वी होण्यासाठी त्याला सर्व प्रकारची मदत करा. त्याने यापूर्वी फ्रान्समध्ये आणलेल्या लोहारांना येथे चांगली वागणूक मिळते याची खात्री पटवा. म्हणजे फ्रान्समधील उद्योगांकरिता त्याला आणखी लोक मिळविणे शक्य होईल"

अशा रीतीने आणलेले लोक स्वगृही परतणार नाहीत याची पक्की काळजी घेतली जाई. त्याचप्रमाणे स्थानिक कारागीर इतर देशात जाणार नाहीत आणि धंद्याची गुपिते

फोडणार नाहीत याचीही काळजी घेतली जाई. परंतु धार्मिक कारणांसाठी हद्दपार करणे हा विरुद्ध दिशेने वाहणारा एक अत्यंत खळबळजनक प्रवाह होता. या कारणामुळे उद्योगी कर्तृत्ववान, कुशल कारागीर आणि व्यापारी यांच्या अनेक गुणवान गटांना देशाबाहेर हाकलून देण्यात आले. एकीकडे फ्रान्समध्ये कुशल कारागीर आणण्यासाठी फ्रान्सचे राज्यकर्ते हर प्रकारचे प्रयत्न करत होते, तर दुसरीकडे सतराव्या शतकातील ह्युगुनॉट्सच्या हद्दपारीमुळे स्वदेशीय अत्युच्च दर्जाच्या कारागिरांना ते जबरदस्तीने हाकलून देत होते.

कंबरलँड आणि वेस्टमोरलँड येथील न्यायाधीशांना १५६६ साली राणी एलिझाबेथने लिहिलेल्या पत्रावरून, परकीय कारागिरांच्या कल्याणाची सरकार काळजी घेई या सत्याची खात्री पटते. त्या वेळी मरण अत्यंत स्वस्त झाले होते, अत्यंत सामान्य गुन्ह्यांसाठी हात-पाय किंवा कान कापून टाकणे, अंगावर डाग देणे किंवा फासावर चढवणे अशा शिक्षा सर्रास दिल्या जात होत्या. तेव्हा केवळ एका जर्मन माणसाच्या खुनाबद्दल राणीला केवढो आत्मीयता वाटते ते पाहा : "फर्मान काढून आम्ही काही जर्मन लोकांना सवलती दिल्या आहेत. हे लोक पदरचे पैसे खर्च करून, मोठ्या कष्टाने आपल्या वेस्टमोरलँड आणि कंबरलँड या परगण्यातील पहाड आणि खाणी यांमधून मोठ्या प्रमाणावर खनिजे काढण्याचे काम अत्यंत कौशल्याने करतात. ते काम सुरू ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे. असे असताना या परगण्यातील अनेक बेबंद लोकांनी आमच्या शांतताविषयक कायद्याची पायमल्ली करून, दंगेधोपे घडवून आणून त्यांना मारहाण केली. या सगळ्या प्रकाराचे जर्मन माणसाच्या खुनामध्ये पर्यवसान झाले असून या घटनेचा कंपनीच्या कामावर अनिष्ट परिणाम होणार आहे. म्हणूनच या दंग्यांशी आणि खुनाशी संबंध असणाऱ्या सर्वांना कैद करून कोठडीत डांबण्याचा हुकूम आम्ही देत आहोत. एवढेच नव्हे तर यापुढे जर्मन लोकांना मैत्रीने आणि सलोख्याने वागवण्याची दक्षता तुम्ही घेतली पाहिजे. यामध्ये तुम्ही हयगय केलीत तर त्याचे काय परिणाम होतील हे तुम्ही जाणताच."

उद्योगधंद्यांना उपयुक्त असणाऱ्या कुशल परदेशी कारागिरांना सरकार जसे संरक्षण देई तसेच नव्या तंत्रज्ञानाच्या संशोधकांना सरकार मदत करी. आज सरकार ज्याप्रमाणे संशोधकाला पेटंटचे अधिकार देते त्याप्रमाणे १६११ साली जेव्हा जेहां द ब्राद द फेर यांनी नव्या चक्की यंत्राचा शोध लावला तेव्हा त्यांना ते यंत्र बनविण्यासाठी वीस वर्षांचे एकाधिकारी हक्क बहाल करण्यात आले. "आमच्या राज्यामध्ये त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना नव्या संशोधनानुरूप चक्की यंत्रे तयार करण्याचा आम्ही परवाना देत आहोत. त्यांच्या स्पष्ट संमतीशिवाय इतर कोणालाही या शोधाबरहुकूम कोणत्याही अवस्थेतील वा दर्जाची, तुकड्या-तुकड्यांमध्ये किंवा संपूर्ण यंत्रे तयार करण्यास आम्ही मनाई करीत आहोत. हा नियम तोडल्यास दहा हजार लिव्हर्स रकमेचा दंड करण्यात येईल आणि अशी यंत्रे जप्त करण्यात येतील."

संशोधकांना एकाधिकारी हक्क बहाल करण्यात येत एवढेच नव्हे, तर काही देशांत नव्या आणि अधिक चांगल्या उत्पादनपद्धतींचा शोध लावून एतद्देशीय उद्योगधंदे सुरू करण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांना उत्तेजनार्थ बक्षिसेही दिली जात. फ्रान्समध्ये कोलबर्ट यांनी शासकीय अधिपत्याखाली चालणारे उद्योग आणि तांत्रिक शिक्षणसंस्था स्थापन केल्या. सतराव्या शतकाच्या शेवटी बव्हेरियामध्ये शासकीय कापडउद्योगात दोन हजार कामगार नोकरीस होते. एक नमुना म्हणून, एक स्फूर्तिस्थान म्हणून, एक प्रयोगशाळा म्हणून या शासकीय उद्योगांचे कार्य झाले. गिल्डची कोणत्याही प्रकारची बंधने नसलेल्या या महाकाय उद्योगांमध्ये प्रयोगशीलतेला आणि प्रगतीला अनिर्बंध वाव होता. एकट्या-दुकट्या उद्यमशील कारागिराला ही गोष्ट फार कठीण होती.

परंतु हे कठीण असले तरी अशक्य मात्र नव्हते. प्रत्यक्ष सूट देऊन किंवा इतर मार्गांनी मदत करून उद्योजकाला प्रोत्साहन द्यायला शासन सदैव तयार असे. कोल्बर्ट अधिकारावर असताना फ्रेंच कापडउद्योगाला शासनाकडून सवलतीच्या रूपाने ८० लाख लिव्हर्स रक्कम मिळाली. सतराव्या शतकातील फ्रान्समध्ये रेशीम आणि जरीची वस्त्रे यांच्या उत्पादनासाठी काही माणसांना एक गिरणी उभारायची होती. यासाठी सरकारने त्यांना अनेक विशेष सवलती तर दिल्याच आणि वर पैशाच्या स्वरूपात प्रत्यक्ष मदतही केली. "आपल्या प्रजाजनांचे हित साधण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे उद्योग-धंद्याची स्थापना करणे हा होय. यामुळे आपले राज्य संपन्न होण्याची शक्यता बळावते. जी चीजवस्तू आपल्याकडे नाही त्यासाठी आपल्याला शेजाऱ्यांकडे याचना करावी लागत नाही. तसेच आपल्या लोकांमध्ये आळसाने निर्माण केलेल्या अनेक दुर्गुणांचे उच्चाटन करण्यासाठी हा सोपा आणि उत्तम उपाय आहे. असे उपाय योजल्यास सोने आणि चांदी राज्याबाहेर पाठवून शेजाऱ्यांना श्रीमंत करण्याची पाळी आपल्यावर येणार नाही... (त्यानंतर काही नावे दिली आहेत) ... आमची परवानगी आणि मान्यता असल्या-शिवाय यापुढे बारा वर्षे पॅरिसमध्ये इतर कोणीही रेशीम गिरण्या काढू नयेत....संबंधित उद्योजकांना हा उद्योग सुरू करण्यासाठी मदत म्हणून १ लक्ष ८० हजार लिव्हर्स रकमेचे कर्ज तात्काळ देण्यात येईल....ते बारा वर्षे ही रक्कम बिनव्याजी वापरतील आणि नंतर आम्हाला फक्त १ लक्ष ५० हजार लिव्हर्स परत करतील. उरलेले ३० हजार लिव्हर्स आम्ही त्यांना बक्षीस देत आहोत. हा उद्योग सुरू करण्यासाठी होणारा असाधारण खर्च आणि धंद्यात नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेऊन आम्ही त्यांना या सवलती देत आहोत."

औद्योगिकीकरणाच्या समर्थनार्थ व्यापारवादी ज्या कारणांची जंत्री देत, त्यामधील आणखी एका मुद्द्याकडे हा हुकुमनामा निर्देश करतो. औद्योगिकीकरणामुळे केवळ निर्यात वाढून अनुकूल व्यापारी शिल्लक राखण्यास मदत होते एवढेच नव्हे तर रोजगारीमध्येही वाढ होते असा व्यापारवाद्यांचा सतत धोशा असे. श्रीयुत टी. मॅन्ले यांनी १६७७ साली असा युक्तिवाद केला होता. "आताच्या दुप्पट दराने निर्यात केलेल्या दहा पौंड कच्च्या लोकरीपेक्षा एक पौंड लोकरीचे कापड करून त्याची निर्यात

करणे आपल्या दृष्टीने अधिक फायदेशीर आहे. त्यामुळे आपल्या लोकांना रोजगार उपलब्ध होतो." भिकारी आणि बेकार लोक म्हणजे एक डोकेदुखी ठरून निराधार योजनांसाठी बराच पैसा ओतावा लागणाऱ्या त्या काळी या युक्तिवादाला चांगलेच वजन प्राप्त झाले. आपल्या प्रजेचे हित साधू पाहणारा राजा आणि राष्ट्रीय सत्ता व संपत्ती यांचे संवर्धन करू पाहणारे व्यापारवादी विचारवंत यांना देशात बंदुकीच्या दारूप्रमाणे स्फोटक ठरणाऱ्या सामान्य जनतेला चांगल्या अवस्थेमध्ये ठेवण्याची गरज भासे. यासाठीच कामगारांना रोजगार पुरवणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन दिले जाई. त्याचप्रमाणे धडधाकट सैनिक मिळण्यासाठी लोकांना पुरेसे अन्न उपलब्ध होणे आवश्यक असल्याने धान्याच्या उत्पादनाकडेही विशेष लक्ष पुरवण्यात येई. युद्धजन्य परिस्थितीत धान्य-पुरवठा अत्यंत महत्त्वाचा असतो याची सर्वांनाच स्पष्ट जाणीव होती. यामुळे इंग्लंडमध्ये धान्योत्पादनाला उत्तेजन म्हणून शेतकऱ्यांना सरकारने सढळ हाताने मदत केली. युद्धकाळामध्ये अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता आणि हृष्टपुष्ट लढाऊ माणसांचे संख्याबळ राष्ट्राला आवश्यक असते याची जाण विविध देशांनी केलेल्या 'धान्य-कायद्यां'मागे (कॉर्न-लॉज) दिसते.

लढवय्ये, युद्ध-काळ, या पद्धतीने विचार करणाऱ्या लोकांच्या दृष्टीने युद्धनौकांची संख्या आणि दर्जा या गोष्टी स्वाभाविकपणेच महत्त्वाच्या होत्या. स्वदेशाचा बचाव करण्यासाठी आणि शत्रूराष्ट्रावर हल्ला करण्यासाठी युद्धनौकांची आवश्यकता होती. व्यापारवाद्यांना अनुकूल व्यापारी शिल्लक राखण्यासाठी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे तितकेच त्यांना व्यापारी गलबतांची बांधणी करणेही महत्त्वाचे वाटले. विदेश व्यापारामध्ये सरकारांना रस होता. म्हणून देशातील उत्पादित वस्तू परदेशात नेण्यासाठी पुरेशा नौकांचा पुरवठा करण्यावर त्यांनी भर दिला. उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यामध्ये त्यांनी उत्साह दाखवला त्याच उत्साहाने त्यांनी नौकानिर्मिती आणि नौकानयन याकडेही आपले लक्ष वळविले. यासाठीही पुन्हा त्याच पद्धतींचा वापर करण्यात आला. उदाहरणार्थ, नौकानिर्मात्यांना सरकारतर्फे आर्थिक सहाय्य देण्यात आले. जहाज-बांधणी उद्योगासाठी डांबर, पीच, मजबूत लाकूड यासारख्या आवश्यक वस्तूंचे सर्वेक्षण करून, कोणतीही जकात न आकारता, त्यांची आयात करण्यास परवानगी देण्यात आली. जनतेवर आरमारात जाण्याची सक्ती करण्यात आली. फ्रान्समधील न्यायाधीशांना गुन्हेगारांना शक्य तर गलबतांवर पाठवण्याची सूचना करण्यात आली. इंग्लंडमध्ये नाविकांची प्रशिक्षण-शाळा म्हणून मच्छीमार उद्योगाला प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून लोकांना अधिकाधिक मासे खाण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. आरोग्यासाठी आवश्यक अशी जीवनसत्त्वे माशामध्ये असतात, एवढेच नव्हे तर दीर्घायुष्यासाठी आहारात त्यांची आवश्यकता असते याची लोकांना खात्री पटवण्याचा प्रयत्न त्या काळच्या प्रचारयंत्रणेने निःसंशयपणे केला.

सोळाव्या शतकाच्या शेवटी स्पेनला उतरती कळा लागल्यानंतर अग्रणी सत्ता म्हणून हॉलंड या छोट्या देशाचा उदय झाला. छोटा असला तरी हा देश सामर्थ्यशाली आणि

संपन्न होता. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे नौकानिर्मिती आणि नौकानयन यावर त्याने दिलेला भर! व्हेनिसप्रमाणे हॉलंडच्या रहिवाश्यांनाही त्यांच्या देशाच्या भौगोलिक स्थानामुळे दर्यावर्दी बनणे भागच पडले. माशांची अपार संपत्ती असलेला उत्तर समुद्र (नॉर्थ सी) हॉलंडवासीयांना सतत आकृष्ट करी. उत्तरेकडून भूमध्य समुद्राकडे जाणाऱ्या वस्तूंचा ओघ आणि तसाच विरुद्ध दिशेचा प्रवाह या मार्गावर हॉलंड देश मध्यभागी होता. उद्यमशील डच माणसांनी या संधीचा चांगला फायदा उठवला. त्यांनी समुद्राकडे नजर वळवली आणि विस्तारणाऱ्या जगामध्ये ते व्यापारी चीजवस्तू वाहणारे झाले. डच नौका सर्वत्र संचार करू लागल्या आणि त्यामधून देशोदेशीच्या वस्तू जगभर जाऊ लागल्या.

परंतु इंग्लंडला किंवा फ्रान्सला त्यांच्या चीजवस्तूंची वाहतूक डच बोटींमधून होणे सहन होणारे नव्हते. त्यांच्या स्वयंपूर्ण होण्याच्या योजनेमध्ये स्वतःची गलबते बांधणे हा महत्त्वाचा भाग होता. तसेच त्यांच्या देशातील वस्तू वाहून नेण्यासाठी डच दर्यावर्दींना पैसे मोजणे त्यांना आवडत नव्हते. अमेरिकन इतिहासामध्ये सुप्रसिद्ध झालेल्या इंग्लिश जलपर्यटन कायद्यांमागील अनेक हेतूंपैकी एक म्हणजे डचांकडून सागरी वाहतुकीचे प्रभुत्व छिनावून घेणे हा होता. १६६० सालच्या एका कायद्यामुळे त्यांचा हा हेतू सुस्पष्ट होतो. " जलपर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नौकानयनाची वाढ करण्यासाठी या राष्ट्रामध्ये कायदा करण्यात येत आहे की १ डिसेंबर १६६० पासून....राजेसाहेबांच्या अधिकारकक्षेतील प्रदेश, बेटे किंवा मळे यामधून कोणत्याही वस्तूंची निर्यात करताना किंवा आशिया, आफ्रिका व अमेरिका या खंडांमधून वरील प्रदेशात कोणत्याही वस्तूंची आयात करताना इतर कोणत्याही देशांच्या गलबतांचा किंवा नौकांचा वापर करता येणार नाही. तर, केवळ इंग्लंड, आयर्लंड किंवा वेल्समध्ये राहाणाऱ्या लोकांनी बांधलेल्या आणि त्यांच्याच मालकीच्या गलबतांमधून आयात-निर्यात केली गेली पाहिजे. अशा गलबतांवरील तीन-चतुर्थांश खलाशी इंग्लिश असले पाहिजेत. "

या कार्यामध्ये मायभूमी आणि वसाहती यांनी परकीय घुसखोरांविरुद्ध एकत्रित लढा द्यायचा होता. सामर्थ्यशाली डच गलबतशहांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अमेरिकन लोकांचा या धोरणामुळे चांगला फायदा झाला. जलपर्यटन-कायद्यांमधील संबंधित कलमामुळे अमेरिकन लोकांना स्वतःची व्यापारी गलबते बांधण्यास मदत झाली. मग अल्पावधीतच जगातील प्रत्येक बंदरामध्ये ' यांकी ' (अमेरिकन) बोटी दिसणे ही नित्याची बाब झाली वाढत्या ब्रिटिश साम्राज्याच्या नौकानयन-क्षेत्रातील वाटा मिळाल्यामुळे ' यांकी ' नौकानिर्माते, नौकामालक आणि नौकाचालक यांना प्रचंड संपत्ती मिळाली.

परंतु वसाहतींना फायदेशीर नसणारी काही कलमेही जलपर्यटन कायद्यामध्ये होती. कारण **मायभूमीच्या** फायद्यासाठी वसाहतींचा वापर करणे हा देखील व्यापारवादी विचारसरणीचाच एक भाग होता.

म्हणूनच मायभूमीतील उद्योगांशी स्पर्धा करतील अशा कोणत्याही उद्योगाकडे वळण्यास वसाहतीमधील लोकांना बंदी करणारे कायदे करण्यात आले. उदाहरणार्थ,

त्यांना टोप्या, लोकरीचे कापड, लोखंडाच्या वस्तू यांचे उत्पादन करण्यास बंदी करण्यात आली. या वस्तूंसाठी लागणारा कच्चा माल अमेरिकेमध्ये सहज उपलब्ध होता. तरीही हा कच्चा माल त्यांनी औद्योगिक प्रक्रियेसाठी इंग्लंडमध्ये पाठवावा आणि उत्पादित वस्तू विकत घ्याव्यात अशी त्यांच्यावर सक्ती करण्यात आली.

इंग्लंडचे हे धोरण केवळ अमेरिकेलाच नव्हे तर सर्वच वसाहतींना लागू होते. उदाहरणार्थ, आयर्लंड ही इंग्लंडची वसाहत होती. आयरिश लोकांनी तेथील लोकरी-पासून कापड विणायला सुरुवात केली तेव्हा तो उद्योग निकालात काढणारे कायदे इंग्लंडने केले. बरे मग ती कच्ची लोकर कोठेही निर्यात करायला आयरिश लोकांना मुभा होती का ? मुळीच नाही. त्यांनी ती केवळ इंग्लंडलाच विकली पाहिजे असा दंडक होता. अशा आयात केलेल्या शक्य तेवढ्या लोकरीचे कापड करून, इंग्लंड उरलेली लोकर पुनर्निर्यात करी. अशी सक्ती करून, आपल्याला हवी ती लोकरीची किंमत आयरिश लोकांवर लादणे इंग्लंडला शक्य झाल्यामुळे अनेक आयरिश लोक कंगाल बनले. यामुळे ब्रिटिशांच्या हुकुमतीविरुद्ध झालेल्या अमेरिकन स्वातंत्र्य लढ्याप्रमाणेच आयरिश स्वातंत्र्यलढ्यामध्येही इंग्लंडच्या व्यापारवादी धोरणाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

तंबाखू, तांदूळ, नीळ, टर्पेन्टाईन, डांबर, बीव्हरची कातडी, अशुद्ध लोखंड यासारख्या वस्तू केवळ इंग्लंडलाच निर्यात करण्याची अमेरिकन लोकांवर इंग्रज सक्ती करीत. बदलत्या काळाबरोबर वस्तूंची ही जंत्री लांबतच गेली. इंग्लंडमधील औद्योगिक उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून इंग्रजांना या पदार्थांची गरज होती. याशिवाय जादा आयात मालाची ते पुनर्निर्यात करीत आणि अशा व्यवहारातूनही पुरेसा नफा उकळीत.

उदाहरणार्थ, व्हर्जिनियाचा तंबाखू थेट फ्रान्सच्या तपकीर-उत्पादकाकडे पाठविण्या-ऐवजी, प्रथम तो इंग्लंडच्या व्यापाऱ्याकडे येई आणि तेथून तो फ्रान्सच्या तपकीर उत्पादकाकडे पुनर्निर्यात केला जाई.

मायभूमीचा स्वार्थ साधण्यासाठीच वसाहती अस्तित्वात असतात असे मायभूमीच्या सुपुत्रांना वाटे; तर याउलट वसाहतवासियांना स्वहितामध्येच स्वारस्य होते. हितसंबंधां-मधील हा विरोध दोघांमधील संघर्षाच्या मुळाशी होता. अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स परगण्याचे ब्रिटिश गव्हर्नर सर फ्रान्सिस बर्नार्ड यांनी मायभूमी आणि वसाहती यामधील संबंधाची व्यापारवादी संकल्पना स्पष्ट केली आहे. " अमेरिकेबरोबरच्या व्यापाराबाबत ब्रिटनने दोन प्रमुख उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली पाहिजेत. (१) ब्रिटन पुरवू शकेल अशा युरोपमधील वस्तू आणि इतर सर्व उत्पादित वस्तू ग्रेट ब्रिटनकडून घेण्यास अमेरिकन लोकांना भाग पाडणे; आणि (२) आपल्या साम्राज्याची वृद्धी होईल किंवा नफा थेट **ग्रेट ब्रिटन**मध्येच येईल अशा रीतीने अमेरिकेच्या विदेशव्यापारावर नियंत्रण ठेवणे. "

केवळ मायभूमीची राष्ट्रीय संपत्ती व सत्ता यांच्या वृद्धीला हातभार लावण्यासाठीच वसाहती अस्तित्वात होत्या हे मायभूमीचे उद्दिष्ट सुस्पष्ट करणारे विधान आपल्याला येथे आढळते. पण ही गोष्ट केवळ इंग्लंडच्याच संदर्भात खरी नव्हती. त्या व्यापारवादी

काळात फ्रान्स, स्पेन इत्यादी सर्वच "मायभूमीं"बाबत ती खरी होती हे आपण लक्षात घेतलें पाहिजे.

त्याचप्रमाणे "राष्ट्रीय संपत्ती" आणि "राष्ट्रीय सत्ता" या शब्दांमध्येही गोलमाल आहे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे "आपला देश" संपन्न करण्याचा जो मार्ग अनेक लेखक सुचवत होते तो त्यांना स्वतःला किंवा त्यांच्या वर्गाला संपन्न करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग होता हा देखील एक गमतीदार योगायोगच म्हटला पाहिजे. याचा अर्थ ते मुद्दाम काही लबाडी करत नव्हते. खरे तर स्वतःचे हितसंबंध व संपूर्ण देशाचे हितसंबंध एकच आहेत असे समजणे त्यांच्याबाबतीत नैसर्गिकच होते. कदाचित इतर कोणत्याही काळात आर्थिक हितसंबंध आणि राष्ट्रीय धोरण यांमधील सोयरीक इतकी घनिष्ठ नसेल.

पैसे उभे करण्यासाठी पूर्वी राजांना किती उरस्फोड करावी लागली हे आपण पाहिलेच आहे. जेव्हा करआकारणीची विकसित आणि विस्तारित व्यवस्था अस्तित्वात नव्हती तेव्हा त्या ठिकाणी हव्या त्या वेळेला पुरेसा पैसा उपलब्ध होईल अशी राजांना खात्री वाटत नसे. त्या काळी सरकारी खजिन्याकडे पैशाचा अखंड प्रवाह वाहात नव्हता. यामुळेच महसूल गोळा करण्याचे अधिकार राजाने काही लोकांना बहाल केले. अशा अधिकारी व्यक्ती राजाला कराची रक्कम आगाऊ देत आणि नंतर गरीब जनतेकडून पै न पै वसूल करीत. या पद्धतीमध्ये राजाने सर्वात अधिक पैसे देणाऱ्या लोकांना अधिकाराच्या जागा विकल्या होत्या. प्रचंड रक्कम देणाऱ्यांना मक्तेदारी अधिकार बहाल केले होते. तसेच अत्यंत नाइलाजाने राजघराण्याच्या अखत्यारीतील जमिनी विकण्याची पाळी राजावर आली होती. यामुळेच अखेर व्यापारी आणि सावकार यांच्याकडे कर्जासाठी याचना करणे त्यांना भाग पडले. याच कारणामुळे सरकारांनी मौल्यवान धातूंचा साठा करण्यावर सदैव भर दिला होता. व्यापार हा संपत्ती मिळवण्याचा मार्ग आहे अशी मनोमन खात्री पटल्यामुळे, शासनसंस्था आणि व्यापारीवर्ग यांचे हितसंबंध एकच आहेत असे सरकारने समजणे नैसर्गिकच होते. म्हणूनच व्यापार आणि व्यापाराशी निगडीत अशा सर्व गोष्टींना उत्तेजन देणे हा शासनसंस्थेचा प्रमुख कार्यभाग झाला.

व्यापारावरूनच शासनाचे महत्त्व ठरत असल्यामुळे त्याच मार्गाने आपला मुलुख आणि आपली निर्यात वाढवणे शासनाला शक्य होते. थोडक्यात, व्यापारवाद म्हणजे व्यापारी-वाद होता.

व्यापाराच्या बाबतीत एका देशाचे नुकसान म्हणजे दुसऱ्या देशाचा फायदा होता. म्हणजे दुसऱ्या देशाच्या जिवावरच एखादा देश स्वतःचा व्यापार वाढवू शकतो असा व्यापारवाद्यांचा समज होता. व्यापार म्हणजे परस्परांना फायदेशीर ठरणारी प्रक्रिया—एक किफायतशीर विनिमय—अशी त्यांची धारणा नव्हती, तर व्यापार हा एक ठराविक समुच्चय असून प्रत्येकजण त्यातला मोठा तुकडा बळकावण्याचा प्रयत्न करतो असे त्यांना वाटे. 'द डिक्शनरी ऑफ ट्रेड अँड कॉमर्स' [व्यापार आणि दळणवळण यासंबंधीचा माहिती कोष] या कोषाचे अठराव्या शतकातील ग्रंथकार हेच निर्देशित

करतात : " युरोपमधील व्यापार हा एक मर्यादित समुच्चय आहे असे दिसते. समजा लोकरीच्या व्यापारामध्ये इंग्लंड प्रतिवर्षी पंधरा दशलक्ष पौंड किंमतीचा माल निर्यात करत आहे. जर एखाद्या वर्षी इंग्लंडला परकीय बाजारपेठेत वीस दशलक्ष पौंड किंमतीचा माल पाठवायचा असेल तर इतर देशांची विक्री कमी करूनच त्यांना ही गोष्ट शक्य होईल."

आणि १६७० साली हेगमधील फ्रेंच मंत्री श्री. पॉमपॉन यांना कोलबर्ट यांनी लिहिले : " हॉलंडचा व्यापार आणि उत्पादन एखाद्या दुसऱ्या देशाच्या हातात जात नाही तोपर्यंत त्यात घट होणार नाही. आपल्या शासनाच्या भल्यासाठी आपला व्यापार आणि औद्योगिक उत्पादन वाढणे आवश्यक आहे. म्हणजेच हॉलंड देशामध्ये त्यांची घट होणेही तितकेच महत्त्वाचे आणि आवश्यक आहे"

प्रतिस्पर्धी देशाचा व्यापार आणि औद्योगिक उत्पादन कमी होणे " या इतकी सार्वत्रिक भल्यासाठी दुसरी महत्त्वाची आणि आवश्यक गोष्ट नाही." या विचारसरणीचा रोख फक्त एकाच दिशेने असू शकतो हे तुमच्या ध्यानात येईलच. युद्ध ! व्यापारवादी धोरणाचे फळ होते युद्ध ! बाजारपेठेसाठी झोंबाझोंबी, या ना त्या देशाच्या व्यापारासाठी जीवघेणी स्पर्धा, अधिक वसाहतींसाठी झगडा या सर्वांची फलश्रुती म्हणजे स्पर्धा करणाऱ्या राष्ट्रांमध्ये एकामागून एक युद्धे सुरू झाली. यापैकी काही युद्धांना 'व्यापार-युद्धे' हे त्यांच्या अस्सल स्वरूपाला साजेसेच नाव देण्यात आले होते. तर आजच्याप्रमाणेच इतर काही युद्धांची उद्दिष्टे गोंडस नावाखाली झाकण्यात आली होती. परंतु १६९० सालची, कँटरबरीच्या आर्चबिशपची सत्यकथन करणारी ग्वाही आपल्यापाशी आहे : " जगाच्या या भागात गेल्या काही वर्षात घडलेल्या लढायांमागे आणि तंट्यांमागे महान आणि पारमार्थिक कारणे असल्याचा कितीही कांगावा करण्यात येत असला तरी, माझ्या मते, त्यामागील खरे आणि अंतिमतःच्या महत्त्वाचे कारण होते : सोने, मोठेपणा आणि ऐहिक वैभव."

आपण आर्चबिशपचा शेवटचा शब्दप्रयोग वेचूया. व्यापारवादी धोरणांचा रोख होता : सोने, मोठेपणा आणि वैभव.

◇ ◇ ◇

१२

एकले चलो !

१७७६ साल बंडाचे वर्ष होते. ते एक अविस्मरणीय वर्ष होते. या वर्षाच्या उल्लेखाबरोबर इंग्लंडच्या व्यापारवादी वसाहतवादी धोरणाविरुद्ध केलेला उठाव आणि स्वातंत्र्याची घोषणा या गोष्टी अमेरिकन लोकांच्या मनात उफाळून येतात. प्रत्येक राष्ट्राच्या अर्थतज्ञांना या वर्षामुळे अॅडम स्मिथच्या 'वेल्थ ऑफ नेशन्स' [राष्ट्रांची संपत्ती] या पुस्तकाची आठवण होते. नियंत्रण, नियमन आणि निर्बंध या तीन व्यापारवादी 'नि'विरुद्ध उफाळणाऱ्या उठावांचा सारांश त्यात आहे. अठराव्या शतकात व्यापारवादी सिद्धान्त आणि व्यवहार यांच्याशी सहमत नसणाऱ्या लोकांची संख्या वाढत होती. ते व्यापारवादाशी सहमत नव्हते, कारण त्यापासून त्यांना त्रास होत होता. विशेष सवलती असलेल्या एकाधिकारी कंपन्यांच्या प्रचंड नफ्यामध्ये इतर व्यापाऱ्यांना वाटा हवा होता. पण त्यासाठी प्रयत्न केल्यास त्यांना 'लुडबुडे' म्हणून बाहेर काढण्यात येई. पैसेवाल्या लोकांना हवा तेव्हा, हवा तेथे आणि हव्या त्या पद्धतीने पैसा वापरायचा होता. वाढता व्यापार आणि वाढते उद्योगधंदे यातून मिळणाऱ्या प्रत्येक सुसंधीचा त्यांना फायदा उठवायचा होता. भांडवलामुळे प्राप्त होणाऱ्या सत्तेची त्यांना जाणीव होती आणि ती सत्ता त्यांना मुक्तपणे वापरायची होती. "हे केले पाहिजे, ते करता कामा नये" असल्या नियमांचा त्यांना आता वीट आला होता. "याविरुद्ध कायदे ... यावर कर ... त्यासाठी सवलती" या गोष्टी आता त्यांना असह्य झाल्या होत्या. त्यांना खुला व्यापार हवा होता.

सरकारे उद्योगधंद्यांना मदत करण्यास उत्सुक होती हे ठीक, परंतु एका वर्गाला मदत करायची तर दुसऱ्या वर्गाला त्याची झळ लागल्याशिवाय ती करता येत नाही. यामुळे दुखावल्या जाणाऱ्या वर्गाला हे धोरण आवडत नव्हते. अशा लोकांनी आपला निषेध व्यक्त केला. १७७० साली प्रशियामधील धनगरांना लोकर निर्यात करायला बंदी होती. उद्योजकांना स्वस्त किंमतीमध्ये पुरेसा कच्चा माल (लोकर) पुरवून कापड उद्योगाला प्रोत्साहन देणे हा त्या धोरणामागचा उद्देश होता. लोकरीच्या निर्यातीवरील या बंदीचे उद्योजकांनी स्वागतच केले; पण धनगरांनी त्याविरुद्ध आवाज उठवला. १७२१ मध्ये त्यांनी राजाकडे एक अर्ज करून हा कायदा रद्द करावा अशी मागणी केली :

" त्यांच्या म्हणण्यानुसार गोदामामध्ये लोकरीचे भरपूर साठे असून या वर्षीच्या लोकरीच्या उत्पादनापैकी अर्धे सुद्धा विकले जाणार नाही यामुळे उद्योजकांना लोकरीचा भरपूर पुरवठा होऊन उद्योगधंद्यांची भरभराट व्हावी हा धनिकांचा उद्देश आता पूर्णपणे सफल झाला आहे. पण या उलट मेंढपाळी करणाऱ्या धनगरांचे हाल मात्र वाढत आहेत. आधीच्या प्रचंड साठ्यामुळे आज ग्राहकाला रुचेल या किंमतीला लोकर विकणे धनगरांना भाग पडते. या कायद्यामुळे लोकरीच्या किंमती घसरल्या आहेत आणि त्यामुळे देशाचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. (निर्यातीवरील बंदी जर कायम राहिली तर किंमती अधिकच खाली येतील.) आता मेंढपाळीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्चच वाढला आहे. त्यामुळे अनेक धनगरांवर स्वतःच्या कळपांचा विनाश पाहण्याची पाळी येण्याची शक्यता आहे."

पण त्यावेळचा प्रशियाचा राजा पहिला फ्रेडरिक विल्यम आपल्या नियंत्रणाच्या धोरणाबद्दल ठाम होता. त्याने धनगरांच्या अर्जाला दिलेले उत्तर पाहा : " प्रशियाचे श्रीमंत राजे सरकार लोकरीच्या निर्यातीवरील बंदी कायम ठेवणे आवश्यक समजतात. कारण इतर सत्तांच्या, विशेषतः इंग्लंडच्या अनुभवांवरून असे दिसते की लोकर देशाबाहेर जाऊ न दिल्यामुळे तो देश श्रीमंत होत आहे."

इंग्लंड देश श्रीमंत होत होता हे प्रशियाच्या राजाचे म्हणणे कदाचित खरे असेल. परंतु त्या मागच्या कारणाबद्दल प्रशियाच्या व्यापाऱ्यांनी राजाशी वाद घातला असता. व्यापारवादी नियंत्रणे त्यांनाही आवडत नव्हती हे आपल्याला ठाऊक आहे. त्यांचा धंदा वधारेल अशा तऱ्हेचे बदल त्यांना हवे होते. तेव्हा स्वतःची बाजू मांडण्यासाठी त्यांनी व्यापारवादी पद्धतीचाच अवलंब केला – म्हणजेच देशाची संपत्ती आणि समृद्धी वाढविण्यासाठी आवश्यक ठरणाऱ्या धोरणांचा आपण पाठपुरावा करीत आहोत असा त्यांनी आव आणला. अशा रीतीने स्वतःचे हितसंबंध देशाच्या हितसंबंधांशी जोडून देणे ही एक जुनीच कावेबाज पद्धत होती. इंग्लंडच्या लोकसभेच्या नोंदवहीमध्ये ८ मे १८२० रोजी व्यापाऱ्यांनी खुल्या व्यापारासंबंधी केलेला युक्तिवाद आपल्याला पाहावयास मिळतो ! " लंडन शहराच्या व्यापाऱ्यांनी अर्ज केला आणि तो वाचला गेला. त्यात देशाची संपत्ती आणि समृद्धी वाढविण्यासाठी विदेशी व्यापार सुयोग्य ठरतो असे मत मांडलेले होते. ज्या क्रयवस्तूंच्या उत्पादनवाढीसाठी इतर देशांची जमीन, हवामान, भांडवल आणि उद्योग सुयोग्य आहेत त्यांची आयात करणे आणि आपली परिस्थिती ज्या उत्पादनासाठी सुयोग्य आहे त्या वस्तूंची निर्यात करणे ही गोष्ट व्यापारामुळे शक्य होते. आपल्या देशातील उद्योग आणि भांडवल यांना योग्य दिशा देण्यासाठी विदेशी व्यापाराची वाढ होणे आवश्यक आहे. त्यासाठी तो नियंत्रणापासून मुक्त केला पाहिजे. अत्यंत कमी किंमती असलेल्या बाजारपेठेत खरेदी आणि अत्यंत भरमसाठ किंमती असलेल्या बाजारपेठेत विक्री हे कोणत्याही व्यापाऱ्याकडून वैयक्तिक व्यवहारात अंमलात आणले जाणारे तत्त्व, अत्यंत काटेकोरपणे, संपूर्ण राष्ट्राच्या व्यापाराचा नियम म्हणून अंमलात आणले जावे. या तत्त्वावर आधारलेल्या धोरणामुळे जागतिक व्यापाराचे, परस्परांना किफायतशीर ठरणाऱ्या

विनिमयात रूपांतर होईल आणि प्रत्येक राष्ट्राच्या प्रजाजनांमध्ये संपत्ती आणि समृद्धी यांचे वाटप होईल .. विदेशी वस्तूंच्या आयातीच्या प्रमाणात देशातील उत्पादनाला खीळ बसते या गैरसमजावर आपला नियंत्रणवादी व संरक्षणवादी दृष्टिकोण आधारलेला आहे ... आणि याच तत्त्वाच्या आधारे सतत नियम केले तर एक दिवस असा उगवेल की आपण विदेशी व्यापारामधून नामशेष होऊ. ”

ॲडम स्मिथ यांचे **' इन्क्वायरी इन्टू द नेचर अँड कॉजेस् ऑफ द वेल्थ ऑफ नेशन्स '** [राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप आणि त्यामागील कारणे यांची विवेचनात्मक तपासणी] हे एक लोकांच्या कल्पनाशक्तीची पकड घेणारे पुस्तक होते. देशोदेशी त्याचा प्रसार झाला. अधिक सत्ताधारी होण्यासाठी शासनसंस्थेने हे किंवा ते धोरण अंमलात आणले पाहिजे अशा रीतीने आधीच्या लेखकांसारखा युक्तिवाद न करता, ॲडम स्मिथ यांनी संपत्तीचे उत्पादन आणि वितरण यावर प्रभाव पाडणाऱ्या कारणांचा अभ्यास करण्याकडे आपले लक्ष केंद्रित केले होते. जेव्हा अनेक व्यापारवादी, देशाची सत्ता वाढवणाऱ्या धोरणांचा बुरखा पांघरून त्या आड स्वार्थ साधण्यात निमग्न होते, त्यावेळी त्याची वकिली करण्याऐवजी, विश्लेषणामध्ये रस असलेल्या ॲडम स्मिथ यांनी शास्त्रीय पद्धतीने या विषयाची मांडणी केली. त्यांच्या या सुप्रसिद्ध पुस्तकाचा काही भाग व्यापार-वादी तत्त्वप्रणालीच्या अभ्यासाला वाहिलेला आहे. त्यांनी व्यापारवाद्यांचे बिंग फोडले.

स्मिथ यांच्या पूर्वीही काही जणांनी असा प्रयत्न केला होता. व्यापारवादाच्या उन्नत-कालामध्येही त्या तत्त्वांवर हल्ला चढवणारे काही विचारवंत होते. व्यापारवाद्यांच्या प्रत्येक व्यवहारावर टीका झाली होती.

विदेशी मालावरील कर किंवा त्यांच्या आयातीवरील बंदी याचेच उदाहरण घ्या. अगदी १६९० साली देखील **अ डिस्कोर्स ऑफ ट्रेड** [व्यापारासंबंधी एक चर्चा] या पुस्तकामध्ये निकोलस बार्बोन यांनी लिहिले होते : “ व्यापाराला मनाई हेच त्याच्या ऱ्हासाचे कारण होय. एतद्देशीय वस्तूंशी विनिमय करूनच विदेशी वस्तू आणल्या जातात. म्हणजेच ज्या प्रमाणात विदेशी वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घातले जातात, त्याप्रमाणात तिच्याशी विनिमय होऊ शकणाऱ्या देशी वस्तूंचे उत्पादन आणि त्याची निर्यात यालाही अडथळा निर्माण होतो. अशा उद्योगात काम करणारे कारागीर आणि व्यापारी यांचा धंदा बुडीत निघतो...”

किंवा व्यापारी शिलकीचा सर्वपरिचित सिद्धांत पाहा. ' डिस्कोर्सेस अपॉन ट्रेड ' [व्यापारासंबंधी चर्चा] या प्रसिद्ध पुस्तकामध्ये डड्ले नॉर्थ यांनी १६९१ साली व्यापार-वाद्यांच्या युक्तिवादावर घणाघाती घाव घातले होते. “ आयात–निर्यात शिल्लक किंवा व्यापारी शिल्लक यासंबंधी झालेल्या चौकशीच्या संदर्भात अलीकडेच मोठा गोंधळ माजवण्यात आला होता. आपण निर्यातीपेक्षा अधिक आयात केली तर आपली विनाशा-कडे वाटचाल होईल अशी लोकांची समजूत होती ... आता हे ऐकायला विचित्र वाटेल, पण व्यापाराच्या बाबतीत संपूर्ण जग हे एखाद्या राष्ट्राप्रमाणे असते जगातील विविध राष्ट्रे राष्ट्रातील लोकांप्रमाणे असतात. व्यापार हा लोकांचे नुकसान करूच शकत नाही,

कारण तो तसा झाल्यास लोक त्याला सोडचिठ्ठी देतील ... कायदे करून व्यापारातील नफा ठरत नाही तर त्याचा दर व्यापारातूनच घडतो. परंतु जेव्हा असे कायदे केले जातात तेव्हा ते व्यापाराला अडथळा मात्र करतात आणि म्हणूनच त्याचे परिणाम प्रतिकूल होतात. ”

त्याचप्रमाणे १७४९ साली जोसेफ टकर यांनी विशिष्ट लोकांना एकाधिकारी सवलती देणाऱ्या व्यापारवादी धोरणांवर हल्ला चढवला. “ आपल्या देशातील एकाधिकारी सार्वजनिक कंपन्या आणि कार्पोरेट सनदा या गोष्टी खुल्या व्यापाराला हानीकारक आहेत ... काही मूठभर लोभी संचालकांना श्रीमंत करण्यासाठी संपूर्ण राष्ट्राला व्यापारामध्ये नुकसान सहन करावे लागते. तीन-चतुर्थांश जगाशी असलेल्या व्यापारामधून अंग काढून घ्यावे लागते. ज्या गोष्टीमुळे **लोक** गरीब होतात त्याचमुळे हे **संचालक** श्रीमंत होतात. ”

वसाहतवाद्यांच्या व्यापारी धोरणाबद्दल टकर म्हणतात : “ आयर्लंडचे उद्योगधंदे आणि व्यापार दडपून टाकण्यामागील आपला अवास्तव मत्सर आणि चुकीचे धोरण हे आपला व्यापार वाढवण्याच्या मार्गात येणारे प्रमुख अडथळे आहेत. आयर्लंड श्रीमंत झाले तर **इंग्लंड** देखील श्रीमंत होईल आणि फ्रान्स **गरीब** बनेल. आज आयर्लंड-मधून चोरून निर्यात केलेल्या लोकरीपासून फ्रान्समध्ये कापड बनते आणि तेथून ते आपल्या कापडाशी स्पर्धा करण्यासाठी जागतिक बाजारपेठेत येते. याच लोकरीचे जर आयर्लंडमध्ये कापड करण्यात आले, तर आयरिश जमीनमालकांच्या खंडात वाढ होऊन तो पैसा लवकरच इंग्लंडकडे वाहू लागेल. ”

सोने-चांदीचे भांडार राष्ट्रासाठी महत्त्वाचे असते या व्यापारवादी संकल्पनेचे काय झाले ? ॲडम स्मिथ यांचे एक मित्र डेव्हिड ह्यूम यांनी १७४२ मध्ये त्या संकल्पनेचा चक्काचूर केला. प्रचंड खजिन्यामुळे कोणत्याही देशाला प्रदीर्घ काळ फायदा होत नाही हे त्यांनी दाखवून दिले. आंतरराष्ट्रीय व्यापार प्रक्रियेमधून सुवर्णनियंत्रित चलनपद्धती असलेल्या प्रत्येक देशात येणारा सोन्याचा साठा किंमतींच्या पातळीवर परिणाम करतो व त्यामार्फत त्या देशाच्या आयात-निर्यातीचे संतुलन होते असा त्यांचा सिद्धांत होता. परंतु हे कसे होत असे ?

अर्थव्यवस्थेतील चलन पुरवठ्याच्या प्रमाणात किंमतींमध्ये चढउतार होतात हे सत्य फार पूर्वीपासून माहीत होते. या मुद्याला धरून ह्यूम यांनी मांडणी केली : “ आपण जर कोणत्याही एका राज्यापुरताच विचार केला तर चलन पुरवठ्यातील चढउतारामुळे तेथील संपन्नतेत काहीच फरक पडणार नाही ही गोष्ट तर उघडच आहे; कारण क्रयवस्तूंच्या किंमती चलन पुरवठ्यामुळे निश्चित होतात. ”

आता किंमती वाढल्या तर त्याचा एखाद्या देशाच्या विदेश व्यापारावर काय परिणाम होतो ? अर्थातच या देशातील वस्तू महाग झाल्यास इतर देशांतील लोक त्या वस्तू कमी प्रमाणात विकत घेतील. याचाच अर्थ त्या देशाची निर्यात कमी होऊन तेथील आयात-निर्यातीचे संतुलन बिघडून जाईल. इतर देश या देशाकडून जेवढ्या वस्तू विकत घेतील

त्यापेक्षा हा देश त्यांच्याकडून अधिक वस्तू आयात करील. शेवटी या-ना-त्या मार्गाने देशाला या फरकाची किंमत मोजावीच लागेल. जर देशाची निर्यात आयातीएवढी होत नसेल तर देशाला तो फरक पैशामध्येच मोजावा लागेल. याचा अर्थ ज्या देशात किंमती वाढल्या आहेत तेथून सोने बाहेर जाऊ लागेल. या गळतीमुळे त्या अर्थव्यवस्थेतील चलनपुरवठा कमी होईल व त्याचा परिणाम म्हणून तेथील किंमतींची पातळी खाली येईल. त्यानंतर इतर देशांच्या लक्षात येईल की संबंधित देशातील वस्तू आता स्वस्त झाल्या आहेत. यामुळे मग निर्यात वाढेल आणि मग तो देश पुन्हा आयात निर्यातीचे संतुलन साधू शकेल. हीच प्रक्रिया याविरुद्ध क्रमानेही घडू शकेल. म्हणजे अर्थव्यवस्थेतील चलन पुरवठा कमी झाल्यामुळे जर एखाद्या देशातील किंमतींची पातळी खालावली तर इतर देश अशा देशाकडून अधिक वस्तू विकत घेतील, कारण त्या स्वस्त असतील. अशा परिस्थितीत सदर देशाची निर्यात आयातीपेक्षा अधिक असेल आणि यातील फरक त्याला पैशाच्या रूपात मिळेल. अशा रितीने सोन्याच्या साठ्यात होणारी वाढ भाववाढीला कारणीभूत होईल. मग किंमतींमुळे होणारा निर्यातवाढीचा फायदा संपुष्टात येईल, आणि देशाच्या आयात-निर्यातीमध्ये पुन्हा एकदा समतोल साधला जाईल.

अर्थात ह्यूमच्या सिद्धांताची ही केवळ रूपरेषा आहे. वास्तविक पाहता हा सगळा प्रकार इतक्या सुरळितपणे घडत नसतो. त्याला बराच वेळ लागतो—हा सिद्धांत "लांब पल्ल्याच्या" काळासाठी खरा आहे. परंतु ह्यूमच्या स्पष्टीकरणामुळे मौल्यवान धातूंचा साठा देशाला आवश्यक असतो याला महत्त्व देणारी व्यापारवादी संकल्पना मोडीत निघाली.

व्यापारवादी सिद्धांतच व्यवहारात आल्याक्षणीच त्याच्यावर एकामागून एक हल्ले चढवण्यात आले. फ्रान्समध्ये 'फिजिओक्रॅट्सनी' खुल्या व्यापारावर भर दिला.

फ्रान्समध्ये उद्योगधंद्यांवरील शासनसंस्थेचे नियंत्रण शिगेला पोहोचले असल्यामुळे, व्यापारवादी आणि लष्करशाही यांच्या विरोधाला तेथे खतपाणी मिळाले असेल असे कोणाला वाटेल. खरेच आहे ते. फ्रान्समधील उद्योगधंदे, "हे केलेच पाहिजे" आणि "हे करता कामा नये" याच्या जाळ्यामध्ये एवढे गुरफटले होते, आणि तेथे नियमन करणाऱ्या निरीक्षकांचा इतका सुळसुळाट झाला होता की, कारभाराचे गाडे पुढे कसे सरकत होते याचेच आश्चर्य वाटावे. गिल्डचे कायदे आणि नियम वाईट होते. काही ठिकाणी ते चालू राहिले तर काही ठिकाणी त्यांच्या जागी बारीक-सारीक गोष्टींवर निर्बंध लादणारे सरकारी नियम आले. फ्रान्समधील उद्योगधंद्यांना संरक्षण देऊन उद्योजकांना मदत करण्यासाठी या नियमांची आखणी करण्यात आली होती. हे काम जरी हुषारीने करण्यात आले असले तरी उद्योजकांना ती एक डोकेदुखीच झाली होती. कापड-उद्योजकाला कोणत्याही प्रकारचे कापड तयार करायला परवानगी होती का? नाही. ते कापड या दर्जाचे आणि एवढ्याच लांबीचे असले पाहिजे असा नियम होता. टोप्यांचा उत्पादक बीव्हर, फर आणि लोकर मिश्रित टोप्या बनवून लोकांची मागणी पुरवू शकत होता का? नाही. एक तर संपूर्ण बीव्हरच्या किंवा संपूर्ण लोकरीच्या टोप्या बनवण्याची त्याला मुभा होती. त्यामध्ये बदल मंजूर नव्हता. वस्तूंच्या उत्पादनासाठी एखाद्या अधिक

चांगल्या आणि नव्या साधनांचा उपयोग उद्योजक करू शकत होता का? नाही. अवजारे एका विशिष्ट आकाराचीच असली पाहिजेत असा नियम होता आणि ती तशी आहेत याची खातरजमा तपासनीस करीत.

कोणत्याही अतिरेकाचा नैसर्गिक परिणाम म्हणून विरुद्ध दिशेने तितकेच अतिरेकी पद्धतीचे मार्गक्रमण सुरू होते. उद्योगधंद्यांवरील अतिरेकी नियंत्रणामुळेच त्यावर अजिबात नियंत्रण नको अशी मागणी पुढे आली. निर्नियंत्रणाची मागणी करणाऱ्या अगदी सुरुवातीच्या लोकांमध्ये द गूर्ने नावाचे एक फ्रेंच उद्योजक होते. त्यांच्याबद्दल टयुरगॉट या प्रसिद्ध फ्रेंच अर्थमंत्र्यांनी लिहिले आहे : "बराच खर्च करून एखाद्या कंपनीत प्रवेश मिळवून एखादी वस्तू तयार करण्याचा किंवा विकण्याचा अधिकार विकत घेतल्याशिवाय कोणत्याही नागरिकाला त्या वस्तूचे उत्पादन किंवा विक्री करता येत नव्हती, हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले...ज्या राज्यामध्ये वारसा हक्क केवळ रूढीनुसारच ठरतो अशा राज्यामध्ये कापडाच्या प्रत्येक तुकड्याची लांबी आणि रुंदी किती असावी, तो तुकडा किती धाग्यांनी बनलेला असावा अशा गोष्टींबद्दल खास कायदे करणे, हे महत्त्वाचे तपशील भरलेल्या कागदपत्रांवर कायदेमंडळाने शिक्कामोर्तब करणे आणि एकाधिकारशाहीच्या नशेखातर असे असंख्य नियम करणे असल्या गोष्टी सरकार करील याची त्यांनी कधी कल्पनाही केली नव्हती. प्रत्येक क्रय वस्तूची किंमत नियंत्रित करण्यामध्ये, एखाद्या उद्योगधंद्याची भरभराट व्हावी म्हणून दुसऱ्या उद्योगावर बंदी घालण्यामध्ये आणि इतर सर्व नागरिकांपेक्षा शेतकऱ्यांची अवस्था तर अधिकच अनिश्चित आणि दीनवाणी करून, देशात धान्याचा पुरवठा भरपूर होईल अशा कारवायांमध्ये सरकार गुंतून पडते हे पाहून ते अवाकच झाले."

या अमर्याद नियंत्रणामुळे गूर्ने केवळ आश्चर्यचकित होऊन थांबले नाहीत. त्यांना फ्रान्सने हे नियंत्रण झुगारून द्यावे असे वाटले. तेव्हापासून कोणत्याही प्रकारच्या नियंत्रणाविरुद्ध सर्वांची रणगर्जना बनलेला शब्दप्रयोग त्यांनी तयार केला "लेसेफेअर" (Laissez-faire) म्हणजेच मुक्त व्यवहार. या प्रसिद्ध शब्दप्रयोगाचे स्वैर भाषांतर आहे, "एकले चलो."

मुक्त व्यवहार हे गूर्ने यांना समकालीन असणाऱ्या फ्रेंच फिजिओक्रॅटस्‌चे घोषवाक्य झाले. अर्थशास्त्राचे पहिले-वहिले शिल्पकार म्हणून हे फिजिओक्रॅट्स् महत्त्वाचे आहेत. आर्थिक प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी फ्रान्सुआ क्वेस्नेच्या नेतृत्वाखाली १७५७ सालापासून नियमितपणे जमणारा तो एक गट होता. या गटाच्या सभासदांनी नियंत्रणापासून मुक्त खुला व्यापार आणि मुक्त व्यवहार यासाठी आवाहने करणारे लेख आणि पुस्तके लिहिली. बाडेनचे राजे कार्ल फ्रीडरिश यानी आपण आपले राज्य कसे चालवावे याबद्दल 'मिराबो' या प्रसिद्ध फिजिओक्रॅटना १७७० साली सल्ला विचारला. त्यांनी लिहिले : "महाराज, आपल्या राज्यात आपण खुले बंदर आणि खुला व्यापार सुरू करावा. आपल्या राज्यात पाय ठेवताच आपले प्रिय आणि आदरणीय नाव प्रथम वाचले जावे आणि त्याखाली हे महान शब्द असावेत : मुक्त व्यवहार, बंधमुक्तता, स्वातंत्र्य!

....तुमचे राज्य लवकरच माणसांसाठी सुखसोयींचे आगर बनून व्यापाराचा नैसर्गिक मार्ग आणि सर्व जगाचे एकत्र येण्याचे ठिकाण म्हणून नावारूपाला येईल."

फिजिओक्रॅट्स खुल्या व्यापारावर विश्वास ठेवण्याकडे एका अप्रत्यक्ष मार्गाने आले. सर्वप्रथम त्यांचा खाजगी मालमत्ता आणि विशेषतः जमिनीची खाजगी मालकी यांच्या पावित्र्यावर ठाम विश्वास होता. मालमत्तेच्या हक्कांवर त्यांचा विश्वास असल्यामुळे त्यांचा स्वातंत्र्यावर विश्वास होता—जोपर्यंत दुसऱ्याच्या मालमत्तेला धोका पोहोचत नाही तोपर्यंत स्वतःच्या मालमत्तेचे हवे ते करण्याचे व्यक्तिस्वातंत्र्य त्यांना हवे होते. स्वतःला हवे ते उत्पादन करण्याची आणि हवी तेथे विक्री करण्याची शेतकऱ्यांना मुभा असावी ही त्यांची खुल्या व्यापारासाठी सुरू असणाऱ्या युक्तिवादामागील भूमिका होती. त्याकाळी फ्रान्स-बाहेर धान्य पाठवायचे तर प्रथम कर भरावा लागे. एवढेच नव्हे, तर देशाच्या एका भागातून दुसऱ्या भागात धान्य नेतानाही त्यावर कर भरावा लागे. न्यू जर्सीमधील शेतकऱ्याला न्यूयॉर्कला भाजीपाला पाठवताना राज्याच्या सरहद्दीवर कर भरावा लागण्या-सारखी ही स्थिती होती. फिजिओक्रॅट्स अशा कराच्या विरुद्ध होते. मालमत्तेच्या हक्काचा उपभोग घेण्यासाठी संपूर्ण स्वातंत्र्य आवश्यक आहे हे त्यांच्या विचाराबद्दल सर्वात चांगली माहिती असणाऱ्या मेर्सियेर द लारिव्हियेर यांनी दाखवून दिले आहे. "अनिर्बंध स्वातंत्र्याशिवाय उत्पादनाची अमर्याद मुबलकता अशक्य आहे...जो अधिकार वापरण्याचे स्वातंत्र्य आपल्याला नाही तो अधिकार हा अधिकारच नाही, हे खरे नाही का? म्हणूनच स्वातंत्र्याशिवाय मालमत्तेच्या अधिकाराची कल्पना करणे अशक्य आहे... उपभोगाच्या इच्छेने प्रेरित झाल्याशिवाय माणूस कोटलीही गोष्ट करत नाही. आता उपभोगाच्या स्वातंत्र्यापासून उपभोगाची इच्छा जर वेगळी काढली तर त्याचा काय उपयोग?"

प्रत्येक प्रश्नाचा शेतीवर काय परिणाम होईल याच दृष्टिकोनातून फिजिओक्रॅट्स त्या विषयाला हात घालीत. जमीन हे संपत्तीचे एकमेव उगमस्थान आहे आणि फक्त जमिनी-वरील श्रमच उत्पादक श्रम असतात अशी त्यांची धारणा होती. ' कार्ल फ्रीडरिश यांच्या बरोबरच्या पत्रव्यवहारामध्ये मिराबो म्हणतात : "एक कसणारा माणूस या नात्याने आपला शेतकरी उत्पादक श्रम करतो आणि केवळ या श्रमातूनच, खर्च वजा जाता आपल्याला नफा मिळतो. एक विणकर या नात्याने तो जे काम करतो ते उपयुक्त असले तरी त्यातून निर्मिती होत नाही म्हणून ते अनुत्पादकच असते."

फिजिओक्रॅसट्च्या युक्तिवादाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते: उद्योगधंदे आणि व्यापार याला अत्यावश्यक असलेला कच्चा माल शेतीमधूनच पुरवला जातो. अशा कच्च्या मालाचे उत्पादित वस्तूंमध्ये रूपांतर करण्याचे उपयुक्त काम कारागीर करतात. हे खरे असले तरीही ते संपत्तीच्या साठ्यामध्ये भर घालत नाहीत. कच्च्या मालावर कारागिरांनी काम केल्यावर त्याचे मूल्य वाढते, परंतु मूल्यातील ही वाढ केवळ कारा-गिरांना त्यांच्या कामाबद्दल मोजलेल्या पैशाइतकीच असते. त्यामुळे संपत्तीमध्ये वाढ होत नाही. मात्र शेतीच्या बाबतीत ही गोष्ट खरी नव्हती असा फिजिओक्रॅट्सचा युक्ति-

वाद होता. त्यांच्या मते उद्योगधंदे वांझ होते तर शेती फलदायी होती. शेतीमधील मजुरीचा खर्च आणि शेतमालकाचा नफा वजा जाऊनही, निसर्गाच्या कृपाप्रसादामुळे निव्वळ उत्पन्न बाकी राहाते. आणि हीच संपत्तीमधील खरी वाढ होय असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या मते, खर्च वजा जाता उरणारे शेतीमधील वरकड उत्पादन किंवा निव्वळ उत्पन्न हे प्रत्येक साली वेगवेगळे असते. ऋतुमानातील बदलाप्रमाणे ते कमी जास्त होते.

या फिजिओक्रॅटिक सिद्धान्तामधील बऱ्याच भागाशी आजचे अर्थतज्ञ सहमत होत नसले तरी आजही एका गोष्टीबद्दल फिजिओक्रॅटसची प्रशंसा केली जाते. ती म्हणजे राष्ट्राकडे साठलेल्या वस्तू हे त्यांच्या संपत्तीचे परिमाण नसून राष्ट्राचे उत्पन्न हेच त्यांच्या संपत्तीचे परिमाण आहे; किंवा वस्तूंच्या साठ्याने नव्हे तर वस्तूंच्या प्रवाहाने राष्ट्राच्या संपत्तीचे मोजमाप केले पाहिजे हे त्यांनी दाखवून दिले.

फिजिओक्रॅट्सच्या सिद्धान्ताबद्दल ॲडम स्मिथ यांचे विचार पाहा : "या विचारसरणीतील सर्व दोष मान्य करूनही, राजकीय अर्थशास्त्र या विषयाबद्दल आजवर जे लिहिले गेले आहे त्यामध्ये ही विचारसरणी सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाणारी आहे ... केवळ जमिनीवरील श्रम हेच उत्पादक श्रम असतात असा अत्यंत संकुचित विचार ह्यात मांडला गेला असला तरीही ज्याचा उपभोग घेता येणार नाही अशा पैशाच्या साठ्याऐवजी प्रतिवर्षी श्रमाने उत्पादित केलेल्या उपभोग्य वस्तूंमध्ये राष्ट्राची संपत्ती असते आणि संपूर्ण स्वातंत्र्य देऊनच वार्षिक पुनरुत्पादनाची उच्चतम पातळी गाठता येते हा विचार मांडल्यामुळे सर्वदृष्ट्या ही तत्त्वप्रणाली जितकी न्याय्य तितकीच उदारमतवादीही असल्याचे सिद्ध होते."

फिजिओक्रॅट्सनी जरी ॲडम स्मिथ यांच्याही पूर्वी "संपूर्ण स्वातंत्र्याचा" युक्तिवाद मांडला असला तरी ॲडम स्मिथ हेच अधिक प्रभावशाली ठरले. त्यांच्या **'वेल्थ ऑफ नेशन्स'** [राष्ट्रांची संपत्ती] या पुस्तकाच्या एकामागून एक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या हयातीत आणि त्यानंतरही त्याचा वाचकवर्ग विशाल होता. व्यापारवादी सिद्धांतावर जे काही हल्ले चढवण्यात आले त्यामध्ये स्मिथ यांचे हल्ले निर्णायक होते. त्यांनी जडजवाहीरवाद्यांना निकालात काढताना लिहिले : "ज्याप्रमाणे एखाद्या देशात द्राक्षांचे मळे नसतील तर त्यांना विदेशातून दारू आणावी लागेल, त्याचप्रमाणे स्वतःच्या खाणी नसतील तर त्यांना नक्कीच विदेशातून सोने आणि चांदी आणावी लागेल. म्हणूनच सरकारने एका वस्तूपेक्षा दुसऱ्या वस्तूकडे अधिक लक्ष देण्याची काहीही आवश्यकता नाही. दारू विकत घेण्याचे आर्थिक बळ जर एखाद्या देशामध्ये असेल तर जरूर तेव्हा त्याला दारू मिळेल आणि सोने व चांदी विकत घेण्याचे बळ एखाद्या देशापाशी असेल तर त्याला या मौल्यवान धातूंची कधीही कमतरता भासणार नाही. इतर सर्व क्रयवस्तूंप्रमाणेच एका विशिष्ट किंमतीला मौल्यवान धातू विकत घेता येतात.."

व्यापारवाद्यांच्या वसाहतवादी धोरणाविषयी त्यांच्या लिखाणाचा सारांश असा होता. : "व्यापारवादी व्यवस्थेच्या इतर सर्व संकुचित आणि विघातक युक्त्यांप्रमाणेच त्यांची

वसाहतींबरोबर व्यापाराची एकाधिकारशाही इतर सर्व देशांमधील व प्रामुख्याने वसाहतीं-मधील उद्योगधंद्यांना दडपून ठेवण्यास कारणीभूत होते. आणि तरीही ज्या देशाच्या फायद्यासाठी या युक्त्या अंमलात आणण्यात येतात त्या देशांचे उद्योगधंदे वाढणे तर दूरच राहो पण उलट ते डबघाईलाच येतात."

स्मिथ यांच्या पुस्तकाच्या पहिल्या वाक्यापासून खुल्या व्यापाराच्या युक्तिवादाला सुरुवात होते. प्रथम आपल्याला सांगण्यात येते की, "श्रमाच्या उत्पादक शक्तींमधील जबरदस्त वाढ हा श्रमविभागणीचा परिणाम आहे असे दिसते." श्रमविभागणीचा आपल्याला आज अभिप्रेत असणारा अर्थच १७७६ साली स्मिथना अभिप्रेत होता. कामगाराला तो तज्ज्ञ होईपर्यंत एकच काम करायला लावल्यामुळे कामगार त्या कामात पारंगत होतो हेच स्मिथना अभिप्रेत होते. "एका अत्यंत क्षुल्लक उद्योगाचे आपण उदाहरण घेऊ या. टाचणी तयार करण्याचा उद्योग क्षुल्लक असला तरीं त्यामध्ये श्रमविभागणीकडे नेहमीच लक्ष दिले जाते. या धंद्याचें शिक्षण ज्याने घेतलेले नाही किंवा यात वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामुग्रीशी ज्याची जानपहचान नाही असा कारागीर अत्यंत कामसू असला तरीही दिवसभरात तो फार तर एखाददुसरी टाचणी तयार करील, वीस नक्कीच नाही. पण आज ज्या पद्धतीने हा धंदा केला जातो. त्यामध्ये संपूर्ण काम हा एक वैशिष्ट्यपूर्ण उद्योग बनला आहे. एवढेच नव्हे, तर त्या कामाची अनेक शाखांमध्ये विभागणी करण्यात आली असून प्रत्येक शाखा देखील एक वैशिष्ट्यपूर्ण उद्योग बनली आहे. एक माणूस तार ओढून ती लांब करतो, दुसरा ती सरळ करतो. तिसरा ती कापतो. चौथा ती टोकदार करतो, पाचवा डोके घडवण्यासाठी ती टोकतो. हे डोके घडवण्यासाठी दोन-तीन वेगवेगळ्या क्रिया कराव्या लागतात. यात टाचणी सरळ उभी करणे हे देखील एक वैशिष्ट्यपूर्ण काम आहे, तसेच टाचण्यांना पॉलिश करणे हेही आहे. त्यानंतर टाचण्या कागदामध्ये ठेवणे हेदेखील एक वेगळेच काम आहे. अशा रीतीने टाचण्या तयार करण्याचे काम वेगवेगळ्या अठरा क्रियांमध्ये विभागलेले आहे. काही कारखान्यांत या सर्व क्रिया वेगवेगळी माणसे करतात तर इतर काहींमध्ये एक माणूस त्यातील दोन किंवा तीन क्रिया करतो. मी असा एक छोटा कारखाना पाहिला आहे. त्यात फक्त दहा माणसे काम करत होती. म्हणूनच त्यांच्यापैकी काही जण दोन किंवा तीन क्रिया करीत. तेथे नेट लावल्यास ते सर्वजण मिळून दिवसभरात साधारणपणे बारा पौंड टाचण्या करीत. एका पौंडात मध्यम आकाराच्या चार हजारापेक्षा अधिक टाचण्या बसतात. म्हणजे ती दहा माणसें एकत्रितपणे दिवसभरात अठ्ठेचाळीस हजारापेक्षा जास्त टाचण्या तयार करतात. याचा अर्थ अठ्ठेचाळीस हजार टाचण्यांचा एकदशांश भाग करणारा प्रत्येक माणूस दिवसभरात चार हजार आठशे टाचण्या तयार करतो असे म्हणता येईल. पण जर त्यापैकी प्रत्येकाने संपूर्ण टाचणी करण्याचे काम स्वतंत्रपणे केले आणि त्यांच्या-पैकी कोणालाही विशिष्ट धंद्याचे प्रशिक्षण मिळालेले नसेल तर त्यापैकी प्रत्येकजण वीस टाचण्याही तयार करू शकणार नाही. दिवसभरात कदाचित एक टाचणीही करणे त्यांना जमणार नाही. वेगवेगळ्या क्रियांच्या सुयोग्य विभागणीमुळे आणि संयोजनामुळे ते

आज जेवढे उत्पादन करतात, त्याच्या दोनशे चाळीसावाच काय पण कदाचित चार हजार आठशेवा भागही त्यांच्याकडून होऊ शकला नसता."

असे असेल, पण म्हणून काय सिद्ध होते ? धरून चालू की अधिक कौशल्य, वेळेची बचत आणि एकंदर कार्यक्षमता वगैरे कारणांमुळे श्रमविभागणी, श्रमाची उत्पादकता याबद्दल ॲडम स्मिथबरोबर आपण सहमत आहोत. पण म्हणून काय झाले ? त्याचा खुल्या व्यापाराशी काय संबंध ?

भुकेचा अन्नाशी असतो तसाच ! कारण श्रमविभागणी बाजारपेठेच्या विस्ताराने निश्चित होते असे ॲडम स्मिथ म्हणतात : "विनिमयाच्या शक्तीमुळे श्रमविभागणी शक्य होते. म्हणूनच या श्रमविभागणीच्या विस्ताराची मर्यादा या विनिमयशक्तीच्या म्हणजेच बाजारपेठेच्या विस्ताराने ठरवली जाते. जेव्हा बाजारपेठ छोटेखानी असते तेव्हा एकाच कामाला वाहून घेण्यासाठी कोणाही माणसाला प्रोत्साहन मिळत नाही. कारण स्वतःच्या श्रमाने केलेल्या उत्पादनापैकी स्वतःच्या उपयोगास आवश्यक भाग वजा जाता उरलेल्या वरकड उत्पादनाचा विनिमय करून तो इतर माणसांनी उत्पादित केलेल्या पण त्याला आवश्यक असलेल्या क्रयवस्तू मिळवू शकेल एवढी शक्ती अशा बाजारपेठेत नसते."

श्रमविभागणीने उत्पादकता वाढते व श्रमविभागणीची मर्यादा बाजारपेठेच्या मर्यादेने ठरते. तर जितका बाजारपेठेचा विस्तार अधिक तेवढी श्रमविभागणी अधिक आणि तेवढीच उत्पादकतेत जास्त वाढ — म्हणजेच राष्ट्रीय संपत्तीही तेवढी अधिक. खुल्या व्यापारामुळे बाजारपेठा अधिकाधिक विस्तृत होतात व त्यामुळे विस्तृत प्रमाणावर श्रमविभागणी करता येते आणि परिणामी उत्पादकताही वेगाने वाढू लागते. म्हणूनच खुल्या व्यापाराची गरज आहे.

आता हे जरासे गुंतागुंतीचे आहे. पण हे समजून घेण्याची सोपी पद्धत अशी आहे :

१. श्रम विभागणीमुळे उत्पादकतेमध्ये वाढ घडून येते.
२. बाजारपेठेच्या विस्ताराच्या प्रमाणात श्रमविभागणी कमी किंवा जास्त होते.
३. बाजारपेठेचा खरा विस्तार खुल्या व्यापारामुळेच होतो.

म्हणून—खुला व्यापार उत्पादकतेमध्ये वाढ घडवून आणतो.

आणखीही एक मुद्दा लक्षात घेण्याजोगा आहे. विविध देशांमधील खुल्या व्यापारामुळे श्रमविभागणी सर्वोच्च पातळीला पोहोचते. ॲडम स्मिथ यांच्या टाचण्या तयार करणाऱ्या कारखान्याप्रमाणेच जागतिक पातळीवरील श्रमविभागणीमुळेही तसेच फायदे मिळतात. ज्या वस्तू अत्यंत स्वस्तात तयार करणे शक्य असते त्याच वस्तूंच्या उत्पादनामध्ये पारंगत होण्यास प्रत्येक देशाला वाव मिळतो. अशा रीतीने सर्व जगाच्या संपत्तीमध्ये वाढ होते.

परंतु या प्रकरणाच्या सुरुवातीला व्यापारवादी नियंत्रण, नियमन आणि निर्बंध या विरोधी बंडखोर म्हणून आपण ॲडम स्मिथची ओळख करून घेतली होती. उद्योग-

धंद्यातील सरकारच्या ढवळाढवळीबद्दल त्यांना काय म्हणायचे होते? पुढील उताऱ्यामध्ये त्यांनी सरकारच्या अशा ढवळाढवळीचा धिक्कार केला आहे आणि मुक्तीची मागणी केली आहे. "एखाद्या उद्योगधंद्याकडे नैसर्गिकरित्या आकृष्ट होणाऱ्या भांडवलापेक्षा विशेष प्रोत्साहन देऊन त्या विशिष्ट उद्योगधंद्याकडे अधिक भांडवल वळवणारी किंवा खास निर्बंध घालून एखाद्या उद्योगाकडील भांडवलाचा ओघ थांबविण्याचा प्रयत्न करणारी प्रत्येक व्यवस्था प्रत्यक्षात तिच्या मूळ उद्दिष्टालाच मारक ठरते. अशा प्रयत्नांमुळे संपत्ती आणि मोठेपणा यांच्या दृष्टीने होणाऱ्या समाजाच्या प्रगतीला चालना मिळण्याऐवजी खीळ घातली जाते. स्वतःची जमीन आणि श्रम यांचे वार्षिक उत्पादनाचे खरे मूल्य यामुळे वाढत नाही तर उलट ते घटते.

"अशा तऱ्हेचे सर्व नियम वा निर्बंध पूर्णपणे काढून घेतल्यावर नैसर्गिक स्वातंत्र्य असलेली सहजगती आणि साधी व्यवस्था आपोआप प्रस्थापित होते. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांची पायमल्ली टाळून स्वतःच्या सोयीप्रमाणे स्व-हिताचा पाठपुरावा करण्याचे आणि स्वतःची उद्यमशीलता आणि भांडवल दुसऱ्या कोणत्याही माणसाची वा माणसांची उद्यमशीलता आणि भांडवल यांच्या स्पर्धेत उतरवण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य प्रत्येक माणसाला मिळाले पाहिजे."

हे शेवटचे वाक्य पुन्हा वाचा म्हणजे उद्योगधंदे हनुमान उडी घ्यायला अधीर झाले असूनही त्यांच्या पायात खोडा घालणाऱ्या नियमांच्या काळात 'द वेल्थ ऑफ नेशन्स' हे प्रत्येक उद्योजकाचे बायबल का बनले हे तुमच्या सहज लक्षात येईल.

◇ ◇ ◇

१३

आणि जुनी व्यवस्था बदलू लागली....

गरिबांवर कर लादणाऱ्या परंतु श्रीमंतावर कर न बसवणाऱ्या सरकारला तुम्ही काय म्हणाल ? असे सरकार अगदीच वेडगळ आहे असे प्रथम तुम्हाला वाटेल. पण थोडा विचार केल्यावर, अमेरिकेतील सरकारही आज तीच गोष्ट करत आहे असे तुम्हाल आढळून येईल. असे असूनही अमेरिकेमधील श्रीमंत लोकांनाच वाजवीपेक्षा जास्त कर भरावा लागतो असे सिद्ध करण्यासाठी वाद घालणारे अनेक लोक आपल्याला सापडतील. परंतु, अठराव्या शतकातील फ्रान्सचे सरकार श्रीमंतांवर कर न बसवता केवळ गरिबांवरच कर लादत होते याबद्दल मात्र कसलाही वाद उद्‌भवणार नाही.

असा वाद उद्‌भवणार नाही याचे कारण जवळपास सर्वच करांतून आपण मुक्त आहोत असा तेव्हाच्या विशेषाधिकारी वर्गाचा दावा होता. सर्वसामान्य लोकांप्रमाणे आपल्यालाही कर भरावे लागले तर फ्रान्सचा अंतकाळ नजीक येईल असे धर्मगुरू आणि सरदार-दरकदारांना वाटे. जेव्हा राज्याचा खर्च फार वाढू लागला आणि त्याच्याशी महसुलाचा मेळ बसेनासा झाला, म्हणजेच फ्रान्सच्या सरकारला आर्थिक चणचण भासू लागली तेव्हा गरिबांप्रमाणेच विशेषाधिकारी वर्गांवरही कर बसवून या अडचणीतून मार्ग काढता येईल असा विचार राज्यकर्त्यांनी केला. १७७६ साली अर्थमंत्री टर्गो यांनी करव्यवस्थेमध्ये काही अत्यावश्यक सुधारणा अंमलात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु विशेषाधिकारी वर्गांना असा बदल मानवणे शक्यच नव्हते. त्यामुळे पॅरिसमधील संसदेत एकत्र येऊन त्यांनी त्यांची भूमिका अत्यंत स्पष्टपणे पुढील शब्दात मांडली : “ प्रत्येकाजवळ असणारी गोष्ट त्यांच्याजवळ कायम ठेवणे हा न्यायाचा पहिला नियम आहे. संपत्तीच्या अधिकाराचे रक्षण करणे एवढेच नव्हे, तर त्यापेक्षा अधिक म्हणजे जन्म आणि सामाजिक स्थान यामुळे माणसाला मिळणाऱ्या अधिकारांचे रक्षण करणे हा या नियमाचा अर्थ आहे.... या कायदेशीर न्याय्य नियमावरून एक गोष्ट ओघानेच येते की मानवता आणि दयाधर्म यांच्या नावाने कोणतीही व्यवस्था जर कर्तव्यांमध्ये समानता प्रस्थापित करण्याचा वा माणसामाणसांतील वाजवी फरक नष्ट करण्याचा प्रयत्न करील तर ती अनागोंदीला कारणीभूत होईल. (हा समानतेचा अपरिहार्य परिणाम असतो.) त्यामुळे नागरी जीवन

उद्‌ध्वस्त होईल. अनेक वेगवेगळया इस्टेटी मिळून फ्रेंच राजेशाहीची जडण-घडण झाली आहे. शिक्षण आणि पूजाअर्चा ही कामे धर्मगुरू पार पाडतात. शासनाच्या रक्षणासाठी उमराव आपले रक्त सांडतात आणि सल्लामसलत करून राजाला मदत करतात. राजाला अशा महत्त्वाच्या सेवा देऊ न शकणारे, राष्ट्रातील सर्वात नीच वर्गाचे लोक कर भरून, कामधंदा करून आणि शारीरिक परिश्रम करून राजाची सेवा करतात. या फरकांचे समूळ उच्चाटन किरणे म्हणजे सगळी फ्रेंच राज्यघटना झुगारून देण्यासारखेच आहे. ''

धर्मगुरू आणि उमराव हे विशेषाधिकारी होते. त्यांना अनुक्रमे ' फर्स्ट इस्टेट ' आणि ' सेकंड इस्टेट ' असे संबोधण्यात येई. धर्मगुरूंची संख्या सुमारे एक लक्ष तीस हजार आणि उमरावांची संख्या एक लक्ष चाळीस हजार होती. हे सर्व लोक विशेषाधिकारी वर्गात गणले जात याचा अर्थ त्यांच्यापैकी सर्वचजण श्रीमंत होते किंवा ते काहीच काम करत नसत असे नव्हे. यातील काही धर्मगुरू व उमराव गरीब होते तर काही बिशप आणि उमराव अतिश्रीमंत होते. काही पुजारी आणि सरदार कष्ट करणारे होते, तर काही अत्यंत आळशी होते. आणि इतर अनेकजण या दोन टोकांमध्ये कोठेतरी असत.

सामान्य माणसे निराधिकारी वर्गात मोडत होती. त्यांना ' थर्ड इस्टेट ' म्हणून ओळखण्यात येई. फ्रान्समधील अडीच कोटी लोकांपैकी या वर्गाची संख्या ९५ टक्क्यां-पेक्षा जास्त होती. तसेच ज्याप्रमाणे विशेषाधिकारी वर्गातील लोकांच्या संपत्तीमध्ये आणि जीवनमानामध्ये तफावत होती. त्याचप्रमाणे निराधिकारी वर्गातील लोकांमध्येही विविध पातळ्या अस्तित्वात होत्या. त्यांच्यापैकी सुमारे दोन लक्ष पन्नास हजार लोक उच्च मध्यम-वर्गीय किंवा भांडवलदार होते. ' थर्ड इस्टेट 'मधील इतर लोकांच्या तुलनेने ते चांगलेच सुस्थितीत होते. तसेच शहरांमध्ये आणि नगरांमध्ये राहणाऱ्या कारागिरांचा आणखी एक गट होता. त्यांची संख्या सुमारे २५ लाख होती. आणि राहिलेले सुमारे दोन कोटी वीस लक्ष लोक जमिनीवर राबणारे होते. ते शासनाला कर भरत, धर्मगुरूंना दंड भरत आणि उमरावांना सरंजामी खंड किंवा श्रमसेवा देत.

तुमच्या आमच्या सारखी माणसे आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात खर्चाची निश्चिती करून आपल्या जीवनाची आखणी करतात. विविध सरकारे सुद्धा सर्वसाधारणपणे असेच करतात. परंतु अठराव्या शतकातील फ्रान्सच्या सरकारचे डोके उरफाटे चाले. ते मूर्खपणे पैशाची उधळपट्टी करी, तसेच त्याच्या कारभारात अव्यवस्थितपणा आणि भ्रष्टाचार यांनी गोंधळ माजवला होता. एका उदाहरणावरून हे सिद्ध होईल. तेव्हा सरकारी पेन्शन मिळणाऱ्या सर्वांच्या नावांची नोंद असणारे ' लिव्र रूज ' या नावाचे एक ' लाल पुस्तक' होते. सदर यादीत ड्यूक्रेस्ट या न्हाव्याचे नाव होते. त्याला सालिना १७०० लिव्हर्स पेन्शन मिळे. कारण कॉम्त – द – आर्त्वा यांच्या मुलीची केशभूषा करण्यासाठी त्याची नेमणूक झाली होती. आता केशभूषा करण्याएवढे केस वाढण्यापूर्वीच अल्पवयात सदर मुलीचे निधन झाले तरी ड्यूक्रेस्टला त्याचे पेन्शन मिळतच होते.

फ्रान्सची अर्थव्यवस्था किती बेडरपणे चालवली जात होती त्याचे हे एक उदाहरण झाले. अशी हजारो उदाहरणे देता येतील. उत्पन्नावरून खर्च ठरण्याऐवजी तेथे खर्चावरून उत्पन्न ठरवण्यात येई. बेशिस्तीने आणि बेपर्वाईने खर्च केल्यामुळे बराच पैसा करांच्या रूपाने गोळा करावा लागे. विशेषाधिकारी लोक या करांचे ओझे वाहायला अजिबात तयार नव्हते. (या उलट ते निराधिकारी लोकांवर स्वतःचे असे वेगळे कर लादत.) तसेच या ना त्या क्लृप्त्या वापरून ' थर्ड इस्टेट 'चे श्रीमंत सभासद प्रत्यक्ष करांमधून स्वतःची सुटका करून घेत. यामुळे करांचे सर्व ओझे गरिबांवरच पडे व त्यांना असे ओझे फारच जाचक झाले होते. त्या काळचे खरे चित्र रंगवायचे तर राजा, धर्मोपदेशक आणि उमराव यांचे ओझे पाठीवर वाहून नेणारा भुईपर्यंत वाकलेला शेतकरी रंगवावा लागेल.

द तॉकव्हिल या प्रसिद्ध फ्रेंच लेखकाने या कराच्या भाराचा कष्टाळू शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनावर काय परिणाम होई हे दाखविले आहे. " अठराव्या शतकातील फ्रेंच शेतकरी आहात अशी कल्पना करा ... जमिनीशी तो इतक्या उत्कटपणे जोडला गेला होता की स्वतःची सर्व बचत तो जमीन विकत घेण्यासाठी खर्च करी ... या खरेदीसाठी त्याला प्रथम कर भरावा लागे ... अखेर त्याला ती जमीन मिळाली की धान्याची पेरणी करताना तो जीव ओतून काम करी ... तेथे पुन्हा त्याचा सरंजामदार त्याला शेतावरून परत बोलावी आणि विनावेतन आपल्या शेतावर राबण्याची सक्ती करी. नुकतेच रोप आलेले स्वतःचे शेत त्याने सरंजामदाराच्या शिकार-शर्यतींपासून वाचवण्याचा प्रयत्न केला तर त्याला ठोकरण्यात येई. त्याला नदी ओलांडून जायचे तर कर वसूल करण्यासाठी सरंजामदार त्याच्या मार्गात आडवे येत. बाजारपेठेमध्ये स्वतःचे धान्य विकण्याचा अधिकारही त्याला या लोकांकडून विकत घ्यावा लागे. घरी परत आल्यावर स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी उरलेला गहू वापरायचा तर सरंजामदाराच्या गिरणीमध्ये तो दळल्याशिवाय आणि त्याच्याच भटारखान्यात त्याचा पाव तयार करून घेतल्याशिवाय शेतकऱ्याची सुटका नव्हती. त्याच्या तुटपुंज्या उत्पन्नाचा काही भाग खंड भरण्यात निघून जाई ... त्याला काही करायचे असले तरी हे त्रासदायक शेजारी नेहमी त्याच्या मार्गात आडवे येत ... आणि त्यांना वाटेला लावल्यानंतर चर्चचा काळा बुरखा घेऊन इतर काहीजण सुगीच्या वेळी त्याच्या उत्पन्नातील वरकड भाग फस्त करीत ... मध्ययुगीन काळातील सामाजिक संस्थांचा काही प्रमाणात नाश केल्यावर त्यांचे जे विकृत स्वरूप उरले ते मूळ संस्थांपेक्षा शंभरपटीने तिरस्करणीय ठरले. "

परंतु हे तर अकराव्या शतकातील सरंजामदारी व्यवस्थेचे चित्र दिसते. म्हणजे त्यानंतरच्या सात शतकांमध्ये काहीच फरक पडला नव्हता का ? हो, पडला होता तर. फ्रान्समधील दोन कोटी वीस लाख शेतकऱ्यांपैकी, अठराव्या शतकामध्ये केवळ दहा लाख शेतकरी भूदासाच्या अवस्थेत होते. इतरांनी त्या अवस्थेमधून स्वतंत्र शेतकऱ्यांच्या स्थानापर्यंत पायरी पायरीने मजल गाठली होती. परंतु याचा अर्थ सर्व प्रकारच्या सरंजामी सेवा आणि बंधने संपुष्टात आली होती असा नव्हे. काही बंधने नष्ट करण्यात आली असली

तरी बरीचशी टिकूनही होती. ज्या कारणांसाठी ती लादण्यात आली होती ती कारणे कालबाह्य होऊन बराच काळ लोटला होता तरीही. पूर्वी राजाला लष्करी सेवा देण्याच्या बदल्यात उमरावांना सरंजामी अधिकार बहाल करण्यात आले होते; परंतु आता राजाच्या सैन्याचे स्वरूप म्हणजे वेगवेगळ्या उमरावसेनांचा समूह असे राहिले नव्हते. त्या अर्थाने उमरावांचे स्वतंत्र लष्करी कार्य संपुष्टात आले होते. एक सामाजिक गट म्हणून ते आता राज्यकारभार करण्यास मदत न करता केवळ वैयक्तिकरीत्या ते अशी काही कामे करीत ते शेतीकाम किंवा कुठलाही धंदा करीत नसत. थोडक्यात त्यांना कोणतेही आर्थिक कार्य नव्हते. म्हणजेच काहीही उत्पादन न करता ते नुसते बसून खात होते. त्यामुळे बहुतांशी प्रमाणात ते आळशी बनले होते आणि सामाजिक बांडगुळाचे जीवन जगत होते. त्यांच्या इस्टेटीपासून दूर राजदरबारामध्ये ते कालापव्यय करीत. परंतु तरी ते शेतकऱ्यांकडून पैसे आणि सेवा यांची मागणी करीत आणि त्यांची मागणी पुरवलीही जाई. सरंजामदारीचे हे अवशेष शेतकऱ्यांना साहजिकच नकोसे झाले होते. द तॉकव्हिल वरील उताऱ्याच्या शेवटच्या वाक्यात सांगतात त्याप्रमाणे काही रूढीबद्ध सेवा / देणी नष्ट केल्यामुळे जी टिकून होती त्यांचा अधिकच तिरस्कार केला जाई.

शेतकरी स्वतःच्या उत्पन्नापैकी नक्की किती भाग कराच्या रूपाने देई? उत्तर कळल्यावर कोणीही आश्चर्याने थक्कच होईल त्यांच्या उत्पन्नापैकी जवळपास ऐंशी टक्के भाग वेगवेगळ्या करांपोटी काढून घेतला जाई असा अंदाज आहे राहिलेल्या वीस टक्के उत्पन्नात त्याला स्वतःच्या परिवाराच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजा भागवाव्या लागत. मग शेतकरी कुरकुर करी यात नवल नाही. एखाद्या वर्षी पीक वाईट आले तर त्यांची उपासमार होई आणि अशावेळी बरेचसे शेतकरी अन्नान्न दशा होऊन वणवण फिरत राहत याचेही नवल वाटायला नको.

१७८९ साली फ्रेंच क्रांतीचा उद्रेक झाला. परंतु त्यावरून सतराव्या शतकापेक्षा अठराव्या शतकामध्ये शेतकऱ्यांची स्थिती अधिकच खालावली होती असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. खरे तर त्यांची परिस्थिती अधिक खालावली नव्हती, तर उलटपक्षी ती थोडीफार सुधारली होती. अनेक कर भरल्यानंतर राहणाऱ्या थोड्याशा उत्पन्नातून या ना त्या प्रकारे थोडीफार बचत करून शेतकऱ्यांना जमीन विकत घेणे शक्य झाले होते. म्हणूनच १७८९ च्या सुमारास फ्रान्समधील सुमारे एक तृतीयांश जमीन त्यांच्या मालकीची होती. परंतु यामुळे पूर्वीपेक्षा त्यांचा असंतोष अधिकच वाढला होता. कारण?

कारण त्यांची जमिनीची भूक वाढली होती. ती थोडीफार शमविणेच त्यांना शक्य झाले होते. त्यांच्या प्रगतीच्या मार्गात कोण आडवे येत होते? विशेषाधिकारी वर्गांनी आणि शासनसंस्थेने त्यांच्यावर लादलेले कंबरडे मोडून टाकणारे करांचे ओझे! पाठीवरचे हे अवजड ओझे झुगारून दिले तर आपल्याला सरळ उभे राहता येईल, जनावरांच्या अवस्थेतून माणसांच्या अवस्थेला उन्नती करून घेता येईल, हे आता पूर्वीपेक्षाही अधिक स्पष्टपणे त्यांच्या लक्षात आले. त्यांची स्थिती थोडीफार सुधारली

होती म्हणूनच अधिक चांगल्या स्थितीकडे त्यांचे लक्ष वेधले गेले. सरंजामी देणी आणि निर्बंध झुगारून दिले पाहिजेत हे फ्रान्समधील (आणि इतर पश्चिम युरोपियन देशामधील) शेतकऱ्यांच्या यापूर्वी ध्यानात आले नव्हते असे नव्हे. या गोष्टी त्यांना पूर्वीही जाणवल्या होत्या. यापूर्वीही शेतकरी उठाव झाले होते. परंतु त्याद्वारे सरंजामी व्यवस्था संपूर्णपणे उलथवून टाकणे त्यांना शक्य झाले नव्हते. तरीही शेतकऱ्याची स्थिती यामुळे सुधारली होती. आता ही बंधने मुळापासून उखडून टाकण्यासाठी शेतकऱ्यांना मदत आणि नेतृत्व हवे होते.

आणि ते त्यांना उगवत्या मध्यमवर्गाने पुरवले.

या उगवत्या मध्यमवर्गाने—भांडवलदार वर्गाने—फ्रेंच क्रांती घडवून आणली, यशस्वी केली आणि त्यापासून त्यांनाच सर्वाधिक फायदा मिळाला. भांडवलदारवर्गाने क्रांती घडवून आणली कारण तसे करणे त्यांना भाग पडले. त्यांनी आपल्या दमनकर्त्यांना फेकून दिले नसते तर ते स्वतःच चिरडले गेले असते. अंड्यातील कोंबडीचे पिल्लू मोठे होत होत इतके मोठे होते की कवच फोडून बाहेर येणे किंवा आतच मरणे यापेक्षा त्या पिल्लापुढे दुसरा पर्याय नसतो. भांडवलदारवर्गाची स्थिती नेमकी तशीच झाली होती. उद्योगधंदे आणि व्यापार यामधील नियमन, नियंत्रण आणि निर्बंध, छोट्या गटांना सरकारने दिलेल्या विशेष सवलती आणि त्यांचे एकाधिकारी हक्क; प्रगतीच्या मार्गात अडथळे ठरणाऱ्या जुनाट गिल्ड्स्; करांचे सतत वाढणारे विषम ओझे; जुन्या कायद्यांचे अस्तित्व व त्यातच भांडवलदारांचे मत लक्षात न घेता करण्यात येणारे नवीन कायदे; प्रत्येक बाबतीत नाक खुपसणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांची फुगत जाणारी संख्या आणि सतत वाढणारे सरकारी कर्ज—या सगळ्या भ्रष्ट आणि रसातळाला जाणाऱ्या सरंजामी समाजाचे कवच फोडून बाहेर येणे रसरसत्या भांडवलदारवर्गाला भाग पडत होते. स्वतःचा गळा घोटला जाऊ नये, मरण ओढवू नये यासाठी या उद्योन्मुख भांडवलदारवर्गाने हे कवच फोडून टाकण्यासाठी कंबर कसली.

हे भांडवलदार होते तरी कोण ? साहित्यिक, डॉक्टर्स, शिक्षक, वकील, न्यायाधीश, सरकारी नोकर हा सुशिक्षितांचा वर्ग आणि व्यापारी, उद्योजक, सावकार हा पैसेवाल्यांचा वर्ग यांचा त्यामध्ये समावेश होता. त्यांच्याकडे अगोदरच पैसा होता आणि त्यांना त्यापेक्षा अधिक पैसा हवा होता. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आता प्रत्यक्षात सरंजामी न राहिलेल्या समाजातील सरंजामी कायदे त्यांना झुगारून द्यायचे होते, किंबहुना ती त्यांची गरजच बनली होती घट्ट बसणारी सरंजामी बाराबंदी फेकून देऊन त्यांना सैलसर भांडवली कोट चढवायचा होता. आर्थिक क्षेत्रातील त्यांच्या गरजांचे पडसाद त्यांना फिजिओक्रॅट्स आणि ॲडम स्मिथ यांच्या लेखनात उमटलेले दिसले. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या गरजांच्या प्रतिमा त्यांना व्होलटेअर, डिडेरॉट आणि ज्ञानकोषवादी यांच्या लेखनात चितारलेल्या दिसल्या. उद्योगधंदे आणि व्यापार या बाबतीतील खुल्या व्यव-

हाराचा (Laissez faire) धर्म आणि विज्ञान क्षेत्रातील जोडीदार होता बुद्धिप्रामाण्यवाद (रूऊ ऑफ रीझन–रॅशनॅलिझम) !

स्वतःसारखे कठोर परिश्रम करण्याची कुवत किंवा पात्रता नसणाऱ्या माणसाला, केवळ त्याच्याकडे कोणाचा तरी वशिला आहे म्हणून फुकटचा मलिदा खाता यावा यासारखी डोके फिरवणारी दुसरी गोष्ट नसेल. भांडवलदारांची थोड्याफार प्रमाणात अशीच अवस्था होती. त्यांच्याकडे बुद्धिमत्ता होती, संस्कृती होती, पैसा होता. पण या साऱ्यामुळे समाजात जे कायदेशीर स्थान त्यांना मिळायला हवे होते ते मिळत नव्हते. " ग्रेनोबल येथील प्रेक्षागृहात स्वतःच्या जागेवर बसलेल्या बर्नाव्हच्या आईला ज्या क्षणी एका उमरावाने हुसकावले त्या क्षणापासून बर्नाव्हि एक क्रांतिकारक बनला. मादाम रोलन्ड तक्रार करतात की त्यांना आणि त्यांच्या आईला, शातो ऑफ फान्तने येथे मेजानीसाठी थांबवून घेतल्यावर नोकरांच्या निवासस्थानात जेवण वाढण्यात आले. अशा रीतीने स्वाभिमान डिवचला गेल्यामुळे अनेकजण जुन्या राज्यव्यवस्थेचे वैरी झाले ! "

भांडवलदारांकडे जमीन जवळपास नव्हतीच, पण त्यांच्याकडे भांडवल मात्र होते. त्यांनी शासनसंस्थेला कर्ज दिले होते. त्यांना ते परत हवे होते. सरकारी कारभारात मूर्खपणे करण्यात येणाऱ्या सार्वजनिक पैशाच्या उधळपट्टीमुळे सरकारचे दिवाळे वाजेल याची त्यांना कल्पना होती. आपले पैसे आपण वाचवले पाहिजेत हा धोक्याचा इशारा त्यांना मिळाला.

भांडवलदारांना त्यांच्या आर्थिक सत्तेच्या प्रमाणात राजकीय सत्ता हवी होती. त्यांच्यापाशी संपत्ती होती—त्यांना विशेष अधिकार हवे होते. या रसातळाला जाणाऱ्या सरंजामी समाजातील त्रासदायक नियंत्रणातून त्यांना आपली मालमत्ता मुक्त करायची होती. सरकारला दिलेल्या कर्जाची परतफेड होईल याची त्यांना खबरदारी घ्यायची होती. या गोष्टी साध्य होण्यासाठी सरकारमध्ये त्यांचा आवाज ऐकला जाईल एवढेच नव्हे, तर केवळ त्यांचाच आवाज सर्वाधिक महत्त्वाचा होईल यासाठी त्यांना पावले उचलणे भाग होते. त्यांना संधी मिळाली आणि त्यांनी तिचा लाभ उठवला.

त्यांना संधी मिळाली कारण फ्रान्समध्ये एवढा सावळागोंधळ माजला होता की सरकारला जुन्या पद्धतीने कारभार करणे अशक्य झाले होते. कॉम्तं द कलोन या एका उमरावानेच हे मान्य केले होते. तो अर्थमंत्री असल्यामुळे पुढे काय मांडून ठेवले आहे हे त्याला अगदी स्पष्ट दिसत होते. " वेगवेगळी राज्ये आणि देश यांच्या संमिश्र व्यवस्थापनाने फ्रान्सचे राज्य बनले आहे. येथील काही परगण्यांना दुसऱ्याबद्दल काहीही माहिती नाही. येथील काही जिल्हे करांपासून पूर्णपणे मुक्त असून इतर जिल्ह्यांना तो भार वाहावा लागतो. येथील सर्वात श्रीमंत वर्गावर कराचे ओझे सगळ्यात कमी आहे. विविध विशेष सवलतींमुळे येथील समतोल बिघडला आहे. येथे चिरकालीन कायदा किंवा सर्वसंमत विचार या गोष्टी अशक्य झाल्या आहेत. अशा असंख्य दोषांनी हे राज्य ग्रासलेले असून सद्यस्थितीत येथे राज्य करणे अशक्य झाले आहे.

या शेवटच्या पाच शब्दांकडे विशेष लक्ष द्या. राज्यकर्त्यावर्गाचा एक माणूस मान्य करतो की आता **राज्य करणे अशक्य झाले आहे** यात असंतुष्ट जनतेची भर घाला; सत्ता काबीज करण्यासाठी धडपडणाऱ्या एखाद्या हुषार वर्गाला त्या असंतोषाचे समुद्रमंथन करू द्या आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या अमृताचे नाव असेल – क्रांती! ती १७८९ साली घडली. तिला फ्रेंच राज्यक्रांती असे म्हणतात.

थर्ड इस्टेट म्हणजे काय? या सुबोध पुस्तिकेमध्ये क्रांतिकारकांच्या ॲबी सिएझ या एका नेत्याने त्यांच्या उद्दिष्टांचे स्वरूप थोडक्यात समजावून सांगितले आहे. "आपण स्वतःला तीन प्रश्न विचारले पाहिजेत :

"पहिला : थर्ड इस्टेट म्हणजे काय? सर्व काही.

"दुसरा : आपल्या राजकीय व्यवस्थेमध्ये आजवर तिचे काय स्थान राहिले आहे? नगण्य.

"तिसरा : तिला काय पाहिजे आहे? तिला स्वतःचे स्थान प्राप्त करून घ्यायचे आहे."

थर्ड इस्टेटीच्या घटकांना म्हणजे, कारागीर, शेतकरी आणि भांडवलदार या सर्वांनाच काही तरी स्थान मिळवायचे होते हे खरे असले तरीही यापैकी मुख्यत्वे फक्त शेवटच्याच गटाला स्वतःला हवे होते ते साध्य करणे शक्य झाले. भांडवलदारवर्गाने नेतृत्व केले तर इतरांनी प्रत्यक्ष लढा दिला आणि यातूनच सर्वाधिक फायदा भांडवलदारवर्गाचाच झाला. क्रांतीच्या काळात स्वतःला अधिकाधिक श्रीमंत आणि बलवान करण्याच्या एकामागून एक संधी भांडवलदार वर्गाला मिळाल्या. त्यांनी धर्मोपदेशक आणि उमराव यांच्याकडून छिनावून घेतलेल्या जमिनींबाबत सट्टेबाजी केली आणि सैन्याशी लबाडीचे व्यवहार करून प्रचंड पैसा जमा केला.

क्रांतीच्या प्रक्रियेत काय घडत होते याचे गरीब कष्टकरी वर्गाचा प्रवक्ता मराट याने त्याच्याच शब्दात केलेले वर्णन पहा : "उठावाच्या क्षणी आडव्या येणाऱ्या प्रत्येक अडथळ्याला लोकांनी संख्येच्या जोरावर लीलया पार केले. पण त्यांना सुरुवातीला कितीही सत्ता मिळाली, तरी अखेर कुशल, निष्णात आणि कावेबाज अशा उच्च वर्गाच्या कारस्थानांना ते बळी पडत. उच्च वर्गातील सुशिक्षित आणि कावेबाज कारस्थान्यांनी प्रथम जुलमी राज्यकर्त्यांना विरोध केला, परंतु लोकांचा विश्वास संपादन केल्यावर आणि त्यांच्या शक्तीचा वापर केल्यावर ते लोकांच्या विरुद्धच उठले. ज्या विशेष सामाजिक स्थानांवरून जुलमी राज्यकर्त्यांना हाकलून देण्यात आले होते, त्या जागी ते स्वतःच जाऊन बसले. समाजातील अत्यंत तळच्या वर्गांनी —कामगार, कारागीर, छोटे दुकानदार, शेतकरी यांनी–थोडक्यात म्हणजे सामान्य आणि दुर्दैवी लोकांनी क्रांती सुरू केली आणि पुढे नेली. पण याच लोकांना बेशरम श्रीमंत लोक मवाली म्हणतात. रोमन लोक अशा सामान्य लोकांना तितक्याच बेशरमपणे भणंग सर्वहारा म्हणत. या क्रांतीचा उपयोग फक्त जमीनमालक, वकील आणि बदमाशांच्या फायद्यासाठी करण्यात आला होता. ही सत्यस्थिती वरच्या वर्गांनी सतत छपवून ठेवली आहे."

जे घडले त्याचे हे प्रामाणिक वर्णन आहे. क्रांतीनंतर फ्रान्समध्ये भांडवलदारवर्गाने राजकीय सत्ता हाती घेतली. जन्माधिष्ठित सत्ता उलथवून टाकण्यात आली, परंतु त्याची जागा उद्योगधंद्यांवर आधारित सत्तेने घेतली. "स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व" ही सर्व क्रांतिकारकांची लोकप्रिय घोषणा होती, पण प्रत्यक्षात या गोष्टी फक्त भांडवलदारवर्गालाच मिळाल्या.

नेपोलियनकालीन कायद्यांच्या अभ्यासावरून ही गोष्ट स्पष्ट होते. सरंजामी मालमत्तेचे नव्हे तर भांडवली मालमत्तेचे रक्षण करण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून कायदे करण्यात आले होते. या कायदेसंहितेमध्ये सुमारे २,००० कलमे आहेत, परंतु त्यापैकी फक्त ७ कलमे कामगारविषयक असून जवळपास ८०० मालमत्ताविषयक आहेत. ट्रेड युनियन्स आणि संप यावर कायद्याने बंदी घालण्यात आली, पण मालकांच्या संघटनांना मात्र पूर्ण मुभा देण्यात आली होती. कोणत्याही खटल्यामध्ये कामगारांवर नव्हे तर मालकावर विश्वास ठेवला पाहिजे असे ही कायदेसंहिता म्हणते. भांडवलदारवर्गाने त्यांच्या रक्षणासाठी ही संहिता घडवली होती; मालमत्ताधाऱ्यांनी मालमत्तेच्या रक्षणासाठी तिची योजना केली होती.

लढ्याचे धुके विरल्यानंतर स्वतःला हवे ते हवे तसे, हवे तेव्हा आणि हवे तेथे विकण्याचा आणि विकत घेण्याचा हक्क भांडवलदारांनी मिळवला होता. सरंजामशाहीचे थडगे उभारण्यात आले होते.

केवळ फ्रान्समध्येच नव्हे तर ज्या ज्या देशांवर नेपोलियनच्या सैन्याने निशाण रोवले त्या सर्व ठिकाणी सरंजामशाहीचा विनाश झाला. विजयी आगेकूच करणाऱ्या नेपोलियनने बाजारपेठ मुक्त केली आणि आपली कायदेसंहिता अंमलात आणली. पराजित राष्ट्रांमधील भांडवलदारवर्गाने त्याचे स्वागत केले यात नवल ते काय? अशा सर्व देशांमध्ये 'भूदास' पद्धती समूळ नष्ट करण्यात आली, सरंजामी सेवा आणि खंड संपुष्टात आणण्यात आले; तसेच कोणतेही नियम आणि निर्बंध विरहित खरेदी-विक्री करण्याचा मालक-शेतकरी, व्यापारी आणि उद्योजक यांचा अधिकार ठामपणे प्रस्थापित करण्यात आला.

फ्रेंच क्रांतीच्या या कालखंडाचा उद्बोधक सारांश कार्ल मार्क्स यांच्या १८५२ साली लिहिलेल्या 'द एटीन्थ ब्रुमिएर ऑफ लुई बोनापार्ट' या पुस्तिकेत दिला आहे. 'महान फ्रेंच क्रांतीच्या देस्मुलीन, डॅन्टन, रोबेस्पियर, सॉ झुस्त, नेपोलियन या नेत्यांनी तसेच संघटना आणि जनता यांनी त्यांचे ऐतिहासिक कार्य पूर्ण केले—भांडवलदारवर्गाची मुक्ती करून आधुनिक भांडवली समाजाची प्रस्थापना केली. ज्या भूमीमध्ये सरंजामशाहीची पाळेमुळे घट्ट रुतली होती ती जमीन उकरून तेथे फोफावलेल्या सरंजामी सत्ताधाऱ्यांची पाळेमुळे जॅकोबिन्सनी खणून काढली. संपूर्ण फ्रान्समध्ये खुल्या स्पर्धेचा विकास होऊ शकेल, मोठ्या इस्टेटींचे तुकडे करून भू-संपदेचा पुरेपूर उपयोग करता येईल आणि राष्ट्राच्या औद्योगिक उत्पादनक्षमतेचा पूर्ण वापर होऊ शकेल यासाठी आवश्यक असलेली

परिस्थिती नेपोलियनने निर्माण केली. फ्रान्सच्या सरहद्दीबाहेरील सरंजामी संस्थाही त्यांनी निकालात काढल्या ... ”

क्रांती हा रक्तपाताचा मामला असतो. या फ्रेंच नमुन्यामध्ये घडलेली हिंसा आणि दहशत यामुळे अनेक लोक हादरून गेले. इंग्रज राज्यकर्ते फ्रेंच क्रांतीचे सर्वात कट्टर विरोधक होते ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. कारण फ्रेंच क्रांतीच्या आधी १०० वर्षांपूर्वी स्वतःच्या आर्थिक सत्तेच्या जोडीने राजकीय सत्ता मिळवण्यासाठी इंग्लिश भांडवलदारवर्गाने लढा दिला होता आणि त्यावेळी घडलेल्या हिंसेचा त्यांना आता सोईस्करपणे विसर पडला होता.

परंतु त्यात एक फरक होता. फ्रान्समध्ये उद्योगधंद्यांवर आधारित सत्तेने, जन्मावर आधारित सत्तेला पुन्हा कधीही डोके वर काढता येणार नाही असा दणका दिला. तर इंग्लंडमध्ये दणक्याने नव्हे, तर निर्णयाच्या स्वरूपात उद्योगधंद्यांना विजय मिळाला होता. इंग्लंडमध्ये उद्योगधंद्यांवर आधारित सत्ता आणि जन्माधिष्ठित सत्ता एकमेकांना चांगल्या ओळखत होत्या. आणि म्हणूनच इतर देशांपेक्षा त्यांचे तेथे एकमेकांशी चांगलेच जमले असे दिसते. इंग्लिश भांडवलदारांना जमिनदारी मिळवणे शक्य झाले होते. आणि जमीनदारांनी “ आपण या सगळ्यांपेक्षा वरचे आहोत ” हे खूळ डोक्यातून काढून टाकून उद्योगधंद्यांमध्ये लक्ष घातले होते. परंतु तरीही इंग्लिश इतिहासातील १६४० ते १६८८ या काळात खरोखर झगडा सुरू झाला आणि सरकारमध्ये भांडवलदारांच्याच शब्दाला किंमत असेल हे मान्य केल्यावरच हा झगडा संपुष्टात आला होता.

“ प्रतिनिधित्वाशिवाय कर-आकारणी ” या प्रश्नावर अमेरिकन वसाहतवाद्यांची बाजू हिरिरीने मांडणाऱ्या त्या महान ब्रिटिश राजकीय मुत्सद्दी व्यक्तीचे, एडमंड बर्क यांचे नाव सर्वांनाच परिचित आहे. जेव्हा फ्रेंच क्रांतीवर जहाल टीका करणारे अनेक लेख त्यांनी लिहिले तेव्हा दुसऱ्या एका इंग्लिश लेखकाने शंभर वर्षांपूर्वीच्या इंग्लंडच्याच “ दैदीप्यमान क्रांती ”बद्दल त्यांना आठवण करून दिली : “ मानवजातीच्या दृष्टीने मानवतेच्या दृष्टिकोनातून व्यावहारिकपणे विचार करता ...., फ्रान्सच्या लोकांनी या देशाचा असा कोणता अक्षम्य गुन्हा केला आहे ? १७८९ च्या क्रांतीद्वारे त्यांनी त्यांच्या सरकारमध्ये बदल घडवून आणला हा त्यांचा गुन्हा आहे का ? याबाबतीत ते आपल्या-पेक्षा एक शतक मागे आहेत एवढाच त्यांच्यात आणि आपल्यात फरक आहे. मग त्यांच्या राजाला त्यांनी वठणीवर आणले याला गुन्हा म्हणायचे काय ? खरे पाहाता ब्रिटिशांनीच हा पायंडा पाडला होता. ”

इंग्लंडमध्ये १६८९ च्या आसपास आणि फ्रान्समध्ये १७८९ च्या नंतर, खुल्या बाजारपेठेसाठी चाललेल्या लढ्यामध्ये मध्यमवर्गाचा विजय झाला. फ्रेंच राज्यक्रांतीने ज्या प्रमाणात सरंजामशाहीला अखेरचा भीमटोला दिला, त्यावरून १७८९ साली मध्य-युगाचा अंत झाला असे म्हणता येईल. धर्मगुरू, योद्धे आणि कष्टकरी यांनी बनलेल्या सरंजामी समाजाच्या घडणीमध्ये एका मध्यमवर्गीय गटाचा उदय झाला होता. त्याची

सत्ता अनेक वर्षे हळूहळू वाढत होती. सरंजामशाहीविरुद्ध त्यांनी दिलेल्या प्रदीर्घ आणि कष्टमय लढ्यामध्ये तीन लढे अत्यंत महत्त्वाचे आहेत. पहिला म्हणजे 'प्रॉटेस्टंट रिफॉर्मेशन' [धार्मिक सुधारणा], दुसरा म्हणजे इंग्लंडमधील 'दैदीप्यमान क्रांती' आणि तिसरा म्हणजे 'फ्रेंच क्रांती'. अखेर अठराव्या शतकाच्या शेवटी जुनी सरंजामी व्यवस्था धुळीस मिळवण्याची शक्ती त्या मध्यमवर्गामध्ये आली होती. सरंजामशाहीच्या जागी, नफा मिळवण्याचे मुख्य उद्दिष्ट असलेली, वस्तूंच्या खुल्या विनिमयावर आधारित अशी वेगळी समाजव्यवस्था भांडवलदारवर्गाने आणली.

त्या व्यवस्थेचे नाव आहे--- भांडवलशाही.

भाग २

भांडवलशाहीकडून पुढे ?

१४

पण हा पैसा आला कोठून ?

सिनेमाच्या तिकिटांसाठी रांगेमध्ये दोन माणसे उभी आहेत नंबर येताच स्टॉलच्या ३ तिकिटांकरता प्रत्येक जण तिकिटामागे ५ रुपयें प्रमाणे १५ रुपये मोजतो. एक जण तिकिटाची खिडकी सोडून बाजूला झाल्यावर त्याला त्याचे दोन मित्र भेटतात; आणि ते तिथे सिनेमागृहात जाऊन सिनेमा सुरू होण्याची वाट पाहात बसतात. दुसरा मात्र तिकिटाची खिडकी सोडून सिनेमागृहासमोरील फूटपाथवर येऊन "आज रातका शो, पाच का दस, पाच का दस" असे ओरडू लागतो. कदाचित प्रत्येकी आठ रुपयांना ती तिकिटे विकण्यात तो यशस्वी होईल; किंवा कदाचित होणारही नाही.

या माणसाचे १५ रुपये आणि पहिल्याचे १५ रुपये यात काही फरक आहे का ? आहे. हे दुसरे श्रीयुत सट्टेबाज यांचे पैसे म्हणजे भांडवल आहे; तर पहिले श्रीयुत सिनेप्रेक्षक यांचे पैसे तसे नाहीत. दोहोंत फरक काय ?

वस्तू किंवा श्रम प्रथम खरेदी करून नंतर नफा घेऊन विकले तर पैशाचे भांडवलात रूपांतर होते. श्री. सट्टेबाज यांना सिनेमा पाहायचा नव्हता. त्यांनी १५ रुपये मोजले ते या व्यवहारातून थोडेसे अधिक पैसे मिळवण्यासाठी. म्हणजेच त्यांचे पैसे भांडवल म्हणून काम करत होते. याउलट श्री. सिनेप्रेक्षक यांनी नफ्यासाठी नव्हे, तर सिनेमा बघण्यासाठी १५ रुपये मोजले होते. म्हणजेच त्यांचा पैसा हा भांडवल म्हणून काम करत नव्हता.

याच पद्धतीने, पाव विकत घेण्यासाठी पैसा हवा म्हणून जेव्हा मेंढपाळ लोकर विकतो, तेव्हा तो पैशाचा उपयोग भांडवल म्हणून करत नाही. परंतु तीच लोकर नंतर अधिक चांगल्या किंमतीला विकता यावी म्हणून एखादा व्यापारी जेव्हा त्या लोकरीसाठी पैसे मोजतो, तेव्हा तो त्याच्या पैशाचा उपयोग भांडवल म्हणून करत असतो. ज्या उद्योगातून नफा होतो (किंवा नफा होण्याची शक्यता असते), अशा उद्योगासाठी किंवा विनिमयासाठी जेव्हा पैसा उपयोगात आणला जातो तेव्हा तो पैसा भांडवल बनतो. उपभोगासाठी खरेदी करता यावी म्हणून विक्री करणे ही भांडवल-पूर्व पद्धत, आणि नफा व्हावा या दृष्टीने विक्री करता यावी म्हणून खरेदी करणे ही भांडवली पद्धत असा या दोन पद्धतींमधील फरक आहे.

परंतु नफा व्हावा या दृष्टीने विक्री करण्यासाठी अशी कोणती गोष्ट भांडवलदार विकत घेतो ? सिनेमाची तिकिटे ? लोकर की मोटारी ? टोप्या की घरे ? नाही. यापैकी कोणतीही नाही; पण या सर्वांचाच ती भाग आहे. एखाद्या औद्योगिक कामगाराला विचारल्यास तो सांगेल की त्याच्या काम करण्याच्या क्षमतेबद्दल त्याचा धनी त्याला पैसे देतो. विक्री करून नफा मिळवण्यासाठी भांडवलदार कामगाराची श्रमशक्ती विकत घेतो. परंतु तो कामगाराची श्रमशक्ती विकू शकत नाही, हे तर उघडच आहे. कच्च्या मालापासून कामगारांच्या श्रमाने उत्पादित केलेल्या वस्तू विकून भांडवलदार नफा मिळवतो. कामगारांनी निर्माण केलेल्या मूल्यापेक्षा त्यांना वेतन म्हणून मिळणारी रक्कम कमी असते; आणि त्यामुळेच नफा निर्माण होतो.

भांडवलदाराकडे इमारती, यंत्रे, कच्चा माल वगैरे उत्पादनसाधनांची मालकी असते. तो श्रमशक्ती विकत घेतो. या दोन गोष्टींच्या एकत्र येण्यानेच भांडवली उत्पादन शक्य होते.

पैसा हेच भांडवलाचे एकमेव रूप नव्हे. आजच्या उद्योगपतीकडे फारसा पैसा नसल तरीही त्याच्याकडे बरेच भांडवल असू शकते. त्याच्याकडे उत्पादनसाधनांची मालकी असते आणि श्रमशक्ती विकत घेऊन तो स्वतःचे भांडवल वाढवतो.

एकदा आधुनिक उद्योगधंदे सुरू झाले की ते नफा मिळवतात व त्यांना लागणाऱ्या भांडवलाचा अतिशय वेगाने संचय करतात. परंतु आधुनिक उद्योगधंद्यांची सुरुवात होण्यापूर्वी, सर्वप्रथम भांडवल आले कोठून ? हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण संचयित भांडवलाशिवाय आज आपल्याला ठाऊक असलेली औद्योगिक भांडवली उत्पादनपद्धती अस्तित्वातच येऊ शकली नसती. त्याप्रमाणे जगण्यासाठी दुसऱ्यांकडे काम करणाऱ्या, मालमत्ताविहीन, बंधमुक्त कष्टकरी वर्गाशिवाय औद्योगिक भांडवलशाही शक्य नव्हती. या दोन्ही गोष्टी कशा निर्माण झाल्या ?

कष्टाळूपणे राबून, काटकसरीने राहून, हळूहळू पैसे साठवणाऱ्या लोकांच्या अल्पबचतीमधून, भांडवली उत्पादन सुरू करण्यासाठी लागणारे भांडवल निर्माण झाले असे काही जणांना वाटण्याची शक्यता आहे. अर्थात लोकांनी बचत केली; परंतु या बचतीमधून काही भांडवलाचा प्रचंड संचय झाला नाही. अशा बचतीमधून भांडवलसंचय होतो ही एक गोड गुलाबी कथा झाली. कदाचित कोणाला वाईट वाटेल, पण ती गुलाबी कथा काही पूर्णपणे खरी नाही; आणि खरी कथा तेवढीशी गुलाबी नाही.

भांडवलपूर्व काळात मुख्यत्वे व्यापाराच्या माध्यमातून—येथे व्यापार म्हणजे केवळ वस्तूंचा विनिमय नव्हे तर स्वाऱ्यांमधील विजय, चाचेगिरी, लुटालूट आणि शोषण यांचाही त्यात समावेश होतो—भांडवलसंचय करण्यात आला.

इटालियन शहरांनी धर्मयुद्धांसाठी पश्चिम युरोपातील लोकांना सैन्यात दाखल करून घेतले होते, ते काही उगाच नव्हे. अशा धार्मिक युद्धांच्या शेवटी व्हेनिस, जीनीव्हा आणि पिसा ह्यांच्या अधिपत्याखाली एक मोठे साम्राज्य निर्माण झाले आणि इटालियन जेत्यांनी मिळालेल्या संधीचा चांगलाच फायदा उठवला. मग इटालीचे आसुसलेले व्यापारी आणि सावकार यांच्याकडे पूर्वेकडील संपत्तीचा ओघ सुरू झाला. या विषयातील

एक जाणकार जॉन ए. हॉब्सन यांनी इटालीच्या पूर्वेकडील व्यापारासंबंधी असे म्हटले आहे : “स्वतःच्या देशांमध्ये पुढील काळात भांडवली उत्पादनपद्धतीचा विकास करण्यासाठी आवश्यक असलेला संपत्तीसंचय पश्चिम युरोपला उपलब्ध करून देणाऱ्या लाभदायक व्यापाराचा पाया फार पूर्वीच घातला गेला होता.”

हॉब्सन यांचे म्हणणे खरे असेल तर भांडवली उत्पादनव्यवस्थेच्या सुरुवातीच्या घडामोडींचा शोध आपण इटालियन द्वीपकल्पात घेतला पाहिजे. तेराव्या आणि चौदाव्या शतकात आणि त्याच्याही थोड्याफार आधी आपल्याला अगदी तेथेच या प्रारंभीच्या घडामोडी दिसून येतात.

परंतु पूर्वेकडील ही संपत्ती प्रचंड असली तरी पुरेशी नव्हती. भांडवली उत्पादनाची खरीखुरी सुरुवात होण्यापूर्वी भांडवलाच्या नव्या आणि मोठ्या प्रवाहाची जरुरी होती. ही गरज भागवण्यासाठी, सोळाव्या शतकापासून आवश्यक तेवढ्या मोठ्या प्रमाणावर भांडवलसंचय होऊ लागला. आधुनिक भांडवलशाहीच्या इतिहासाचे आणखी एक नामवंत जाणकार कार्ल मार्क्स या संदर्भात सारांशाने असे मांडतात : “अमेरिकेमधील सोने आणि चांदी यांचा शोध, तेथील खाणींमधून मूळ रहिवाश्यांचे समूळ उच्चाटन, ईस्ट इंडियावरील विजयाची आणि लुटालुटीची सुरुवात; काळ्या लोकांना पकडून, गुलाम बनवून, विकण्यासाठी आफ्रिकेचे शिकारीच्या मैदानात रूपांतर, या सर्व घटनांनी भांडवलशाहीच्या गुलाबी पहाटेची सूचना दिली. हे सर्व ग्राम्य प्रकार म्हणजे प्राथमिक भांडवलसंचयाचे महत्त्वपूर्ण पैलू आहेत.”

ज्याच्या तुलनेमध्ये विसाव्या शतकातील गुंडांच्या आणि दंगलखोरांच्या कारवाया म्हणजे शाळकरी मुलांची रविवारची सहल वाटेल असे क्रौर्य, खून आणि यातना यांनी रंगलेली कथा ऐकण्याची तयारी आहे तुमची ? अशी तयारी असेल तर मेक्सिको किंवा पेरू देशातील मूळ रहिवाशांना, सोळाव्या शतकांमध्ये त्यांचे पूर्वज पहिल्यांदा गोऱ्या माणसांच्या सहवासात आले त्या भेटीची कथा तुम्हांला ऐकवण्यास सांगा. त्या मूळ रहिवाशांना बाटवून ख्रिश्चन करण्यात आले; त्याचबरोबर त्यांच्यावर खाणीमध्ये काम करण्यासाठी सक्ती करण्यात आली. त्यासाठी त्यांना टोकून काढण्यात आले आणि वेळप्रसंगी त्यांचे खूनही पाडण्यात आले. मूळ रहिवाशांनी भूगर्भातून काढलेले सोन्याचांदीचे प्रचंड साठे जुन्या जगाकडे (युरोपमध्ये) पाठवण्यात आले आणि अखेर तेथील व्यापारी आणि सावकार यांच्या हाती पडले! (या यापाऱ्यांकडील वा सावकारांकडील सोने किंवा चांदी डबक्यातील पाण्यासारखी नव्हती, तर ती प्रवाही होती. उद्योजकांना किंवा व्यापाऱ्यांना अधिक पैसा मिळवण्यासाठी कर्ज म्हणून त्याचा वापर होई. थोडक्यात, तो पैसा म्हणजे भांडवल होते.)

मेक्सिको आणि पेरू या देशांचे जेते कोर्टेझ आणि पिझारो हे स्पॅनिश होते, हे खरे आहे. वसाहतींशी अत्यंत क्रूरपणे वागण्याबद्दल स्पॅनिश लोक फार पूर्वीपासून कुप्रसिद्ध आहेत. पण डचांचे काय ? त्यांच्या पद्धती वेगळ्या होत्या असे खात्रीलायकपणे सांगता येईल काय ?

" नाही ", जावा या बेटाचे एके काळचे लेफ्टनंट गव्हर्नर सर टी. एस. रॅफल्स म्हणतात. त्यांनी हॉलंडच्या वासाहतिक शासनांच्या इतिहासाचे वर्णन " विश्वासघात, लाचलुचपत, सर्रास कत्तल आणि क्षुद्रपणा या सर्वांची परिसीमा " असे केले आहे. त्यांच्या अंदाजाप्रमाणे डच ईस्ट इंडिया कंपनीचा १६१३ ते १६५३ या काळातील नफा प्रतिवर्षी ६,४०,००० गिल्डर्स एवढा होता. भांडवलसंचय करण्याच्या डचांच्या पद्धतीचा हा एक नमुना पाहा : " मलाक्कावर कबजा करण्यासाठी १६४१ मध्ये पोर्तुगीज गव्हर्नरला लाच दिल्यावर त्याने डचांना शहरात येऊ दिले. त्याच्या या राजद्रोहाची किंमत म्हणून २१,८७५ पौंड द्यावे लागू नयेत, यासाठी तात्काळ त्याच्या घरात शिरून डचांनी त्याचा खून पाडला. डचांनी जेथे पाऊल टाकले तेथे विध्वंस आणि विजनावस्था निर्माण झाली. जावामधील बांजुवांगी या परगण्यामध्ये १७५० साली ८०,००० पेक्षा जास्त लोक राहात तर १८११ साली तेथे १८,००० लोक शिल्लक होते. केवढा कौतुकास्पद व्यापार ! "

अशा रीतीने सतराव्या शतकामध्ये स्वतःला प्रमुख भांडवली राष्ट्र बनवण्यासाठी आवश्यक असलेला पैसा हॉलंडने जमा केला.

त्यानंतर सर्वात महत्त्वाचा भांडवली देश बनण्याचा मान इंग्लंडने मिळवला. इंग्रजांना आवश्यक असणारे भांडवल त्यांनी कोठून आणि कसे जमा केले ? खूप काबाडकष्ट करून, काटकसरीने राहून आणि अल्पबचत करून ? नाही विश्वास बसत तुमचा ?

१८३८ साली लंडनमध्ये प्रसिद्ध झालेल्या '**कॉलोनायझेशन अँड ख्रिश्चॅनिटी**' [वसाहतीकरण आणि ख्रिस्ती धर्म] या पुस्तकात होविट यांनी '**ओरिएंटल हेराल्ड**' या वृत्तपत्रातील एका लेखकाचा उतारा दिला आहे. त्यामध्ये भारतातील ब्रिटिशांबद्दल केलेले भाष्य पाहा : " आमचे साम्राज्य जनमतावर आधारित नाही, एवढेच काय पण ते कायदेशीरही नाही. प्रत्यक्षात ते बळाचा वापर करून मिळवलेले आणि टिकवलेले साम्राज्य आहे. देशाचा कोणताही भाग स्वेच्छेने देण्यात आलेला नाही. प्रथम आम्हाला सागराच्या किनारपट्टीवर आमच्या वस्तू विकण्यासाठी परवानगी देण्यात आली. पण नंतर काही वेळा बळाचा वापर करून तर काही वेळा कपटाने आम्ही या देशातील पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांना नेस्तनाबूत केले, सरदारांकडून त्यांची सर्व सत्ता हिसकावून घेतली आणि लोकांचे उद्योगधंदे व चीजवस्तू यांची लूटमार करून आम्ही त्यांची बरकड आणि उपभोग्य संपत्ती काढून घेतली. "

हा माणूस संतापलेला दिसतो, नाही का ? १७६९-७० या काळात तुम्ही जर भारतामध्ये राहात असता, तर कदाचित तुम्हीही संतापला असता. त्या वेळी हजारो भारतीय लोकांचे भूकबळी तुम्हांला दिसले असते. याचे कारण देशात पुरेसे भात पिकले नव्हते का ? मुळीच नाही. तांदूळ अगदी मुबलक होता. मग अशा दुष्काळी स्थितीचे कारण काय ? याचे साधे आणि सोपे कारण असे—पिकलेले सगळे भात इंग्रजांनी विकत घेतले होते आणि केवळ प्रचंड किंमतीलाच लोकांना ते विकण्याची त्यांची तयारी होती. ती किंमत मोजणे दैन्यावस्थेतील एतद्देशीय लोकांना परवडत नव्हते.

वसाहतींबरोबर सुरू असणाऱ्या अशा व्यापारामधून मातृभूमीकडे संपत्ती जमा होत होती. युरोपियन व्यापाऱ्यांनी त्या द्वारे प्रचंड पैसा जमा केला. आफ्रिकेतील काळ्या लोकांची विक्री म्हणजे भांडवलसंचयाचा एक विशेष महत्त्वाचा मार्ग होता. १८४० साली प्राध्यापक एच. मेरिव्हेल यांनी ऑक्सफर्डमध्ये " वसाहतीकरण आणि वसाहती " या विषयावर अनेक भाषणे दिली. या भाषणांच्या ओघात त्यांनी दोन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आणि त्यांची उत्तरेही देऊन टाकली. " लिव्हरपूल आणि मँचेस्टर या दोन नगरांचे महानगरांमध्ये रूपांतर करण्याची किमया कोणी केली ? आज तेथे जोमाने चालणारे उद्योगधंदे आणि प्रचंड वेगाने होणारा संपत्तीचा संचय कोणाच्या जीवावर चालू आहे ? ... इंग्रजांची आजची समृद्धी नीग्रोंचे श्रम आणि दुःखे यांवर आधारलेली आहे ... त्यांच्या गोद्या बांधण्याचे आणि वाफेची इंजिने तयार करण्याचे काम नीग्रोंनीच केल्यासारखा हा प्रकार आहे. "

प्राध्यापकांच्या विधानांची खिल्ली उडवण्याची अलीकडे फॅशन आहे. पण प्रा. मेरिव्हेल मनाला येईल ते भकत होते का ? मुळीच नाही. लिव्हरपूलच्या व्यापाऱ्यांनी १७८८ साली हाऊस ऑफ कॉमन्सपुढे केलेला अर्ज बहुधा त्यांनी वाचला असावा. माणसांचा व्यापार ही गोष्ट एका सुसंस्कृत देशाला अशोभनीय आहे, हे सांगण्याचा गाढवपणा करणाऱ्या त्या मूर्ख लोकप्रतिनिधींना उत्तर म्हणून तो अर्ज होता : " गेली अनेक वर्षे लिव्हरपूलच्या व्यापाराचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या आफ्रिकन गुलामांच्या व्यापारावर संपूर्ण बंदी घालण्याचा जो प्रयत्न काही लोक करत आहेत त्याबद्दल या अर्जदारांना फार चिंता वाटते. संपत्तीच्या या उगमस्थानावर बंदी घालण्यात येऊ नये अशी अर्जदारांची आपल्याला नम्र विनंती आहे. "

सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगीजांनी नीग्रो गुलामांचा व्यापार सुरू केला आणि लगेच युरोपच्या सुसंस्कृत ख्रिश्चन राष्ट्रांनी त्यांची री ओढली. (अमेरिकेमध्ये पहिला नीग्रो गुलाम १६१९ साली एका डच जहाजामधून आणला गेला.) आफ्रिकेमधील अजाण नीग्रोंवर कबजा करून 'नव्या जगा'तील (म्हणजे अमेरिकेतील) मळ्यांमध्ये मरेपर्यंत राबवण्यासाठी त्यांचा कच्चा माल म्हणून उपयोग केल्यास बराच पैसा मिळवता येईल ही कल्पना ज्याच्या सुपीक डोक्यातून प्रथम निघाली त्या इंग्रजाचे नाव होते जॉन हॉकिन्स. इंग्लंडच्या महान राणीला या खून आणि चाचेगिरी करणाऱ्या माणसाच्या महान कार्याचे एवढे कौतुक वाटले की त्याने गुलामांच्या व्यापारासाठी केलेल्या दुसऱ्या सफरीनंतर तिने त्याला 'नाइट'चा हुद्दा बहाल केला. साखळदंडांनी जखडलेला नीग्रो म्हणजे या सर जॉन हॉकिन्सच्या मुकुटातील तुरा होता. त्याने स्वतःच्या या अमानुष व्यापाराचे मोठे अभिमानास्पद वर्णन रिचर्ड हॅक्ल्युट यांच्याकडे केले. १५६२-६३ मधील हॉकिन्सच्या पहिल्या सफरीचे हॅक्ल्युट यांनी केलेले वर्णन मोठे गंमतीदार आहे : " हिस्पियानोला येथील नीग्रो ही एक चांगली व्यापारी वस्तू आहे आणि गिनीच्या किनाऱ्यावर अनेक नीग्रो सहज पकडता येतील याची खातरजमा करून घेतल्यानंतर असा प्रयत्न एकदा करायचाच असे हॉकिन्सने ठरवले. त्यानंतर त्याने

त्याच्या लंडनमधील मित्रांना ही योजना सांगितली. त्याच्या मित्रांना ही कल्पना एवढी आवडली की त्यांनी त्याला उदारहस्ते आर्थिक मदत करून अशा साहसी सफरीत सहभागी होण्याची तयारी दर्शवली. अशा कामासाठी तीन चांगली गलबते लगेच पुरवण्यात आली. मग हॉकिन्स गिनीच्या किनाऱ्यावरील सेअरा लिऑना येथे पोहोचला. काही काळ तेथे राहिल्यानंतर, थोड्याफार प्रमाणात तलवारीच्या बळावर तर काही अंशी इतर मार्गांनी त्याने जवळपास ३०० निग्रोंवर कबजा केला याशिवाय त्या देशातील इतर चीजवस्तूही त्याने व्यापारासाठी घेतल्याच. हे भक्ष्य बरोबर घेऊन त्याने समुद्र पार केला आणि सर्व नीग्रो विकून टाकले. त्याच्या बदल्यात मिळालेली कातडी, आले, साखर, वेगवेगळे मोती वगैरे वस्तूंनी त्याची तीनही गलबते भरून गेली. एवढेच नव्हे, तर आणखी दोन गलबते भाड्याने घ्यावी लागली. अशा तऱ्हेने स्वतःला आणि इतर साहसी लोकांना प्रचंड सिद्धी आणि संपत्ती मिळवून देऊन तो मायदेशी परतला."

त्याची "प्रचंड सिद्धी आणि संपत्ती" पाहून राणी एलिझाबेथ भलतीच खूष झाली. पुढच्या सफरींमधील नफ्यामध्ये तिलाही सहभागी व्हायचे होते. म्हणूनच त्याच्या दुसऱ्या सफरीकरता गुलामांचे व्यापारी हॉकिन्स याला राणीने एक गलबत कर्जाऊ दिले. त्या गलबताचे नाव होते 'येशू'.

व्यापार—म्हणजेच स्वाऱ्यांतील जय, चांचेगिरी, लुटालूट आणि शोषण या सर्व मार्गांचा वापर-करून भांडवली उत्पादन सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल जमा करण्यात आले. मार्क्स या सगळ्याचे यथार्थ वर्णन करतात : "उपजतच गालावर जखमेचा व्रण घेऊन या जगामध्ये पैसा येतो, तर पावलापासून डोक्यांपर्यंत प्रत्येक रंध्रातून रक्त आणि घाणीचा वर्षाव करत भांडवल येते." स्वाऱ्यांमधील जय, चांचेगिरी, लुटालूट आणि शोषण हे व्यापाराचे प्रभावी मार्ग होते. या मार्गांनी प्रचंड नफा मिळवून दिला आणि भांडवलाचा वाढता पुरवठा निर्माण केला.

परंतु महाकाय भांडवली उत्पादन सुरू होण्याकरता संचयित भांडवलाबरोबरच आणखी एका गोष्टीची आवश्यकता असते. नफ्याला जन्म देणारे कामगार नसतील तर नफा मिळवण्यासाठी, म्हणजेच भांडवल म्हणून, या भांडवलाचा उपयोग करता येत नाही. म्हणूनच कामगारांचा पुरेसा पुरवठा होणेदेखील आवश्यक होते.

विसाव्या शतकामध्ये, जेव्हा आपल्या सभोवार बेकारी पसरली आहे, मिळेल ते काम करायला कामगार तयार आहेत अशा परिस्थितीत, कधीकाळी उद्योगधंद्यांकरता कामगार मिळवणे ही एक मोठी समस्या होती ही गोष्ट आपल्याला समजणे कठीण आहे. कारखान्यांमध्ये वेतनावर काम करायला उत्सुक असणाऱ्या लोकांचे अस्तित्व आपल्याला अत्यंत "नैसर्गिक" वाटते. पण त्यात नैसर्गिक असे काहीच नाही. दुसऱ्यासाठी काम करण्याशिवाय गत्यंतर नसेल तरच माणूस वेतनावर काम करतो. जोपर्यंत माणसाकडे जमीन आहे आणि त्यावर आपल्या गरजेच्या वस्तूंचे उत्पादन त्याला करता येते तोपर्यंत तो दुसऱ्याकरता काम करणार नाही. अमेरिकेचा इतिहास हेच सिद्ध करतो. अमेरिकेत जोपर्यंत पश्चिमेकडे स्वस्त किंवा मोफत जमीन उपलब्ध होती तोपर्यंत जमिनीसाठी

तहानलेल्या लोकांचे ‘ पश्चिमायन ’ चालू राहिले; आणि त्यामुळे पूर्वेकडे कामगारांची चणचण होती. ऑस्ट्रेलियामध्येही असेच घडले. “ स्वान नदीच्या काठावर वसाहत करण्यासाठी श्री. पील यांनी ५०,००० पौंड आणि ३०० कष्टकरी बरोबर घेतले होते. परंतु या कष्टकऱ्यांना “ जमीन मिळण्याची शक्यता मोहवत होती आणि थोड्याच दिवसांत स्वतःचा बिछाना अंथरण्यासाठी किंवा नदीवरून पाणी आणण्यासाठीही श्री. पील यांच्याकडे नोकर उरला नाही. ” जोपर्यंत कामगारांना स्वतःची उत्पादनसाधने – या विशिष्ट बाबतीत जमीन – मिळवता येतात, तोपर्यंत ते दुसऱ्याकरता काम करत नाहीत ही गोष्ट न समजल्यामुळे स्वतःचा बिछाना स्वतःलाच घालावा लागणाऱ्या श्री. पील यांच्याकरता पाहिजे तर आपण दोन अश्रू ढाळूया.

जमीन हे उत्पादनसाधन असणाऱ्या कष्टकऱ्यांबद्दल जे खरे आहे तेच एखादे वर्कशॉप आणि विविध अवजारे यांसारखी उत्पादनसाधने असणाऱ्या कष्टकऱ्यांबद्दलही खरे आहे. त्यांना जोपर्यंत स्वतःची अवजारे वापरून वस्तूंचे उत्पादन करता येते आणि अशा वस्तू विकून स्वतःच्या पोटापुरते मिळवता येते तोपर्यंत ते दुसऱ्याकरता काम करत नाहीत. कशासाठी त्यांनी मोलमजुरी करावी ?

जेव्हा कामकऱ्यांकडे जमीन किंवा अवजारे यांपैकी काहीच उरत नाही—जेव्हा ते उत्पादनसाधनांपासून विभक्त केले जातात—तेव्हाच ते दुसऱ्यांकडे राबायला जातात. तशी त्यांची इच्छा नसते; पण तसे करणे त्यांना भाग पडते. जीवनासाठी आवश्यक असलेले अन्न, वस्त्र आणि निवारा मिळवण्यासाठी आता त्यांच्याकडे दुसरा पर्याय नसतो. उत्पादनसाधनांपासून वंचित झालेल्या कामगारांना आता त्यांच्याकडे राहिलेली एकमेव वस्तू विकणे भाग पडते. ती म्हणजे त्यांची काम करण्याची क्षमता — त्यांची श्रमशक्ती.

त्यामुळेच भांडवली उत्पादनाला आवश्यक ठरणाऱ्या कष्टकऱ्यांचा पुरवठा कसा उपलब्ध झाला याची कथा ही कष्टकऱ्यांना त्यांच्या उत्पादनसाधनांपासून कसे वंचित करण्यात आले याचीच कथा आहे. “ भांडवली व्यवस्थेचा मार्ग खुला करणारी प्रक्रिया ही कष्टकऱ्यांपासून त्यांची उत्पादनसाधने काढून घेण्याच्या प्रक्रियेपेक्षा वेगळी असूच शकत नाही. एकीकडे उत्पादनाच्या आणि जगण्याच्या सामाजिक साधनांचे भांडवलामध्ये, तर दुसरीकडे प्रत्यक्ष उत्पादकांचे मोलमजुरीवर राबणाऱ्या कामगारांमध्ये रूपांतर करणारी अशी ती प्रक्रिया असते. एकदा का या प्रत्यक्ष उत्पादकाला जमिनीपासून विभक्त केले आणि तो दुसऱ्याचा गुलाम, भूदास किंवा वेठबिगार राहिला नाही की त्याच्याकडे विकण्यासाठी स्वत्वाखेरीज दुसरी कोणतीही वस्तू नसते. कामगाराने मिळेल त्या बाजारपेठेत स्वतःजवळील क्रयवस्तू म्हणजे श्रमशक्तीची खुली विक्री करण्यासाठी त्याला गिल्ड-व्यवस्थेच्या कचाट्यातून—अॅप्रेंटिस आणि जर्नीमेन यांच्याकरता असणारे नियम आणि त्या व्यवस्थेमधील कामगार-नियमनाचे अडथळे—मुक्त व्हावे लागते. हे नव्याने बंधमुक्त झालेले लोक, त्यांच्याजवळील उत्पादनाची सर्व साधने काढून घेतल्यावर आणि जुन्या सरंजामशाहीतील जगण्याची सर्व हमी संपल्यानंतरच स्वत्वाची विक्री करू लागतात. बळजोरीने केलेली लूट आणि तायातूट यांची ही कथा मानवजातीच्या इतिहासात

रक्ताने रंगलेली आहे. "

महाकाय उद्योगांवर आधारित भांडवलशाहीचा विकास सर्वप्रथम इंग्लंडमध्ये झाला म्हणूनच तिच्या उदयाची सर्वात सुस्पष्ट चिन्हे तेथे आढळतात. याआधीच्या प्रकरणांमध्ये शेत-बंदिस्ती आणि भरमसाठ दराने खंड-आकारणी यामुळे सोळाव्या शतकामध्ये अनेक शेतकरी जमिनींवरून हुसकून रस्त्यावर कसे फेकले गेले आणि पुढे भिकारी, चोर व भटके कसे बनले हे आपण पाहिले आहे. अशा रीतीने सोळाव्या शतकामध्येच काही प्रमाणात कामकऱ्यांचा वर्ग तयार झाला होता.

अठराव्या शतकात आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस शेत-बंदिस्तीला पुन्हा एकदा उधाण आले. या वेळेस शेत-बंदिस्तीचा विस्तार प्रचंड प्रमाणात झाला आणि यामुळे स्वतःची श्रमशक्ती विकणे भाग पडणाऱ्या दुर्दैवी भूमिहीन लोकांची फौज प्रचंड प्रमाणात वाढली. सोळाव्या शतकातील सरकारला या भुकेल्या जनतेच्या हिंसकतेची भीती वाटत होती म्हणून केवळ भूमिहीनांकडूनच नव्हे तर सरकारकडूनही शेत-बंदिस्तीला फार मोठ्या प्रमाणावर विरोध झाला होता. परंतु अठराव्या शतकात शेत-बंदिस्तीला कायदेशीर रूप मिळाले. जमीन-मालकांच्या सरकारने जमीनमालकांसाठी केलेले " शेत-बंदिस्ती संदर्भातील कायदे " ही त्या काळातील नित्याचीच बाब झाली. म्हणूनच जमिनीस बांधलेला कष्टकरी हा भूमिहीन कामकरी झाला आणि कारखान्यांमध्ये मजुरीवर राबायला तयार असलेला कामगार बनला.

शेत-बंदिस्तीचा सर्वाधिक प्रसार इंग्लंडमध्ये झाला हे खरे असले तरी कमी-अधिक प्रमाणात सर्व युरोपखंडामध्येही तिचा प्रसार झालाच. फ्रान्समधील शेफिस येथील शेतकऱ्यांनी १७९० साली इस्टेट्स-जनरलमधील त्यांच्या प्रतिनिधींना केलेल्या तक्रारीमध्ये यासंबंधीचा पुरावा मिळतो : " शेफिस परगण्यातील ऑंझू येथील आम्ही काही रहिवासी येथील सर्वसामान्य लोकांच्या वतीने विनंति-अर्ज करू इच्छितो. आमच्या काही तक्रारी आहेत. येथील काही श्रीमंत, सत्ताधारी आणि हावरट लोकांनी अन्यायाने काही सार्वजनिक जमिनींवर कब्जा केला आहे. कौन्सिलने येथील जमीनमालकांच्या बाजूने दिलेल्या निर्णयामुळे या परगण्यातील जनतेची पार दैन्यावस्था झाली आहे. कारण गुरे चारण्यासाठी जनतेजवळ केवळ हीच कुरणे उपलब्ध होती. ती काढून घेण्यात आल्यामुळे जनता गरिबीच्या खाईत ढकलली गेली आहे. अर्थतज्ञांची एक नवी विचारप्रणाली सामूहिक जमिनी शेतीविकासाकरिता चांगल्या नाहीत हे लोकांना पटवून देण्याच्या प्रयत्नात आहे. पण याचा फायदा उठवून या परगण्यातील सत्ताधारी जमीनमालक आणि पैसेवाले यांनी सामूहिक जमिनी बळकावून स्वतःच्या तुंबड्या भरल्या आहेत. परगण्यातील अनेक रहिवाश्यांच्या दृष्टीने कुरणांपेक्षा अधिक मौल्यवान दुसरे काहीही नाही. या जमिनींअभावी त्यांना गुरे ठेवता येणार नाहीत. परिणामी त्यांना खत मिळणार नाही आणि जर खत मिळाले नाही तर त्यांना चांगले पीक कसे काढता येईल ? "

जे सामुहिक हक्क काढून घेतल्याबद्दल हे फ्रेंच शेतकरी तक्रार करत होते तेच हक्क गमावल्यामुळे इंग्लिश शेतकऱ्यांनाही सणसणीत तडाखा बसला. चांगल्या शेतीसाठी

गुरांच्या चाऱ्याची व्यवस्था करावीच लागते. सामूहिक जमिनींवरील शेतकऱ्यांचे हक्क गेल्यामुळे त्यांच्यावर कुऱ्हाडच कोसळली. त्यामुळे ज्या जमीनमालकांनी त्यांचे सामूहिक हक्क हिरावून घेतले आणि ज्या सरकारने जमिनींवरून त्यांची हकालपट्टी होईल असे उपाय योजले, त्यांच्याबद्दल शेतकऱ्यांच्या मनात कटू भावना तयार होणे स्वाभाविकच होते. त्या काळी लोकप्रिय असलेल्या या छोट्याशा पद्यपंक्तीमधून त्यांची चीड स्पष्ट होते :

जनसामान्यां ताडन करी जरी
हा चोरीविरोधी कायदा
मुक्त फिरती हे मोठे चोर
लुटूनी गाव जमिनीचा मलिदा

उद्योगधंद्यांना कामगार पुरवण्यासाठी जमीनमालक शेतकऱ्यांना हाकलून देत होते अशी काही समजूत करून घेऊ नका. असला विचारही त्यांच्या डोक्यात नव्हता. त्यांना केवळ जमिनीतून जास्तीत जास्त नफा मिळवण्यात रस होता. शेत-बंदिस्ती न करता त्यांना अधिक पैसा मिळवता आला असता तर त्यांनी ती पद्धत अंगीकारली नसती. परंतु जमीन खुली ठेवण्यापेक्षा शेत-बंदिस्ती करण्यामुळे त्यांना अधिक पैसा मिळत होता. १७७६ सालच्या आपल्या श्रॉपशायरमधील सफरीबाबत आर्थर यंग सांगतात : " शेत-बंदिस्ती केल्यानंतर खंड-आकारणी सर्वसाधारणपणे दुप्पट झाली आहे. डॅव्हेन्ट्रीपासून ब्रॅमस्टनकडे जाताना तीन मैलांवर, वर्षापूर्वीच शेत-बंदिस्ती केलेले एक शेत आहे. येथील खुल्या जमिनीचा खंड एकरामागे ६ ते १० शिलिंग्ज होता. परंतु आता तो २० ते ३० शिलिंग्ज झाला आहे. "

कंगाल कष्टकऱ्यांना, पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्या ताब्यात असणाऱ्या जमिनींवरून हाकलून दिल्याचे सर्वात कुप्रसिद्ध उदाहरण स्कॉटलंडमधील सुदरलँडच्या डच्चेसचे आहे. मार्क्सनी या हकिगतीचे केलेले वर्णन पाहा : " सर्व स्वतंत्र शेतकऱ्यांना हाकलून दिल्यावर झोपड्या पाडणे चालू होते; म्हणजे आता त्या जमिनींवर शेतमजुरांना स्वतःला राहण्यासाठीदेखील जागा उरणार नाही याची खबरदारी घेतली जात होती. सुदरलँडच्या डच्चेसने पाडलेल्या झोपड्या हे एकोणिसाव्या शतकात वापरण्यात आलेल्या पद्धतींचे चांगले उदाहरण आहे. याआधी केलेल्या अशा प्रकारच्या उपाययोजनांनी या प्रदेशाची लोकसंख्या केवळ १५,००० झाली होती; आणि आता अर्थशास्त्रामध्ये चांगली गती असणाऱ्या या बाईने हा सगळा प्रदेश म्हणजे शेळ्यामेंढ्यांचे कुरण बनवण्याचा चंग बांधला होता. यासाठी १८१४ ते १८२० पर्यंत या १५,००० रहिवाशांचा म्हणजे ३,००० कुटुंबांचा पद्धतशीरपणे पिच्छा पुरवण्यात आला. त्यांची सगळी गावे जाळून उद्ध्वस्त करण्यात आली. ब्रिटिश सैनिकांनी या रहिवाशांशी हाणामारी करून त्यांची जबरदस्तीने उचलबांगडी केली. आपल्या झोपडीतून बाहेर पडायला नकार देणाऱ्या एका म्हाताऱ्या बाईला जिवंत जाळण्यात आले. अशा रीतीने शतकानुशतके लोकांकडे असणाऱ्या ७,९४,००० एकर जमिनीवर त्या महान स्त्रीने कबजा मिळवला. "

सोळाव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत शेतकऱ्यांना जमिनीवरून हुसकावून लावण्याची प्रक्रिया इंग्लंडमध्ये अविरतपणे चालू राहिली. फ्रान्समध्ये छोट्या मालक शेतकरीवर्गाची वाढ झाली. परंतु इतर कोणत्याही देशापेक्षा औद्योगिक भांडवलशाहीचा अत्यंत वेगाने विकास झालेल्या इंग्लंडमध्ये हा छोट्या मालक-शेतकऱ्यांचा वर्ग समूळ निपटून टाकण्यात आला. अठराव्या शतकातील एक इंग्लिश लेखक डॉ. आर. प्राईस या शेतकरी वर्गाची तेव्हा काय गत झाली याचे चित्रण करतात : " जेव्हा ही जमीन काही बड्या शेतकऱ्यांच्या हातात पडते; तेव्हा छोट्या शेतकऱ्यांचे दुसऱ्याकरता काम करून स्वतःचे पोट भरणाऱ्या कामकऱ्यांमध्ये रूपांतर होते. मग शहरे आणि उद्योगधंदे वाढू लागतात, कारण नोकरी आणि निवारा यांच्या शोधात लोकांचा ओघ त्या दिशेने सुरू होतो. सर्वात तळच्या वर्गातील माणसांची स्थिती अधिकच खालावते. छोटे जमीनमालक या स्थानावरून दिवसाच्या रोजावर राबणारे कामगार या कनिष्ठ पातळीवर ते फेकले जातात."

वस्तुस्थितीचे हे अचूक चित्रण आहे. जमिनीवरून हाकलून दिल्यामुळे 'तळच्या थरातील लोक' रोजंदारीवर काम करणारे मजूर बनले. म्हणजेच आवश्यक प्रमाणात कामगारांचा पुरवठा करण्यासाठी उपयोगी पडलेल्या पद्धतींपैकी शेत-बंदिस्ती ही एक प्रमुख पद्धत होती.

इतर पद्धतींचाही अवलंब करण्यात आला. दुसरी एक पद्धत तेवढी सुस्पष्ट किंवा डोळ्यात भरणारी नव्हती, परंतु तिचाही अनेक लोकांच्या जीवनावर परिणाम झाला. ती म्हणजे फॅक्टरी-व्यवस्था. ज्याप्रमाणे शेतीमध्ये राबणाऱ्या कामगाराला जमिनीपासून विभक्त करण्यात आले, त्याप्रमाणे उद्योगधंद्यांमध्ये राबणाऱ्या कष्टकऱ्याला त्याच्या उत्पादनसाधनांपासून विभक्त करण्यात आले.

हाऊस ऑफ कॉमन्सच्या १८०६ सालच्या नोंदीमध्ये "इंग्लंडमधील लोकर-उद्योगाची पाहणी करण्यासाठी" नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल दाखवतो : " जवळपासच्या विभागात बऱ्याच काळापासून चालू असणारे काही थोडेसे कारखाने आहेत. गेली काही वर्षे घरगुती कापड-उद्योजकांना त्यांच्याबद्दल जबरदस्त असूया वाटते. त्यांनी या कारखान्यांसंबंधी गंभीर शंका उपस्थित केल्या आहेत. ही फॅक्टरी-व्यवस्था हळूहळू घरगुती उद्योगांना नष्ट करील आणि स्वतःकरता काम करणाऱ्या छोट्या स्वतंत्र मालक-कारागिराला यापुढे जर्नीमॅनप्रमाणे काम करावे लागेल अशा भीतीने विणकरांना ग्रासले आहे."

१८०६ सालच्या अहवालातील 'भीती' नंतर खरीच ठरली. याचे कारण उघडच आहे. कार्यशक्तीवर चालणारी यंत्रे आणि श्रमविभागणी असणाऱ्या फॅक्टरी-व्यवस्थेला हाताने काम करणाऱ्या कारागिरापेक्षा अधिक वेगात आणि कमी किंमतीत वस्तूंचे उत्पादन करणे सहज शक्य झाले. हस्तोद्योग आणि यंत्रोद्योग यांच्या स्पर्धेमध्ये यंत्राचा विजय होणे अपरिहार्यच होते आणि तो तसा झालाही. त्यामुळे हजारो "छोट्या व स्वतंत्र मालक-कारागिरांवर" (स्वतंत्र, कारण त्यांच्याकडे उत्पादनसाधनांची, त्यांच्या

अवजारांची मालकी होती.) ' जर्नीमेन 'प्रमाणे वेतनावर काम करण्याची पाळी आली. अशा रीतीने शरण जाण्यापूर्वी त्यांनी बराच काळ उपासमार सहन केली, पण अखेर त्यांना शरणागती पत्करावीच लागली.

१८४० साली लोकप्रतिनिधींच्या सभागृहापुढे मांडण्यात आलेल्या, हातमाग विणकरांच्या सहाय्यक आयुक्तांच्या अहवालात, हातमाग विणकराने त्याच्या जुनाट व कालबाह्य उत्पादनसाधनांना चिकटून राहणे कसे फोल होते, याचा पुरावा दिला आहे : " एखाद्या उद्योगात जम बसवण्यासाठी कमी किंमतीला वस्तूंची विक्री करण्याची स्पर्धा सुरू झाल्यामुळे, वेतनमान घसरण्याबरोबरच आणखीही महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. स्वतःचे कुटुंब आणि इतर काही व्यक्ती यांची मदत घेऊन थोडेफार कापड तयार करू शकणाऱ्या विणकराचा धंदा बड्या उद्योजकांनी घशात घातला आहे. त्यामुळे पूर्वीचे अनेक मालक-कारागीर आता जर्नीमेन बनले आहेत. त्यांना दारिद्र्याने घेरले आहे. "

यंत्रांच्या स्पर्धेमुळे खाली येणाऱ्या किंमतींनी हस्तोद्योग करणाऱ्या कामगाराला कसा तडाखा दिला याचा सर्वांत खात्रीलायक पुरावा आपल्याला १८३६ साली प्रकाशित झालेल्या फिलिप गॅस्केलच्या प्रसिद्ध पुस्तकातील पुढील उताऱ्यामध्ये मिळतो : " वाफेच्या शक्तीचा वापर सुरू झाल्यापासून हातमागावर काम करणाऱ्या विणकरांच्या स्थितीत एक जबरदस्त व क्लेशकारक बदल घडला आहे. वाफेच्या इंजिनाखाली त्यांच्या श्रमाचा चक्काचूर झाला आहे. एक विशिष्ट प्रकारचे कापड विणण्यासाठी विणकराला मिळणाऱ्या किंमती खालील तक्त्यामध्ये दिल्या आहेत. त्यावरून या विशिष्ट प्रकारच्या श्रमाच्या किंमतीमध्ये काय प्रचंड घट झाली ते दिसून येते.

तक्ता ६

वर्ष	श्रमांची किंमत शिलिंग पेन्स
१७९५	३९ -- ९
१८१०	१५ -- ०
१८३०	५ -- ०

" आणि ही काही एकमेव घटना नव्हे; संपूर्ण हातमाग व्यवसायाशी संबंधित असलेल्या श्रमिकांच्या बदललेल्या परिस्थितीचे हे बोलके उदाहरण आहे. "

हस्तोद्योगाला मिळणाऱ्या किंमती कोसळण्याची ही कथा अतिशय दुःखदायक आहे. स्वतःचे पोट भरणे अशक्य झाल्यावर, (जमल्यास) विणकराने त्याचे उत्पादनसाधन म्हणजे हातमाग विकून टाकले. त्यानंतर एखाद्या कारखान्याच्या रोजगार विभागासमोर रांगेत उभे राहणे हे त्याचे पुढचे पाऊल ओघानेच आले. अशा ठिकाणी इतर उद्योगधंद्यातील समदुःखी कामगार त्याला भेटले. या रीतीने कामगारांच्या प्रचंड पुरवठ्याशिवाय चालू न शकणाऱ्या यांत्रिक उत्पादनानेच हस्तोद्योगी श्रमिकाला उद्ध्वस्त करून कामगारांचा पुरेसा पुरवठा होईल याची खबरदारी घेतली.

अशा रीतीने, औद्योगिक भांडवलशाहीला भांडवलसंचयाप्रमाणेच आवश्यक असलेला, संपत्तिविहीन कामगारांचा वर्ग अस्तित्वात आला.

ज्या वेळी उत्पादनपद्धती आणि विनिमयपद्धती यांमधील ही क्रांती घडून आली—म्हणजेच सरंजामशाही संपून भांडवलशाही अस्तित्वात आली—तेंव्हा जुने विज्ञान, जुने कायदे, जुनी शिक्षणपद्धती, जुने सरकार आणि जुना धर्म यांचे काय झाले ? त्यामध्येही बदल घडले. तसे घडणे भागच होते. इ. स. १८०० मधील कायदेपद्धती ही इ. स. १२०० मधील कायदेपद्धतीपेक्षा फारच वेगळी होती. तीच गोष्ट धार्मिक शिक्षणाचीही झाली. व्यापारी, उद्योजक आणि सावकार यांचे वर्चस्व असलेल्या जगाला, धर्मगुरू आणि योद्धे यांचे वर्चस्व असलेल्या जगापेक्षा वेगळ्या प्रकारच्या धार्मिक संकल्पनांची गरज होती. ज्या समाजामध्ये स्वतःला आणि स्वतःच्या कुटुंबाला पोटापुरते मिळवणे हेच कामाचे उद्दिष्ट होते त्या समाजामधील नफेखोरांचा चर्च निषेध करू शके. परंतु ज्या समाजामध्ये नफा मिळवणे हाच प्रमुख उद्देश आहे त्या समाजात वेगळा सूर लावणे चर्चला भाग पडले. जेथे कारागीर केवळ स्वतःचे पोट भरण्यासाठी काम करत अशा सरंजामकालीन हस्तोद्योगी अर्थव्यवस्थेशी सांधाजुळणी झालेल्या कॅथॉलिक चर्चला, जेथे केवळ नफा मिळवण्याकरता भांडवलदार झटतो अशा भांडवली अर्थव्यवस्थेला साजेशी शिक्षणव्यवस्था उभी करणे जरी शक्य नव्हते तरी प्रॉटेस्टंट चर्चला ते शक्य होते, आणि त्यांनी तसेच केले. प्रॉटेस्टंट चर्चचे अनेक वेगवेगळ्या संप्रदायामध्ये तुकडे पडले, परंतु त्या सर्वांमध्ये नफेखोरीमध्ये रस असणाऱ्या भांडवलदाराला वेगवेगळ्या प्रमाणात दिलासा मिळत होता.

आता प्युरिटन पंथाचेच उदाहरण घ्या. श्रीमंती मिळवण्याचा मार्ग नरकाकडे नेतो असे कॅथॉलिक कायदेपंडितांनी सांगितले होते. परंतु बॅक्स्टर या प्युरिटन गृहस्थांनी त्यांच्या अनुयायांना सांगितले की, संपत्ती मिळवण्याच्या सुसंधींचा फायदा घेतल्याखेरीज ईशसेवेचा मार्ग त्यांना खुला होणार नाही. " (तुमच्या किंवा दुसऱ्या कोणाच्याही आत्म्याला कोणत्याही प्रकारे हानी न करता) एखाद्या मार्गाने मिळेल त्यापेक्षा अधिक संपत्ती मिळण्याचा दुसरा कायदेशीर मार्ग देवाने तुम्हाला दाखवला असताना, तुम्ही नकार देऊन कमी फायदेशीर मार्ग पत्करलात तर तुम्हांला आलेल्या बोलावण्याकडे तुम्ही दुर्लक्ष केलेत आणि देवाचा सेवक बनायला, त्याच्या भेटी स्वीकारायला आणि त्याला लागतील तेव्हा त्याच्यासाठी त्यांचा उपयोग करायला तुम्ही नकार देत आहात असा त्याचा अर्थ होईल. स्वतःची तुंबडी भरण्यासाठी आणि पापासाठी नव्हे, परंतु देवासाठी श्रीमंत होण्याचे प्रयत्न तुम्ही केलेच पाहिजेत. "

किंवा मेथॉडिस्ट पंथाचे उदाहरण घ्या. त्यांचे प्रसिद्ध नेते वेस्ली यांनी म्हटले आहे : " उद्योगीपणापासून व काटकसरीपासून आपण लोकांना परावृत्त करता कामा नये. जेवढे शक्य असेल ते सर्व मिळवायला, शक्य तेवढी बचत करायला थोडक्यात म्हणजे श्रीमंत व्हायला आपण सर्व ख्रिश्चनांना प्रोत्साहन दिले पाहिजे. "

नाही तर कॅल्व्हिनिस्ट पंथाचे उदाहरण घ्या. महाकाय उद्योगांवर आधारित भांडवली उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या भांडवलसंचयाकरता उपलब्ध असलेल्या संधी पूर्वी कधीही नव्हत्या एवढ्या सोळाव्या शतकात होत्या. याच काळात प्रॉटेस्टंट रिफॉर्मेशनचा उदय झाला. कॅल्व्हिन यांची शिकवण विशेष करून भांडवली उद्योजकांच्या ईर्षेला प्रोत्साहन देणारी होती. पूर्वीची कॅथॉलिक चर्च ही संस्था व्यापारी ' नफ्याच्या लालसे 'ला पाप ठरवून व्यापाऱ्याकडे संशयी दृष्टीने पाहात असे. तर याउलट प्रॉटेस्टंट कॅल्व्हिन यांनी लिहिले : " जमीनमालकीमधून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा उद्योगधंद्यांमधून मिळणारे उत्पन्न अधिक का नसावे ? व्यापाऱ्याचा नफा अखेर कोठून येतो ? त्याची उद्यमशीलता आणि मेहनत यामधूनच ना ? " यामुळे कॅल्व्हिनिझम हा उगवत्या भांडवलदारवर्गाचा पंथ बनला यात आश्चर्य ते काहीच नाही.

कॅल्व्हिन यांचे ' न्यू इंग्लंड 'मध्ये वसाहत करणारे अनुयायी म्हणजे प्युरिटन्स हे अमेरिकेमध्ये ज्ञात आहेत. देवाचा गौरव करणे हेच यांच्या आयुष्याचे ध्येय होते. अशा या कणखर लोकांच्या स्तुतिस्तोत्रांनी आपली इतिहासाची पुस्तके भरली आहेत. आराम, उधळेपणा आणि आळशीपणा न करता, अविरत काम करून आणि काटकसर करून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ते आपले जीवन जगत होते असे आपल्याला सांगण्यात येते. आता या सगळ्याचा क्षणभर वेगळ्या पद्धतीने विचार करा. एकीकडे संपत्तीचा संचय आणि दुसरीकडे सतत कामाची सवय या गोष्टी ज्या अर्थव्यवस्थेचा पाया आहेत त्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने, कॅल्व्हिन यांच्या अनुयायांनी तीच धार्मिक मूल्ये स्वतःच्या दैनंदिन जीवनात आणणे यापेक्षा अधिक सुयोग्य गोष्ट कोणती असेल ? धनसंचयाला सुयोग्य ठरणारे प्रत्येक काम जो करतो तोच सर्वांत चांगला ख्रिश्चन होय [असे कॅल्व्हिन यांचे म्हणणे होते.] धनसंचयाला सुयोग्य म्हणजेच भांडवलशाहीच्या आंतरिक प्रेरणेला सुयोग्य ! अगदी दुग्धशर्करायोग !

ही मनोप्रेरणा अतिशय जागृत असलेल्या लोकांपैकी एक सुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे बेंजामिन फ्रँकलिन ! त्यांच्या ' पुअर रिचर्डस अल्मनाक ' [गरीब रिचर्डसचे पंचांग] या पुस्तकामध्ये, नेक वृत्तीच्या माणसांनी चांगले जीवन कसे जगावे यासंबंधीचे अत्यंत सोपे, बाळबोध प्युरिटन विचार त्यांनी व्यक्त केले आहेत :

" जो माणूस काम करत नाही तो कधीच कीर्तिवंत होत नाही. "

" सुखाच्या (फायद्याच्या) आशेने दुःख कमी होते. "

" तुम्ही तुमचा उद्योग सांभाळा म्हणजे उद्योग तुम्हाला सांभाळेल. "

आणि ' ॲडव्हाईस टू यंग ट्रेड्समेन ' [तरुण व्यापाऱ्यांना सल्ला] या पुस्तकात ते लिहितात : " थोडक्यात म्हणजे तुमची इच्छा असेल तर संपत्तीचा मार्ग बाजारपेठेच्या मार्गाइतका सोपा आहे. तो मुख्यत्वे दोन गोष्टींवर अवलंबून आहे. उद्यमशीलता आणि काटकसर—म्हणजेच वेळ किंवा पैसा काहीही वाया घालवू नका—प्रामाणिकपणे स्वतःला मिळवता येणे शक्य असेल ते मिळवणारा आणि जे मिळते त्याची बचत करणारा माणूस नक्कीच श्रीमंत होतो. "

भांडवली मनोप्रेरणा ही अशी असते. कॅल्व्हिनिस्ट लोकांकरता ही शिकवण म्हणजे साधासुधा सल्ला नव्हता तर ख्रिश्चन वागणुकीचे ते एक ध्येय होते, एक अत्यंत महत्त्वाचे मूल्य होते. ही शिकवण प्रत्यक्ष व्यवहारात आणणे हाच देवाचा गौरव करण्याचा सर्वात चांगला मार्ग होता.

नफ्याची मनीषा बाळगणे हा मानवी ' स्वभाव 'च आहे असे तुम्हाला पुन्हा कोणी सांगितले तर ही मनीषा मानवी स्वभाव कशी बनली हे तुम्ही त्याला सांगू शकाल. सरंजामी समाजाला जवळपास अज्ञात असलेल्या बचत आणि गुंतवणूक या गोष्टी भांडवली समाजामध्ये, देवाचा गौरव करण्यासाठी, हळूहळू नित्याचीच बाब कशा बनल्या आहेत हे तुम्ही त्याला दाखवून द्या. अशारीतीने एकोणिसावे शतक सुरू होण्याच्या सुमारास, " बचत करणे आणि गुंतवणूक करणे या गोष्टी एका मोठ्या वर्गाच्या दृष्टीने एकाच वेळी कर्तव्य आणि आनंददायी बनल्या. बचत केलेले पैसे क्वचितच काढून घेण्यात येत आणि चक्रवाढ व्याजाने केलेल्या संचयामुळे, आज आपण गृहीत धरून चालतो ते भौतिक विजय शक्य झाले. त्या काळची नीतिमत्ता, राजकारण, साहित्य आणि धर्म या सर्वांनी बचत वाढवण्यासाठी जणू एक प्रचंड कटच केला होता. देव आणि दौलत यांचा मिलाफ झाला. श्रीमंत माणसांना या भूतलावर स्वास्थ्य प्राप्त झाले. बचत केल्यास अखेर स्वर्गाच्या राज्यामध्ये प्रवेश करणे श्रीमंत माणसाला शक्य झाले. "

सुरुवातीच्या व्यापारामधून झालेला भांडवलसंचय आणि संपत्तिविहीन कष्टकरी वर्गाचा उद्भव यामुळे औद्योगिक भांडवलशाहीची सुरुवात झाली. भांडवलाचा अधिकाधिक पुरवठा चालू राहील याची काळजी फॅक्टरी-व्यवस्थेमार्फत घेण्यात आली. बचत करून पुन्हा गुंतवणूक केल्यास स्वर्गाचे राज्य आपल्यालाच मिळणार आहे अशी श्रद्धा असलेल्या, या संपत्तीच्या नवीन मालकांनी त्याचे भांडवल पुनः पुन्हा कारखान्यांमध्ये गुंतवण्यास सुरुवात केली. अशा रीतीने आपल्याला ठाऊक असलेली आधुनिक व्यवस्था अस्तित्वात आली.

◇ ◇ ◇

१५

उद्योगधंदे, शेती आणि वाहतूक-व्यवस्था यांमध्ये क्रांती

१५० वर्षांपूर्वीची वृत्तपत्रे "विश्वास ठेवा किंवा ठेवू नका" अशा अविश्वसनीय घटनांच्या हकिगती देणारी व्यंगचित्रे देत नसत. त्या काळी तशी पद्धत जर अस्तित्वात असती तर खालील बातमी कशी द्यायची ते ११ मार्च १७७६ च्या 'बर्मिंगहॅम गॅझेट'ला समजले असते : "गेल्या शुक्रवारी श्री. वॅट यांच्या नव्या तत्त्वांवर आधारलेले वाफेचे इंजिन ब्लूमफील्ड कोलियरी (कोळशाची खाण) येथे सुरू करण्यात आले. अचाट कार्यक्षमता असलेल्या या एकमेव यंत्राच्या पहिल्या-वहिल्या हालचाली पाहण्यास अतिशय उत्सुक असलेले अनेक शास्त्रज्ञ तेथे हजर होते. या प्रात्यक्षिकावरून अननुभवी लोकांच्या मनातील शंका दूर झाल्या असून या शोधाचे महत्त्व आणि उपयुक्तता आता स्पष्ट झाली आहे. अनेक वर्षांच्या अभ्यास आणि वेगवेगळ्या खर्चिक व किचकट प्रयोगांनंतर श्री. वॅट यांनी यंत्राचा शोध लावला."

सन १८०० पर्यंत श्री. वॅट यांच्या "शोधाचे महत्त्व आणि उपयुक्तता" इंग्लिश लोकांना इतकी स्पष्ट झाली होती की ३० कोळशाच्या खाणी, २२ तांब्याच्या खाणी, २८ फाउंड्रीज, १७ दारू गाळण्याचे कारखाने आणि ८४ कापडगिरण्यांमध्ये या यंत्राचा उपयोग करण्यात येत होता.

माणसांचे काम करण्यासाठी नव्या यंत्राचा शोध लावणे ही तर जुनीच गोष्ट होती. परंतु वाफेच्या शक्तीवर यंत्रे चालवण्यात येऊ लागल्यावर उत्पादनाच्या पद्धतीत एक महत्त्वाचा बदल घडून आला. अशी इंधनावर चालणारी यंत्रे म्हणजे फॅक्टरी व्यवस्थेच्या व्यापक विस्ताराचेच चिन्ह होते. अशा यंत्रांशिवाय कारखाना उभा करणे शक्य होते, परंतु कारखाने उभे केल्याशिवाय अशा इंधनावर चालणाऱ्या यंत्रांचा वापर करणे शक्यच नव्हते.

विस्तृत प्रमाणावर कार्यक्षम श्रमसंचलन आणि श्रमविभागणी असलेल्या फॅक्टरी-व्यवस्थेमुळे उत्पादनामध्ये प्रचंड वाढ घडून आली. कारखान्यांमधून प्रचंड वेगाने वस्तू बाहेर पडू लागल्या. यामागील कारणे दोन प्रकारची होती. नफा मिळवण्याच्या लालसेने भरधाव सुटलेले भांडवल हे एक कारण, तर बाजारपेठेतील मागणी वाढली होती हे दुसरे

कारण नव्याने शोध लागलेल्या प्रदेशांमधील बाजारपेठा हे मागणी वाढण्यामागचे एक महत्त्वाचे कारण होते. त्याचप्रमाणे आणखीही एक कारण होते. फॅक्टरीनिर्मित वस्तूंना जशा नव्या परदेशी बाजारपेठा मिळाल्या त्याचप्रमाणे इंग्लंडमधील लोकसंख्यावाढीमुळे देशांतर्गत बाजारपेठेतही वाढ झाली.

अठराव्या शतकातील इंग्लंडच्या लोकसंख्येतील वाढ ही मुख्यत्वे जन्मांचे प्रमाण वाढल्यामुळे होती की मृत्यूंचे प्रमाण घटल्यामुळे होती याबद्दल पूर्वी इतिहासकारांमध्ये वाद असे. जरी दोन्ही कारणे अस्तित्वात होती तरीही मृत्यूंच्या प्रमाणातील घट हे अधिक महत्त्वाचे कारण असल्याचे आता मानण्यात येते. पण मृत्यूंचे प्रमाण घटण्याचे कारण काय ? कदाचित डॉक्टर्सना त्यांच्या व्यवसायाबद्दल अधिक समज आली असावी. त्यामुळे पूर्वी जे लोक मृत्युमुखी पडले असते ते लोक आता जिवंत राहू शकले. लंडनमधील 'लाईंग-इन-हॉस्पिटल'च्या (रुग्णांची राहण्याची व्यवस्था असणारे हॉस्पिटल) कागदपत्रांवरून, माता आणि मुले यांच्या मृत्युप्रमाणात विस्मयकारक घट झालेली दिसते :

तक्ता ७

मृत्यूंचे प्रमाण

	इ. स. १७४९ – १७५८	इ. स. १७९९ – १८००
स्त्रिया	४२ मध्ये १	९१४ मध्ये १
मुले	१५ मध्ये १	११५ मध्ये १

या आकडेवारीवरून वास्तवाचे दर्शन होते. सन १७०० पूर्वी इंग्लंडमधील लोकसंख्या दर १०० वर्षांनी सुमारे १० लाखांनी वाढत असे. परंतु सन १७०० ते १८०० या काळात लोकसंख्या ३० लाखांनी वाढली !

शेतीमध्ये फार मोठ्या प्रमाणावर झालेल्या सुधारणांमुळे लोकांना खायला-प्यायला अधिक मिळत होते हे लोकसंख्यावाढीचे कदाचित आणखी एक कारण असावे. (शेतीमधील या सुधारणाही काही प्रमाणात लोकसंख्यावाढीमुळेच घडल्या होत्या.) ज्याप्रमाणे औद्योगिक क्रांती झाली त्याचप्रमाणे शेती क्रांतीही झाली.

इंग्लंडमधील एखाद्या शाळकरी मुलाला विचारा की १६४९ साली काय झाले ? तो उत्तर देईल की "पहिला चार्ल्स मरण पावला." हॉलंडमधून आणलेल्या सलगम आणि इतर मुळांची लागवड १६४९ साली सुरू करण्यात आली हे त्याच्या डोक्यातही येणार नाही. पण ते का यावे ? सलगमचे विशेष महत्त्व काय होते ?

पहिल्या प्रकरणातील त्रिक्षेत्र-पद्धती दाखवणाऱ्या तक्त्याकडे पुन्हा एक नजर टाकली तर याचे उत्तर मिळू शकेल. जमिनीचा $\frac{1}{3}$ भाग पडीत राहणे ही भयंकरच नासाडी होती. गुरांना आवश्यक असलेल्या वनस्पती आणि सलगम यांच्या लागवडीमुळे

जमिनीचा कस पुन्हा भरून काढण्याचा प्रश्न सोडवता आला. पहिले वर्ष—गहू, दुसरे वर्ष—सलगम, तिसरे वर्ष—सातू, चौथे वर्ष—गुरांना आवश्यक वनस्पती; अशा चौरंगी पद्धतीने चांगलीच सुधारणा घडून आली. धान्याची दोन पिके लागोपाठ घेतल्यामुळे जमिनीचा कस जाणे व त्यामुळे ती पडीत ठेवावी लागणे या दोन्ही गोष्टी निकालात निघाल्या.

गुरांना आवश्यक असलेल्या वनस्पती आणि सलगम यांच्या लागवडीमुळे जमिनीतील तण काढण्याचा प्रश्न तर सुटलाच, पण त्याबरोबर थंडीच्या दिवसात गुरांना पुरेसे खाद्य पुरवता येऊ लागले. पूर्वी थंडीच्या दिवसात काही गुरे मारण्यात येत व त्यांचे मांस खाण्यासाठी मीठ लावून राखून ठेवण्यात येई. परंतु आता थंडीच्या काळातही अधिक गुरे जगवणे शक्य झाले.

चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास करण्याचे प्रयोग याच काळात करण्यात आले. शास्त्रीय पद्धतीने जनावरांची पैदास करण्यापूर्वी आणि त्यानंतर, स्मिथफील्ड बाजारपेठेत विकण्यात येणाऱ्या जनावरांच्या सरासरी वजनांवरून ते प्रयोग यशस्वी झाले हे सिद्ध होते.

तक्ता ८

जनावरांचे सरासरी वजन

	अठराव्या शतकाच्या सुरुवातीस	अठराव्या शतकाच्या शेवटी
गाई	३७० पौंड	८०० पौंड
वासरे	५० पौंड	१४८ पौंड
शेळ्या	२७ पौंड	८० पौंड

ज्याप्रमाणे उद्योगधंद्यांमध्ये वापरण्यात येणाऱ्या साधनांमध्ये आणि यंत्रांमध्ये सुधारणा घडल्या त्याचप्रमाणे अठराव्या शतकामध्ये चांगल्या प्रकारचे नांगर आणि कुदळी वगैरेंचा वापर शेतीमध्ये सुरू झाला.

शेत-बंदिस्तीमुळे कुळांना जमिनीवरून हाकलून देण्यात आले, परंतु त्यामुळेच शेतकी तंत्रज्ञान, विज्ञान आणि उत्पादनसाधने यांमध्ये सुधारणा करून त्यांचा विस्तृत प्रमाणावर वापर शक्य झाला. पूर्वीच्या खुल्या क्षेत्राच्या, सार्वजनिक शेतीव्यवस्थेमध्ये ते शक्य नव्हते.

लोकसंख्येमध्ये वाढ झाल्यामुळे शेती किफायतशीर होऊ लागली. नफ्याच्या लालसेने बड्या जमीनमालकांनी या काळात त्यांच्या शेतांमध्ये प्रचंड प्रमाणावर भांडवल-गुंतवणूक केली. परिणामतः धान्याची उपलब्धता आणि दर्जा सुधारला व त्यामुळे लोकसंख्येमध्ये अधिकच वाढ झाली.

उद्योगधंदे आणि शेती यांमधील क्रांतीबरोबरच वाहतूक-व्यवस्थेतही क्रांती घडली. अतिशय वेगाने मोठ्या प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन करून आणि अधिक विस्तृत प्रमाणावर अधिक चांगली पिके घेऊन जर ती ग्राहकांकडे पाठवता येणार नसतील तर सगळेच मुसळ केरात जाईल. पूर्वी रस्ते इतके खराब होते की अठराव्या शतकाच्या मध्यास प्रवास करणाऱ्या, डाऊनशायर येथील मार्क्विस यांना प्रवासमार्गात दुरुस्त्या करण्यासाठी कामगारांचा एक तांडा बरोबर घेऊन जावे लागले. अनेकदा चिखलामधून बग्गी खेचून वर काढावी लागली. मार्क्विस यांना जे त्रासदायक होते ते वाढत्या बाजारपेठेची मागणी पुरवण्याची धडपड करणाऱ्या उद्योजकाला अशक्यच होते. त्याला स्वस्त, जलद आणि नियमित वाहतुकीची आवश्यकता होती. लँकेशायरमध्ये जसा कापड-उद्योग एकवटला होता त्याप्रमाणे एका विशिष्ट भागामध्ये उत्पादन केंद्रित करण्याचा फायदा उठवण्याची या उद्योजकांची इच्छा होती, त्यांनाही अशी वाहतूक-व्यवस्था हवीच होती.

म्हणूनच अठराव्या शतकामध्ये रस्तेबांधणीत सुधारणा करण्यास आणि कालवे बांधण्यास सुरुवात झाली. आपणा सर्वांना ठाऊक असणारा जॉन मॅकॅडम इंजिनीअर यानी बांधलेला मॅकॅडम रस्ता एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस तयार करण्यात आला. त्यापाठोपाठ रेल्वे आणि वाफेवर चालणाऱ्या आगबोटी यांचे पदार्पण झाले. तसेच नद्यांचे तळ अधिक सखोल करण्यात आले आणि कालवे खणण्यात आले. वाहतूक-व्यवस्थेतील क्रांतीमुळे देशांतर्गत बाजारपेठ सर्व दिशांनी वाढू लागली, एवढेच नव्हे तर जागतिक बाजारपेठेचे देशांतर्गत बाजारपेठेत रूपांतर करणे शक्य झाले.

लोकसंख्येतील वाढ, वाहतूक-व्यवस्था, शेती आणि उद्योगधंदे यांमधील क्रांती या परस्परावलंबी गोष्टी आहेत. त्या सर्वांनी स्वतः घडत घडत दुसऱ्यांना घडवले. या शक्तींनी एक नवे जग निर्माण केले.

◇ ◇ ◇

१६

तुम्ही पेरता बी — फळ घेणारा दुसराच

गिरणगावामधून जाणाऱ्या एका बसमध्ये शब्द कानावर पडले : " अरे देवा! पुन्हा एकदा निदर्शने! ' संघटित कामगारांवर अन्याय ' असे फलक घेऊन दुकाने आणि कारखाने यांच्यासमोर निदर्शने करत फिरणाऱ्या या संपकऱ्यांचा मला आता अगदी वीट आला आहे. सरकार या सर्वांना तुरुंगात का डांबत नाही ? "

वरील वक्तव्य करणाऱ्या संतप्त महिलेला तिचा स्वतःचा इतिहास ठाऊक नव्हता. तिला वाटत होते की एका साध्या प्रश्नाला तिच्याकडे एक सोपा उपाय होता. पण तिला जे वाटत होते ते चुकीचे होते. तिने सुचवलेला उपाय पुन्हा पुन्हा अंमलात आणण्यात आला होता आणि त्यामुळे हा प्रश्न सुटत नाही असे आता ध्यानात आले होते. इंग्लंडमध्ये शंभर वर्षांपूर्वी एका दंडाधिकाऱ्याने संप मोडून काढण्याची स्वतःची योजना गृहखात्याला कळवली होती : " स्वतःचे काम सोडून निघालेल्या लोकांना अटक करून घाण्याला जुंपण्यात यावे अशी उपाययोजना मी सुचवतो. "

अगदी त्या महिलेने सुचवला तसाच उपाय होता तो—परंतु १८३० साली सुचवलेल्या त्या उपायाचा परिणाम काय झाला ? त्या महिलेलाच उत्तर देऊ द्या.

एकोणिसाव्या शतकातील तो दंडाधिकारी आणि विसाव्या शतकातील ती महिला या दोघांनाही एक गोष्ट कळत नाही की, फलक हातात घेऊन रस्त्यावर चालताना मजा वाटते म्हणून कामगार निदर्शने करतात किंवा कामगारांना काम करायचे नसते म्हणून ते संप करतात असे नव्हे. यामागची कारणे फार खोलवर रुजलेली आहेत. ती शोधून काढण्यासाठी आपल्याला इंग्लिश इतिहासाकडे वळले पाहिजे. कारण औद्योगिक क्रांती प्रथम त्या देशात झाली.

आकडेवारीचा उपयोग काहीही सिद्ध करण्यासाठी करता येतो ही गोष्ट तर सर्वश्रुतच आहे. परंतु ज्या काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती बाल्यावस्थेत होती, त्या काळच्या सत्यपरिस्थितीचे चित्र रंगवताना आकडेवारीने जेवढा खोटेपणा केला तेवढा तिने एरवी कधीच केला नसेल. आकड्यांच्या प्रत्येक तक्त्यामध्ये प्रचंड प्रगती दिसायची. कापूस, लोखंड, कोळसा आणि इतर क्रयवस्तूंचे उत्पादन दसपट झाले. विक्रीचे प्रमाण,

विक्रीची किंमत आणि मालकांचे नफे या सर्व गोष्टी गगनाला भिडल्या. ती आकडेवारी पाहून कोणाचेही डोळे आश्चर्याने विस्फारले जातील. गीतकारांनी त्यांच्या कवनांमध्ये वर्णन केलेला स्वर्गच इंग्लंडमध्ये अवतरल्याचा आभास होईल. तसा स्वर्ग अवतरला होताही—पण काही मूठभरांकरताच.

जनसामान्यांकरता मात्र तेथे नरकच अवतरला होता. कामगारांचे सुख आणि स्वास्थ्य या संदर्भात या आकडेवारीने धादांत खोट्या गोष्टी सांगितल्या. १८३५ साली प्रकाशित झालेल्या एका पुस्तकाच्या लेखकाने याकडे लक्ष वेधले होते : " दहा लाखांपेक्षा अधिक माणसे भुकेने तडफडत आहेत आणि त्यांची संख्या सतत वाढतच आहे... व्यापाराच्या इतिहासातील हा एक नवाच काळ उदयास आला आहे. सतत फोफावणारा व्यापार हा कष्टकरी वर्गाच्या जीवनमानात होणाऱ्या सुधारणेचा निदर्शक नसून त्यांची गरिबी आणि हलाखी यांचा निदर्शक आहे. अशा विचित्र काळामध्ये ग्रेट ब्रिटनने आता पदार्पण केले आहे. "

मंगळावरील कल्पित मानव जर कामाच्या गडबडीत असणाऱ्या इंग्लंडमध्ये अवतरला असता तर पृथ्वीचे सर्व रहिवासी वेडपट आहेत असे त्याला वाटले असते. कारण दिवसभर कष्टप्रद काम करून, डुकरांनाही राहण्यास अयोग्य अशा घाणेरड्या आणि कंगाल खोपट्यांमध्ये रात्री परत येणारे माणसांचे प्रचंड लोंढे त्याला एकीकडे दिसले असते, तर दुसरीकडे कामाने स्वतःचे हात कधीही खराब न करणारे, पण तरीही कामकरी जनतेच्या जीवनाचे नियंत्रण करण्यासाठी कायदे करणारे आणि आपापल्या राजवाड्यात राजाप्रमाणे राहाणारे मूठभर लोक त्याला दिसले असते.

वास्तविक पाहाता तेव्हा दोन इंग्लंड देश अस्तित्वात होते. डिझ्राएलीने त्याच्या ' सिबिल 'मध्ये यावर अचूक बोट ठेवले आहे : " ' ही दोन राष्ट्रे आहेत. या दोघांमध्ये कसलेही दळणवळण नाही आणि एकमेकांविषयी कसलीही सहानुभूती नाही. वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये किंवा वेगवेगळ्या ग्रहांवर राहात असल्याप्रमाणे एकमेकांच्या सवयी, विचार आणि भावना यांची त्यांना अजिबात जाण नाही. त्यांचे जन्म वेगवेगळ्या परिस्थितीत होतात, वेगवेगळ्या प्रकारचे अन्न ते भक्षण करतात. वेगवेगळ्या प्रकारच्या चाली रीतींनी त्यांचे जीवन चालते आणि त्यांच्यावर वेगवेगळ्या कायद्यांचे नियंत्रण असते.'

" ' म्हणजे तुम्ही कोणाबद्दल बोलत.... ' चाचरतच एग्रेमॉन्टनी विचारले.

' श्रीमंत आणि गरीब ' "

ही विभागणी काही नवी नव्हती. परंतु यंत्रसामुग्री आणि फॅक्टरीव्यवस्था आल्यामुळे ही विभाजनरेषा पूर्वी कधीही नव्हती एवढी स्पष्ट झाली. श्रीमंत अधिकच श्रीमंत झाले आणि उत्पादनसाधनांपासून विभक्त केल्यामुळे गरीब अधिकच गरीब झाले. पूर्वी साधारणपणे बरी मिळकत असलेल्या कारागिरांवर आता यंत्रोत्पादित वस्तूंच्या स्पर्धेमुळे विशेषच हलाखीची परिस्थिती ओढवली होती आणि ते कंगाल बनले होते. त्यांची

परिस्थिती किती भयानक होती याची कल्पना थॉमस हीथ या हातमाग चालवणाऱ्या विणकराच्या परिस्थितीवरून येते !

" **प्रश्न** : तुम्हाला मुले आहेत का ?

" **उत्तर** : नाही, मला दोन मुले होती. पण देवाच्या अगाध कृपेमुळे ती आता मरण पावली आहेत.

" **प्रश्न** : तुमच्या मुलांच्या मृत्यूबद्दल तुम्हांला समाधान वाटते का ?

" **उत्तर** : होय. त्याबद्दल मी देवाचे आभार मानतो. त्यांचे पालनपोषण करण्याच्या जबाबदारीतून मी सुटलो आहे आणि या जीवनाच्या कष्टांमधून त्या छोट्या जीवांची सुटका झाली आहे. "

दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची पाळी आल्याशिवाय माणूस अशा तऱ्हेने बोलणार नाही हे तर उघडच आहे.

यंत्राविरुद्ध तग धरून राहणे अशक्य बनल्यामुळे भुकेकंगाल अवस्थेमध्ये फॅक्टरीत प्रवेश करणाऱ्या लोकांची स्थिती काय होती ? त्याकाळच्या फॅक्टरीतल्या कामाची परिस्थिती काय होती ?

कामाचे कष्ट हलके करणे शक्य असलेल्या नव्या यंत्रसामुग्रीने कष्टांचे प्रमाण उलट अधिकच वाढवले. या यंत्रांची कार्यक्षमता प्रचंड होती व त्यांचा जास्तीत जास्त प्रमाणात वापर करण्यात आला. कारखानदारांच्या दृष्टीने ती यंत्रे म्हणजे भले मोठे भांडवल होते. त्या भांडवलाचा वापर व्हायचा असेल तर यंत्रे अविरतपणे चालू ठेवली पाहिजेत हे त्यांना ठाऊक होते. शिवाय हुषार कारखानदार हेही जाणून होते की यंत्रांमधून जेवढे मिळवायचे आहे ते लवकरात लवकर मिळवले पाहिजे, कारण एखादा नवा शोध लागून ती यंत्रे लवकरच कालबाह्य होणार होती. म्हणूनच कामाचे तास जास्त होते. १६ तासांचा कामाचा दिवस ही अशक्य कोटीतील गोष्ट नव्हती. अखेर बारा तासांच्या दोन पाळ्या मिळवण्यात कामगारांना यश आले तेव्हा त्यांना मोठाच दिलासा मिळाला.

पण केवळ कामाचे तासच जास्त असने तर ती तितकीशी वाईट गोष्ट नव्हती. कामगारांना त्याची सवय होती. घरगुती उत्पादनव्यवस्थेत स्वतःच्या घरामध्ये प्रदीर्घ काळ काम करण्याची त्यांना सवय होती. परंतु फॅक्टरींमधील शिस्तीची सवय लावून घेणे त्यांना फारच जाचक ठरू लागले. एका विशिष्ट वेळेला सुरुवात करायची, एका विशिष्ट वेळेला थांबायचे, पुन्हा सुरुवात करायची आणि यंत्राच्या हालचालीबरोबर आपला वेग कायम ठेवायचा. सतत मुकादमाच्या कडक देखरेखीखाली आणि अधिपत्याखाली राबायचे. हे सगळे नवे होते आणि अतिशय कष्टदायी होते.

मॅन्चेस्टरजवळील एका गिरणीमध्ये सूत कामगारांना ८०° ते ८४° तपमानात पाणी प्यायलाही कधी बाहेर न जाता दिवसाकाठी १४ तास काम करावे लागे. या नियमांचे पालन न केल्यास त्यांना पुढील दंड होई :

तक्ता ९

कारण	दंड
खिडकी उघडी ठेवल्यास	१ शिलिंग
काम खराब केल्यास	१ शिलिंग
स्वतःचे हातपाय स्वच्छ केल्यास	१ शिलिंग
गॅस पेटलेला असताना आपले यंत्र दुरुस्त केल्यास	२ शिलिंग्ज
सकाळचा बराच वेळ दिवाबत्ती चालू ठेवून काम केल्यास	२ शिलिंग्ज
शिटी वाजवल्यास	१ शिलिंग

हा प्रकार चमत्कारिक वाटेल, परंतु तो खरोखरच अस्तित्वात होता आणि तो काही अपवादात्मक नव्हता. (सुमारे पन्नास वर्षांपूर्वी भारतामधील कोळशाच्या खाणींमध्ये किंवा चहाच्या मळ्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची परिस्थिती औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीला या कामगारांनी अनुभवली होती.)

आमच्या मालकीच्या गोष्टींचे आम्ही काय वाटेल ते करू असे भांडवलदारांना वाटे. त्यांची यंत्रे आणि त्यांचे मजूर यात ते मुळीच फरक करत नसत. पण हेही तितकेसे खरे नाही, कारण यंत्रांवर आधीच पैसा खर्च केलेला असे. मजुरांना मात्र काम केल्यावर पैसे देण्यात येत. मजुरांना सुस्थितीत ठेवण्यापेक्षा यंत्रांना सुस्थितीत ठेवण्याची ते काळजी घेत.

ते कमीत कमीत मजुरी देत. बाजारपेठेमध्ये जितकी कमी किंमत देऊन श्रमशक्ती विकत घेणे शक्य होते तितकी कमी किंमत ते देत. स्त्रिया आणि मुले यंत्रांवर काम करू शकत आणि त्यांचे मजुरीचे दर कमी होते. म्हणून बऱ्याच कुटुंबातील स्त्रिया आणि मुले यांना फॅक्टरीमध्ये काम मिळे, तर घरातील पुरुष बेकार असत. सुरुवातीच्या काळात, कारखानदार गरीब, अनाथ मुलांना त्यांच्या पालकांकडून कामासाठी विकत घेणे सर्वात अधिक पसंत करत. नंतरच्या काळात काम करणाऱ्या आईबापांची मजुरी परिवाराचे पोट भरण्यासाठी अपुरी पडत असल्याने, घरामध्ये राहणाऱ्या मुलांना गिरण्या आणि खाणी यांमध्ये कामासाठी राबवण्यावर पालकांचा भर असे. औद्योगिकीकरणाची भयानकता इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा त्या काळच्या बालकामगारांबद्दलच्या माहितीपत्रांमध्ये दिसून येते.

एका कापडगिरणीतील शिकाऊ कामगारांवर अधिकारी म्हणून काम करणाऱ्या जॉन मॉस यांनी गिरणीमध्ये जबरदस्तीने कामाला लावलेल्या धर्मग्रामातील मुलांबद्दल १८१६ साली लोकसभेच्या एका समितीसमोर खालील पुरावा सादर केला :

“ शिकाऊ कामगार म्हणून धर्मग्रामातील मुलांना कामावर ठेवले होते का ? — होय तेथील लहान मुलेच शिकाऊ कामगार होती.

“ वयाच्या कितव्या वर्षी त्यांना कामावर ठेवण्यात आले ? — लंडनहून आणलेली मुले ७ ते ११ वर्षे वयाची होती तर लिव्हरपूलमधून आणलेली मुले ८ किंवा १० ते १५ वर्षांची होती.

" त्यांना किती वर्षांपर्यंत शिक्षण देण्यात येत होते ? — २१ वर्षांपर्यंत.

" कामाचे तास काय होते ? — सकाळी ५ ते रात्री ८.

" दिवसाकाठी १५ तास हे कामाचे नियमित तास होते का ? — होय.

" जेव्हा गिरणीच्या दुरुस्तीसाठी किंवा पुरेसा कापूस नाही म्हणून काम बंद ठेवण्यात येत असे त्याची भरपाई मुलें करत का ? — होय.

" काम करत असताना मुले बसलेली असत की उभी असत ?— उभी असत.

" संपूर्ण दिवसभर ? — होय.

" गिरणीमध्ये बसायची काही सोय होती का ? — नाही. झोपायची वेळ झालेली असतानाही मी त्यांना अनेकदा गिरणीमध्ये काम करताना पाहिले आहे.

" यंत्रांमुळे मुलांना दुखापत होत असे का ? — अनेकदा. "

१८३३ साली पुन्हा एकदा राजाच्या अधिकाऱ्यांनी कारखान्यांमध्ये मुलांना कामावर ठेवण्याबद्दल एक अहवाल सादर केला. त्या अहवालामध्ये (आपल्या भावाच्या मदतीने) तुकडे उचलण्याचे काम करणाऱ्या, आठवड्याकाठी ४ शिलिंग्ज मिळवणाऱ्या ११ वर्षांच्या थॉमस क्लार्क या मुलाची साक्ष आहे. त्याच्या हकिगतीतील हा काही भाग : " आम्हाला झोप लागल्यास माझ्या आंगठ्याएवढा जाड दोरखंड घेऊन, तो दुहेरी करून, त्याला गाठ मारून, त्या दोरखंडाने आम्हाला झोडपून काढण्यात येई... सकाळी ६ वाजण्यापूर्वी—कित्येक वेळा ५ वाजताच—मी कारखान्यात जाई आणि रात्री ९ वाजेपर्यंत काम करी...एकदा तर मी अख्खी रात्र काम केले...आम्हीच तसे काम करायचे ठरवले, कारण आम्हाला खर्चासाठी थोडेसे जास्त पैसे हवे होते. त्याआधीच्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून आम्ही काम करत होतो, आणि सतत दुसऱ्या रात्री सतत ९ वाजेपर्यंत काम करत राहिलो...एखाद्या दोरखंडावरून चालल्यासारखी माझी स्थिती झाली आहे...मला जेमतेम ४ शिलिंग्ज मिळू शकतात... माझा भाऊदेखील माझ्यासाठी काम करतो. तो केवळ ७ वर्षांचा आहे. मी त्याला एक छदामही देत नाही... तो माझा भाऊ नसता तर त्याला आठवड्यामागे १ शिलिंग देणे मला भागच पडले असते... माझ्याबरोबरच सकाळी ६ वाजता मी त्याला नेतो आणि रात्री ८ वाजेपर्यंत ठेवतो. "

लहान मुलांनी श्रम करणे ही काही नवी गोष्ट नव्हती हे लक्षात घ्या. दहाव्या प्रकरणातील गृहोद्योगांचे डेफो यानी केलेले वर्णन आपल्याला परिचितच आहे. पूर्वी आई-वडिलांच्या श्रमाला पूरक म्हणून लहान मुलांचे काम असे. परंतु हे श्रम म्हणजे या नव्या व्यवस्थेचा पायाच झाले होते. पूर्वी मुले आईबापांच्या नजरेखाली घरामध्येच काम करत आणि त्यांच्या कामाचे तास आणि पद्धत आईबापांनी ठरवलेली असे. परंतु आता एका मुकादमाच्या नजरेखाली ती कारखान्यात काम करीत होती. मुकादम त्यांच्या लहानग्या शरिरांमधून किती काम पिळून काढू शकतो यावर त्या मुकादमाची नोकरी अवलंबून होती. नफ्याला लालचावलेल्या कारखानदाराने त्या कारखान्यातील कामाची पद्धत आणि तास **निश्चित** केले होते. लहानग्या मुलांना इतके तास काम

करताना पाहून, वेस्ट इंडिजमधील गुलामांच्या मालकालादेखील आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नसे. ब्रॅडफोर्डमधील तीन गिरणीमालकांशी झालेल्या बोलण्यात त्यांच्यापैकी एकजण म्हणतो : " गुलामांचा मालक असल्यामुळे मला नेहमीच स्वतःची लाज वाटत आली आहे. परंतु ९ वर्षांच्या मुलांकडून दिवसाकाठी साडेबारा तास काम करून घेण्याइतका – आणि ही तुमच्याकडची नियमित पद्धत आहे हे तुम्हीच मान्य करता – क्रूरपणा दाखवणारा कोणी माणूस असेल असे वेस्ट इंडिजमधील आम्हा लोकांना कधीही वाटले नव्हते. "

या गुलामांच्या मालकाला आणखी एक तुलना करता येणे शक्य होते. वेस्ट इंडिज आणि अमेरिकेच्या दक्षिण भागातील राज्ये या ठिकाणच्या गुलामांच्या वस्त्यांची परिस्थिती हलाखीची असली तरीही, काही दृष्टींनी विचार करता, नव्या कारखानदारी शहरांमधील कामगारांच्या घरांपेक्षा ती अधिक वाईट नव्हती असा युक्तिवादही तो करू शकला असता. वाफेची शक्ती उपयोगात आल्यानंतर कारखान्यांच्या जागा जलशक्ती उपलब्ध असलेल्या ठिकाणांजवळच असण्याची गरज राहिली नव्हती. उद्योगधंदे कोळशाच्या खाणींजवळ सरकले आणि जवळपास एका रात्रीतच कोणाच्या खिजगणतीतही नसलेल्या जागांची नगरे बनली आणि जुन्या नगरांची शहरे बनली. १७७० साली इंग्लंडची ग्रामीण लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ४०% होती. तर १८४९ साली ती २६% झाली होती. शहरांच्या वाढीच्या आकडेवारीवरून काय घडत होते याची आपल्याला कल्पना येते.

तक्ता १०

	१८०१	१८४१
मँचेस्टर	३५,०००	३,५३,०००
लीड्स	५३,०००	१,५२,०००
बर्मिंगहॅम	२३,०००	१,८१,०००
शेफील्ड	४६,०००	१,११,०००

या सुप्रसिद्ध ठिकाणी सुप्रसिद्ध वस्तू तयार होत. अंधाऱ्या, दाटीवाटीच्या, घाणेरड्या व आरोग्यास अपायकारक अशा वस्त्यांध्ये राहणाऱ्या कामगारांनी तयार केलेल्या वस्तू ! १८३७ साली नास्सो सिनियर या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाने मँचेस्टरच्या एका भागातून एकदा फेरफटका मारला. त्यांना दिसलेल्या परिस्थितीचे त्यांनी वर्णन केले : " ही शहरे—केवळ व्याप्ती आणि रहिवाश्यांच्या संख्येवरून यांना शहरे म्हणायचे—सट्टेबाज ठेकेदारांचा तात्कालिक फायदा सोडता इतर सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून उभी करण्यात आली आहेत.... एका जागी एका प्रचंड खड्डयामधून जाणारा संपूर्ण रस्ताच आम्हाला दिसला. जास्त खोदकाम न करता गाळे उभारणे येथे शक्य असल्यामुळे तसे करण्यात आले होते. वस्तू किंवा कचरा साठवण्यासाठी हे गाळे नव्हते तर, माणसांनी राहण्यासाठी होते.

या रस्त्यावरील एकही घर कॉलऱ्यामधून सुटलेले नाही सर्वसाधारणपणे या उपनगरातील वस्त्यांना पदपथ नाहीत, रस्त्याच्या मध्यभागीच शेणाचे ढीग पडलेले असतात. पाठीला पाठ लावून घरे बांधण्यात आली आहेत. या घरांना खेळती हवा नाही की सांडपाण्याची सोय नाही. एकाच छपराखाली वेगवेगळ्या कोनाड्यांमध्ये वेगवेगळी कुटुंबे राहातात "

वरील उताऱ्यातील ठळक अक्षरामध्ये लिहिलेल्या वाक्याकडे नीट लक्ष द्या. अशा प्रकारच्या घरांमध्ये राहाण्याची पाळी आलेल्या गरीब लोकांच्या आरोग्यावर या परिस्थितीचा काय परिणाम झाला असेल हे उघडच आहे. आरोग्यास अपायकारक अशा या वस्त्यांमध्ये राहाण्याचे दुर्भाग्य ओढवलेल्या गरिबांचे जीवन रोगराई आणि मृत्यू यांनी घेरले गेले. नगराच्या दुसऱ्या भागामध्ये राहाणारा माणूस नशीबवान असे-कारण, माणूस कोणत्या भागात राहातो यावर त्याची आयुर्मर्यादा अवलंबून होती. १८४४ साली मँचेस्टरच्या एका उपनगरात केलेल्या पाहणीवरून डॉ. पी. एच. हॉलंड यांनी तयार केलेला एक अहवाल सांगतो : " काही रस्त्यांवरील घरांमध्ये मृत्यूचे प्रमाण, इतर काही रस्त्यांवरील घरांच्या चौपट असल्याचे आढळून आले. रस्त्यांच्या काही विशिष्ट गटांमध्ये हे प्रमाण दुसऱ्या काही गटांच्या दुप्पट असल्याचे दिसून आले. मृत्यूंचे प्रमाण जास्त असलेल्या विभागातील रस्ते वाईट स्थितीत असून मृत्यूंचे प्रमाण कमी असलेल्या विभागातील रस्त्यांची स्थिती चांगली असल्याचे आढळते. म्हणून, अत्यावश्यक खबरदारी न घेतल्यामुळेच आपले लगतचे शेजारी हजारोंच्या संख्येने प्रतिवर्षी मृत्यूच्या खाईत ढकलले जात आहेत असा निष्कर्ष काढणे अटळ बनते. "

आपले " लगतचे शेजारी " मृत्युमुखी पडल्याबद्दल श्रीमंतांना, त्या दुसऱ्या राष्ट्राला काय वाटत होते ? कारखान्यांमधील परिस्थिती, कामाचे जास्त तास, बालकामगार याबद्दल सुखवस्तू लोकांची वृत्ती काय होती ? त्यांच्यापैकी बहुतेक जण यासंबंधी विचारच करत नसत; आणि कधीमधी केलाच तर हे सर्व अटळच आहे असे म्हणून स्वतःचे समाधान करून घेत. " समाजामध्ये नेहमीच गरीब लोक असतात, " असे बायबलनेच सांगितलेले नाही का ? अर्थात, इतर माणसांबरोबर आपले संबंध कसे असावेत या विषयी बायबलने सांगितलेल्या गोष्टींकडे ते सोईस्करपणे दुर्लक्ष करत. स्वतःचा मतलब ज्यामुळे साधेल तेवढ्याच गोष्टी ते वाचत आणि ऐकत.

म्हणूनच, ज्या गोष्टींमुळे तुमच्या–आमच्या अंगावर काटा उभा राहील अशा गोष्टी त्या काळच्या श्रीमंतांना यथायोग्यच वाटत. शाळेमध्ये न जाता दिवसाकाठी १४ तास काम करणे मुलांना अपायकारक होते का ? किती मूर्खासारखा प्रश्न आहे हा ! मुलां-करता सकाळी ६ ते रात्री ८ असे कामाचे तास असणाऱ्या एका कापडगिरणीतील जी. ए. ली या सद्गृहस्थांचे असे म्हणणे होते : " उच्च नीतिमत्ता राखण्यासाठी कामसूपणा आणि नियमितपणा या सवयी लहानपणापासूनच अंगी बाणवण्यापेक्षा दुसरी कोणती गोष्ट अधिक उपयुक्त असू शकेल ? "

गरिबांच्या नीतिमत्तेबद्दल श्री. ली यांना फार काळजी होती. तसेच रॉयल सोसायटीचे अध्यक्ष श्री. गिडी यांनाही फार काळजी होती. कामगारवर्गातील मुलांकरता प्राथमिक शाळा काढण्यास त्यांचा विरोध होता. श्री. गिडी यांचा गंमतीदार युक्तिवाद पहा : " गरीब कष्टकरी वर्गातील मुलांना शिक्षण दिल्याने त्यांची नीतिमत्ता आणि सुख-समाधान यांना धोका उत्पन्न होईल. समाजातील त्यांच्या स्थानामुळे शेती आणि इतर कष्टप्रद कामे करणारे इमानदार नोकर होण्याऐवजी, आयुष्यात स्वतःच्या वाट्याला आलेल्या दैन्याचा ते तिरस्कार करू लागतील...त्यामुळे विद्रोहाची शिकवण देणाऱ्या पुस्तिका ते वाचू शकतील...आणि आपल्या वरिष्ठांशी ते उर्मटपणे वागू लागतील."

परंतु त्या काळच्या आणखी एका साक्षीदारावर विश्वास ठेवायचा तर आपल्या वाट्याला आलेल्या परिस्थितीचा तिरस्कार करणे तर सोडाच पण उलट त्याबद्दल उपकृतपणाचीच भावना गरिबांमध्ये असणे योग्य होते. कारखानदारी व्यवस्था हे मानवजातीला मिळालेले वरदानच होते. अशा व्यवस्थेचा भाग असलेले ते गरीब लोक खरोखरच मोठे नशीबवान होते. किमानपक्षी ॲण्ड्र्यू उर यांना तरी तसेच वाटत होते. त्यांनी १८३५ साली स्वतःच्या सफरीसंबंधी पुढील नोंद केली आहे : " माझ्या अलीकडच्याच सफरीमध्ये म्हातारे, तरुण, मध्यवयीन असे हजारो स्त्री-पुरुष मी पाहिले. त्यांची खायची-प्यायची अगदी चंगळ आहे, त्यांना कपडालत्त्याची ददातच नाही आणि उन्हाळ्यात सूर्यापासून व हिवाळ्यात बर्फापासून चांगले संरक्षण मिळेल अशा घरांमध्ये ते राहातात. आपल्या उच्च वर्गातील लोक राहणार नाहीत अशा खेळत्या हवेच्या, आरोग्यदायी वातावरणात हे लोक राहातात...किंमत, उपयुक्तता आणि बांध-कामातील कौशल्य याबाबतीत आशियाई, इजिप्शियन आणि रोमन साम्राज्यांमधील वास्तुशिल्पांना लाज वाटायला लावतील अशा अनेक भव्य इमारती येथे आहेत अशी आहे फॅक्टरीव्यवस्था. "

डॉ. उर कारखान्यांच्या सफरीवर गेले होते, ते कारखान्यामध्ये काम करत नव्हते हे लक्षात घेणे जरुरीचे आहे.

डॉ. उर यांनी कारखान्यांची स्तुतिस्तोत्रे गायला सुरुवात करण्यापूर्वी कैक वर्षे आधी दैन्यावस्थेतील गरिबांना मदत करायला आणि दिलासा द्यायला चर्चचा एक उपदेशक पुढे सरसावला. तो कोणी साधासुधा उपदेशक नव्हता—खुद्द आर्चडीकन पॅले यांनीच ते काम अंगावर घेतले. कामगारवर्गातील असंतुष्ट लोकांना त्यांची परिस्थिती वाईट आहे आणि श्रीमंतांची चांगली आहे असे वाटे. तेव्हा त्यांना त्यांची स्थिती आल्हाददायक वाटावी यासाठी प्रसिद्ध धर्ममार्तंड उपदेश करीत : " दारिद्र्यामुळे करावी लागणारी कामे म्हणजे हालअपेष्टा नसून सुखावह गोष्टी आहेत. काटकसर सुखावहच असते. अत्यंत काळजीपूर्वक घडवलेली ही करामत असून त्यामुळे मनाला समाधान मिळते सगळ्या गोष्टींची मुबलकता झाली की हे समाधान नष्ट होते. प्रचंड अगणित संपत्तीमधून थोडेफार काढून घेण्यात काय मजा आहे ?...नीच सामाजिक स्थानावरील माणसांना असलेला आणखी एक फायदा म्हणजे त्यांच्या मुलांकरता हव्या असलेल्या गोष्टी ते

अगदी सहजपणे पुरवू शकतात. गरिबांच्या मुलांना आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी दोन शब्दात सांगता येतात, " कामसूपणा आणि निष्पाप वृत्ती. "

एवढे सांगितल्यावरही गरिबी ही खरोखरच सुखावह गोष्ट असते यावर अविश्वास दाखवण्याचा आडमुठेपणा करणाऱ्या काही मूर्ख लोकांसाठी आर्चडीकन पॅले यांच्या भात्यांमध्ये आणखी एक तीर होता. श्रीमंत लोक आराम करतात याचा गरिबांना राग येई. किती मूर्खपणा आहे हा ! वास्तविक पाहाता, श्रीमंतांनाच गरिबांचा मत्सर वाटतो– कारण भरपूर काम केल्यानंतरच विश्रांती सुखावह असते. आर्चडीकन यांचा युक्तिवाद पहा : " श्रीमंतांच्या ज्या आणखी एका गोष्टीचा गरिबांना मत्सर वाटतो ती गोष्ट म्हणजे त्यांचा आराम. ही त्यांची भूमिका अगदीच चुकीची आहे....विश्रांती म्हणजे श्रम काही काळ थांबवणे. ज्यांना कधी थकवाच आलेला नाही त्यांना विश्रांतीचा अर्थ कसा काय कळणार ? आणि त्यातून त्यांना आनंद कसा मिळणार ? विश्रांतीमुळे गरिबांना जो उत्साह येतो आणि जे सुख मिळते त्याचा श्रीमंत लोक मत्सर करतात ते उगीच नव्हे ! "

आर्चडीकन पॅले यांनी हा दिलासादायक उपदेश १७९३ साली केला. याच काळात फ्रान्समधील गरीब लोक समाजातील प्रस्थापितांचे तख्त उलथून टाकण्याचा प्रयत्न करत होते हे आपण पाहिलेच आहे. फ्रेंच राज्यक्रांती हा रक्तपाताचा मामला होता. इंग्लंडमधील श्रीमंतांना काही तो आवडला नाही. " त्यांचे मुंडके उडवून टाका ! " ही भयानक फ्रेंच कल्पना खाडी पार करून इंग्लंडमधील तळागाळातल्या लोकांना फूस लावील या विचारानेच श्रीमंतांच्या अंगावर काटा उभा राही. म्हणूनच गरिबांना हितचिंतक असलेल्या या आर्चडीकनने, इंग्लंडमधील भडक मार्गाने काही उपद्व्याप करू पाहणाऱ्या गरीब लोकांना इशारा दिला : " फक्त धीम्या आणि पुरोगामी बदला करताच आपण झटले पाहिजे ... यशस्वी उद्योगधंद्यांचे नैसर्गिक फळ म्हणूनच असा बदल घडू शकतो ... आणि अशा गोष्टींची अपेक्षा सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था असतानाच करता येते; दुसऱ्या कोणत्याही परिस्थितीत ते शक्य नाही ... श्रीमंतांचे सामाजिक स्थान आणि धनसंपत्ती यांची अभिलाषा धरणे आणि सामाजिक उठाव व गोंधळ निर्माण करून बळाच्या जोरावर या गोष्टी हस्तगत करण्याची मनीषा बाळगणे हा केवळ दुष्टपणाच नव्हे तर मूर्खपणाही आहे. "

इंग्लंडमधील गरीब लोकांनी या उपदेशकाचा सल्ला ऐकला. त्यांनी " श्रीमंतांची संपत्ती हिसकावून घेतली नाही. " परंतु बदलत्या काळाबरोबर " यशस्वी उद्योगधंद्यांचे नैसर्गिक फळ असलेल्या " ज्या " धीम्या आणि पुरोगामी बदलाचे " त्यानी आश्वासन दिले होते त्या बदलाची लोक वाट पाहू लागले. परंतु तो बदल झाला नाही, म्हणून त्यांनी त्यासाठी लढा उभारला.

उदाहरणार्थ, कामाचे तास कमी व्हावेत म्हणून त्यांनी लढा दिला. १४ ते १६ तासांचा दिवस हा फारच मोठा आहे हे मान्य असणाऱ्या, थोडीफार माणुसकी शिल्लक असलेल्या श्रीमंतांनादेखील या लढ्यामध्ये त्यांनी साथ दिली. यापैकी काही श्रीमंत लोकांनी हा प्रश्न लोकसभेमध्ये नेला. दिवसाचे कामाचे तास १० तासापर्यंत मर्यादित

करावे याला पाठिंबा देणारी भाषणे त्यांनी केली. या गोष्टीचा डॉ. उरसारख्या अनेक लोकांना भयंकर राग आला. एका गंमतीदार कारणामुळे डॉ. उरना संताप अनावर झाला :

"कारागिरांच्या कोणत्याही वर्गाला १० तासांपेक्षा जास्त काम करावे लागू नये, यासाठी ब्रिटिश लोकसभेतील ९३ सभासदांनी मतदान करावे ही गोष्ट कोणाही निःपक्ष-पाती माणसाला आश्चर्यकारकच वाटेल.

"त्या कारागिराच्या स्वातंत्र्यामध्ये केलेली ही ढवळाढवळ खिश्चन जगातील इतर कोणत्याही कायदेमंडळाने क्षणभरही सहन केली नसती. ग्लूस्टरशायरच्या उद्योजकांनी, हे विधेयक 'काळ्याकुट्ट कालखंडाचे प्रतिनिधित्व' करणारे आहे असे म्हटले ते चुकीचे नाही."

आर्चडीकनप्रमाणे डॉ. उर देखील कामगारांचे मित्रच होते. म्हणूनच, मालकाच्या इच्छेप्रमाणे हवा तितका वेळ काम करण्याच्या कामगाराच्या स्वातंत्र्यामध्ये ढवळाढवळ करणाऱ्या या विधेयकावर डॉ. उर आणि ग्लूस्टरशायरचे उद्योजक संतप्त झाले! मरेपर्यंत काम करण्याचा इंग्लिश माणसाचा जन्मसिद्ध हक्क लोकसभेने त्यांच्यापासून काढून घेतला तर त्याच्या ऐतिहासिक स्वातंत्र्याचे काय होईल, असा गहन प्रश्न त्यांना भेडसावू लागला!

कामाचे तास मर्यादित करणे ही माणसाच्या नैसर्गिक स्वातंत्र्यामध्ये केलेली ढवळा-ढवळ आहे हा युक्तिवाद फार महत्त्वाचा होता. अमेरिका आणि इंग्लंड या देशांमध्ये याचा पुन्हा पुन्हा उपयोग करण्यात आला. खुल्या व्यवहाराचे तत्त्व मांडणाऱ्या ॲडम स्मिथ या महान अर्थतज्ज्ञाकडून उद्योजकांनी हा युक्तिवाद उचलला होता. (आता यातील गंमतीदार प्रकार म्हणजे कामाच्या तासांच्या बाबतीत स्वतःच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली होत असल्याबद्दल कामगारांनी कधीच हरकत घेतली नाही.) व्यापारवादाच्या जाचक धोरणांना कडाडून विरोध करणारे ॲडम स्मिथ कोणत्याही प्रकारच्या ढवळाढवळीच्या विरोधात उभे ठाकले होते. त्यांच्या 'द वेल्थ ऑफ नेशन्स' (राष्ट्रांची संपत्ती) या पुस्तकामधून त्या काळचे उद्योजक असे उतारे देऊ शकत : "इतर सर्व प्रकारच्या संपत्तीचा मूलाधार असलेल्या श्रमसंपत्तीवरील प्रत्येक माणसाचा हक्क हा सर्वात पवित्र असल्याने तो अबाधित राखला पाहिजे. गरीब माणसाच्या हातामधील ताकद आणि कौशल्य यांमध्येच त्याची मिळकत असते. आपल्या शेजाऱ्याला कोणताही धोका उत्पन्न न करता, स्वतःला योग्य वाटेल त्या पद्धतीने ही ताकद आणि कौशल्ये वापरण्यास त्याला अडथळे निर्माण करणे म्हणजे त्या अत्यंत पवित्र संपत्तीवरील हक्काची सरळसरळ पायमल्ली करण्यासारखेच आहे. एखाद्या माणसाला नोकरीस ठेवणे योग्य आहे किंवा नाही ह्याचा निर्णय मालकांकडे सोपवण्यात यावा, कारण त्याच्या योग्ययोग्यतेशी मालकांचे हितसंबंध निगडीत आहेत."

अर्थात, व्यापारवादी नियमन आणि निर्बंध यांच्या विरोधात ॲडम स्मिथ यांनी हा युक्तिवाद केला होता. १७७६ साली एका वेगळ्या प्रकारच्या नियमनाविरुद्ध लढण्यासाठी लिहिलेल्या या उताऱ्यामध्ये स्वतःचा मीठमसाला भरण्याचा प्रयत्न ते उद्योजक करत होते असेही म्हणता येईल. क्षणभर धरून चालू की स्मिथ यांच्या पुस्तकातून त्यांनी उतां

देणे योग्य होते. परंतु स्मिथ यांनी ज्या गोष्टी उद्योजकांच्या हितसंबंधांच्या विरोधात मांडल्या होत्या त्या सोयिस्कररित्या विसरून जाणे हे मात्र बरोबर नव्हते. स्वतःच्या कृत्यांना रंगसफेदी चढवणारे उतारे स्मिथ यांच्या पुस्तकातून उचलायचे आणि त्या कृत्यांना काळिमा फासणारे उतारे तेवढे सोडून द्यायचे ही संवय राज्यकर्त्यावर्गाला अतिशय उपयुक्त ठरली—आणि कामगारवर्गाला अनर्थकारक ठरली. शंभर वर्षे उलटल्यानंतरही हा प्रकार चालूच राहिला.

स्वतःचे जीवन सुधारण्यासाठी कामगार काय करू शकत होते? तुम्ही काय केले असते? समजा, हातमागावर गरम कपडे विणणारा विणकर म्हणून काम करून तुम्हाला पोटापाण्याची बऱ्यापैकी सोय करता येत होती. समजा, तुमच्या डोळ्यादेखत एक गिरणी उभी राहिली आणि त्यातील यंत्रांनी अतिशय कमी किंमतीत प्रचंड प्रमाणात गरम कपड्यांच्या उत्पादनाला सुरुवात केली आणि त्यामुळे तुमचे जिणे हळुहळू खडतर बनून अखेर भुकेने मरायला टेकण्याची तुमच्यावर पाळी आली. अशा वेळेला ती यंत्रे येण्यापूर्वीच्या दिवसांची तुम्हांला आठवण येईल. आणि साधारण पोट भरता येणे शक्य असलेले ते दिवस म्हणजे चैनीचे जीवन होते असे तुम्हाला तुमच्या दिवास्वप्नांमध्ये वाटू लागेल. मग आजचे गरिबीचे जिणे तुम्हाला असह्य होईल. याचे कारण काय? यापूर्वी हजारो वेळा विचारलेला हा प्रश्न तुम्ही स्वतःला पुनः पुन्हा विचाराल आणि प्रत्येक वेळी याच निष्कर्षावर येऊन ठेपाल—नवी यंत्रसामुग्री. ह्या नव्या यंत्रांमुळे माणसे बेकार झाली आणि वस्तूंच्या किंमती खाली उतरल्या. ही यंत्रेच आपली वैरी आहेत.

जेव्हा जगणे असह्य झालेली माणसे या निष्कर्षाप्रत पोहोचतात तेव्हा पुढचे पाऊल ठरलेलेच असते.

यंत्रांची मोडतोड.

लेस-फ्रेम्स, होजियरी फ्रेम्स, यंत्रमाग, सूत कातण्याची यंत्रे जी जी यंत्रे वेगवेगळ्या कामगारांना त्यांचे दैन्य आणि दुरावस्था यांचे कारण वाटली ती ती सर्व यंत्रे मोडून किंवा जाळून टाकण्यात आली. 'लुड्डाईट्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या यंत्रे तोडणाऱ्या कामगारांना यंत्राविरूद्ध झगडून आपण एका चांगल्या जीवनमानासाठी झगडत आहोत असे वाटत असे. खालील प्रकारची गाणी गात यंत्रांची मोडतोड करताना यंत्रांबद्दलच्या त्यांच्या दबलेल्या द्वेषभावनेला बाहेर पडण्यास वाव मिळत असे :

फेरामध्ये उभे राहुनी
आण आम्ही घेऊ
फोडू आम्ही कमान चिडवया
गिरण पेटवून देऊ

अशा हिंसाचाराचे परिणाम काय असतात याची आपल्याला सहज कल्पना करता येईल. कामगारांच्या हिंसक जमावांनी संपत्तीचा नाश केला आणि यंत्रांचे तुकडे-तुकडे केले. अर्थातच त्या यंत्रांच्या मालकांनी झटपट पावले उचलली. त्यांनी कायद्याचा आधार घेतला आणि त्यांना मदत करण्यास कायद्याने जराही विलंब केला नाही. १८१२

साली यंत्रांची मोडतोड करणाऱ्यास मृत्यूची शिक्षा ठोठावणारे विधेयक लोकसभेने मंजूर केले. परंतु हे विधेयक मंजूर होण्यापूर्वी, त्यावर झालेल्या चर्चेमध्ये 'हाऊस ऑफ लॉर्डस'च्या एका सभासदाने या विधेयकाला विरोध करणारे एकमेव भाषण केले. माणसांचा विनाशच यंत्रांच्या मोडतोडीला प्रामुख्याने कारणीभूत झाला असल्याची त्याने सभासदांना आठवण करून दिली : "मोडतोडीचे हे प्रकार धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचले आहेत हे जरी खरे असले तरीही त्यांचा उद्‌भव गरिबांच्या न भूतो न भविष्यति अशा दुरावस्थेमधून झाला आहे हे नाकारता येणार नाही. या दीनदुबळ्या माणसांचा त्यांच्या कृत्यांबद्दलचा नेट पाहता हे लक्षात येते की भुकेचा राक्षस त्यांच्या पोटात खवळून उठल्याशिवाय, एकेकाळचे हे प्रामाणिक आणि उद्योगी लोक, स्वतःला, स्वतःच्या कुटुंबाला आणि स्वतःच्या समाजाला इतकी धोकादायक ठरणारी कृत्ये करण्यास उद्युक्त झाले नसते... कारागिरांचे त्यांच्या व्यवसायातून उच्चाटन करून कामगाराला कस्पटासमान बनवणाऱ्या यांत्रिकी सुधारणा केवळ मूठभर लोकांची श्रीमंती वाढवतात. परंतु मूठभरांची श्रीमंती वाढवण्यापेक्षा उद्योगी गरिबांचे जीवनमान उंचावणे अधिक महत्त्वाचे आहे असे या वेड्या लोकांना मनापासून वाटते

"तुम्ही या जमावातील लोकांना अविचारी, घातक आणि अज्ञानी समजता ... पण या लोकांबद्दलची आपली काही कर्तव्ये आहेत हे आपल्याला ठाऊक आहे का? हेच लोक आपल्या शेतांमध्ये काम करतात, आपल्या घरांमध्ये मोलमजुरी करतात, याच लोकांमधून तुमच्या आरमारामध्ये आणि सैन्यामध्ये भरती केली जाते, त्यांच्याच जोरावर तुम्ही सगळ्या जगाला धाब्यावर बसवता. परंतु दैन्यावस्था आणि संकटावस्था यामुळे दारुण निराशेने घेरलेले हे लोक तुम्हालाच धाब्यावर बसवू शकतात."

२७ फेब्रुवारी १८१२ रोजी हे भाषण करणाऱ्या त्या माणसाचे नाव होते लॉर्ड बायरन.

यंत्रांची मोडतोड करणे हा काही शहाणपणाचा उद्योग नव्हता. तो यशस्वी झाला असता तरीदेखील कामगारांचे प्रश्न त्यामुळे सुटले नसते. साप साप म्हणून भुई धोपटण्याचाच तो प्रकार होता. यंत्र नव्हे तर यंत्राचा मालक हे त्यांच्या दुःखाचे कारण होते. शेत-बंदिस्ती करणाऱ्या जमीनमालकाइतक्या उघडपणे नाही तरी तेवढ्याच प्रभावीपणे हे यंत्रमालक कारागिरांना त्यांच्या उत्पादनसाधनांपासून विभक्त करत होते.

यंत्रसामुग्रीची मोडतोड करून आपले प्रश्न सुटणार नाहीत याची कामगारांना लवकरच जाणीव झाली. काही कामगारांनी दुसऱ्या पद्धतीचा अवलंब केला. उदाहरणार्थ, "गरीब विणकरांच्या" एका गटाने ओल्ड हॅममधील त्यांच्या मालकांना १८१८ साली पाठवलेला हा अर्ज पहा. "या शहरातील आणि उपनगरातील आम्ही विणकर आमच्या कंगाल अवस्थेकडे तुमचे लक्ष वेधावे यासाठी आदरपूर्वक विनंती करत आहोत. आमची मजुरी अतिशय कमी आहे आणि अशा परिस्थितीशी आम्हाला बराच काळ सामना करावा लागत आहे. तुम्ही आपसात एक बैठक घेऊन आमची मजुरी वाढवून आमची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न करता येईल का ते पाहावे. कारण सध्याच्या मजुरीतून

जीवनावश्यक वस्तू घेणेही आम्हाला मुश्किल बनले आहे, हे तुम्हाला ठाऊकच आहे. तुम्ही संयुक्तपणे निर्णय घेतला तर तुमच्या नफ्याला धक्का न लावता – आणि तसे करण्याची आमची जराही इच्छा नाही—मजुरी वाढवता येणे तुम्हाला शक्य आहे असे आम्हाला वाटते.”

इतरही अनेक प्रकारचे अर्ज करण्यात आले. अगदी शेकड्यांनी. मालकांकडे अर्ज पाठवण्याचा काहीच उपयोग होत नाही, हे लक्षात आल्यावर तो प्रकार बंद करण्यात आला, परंतु लोकसभेकडे अनेक अर्जविनंत्या धाडण्यात आल्या. त्यातील बहुतेक अर्ज कचऱ्याच्या टोपलीत फेकण्यात आले, पण काही अर्जांकडे थोडेफार लक्ष देण्यात आले. कामगारवर्गाची दैन्यावस्था कमी करणारे काही कायदे कायदेसंहितेमध्ये आधीच होते. आता काही प्रमाणात या अर्जांमुळे, तर काही प्रमाणात विविध समित्यांनी केलेल्या पाहण्यांमध्ये कामगारांची स्थिती भयंकर असल्याचे निर्विवाद सिद्ध झाल्यामुळे, आणखी काही कायदे करण्यात आले.

परंतु कायदेसंहितेमध्ये कायदे असणे ही एक गोष्ट असते, आणि ते प्रत्यक्षात उतरवणे वेगळीच गोष्ट असते. कामगारांच्या हे लक्षात आले. एकच कायदा कामगारांना एका पद्धतीने लावण्यात येतो आणि मालकवर्गाला अगदी वेगळ्या पद्धतीने लावण्यात येतो ही गोष्टही त्यांच्या पक्की ध्यानात आली.

न्यायालयामध्ये कामगार जेव्हा तक्रारी आणत तेव्हा ज्या मालकाविरुद्ध ते तक्रार करत होते तोच माणूस त्यांचे गाऱ्हाणे ऐकणारे न्यायाधीश असल्याचे त्यांना आढळे! अर्थातच, अशा परिस्थितीत न्याय्य निवाडा होण्याची शक्यता कमीच होती!

परंतु हे लागेबांधे इतके आंतरिक असण्याचीही गरज नव्हती. मालक ज्या वर्गामध्ये मोडत होते त्याच वर्गाचा न्यायाधीश असणे हेदेखील बहुतेक वेळा पुरेसे होते. किंवा ते जरी एकाच वर्गातले नसले तरीही समाजाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन एकसारखा असणेही पुरेसे होते. न्यायालयात कामगारांना पायीच्या वहाणेप्रमाणे वागवण्यात येई. तर मालकांना शिरसावंद्य मानण्यात येई. मालकांनी चार तुकडे कामगारांच्या अंगावर फेकण्याबद्दल कामगारांनी ऋणी राहिले पाहिजे आणि मालकांची वाहवा केली पाहिजे असेच न्यायाधीशांना वाटे. अशा परिस्थितीमध्ये फासे कामगारवर्गाच्या विरुद्ध पडणार हे स्पष्टच होते. ‘द टाऊन लेबरर’ (शहरातील कामगार) या पुस्तकामध्ये दोन प्रसिद्ध इतिहासकारांनी त्या काळचे चित्रण केले आहे: “लोकसभेने कामगारवर्गाला फारशा सवलती दिल्या नाहीतच पण ज्या काही दिल्या त्यालाही काही अर्थ उरला नाही. कारण मालकांच्या विरुद्ध जाणारे कायदेकानू अंमलात आणण्यास न्यायाधीशांची संमती नव्हती.... मालकांनी कायद्याचे पालन केले नाही तर जबरदस्तीने कायद्याची अंमलबजावणी करता येणे शक्य नाही असेच न्यायाधीश गृहीत धरून चालत.... मालकांनी कायद्याचे पालन करावे यासाठी त्यांचे मन वळवणे न्यायाधीशांना शक्य नसल्यामुळे, मालकांना कायदेपालन करायला लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांनाच ते तुरुंगात पाठवीत.”

केवळ त्या विशिष्ट कालावधीमध्येच असे प्रकार घडत होते असे नव्हे तर सर्व भांडवली देशामध्ये नेहमीच असे घडते, असे समाजाकडे अत्यंत बारकाईने पाहणाऱ्या ॲडम स्मिथ या विचारवंताचे म्हणणे होते. स्वतःच्या कृत्यांना नीतिमत्तेची झालर लावण्यासाठी त्यांच्या या नेत्याकडे वळणारे मालक, 'द वेल्थ ऑफ नेशन्स' (राष्ट्रांची संपत्ती) या पुस्तकामधील पुढील उताऱ्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत : "मुलकी कारभारासाठी असलेले सरकार खरे तर संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी असल्यामुळे प्रत्यक्षामध्ये गरिबांपासून श्रीमंतांचे संरक्षण करण्यासाठी किंवा मालमत्ता-विहीन लोकांपासून मालमत्तादार लोकांचे संरक्षण करण्यासाठीच या सरकारची स्थापना करण्यात आलेली असते."

जीवनाच्या कटू अनुभवामधून कामगारांना हे सत्य उमगले. या बाबतीत काय काय करता येणे त्यांना शक्य होते ? एक गोष्ट त्यांच्या सहजपणे ध्यानात आली. त्यांनी मतदानाचा अधिकार मिळवला तर मूठभरांसाठी असलेल्या मूठभरांच्याच सरकारऐवजी बहुजनांसाठी झटणारे बहुजनांचे सरकार स्थापन करण्यासाठी कायदेमंडळावर दबाव आणणे त्यांना शक्य होते कायदे कोणी करावेत याबाबत आपल्या मताला किंमत असावी असे त्यांना वाटले. कायदे जर कामगारांनी केले तर ते कामगारांचे हित जपण्यासाठी केले जातील. त्या काळी अस्तित्वात असलेले कायदे हा त्यांच्या मार्गातील अडथळा होता—ते कायदे मालकांनी केलेले होते. कायदे करण्यामध्ये जर कामगार सहभागी झाले तर त्यांची परिस्थिती सुधारण्याची काही शक्यता होती. 'कॉर्न लॉज' करून जमीनमालकांच्या आणि संरक्षणात्मक जकाती बसवून उद्योजकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणे जर सरकारला शक्य असेल तर कामगारांचे वेतन आणि कामाचे तास याबद्दल संरक्षणात्मक उपाय योजणेही शक्य आहे. म्हणून मतदानाच्या हक्कासाठी त्यांनी लढा दिला.

अमेरिका आणि इंग्लंड या देशात असलेल्या राजकीय लोकशाहीची आता आपल्याला इतकी सवय झाली आहे की ती अशीच पूर्वापार चालत आलेली गोष्ट आहे असे आपल्याला वाटते. अर्थातच हे काही खरे नाही. अमेरिका आणि युरोपियन देश यांमधील सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क सुखासुखी देण्यात आला नव्हता—तो लढ्याचा परिपाक होता. इंग्लंडमधील 'चार्टिस्ट' चळवळीमध्ये कामगारवर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला. या चळवळीच्या मागण्या अशा होत्या :

१. सर्व पुरुषांना मतदानाचा हक्क.

२. लोकसभेमध्ये निवडून आलेल्या सर्वांना पगार. (त्यामुळे गरीब लोकांना निवडणूक लढवणे शक्य होईल.)

३. लोकसभेची मुदत एक वर्षाची असावी.

४. उमेदवारीसाठी मालमत्तेची बंधने नसावीत.

५. मतपत्रिकेद्वारा मतदान व्हावे, म्हणजे मतदारांवर दहशतीचा वापर होणार नाही.

६. समान लोकसंख्येचे मतदारसंघ असावेत.

' चार्टिस्ट ' चळवळ जरी प्रत्यक्षात हळूहळू ओसरली तरीही अखेर वार्षिक लोकसभेची मागणी वगळता बाकी सर्व मागण्या एकामागून एक मान्य झाल्या. जीवन-मान सुधारण्यासाठी चाललेल्या कामगारवर्गाच्या लढ्यातील राजकीय लोकशाही हे एक महत्त्वाचे हत्यार असल्याची जाणीव असल्यामुळे चार्टिस्टांनी राजकीय लोकशाहीसाठी लढा उभारला. मँचेस्टरमधील कामगारांच्या एका मेळाव्याला उद्देशून भाषण करताना स्टीफन्स हा एक ' मेथॉडिस्ट ' नेता म्हणाला : " मित्रांनो, ' चार्टिझम ' म्हणजे केवळ मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी असलेली राजकीय चळवळ नव्हे. चार्टिझम हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. आपले मागणीपत्र (चार्टर) चांगला आहार, चांगले निवास-स्थान, समृद्धी आणि कमी श्रमकाल यांसाठी आहे. "

पार्सन स्टीफन्स आशावादी होते. कामगारवर्गाने राजकीय लोकशाहीचा लढा जिंकला. पण त्यामुळे जी समृद्धी येईल अशी पार्सनची अपेक्षा होती ती समृद्धी काही आली नाही. जीवनमान फक्त काही प्रमाणातच सुधारले आणि सगळे काही मतपत्रिकेद्वारा घडले नाही. वास्तविक पाहाता, चांगली कार्यपरिस्थिती, अधिक वेतन आणि कमी श्रमकाल या मागण्या जिंकण्यामध्ये कामगारांच्या विशिष्ट हितसंबंधांसाठी लढणाऱ्या त्यांच्याच अशा संघटनांचा – ट्रेड युनियन्सचा – वाटा सर्वात महत्त्वाचा होता.

ट्रेड युनियन हा काही अगदी नवा प्रकार नव्हता. पूर्वी जर्नीमेनच्या असलेल्या संघटनांमधून काही अंशी नैसर्गिकरीत्या त्या निर्माण झाल्या. परंतु उद्योगधंद्यांमध्ये भांडवलाचे वर्चस्व वाढल्यानंतर, गिल्ड–धर्तीवर संघटित झालेल्या कामकऱ्यांच्या संघट-नांनी आजच्यासारख्या ट्रेड युनियन्सचे रूप धारण केले : स्वतःच्या मालकांविरुद्ध लढणारी स्वतःच्या हितसंबंधाकरता झगडणारी, स्वतःचे जीवनमान सुधारण्याकरता धडपडणारी एकाच उद्योगधंद्यातील कामगारांची संघटना.

ट्रेड युनियन्स काही एका रात्रीत निर्माण झाल्या नाहीत. वर्गीय एकजुटीची भावना वाढायला बराच कालावधी जावा लागला. तोपर्यंत राष्ट्रीय स्तरावर खरीखुरी संघटना उभारणे शक्य नव्हते. औद्योगिक क्रांतीमुळे ट्रेड युनियन चळवळ वेगाने पुढे झेपावली. औद्योगिक क्रांतीमुळे शहरांमध्ये मोठ्या संख्येने कामगार केंद्रित झाले. वाहतुकीची आणि दळणवळणाची साधनें यामध्ये आलेल्या सुधारणांमुळे राष्ट्रीय स्तरावर काम करू शकणाऱ्या संघटनांना भौतिक आधार मिळाला आणि कामगारवर्गीय चळवळ अत्यावश्यक बनवणारी परिस्थिती तयार झाली. मग ट्रेड युनियन चळवळ फोफावणे क्रमप्राप्तच झाले. भांडवली विकासापाठोपाठ कामगारवर्गीय संघटना उभ्या राहिल्या. कारण भांडवली विकासामुळे वर्ग, वर्गीय भावना व सहकार्य आणि दळणवळण यासाठी अत्यावश्यक असलेली भौतिक साधने यांची निर्मिती झाली. सर्वाधिक औद्योगिकीकरण झालेल्या आणि फॅक्टरी व्यवस्थेमुळे महानगरांची वाढ झालेल्या देशांमध्ये ट्रेड युनियन चळवळीने बाळसे घेतले. १८४४ साली या संदर्भात भाष्य करताना फ्रीडरिश एंगल्स यांनी लिहिले : " (शहरांमध्ये) होणाऱ्या लोकसंख्येच्या केंद्रीकरणामुळे ज्याप्रमाणे मालमत्तादार-वर्गाचा फायदा होऊन त्याच्या संपत्तीची वृद्धी होते, त्याचप्रमाणे, किंबहुना त्यापेक्षाही अधिक

वेगाने कामगारवर्गाचा विकास होतो. आपण आंतरिक धाग्यांनी बांधला गेलेला एक वर्ग आहोत अशी भावना कामगारांमध्ये वाढीस लागते. एक व्यक्ती म्हणून दुर्बल असलो तरीही संघटितपणे आपण एक शक्ती आहोत अशी जाणीव त्यांच्यामध्ये तयार होऊ लागते. भांडवलदार आणि कामगार यामधील दरी रुंदावत जाऊन कामगारांच्या सामाजिक स्थानानुरूप खास कामगारवर्गीय जाणिवा त्यांच्यामध्ये तयार होऊ लागतात. आपल्याला सहन कराव्या लागणाऱ्या दडपणुकीची जाणीव तीव्र बनते आणि कामगारांना सामाजिक आणि राजकीय महत्त्व प्राप्त होते. अशी महानगरे कामगार–चळवळीचे उगमस्थान बनतात. सर्वप्रथम अशा शहरांमध्ये आपल्या स्वतःच्या जीवनाबद्दल विचार करायला आणि त्या परिस्थितीविरुद्ध झगडा द्यायला कामगार शिकतात. कामगारवर्ग आणि भांडवलदारवर्ग यांच्यामधील विरोध येथे प्रथम सुस्पष्ट होतो आणि यातूनच पुढे ट्रेड युनियन्स, चार्टिझम आणि समाजवाद यांचा जन्म होतो. ”

इंग्लंडमध्ये निर्माण झालेले औद्योगिक क्रांतीचे वादळ इतर देशांमध्येही पसरले. आणखी काही देशांमध्ये अजूनही त्या वादळाचा प्रवास चालू आहे. प्रत्येक देशामध्ये काही नेहमीच इंग्लंडचा कित्ता गिरवला जात नाही. वेगवेगळ्या परिस्थितीनुसार मालमत्तादारवर्गाच्या धोरणांमध्ये आणि शासनाच्या कायद्यांमध्ये फरक पडतो. परंतु एका बाबतीत मात्र प्रत्येक देशाने इंग्लंडच्या पावलावर पाऊल ठेवले आहे. सगळीकडे ट्रेड युनियन्सविरुद्ध युद्ध पुकारण्यात आले आहे.

तसे हे युद्ध जुनेच आहे. आपल्या मागण्यांसाठी झगडणाऱ्या कामकऱ्यांच्या संघटना चौदाव्या शतकापासूनच बेकायदेशीर ठरवण्यात आल्या आहेत आणि त्यानंतर प्रत्येक शतकामध्ये अशा संघटनांवर बंदी घालणारे कायदे करण्यात आले आहेत. १७७६ साली ॲडम स्मिथ यांनी याबद्दल लिहिले : “ कामगारांचे वेतन काय असावे ही गोष्ट सगळीकडेच (भांडवलदार आणि कामगार) या दोन बाजूंच्या करारानुसार ठरते. या दोन बाजूंचे हितसंबंध अजिबात सारखे नसतात. जास्तीत जास्त वेतन मिळावे अशी कामगारांची इच्छा असते तर कमीत कमी वेतन द्यावे असे मालकांना वाटते. वेतनवाढ मिळवण्यासाठी कामगार, तर वेतनाची पातळी कमी करण्यासाठी मालक संघटित होतात.

“ परंतु सर्वसाधारणपणे या झगड्यामध्ये कोणाचे वर्चस्व राहील हे ओळखणे काही कठीण नाही....मालकांची संख्या कमी असल्याने त्यांना संघटित होणे अधिक सोपे असते. शिवाय कायदाही त्यांच्या संघटनांना मान्यता देतो, कमीत कमी त्यावर बंदी तरी आणत नाही. तर याउलट कामगारांच्या संघटनांवर बंदी आणली जाते. कामाचे मूल्य कमी करायला बंदी करणारे कायदे आपले कायदेमंडळ करत नाही, परंतु कामाचे मूल्य वाढवण्याविरुद्ध मात्र अनेक कायदे केले जातात. ”

१७७६ साली स्मिथ यांनी इंग्लंडबद्दल जे लिहिले ते इतर सर्व भांडवली देशांबद्दलही खरे होते आणि आहे. काही ठिकाणी कामगार–संघटनांप्रमाणेच मालक–संघटनांवरही कायद्याने बंदी आणली असली तरीही कायद्याची कडक अंमलबजावणी कामगारांबाबतच करण्यात येई, मालकांबाबत फारशी नाही. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका या देशांत कायद्याने ट्रेड युनियन्सवर वरवंटा फिरवण्यात आला.

इंग्लंडमध्ये जवळपास २५ वर्षे 'कॉम्बिनेशन लॉज' द्वारा (संघटनाविषयक कायदे) स्वतःच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी एकत्र येण्यास कामगारांना बंदी करण्यात आली होती. संघटित होण्याचा प्रयत्न केल्यास कायद्याने तो गुन्हा ठरे. "स्टॉकपोर्टमधील टोप्या तयार करणाऱ्या ९ कामगारांना १८१६ साली कटकारस्थानात सहभागी होण्याबद्दल शिक्षा म्हणून दोन वर्षे तुरुंगवासाची सजा फर्मावण्यात आली. त्याबद्दल निकाल देताना न्यायाधीशांनी (सर विल्यम गॅरो) निर्वाळा दिला, 'या स्वर्गसमान देशामध्ये कायदा अत्यंत क्षुद्र माणसालाही अत्यंत प्रतिष्ठित असामीसारखीच वागणूक देतो. सर्वांना सारखेच संरक्षण मिळत असल्याने संघटित होण्याची काहीच गरज नाही... १०० ते १३० माणसांना नोकरीधंदा पुरवणाऱ्या श्री. जॅक्सन यांच्यासारख्या सद्‌गृहस्थाचे समाजाने ऋणीच असले पाहिजे.'"

ट्रेड युनियन संघटित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोपी–कामगारांना दोन वर्षे तुरुंगवास आणि त्यांना नोकरीवर ठेवण्याची दयाबुद्धी दाखवणाऱ्या श्री. जॅक्सन यांना स्तुतीसुमने. न्यायाधीशांचे पहिलेच वाक्य पुन्हा एकदा वाचा. आपल्या स्वतःच्याच बोलण्यावर त्यांचा विश्वास बसला असता का?

इंग्लंडप्रमाणेच फ्रान्समध्येही वेतनवाढ मिळविण्यासाठी करण्यात येणाऱ्या संघटना बेकायदेशीर ठरवण्यात आल्या. कायदे पुनःपुन्हा तोडणाऱ्या कामगारांची न्यायाधीशांना कीव येई. लेव्हास्यूरच्या म्हणण्यानुसार त्यांनी कामगारांना संघटित न होण्याचा सल्ला दिला. परंतु 'राह अकेला जो चलता है, वो तो है कमजोर' याची खात्री पटलेल्या कामगारांनी त्यांची संघटनेसाठी धडपड चालूच ठेवली: "कायद्याच्या सर्व कडक तरतुदीचा वापर न करता न्यायाधीश शिक्षा देत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, 'न्यायासनाचे धोरण सौम्यच आहे, परंतु कामामुळे समृद्धी व समाधान मिळते आणि संघटनांमुळे तुरुंगवास भोगावा लागतो व गरिबीशी टक्कर घ्यावी लागते हा धडा तुमच्या पक्का लक्षात राहण्यासाठी आम्ही शिक्षा देत आहोत.' परंतु कामगार काही हा धडा शिकले नाहीत. १८२२ सालच्या संपाने त्यांची मजुरी ताशी ३५ सेन्टस झाली आणि १८३३ सालच्या संपाने ती ताशी ४० सेन्टस झाली. हे आणि केवळ असेच धडे त्यांच्या चांगले लक्षात राहिले. म्हणूनच १८४५ साली ताशी ५० सेन्टस मजुरी मिळण्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा संप पुकारला."

स्वतःची स्थिती सुधारण्यासाठी संघटनेद्वारा आपल्याला ताकद प्राप्त होत असल्याबद्दल जर्मनीमधील कामगारांचीही खात्री पटली होती. १८६४ साली बर्लिनमधील छापखान्यातील मजुरांनी 'प्रशियन चेम्बर ऑफ डेप्युटीज'कडे खालील अर्ज पाठवला: "कष्टकरी वर्गाच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वप्रथम सध्याच्या कायद्यांनी कामगारांवर घातलेली बंधने तोडून टाकली पाहिजेत याची खात्री पटल्यामुळेच आम्ही छापखान्यातील जर्नीमेन हा अर्ज करत आहोत: मागणी आणि पुरवठ्याच्या नियमावर आधारित अर्थव्यवहारातून कामगारांच्या मूलभूत गरजाही भागवल्या जात नाहीत आणि एकट्या-दुकट्या कामगाराला आपली मजुरी वाढवून घेता येणे अशक्य असते हे लक्षात

घेता संघटनेच्या हक्काची मागणी न्याय्य तशीच विवेकी आहे ...कामगारांच्या संघटनांवर बंदी आणणारे १८४५ सालचे औद्योगिक कायदे निकालात काढण्यात आले पाहिजेत. ''

आणि गावोगावी हीच तऱ्हा. वर्गकलहाच्या खेळातील आपल्याविरुद्ध असलेले नियम कमी जाचक करण्यासाठी, संघटनेचे अधिकार मिळवण्यासाठी कामगारांच्या मागण्या आणि झगडे. ' मेथॉडिस्ट फेडरेशन फॉर सोशल सर्व्हिस 'च्या १९३५ सालच्या अहवालातील दोन कलमांवरून, अमेरिकेमध्ये संघटनात्मक अधिकारासाठी किती तीव्र लढा देण्यात आला आहे याची कल्पना येते : '' ... युनियनच्या कार्यशील सभासदांविरुद्ध दहशतवादाचे भीषण सत्र चालू करण्यात आले आहे .... प्रत्येक दिवशी बुरखाधारी गुंडांच्या टोळ्यांकडून युनियनच्या काही सभासदांवर हल्ला केला जातो....या प्रकारचा पहिलाच बळी ठरलेल्या एका माणसाला शहराबाहेर १५ मैल फरफटत नेण्यात आले आणि त्या खुनी हल्लेखोरांनी त्याला मृतावस्थेतच तेथे सोडले. ...आजपर्यंत पाच जणांना अशी भयानक मारहाण झालेली आहे आणि त्यात ' अमाल्गमेटेड ॲसोसिएशन 'च्या एका अध्यक्षाचाही समावेश होतो...

'' सर्व उपलब्ध पुराव्यावरून हे स्पष्ट होते की या देशातील श्रीमंत आणि गरीब यांमधील झगडा अतिशय झपाट्याने अत्यंत उग्र स्वरूप धारण करत आहे... या वर्षी झालेल्या आर्थिक झगड्यामध्ये कमीत कमी ७३ कामगार, खंडकरी आणि नीग्रोंचा बळी गेला आहे; एकाही मालकाचा नाही. ''

परंतु असल्या सर्व बेकायदेशीर आणि कायदेशीर बडग्यांना ट्रेड युनियन्स पुरून उरल्या आहेत. हा प्रवास अत्यंत खडतर आहे. युनियनच्या सभासदांना तुरुंगात टाकण्यात आले, युनियनचे पैसे लुटण्यात आले, युनियन्सना भूमिगत व्हावे लागले— '' कल्याणकारी संस्था '' आणि '' सामाजिक संस्था '' असे स्वरूप धारण करावे लागले. संप आणि निदर्शने यांसारखी युनियनची शस्त्रे बोथट करण्याचे प्रयत्न झाले आणि तरीही ट्रेड युनियन्स जिवंत आहेत. स्वतःचे जीवनमान सुधारण्याचे कामगारांचे ते सर्वात प्रभावी शस्त्र आहे.

एका महान कवीने सुमारे शंभर वर्षांपूर्वी '' इंग्लंडच्या बांधवांना '' उद्देशून एक कविता केली होती. औद्योगिक क्रांतीनंतर ओढवलेल्या परिस्थितीचे आणि त्या परिस्थितीशी कामगारांनी ज्या प्रकारे टक्कर दिली तिचे वर्णन करणाऱ्या या प्रकरणाचा सारांश त्या कवितेनेच सांगणे इष्ट होईल.

इंग्लिश बांधवांनो, कुणासाठी ही नांगरणी
तुम्हाला खाली लोटणाऱ्या मालकांसाठी ?
परिश्रमपूर्वक विणलेली ही किंमती वस्त्रे कुणासाठी,
जुलमी मालकांनी ल्यावीत म्हणून !

का देता त्यांना अन्नवस्त्रे ?
        रक्षण करता जन्मापासून मृत्यूपर्यंत
त्या कृतघ्न ऐतखाऊंचे
        जे तुमचा घाम–नव्हे, तुमचे रक्त–पितात ?

इंग्लंडच्या कामगारांनो, का म्हणून घडविता
        हत्यारे, साखळदंड आणि चाबूक ?
बुळबुळीत ऐतोबांनी तुमच्या श्रमाची संपत्ती
        लुटून न्यावी म्हणून !

मिळते का तुम्हांला उसंत, आराम, शांतता,
        निवारा, अन्न आणि प्रेमाचा ओलावा ?
कष्ट आणि भीतीचे मोल देऊन
        तुम्ही विकत तरी काय घेता ?

तुम्ही पेरता बी — फळ घेणारा दुसराच
तुम्ही शोधता संपत्ती — लाटणारा दुसराच
तुम्ही विणता वस्त्रे — पांघरणारा दुसराच
तुम्ही घडविता हत्यारे — पेलणारा दुसराच

पेरते व्हा, पण — जुलमी मालकांसाठी नव्हे
संपत्ती कमवा, पण — भोंदू लोकांसाठी नव्हे
वस्त्रे विणा, पण — ऐतखाऊंसाठी नव्हे
हत्यारे घडवा, पण — वापरा स्वरक्षणासाठी

—पर्सी बाइश शेली

◊ ◊ ◊

१७

हे " नैसर्गिक नियम " कोणाचे ?

अधांतरी सोडलेली वस्तू खाली पडते, वर जात नाही. खिडकीबाहेर उडी मारली तर काय होईल ते तुम्हा-आम्हाला समजते. पदार्थविज्ञानातील तज्ज्ञांनी याबद्दल आपल्याला स्पष्टीकरण दिले आहे. न्यूटन यांनी गुरुत्वाकर्षणाच्या नियमांचा शोध लावला आणि भौतिक विश्वाचा व्यापार नियंत्रित करणाऱ्या इतरही अनेक नैसर्गिक नियमांचा उलगडा केला. या नैसर्गिक नियमांच्या ज्ञानामुळे आपल्याला कृती ठरवून विशिष्ट उद्दिष्ट साधता येते. हे नियम माहीत नसल्यास किंवा त्या नियमांकडे दुर्लक्ष करून कृती केल्यास त्याचे दुष्परिणाम भोगावेच लागतात.

त्याच धर्तीवर, औद्योगिक क्रांतीच्या कालखंडात अर्थतज्ज्ञांनी अनेक नियम तयार केले. ज्याप्रमाणे शास्त्रज्ञांचे नियम भौतिक जगतातील सत्य उलगडून दाखवतात, त्याचप्रमाणे हे नियम आर्थिक आणि सामाजिक जगतातील सत्याचा उलगडा करतात असा त्यांचा दावा होता. अर्थशास्त्राचे " नैसर्गिक नियम " सांगणारी ती तत्त्वप्रणाली होती. स्वतःच्या शोधाबद्दल त्यांना भलताच अभिमान होता. हे नियम चांगले आहेत की वाईट याबद्दल ते वाद घालत नसत. अशा चर्चेमध्ये काहीच अर्थ नव्हता. त्यांचे नियम म्हणजे त्रिकालाबाधित सत्य होते. या तत्त्वांच्या अनुरोधाने माणसे शहाण्यासारखी वागली तर ठीकच आहे, पण या नैसर्गिक नियमांविरुद्ध वागण्याचा गाढवपणा लोकांनी केला तर त्याचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील.

सत्याच्या मागावर असलेले हे अर्थतज्ज्ञ आपल्या शोधांच्या प्रत्यक्ष व्यवहारातील परिणामांची काळजी न करण्याइतके उदात्त मनाचे होते की नाही हे सांगणे कठीण आहे. परंतु विशिष्ट काळी विशिष्ट परिस्थितीत वावरणारी ती हाडामांसाची माणसे होती हे तर निश्चितच. याचाच अर्थ असा की त्या परिस्थितीत, त्या काळी निर्माण झालेल्या प्रश्नांशीच ते झटापट करत होते. त्यांच्या तत्त्वप्रणालीचा समाजातील सत्ताधारी गटांवर परिणाम होत होता आणि स्वतःच्या हितसंबंधांना अनुसरूनच त्यांनी या तत्त्वप्रणालीला पाठिंबा दिला किंवा विरोध केला आणि त्याच दृष्टिकोनातून " सत्या "चा वेध घेतला.

ज्याप्रमाणे व्यापारी क्रांतीच्या काळात व्यापारवादी सिद्धांतांचा जन्म झाला, किंवा फ्रान्सच्या शेती अर्थव्यवस्थेमधून सर्व संपत्तीचा उगम जमिनीतच असल्याचा दावा करणाऱ्या फिजिओक्रॅट्सचा जन्म झाला, त्याचप्रमाणे इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या काळात उगवत्या उद्योगपतींबरोबर त्या काळाला अनुरूप अशा अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा जन्म झाला. औद्योगिक क्रांतीला सैद्धान्तिक पाया पुरवणाऱ्या या तत्त्वप्रणालीला " अभिजात अर्थशास्त्र " असे म्हणण्यात येते. या अभिजात विचारप्रणालीचे संस्थापक असलेले ॲडम स्मिथ यांच्या सिद्धांताशी आपली काही प्रमाणात ओळख झालेलीच आहे. रिकार्डो, माल्थस, जेम्स मिल, मॅक्क्युलॉक, सिनिअर, आणि जॉन स्टुअर्ट मिल ही देखील याच विचारप्रणालीशी जोडलेली काही प्रसिद्ध नावे होत. सगळ्याच बाबतीत स्मिथ यांच्याशी किंवा आपापसात ते सहमत होते असे नव्हे. परंतु काही मूलभूत व्यापक तत्त्वाबद्दल त्यांचे एकमत होते.

त्या काळच्या उद्योगपतींनाही या मूलभूत तत्त्वांबाबत विलक्षण आत्मीयता होती. त्याला कारणही तसेच होते. अभिजात अर्थशास्त्राचा त्यांच्या विशिष्ट हितसंबंधाशी बसणारा मेळ हा मणिकांचन योगच होता. या अभिजात अर्थशास्त्रामधून स्वतःच्या कृत्यांना आधार देणारे अनेक नैसर्गिक नियम ते सहजासहजी वेचू शकत.

उद्योगपतीला फक्त पोपटाचा डोळाच दिसत होता. त्याला नफा कमवायचा होता. अगदी त्याच वेळी, त्याने नफाच कमावला पाहिजे असे सांगणाऱ्या अभिजात अर्थतज्ज्ञांचे आगमन झाले, एवढेच नव्हे तर उद्योगपतीला दिलासा देणारी आणखीही एक गोष्ट होती. स्वतःच्या नफ्यासाठी त्याने घालवलेल्या प्रत्येक क्षणामुळे शासनसंस्थेलाही मदत होत असल्याचे त्याला सांगण्यात आले. ॲडम स्मिथ यांचा असाच दावा होता. उदाहरणार्थ, भल्याबुऱ्याच्या नको त्या जाणिवेने स्वतःचा निद्रानाश करून घेणाऱ्या लालसी भांडवलदाराला दिलेला हा विशेष सल्ला पाहा : स्वतःच्या हाती लागू शकणाऱ्या भांडवलाला अधिकाधिक फायदेशीर पद्धतीने कार्यरत करण्याचाच प्रत्येक माणूस सतत प्रयत्न करतो. संपूर्ण समाजाचा नव्हे तर फक्त स्वतःच्या फायद्याचा तो विचार करतो. परंतु अशा तऱ्हेने स्वतःच्या फायद्याचा त्याने विचार केल्यामुळे नैसर्गिकरीत्या, किंबहुना अपरिहार्यपणेच समाजाला अत्यंत हितावह ठरेल अशा पद्धतीने त्यांची भांडवल-गुंतवणूक होते. "

काय ? समजले का ?

समाजाच्या कल्याणाची गाठ व्यक्तीच्या समृद्धीशी घातली आहे. प्रत्येक माणसाला हवे ते करण्याचे स्वातंत्र्य द्या, त्याला जास्तीत जास्त नफा कमवायला सांगा, त्याच्या स्वार्थाला खतपाणी घाला आणि पाहता पाहता सर्व समाजाचे कल्याण होईल. प्रत्येकाने स्वार्थ साधला की आपोआप सगळ्या समाजाला समृद्धी प्राप्त होईल. अधिकाधिक नफा कमावण्यासाठी बेफाम सुटलेल्या भांडवलदारांना पर्वणी साधायची ही सुवर्णसंधी होती ! दूर व्हा, खुल्या व्यवहाराच्या या सुपर-फास्ट ट्रेनसाठी मार्ग मोकळा करा !

कामाचे तास आणि मजुरी यांचे सरकारने नियमन करावे का ? असे करणे म्हणजे नैसर्गिक नियमामध्ये लुडबूड करण्यासारखे होते आणि म्हणून तसे करण्यात काहीच अर्थ नव्हता असे अभिजात अर्थतज्ज्ञांचे मत होते.

मग सरकारचे काम काय असावे? सरकारने शांतता राखावी, मालमत्तेचे रक्षण करावे आणि (आर्थिक व्यवहारामध्ये) नाक खुपसू नये.

स्पर्धेसाठी जगाचे मैदान खुले केले पाहिजे. स्पर्धेमुळे किंमती कमी राहातात, खंबीर व कार्यक्षम माणसे यशस्वी होतात आणि अकार्यक्षम रडतराऊत बाहेर फेकले जातात. कोणत्याही प्रकारची एकाधिकारशाही–मग किंमती वाढवण्यासाठी भांडवलदारांची असो नाही तर मजुरी वाढवण्यासाठी ट्रेड युनियन्सची असो – असण्यामुळे नैसर्गिक नियमांचा भंग होतो.

व्यापारवादी नियमन, नियंत्रण आणि निर्बंध यांना प्रत्युत्तर म्हणून अ‍ॅडम स्मिथ यांनी या विचारांची मांडणी केली होती हे आपण पाहिले आहे. औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीला १७७६ साली त्यांनी आपले महान पुस्तक लिहिले. जेव्हा इतर अर्थतज्ञांनी या सिद्धान्तांना उचलून धरून त्यांचा विकास केला व त्यांना लोकप्रियता मिळवून दिली तेव्हा औद्योगिक क्रांतीचे वारू चौखूर उधळले होते, क्रयवस्तूंच्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झाली होती आणि भांडवलदारवर्गाने सत्ता हस्तगत केली होती. त्या काळच्या परिस्थितीला अनुरूप अशा आणखी काही "नैसर्गिक नियमांचे" त्यांनी प्रतिपादन केले.

थॉमस आर. माल्थस यांचे 'अ‍ॅन एस्से ऑन द प्रिन्सिपल ऑफ पॉप्युलेशन' (लोकसंख्येच्या तत्त्वासंबंधी एक लेख) हे त्या काळचे एक अतिशय प्रसिद्ध पुस्तक होते. शेलीचे सासरे विल्यम गॉडविन यांच्या एका पुस्तकाला प्रत्युत्तर म्हणून १७९८ साली ते प्रसिद्ध करण्यात आले. सर्वच सरकारे वाईट असतात, परंतु विवेकी व्यवहार केल्यास मनुष्यमात्राला प्रगती करणे आणि सुखी जीवन जगणे शक्य आहे, असे गॉडविन यांच्या १७९३ साली प्रसिद्ध झालेल्या 'एन्क्वायरी कन्सर्निंग पोलिटिकल जस्टिस' (राजकीय न्यायासंबंधी विचारणा) या पुस्तकाचे सार होते. गॉडविन यांच्या धोकादायक विचारधारेशी माल्थस यांना दोन हात करायचे होते. मानवाच्या स्थितीमध्ये फार मोठी सुधारणा होणे शक्यच नाही हे त्यांना दाखवून द्यायचे होते— म्हणजे त्यातच गोड मानून राहण्याची लोकांना सवय लागेल आणि ते फ्रेंच लोकांप्रमाणे क्रांतीच्या भुताने पछाडले जाणार नाहीत.

गॉडविन यांच्यावर त्यांनी जो हल्ला चढवला तो असा : "समाजाच्या आर्थिक व्यवहारातील सर्व दोष आणि दैन्यावस्था यांबद्दल मानवनिर्मित संस्थांना जबाबदार धरणे ही गॉडविन यांनी त्यांच्या पुस्तकात केलेली घोडचूक आहे. आज प्रस्थापित असलेली खाजगी मालमत्तेची व्यवस्था आणि राजकीय व्यवस्था यामुळेच मानवजातीला लांच्छनास्पद अशा गुन्ह्यांचा आणि दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला आहे असे त्यांना वाटते. जर खरोखरच अशी परिस्थिती असती तर जगामधून दुष्प्रवृत्तींचा नायनाट करणे ही अशक्यप्राय गोष्ट बनली नसती. अशा ध्येयपूर्तीसाठी विवेकासारखे सुयोग्य आणि प्रभावी असे दुसरे कोणतेच साधन असू शकणार नाही. मानवनिर्मित संस्था ही जरी मानवजातीला पिडणारी सर्वांत महत्त्वाची कारणे वाटली तरीही सत्य वेगळेच आहे. प्रत्यक्षामध्ये या मानवनिर्मित संस्था म्हणजे केवळ पृष्ठभागावरचे बुडबुडे आहेत; मानवाच्या संपूर्ण

जीवनप्रवाहाला गढूळ करून टाकणाऱ्या घाणीची कारणे ही फार खोलवर रुजलेली आहेत. ती कारणे मानवनिर्मित संस्थांपेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रभावशाली आहेत."

मानवजातीच्या दैन्यावस्थेला कारणीभूत असलेली ही " फार खोलवर रुजलेली " कारणे कोणती? माल्थस यांच्या मते, लोकसंख्येतील वाढ ही अन्नधान्यातील वाढीपेक्षा अधिक असते हे ते कारण होय. त्यामुळे खाणारी तोंडे तर जास्त आहेत, परंतु त्यांच्यासाठी पुरेसे अन्न नाही, अशी परिस्थिती अनेक वेळा ओढवते. " अनियंत्रित परिस्थितीमध्ये लोकसंख्या भूमितिश्रेणीने वाढते, अन्नधान्य-पुरवठा मात्र फक्त गणितश्रेणीने वाढतो...जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा अशा रीतीने मर्यादित राहिल्याने लोकसंख्येच्या वाढीला सतत लगाम घातला जातो. मानवजातीच्या एका मोठ्या विभागाला याचे अपरिहार्य दुष्परिणाम भोगावेच लागतात....

" इंग्लंडची लोकसंख्या सुमारे सत्तर लाख आहे. आपण असे धरून चालू की सध्याचा अन्नधान्य-पुरवठा इतक्या लोकांसाठी पुरेसा आहे. पहिल्या २५ वर्षांनंतर लोकसंख्या एकशे चाळीस लाख होईल. अन्नधान्य-पुरवठादेखील दुप्पट झाल्याने या लोकसंख्येला पुरेसा होईल. पण दुसऱ्या २५ वर्षांनंतर लोकसंख्या दोनशे ऐंशी लाख होईल, पण अन्नधान्य-पुरवठा मात्र दोनशेदहा लाख लोकांना पुरेल इतकाच होईल. त्यापुढच्या २५ वर्षांनंतर लोकसंख्या पाचशे साठ लाख होईल, परंतु अन्नधान्य-पुरवठा मात्र केवळ दोनशे ऐंशी लाख – म्हणजे फक्त निम्म्या – लोकांना पुरेसा होईल. शंभर वर्षांनंतर लोकसंख्या अकरा कोटी वीस लाख होईल, परंतु अन्नधान्य-पुरवठा केवळ तीन कोटी पन्नास लाख लोकांना पुरण्याइतकाच असेल. म्हणजेच सात कोटी सत्तर लाख लोकांना अन्न-पुरवठा होऊ शकणार नाही."

प्रत्यक्षात असे घडत नाही असे माल्थस आपल्याला सांगतात. कारण (रोगराई, प्लेग, दुष्काळ इत्यादी स्वरूपात) मृत्यूचे थैमान चालू होते आणि वाढणारी लोकसंख्या अन्नपुरवठ्याच्या पातळीवर रोखण्यात येते. " वेगाने फुगणाऱ्या लोकसंख्येला आळा घालण्यात येतो, आणि दुःख व दैन्यावस्था यांद्वारे अन्नधान्य-पुरवठा पुरेसा होईल एवढ्याच पातळीवर लोकसंख्या कायम राहाते."

म्हणजेच, वाढती नफेखोरी (मानवनिर्मित कारण) नव्हे तर अन्नपुरवठ्यापेक्षा वेगाने वाढणारी लोकसंख्या (नैसर्गिक नियम) हीच श्रमिकांच्या गरिबीचे कारण असल्याचा माल्थस यांचा दावा होता. गरिबांच्या या स्थितीमध्ये काहीच सुधारणा करता येणे शक्य नाही का? " काहीच नाही " – आपल्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीमध्ये माल्थस ठामपणे सांगतात, " समाजाच्या या स्थितीमध्ये काही महत्त्वपूर्ण सुधारणा करणे ही केवळ अशक्य कोटीतील गोष्ट आहे. याबद्दल आपल्याला कितीही वाईट वाटले तरी त्याला काहीही इलाज नाही."

परंतु १८०३ साली प्रसिद्ध झालेल्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये मात्र माल्थस यांना एक मार्ग सापडला. दुःख आणि दैन्यावस्थेखेरीज लोकसंख्यावाढीला आळा घालण्यासाठी आणखी एक उपाय योजणे शक्य होते — तो म्हणजे " नैतिक निर्बंध." संप, क्रांती,

परोपकार, सरकारी उपाययोजना यापैकी कशानेही गरिबांना त्यांच्या दैन्यावस्थेमधून बाहेर पडता येणे शक्य नव्हते — त्यांच्यामध्ये जन्माचे प्रमाण एवढे असण्याला ते स्वतःच जबाबदार होते. इतक्या लहान वयात त्यांनी विवाहबद्ध होणे योग्य नव्हते. त्यांनी " नैतिक निर्बंध " घालून घेतले पाहिजेत — एवढा मोठा परिवार असणे योग्य नव्हे— तरच त्यांना स्वतःची स्थिती सुधारण्याची संधी होती. समाजाची अधिक सेवा कोण करते — विवाहित आणि पोराबाळांचे लेंढार असलेली स्त्री की प्रौढ कुमारिका ? माल्थस यांचा कौल प्रौढ कुमारिकेच्याच बाजूने होता : " दहा-बारा मुलांना जन्म देणाऱ्या स्त्रीला वाटत असेल की, तिची मुले देशासाठी लढत असल्याने समाजाने तिचे ऋणी असले पाहिजे.... परंतु या प्रश्नाचा आपण अधिक सखोल विचार केला, या सन्मानित विवाहितेला न्यायाच्या तराजूमध्ये एका पारड्यात बसवून दुसऱ्या पारड्यात दुर्लक्षित प्रौढ कुमारिकेला बसवले तर दुसरीचे पारडे जड झाल्याचे आपल्या लक्षात येईल. "

स्वतःच्या दारिद्र्याची जबाबदारी गरिबांवरच होती हे समजल्याने श्रीमंतांचे मन आनंदाने भरून गेले. ॲडम स्मिथ यांच्यानंतर अभिजात अर्थतज्ज्ञांमध्ये सर्वात महत्त्वाचे नाव येते डेव्हिड रिकार्डो यांचे. लंडनच्या शेअर बाजारात उलाढाली करून या ज्यू माणसाने प्रचंड पैसा कमावला. १८१७ साली प्रसिद्ध झालेले त्याचे " द प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ॲंड टॅक्सेशन ' [राजकीय अर्थशास्त्र आणि करयोजना यांची मूलतत्त्वे] म्हणजे अर्थशास्त्राला विज्ञानाचे स्थान मिळवून देणारे पहिले पुस्तक असे अनेकजण मान्य करतात. रिकार्डोच्या पुस्तकापेक्षा ॲडम स्मिथ यांचे ' वेल्थ ऑफ नेशन्स ' हे पुस्तक वाचायला फारच सोपे आहे. यामागचे एक कारण असे की ॲडम स्मिथ यांची लेखनशैली अधिक चांगली होती. दुसरे आणि कदाचित अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे आपले विचार समजावून सांगण्यासाठी स्मिथ दैनंदिन व्यवहारातील उदाहरणांचा उपयोग करून मूर्त स्वरूपाची मांडणी करतात. याउलट रिकार्डो यांची मांडणी अमूर्त स्वरूपाची असून त्यांची उदाहरणे काल्पनिक असतात— त्यांचा वास्तवाशी संबंध असतोच असे नाही. वैज्ञानिक पुस्तके सर्वसाधारणपणे समजण्यास कठीण आणि अनाकर्षक असतात. रिकार्डो यांचे पुस्तकही याला अपवाद नाही. असे असले तरीही त्यांचे विचार अतिशय महत्त्वाचे होते आणि आजवर होऊन गेलेल्या महान अर्थतज्ज्ञांपैकी ते एक आहेत.

त्यांच्या काही सिद्धांतांचा मर्यादित प्रमाणात विचार करणे आपल्याला येथे शक्य आहे. त्यांचा पहिला सिद्धांत " वेतनाचा वज्रसिद्धांत " म्हणून ओळखला जातो. कामगारांना त्यांच्या श्रमाचा काय मोबदला मिळतो याकडे रिकार्डोपूर्वीही अनेक लेखकांचे लक्ष वेधले गेले होते. १७६६ साली प्रसिद्ध झालेल्या ' रिफ्लेक्शन्स ऑन द फॉर्मेशन ॲंड डिस्ट्रिब्युशन ऑफ वेल्थ ' (संपत्तीची निर्मिती आणि वितरण यासंबंधी मनोगते) या छोट्याशा पुस्तकामध्ये टयुर्गॉट म्हणतात : स्वतःच्या हस्तकौशल्यावर अवलंबून असणाऱ्या कामगाराकडे दुसऱ्याला देता येण्यासारखे फक्त श्रमच असतात. कमीअधिक किंमतीला तो त्याचे श्रम विकतो. परंतु ही किंमत किती असावी हे केवळ त्याच्यावरच अवलंबून नसते. त्याला नोकरीवर ठेवणाऱ्या माणसाबरोबर केलेल्या करारा-

नुसार ती किंमत ठरते. त्याचा मालक त्याला कमीत कमी किंमत देतो आणि काम करून घेण्यासाठी अनेक कामगार उपलब्ध असल्यामुळे सर्वांत स्वस्तात काम करायला तयार असणाऱ्या कामगारालाच तो पसंत करतो. म्हणून एकमेकांशी आपल्या श्रमाची किंमत कमी करायला कामगारांना विरोधात तयार व्हावे लागते. सर्व कामगारांची मजुरी मीठ-भाकरी मिळवण्यास पुरेल इतकीच राहणे अपरिहार्य बनते आणि प्रत्यक्षात तसेच घडते. ”

ट्युरगॉट येथेच थांबले. रिकार्डो यांनी या कल्पनेचा पुढे विस्तार केला आणि म्हणूनच त्यांच्या नावाबरोबर “ वेतनाचा वज्र-सिद्धांत ” जोडला जातो. स्वतःला आणि स्वतःच्या परिवाराला जिवंत ठेवता येईल एवढीच मजुरी कामगारांना मिळते ही गोष्ट रिकार्डो यांनी पुढील शब्दांत मांडली : “ श्रमाची नैसर्गिक किंमत कामगाराला आणि त्याच्या कुटुंबाला लागणाऱ्या अन्न, वस्त्र वगैरेच्या किंमतीवर अवलंबून असते. अन्न आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्यास श्रमाची नैसर्गिक किंमत वाढते; या वस्तूंची किंमत कमी झाल्यास श्रमाची नैसर्गिक किंमत कमी होते. ”

परंतु काही काही वेळेला कामगारांना उदरनिर्वाहापेक्षा अधिक मजुरी मिळते तर काही वेळेला त्यापेक्षा कमी मिळते हे आपल्याला ठाऊक आहे. रिकार्डो ही गोष्ट विचारात घेतात. श्रमाचा बाजारभाव आणि श्रमाची नैसर्गिक किंमत यांमध्ये त्यांनी फरक केला. “ मागणी आणि पुरवठा यांच्या नैसर्गिक संतुलनामधून श्रमासाठी प्रत्यक्षात मोजली जाणारी किंमत म्हणजेच बाजारभाव ठरतो. श्रमाचा पुरवठा (मागणीच्या तुलनेने) कमी असला तर श्रमाचा बाजारभाव अधिक असतो, जर पुरवठा जास्त असला तर तो कमी होतो. श्रमाच्या या बाजारभावात विशिष्ट वेळी श्रमाच्या नैसर्गिक किंमतीपेक्षा कितीही फरक असला तरीही क्रयवस्तूंप्रमाणेच श्रमाचा बाजारभावही (लांब पल्ल्याचा विचार करता) नैसर्गिक किंमतीच्या आगेमागेच असतो. ”

या शेवटच्या विधानाची सत्यता पटवून देण्यासाठी, आणि बाजारभाव नैसर्गिक किंमतीच्या आगेमागेच असतो हे दाखवण्यासाठी, माल्थस यांच्या पुस्तकामधील काही गोष्टींचा रिकार्डो उपयोग करतात. ते म्हणतात की, श्रमाची किंमत जास्त ठरते — म्हणजेच आपल्या कुटुंबाच्या गरजेपेक्षा जेव्हा कामगारांना जास्त मजुरी मिळते — तेव्हा आपल्या कुटुंबाचा आकार वाढवण्याकडे त्यांचा कल असतो. अशा तऱ्हेने कामगारांची संख्या वाढल्यावर त्यांच्या श्रमांची बाजारपेठेतील किंमत कमी होते. जेव्हा श्रमाचा बाजारभाव कमी असतो, तेव्हा कुटुंबाच्या गरजेपेक्षा कमी मजुरी कामगारांना मिळाल्यामुळे त्यांची संख्या कमी झाल्यामुळे श्रमाचा बाजारभाव वाढतो.

अशा रीतीने रिकार्डो यांच्या वेतनसिद्धांतानुसार लांब पल्ल्याचा विचार करता, “ स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी आणि कुटुंबाच्या आकारमानात फारशी वाढ किंवा घट न होता वंशाचा दिवा तेवत ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या ” वेतनापेक्षा कामगारांना कधीही अधिक वेतन मिळणे शक्य नाही.

रिकार्डो यांच्या सर्वांत प्रसिद्ध अशा खंडविषयक नियमाच्या आकलनासाठी, इंग्लंडमध्ये रिकोर्डो यांचे ‘ प्रिन्सिपल्स ’ प्रसिद्ध झाले त्या वेळी चाललेल्या कॉर्न लॉज-

संबंधीच्या वादविवादात डोकावणे आवश्यक आहे. या भांडणातील प्रतिस्पर्धी होते जमीनमालक आणि उद्योगपती.

कॉर्न लॉजद्वारा गव्हावर एक प्रकारची संरक्षणात्मक जकात बसवली होती. देशातील गव्हाची किंमत एका विशिष्ट पातळीला पोहोचण्यापूर्वी (ही पातळी काय असावी हे वेळोवेळी ठरवण्यात येई) गव्हाची आयात करायला परवानगी नव्हती.

इंग्लंडमधील गव्हाच्या लागवडीला उत्तेजन देणे हा यामागील उद्देश होता. म्हणजे अडचणीच्या काळात इंग्लंडमध्येच गव्हाचा पुरेसा पुरवठा उपलब्ध होऊ शकला असता. यासाठी इंग्लिश शेतकऱ्याच्या अन्नधान्याला चांगली किंमत देऊन धान्योत्पादनाला प्रोत्साहन देण्यात येई. देशाबाहेरील गव्हाच्या उत्पादनामुळे होऊ शकणाऱ्या स्पर्धेची काळजी करण्याचे इंग्लिश शेतकऱ्याला कारण नव्हते, कारण त्याच्या गव्हाला विशिष्ट किंमत मिळेपर्यंत बाहेरील गहू देशात येऊ शकत नव्हता. म्हणजेच मागणीच्या मानाने पुरवठा फार जास्त नसेल, तर शेतकऱ्यांना भरपूर नफा मिळणार होता—आणि १७९० पासून पुढे, इंग्लंडमध्ये पुरवठा कधीही जास्त नव्हता.

नेपोलियनकालीन युद्धांमुळे गव्हाची किंमत वधारली आणि अधिकाधिक जमीन गव्हाच्या लागवडीखाली येऊ लागली. गव्हाला चांगली किंमत मिळावी असे जमीनमालकांना वाटे, कारण त्यामुळे त्यांना अधिक खंड मिळाला असता—म्हणजेच त्यांचे खिसे अधिक भरले असते. परंतु उद्योगपतींना मात्र गव्हाची जास्त किंमत मान्य नव्हती. कारण गव्हाची किंमत जास्त झाल्यास, कामगारांच्या उदरनिर्वाहाचा खर्च वाढे. हा खर्च भागवण्यास आधीची मजुरी कमी पडू लागल्याने कामगारांमध्ये असंतोष फैलावून संपाची लाट उठे. असे झाले की अखेर मजुरीचे दर वाढून उद्योगपतींच्या खिशातून पैसा बाहेर पडे. त्यामुळे संरक्षणात्मक जकात मागणारे जमीन-मालक आणि खुल्या व्यापाराचा पुकारा करणारे उद्योगपती यांच्यामध्ये द्वंद्व जुंपले.

रिकार्डो या रणधुमाळीच्या अगदी केंद्रस्थानी होते. ते स्वतःच ताज्या दमाच्या भांडवलदारवर्गातील असल्यामुळे त्यांची उद्योगपतींना सहानुभूती होती, म्हणूनच खंडाचे स्वरूप समजावून सांगणाऱ्या नैसर्गिक नियमांचा शोध लावताना "गव्हाच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने जमीनमालक सोडल्यास इतर सर्व वर्गांचे नुकसान होईल." असे ते दाखवून देतात यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

रिकार्डो या निर्णयाप्रत कसे काय येतात ? गव्हाची किंमत जास्त असेल तर खंडाची वसुलीही जास्त होईल असे ते दाखवून देऊन जमिनीची मर्यादित व्याप्ती आणि वेगवेगळ्या जमिनींच्या कसातील फरक यामुळे खंड अस्तित्वात येतो असा रिकार्डो यांचा युक्तिवाद आहे. "जमीन अमर्याद असून तिचा कस सर्वत्र सारखाच असेल तर तिच्या वापरासाठी काहीच खंड आकारता येणार नाही...जमीन मर्यादित असते, वेगवेगळ्या ठिकाणच्या जमिनींच्या कसामध्ये फरक असतो आणि लोकसंख्येच्या वाढीबरोबर कमी कसाच्या जमिनी लागवडीखाली येतात. यामुळे जमिनीच्या वापरासाठी खंड आकारण्यात येतो. समाजाच्या प्रगतिपथावर जेव्हा दुय्यम प्रतीच्या जमिनी लागवडीखाली येतात, तेव्हा पहिल्या प्रतीच्या जमिनीवर खंड-आकारणीस सुरुवात होते.

या दोन प्रतींच्या जमिनींच्या कसातील फरकानुसार पहिल्या प्रतीच्या जमिनीसाठी भरण्यात येणाऱ्या खंडाचे प्रमाण ठरते.

जेव्हा तिय्यम प्रतीच्या जमिनी लागवडीखाली आणण्यात येतात तेव्हा दुय्यम प्रतीच्या जमिनींवरही खंड-आकारणीस सुरुवात होते आणि पूर्वीप्रमाणेच दुय्यम व तिय्यम प्रतीच्या जमिनींच्या कसामधील फरकावरून खंडाचे प्रमाण ठरते...वाढत्या लोकसंख्येला पुरेसा अन्नधान्य-पुरवठा करण्यासाठी निकृष्ट प्रतीच्या जमिनी लागवडीखाली आणणे देशाला भाग पडते आणि त्यामुळे कसदार जमिनीचा खंड वाढू लागतो. "

' कॉर्न लॉज 'मुळे गव्हाच्या किंमती वाढून गव्हाच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना निकृष्ट प्रतीच्या जमिनी लागवडीखाली आणणे भाग पडते असा रिकार्डो यांचा दावा होता. यामुळे अधिक सकस जमिनीवर खंड-आकारणी सुरू होते. अशा तऱ्हेने बदलत्या काळाबरोबर अधिकाधिक निकृष्ट प्रतीची जमीन लागवडीखाली येऊन खंड वाढत जातो. जमीनमालकांच्या श्रमामुळे हा खंड वाढत नाही. खरे तर ते काहीच करत नाहीत–पण तरीही त्यांना मिळणारा खंड वाढत जातो. " जमीनमालकांचे हितसंबंध हे नेहमीच ग्राहक आणि उद्योगपती यांच्याविरुद्ध असतात. धान्याच्या उत्पादनासाठी अधिक श्रम खर्ची घालावे लागले तर गव्हाची किंमत सतत जास्त राहील. गव्हाचा उत्पादन खर्च वाढल्यास जमिनीचा खंड वाढेल. म्हणूनच धान्योत्पादनाचा खर्च वाढणे हे जमीन-मालकाला हितावह ठरते. परंतु यात ग्राहकाचे हित नसते. पैसे किंवा वस्तू देऊनच धान्य खरेदी करणे शक्य असल्याने, पैसा आणि क्रयवस्तू यांच्या मानाने गव्हाची किंमत कमीच असावी असे त्याला वाटते. त्याचप्रमाणे उद्योगपतीलाही धान्याच्या भाववाढीमुळे काहीही फायदा होत नाही. उलट अन्नधान्याच्या किंमती जास्त असल्यास त्यांना मजुरीवरील खर्च वाढतो. परंतु त्याच्याकडील उत्पादित क्रयवस्तूंच्या किंमती वाढत नाहीत. "

अर्थातच या शेवटच्या वाक्यात खरी गोम होती. रिकार्डो यांच्याच वेतनसिद्धांतानुसार धान्याची किंमत कमी-जास्त असल्याने कामगारांना काहीच फरक पडणार नव्हता. त्यांना उदरनिर्वाहापुरती मजुरी मिळणारच होती. जर धान्याची किंमत जास्त असेल तर मजुरी वाढेल, जर ती कमी असेल तर मजुरी कमी होईल. परंतु उद्योगपतींसाठी मात्र फरक पडणार होता. धान्याच्या किंमती वाढल्याने मजुरी वाढली आहे असे सांगून ते त्यांच्या उत्पादित क्रयवस्तूंच्या किंमती वाढवू शकत नव्हते. यानंतर जमीन मालक आणि उद्योगपती यांच्या समाजोपयोगी कामाची रिकार्डो तुलना करतात आणि यातही जमीन मालकांचीच बाजू लंगडी असल्याचे त्यांना आढळून येते : " जमीन मालक आणि इतर लोक यांच्यामधील व्यवहार व्यापारी व्यवहारासारखा नसतो. व्यापारामध्ये विक्रेता आणि ग्राहक या दोघांचाही फायदा होतो, तर या व्यवहारामध्ये एका बाजूला केवळ फायदा आणि दुसऱ्या बाजूला केवळ तोटा सहन करावा लागतो. "

संरक्षणात्मक जकातीवर हल्ला चढवण्यासाठी बांधलेल्या शस्त्रागारात उद्योगपतींनी रिकार्डो यांच्या नैसर्गिक नियमांची भर घातली. ' कॉर्न लॉज ' मोडीत काढून खुल्या व्यापाराचे साम्राज्य त्यांना प्रस्थापित करायचे होते. परंतु कायदेमंडळावर जमीन

मालकांची अधिसत्ता होती आणि बराच काळपर्यंत (१८४६ पर्यंत) ' कॉर्न लॉज ' तसेच राहिले. त्याचप्रमाणे स्वस्त अन्नधान्य मिळण्यामध्ये देशाला काहीच लाभ होणार नाही असे वाटणाऱ्या जमीन मालकांना कारखान्यामधील कामाचे तास आणि कामाची परिस्थिती याबद्दल अधिकाधिक चिंता वाटू लागली. उद्योगवादाचे दुष्परिणाम कमी व्हावेत यासाठी ओरडा करणाऱ्या मानवतावाद्यांना आता मस्तवाल जमीन मालकांचा पाठिंबा मिळाला. ' कॉर्न लॉज 'ना विरोध करणाऱ्या उद्योगपतींशी या जमीनमालकांना दोन हात करायचे होते. त्यासाठी त्यांनी आपले पहिले शस्त्र उपसले. कारखान्यामधील परिस्थितीची पाहणी करण्यासाठी कायदेमंडळाने समित्या नेमल्या आणि या समित्यांनी आपले अहवाल सादर केले. कामाचे तास कमी करण्यासाठी कायदे संमत करून घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. अर्थातच त्याला उद्योगपतींनी कडाडून विरोध केला. कामगारांनी यंत्रावर काम करण्याच्या वेळात कपात केली तर आपली दुर्दशा होईल असा टाहो फोडायला उद्योगपतींनी सुरुवात केली. परंतु कामगार, मानवतावादी आणि जमीनमालक यांच्या एकत्रित परिश्रमांना यश आले आणि कामाचे तास व कारखान्यातील स्थिती यांचे नियमन करणारे फॅक्टरी ॲक्ट्स (कारखाना विषयक कायदे) अस्तित्वात आले. कामाचे तास आणखी कमी करण्यासाठी व कार्यपरिस्थिती सुधारण्यासाठी चळवळ त्यानंतरही चालूच राहिली.

नास्सो सिनियर या अर्थतज्ज्ञाने कामाचे तास आणखी कमी करता येणार नाहीत हे ' सिद्ध ' करणारा एक सिद्धान्त मांडला. उद्योगपतीचा नफा कामगारांच्या कामाच्या शेवटच्या तासामधून निर्माण होत असल्याने तो तास काढून टाकल्यास नफ्याच्या मुळावरच घाव बसेल आणि उद्योगधंद्याला हादरे बसतील असा त्यांचा दावा होता. " सध्याच्या कायद्यानुसार अठरा वर्षांखालील माणसांना नोकरीला ठेवणाऱ्या कोणत्याही कारखान्याला आठवड्यातील पाच दिवस प्रत्येकी बारा तास आणि शनिवारी प्रत्येकी नऊ तास यापेक्षा कामाचे तास जास्त ठेवता येणार नाहीत. या नियमाप्रमाणे सुरू असणाऱ्या कारखान्यामध्ये संपूर्ण निव्वळ नफा हा केवळ **शेवटच्या तासामधून** निर्माण होतो हे खाली दिलेल्या विश्लेषणावरून स्पष्ट होईल. "

सिनियर यांचे विश्लेषण अत्यंत काल्पनिक अशा उदाहरणावर आधारित होते. त्यामधील अंकगणित बरोबर असले तरीही निष्कर्ष चुकीचे होते. कारखान्यांनी अनेक कामाचे तास कमी करूनही त्यांचा धंदा बुडीत निघाला नाही यावरून ते निष्कर्ष चुकीचे असल्याचे सिद्ध झाले आहे.

सिनियर यांच्या शेवटच्या तासाच्या विश्लेषणापेक्षाही वेतन-निधीचा सिद्धान्त कामगारांना अधिक अपायकारक होता. अनेक अर्थतज्ज्ञांचा यावर विश्वास होता आणि शाळा-कॉलेजात शिकवण्यात येत असल्यामुळे तो अधिक धोकादायक ठरला. शेवटच्या तासाचे तत्त्व कामाचे तास कमी करण्यासाठी चाललेल्या चळवळीच्या विरोधात वापरण्यात आले तर वेतन-निधीचे तत्त्व वेतनवाढीसाठी असलेल्या चळवळीच्या विरोधात उपयुक्त ठरले.

कामगार ट्रेड युनियन्सचे सभासद होतात आणि मजुरीमध्ये वाढ मिळावी यासाठी संप करतात. हा " शुद्ध वेडेपणा " आहे असे अर्थतज्ज्ञांचे म्हणणे होते. पण का ? मजुरीचा खर्च भागवण्यासाठी एक विशिष्ट निधी वेगळा काढण्यात येतो. तसेच वेतनावर काम करणाऱ्या लोकांची एक विशिष्ट संख्या असते. हा निधी आणि कामगारांची संख्या यावरून वेतनाचे प्रमाण निश्चित होते. आणि बस्स. या बाबतीत काहीही बदल करणे ट्रेड युनियन्सना शक्य नव्हते.

यासंबंधीची जॉन स्टुअर्ट मिल यांची मांडणी पाहा : " भांडवल आणि लोकसंख्या यांच्या प्रमाणावर वेतनाची पातळी अवलंबून असते एवढेच नव्हे, तर (भांडवली) स्पर्धेची अधिसत्ता असताना इतर कशानेही ती पातळी बदलता येत नाही. लोकांना नोकरीवर ठेवण्यासाठी लागणारा निधी वाढला किंवा नोकरीवर असणाऱ्या कामगारांची संख्या कमी झाली, तरच वेतनामध्ये वाढ होऊ शकते. त्याचप्रमाणे वेतननिधीमध्ये घट झाली किंवा कामगारांची संख्या वाढली, तरच वेतनाची पातळी खाली येते. "

अगदीच सोपे. वेतननिधी वाढल्याखेरीज किंवा कामगारांची संख्या कमी झाल्याखेरीज कामगारांना कसलीच आशा नाही. म्हणजे आपल्या उदरनिर्वाहासाठी अधिक वेतनाची गरज आहे असे आडमुठे धोरण स्वीकारणाऱ्या कामगारांना प्राथमिक गणिताचे धडे देणे आवश्यक होते : गणिताच्या चार मूलभूत नियमांपैकी कुठल्याही नियमाविरुद्ध वाद घालण्यात काहीही अर्थ नाही. मजुरीचा प्रश्न हा भागाकाराचा प्रश्न आहे. या भागाकाराने आलेली संख्या फार लहान असल्याची तक्रार करण्यात येते. आता ही संख्या वाढविण्यासाठी किती मार्ग उपलब्ध आहेत ? दोन. भाजक तोच ठेवून भाज्यसंख्या मोठी करा, म्हणजे भागाकाराने आलेली संख्या मोठी असेल. नाही तर भाज्य कायम ठेवून भाजक संख्या लहान करा, म्हणजेही भागाकाराची संख्या मोठी होईल. "

सगळे अगदी सरळसोट होते. वेतन वाढवण्याचे दोन मार्ग उपलब्ध होते. " भाजक संख्या कमी करण्याचा " दुसरा मार्ग म्हणजे कामगारांची संख्या कमी करण्याचा मार्ग— हा यापूर्वीही कामगारांना सुचवण्यात आला होता. माल्थस यांनी त्याला " नैतिक निर्बंध " असे नाव दिले होते.

" भाज्य – संख्या वाढवण्याचा " पहिला मार्ग, म्हणजे वेतन निधीमध्ये वाढ करण्याचा मार्ग कोणता ? सिनियर यांच्या मते, " प्रत्येक माणसाला त्याला सर्वाधिक लाभदायक ठरू शकेल अशा मार्गाचा अवलंब करायला मुभा देणे; काही वेळेला हेतुपुरस्सर अज्ञान दाखवून, काही वेळेला (लोकांबद्दलच्या) दयेखातर, तर काही वेळेला राष्ट्रवादी मत्सरापोटी कायदेमंडळाने जे अनेक निर्बंध, नियंत्रणे आणि संरक्षणात्मक कर बसवून उद्योगधंद्यांवर दबाव आणला आहे, त्यापासून उद्योगधंद्यांना मुक्त करणे " हाच तो मार्ग होता. उद्योगधंद्यांना रान मोकळे करा म्हणजे वेतनासाठी बाजूला काढलेल्या निधीमध्ये वाढ होईल. उद्योगपतींनी या युक्तिवादाला तात्काळ अनुमोदन दिले.

कामगार आणि युनियन्स यांच्या मागण्यांना उद्योगपती आणि अर्थतज्ज्ञ यांचे ठरलेले उत्तर होते-वेतन–निधीचा सिद्धांत. कामगारांना त्याचा काहीच उपयोग नव्हता; कारण

तो खोटा असल्याचे त्यांना ठाऊक होते. ट्रेड युनियन कृतीद्वारे वेतनवाढ मिळते हे त्यांनी अनुभवले होते. मजुरीचा खर्च भागवण्यासाठी एक विशिष्ट निधी वेगळा काढून ठेवण्यात येतो यावर त्यांचा अजिबात विश्वास नव्हता. त्यांचा अनुभव सैद्धांतिक पातळीवर खरा असल्याचे फ्रान्सिस वॉकर या अमेरिकन अर्थतज्ज्ञाने दाखवून दिले. १८७६ साली वॉकर यांनी खालील युक्तिवाद करून वेतन-निधी सिद्धान्ताच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवल्या : "आधीच्या उद्योगधंद्यांमधून बचत केलेल्या भांडवलामधून मजुरीचा खर्च भागवण्यात येतो हा वेतनासंबंधीच्या सर्वमान्य सिद्धान्ताचा पायाभूत आधार आहे. यामुळे वेतन देण्यासाठी भांडवल-निधी प्रमाणभूत मानला जातो. पण खरे तर सध्या चालू असलेल्या उद्योगधंद्यामधूनच मजुरीचा खर्च भागवण्यात येतो आणि म्हणून वेतन देण्यासाठी उत्पादन प्रमाणभूत मानले पाहिजे असे माझे प्रतिपादन आहे...स्वतःच्या पैसा खर्च करण्यासाठी नव्हे, तर श्रम खरेदी करण्यासाठी उद्योगपती वेतन देतो...त्या श्रमाच्या उपयोगातून निर्माण होणाऱ्या उत्पादनावर उद्योगपतीचा डोळा असतो आणि त्या उत्पादनाचा प्रकार व किंमत यावरूनच मजुरीचे प्रमाण निश्चित होते...म्हणजेच स्वतःकडे असलेल्या पैशाच्या साठ्याचा विनियोग करण्यासाठी नव्हे, तर भविष्यकाळात उत्पादन करण्यासाठी कामगारांना कामावर ठेवण्यात येते. उद्योगपतीजवळ असणाऱ्या किंवा त्याच्या हाती लागू शकणाऱ्या संपत्तीवरून नव्हे, तर उत्पादित वस्तूंच्या मूल्या-वरूनच कामगारांच्या मजुरीची पातळी निश्चित होते. म्हणजेच भांडवलावरून नव्हे तर उत्पादनावरून रोजगाराची पातळी ठरते आणि म्हणून उत्पादनच मजुरी निश्चित करणारे परिमाण ठरते."

जपान आणि भारत या देशांमधील कापड-गिरण्यांमध्ये आज प्रचलित असलेल्या "वेतन-गोठवणुकीच्या" पद्धतीवरून, वेतन म्हणजे भांडवलामधून कामगारांना देण्यात येणारी आगाऊ रक्कम नव्हे या वॉकर यांच्या युक्तिवादामधील सत्याची चांगलीच साक्ष पटते. जपानमध्ये "रेशीम गिरण्यांमध्ये आणि कापडगिरण्यांमध्ये काम करणाऱ्या मुलींची मजुरी सरळ त्यांच्या आईवडिलांच्या हाती सोपवण्यात येते . काही ठिकाणी ही मजुरी सहा महिन्यांनी देण्यात येते किंवा रेशीम गिरण्यांमध्ये वर्षभर काम केल्यावर एकदम वर्षाची मजुरी देण्यात येते . (आणि भारतामध्ये) सहा आठवडे किंवा एक महिना झाल्यानंतर मजुरी देण्यात येते...एवढेच नव्हे तर आधी मिळवलेल्या मजुरींवर थोडी आगाऊ रक्कम दिल्यास पुन्हा येणाऱ्या पगाराच्या दिवसापर्यंत ९ टक्क्याने व्याजही आकारण्यात येते."

परंतु वेतन-निधी सिद्धांताचा फोलपणा सिद्ध करण्यासाठी विसाव्या शतकापर्यंत थांबण्याचीही जरूरी नव्हती. अगदी सुरुवातीपासून हा सिद्धांत आपल्या अनुभवांशी संपूर्णपणे विसंगत असल्यामुळे कामगारवर्गाने ठोकरला होता. या सिद्धांतामध्ये सत्याचा अंशही नाही हे सिद्ध करण्यासाठी १८७६ साली वॉकर यांनी अमेरिकन जीवनातील अनेक उदाहरणे सादर केली. आणि वेतन-निधी सिद्धांतासाठी तयार केलेली शवपेटी वॉकर यांनी गाडून टाकण्यापूर्वीच सात वर्षे इतर अर्थतज्ज्ञांनी वेतन-निधीचा नैसर्गिक नियम हा नियमच नसल्याचे मान्य करण्यास सुरुवात केली होती. १८४८ साली प्रसिद्ध

झालेल्या ' प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ' (राजकीय अर्थशास्त्राची मूलतत्त्वे) या पुस्तकाद्वारे हा सिद्धांत फार मोठ्या प्रमाणावर प्रचलित करणाऱ्या जॉन स्टयुअर्ट मिल यांनीच मे १८६९ मध्ये ' फोर्टनाइट्ली रेव्ह्यू ' या पाक्षिकासाठी एका पुस्तकाचे परीक्षण करताना अशा प्रकारे माघार घेतली : " ट्रेड युनियन्स वेतनवाढ मिळवू शकतात हे अमान्य करणारा किंवा बाजारपेठेतील स्पर्धेमुळे अगोदरच शक्य झालेली वेतनवाढ मिळवण्यापर्यंतच ट्रेड युनियन्सच्या कार्याची सीमा ठरविणारा, (माझ्यासकट) आजवर अनेक अर्थतज्ज्ञांनी मांडलेला सिद्धांत शास्त्रीय पायावर आधारित नसल्यामुळे, निकालात काढला पाहिजे. "

असे लिहिणे ही जे. एस. मिल यांच्या दृष्टीने एक शौर्याची गोष्ट होती. त्यांनी एक चूक केली आणि प्रामाणिकपणे ती चूक मान्य केली. पण कामगारांच्या दृष्टीने आता फार उशीर झाला होता—त्यांना अर्ध्या शतकाहून अधिक काळ ग्रासणाऱ्या सिद्धांताला फार उशिरा मूठमाती देण्यात येत होती. प्रत्येक वेळी पुढे पाऊल टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या कामगारांच्या शत्रूला बंदुकीच्या दारूचे कोठार खुले करून देणाऱ्या, कामगारांना जीवनमान सुधारण्यासाठी कोणताही आशेचा किरण नाही हे दाखवणाऱ्या आणि प्रत्येक वेळी उद्योगपतींचे हितसंबंध जोपासणाऱ्या या विज्ञानाबद्दल (अर्थशास्त्राबद्दल) कामगारांना काडीमात्रही आस्था वाटणे शक्य नव्हते.

अर्थशास्त्रावर अविश्वास दाखवण्यास कामगारांपाशी खरोखरच आधार होता हे प्राध्यापक जे. इ. केअर्नस या एका अभिजात अर्थतज्ज्ञानेच मान्य केले आहे. १८७३ साली प्रसिद्ध केलेल्या ' एस्सेज इन पोलिटिकल इकॉनॉमी ' (राजकीय अर्थशास्त्रावरील लेख) या आपल्या पुस्तकामध्ये, अर्थशास्त्र म्हणजे भांडवलदारवर्गाचे शास्त्र असल्याचे केअर्नस दाखवून देतात : " विशेषतः कष्टकरी वर्गाबद्दल घेतल्या जाणाऱ्या भूमिकांबाबत अनेकदा राजकीय अर्थशास्त्र काटेकोर नियमांची जंत्री, साचेबंद हुकूमनामे, विशिष्ट प्रकारच्या सामाजिक व्यवस्थेची तळी उचलून धरणारी आणि इतर व्यवस्थांवर आग पाखडणारी आडमुठी तत्त्वमालिका, असे बुरखे धारण करते. माणसांकडून विचार नव्हे, तर आज्ञापालन त्यात अपेक्षित असते. आता राजकीय अर्थशास्त्राच्या नावाखाली जगाला देण्यात येणाऱ्या साचेबंद हुकूमनाम्यांचा जर आपण विचार केला—, आज अस्तित्वात असलेल्या समाजव्यवस्थेला आदर्शत्वाची झूल चढवण्याचेच काम हे हुकूमनामे मुख्यतः करतात असे मला वाटते—तर आपण ज्या औद्योगिक व्यवस्थेचा एवढा उदोउदो करतो, ज्या तथाकथित आर्थिक नियमांचा काही प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ इतका गाजावाजा करतात त्याबद्दल इतर लोकांना केवळ तिरस्कारच का वाटतो ? ते त्याला कडवा विरोध का करतात हे आपल्या लक्षात येईल. राजकीय अर्थशास्त्र संपांचा निषेध करते, कामाचे तास कमी करण्याच्या सूचनांकडे संशयी वृत्तीने पाहाते, पण भांडवलसंचयाला मान्यता देते आणि मजुरीचे प्रचलित दर योग्यच असल्याची ग्वाही देते. हे एखाद्या कामगाराला सांगितल्यावर ' राजकीय अर्थशास्त्र कामगाराच्या विरुद्ध असल्याने, कामगाराने राजकीय अर्थशास्त्राच्या विरोधात उभे ठाकणे योग्यच आहे. ' असे उत्तर त्या कामगाराकडून स्वाभाविकच मिळेल. अशा या तत्त्वमालिकेकडे संशयाने

पाहणे आणि ही सगळी जंत्री उद्योगपतींच्या फायद्यासाठीच उभी करण्यात आली आहे असे वाटून कामगारांनी तिचा निषेध करून ती झिडकारून टाकणे यात अनैसर्गिक असे काहीच नाही. "

" राजकीय अर्थशास्त्र कामगारांविरुद्ध होते " हे खरेच. तसेच ते उद्योगपतींच्या– विशेषतः इंग्लंडच्या उद्योगपतींच्या–फायद्यासाठी होते हेही खरे. अभिजात अर्थतज्ज्ञांची शिकवण फ्रान्स आणि जर्मनीमध्ये पसरली आणि एकोणिसाव्या शतकातील पहिल्या पंचवीस वर्षांत या देशांमध्ये अर्थशास्त्रावर प्रसिद्ध झालेली पुस्तके मुख्यत्वेकरून इंग्लिश अर्थतज्ज्ञांच्या पुस्तकांची भाषांतरे होती किंवा त्यांच्या लिखाणांची ओळख करून देणारी होती. पण हळूहळू या दोन्ही देशांतील विचारवंतांना अभिजात अर्थशास्त्र म्हणजे उद्योगपतींसाठी असलेले सर्वसाधारण स्वरूपाचे सिद्धांत नव्हते तर खास इंग्लिश उद्योगपतींसाठी असलेलेच सिद्धांत होते हे स्पष्ट होऊ लागले. याचा अर्थ इंग्लिश उद्योगपतींना मदत करण्यासाठीच अभिजात अर्थतज्ज्ञांनी जाणीवपूर्वक परिश्रम घेतले होते असे नव्हे. तशी गरज नव्हती. एका विशिष्ट काळी ते इंग्लंडमध्ये राहात असल्याने त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचा ठसा त्यांच्या विचारांवर उमटला होता. ही गोष्ट इतर देशांतील उद्योगपती आणि अर्थतज्ज्ञ यांच्या ध्यानात आली.

आपण खुल्या व्यापाराचेच उदाहरण घेऊ. ॲडम स्मिथ यांनी त्याची घोषणा केली होती आणि त्यानंतरच्या रिकार्डो वगैरे लोकांनीही त्याचा पाठपुरावा केला. संपूर्ण जगभर खुला व्यापार असावा, केवळ देशांतर्गतच नव्हे तर विविध देशांमधील व्यापाराच्या आड येणारे अडथळे दूर करावेत असा त्यांचा आग्रह होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर खुल्या व्यापाराला पाठिंबा देणारा युक्तिवाद रिकार्डो स्पष्टपणे करतात : " खुल्या व्यापारामुळे प्रत्येक देश स्वतःला सर्वाधिक फायदेशीर ठरणाऱ्या उद्योगांकडे आपले भांडवल आणि श्रमपुरवठा वळवतो. प्रत्येकाने वैयक्तिक फायद्याकरता केलेल्या कृतीमुळे सर्वांचेच भले होते. उद्योगाला चालना देऊन, कल्पकतेला इनाम देऊन आणि नैसर्गिक शक्तींचा अतिशय कार्यक्षम उपयोग करून, ही व्यवस्था श्रमाचे वाटप सुयोग्य व परिणामकारक रीतीने करते. यामुळे उत्पादनात प्रचंड वाढ होऊन त्याचे फायदे सर्वदूर पसरतात आणि आर्थिक धाग्याने बांधलेल्या अनेक राष्ट्रांचा समाज सुसंस्कृत जगात आकार घेऊ लागतो. फ्रान्स आणि पोर्तुगाल या देशांमध्ये गोड-मद्याची निर्मिती व्हावी, अमेरिका व पोलंड या देशांमध्ये गव्हाची लागवड व्हावी आणि इंग्लंडमध्ये यंत्रसामुग्रीची निर्मिती व्हावी हे याच तत्त्वाच्या आधारे निश्चित होते. "

वरील उताऱ्यामध्ये, आंतरराष्ट्रीय पातळीवरील वस्तूंच्या खुल्या व्यापाराबद्दलचें रिकार्डो यांचे म्हणणे कदाचित बरोबर कदाचित चूकही असू शकेल. परंतु **त्यांच्या समकालीन इंग्लंडचा विचार करता** त्यांचे म्हणणे बरोबर होते याबद्दल वादच नाही. औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्ये प्रथम झाली होती. उत्पादनाच्या पद्धती, यंत्रसामुग्री, उत्पादित मालाची वाहतूक या बाबतींत जगातील इतर कोणाही उद्योगपतींपेक्षा इंग्लंडचे उद्योगपती आघाडीवर होते. त्यांच्या कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या वस्तूंनी भूभाग व्यापणे

इंग्रजांना शक्य होते. आंतरराष्ट्रीय पातळीवर खुला व्यापार ही त्यांच्याकरता पर्वणीच ठरणार होती.

म्हणूनच असा व्यापार इतर देशातील उद्योगपतींना मानवणारा नव्हता. अमेरिकेमध्ये अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी वॉशिंग्टनच्या कारभारात संरक्षणात्मक जकात-व्यवस्थेचा अंतर्भाव केला. इतर देशांनीही व्यापाराला अडथळा करणाऱ्या जकातीच्या उंच भिंती उभारल्या, परंतु इंग्लिश अभिजात अर्थशास्त्राचा प्रभाव असलेल्या या लोकांनी खुल्या व्यापाराच्या संकल्पनेशीही प्रणयचेष्टा सुरू केल्या.

जेव्हा आंतरराष्ट्रीय खुल्या व्यापाराच्या फायद्यासंबंधीचे इंग्लिश पोवाडे इतर देशांमध्ये लोकप्रिय होऊ लागले होते त्याच वेळेला, १८४१ साली त्यावर हल्ला चढवणारे ‘ नॅशनल सिस्टम ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ’ (राजकीय अर्थशास्त्राची राष्ट्रीय व्यवस्था) हे पुस्तक फ्रीडरिश लिस्ट यांनी प्रसिद्ध केले. त्या काळी जर्मनीमध्ये उद्योगधंदे बाल्या-वस्थेत होते, पुरेसे विकसित नव्हते आणि लिस्ट हे जर्मन नागरिक होते. त्यांनी काही वर्षे अमेरिकेत काढली होती आणि अमेरिकन उद्योगधंद्यांबाबतही तेच खरे असल्याचे त्यांना आढळून आले होते. जर आंतरराष्ट्रीय व्यापार खुला केला तर इंग्लंडपेक्षा मागासलेल्या देशांतील उद्योगधंद्यांना इंग्लंडची बरोबरी करण्यास—कधी काळी ते शक्य झाले तर—खूप काळ लागेल. कमी विकसित देशांनी विकसित देशांशी बरोबरी केल्या-नंतर खुल्या व्यापाराला त्यांचा विरोध नव्हता. “ काही दुर्दैवामुळे जर एखादे राष्ट्र उद्योग-धंदे, व्यापार आणि नौकानयन या बाबतीत इतर राष्ट्रांच्या मागे असेल, आणि याच बरोबर या गोष्टी विकसित करण्यासाठी आवश्यक असलेली भौतिक व बौद्धिक साधने त्या राष्ट्रापाशी असतील तर कालांतराने प्रगत राष्ट्रांशी खुल्या स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी प्रथम स्वतःचे स्थान मजबूत करण्यावर त्या राष्ट्राने भर दिला पाहिजे. ”

वस्तू स्वस्त असणेच सर्वात महत्त्वाचे असते असे नव्हे, तर स्वस्त वस्तूही महाग पडू शकतात असे त्यांचे म्हणणे होते. एका विशिष्ट वेळेला देशात असणाऱ्या मूल्यांच्या साठ्यावरून नव्हे, तर मूल्ये उत्पादित करण्याच्या क्षमतेवरून देशाचे मोठेपण ठरते. “ **संपत्तीमागील कारणे** ही **खुद्द संपत्ती**पेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. एखाद्या माणसाकडे संपत्ती असेल... परंतु जेवढ्या वस्तू तो खर्च करतो त्यापेक्षा अधिक मूल्य असलेल्या वस्तूंचे उत्पादन करण्याची क्षमता जर त्याच्याकडे नसेल तर कालांतराने तो गरीब बनेल...म्हणूनच **खुद्द संपत्ती**पेक्षाही **संपत्ती निर्माण करण्याची क्षमता** ही शतपटीने अधिक महत्त्वाची आहे...आणि एखाद्या व्यक्तीपेक्षाही संपूर्ण राष्ट्राच्या बाबतीत हे अधिकच खरे आहे. ”

खुला व्यापार हे घोषवाक्य बनण्यापूर्वीच इंग्लंडने (औद्योगिक आघाडीवर) अग्रक्रम मिळवल्याने आज इतर राष्ट्रांना तो मार्ग चोखाळणे इंग्लंड अशक्य करीत आहे असा लिस्ट यांचा दावा होता : “ उन्नतीच्या शिखरावर पोहोचल्यावर ते इतरांना गाठता येऊ नये म्हणून ज्या शिडीने आपल्याला शिखर गाठणे शक्य झाले ती शिडीच ढकलून देणे ही तर एक नेहमीचीच युक्ती आहे. ”

म्हणूनच, स्वतःच्या पायांवर उभे राहीपर्यंत, देशातील उद्योगांना देशाची बाजारपेठ राखून ठेवण्यासाठी आणि त्यायोगे बाल्यावस्थेतील एतद्देशीय उद्योगांना चालना देण्यासाठी, संरक्षणात्मक जकातीची भरभक्कम तटबंदी बांधावी अशा धोरणांचा लिस्ट यांनी पुरस्कार केला. त्यांच्या पायांमध्ये पुरेशी ताकद आल्यानंतरच जगातील खुल्या व्यापाराच्या ऑलिम्पिक शर्यतींमध्ये भाग घेण्यासाठी त्यांना पाठवणे योग्य होते. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेऐवजी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे लिस्ट हे एक प्रभावी विचारवंत होते. विशेषतः जर्मनी आणि अमेरिका या देशांमध्ये त्यांच्या विचारांचा प्रभाव फारच मोठा होता.

अभिजात अर्थशास्त्रीय विचारसरणीच्या खात्रीलायकतेबद्दल अविश्वास दाखवणाऱ्या लोकांचा एक गट आता युरोपात वाढीस लागला होता. ॲडम स्मिथ आणि त्यांचे अनुयायी यांनी प्रतिपादन केलेल्या खुल्या व्यापाराच्या सिद्धांताविरुद्ध संरक्षणात्मक जकातीचा पुरस्कार करणारे लिस्ट हे त्यांच्यापैकीच एक होते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात इतके प्रभावी ठरलेले आणि प्रचलित झालेले अभिजात अर्थशास्त्र एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात काही बाबतीत फिके पडू लागले. त्या सुमारास, अभिजात अर्थतज्ज्ञांनी प्रतिपादन केलेल्या काही तत्त्वांना आत्मसात करून, एका वेगळ्या दिशेने त्यांचा विकास करून, संपूर्णतया वेगळे निष्कर्ष काढणाऱ्या एका माणसाचे लेखनकार्य प्रकाशात येऊ लागले. तो माणूसदेखील जर्मनच होता. त्याचे नाव होते कार्ल मार्क्स.

◇ ◇ ◇

१८

" जगभरच्या कामगारांनो, एक व्हा ! "

" माझ्याकडे एक कोटी रुपये असते तर ! " अशी सुरम्य कल्पना आपल्याला अनेकदा सुखावून जाते. वर्तमानपत्रामध्ये लॉटरीचे बक्षीस मिळालेल्या लोकांची नावे वा फोटो झळकले की एकदा तरी आपल्याला असे वाटते. आज अस्तित्वात असलेल्या समाजापेक्षा शतपटीने चांगल्या समाजाबद्दल मनोराज्ये बांधण्यात अशाच प्रकारे बराच वेळ घालवणारे अनेक लोक आजवर होऊन गेले आहेत. बहुतेक वेळा ही मनोराज्ये दिवास्वप्नांच्या पलीकडे जाऊ शकलेली नाहीत. परंतु काही काही वेळेला मात्र या स्वप्नाळू लोकांनी अवकाशात उंच भराऱ्या मारून, स्वतःच्या कल्पनांवर प्रचंड परिश्रम घेऊन भविष्यातील आदर्श समाजाबद्दलची त्यांची दिवास्वप्ने- रामराज्याची कल्पना—शब्दबद्ध केली आहेत.

वास्तविक पाहता असे स्वप्नरंजन कठीण नव्हते. कल्पनाशक्ती असलेल्या कोणाही माणसाला ते जमले असते. जगाकडे उघड्या डोळ्यांनी पाहिले म्हणजे आदर्श समाजात कुठल्या गोष्टी नसाव्यात हे सहज ध्यानात येते. सगळीकडे गरीब माणसे दिसतात, मग रामराज्यात ती असू नये. वस्तूंचे उत्पादन आणि वितरण यांमध्ये नासधूस चाललेली आहे; तर वस्तूंच्या उत्पादनाची आणि वितरणाची शंभर टक्के कार्यक्षमपद्धती रामराज्यासाठी योजता येईल. सगळीकडे वेगवेगळ्या प्रकारचा अन्याय होताना दिसतो, मग अत्यंत प्रामाणिक न्यायाधिशांच्या देखरेखीखाली खराखुरा न्याय देणारी न्यायालये रामराज्यासाठी निर्माण करता येतील. (किंवा न्यायालये आणि न्यायाधीश लागणारच नाहीत अशीही व्यवस्था करता येईल) आजार, दुःख आणि दैन्यावस्था चहूकडे दिसते, मग रामराज्यामध्ये सर्व जण निरोगी, समृद्ध आणि सुखी असतील याची खबरदारी घेता येईल.

अशा रीतीने मनोराज्ये रचणाऱ्यांचे महत्त्वाचे पहिले तत्त्व होते : भांडवलशाहीचा निःपात. भांडवली व्यवस्थेमध्ये त्यांना फक्त दुष्टप्रवृत्तीच दिसत होत्या. कसलीही योजना नसल्यामुळे नासधूस असलेली आणि अतिशय अन्यायकारी अशी ही व्यवस्था होती. भांडवलशाहीमध्ये उत्पादनसाधनांवरील मालकीच्या जोरावर मूठभर लोक काम न करता चैनीत आणि आरामात राहतात. उत्पादनसाधनांची मालकी सामूहिक असल्यास चांगल्या

प्रकारे जीवन जगण्यासाठी उत्पादन करता येईल असे या लोकांना वाटले. म्हणूनच त्यांच्या स्वप्नातील समाजामध्ये उत्पादन साधनांची सामूहिक मालकी असेल आणि सर्वच लोक सुखासमाधानात राहतील याची त्यांनी योजना केली. अशी व्यवस्था म्हणजे समाजवाद. समाजवाद हे या लोकांचे स्वप्न होते.

आणि त्यानंतर कार्ल मार्क्स यांचे पदार्पण झाले.

ते सुद्धा समाजवादी होते. त्यांना देखील कामगारवर्गाच्या परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणायची होती. त्यांना सुद्धा एक नियोजनबद्ध समाजव्यवस्था हवी होती. उत्पादनसाधनांवर सर्व लोकांची सामूहिक मालकी असावी असे त्यांनाही वाटत होते. परंतु एक फरक अत्यंत महत्त्वाचा होता — कोणत्याही रामराज्याची योजना त्यांनी आखली नाही. भविष्यकाळातील समाजामध्ये व्यवहार कशा प्रकारे चालतील याबद्दल त्यांनी जवळपास काहीच लिहिले नाही. गतकालच्या समाजव्यवस्थेमध्ये त्यांना अतिशय रस होता; त्या समाजव्यवस्थेचा उदय, विकास आणि अंत कसाकसा झाला आणि आजच्या समाजव्यवस्थेमध्ये तिचे रूपांतर कसे झाले हे त्यांना जाणून घ्यायचे होते. आजच्या समाजव्यवस्थेमध्येही त्यांना रस होता, कारण भविष्यातील समाज निर्माण करण्यासाठी आजच्या समाजातील कोणत्या शक्ती कार्यप्रवण होऊ शकतील हे त्यांना शोधून काढायचे होते. परंतु उद्याच्या समाजातील आर्थिक संस्थांची रचना कशी असेल याचा विचार करण्यात त्यांनी क्षणभरही वेळ दवडला नाही. त्यांनी बहुतेक सर्व वेळ आजच्या समाजातील आर्थिक संस्थांचा अभ्यास करण्यासाठी कारणी लावला. ते ज्या भांडवली समाजामध्ये राहात होते त्या समाजयंत्राची चक्रे फिरवणारी शक्ती त्यांना शोधून काढायची होती. त्यांनी लिहिलेल्या सर्वांत महत्त्वाच्या पुस्तकाचे नाव होते 'कॅपिटल–ए क्रिटिकल ॲनॅलिसिस ऑफ कॅपिटॅलिस्ट प्रॉडक्शन' (भांडवल – भांडवली उत्पादनाचे विवेचनात्मक विश्लेषण.)

भांडवली समाजाच्या विश्लेषणावरून समाजवाद अस्तित्वात येईल असा त्यांनी निष्कर्ष काढला—ते स्वप्नाळू समाजवाद्यांप्रमाणे समाजवाद अस्तित्वात येण्याची स्वप्ने पाहात बसले नाहीत. समाजवाद प्रत्यक्षात येण्यासाठी समाजामध्ये कार्यप्रवण असणाऱ्या विशिष्ट शक्तीची, संघटित क्रांतिकारी कामगारवर्गाची आवश्यकता होती, हे मार्क्स यांनी ताडले. अभिजात अर्थशास्त्र भांडवलदारांचे हितसंबंध जोपासते म्हणून त्याला भांडवली अर्थशास्त्र म्हणणे योग्य ठरेल. त्याचप्रमाणे मार्क्स यांच्या अर्थशास्त्रामुळे कामगारांना प्रस्थापित सामाजिक चौकटीतील स्वतःच्या स्थानाचे महत्त्व लक्षात येऊन भविष्यासाठी आशा ठेवणे शक्य होत असल्यामुळे त्याला कामगारांचे अर्थशास्त्र म्हणणे योग्य ठरेल.

भांडवली व्यवस्था श्रमाच्या-श्रमिकांच्या–शोषणावर आधारित आहे हा विचार मार्क्स यांच्या अर्थशास्त्रीय विचारप्रणालीचा गाभा आहे.

गुलामी व्यवस्थेच्या काळात श्रमिकांना–म्हणजे गुलामांना–चांगली वागणूक दिली जात नाही हे लक्षात येणे अगदी सोपे होते. त्यांना चांगली वागणूक मिळत नव्हती याबद्दल कोणीही वाद घालणार नाही. काही सहृदय माणसे संतापाने असेही उद्गार

काढतील : " बापरे ! एका माणसाने दुसऱ्या माणसाकरता काम करायचे ? साफ चुकीची आणि धक्कादायक गोष्ट आहे ही ! गुलामगिरी संपुष्टात आणली गेली हे चांगलेच झाले. "

त्याचप्रमाणे सरंजामी समाजात श्रमिकांना म्हणजे भूदासांना–वाईट वागणूक दिली जात होती हेही स्पष्ट होते; त्याबद्दल शंकाच नव्हती. गुलामांप्रमाणे त्यांनाही दुसऱ्याकरता काम करावे लागत होते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते. स्वतःच्या जमिनीवर ते आठवड्यातील चार दिवस काम करत, तर सरंजामदारांच्या जमिनीवर उरलेले दिवस राबत. गुलामगिरी आणि सरंजामशाही या दोन्ही व्यवस्थांमध्ये होणारे श्रमिकांचे शोषण सहज कळणारे होते.

परंतु भांडवली समाजामध्येदेखील श्रमिकांना–म्हणजे कामगारांना–वाईट वागणूक मिळते हे समजून घेणे इतके सोपे नाही. तसे पाहिले तर येथे कामगार स्वतंत्र असतात. गुलाम किंवा भूदास यांच्याप्रमाणे एकाच विशिष्ट गुलाम–मालकासाठी किंवा सरंजामदारासाठी काम करण्याची त्यांच्यावर सक्ती नसते. त्यांची मर्जी असेल तर ते काम करतील नाही तर करणार नाहीत, असे कोणाला वाटणे शक्य आहे आणि एखाद्या भांडवलदाराकडे काम करायचे ठरवल्यावर, केलेल्या कामाबद्दल आठवड्याच्या शेवटी त्यांना मजुरीही देण्यात येते. हा प्रकार पूर्वीपेक्षा वेगळा वाटणे, यामध्ये श्रमाचे–श्रमिकांचे–शोषण होत नाही असे वाटणे शक्य आहे.

परंतु मार्क्स यांना तसे वाटले नाही. पूर्वीच्या दोन्ही व्यवस्थांप्रमाणेच भांडवली समाजव्यवस्थेमध्येही श्रमिकांचे शोषण होते असे त्यांनी प्रतिपादिले. भांडवली समाजामध्ये हे शोषण उघडउघड होत नाही तर छुप्या पद्धतीने होते असा दावा त्यांनी केला. वरकड मूल्याच्या सिद्धान्ताचे प्रतिपादन करून त्यांनी हा मुद्दा पटवून दाखवला.

ॲडम स्मिथपासून जॉन स्टुअर्ट मिलपर्यंतच्या बहुतेक अभिजात अर्थतज्ज्ञांना कमीजास्त प्रमाणात मान्य असलेल्या रिकार्डो यांच्या श्रममूल्य–सिद्धान्तापासून त्यांनी सुरुवात केली या सिद्धान्तानुसार एखाद्या वस्तूचे मूल्य ती वस्तू निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या श्रमांवर अवलंबून असते. या श्रममूल्य–सिद्धान्तावर विश्वास असणाऱ्या बेंजामिन फ्रँकलिन या प्रसिद्ध अर्थतज्ज्ञाचा एक उतारा मार्क्स यांनी दिला आहे : " मूल्याचे स्वरूप समजून घेणाऱ्यामध्ये विल्यम पेटि याच्यानंतरचे पहिले महत्त्वाचे अर्थतज्ज्ञ फ्रँकलिन म्हणतात, ' व्यापार म्हणजे दुसरेतिसरे काहीही नसून श्रमाचा विनिमय आहे. त्यामुळे वस्तूंचे मूल्य श्रमामध्येच मोजणे योग्य आहे. "

सर्वसाधारण वस्तू आणि क्रयवस्तू यामध्ये मार्क्स यांनी फरक केला. त्यांच्या मते क्रयवस्तूंचे उत्पादन हे भांडवली समाजाचेच खास वैशिष्ट्य आहे. " भांडवली उत्पादन-पद्धती प्रचलित असलेल्या समाजामध्ये संपत्ती ' क्रयवस्तूंच्या एका प्रचंड साठ्याच्या स्वरूपात ' सामोरी येते; एक क्रयवस्तू हा तिचा मूलभूत घटक असतो. म्हणूनच आपल्या संशोधनाची सुरुवात क्रयवस्तूच्या विश्लेषणापासून होणे आवश्यक आहे. "

उपभोगासाठी नव्हे तर विनिमयासाठी जेव्हा वस्तूचे उत्पादन करण्यात येते तेव्हा तिला क्रयवस्तूचे स्वरूप प्राप्त होते. एखाद्या माणसाने स्वतःकरताच तयार केलेला कोट

म्हणजे क्रयवस्तू नव्हे. पैशाच्या किंवा दुसऱ्या वस्तूच्या मोबदल्यात दुसऱ्या कोणाला तरी विकण्यासाठी तयार केलेला कोट म्हणजे क्रयवस्तू होय. " स्वतःच्या श्रमांनी उत्पादन करून जो माणूस स्वतःच्या गरजा भागवतो तो उपयोगमूल्ये नक्कीच निर्माण करतो, परंतु क्रयवस्तू मात्र निर्माण करत नाही. क्रयवस्तूंच्या उत्पादनासाठी केवळ उपयोगमूल्ये नव्हे तर दुसऱ्यांसाठी असलेली उपयोगमूल्ये—सामाजिक उपयोगमूल्ये—त्याने निर्माण करणे आवश्यक असते. " स्वतः अंगामध्ये चढवण्याकरता नव्हे तर विनिमयासाठी, विक्रीसाठी जो माणूस कोट तयार करतो तो क्रयवस्तू निर्माण करतो.

आता महत्त्वाचा प्रश्न असा की विनिमयाचा दर काय असेल? या क्रयवस्तूचे मूल्य कशामुळे निश्चित होते? दुसऱ्या एखाद्या क्रयवस्तूबरोबर–बुटांच्या जोडाबरोबर–या कोटाची तुलना करूया. मानवाच्या विशिष्ट गरजा भागवणारी साधने या दृष्टीने या वस्तूंमध्ये काहीच साम्य नाही. किंवा या वस्तू आणि पाव, पेन्सिली यांसारख्या इतर क्रयवस्तूंमध्येही तशा प्रकारचे साम्य नाही. परंतु त्यांचा एकमेकांशी विनिमय होतो याचा अर्थ त्यांच्यामध्ये काहीतरी समान गोष्ट असलीच पाहिजे. या सर्व वस्तू श्रमाचे फळ आहेत हीच त्यांच्यामधील समान गोष्ट आहे असे मार्क्स म्हणतात. सर्व क्रयवस्तू श्रमाचे फळ असतात. म्हणूनच क्रयवस्तूंच्या विनिमयाचा दर किंवा त्यांचे मूल्य त्यांच्यामधील श्रमसाठ्यावरून निश्चित होते. आणि हा श्रमसाठा श्रमकाळावरून मोजता येतो. " म्हणजेच एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी सामाजिक पातळीवर आवश्यक असलेल्या श्रमसाठ्यावरून किंवा श्रमकालावरून त्या वस्तूचे मूल्य निश्चित होते असे आपल्याला दिसते. . .एखाद्या क्रयवस्तूच्या मूल्याचे दुसऱ्या क्रयवस्तूतील मूल्याशी असणारे प्रमाण, एका क्रयवस्तूच्या उत्पादनासाठी (सामाजिकदृष्ट्या) आवश्यक असलेल्या श्रमकालाच्या दुसऱ्या क्रयवस्तूच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या श्रमकालाशी असलेल्या प्रमाणाइतके असते. "

म्हणजेच, कोट तयार करण्यासाठी सोळा तास आणि बुटांचा एक जोड तयार करण्यासाठी आठ तास लागत असतील तर कोटाचे मूल्य बूटजोडाच्या मूल्याच्या दुप्पट असेल. साहजिकच विनिमयात एका कोटासाठी बुटांचे दोन जोड मिळतील. या दोन प्रकारांमध्ये खर्ची पडलेल्या श्रमांचा प्रकार सारखाच नाही. कारण कोट तयार करण्यामध्ये सूत कामगार, विणकर, शिंपी अशा प्रकारच्या लोकांचे श्रम अंतर्भूत असतात तर बूट तयार करण्यामध्ये अत्यंत वेगळ्या प्रकारच्या श्रमांचा अंतर्भाव होतो हे मार्क्स यांना ठाऊक होते. परंतु ' मानवी श्रमशक्तीचा वापर ' या अर्थाने सर्व श्रम हे सारखेच असतात, त्यांची तुलना होऊ शकते, असे मार्क्स यांचे प्रतिपादन राहाते. साधे–अकुशल-साधारण श्रम आणि कुशल श्रम यांची तुलना होऊ शकते; संकल्पनात्मक पातळीवर कुशल श्रमांचे अकुशल श्रमांमध्ये रूपांतर करता येते.

उदा० १ तासाचे कुशल श्रम = २ तासांचे अकुशल श्रम.

म्हणूनच मार्क्स यांच्या म्हणण्याप्रमाणे एखाद्या क्रयवस्तूचे मूल्य तिच्या उत्पादनासाठी सामाजिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या श्रमकालावरून निश्चित होते. कदाचित या विधानाला कोणी हरकत घेईल. कोणी म्हणेल, " म्हणजे झटपट काम करणाऱ्या

माणसाने तयार केलेल्या क्रयवस्तूपेक्षा हलुवाई, अकार्यक्षम माणसाने तयार केलेली क्रयवस्तू — ती तयार करण्यासाठी अधिक वेळ लागल्यामुळे — अधिक मौल्यवान असेल असा याचा अर्थ होतो. " अशा तऱ्हेची हरकत घेतली जाईल हे मार्क्स यांना अपेक्षित होते आणि म्हणून त्याबद्दल त्यांनी लिहिले : " जर एखाद्या क्रयवस्तूचे मूल्य त्या वस्तूच्या उत्पादनामध्ये खर्च झालेल्या श्रमांवरून ठरणार असेल, तर आळशी किंवा वेंधळा माणूस उत्पादनाला अधिक वेळ लावत असल्याने त्याने तयार केलेल्या क्रयवस्तूचे मूल्य अधिक असेल असे कोणाला वाटू शकेल. परंतु तसे वाटणे चुकीचे आहे. मी '**सामाजिक श्रम**' असा शब्द वापरला आहे हे लक्षात घ्या. '**सामाजिक**' या विशेषणामध्ये अनेक गोष्टी अंतर्भूत आहेत. एखाद्या क्रयवस्तूचे मूल्य त्यामध्ये सामावलेल्या **श्रमसाठ्यावरून** निश्चित होते याचा अर्थ समाजाच्या विशिष्ट अवस्थेमध्ये, उत्पादनाच्या सर्वसाधारण सामाजिक स्थितीमध्ये साधारण कौशल्याने आणि तीव्रतेने श्रम करून त्या वस्तूमध्ये **अंतर्भूत झालेल्या श्रमसाठ्यावरून** ते निश्चित होते असे आम्हाला अभिप्रेत आहे. "

दोनशे कामगार असलेल्या कारखान्यात काही कामगार इतरांपेक्षा जास्त चांगले काम करतील; परंतु त्या सर्वांच्या कामाची एक साधारण पातळी असतेच. या साधारण पातळीपेक्षा जास्त काम करणारे कामगार साधारण पातळीपेक्षा कमी काम करणाऱ्यांची भरपाई करतात. समजा, अशा तऱ्हेने एक कोट तयार करायला सर्वसाधारण किंवा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाल सोळा तास आहे. काहींना यापेक्षा थोडा जास्त वेळ लागेल, काहींना कमी लागेल, परंतु सर्वसाधारण पातळीच्या आसपासचे ते [illegible]नगांत फरक होत. तीच गोष्ट ज्या यंत्रसामुग्रीचा उपयोग करून कामगार वस्तू निर्माण करतात, त्या उत्पादनसाधनांच्या बाबतीतही खरी आहे. उदाहरणार्थ, कापड गिरण्यांमध्ये काही ठिकाणी जुन्यापुराण्या मागांचा अवलंब केला जात असेल, तर काही कारखान्यांमध्ये अत्यंत अद्ययावत माग उपयोगात आणले जात असतील. पण तरीही अधिक चांगली आणि जुनीपुराणी उत्पादनसाधने यांची मिळून एक साधारण पातळी असतेच. अशा साधारण उत्पादनसाधनांचा अवलंब करून साधारण श्रमिकांना उत्पादनासाठी लागणारा वेळ म्हणजेच सामाजिकदृष्ट्या आवश्यक असलेला श्रमकाल होय. अर्थातच, स्थल-कालाबरोबर हा श्रमकाल बदलतो. परंतु एका देशामध्ये ठराविक काळात उत्पादनसाधने आणि श्रम यांची एक साधारण पातळी नेहमीच असते.

पण म्हणून काय झाले ? समजा, क्रयवस्तूच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक श्रमकालावरून तिचे मूल्य ठरते असे आपण मान्य केले. परंतु त्याचा, आणि भांडवली समाजात श्रमिकांचे असे शोषण होते, मालमत्तादार वर्ग मालमत्ताविहीन वर्गाच्या जीवावर जगतात, याचा काय संबंध ? त्यावरून, भूदासाप्रमाणेच कामगारही फक्त काही काळ स्वतःकरता आणि उरलेला काळ दुसऱ्याकरता काम करतात हे कसे काय सिद्ध होते ?

या दोन गोष्टींचा अत्यंत घनिष्ट संबंध आहे.

भांडवली समाजातील कामगार हा स्वतंत्र माणूस असतो. गुलामी व्यवस्थेप्रमाणे त्याच्यावर कुणाचीही मालकी नसते किंवा भूदास प्रथेप्रमाणे तो जमिनीच्या तुकड्याला बांधलेलाही नसतो. आपण चौदाव्या प्रकरणात पाहिले त्याप्रमाणे केवळ सरंजामदारापासूनच नव्हे तर उत्पादनसाधनांपासूनही त्याला ' मुक्त ' करण्यात आले होते. पूर्वीप्रमाणे जमीन, अवजारे, यंत्रसामुग्री अशा सर्व उत्पादनसाधनांची मालकी श्रमिकांमध्ये विखुरलेली न राहाता ती अतिशय छोट्या अशा समाजगटाच्या हातामध्ये एकवटली होती हेदेखील आपण पाहिले आहे. ज्या लोकांकडे अशी उत्पादनसाधने नाहीत त्यांना स्वतःचे पोट भरण्यासाठी, ज्यांच्याकडे अशी उत्पादनसाधने आहेत त्यांच्याकडे मजुरीवर काम करणे भागच पडते. आता कामगार काही स्वतःला भांडवलदाराकडे विकून टाकत नाही (तसे असते तर तो गुलाम झाला असता); परंतु आपल्याजवळ असलेल्या एकमेव क्रयवस्तूची तो विक्री करतो. ती क्रयवस्तू म्हणजे आपली काम करण्याची क्षमता किंवा श्रमशक्ती.

" आपल्या पैशाचे भांडवलामध्ये रूपांतर करण्यासाठी बाजारपेठेमध्ये पैसेवाल्यांची स्वतंत्र श्रमिकांशी गाठ पडणे आवश्यक असते. हा श्रमिक दुहेरी अर्थाने स्वतंत्र असतो. एक म्हणजे स्वतःची श्रमशक्ती एक क्रयवस्तू म्हणून विकण्यास तो स्वतंत्र असतो. दुसरे म्हणजे त्याच्याकडे विक्रीसाठी दुसरी कोणतीही क्रयवस्तू नसल्यामुळे स्वतःच्या श्रमशक्तीला तो मूर्त स्वरूप देऊ शकत नाही. "

हा स्वतंत्र कामगार आपली क्रयवस्तू काय दराने विकतो, किंवा त्याच्या श्रमशक्तीचे मूल्य काय असते ? इतर कोणत्याही क्रयवस्तूप्रमाणेच श्रमशक्तीच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या श्रमांवरून श्रमशक्तीचे मूल्य निश्चित होते. म्हणजेच स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी आणि श्रमाचा पुरवठा अखंडित राहण्यासाठी म्हणजे परिवाराचीही गरज भागवण्याकरता ज्या गोष्टी लागतात त्यावरून कामगाराच्या श्रमशक्तीचे मूल्य ठरते. स्थलकालातील फरकानुसार या विविध जीवनोपयोगी वस्तूंमध्ये कशाकशाचा अंतर्भाव होतो यामध्ये फरक पडतो. (उदा. आज अमेरिका व चीन या देशांतील श्रमशक्तीच्या मूल्यांमध्ये फरक आहे.) श्रमशक्तीचा मोबदला म्हणून कामगाराला मजुरी देण्यात येते. सर्वसाधारणपणे स्वतःच्या आणि स्वतःच्या मुलाबाळांच्या श्रमशक्तीचे पुनरुत्पादन करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या मूल्याइतकी मजुरी त्याला पैशाच्या रूपात मिळते.

मार्क्स ही गोष्ट अशा तऱ्हेने विशद करतात : " श्रमशक्तीचे मूल्य कामगाराच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेल्या उपजीविकेच्या साधनांच्या मूल्याइतके असते ... एक कष्टकरी म्हणून त्याला नेहमीच्या स्थितीत जगता येईल या प्रमाणात त्याच्या उपजीविकेची साधने उपलब्ध झाली पाहिजेत. अन्न, वस्त्र, निवारा आणि इंधन यांसारख्या त्याच्या नैसर्गिक गरजांमध्ये देशादेशातील भौतिक परिस्थिती व हवामान यानुसार फरक पडतो. त्याचप्रमाणे त्याच्या आवश्यक गरजांचे प्रकार आणि प्रमाण ऐतिहासिक प्रक्रियेमधून निश्चित होतात. म्हणूनच, एखाद्या देशाच्या संस्कृतीचा विकास किती प्रमाणात झाला

आहे, कोणत्या प्रकारच्या सवयी आणि सुखसोयींचा वारसा घेऊन स्वतंत्र श्रमिकांचा वर्ग तयार झाला आहे, यावर त्या गरजा अवलंबून असतात.

" श्रमशक्तीचा मालक हा मर्त्य मानव असतो ... वेगवेगळ्या प्रकारची झीज आणि मृत्यू यांमुळे श्रमशक्तीच्या बाजारपेठेतून होणारी घट, कमीत कमी, तेवढ्याच ताज्या दमाच्या श्रमशक्तीने सतत भरून काढावी लागते. म्हणूनच श्रमशक्तीच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या उपजीविकेच्या साधनांमध्ये, काही काळानंतर या पिढीतील कामगारांची जागा घेऊ शकणाऱ्या त्यांच्या मुलांच्या गरजांचाही अंतर्भाव व्हायला हवा. त्यायोगे या विशिष्ट प्रकारच्या क्रयवस्तूच्या [श्रमशक्तींच्या] मालकांच्या वंशाचा दिवा बाजारपेठेत सतत तेवत राहील. "

सोप्या भाषेत याचा अर्थ कामगाराच्या स्वतःच्या आणि त्याच्या परिवाराच्या जीवनविषयक गरजा भागतील एवढी मजुरी त्याला त्याच्या श्रमशक्तीचा मोबदला म्हणून देण्यात येते. काही देशांमध्ये या जीवनावश्यक गरजांमध्ये एखादा ट्रान्झिस्टर, सिनेमाची तिकिटे वा क्वचित्‌प्रसंगी मोटार यांचा अंतर्भाव होतो.

वरील उताऱ्यामध्ये ' विशिष्ट क्रयवस्तूच्या मालकांच्या वंशाचा ' मार्क्स उल्लेख करतात. कामगारांपाशी असणाऱ्या क्रयवस्तूचे, श्रमशक्तीचे वैशिष्ट्य कोणते? **श्रमशक्ती स्वतःच्या मूल्यापेक्षा अधिक मूल्य निर्माण करू शकते** हे या क्रयवस्तूचे इतर क्रयवस्तूंच्या तुलनेत असलेले वैशिष्ट्य होय. जेव्हा एखादा कामगार मजुरी करण्यास तयार होतो, तेव्हा केवळ स्वतःच्या मजुरीएवढे मूल्य निर्माण करण्यासाठी लागणाऱ्या काळाकरताच नव्हे, तर कामाच्या संपूर्ण दिवसासाठी त्याने श्रमशक्तीची विक्री केलेली असते. कामाचा दिवस दहा तासांचा असून मजुरीएवढे मूल्य निर्माण जर सहाच तास लागत असतील, तर उरलेले चार तास कामगार **स्वतःसाठी नव्हे, तर त्याच्या मालकासाठी काम करतो**. मार्क्स या सहा तासांना **आवश्यक श्रमकाल**, तर उरलेल्या चार तासांना **वरकड श्रमकाल** असे म्हणतात. दहा तासांमध्ये केलेल्या उत्पादनाच्या मूल्याचा सहा दशांश भाग मजुरीएवढा असतो, तर चारदशांश भाग म्हणजे **वरकड मूल्य** असते. मालक ते मूल्य खिशात घालतो व ते मूल्य म्हणजेच त्याचा नफा असतो.

" क्रयवस्तूमध्ये सामावलेल्या **एकूण श्रमसाठ्यावरून** तिचे मूल्य निश्चित होते. त्या श्रमसाठ्यापैकी एका भागाकरता मजुरीच्या रूपाने मोबदला दिलेला असतो; परंतु त्यातील दुसऱ्या भागाकरता कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात येत नाही. क्रयवस्तूमध्ये सामावलेल्या श्रमापैकी एका भागाकरता पैसे मोजलेले असतात तर दुसऱ्या भागाकरता ते मोजलेले नसतात. म्हणूनच क्रयवस्तूमध्ये सामावलेल्या संपूर्ण श्रमसाठ्याचे मूर्त रूप असणाऱ्या मूल्याच्या मोबदल्यात क्रयवस्तूची विक्री करूनही भांडवलदार नफा कमावतो. ज्याच्यासाठी मोबदला दिलेला असतो तेवढाच नव्हे तर ज्यासाठी कोणताही मोबदला दिलेला नसतो—ज्यामध्ये केवळ कामगारांचे श्रम खर्ची पडलेले असतात—असाही भाग भांडवलदार विकतो. एखाद्या क्रयवस्तूचे खरे मूल्य आणि ती क्रयवस्तू निर्माण करण्यासाठी भांडवलदाराला झालेला खर्च यांमध्ये फरक असतो. म्हणूनच

क्रयवस्तूंची विक्री त्यांच्या **खऱ्या मूल्यापेक्षा जास्त दराने नव्हे तर त्याच दराने** करूनही भांडवलदार साधारण नफा कमावतात हे मला पुन्हा एकदा सांगावेसे वाटते."

मार्क्सचा वरकड मूल्याचा सिद्धांत भांडवली समाजामध्ये श्रमाचे आणि श्रमिकांचे शोषण कशा प्रकारे होते याचे रहस्य उलगडून दाखवतो. या संपूर्ण प्रक्रियेचा सारांश असा :

भांडवली व्यवस्थेमध्ये क्रयवस्तूंचे म्हणजे विक्रीसाठी निर्माण करण्यात येणाऱ्या वस्तूंचे उत्पादन होते.

क्रयवस्तूच्या उत्पादनामध्ये खर्ची पडलेल्या, सामाजिकदृष्ट्या आवश्यक अशा श्रमकालावरून तिचे मूल्य निश्चित होते.

कामगाराकडे जमीन, अवजारे, कारखाने वगैरे उत्पादन साधनांची मालकी नसते.

जगण्यासाठी आपल्याजवळील एकमेव क्रयवस्तूची, श्रमशक्तीची विक्री करणे त्याला भाग असते.

इतर क्रयवस्तूंप्रमाणेच त्याच्या श्रमशक्तीचे मूल्य तिच्या पुनरुत्पादनासाठी आवश्यक असलेल्या म्हणजेच कामगाराच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या मूल्या-वरून ठरते.

म्हणूनच त्याच्या उदरनिर्वाहास पुरेल एवढीच मजुरी त्याला मिळते.

परंतु संपूर्ण कामाच्या दिवसापेक्षा कमी वेळात कामगार त्याच्या श्रमशक्तीएवढे मूल्य निर्माण करू शकतो.

याचाच अर्थ असा की कामाच्या दिवसापैकी काही काळच तो स्वतःसाठी काम करतो.

उरलेला वेळ तो त्याच्या मालकासाठी काम करतो.

कामगाराने उत्पादित केलेल्या क्रयवस्तूचे मूल्य आणि कामगाराची मजुरी यांतील फरक म्हणजेच वरकड मूल्य होय.

हे वरकड मूल्य उत्पादन साधनांच्या मालकांना मिळते.

मालकवर्गाला नफा, व्याज आणि खंड या रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नाचा उगम या वरकड मूल्यामध्ये असतो.

वरकड मूल्य हे भांडवली व्यवस्थेमध्ये होणाऱ्या कामगारांच्या शोषणाचे परिणाम होय.

कार्ल मार्क्स यांना अमेरिकन इतिहासाबद्दल विशेष रस होता आणि ॲब्राहम लिंकन यांची भाषणे आणि लिखाण यांबद्दल त्यांना माहिती असावी. कार्ल मार्क्स यांची पुस्तके वाचण्याचा योग ॲब्राहम लिंकनना आला होता की नाही हे सांगणे कठीण आहे, परंतु काही विषयांबाबत त्यांची विचार करण्याची पद्धत सारखी होती. ॲब्राहम लिंकन यांच्या लिखाणातील हा भाग पाहा : "श्रम खर्ची पडल्याशिवाय आपल्याला कोणत्याही चांगल्या वस्तूचा उपभोग घेता येत नाही. बहुतेक चांगल्या गोष्टींची निर्मिती श्रमानेच झालेली असल्यामुळे त्यांच्या उत्पादनासाठी ज्यांचे श्रम खर्ची पडले त्यांचाच अधिकार त्यांच्यावर पोहोचणे योग्य आहे. परंतु या जगाच्या सर्व कालखंडांमध्ये, काही लोकांनी

राबावे आणि इतरांनी काहीही काम न करता त्याची फळे चाखावीत असेच घडले आहे. हे चुकीचे आहे आणि ते तसेच चालू राहता कामा नये. प्रत्येक श्रमिकाला त्याच्या श्रमाचे फळ शक्य तितक्या पूर्णपणे चाखता यावे हेच कोणत्याही चांगल्या सरकारचे उद्दिष्ट असले पाहिजे. "

हे ॲब्राहम लिंकन यांचे शब्द आहेत. श्रमिक काम करतात आणि भांडवलाबरोबर जीवनाची गाठ घातली गेल्याने एका प्रकारे त्यांची लूट होते असेच त्यांनाही वाटे. एवढेच नव्हे, तर या स्थितीबद्दल काहीतरी केलेच पाहिजे असे त्यांना वाटे. वरील उताऱ्यातील शेवटच्या वाक्यावरून हे आपल्या लक्षात येते. स्वप्नील समाजवाद्यांना तसेच वाटे. मार्क्स यांनाही तसेच वाटत होते. परंतु नक्की काय केले पाहिजे याबद्दल त्यांच्यामध्ये फरक होता.

" स्वतःच्या स्वप्नील कल्पनांचा आविष्कार करताना समाजातील औद्योगिक क्षमता अशा बदलाकरता पुरेशी परिपूर्ण आहे की नाही " याबद्दल स्वप्नील समाजवाद्यांनी फारसा विचारच केलेला नव्हता. आदर्श समाजाची एक योजना तयार करून समाजातील सामर्थ्यशाली आणि श्रीमंत लोकांमध्ये अशा योजनेबद्दल आस्था निर्माण करणे, छोट्या प्रमाणावर असा प्रयोग करणे आणि मग ती प्रत्यक्षात येण्यासाठी लोकांच्या चांगुलपणावर विसंबून राहणे पुरेसे आहे असे त्यांना वाटे.

अशाच दृष्टिकोनातून प्रसिद्ध इंग्लिश समाजवादी रॉबर्ट ओवेन यांनी 'बुक ऑफ द न्यू मॉरल वर्ल्ड' [नव्या नैतिक जगताचा ग्रंथ] हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या नावावरूनच त्यामधील सिद्धांताची आपल्याला कल्पना येते. त्यांचा नवा समाज अस्तित्वात आणण्यासाठी ओवेन कामगारवर्गाला बंड करण्याची हाक देतात का? छे, छे! उलट, त्यांच्या पुस्तकाच्या शेवटी ग्रेट ब्रिटनचे राजेसरकार चौथे विल्यम यांना ते एक पत्र लिहितात. त्या पत्रातील मजकूर असा आहे: " हे पुस्तक 'नव्या नैतिक जगाची' मूलतत्त्वे विशद करते आणि मानवजातीच्या स्वभाववैशिष्ट्यांमध्ये बदल घडवून समाजाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आवश्यक असा पाया तयार करते.... मानवी कल्पनांमधील काही मूलभूत चुकांवर आधारलेल्या सामाजिक संस्था आणि व्यवहार यातून आजचा समाज बनलेला आहे. महाराज, आपण समाजाला अशा अवस्थेमधून बाहेर काढून स्वप्रत्ययकारी सत्यांवर आधारित समाजव्यवस्थेत न्याल आणि त्यायोगे मानवजातीला आजच्या समाजव्यवस्थेच्या सर्व दुष्परिणामांपासून मुक्त करणे आणि सर्वांना सुखी करणे आपल्या राजवटीत शक्य होईल अशी मला खात्री वाटते. "

प्रसिद्ध फ्रेंच समाजवादी चार्ल्स फूरिअर यांनीदेखील त्यांच्या नवसमाजव्यवस्थेच्या प्रयोगांसाठी कामगारवर्गापलीकडे जाऊन धनाढ्य लोकांची मदत घेण्याचे योजले: " फूरिअरवादी तत्त्वांवर आधारित वस्ती निर्माण करण्यासाठी दहा लाख फ्रँक्स देण्यास तयार असणाऱ्या परोपकारी माणसाची प्रत्येक दिवशी विशिष्ट वेळी आपण वाट पाहू असे त्यांनी जाहीर केले. त्यानंतर बारा वर्षे प्रत्येक दिवशी दुपारी नियमितपणे अशा दयाळू माणसाची ते वाट पाहात होते, परंतु दुर्दैवाने कोणीही लक्षाधीश त्यांच्या बाजूला फिरकला नाही. "

सँ सिमँ या आणखी एका फ्रेंच समाजवादी गृहस्थांच्या अनुयायांना फूरिअरच्या कल्पनांबद्दल तिरस्कार होता. परंतु सामाजिक बदल घडवण्यासाठी भांडवलदारांबरोबर हातमिळवणी करणे आवश्यक आहे असे त्यांनाही वाटत होते. 'ग्लोब' [पृथ्वी] या त्यांच्या पत्रकामध्ये २८ नोव्हेंबर १८३१ रोजी त्यांनी खालील मनोरंजक मजकूर प्रसिद्ध केला : "समाजातील वरिष्ठ वर्गांनी मदतीचा हात पुढे केल्याखेरीज कष्टकरी वर्गाचा उद्धार होणे शक्य नाही. त्यामुळे वरिष्ठ वर्गांनीच या बाबतीत पुढाकार घेतला पाहिजे."

स्वप्नील समाजवाद्यांच्या या योजना मार्क्स यांना अतिरंजित आणि हास्यास्पद वाटल्या. आपला जीवन्मित्र आणि सहकारी असलेल्या फ्रीडरिश एंगल्स (मार्क्सच्या मृत्युसमयी अपूर्ण असलेल्या 'भांडवल' या ग्रंथाचे भाग २ व ३ एंगल्सनी प्रसिद्ध केले) यांच्या बरोबर १८४८ साली लिहिलेल्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो'मध्ये [कम्युनिस्ट जाहीरनामा] मार्क्स यांनी स्वप्नील समाजवाद्यांबद्दलची आपली नापसंती व्यक्त केली. "समाजातील प्रत्येकाची—अगदी अत्यंत सुस्थितीत असलेल्यांचीदेखील स्थिती या लोकांना सुधारायची आहे. म्हणून वर्गभेद लक्षात न घेता ते संपूर्ण समाजाला आवाहन करतात, आणि मुख्यत्वे सत्ताधारी वर्गालाच आवाहन करतात. कारण एकदा का ही समाजव्यवस्था काय आहे हे लोकांच्या लक्षात आले की जास्तीत जास्त चांगला समाज निर्माण करण्याची सर्वात चांगली योजना लोक कसे धुडकावून लावतील ?

"म्हणूनच सर्व राजकीय कृती आणि विशेषतः क्रांतिकारी कृती ते निषिद्ध ठरवतात. शांततामय मार्गांनी आपली उद्दिष्टे साधण्याचा ते प्रयत्न करतात आणि हमखास फसणाऱ्या छोट्या छोट्या प्रयोगांद्वारे आणि नमुन्यांद्वारे ते नव्या सामाजिक आदर्शांकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करतात...

"त्यांचे स्वप्नील समाजवादाचे प्रयोग प्रत्यक्षामध्ये आणण्याची त्यांना अजूनही स्वप्ने पडतात. फूरिअरसारख्या काही जणांना 'होम कॉलनीज' तयार कराव्या असे वाटते, तर एटिने कॅबेटसारख्या (आणखी एक फ्रेंच समाजवादी) काही जणांना एक 'लिट्ल आयकेरिया' तयार करावासा वाटतो—'न्यू जेरूसलेम'च्या अशा छोट्या प्रतिकृती तयार करण्यासाठी, आपले हवेत बांधलेले मनोरे साकार करण्यासाठी, भांडवलदारांच्या तिजोऱ्या आणि दयाबुद्धी यांना आवाहने करणे त्यांना भाग पडते."

विशेषतः 'भांडवलदारांच्या तिजोऱ्या आणि त्यांची दयाबुद्धी यांना केलेली आवाहने' यानी मार्क्स आणि एंगल्स यांच्या तळपायाची आग मस्तकात नेली. त्यांच्या मते, सत्ताधारी वर्गाच्या चांगुलपणाला आवाहन करून नव्हे तर कामगारवर्गाच्या क्रांतिकारी कृतीतूनच आजच्या समाजामधून नवसमाज घडवणे शक्य होते. जर्मनीतील बेबेल, लीबनेश्ट आणि इतर डाव्या लोकांना सप्टेंबर १८७९ मध्ये लिहिलेल्या एका पत्रामध्ये ते याबाबतची आपली भूमिका अगदी स्पष्ट करतात : "वर्गलढा हीच इतिहासाची प्रेरक शक्ती आहे आणि विशेषतः भांडवलदारवर्ग आणि कामगारवर्ग यांच्यामधील वर्गलढा हे आधुनिक सामाजिक क्रांतीचे महत्त्वाचे हत्यार आहे ही भूमिका आम्ही गेली जवळपास चाळीस वर्षे आग्रहाने मांडत आहोत. म्हणूनच चळवळीमधून या वर्गलढ्याचीच हकालपट्टी करू इच्छिणाऱ्या लोकांबरोबर सहकार्य करणे आम्हांला

अशक्य आहे. जेव्हा [पहिल्या] 'इंटरनॅशनल'ची स्थापना करण्यात आली तेव्हा ही युद्धनीती आम्ही स्पष्ट केली : कामगारवर्गाची मुक्ती कामगारवर्गानेच केली पाहिजे. म्हणूनच, स्वतःची मुक्ती करून घेण्याइतके कामगार शहाणे झालेले नाहीत आणि परोपकारी भांडवलदारांनी व मध्यमस्तरीय लोकांनी त्यांना वरून मदतीचा हात दिला पाहिजे अशा विचाराच्या लोकांबरोबर आम्हाला हातमिळवणी करता येत नाही."

वर्गलढा ही 'इतिहासाची प्रेरक शक्ती असते' आणि भांडवलदारवर्ग व कामगारवर्ग यांच्यामधील वर्गलढा म्हणजे 'आधुनिक सामाजिक क्रांतीचे महत्त्वाचे हत्यार आहे,' असे मांडताना मार्क्स व एंगल्स यांना नक्की काय अभिप्रेत होते? त्यांची इतिहास समजून घेण्याची पद्धत जर आपण तपासून पाहिली तरच या प्रश्नांची उत्तरे आपल्याला सापडू शकतील.

इतिहासासंबंधीचे तुमचे तत्त्वज्ञान काय आहे? ऐतिहासिक घटनांना गुंफणारा कोणताही धागा नसतो आणि या घटना म्हणजे केवळ अपघात असतात, योगायोग असतो, असे तुम्हाला वाटते का? का तुम्हाला असे वाटते की वेगवेगळ्या विचारधारांच्या प्रभावामुळे ऐतिहासिक बदल घडतात किंवा महान व्यक्तींच्या प्रतिभेमुळे इतिहासाच्या प्रवाहाची दिशा बदलते? या प्रकारच्या एखाद्या तत्त्वज्ञानावर जर तुमचा विश्वास असेल तर तुम्ही मार्क्सवादी नाही. मार्क्ससारख्या अत्यंत प्रतिभाशाली विचारवंताने इतिहास-कारांच्या एका विशिष्ट पंथाचा पाया घातला. त्यांच्या मते, समाजातील आर्थिक शक्तींच्या घडामोडींमधून समाजामध्ये घडणारे बदल म्हणजे इतिहासक्रम होय.

इतिहासकारांच्या या विशिष्ट पंथानुसार समाजातील विविध गोष्टी संपूर्णतया स्वतंत्र नसून परस्परावलंबी असतात. इतिहास म्हणजे असंबद्ध घटनांची खिचडी वाटली तरीही प्रत्यक्षात तसे नसते. वर वर पाहता असंबद्ध वाटणाऱ्या घटनांची संगती लावून इतिहासक्रमाचे नियम शोधता येतात.

मार्क्सच्या इतिहासासंबंधीच्या तत्त्वज्ञानाचे एंगल्स यांनी असे स्पष्टीकरण दिले आहे : "नैसर्गिक, ऐतिहासिक, बौद्धिक जगताकडे सतत बदलणारी आणि विकसित होत असलेली एक प्रक्रिया या दृष्टीने पाहणारी ही पहिलीच विचारपद्धती आहे आणि हेच तिचे शक्तिस्थान आहे. या सतत विकसित होणाऱ्या समाजप्रवाहाला पूर्णत्व देणारी संरचना शोधून काढण्याचा ती प्रयत्न करते. या दृष्टिकोनातून पाहिले असता मानव-जातीचा इतिहास म्हणजे असंबद्ध कल्पनांचे एक चक्रीवादळ न वाटता...मानवाच्या उत्क्रांतीची प्रक्रिया असल्याचे जाणवते."

प्रत्येक समाजामधील आर्थिक व्यवहार, राजकारण, कायदे, धर्म, शिक्षण वगैरे पैलू एकमेकांशी संबंधित असतात, एकमेकांवर अवलंबित असतात आणि त्यातील प्रत्येकाच्या विशिष्ट रंगाचा इतरांच्या रंगाशी संबंध असतो. समाजातील आर्थिक व्यवहार या सर्व शक्तींना पायाभूत असतात. माणसामाणसांमध्ये उत्पादक म्हणून असलेले संबंध म्हणजे या आकाशात उंच चढलेल्या मनोऱ्याचा मूलाधार असतो. माणसे कशी जगतात हे जीवनास आवश्यक असलेल्या गोष्टी ती कशी प्राप्त करतात यावरून—म्हणजेच समाजात कोणत्याही विशिष्ट वेळी प्रचलित असलेल्या उत्पादनपद्धतीवरून—निश्चित होते.

मार्क्स ही मूलतत्त्वे अशा प्रकारे विशद करतात : " समाजातील शासनसंस्थेचे विविध प्रकार आणि कायदेपद्धती यांचा उलगडा त्यांच्या अंगभूत वैशिष्ट्यांवरून किंवा मानवी मनाच्या सर्वसाधारण प्रगतीवरून होत नाही, तर त्यांचा पाया जीवनाच्या भौतिक परिस्थितीमध्ये असतो या निर्णयाप्रत मी येऊन ठेपलो... सामाजिक उत्पादन-प्रक्रियेमध्ये माणसांचे एकमेकांशी विशिष्ट प्रकारचे संबंध तयार होतात...हे संबंध भौतिक उत्पादनशक्तींच्या विकासाच्या एका विशिष्ट टप्प्याशी निगडीत असतात. या उत्पादन-संबंधांचा समुच्चय म्हणजेच समाजाची आर्थिक संरचना असते—या वास्तव पायावरच समाजातील राज्यसंस्था आणि कायदेसंस्था यांची इमारत उभी असते आणि याच पायाशी निगडीत अशा सामाजिक जाणिवा समाजामध्ये तयार होतात. भौतिक जीवनातील उत्पादनपद्धतींमुळे जीवनाच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक प्रक्रिया निश्चित केल्या जातात. माणसांच्या जाणिवा त्यांचे अस्तित्व निश्चित करत नाहीत, तर याउलट, त्यांचे सामाजिक अस्तित्व त्यांच्या जाणिवा निश्चित करते. "

इतिहासाचे विश्लेषण आणि विवेचन करण्यासाठी लागणारे साधन आपल्याला या तत्त्वज्ञानामध्ये मिळते. माणसांच्या जीवनावश्यक वस्तू मिळवण्याच्या पद्धती—म्हणजेच उत्पादन आणि विनिमय पद्धती—हा प्रत्येक समाजाचा पाया असतो. " समाजामध्ये संपत्तीचे वितरण कशा प्रकारे होते आणि समाजाची वर्गांमध्ये विभागणी कशा प्रकारे घडते...या गोष्टी त्या समाजामध्ये काय उत्पादित केले जाते, ते कसे उत्पादित केले जाते आणि त्यांचा विनिमय कशा प्रकारे केला जातो यावर अवलंबून असतात. " त्याचप्रमाणे हक्क, न्याय, शिक्षण वगैरेसंबंधीच्या प्रत्येक समाजाच्या संकल्पना आर्थिक विकासाच्या ज्या विशिष्ट टप्प्यावर समाज उभा असतो त्याला अनुरूप अशाच असतात. मग सामाजिक आणि राजकीय क्रांती कशामुळे होते ? अशी क्रांती म्हणजे केवळ माणसांच्या संकल्पनांमध्ये घडलेला बदल असतो का ? नाही, कारण हा संकल्पनांमधील बदल मूलतः आर्थिक संरचनेमधील—उत्पादन आणि विनिमय पद्धती यांमधील बदलावर अवलंबून असतो.

निसर्गावर विजय मिळवण्याच्या प्रक्रियेमध्ये माणूस प्रगती करतो. वस्तूंचे उत्पादन आणि विनिमय करण्याच्या नव्या आणि अधिक चांगल्या पद्धतींचा शोध लावण्यात येतो. हे बदल जेव्हा मूलभूत असतात, व्यापक परिणाम करणारे असतात, तेव्हा सामाजिक झगडे उद्‌भवतात. जुन्या पद्धतीबरोबर विकसित झालेले सामाजिक संबंध स्थिरावलेले असतात; कायदे, राजकारण, धर्म आणि शिक्षण यांमध्ये सहजीवनाची पद्धत पक्की झालेली असते. आधीपासून सत्ताधारी असलेल्या वर्गाला स्वतःची सत्ता टिकवून धरायची असते आणि त्यामुळेच नव्या उत्पादनपद्धतीशी मेळ जुळणाऱ्या वर्गाशी त्याचा लढा होतो. त्याचे पर्यवसान क्रांतीमध्ये होते.

मार्क्सवाद्यांच्या मते, इतिहासाकडे पाहण्याच्या या पद्धतीमुळे जगातील अनाकलनीय गुपिते समजून घेणे शक्य होते. जीवनावश्यक वस्तू मिळवण्याच्या माणसांच्या धडपडीतून जे वर्गसंबंध तयार होतात त्या वर्गसंबंधांच्या दृष्टिकोनातून ऐतिहासिक घटनांकडे पाहिले असता आजवर अगम्य वाटणाऱ्या गोष्टी समजणे प्रथमच शक्य होते. इतिहासाच्या

या संकल्पनेचा उपयोग करून सरंजामशाहीमधून भांडवलशाहीमध्ये झालेल्या आणि भांडवलशाहीमधून साम्यवादी समाजाकडे होऊ घातलेल्या बदलाची प्रक्रिया आपल्याला कळू शकते.

अशा पद्धतीने मार्क्स आणि एंगल्स यांनी इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे त्यांना भांडवलदारांचे ऐतिहासिक स्थान निश्चित करता आले. भांडवलशाही आणि भांडवलदार हे दुष्ट प्रवृत्तींचे द्योतक आहे असे न सांगता आधीच्या परिस्थितीमधून भांडवली उत्पादनपद्धती कशी जन्माला आली हे त्यांनी दाखवून दिले. सरंजामशाहीबरोबरच्या संग्रामामधील भांडवलदारांच्या क्रांतिकारी स्वरूपाचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. " ज्या उत्पादन आणि विनिमय पद्धतींच्या पायावर भांडवलदारांनी स्वतःचे इमले बांधले तो पाया सरंजामी समाजामध्ये जन्माला आला हे आपणास कळून येते. या उत्पादन आणि विनिमय पद्धतींचा एका विशिष्ट टप्प्यापर्यंत विकास झाल्यावर अशा विकसित उत्पादन-शक्तींशी सरंजामी मालमत्ता–संबंधांचा सांधा जुळू शकला नाही. ते अडसर बनू लागले. या बेड्या तोडणे आवश्यक होते आणि त्या तोडण्यात आल्या.

" त्या जागी भांडवलदारवर्गाच्या आर्थिक आणि राजकीय अधिपत्याखाली मुक्त स्पर्धा आणि तिला अनुरूप सामाजिक व राजकीय घटना अस्तित्वात आली. "

म्हणजेच नव्या उत्पादनशक्ती आणि एक क्रांतिकारी वर्ग (भांडवलदार वर्ग) अशा दोन्ही गोष्टी अस्तित्वात आल्यानेच सरंजामशाहीकडून भांडवलशाहीकडे संक्रमण होऊ शकले. अशा संक्रमणासाठी नेहमीच दोन्ही गोष्टींची आवश्यकता असते. केवळ लोकांच्या इच्छेखातर जुन्या समाजव्यवस्थेमधून नवा समाज निर्माण होत नाही. त्यासाठी नव्या उत्पादनशक्ती आणि त्यांच्या जोडीला एक प्रगतिशील क्रांतिकारी वर्ग अस्तित्वात येणे अत्यावश्यक असते.

सरंजामशाहीकडून भांडवलशाहीकडे झालेल्या संक्रमणाच्या बाबतीत हे खरे होते आणि भांडवलशाहीकडून साम्यवादी समाजाकडे होऊ घातलेल्या संक्रमणाबाबतीतही ते खरे असेल असा मार्क्स व एंगल्स यांचा दावा आहे.

परंतु गतकाळातील समाजाचे अवलोकन करून जे घडले त्याचे वर्णन करणे ही एक गोष्ट झाली आणि आजच्या समाजाचा कानोसा घेत काय घडू शकेल हे सांगणे ही वेगळी गोष्ट झाली. सरंजामशाहीप्रमाणेच भांडवलशाहीदेखील इतिहासजमा होईल याबद्दल मार्क्स व एंगल्स यांच्याकडे असा कोणता पुरावा होता? अंगभूत अंतर्गत प्रक्रियांमुळे भांडवलशाहीचा डोलारा कोसळेल, कारण उत्पादनशक्ती व उत्पादनसंबंध एकमेकांमध्ये गुंफलेले असले तरीही कालांतराने उत्पादनशक्तींच्या विकासक्रमामध्ये प्रचलित उत्पादनसंबंध अडसर बनतील हे दाखवणारा त्यांच्यापाशी कोणता पुरावा उपलब्ध होता ?

१८४८ साली मार्क्स व एंगल्स यांनी भांडवली समाजाचे विश्लेषण केले आणि त्याच्या सर्वनाशास कारणीभूत होतील अशा भांडवली उत्पादनपद्धतीमधील काही पैलूंवर बोट ठेवले. ते पैलू असे :

मूठभरांच्या हातात अधिकाधिक संपत्ती एकवटणे.

काही मोजक्याच बड्या उद्योगपतींनी छोट्या उद्योजकांवर वरवंटा फिरवणे.

कामगारांची वाढत्या प्रमाणावर हकालपट्टी करणाऱ्या यंत्रसामग्रीचा वाढता उपयोग आणि "औद्योगिक राखीव सेनेची" निर्मिती.

जनतेची वाढती दैन्यावस्था.

उत्पादनव्यवस्थेमध्ये सतत होणारे बिघाड–आर्थिक अरिष्ट—प्रत्येक नव्या अरिष्टाचा दणका पहिल्यापेक्षा जास्त.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे—**उत्पादन** जरी अधिकाधिक सामाजिक बनत असले, सामूहिक परिश्रमांनी साकारत असले तरीही त्याचा विनियोग **खाजगी**—वैयक्तिकच राहाणे हा भांडवली समाजातील मूलभूत विरोध होय श्रम निर्मिती करतात, भांडवल त्याची फळे चाखते. भांडवलशाहीमध्ये (अनेक वेळेला केवळ एकाच वस्तूचे उदा० मोटारचे) उत्पादन म्हणजे हजारो कामगारांनी सामूहिकरित्या सहकार्याने केलेल्या एकत्रित श्रमांची निर्मिती झाली आहे. परंतु अशा तऱ्हेने सामाजिकरित्या उत्पादित केलेल्या वस्तूंचा विनियोग श्रमिक करू शकत नाहीत, तर उत्पादनसाधनांचे मालक म्हणजे भांडवलदार त्यांचा विनियोग करतात आणि खरी मेख इथेच आहे—सगळ्या गडबडीचे मूळ यातच आहे. सामाजिक उत्पादना**विरुद्ध** वैयक्तिक विनियोग.

मार्क्स यांच्या 'कॅपिटल' [भांडवल] या ग्रंथामधील एका उताऱ्यामध्ये हे सगळे अत्यंत प्रभावीपणे आले आहे: "एक भांडवलदार इतर अनेकांना गिळंकृत करतो. अनेक भांडवलदारांना काही थोड्या भांडवलदारांनी सामावून घेण्याच्या या केंद्रिकरणाच्या प्रक्रियेबरोबरच, सहकारावर आधारित अशा प्रचंड श्रमप्रक्रियेचा विकास होतो. . .आधीच्या श्रमसाधनांधून आता फक्त सामूहिक पद्धतीनेच वापरता येतील अशा श्रमसाधनांचा विकास होतो. . .एकीकडे भांडवलदारांचा वर्ग सूक्ष्मातिसूक्ष्म बनू लागतो तर दुसरीकडे....[कामगारांची] दैन्यावस्था, दडपणूक, गुलामी, अवहेलना, पिळवणूक यांचा फैलाव होऊ लागतो. परंतु याचबरोबर भांडवली उत्पादन-प्रक्रियेमुळे एकत्रित, शिस्तबद्ध व संघटित झालेल्या कामगारवर्गाच्या बंडाचा भडका उडतो. भांडवलावरील मूठभरांची मालकी उत्पादनपद्धतीला ग्रासू लागते...उत्पादन साधनांचे केंद्रिकरण आणि श्रमाचे सामूहीकरण या दोन्ही गोष्टी अखेर इतक्या टोकाला जाऊन पोहोचतात की भांडवली कवचाखाली त्यांचा जीव गुदमरू लागतो. हे कवच फोडून टाकले जाते. भांडवली खाजगी मालमत्तेची मृत्युघंटा वाजू लागते. लुटारूंचीच लूट केली जाते."

खाजगी मालमत्ता आणि वैयक्तिक विनियोग या दुहेरी विणीची सामाजिक उत्पादन-शक्तींवरील बंधने तुटतील अशा पहाटेची मार्क्स व एंगल्स प्रतीक्षा करत होते. मध्यरात्रीच्या धुमश्चक्रीमधून एका विचाराच्या समाजाचे संगीत फुलेल अशी त्यांची धारणा होती. या समाजामध्ये काही मूठभर भांडवलदारांकडून उत्पादनसाधनांची मालकी आणि ताबा अगणित कामगारांकडे आलेला असेल.

पण हा बदल प्रत्यक्षात येईल कसा? माणसांच्या कृतीमधून. कोण असतील ही माणसे? सर्वहारावर्गाचे घटक—कामगार. पण का? कामगारच हे का करतील? कारण

भांडवलशाहीच्या विसंगतीमुळे याच वर्गाला सर्वाधिक यातना सहन कराव्या लागतात. खाजगी मालमत्तेवर आधारित अशा या व्यवस्थेमध्ये त्यांना त्यांचा न्याय्य वाटा मिळत नसल्याने ही व्यवस्था टिकवून धरण्यात त्यांना काहीच रस नसतो. भांडवलशाहीकडून साम्यवादी समाजाकडे होणाऱ्या संक्रमणाची प्रक्रिया भांडवलशाहीतच अंगभूत आहे आणि सर्वहारावर्ग या प्रक्रियेची प्रेरक शक्ती आहे.

मार्क्स यांचा पिंड दुसऱ्यांनी काय करावे आणि का करावे हे सांगून आरामखुर्चीमध्ये सुस्तावणाऱ्या क्रांतिकारकाचा नव्हता. ते आपले तत्त्वज्ञान प्रत्यक्ष जीवनात जगले. त्यांचे तत्त्वज्ञान केवळ जगाचे आकलन नव्हते तर जग बदलण्याचे एक साधन असे त्याचे स्वरूप होते. यामुळे जग बदलण्यासाठी चाललेल्या लढ्यापासून दूर अवकाशात मार्क्स यांचे स्थान असूच शकत नव्हते. एक सच्चा क्रांतिकारक या नात्याने ते या लढ्याचा एक भाग होते.

भांडवलशाहीला नेस्तनाबूत करण्याची चालकशक्ती कामगारवर्गामध्येच असल्याचे जेव्हा त्यांना जाणवले तेव्हा आर्थिक आणि राजकीय लढ्यांसाठी कामगारवर्गाला संघटित करण्याकडे, तालीम देण्याकडे त्यांनी लक्ष पुरवले. २८ सप्टेंबर १८६४ या दिवशी लंडनमध्ये स्थापन करण्यात आलेल्या ' इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन ' (द फर्स्ट इंटरनॅशनल) या संघटनेचे ते सक्रीय आणि प्रभावशाली सभासद होते. या संघटनेच्या स्थापनेनंतर दोन महिन्यांनी मार्क्सनी डॉ. कुगेलमान या एका जर्मन मित्राला २९ नोव्हेंबर १८६४ रोजी लिहिले : " ही ' असोसिएशन ' किंवा खरे तर तिची समिती महत्त्वाची आहे, कारण ' लंडन ट्रेड युनियन्स 'चे नेते त्यात सहभागी झाले आहेत... पॅरिसमधील कामगारांच्या नेत्यांचे या समितीशी संबंध आहेत. "

ट्रेड युनियन्सना मार्क्स व एंगल्स यांनी खूप महत्त्व दिले : " ट्रेड युनियन्समार्फत एक वर्ग म्हणून कामगारवर्ग संघटित होतो...भांडवलाबरोबर दररोज झगडा करत कामगारांचे स्वतःचे शिक्षण करणारी ट्रेड युनियन म्हणजे कामगारवर्गाची खरीखुरी वर्गीय संघटना असते...."

स्वतःचे शिक्षण कशाकरता करायचे ? अधिक मजुरीसाठी, कामाचे तास कमी करण्यासाठी, चांगली कार्यपरिस्थिती मिळवण्यासाठी ? यासाठी तर करायचेच, परंतु यापेक्षाही फार महत्त्वाच्या लढ्यसाठी, खाजगी मालमत्ता नामशेष करून कामगारवर्गाच्या संपूर्ण मुक्तीच्या लढ्यासाठीही शिक्षण करायचे. उत्पादनसाधनांची खाजगी मालमत्ता हीच भांडवलशाहीतील सर्व दुष्कृत्यांचे उगमस्थान असल्यामुळे, शोषणाला पायाभूत असलेल्या खाजगी मालमत्तेलाच नामशेष करणे मार्क्स व एंगल्स यांच्या कार्यक्रमातील अत्यंत महत्त्वाचा मुद्दा होता. " सर्वहारावर्गाचे एक वर्ग म्हणून संघटन करणे, भांडवली अधिपत्य झुगारून देणे, कामगारवर्गाने राजकीय सत्ता हाती घेणे ही ' कम्युनिस्टां 'ची अत्यंत निकडीची उद्दिष्टे आहेत....सर्वसाधारण मालमत्तेचा विध्वंस हे साम्यवादाचे खास वैशिष्ट्य नसून भांडवली मालमत्ता नामशेष करणे हे खास वैशिष्ट्य आहे. अनेकांचे शोषण करून मूठभरांनी चैन करावी अशा वर्गकलहावर आधारित उत्पादनव्यवस्थेचे आधुनिक भांडवली खाजगी मालमत्ता हे सर्वात विकसित आणि अंतिम स्वरूप होय.

" या अर्थाने कम्युनिस्टांचा सिद्धांत एका वाक्यात सांगता येण्यासारखा आहे : खाजगी मालमत्तेला मूठमाती...

" खाजगी मालमत्ता नामशेष करण्याच्या आमच्या उद्दिष्टांमुळे तुमचा (भांडवलदारवर्गाचा) थरकाप होतो. परंतु आजच्या तुमच्या अधिपत्याखालील समाजामध्येच नऊ-दशांश जनतेकडील खाजगी मालमत्ता कधीच नामशेष करण्यात आली आहे. या नऊ-दशांश लोकांकडे ती नसल्यामुळे मूठभरांच्या हाती तिचे अस्तित्व शक्य झाले आहे. म्हणजे समाजातील प्रचंड बहुसंख्येकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता नसल्यामुळेच केवळ ज्या विशिष्ट प्रकारच्या खाजगी मालमत्तेचा उद्भव होऊ शकतो, अशी मालमत्ता नामशेष करण्याबद्दल तुम्ही आम्हाला दोष देता.

" थोडक्यात म्हणजे तुमच्या हातातील मालमत्तेला मूठमाती देण्याबद्दल तुम्ही आम्हाला दोषी ठरवता. तुम्हाला जे वाटते आहे, अगदी नेमके तेच आम्हाला अभिप्रेत आहे...

" खाजगी मालमत्तेला मूठमाती दिल्यास या जगातील सर्व कामधंदा बंद पडून सार्वत्रिक आळशीपणाचा सगळीकडे प्रादुर्भाव होईल असा आक्षेप घेण्यात येतो.

" परंतु या सिद्धांतामध्ये तथ्य असते तर आळशीपणामुळे भांडवली समाज एव्हाना रसातळाला गेला असता. कारण या समाजामध्ये जे लोक काम करतात त्यांना काहीच मिळत नाही आणि ज्यांना संपत्ती मिळते ते काहीच काम करत नाहीत. "

याचा अर्थ असा की मालमत्तादारवर्गाला दुसऱ्यांचे शोषण करण्याचा अधिकार देणारा खाजगी मालमत्तेचा भांडवली समाजातील प्रकार मार्क्स व एंगल्स यांना नामशेष करायचा होता पण त्याचा मार्ग कोणता ? मालमत्ता असलेल्या लोकांनी ती सोडून द्यावी असे आवाहन करून ? त्यांचे मालमत्तेचे हक्क मतदानाद्वारे काढून घेऊन ? मार्क्स व एंगल्स यांच्या मते हा तो मार्ग नव्हता.

मग कोणता मार्ग ? कोणता मार्ग त्यांनी सुचवला ?

क्रांती

" स्वतःचे विचार आणि उद्दिष्टे लपवून ठेवणे कम्युनिस्टांना तिरस्करणीय वाटते. सध्याच्या प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेला बळजोरीने उलथवूनच आपली ध्येये साकार होतील असे ते जाहीरपणे सांगतात. कम्युनिस्ट क्रांतीच्या उद्रेकाने सत्ताधारी वर्गाचा थरकाप उडू द्या. स्वतःच्या बेड्यांशिवाय गमावण्यासारखे सर्वहारावर्गापाशी काहीच नाही. जिंकण्यासाठी सगळे जग त्यांना मोकळे आहे.

" जगभरच्या कामगारांनो, एक व्हा ! "

सत्ताधारी वर्गाला दिलेले हे रोखठोक आव्हान, क्रांतीला केलेले हे आवाहन प्रथम फेब्रुवारी १८४८ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. याच्या प्रसिद्धीपूर्वी एक महिना म्हणजे १२ जानेवारी १८४८ रोजी अब्राहम लिंकन या महान अमेरिकन नागरिकाने ' हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हज 'मध्ये [लोकप्रतिनिधींचे सभागृह] भाषण करताना क्रांतीला पूर्ण संमती दिली होती ही उल्लेखनीय बाब आहे : " जगामध्ये कुठेही जनतेची इच्छा असेल आणि तिची ताकद असेल तर उठाव करून आज सत्तेवर असलेले सरकार

उलथवून टाकण्याचा आणि सोयीनुरूप नवे सरकार बनवण्याचा जनतेला पूर्ण हक्क आहे. हा अत्यंत महत्त्वाचा आणि अत्यंत पवित्र हक्क आहे आणि या हक्कामुळे जगाची मुक्ती होऊ शकेल अशी आम्हाला आशा वाटते."

"सत्तेवर असलेले सरकार उलथवून टाकण्याच्या" हक्काबद्दल लिंकन का बोलत होते ? जुन्याच सरकारच्या चौकटीमध्ये हवे असलेले बदल घडवून आणणे शक्य नाही का ?

कदाचित तशी शक्यता नाही असे त्यांना वाटत असावे. कदाचित मार्क्स व एंगल्स यांच्याप्रमाणेच "आधुनिक शासनसंस्थेचा कार्यकारी विभाग म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून सर्व भांडवलदारांच्या समाईक व्यवहारांच्या व्यवस्थापनासाठी असलेली समिती आहे" असेच त्यांनाही वाटत असावे.

याचा अर्थ मालमत्तादार आणि मालमत्ताविहीन यांच्या लढ्यामध्ये सरकार हे मालमत्तादारांचे मालमत्ताविहीनांविरुद्ध वापरण्याचे एक महत्त्वाचे शस्त्र बनते. सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधांची जपणूक करण्यासाठी शासनसत्तेचा वापर करण्यात येतो. म्हणजे आपल्या समाजामध्ये भांडवलदारवर्गाच्या हितसंबंधांची जपणूक करण्यासाठी शासनसत्तेचा वापर केला जातो.

वास्तविक पाहता, याच कारणासाठी शासनसंस्था प्रथम अस्तित्वात येते असा मार्क्सवाद्यांचा दावा आहे. आधुनिक समाज दमनकर्ते आणि पीडित, भांडवलदारवर्ग आणि सर्वहारावर्ग यांच्यामध्ये विभागलेला आहे. या दोन्ही गटांमध्ये विरोध आहे. ज्या वर्गाची आर्थिक सत्ता असते—म्हणजेच उत्पादन साधनांवर ज्या वर्गाची मालकी असते—त्याच वर्गाच्या हाती राजकीय सत्ताही असते. आणि "राजकीय सत्ता म्हणजे ... एका वर्गाची दडपणूक करण्यासाठी दुसऱ्या वर्गाने संघटित केलेली शक्तीच होय."

सरकार उच्च-नीच, श्रीमंत-गरीब, सर्व जनतेचेच प्रतिनिधित्व करते. म्हणजेच शासनसंस्था वर्गातीत असल्याचे आपल्याला भासवण्यात येते. परंतु प्रत्यक्षात, आजचे आर्थिक समाजजीवन खाजगी मालमत्तेवर आधारित असल्यामुळे भांडवलशाहीच्या या बालेकिल्ल्यावर—खाजगी मालमत्तेवर— केलेल्या हल्ल्याला शासनसंस्थेकडून विरोध केला जातो आणि जरूर भासल्यास त्यासाठी शासनसंस्था हिंसेचाही अवलंब करते.

थोडक्यात म्हणजे वर्ग अस्तित्वात आहेत तोपर्यंत शासनसंस्था वर्गातीत असू शकत नाही—ती सत्ताधाऱ्यांच्याच बाजूची असते. ॲडम स्मिथ यांनी हे अशा प्रकारे मांडले होते : "मालक आणि कामगार यांच्यामधील तंट्यांचे नियमन करण्याचा कायदेमंडळ जेव्हा जेव्हा प्रयत्न करते तेव्हा तेव्हा मालकच कायदे मंडळाचे सल्लागार असतात."

आपल्या आजच्या काळाला अधिक जवळच्या अशा एका महत्त्वपूर्ण व्यक्तीने अमेरिकेच्या सरकारवर ताबा असणारे आणि येथील आर्थिक जीवनावर ताबा असणारे लोक एकच असल्याचा निर्वाळा दिला आहे. १९१३ साली अध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी लिहिले होते : "या देशातील कच्च्या मालावर काही मूठभर लोकांचा अधिकार चालतो ... याच मूठभर लोकांच्या ताब्यात बहुंशी रेल्वेमार्ग आहेत. आपसात संगनमत करून

ते किंमती ठरवतात. आणि देशातील हेच मूठभर लोक देशातील कर्जवाटप कसे व्हावे हे ठरवतात. आजची परिस्थिती ही अशी आहे ... अमेरिकेमधील सर्व भांडवलदार आणि उद्योगपती यांच्याच ताब्यात तेथील आजचे सरकार आहे."

परंतु शासनयंत्रणा सत्ताधारी वर्गाच्या ताब्यात आहे असे जरी आपण मान्य केले तरीही त्यावर ताबा मिळवण्यासाठी सरकारला जबरदस्तीने उलथवणे हाच एकमेव मार्ग सर्वहारावर्गाला खुला आहे का ? मतपत्रिकेचा उपयोग करता येणार नाही का? लोकशाही मार्गाचा अवलंब करून सत्ता काबीज केली तर ? कामगारवर्ग स्वतःलाच निवडून का देत नाही ?

हे प्रश्न महत्त्वाचे आहेत आणि कामगारांमध्येदेखील यामुळे अनेक तंटे उद्भवले आहेत. हिंसा करण्यात मजा येते म्हणून नव्हे तर त्याशिवाय सत्ताधारीवर्ग आपली सत्ता सोडत नाहीत हे टाऊक असल्यामुळे बळाचा वापर करावाच लागेल, रक्ताचे पाट वाहतीलच, असे उत्तर क्रांतिकारक सर्वसाधारणपणे देतात. या युक्तिवादाला पाठिंबा देणारा सबळ पुरावा आहे. १९३२ साली जर मार्क्स जिवंत असते तर आपल्या युक्तिवादाला पुष्टी देण्यासाठी त्यांनी ' न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून 'मधील खालील वृत्ताचा उपयोग केला असता :

सर्वंकष राजेशाही असणाऱ्या बल्गेरियाची
राजधानी कम्युनिस्ट आहे
परंतु सोफिया महानगरपालिकेवरील हा ' लाल ' ताबा अल्पायुषीच ठरेल.

सोफिया, बल्गेरिया, २६ सप्टेंबर : काल झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकांमधील कम्युनिस्टांच्या विजयामुळे येथे अत्यंत आश्चर्य व्यक्त केले जात असून अतिशय खळबळ माजली आहे.

सोफिया महानगरपालिकेच्या ३५ जागांपैकी २२ जागा कम्युनिस्टांनी जिंकल्या आहेत. सरकारी 'चौकडी' व डेमॉक्रॅटस यांना १० जागा तर झॅन्कॉफ पक्षाला ३ जागा मिळाल्या आहेत. १९३१ सालच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीनंतर कम्युनिस्टांनी मिळवलेली मते दुप्पट झाली आहेत तर सरकारी ' चौकडी 'चा पाठिंबा ५० टक्क्यांनी कमी झाला आहे.

रशियाबाहेर असलेल्या देशांमधील शहरांपैकी सोफिया ही पहिलीच, एका युरोपियन [देशाची] राजधानी कम्युनिस्टांच्या हाती आली आहे. बल्गेरिया-मध्ये सर्वंकष राजेशाही आहे आणि **शहराच्या सभागृहापासून केवळ काही मिनिटांच्या अंतरावर राजा बोरिस यांचे निवासस्थान** आहे हे लक्षात घेता ही घटना अधिकच नजरेत भरते.

या आणि इतर कारणांस्तव शहराला कम्युनिस्ट व्यवस्थापन असावे हे **सहन केले जाणार नाही.** निवडणुकीचे निकाल जाहीर होताच महानगरपालिकेची बैठक होण्यापूर्वीच ती विसर्जित करण्याचा मनसुबा पंतप्रधान निकोलास मुशानॉफ यांनी जाहीर केला आहे. संपूर्ण बल्गेरियाभर कम्युनिस्ट पक्ष बेकायदेशीर ठरवून त्यावर बंदी घातली जाण्याचीही शक्यता आहे.

वास्तविक अतिशय भयंकर आर्थिक परिस्थितीमुळे बोल्शेव्हिझमशी काहीही संबंध नसलेल्या लोकांनीही [प्रस्थापितांच्या] निषेधार्थ कम्युनिस्टांना मते देऊन विजयी केले आहे.

या एका रूढीप्रिय रिपब्लिकन वृत्तपत्राने कम्युनिस्टांनी एके ठिकाणी विजय मिळवला हे कबूल केले आहे. परंतु तरीही व्यवस्थापनाचा ताबा तर सोडाच, परंतु जगण्याचा हक्कही त्यांना भविष्यात देण्यात येणार नाही. " या **आणि इतर कारणांस्तव** " असे लिहिताना या वार्ताहराच्या मनात काय असावे ? कम्युनिस्टांच्या विजयामुळेच सत्ताधारी वर्गाच्या खाजगी मालमत्तेला धोका पोचतो याशिवाय त्याच्या मनात दुसरे काय असू शकणार ?

भविष्यातील अडचणींशी सामना करण्यास कामगारवर्गाला तयार करण्याचा मार्क्स व एंगल्स यांनी प्रयत्न केला. यासाठी एक वर्ग म्हणून कामगारांनी संघटित झाले पाहिजे, आपण एकाच वर्गाचे घटक आहोत अशी जाणीव त्यांच्यामध्ये तयार झाली पाहिजे, ऐतिहासिक विकासप्रक्रियेतील स्वतःचे स्थान त्यांना उमगले पाहिजे लुटारूंना लुटण्यास, खाजगी मालमत्तेला मूठमाती देण्यास आणि त्याचबरोबर वर्ग आणि वर्गसत्ता यांचे विसर्जन करण्यास त्यांनी सिद्ध झाले पाहिजे.

भांडवलशाहीच्या अंगभूत दोषांमुळे ती मोडकळीस येऊ लागल्याचे मार्क्स व एंगल्स यांना जाणवत होते. कामगारांची जर पुरेशी तयारी नसेल तर अशा बिघाडामधून केवळ बजबजपुरी माजेल, जर ते तयार असतील तर समाजवाद अस्तित्वात येईल, " आणि [इतिहासात] प्रथमच इतर जीवजंतूंच्या साम्राज्यापासून मानवाचे साम्राज्य एका परीने वेगळे दिसू लागेल, जनावरांचे जीवन सोडून खरेखुरे माणसाचे जीवन जगायला सुरुवात होईल ...

त्या क्षणापासूनच माणूस अधिक जाणीवपूर्वक रीतीने स्वतःचा इतिहास घडवू लागेल. त्याच क्षणापासून मानवाने केलेल्या सामाजिक कृतींचे त्याला अपेक्षित असेच परिणाम सतत वाढत्या प्रमाणावर घडतील. गरजेच्या साम्राज्यामधून स्वातंत्र्याच्या साम्राज्यामध्ये पदार्पण करताना मानवाची अशी पदोन्नती होईल. "

◇ ◇ ◇

११

.... शक्य झाले तर मी ग्रहमालेला गवसणी घालीन !

अर्थातच हा सगळा प्रकार बंदुकीच्या दारूइतकाच स्फोटक होता. औद्योगिक क्रांतीच्या सुमारास अभिजात अर्थतज्ञांनी विशद केलेला श्रममूल्य-सिद्धांत उपयुक्त ठरला होता. राजकीय क्षेत्रामध्ये मस्तवाल बनलेल्या प्रतिगामी जमीनमालकांना वठणीवर आणण्यासाठी त्या काळी पुरोगामी असलेल्या औद्योगिक भांडवलदारांनी या सिद्धांताचे शस्त्र परजले होते. काहीही काम न करता इतर लोकांच्या श्रमाची फळे चाखत जमीन-मालक ऐश्वर्य उपभोगतात असे त्याद्वारे सिद्ध करण्यात आले होते. खंडविषयक नियमाच्या धनुष्यावर श्रममूल्य सिद्धांताचा बाण लावून रिकार्डो यांनी जमीनमालकांचे शरसंधान केले ते योग्यच होते.

परंतु मार्क्स यांच्या हाती हे अस्त्र लागणे काही योग्य नव्हते. श्रममूल्य-सिद्धांत मान्य करून, त्याचा विकास करून मार्क्स यांनी त्याचे तर्कसुसंगत अंतिम टोक गाठले होते. भांडवलदारांच्या दृष्टिकोनातून या उपद्व्यापाची परिणती अनर्थकारक होती. कारण आता फासे उलटे पडले होते. भांडवलदारांच्या शत्रूविरुद्ध वापरलेल्या त्या चापबाणाचे रूपांतर आता कामगारवर्गाच्या हातातील, भांडवलदारांविरुद्ध उगारलेल्या हातोड्यामध्ये झाले होते !

परंतु या संकटामधून त्यांची लवकरच सुटका झाली. 'कॅपिटल' (भांडवल) या ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतर काही वर्षातच, काही अर्थतज्ञांनी मूल्याविषयी पूर्णपणे नव्या सिद्धांताची मांडणी केली. इंग्लंडमध्ये स्टॅनली जेव्हॉन्स (१८७१), ऑस्ट्रियामध्ये कार्ल मेन्गर (१८७१) आणि स्वित्झर्लंडमध्ये लिऑ वॉलरस (१८७४) या तिघांनी तीन वेगवेगळ्या देशांमध्ये, स्वतंत्रपणे व जवळपास एकाच वेळी या नव्या सिद्धांताची मांडणी केली. अभिजात अर्थतज्ञांप्रमाणे, तसेच मार्क्स व एंगल्स यांच्याप्रमाणे या नव्या अर्थतज्ञांनाही लवकरच अनुयायी मिळाले. त्या अनुयायांनी या सिद्धांताचे स्पष्टीकरण केले आणि विकासही केला. त्यामध्ये काही दुरुस्त्या, सुधारणा करण्यात आल्या आणि काही गोष्टींची भरही टाकण्यात आली, पण या सिद्धांतामधील मूलभूत विचार आजही सनातनी अर्थशास्त्राचा मूलाधार मानला जातो.

या अर्थतज्ज्ञांनी दिलेल्या मूल्यविषयक स्पष्टीकरणाला ‘ सीमान्त उपयोगिता-सिद्धांत ’ असे संबोधण्यात येते. आपल्या ‘ थिअरी ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी ’ [राजकीय अर्थशास्त्रविषयक सिद्धांत] या पुस्तकाच्या दुसऱ्या पानावर जेव्हॉन्स गतकालापासून आपण फारकत घेतली असल्याचे जाहीर करतात : “ पुन: पुन्हा विचारणा आणि सखोल चिंतन केल्यावर, (एखाद्या वस्तूचे) मूल्य पूर्णपणे (तिच्या) उपयोगितेवर अवलंबून असते अशा अभिनव संकल्पनेपाशी मी येऊन ठेपलो आहे. ” आता उपयोगिता म्हणजे उपयुक्तता; आणि एखादी क्रयवस्तू विकत घेऊ इच्छिणाऱ्या माणसाला त्या क्रयवस्तूबद्दल काय वाटते ते या शब्दामधून ध्वनित होते. एखाद्या माणसाला एखादी वस्तू अत्यावश्यक वाटत असेल तर त्याच्या दृष्टीने तिची उपयोगिता जास्त आहे; त्याला तिची तेवढीशी गरज वाटत नसेल तर त्याच्या दृष्टीने तिची उपयोगिता कमी असेल. वस्तूच्या या उपयुक्ततेवरून तो तिचे मूल्य ठरवतो आणि त्यावरूनच तो तिच्यासाठी किती किंमत मोजायला तयार होईल ते ठरते.

मार्क्सवादी अर्थशास्त्र काय किंवा अभिजात अर्थशास्त्र काय, या दोन्ही सिद्धांतांपासून या नव्या सिद्धांताने पूर्णपणे फारकत घेतली होती. त्यांच्या दृष्टिकोनातून, एखादी क्रयवस्तू तयार करण्यासाठी किती श्रम खर्ची पडतात यावरून तिचे मूल्य निश्चित होते. तर जेव्हॉन्स यांच्या मते, “ एकदा का श्रम खर्ची पडले की नंतर वस्तूचे मूल्य काय असेल यावर ते श्रम कोणताही प्रभाव पाडू शकत नाहीत. ” त्यामुळे हा नवा अर्थशास्त्रीय सिद्धांत उत्पादन आणि उत्पादनखर्च यांवर भर न देता उपभोग आणि बाजारपेठ यावर भर देतो. हा सिद्धांत समजायला अधिक कठीण आहे, कारण एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी किती श्रम खर्ची पडले हे सहज लक्षात येऊ शकले तरी तिची उपयोगिता किती असेल ते लक्षात येणे तेवढे सोपे नाही. खर्ची पडलेले श्रम मोजता येतात; त्यांचे **वस्तुनिष्ठ** प्रमाण असते. परंतु उपयोगिता प्रत्येक माणसागणिक बदलत जाते; क्रयवस्तू खरेदी करून मिळणाऱ्या समाधानाविषयीच्या त्याच्या अपेक्षेवर उपयोगिता अवलंबून असते. थोडक्यात म्हणजे, तिचे प्रमाण **व्यक्तिनिष्ठ** असते.

आता एका क्रयवस्तूपासून वेगवेगळ्या लोकांना मिळणारे समाधान वेगवेगळे असते हे तर उघडच आहे. म्हणजे एकाच क्रयवस्तूची वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळी उपयोगिता असते. परंतु ती क्रयवस्तू एकाच किंमतीला विकली जाते, म्हणजे तिचे मूल्य एकच असते. (बहुतेक सर्व आधुनिक अर्थतज्ज्ञांच्या दृष्टीने पैशाच्या रूपातील मूल्य म्हणजेच किंमत होय; परंतु मार्क्सच्या दृष्टीने हे खरे नव्हते.) आता उपयोगितेवरून मूल्य ठरत असेल, तर उपयोगितेचे वेगवेगळे समुच्चय एकाच किंमतीला कसे विकता येतील ? या ठिकाणी सीमान्ततेची संकल्पना शिरकाव करते आणि तिचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. याचे कारण असे की अर्थशास्त्रीय सिद्धांतांविषयीच्या प्रत्येक आधुनिक पाठ्यपुस्तकामध्ये, “ सीमान्त उपयोगिता ”, “ सीमान्त उत्पादकता ” आणि “ सीमान्त उत्पादनखर्च ” वगैरेंचे उल्लेख जागोजागी आढळतात.

समजा, बाजारपेठेमध्ये १,००,००० मोटारगाड्या उपलब्ध आहेत. काही संभाव्य ग्राहक असे असतील की ज्यांच्याकडे पैसा भरपूर आहे आणि मोटारीची त्यांना आत्यंतिक गरज असल्यामुळे, मोटारीसाठी हवी ती किंमत मोजायला ते मागेपुढे पाहणार नाहीत. तर एवढे अतिश्रीमंत नसलेले किंवा मोटार फारच महागडी असेल तर दुसऱ्या कोणत्या तरी वस्तूवर पैसे खर्च करणे बरे असे वाटणारे काही ग्राहक असतील. त्यानंतर, मोटारीसाठी वाजवी किंमत मोजायला तयार असलेले आणि जवळ फारसे पैसे नसल्यामुळे काळजीपूर्वक खर्च करणारे असेही काही ग्राहक असतील. मोटारीइतकेच समाधान देऊ शकतील अशा इतर अनेक गोष्टींची त्यांना गरज असल्यामुळे, त्या गोष्टींपेक्षा मोटारीला जास्त पैसे पडणार असतील तर स्वतःच्या मर्यादित पैशाचा उपयोग इतर वस्तूंसाठी करणे ते अधिक पसंत करतील; ते मोटारगाडी विकत घेणार नाहीत. " एखाद्या वस्तूची किंमत जर आपल्याला योग्य वाटली तरच आपण ती वस्तू विशिष्ट प्रमाणात खरेदी करतो. किंमत अधिक असल्यास आपण कमी प्रमाणात खरेदी करू आणि किंमत कमी असेल तर अधिक प्रमाणात खरेदी करू. उपयोगितेमधील फरकामुळे असे घडते असेच जेव्हॉन्स यांचे म्हणणे आहे. आपल्या खरेदीमधील अंतिम नगाच्या आपल्याला वाटणाऱ्या उपयोगितेशी तिची किंमत निगडित असते..." प्रत्येक ग्राहकाच्या बाबतीत हे खरे असते आणि मागणी व पुरवठा समान होईपर्यंत किंमत ठरवण्याची प्रक्रिया चालू राहाते. अखेर मोटार-उत्पादक ज्या किंमतीला मोटार विकण्यास तयार आहे त्या किंमतीला मोटार खरेदी करणारा एक लाखाचा ग्राहक त्याला सापडतो. काही ग्राहक अधिक किंमत मोजायला तयार असतील; तर किंमत थोडीशी कमी असली तर मोटार खरेदी करण्याची तयारी असलेले हजारो ग्राहक असतील. परंतु १,००,००० मोटार-गाड्या उपलब्ध आहेत आणि त्या सर्व जर विकायच्या असतील तर एक लाखाव्या ग्राहकाची आवड आणि त्याच्या खिशाला परवडणारी किंमत या गोष्टी लक्षात घेऊनच मोटार-उत्पादकाला किंमत ठरवावी लागेल. कमी गाड्या विकण्याची तयारी असली तर त्याला अधिक किंमत मिळू शकेल. तसेच थोडी किंमत ठेवल्यास तो अधिक मोटारी विकू शकेल. परंतु त्याच्याकडे विक्रीसाठी १ लाख गाड्या असतील आणि त्या सर्व गाड्या त्याला विकायच्या असतील तर गाडी जेमतेम खरेदी करणे ज्याला शक्य आहे अशा ग्राहकाला परवडेल अशीच किंमत त्याला ठेवावी लागेल. उत्पादक सांगेल ती किंमत मोजायला तयार असणारे एक लाख ग्राहक नसतील तर एक तर बाजारपेठेतून काही गाड्या काढून घेऊन त्याला कमी गाड्यांची विक्री करावी लागेल; किंवा सर्व गाड्या विकायच्या असल्यास, कमी ऐपत असलेल्या, भिन्न अभिरुची असलेल्या ग्राहकांना परवडेल अशा प्रमाणात किंमत कमी करावी लागेल. कारण खुल्या बाजारपेठेमध्ये एकाच प्रकारची गाडी एका माणसाला एका किंमतीला व दुसऱ्याला दुसऱ्या किंमतीला विकणे शक्य होणार नाही.

अर्थात हा एक लाखावा – किंवा 'सीमान्त' – ग्राहक म्हणजे कोणी एक विशिष्ट माणूस नसतो. संपूर्ण १ लाखापैकी तो कोणीतरी एक असतो आणि त्याची गाडीही १ लाखापैकी कोणती तरी एक असते. बाजारपेठेचे कार्य कशा पद्धतीने चालते आणि बाजारभाव

कसा निश्चित होतो याविषयीच्या सैद्धांतिक मांडणीमध्ये हा एक लाखावा माणूस म्हणजे सीमान्त मागणी असते. मोटारीची किंमत अधिक असली तर ज्या गोष्टींपासून अधिक समाधान मिळेल अशा वस्तूंवर तो पैसे खर्च करील. किंमत कमी असल्यास अधिक ग्राहक बाजारपेठेत येतील आणि पुरवठा अपुरा पडेल. तसे झाले तर मोटार-उत्पादक किंमत वाढवील आणि परिणामतः फक्त कमी किंमत मोजायला तयार असणाऱ्या सर्व ग्राहकांची बाजारपेठेतून हकालपट्टी होईल.

आता मागणीच्या बाजूने सुरुवात करून या प्रक्रियेचे स्पष्टीकरण काय आहे ते पाहूया. समजा, एका रेफ्रिजरेटरसाठी १०,००० रुपये मोजायला तयार असणारे १,००० लोक आहेत आणि ७,५०० रुपये मोजायला असणारे १,००० लोक आहेत. याचा अर्थ कमीत कमी ७,५०० रुपये मोजण्याची तयारी असलेले २,००० लोक आहेत. यापेक्षा कमी किंमत मोजायची तयारी असणाऱ्या लोकांचा आपण टप्प्याटप्प्याने विचार करू. अखेर, कमीत कमी ५०० रुपये मोजायला तयार असलेले ५० लाख लोक आपल्याला सापडतील. आता प्रश्न असा आहे की यापैकी किती लोकांना रेफ्रिजरेटर विकत घेता येईल आणि त्याची किंमत काय असेल ? (एकूण प्रक्रिया समजायला सोपी व्हावी यासाठी फक्त एकाच प्रकारचा रेफ्रिजरेटर उपलब्ध आहे असे आपण धरून चालू.) आता ५० लाख रेफ्रिजरेटर्स कोणत्या किंमतीला विकणे रेफ्रिजरेटर-उत्पादकाला परवडेल यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून असेल. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करूनदेखील जर एका रेफ्रिजरेटरचा उत्पादनखर्च ५०० रुपयांपेक्षा जास्त येणार असेल किंवा ५०० च्या किंमतीला एक रेफ्रिजरेटर विकून त्याला फारच थोडा नफा हाती लागणार असेल तर रेफ्रिजरेटर्सचे उत्पादन करण्याऐवजी, अधिक नफा देऊ शकेल असा इतर धंदा मिळाला तर तो आपले भांडवल गुंतवील. तसे झाले की ५० लाख रेफ्रिजरेटर्सचे उत्पादन केले जाणार नाही. जसा ग्राहकाला त्याच्या पैशाचा सीमान्त उपयोग असतो तसाच उत्पादकाला त्याच्या भांडवलाचा सीमान्त उपयोग असतो. दुसऱ्या एखाद्या धंद्यामध्ये गुंतवणूक करून त्याला जर अधिक नफा मिळणार असेल तर रेफ्रिजरेटर्सच्या उत्पादनामध्ये तो भांडवल गुंतवणार नाही. पुरेसा नफा देऊ शकेल एवढेच भांडवल तो रेफ्रिजरेटर्सच्या उत्पादनासाठी वापरील. जर या धंद्यात कमी भांडवल गुंतवले गेले तर त्याने एक सुसंधी वाया दवडली असे होईल (आणि अशी संधी उपलब्ध झाल्यास लवकरच नफ्याला लालचावलेले इतर भांडवल रेफ्रिजरेटर्सच्या धंद्यात शिरेल), आणि जर अधिक भांडवल गुंतवले तर भांडवलाचे प्रमाण अवाजवी झाल्यामुळे त्या उद्योगधंद्यामध्ये लाभांश मिळू शकणार नाही. समजा रेफ्रिजरेटरसाठी १,५०० रुपये मोजायला ३० लाख लोक तयार असून या किंमतीमुळे आपल्याला पुरेसा नफा मिळेल असे उद्योजकाला आढळले. आणि दुसऱ्या एखाद्या उद्योगामध्ये भांडवल गुंतवून त्याला यापेक्षा अधिक नफा मिळण्याची शक्यताही नाही. अशा वेळी त्याने अधिक उत्पादन केल्यास किंमती घसरून त्याचा नफा कमी होईल आणि या उद्योगधंद्यामधून भांडवल काढता पाय घेईल.

अर्थात, हे सगळे गुंतागुंतीचे वाटते आणि तसे ते आहेही ! परंतु "सीमान्त उपयोगितेच्या" मुळाशी असलेली सर्वसाधारण कल्पना अगदीच सोपी आहे आणि

प्रतिदिनी आपल्याला तिचे प्रात्यक्षिक दिसते. एखाद्या वस्तूपासून आपल्याला किती समाधान मिळते ते आपल्याजवळ ती वस्तू अगोदरच किती प्रमाणात आहे यावर अवलंबून असते. आपल्याकडे एखाद्या वस्तूचा भरपूर साठा असेल तर ती आणखी मिळाल्यामुळे आपल्याला थोडेसेच समाधान मिळते. समजा, मुलांचा एक क्रिकेटचा संघ खेळ सुरू करण्याच्या बेतात आहे, पण त्यांच्यापाशी बॅट नाही. अशा वेळी एक बॅट मिळण्याची संधी आली तर या बॅटकरता पडेल ती किंमत मोजायला ती मुले मागेपुढे पाहतील का? मुळीच नाही. आता समजा, सुरुवातीलाच त्यांच्यापाशी चार बॅटस आहेत तर पाचवी बॅट मिळण्याची संधी येताच आता तितक्याच घाईगर्दीने बॅट विकत घेण्यास ती मुले धावतील का? अर्थातच नाही. त्यांच्या दृष्टीने बॅटची सीमान्त उपयोगिता इतकी कमी आहे की कदाचित ती मुले पाचवी बॅट विकत घेण्याच्या भानगडीतही पडणार नाहीत.

एखादी वस्तू आपल्याकडे जितकी जास्त असते तितका आपल्याला तिचा हव्यास कमी असतो. कपड्यांचे नऊ जोड असणाऱ्या माणसाला दहावा जोड मिळाल्यामुळे होणारे समाधान, एकच जोड असणाऱ्या माणसाला दुसऱ्या जोडामुळे मिसळणाऱ्या समाधानापेक्षा कमी असणार हे तर उघडच आहे. पाण्याचे उदाहरण देऊन जेव्हॉन्स हीच कल्पना स्पष्ट करतात : “ सर्व पदार्थांमध्ये पाणी ही सर्वात उपयुक्त वस्तू आहे असे म्हणता येईल. मरणोन्मुख माणसाला वाचविण्यासाठी दिवसाला एक भांडे पाण्याची उपयोगिताही फार मोठी असते. स्वयंपाक आणि धुणीभांडी यासाठी दररोज कित्येक लिटर पाण्याची उपयोगिताही मोठीच असते. परंतु अशा वापरासाठी एकदा का पुरेसा पुरवठा उपलब्ध झाला की आणखी पाणी मिळण्याने काहीच फरक पडत नाही. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत पाणी अत्यावश्यक असते, नंतर पुरवठ्यानुसार त्याची उपयोगिता बदलत जाते आणि अखेर एका मर्यादेनंतर त्याला उपयोगिता शिल्लकच राहात नाही असे आपल्याला दिसते...एकच वस्तू आपल्याकडे कमी-अधिक प्रमाणात उपलब्ध असल्यास तिची उपयोगिताही वेगवेगळी वाटते. ”

पाव आणि हिरे यांच्या मूल्यातील फरक स्पष्ट करण्यासाठी सीमान्त उपयोगितेच्या या संकल्पनेचा वापर केला जातो. पावाची उपयोगिता फारच जास्त असल्यामुळे पावाची किंमत हिऱ्यापेक्षा जास्त असली पाहिजे असे प्रथमदर्शनी वाटेल. परंतु पावाचा पुरवठा इतका मुबलक असतो की, दोन-चार तुकड्यांची त्यामध्ये भर पडल्याने काहीच फरक पडत नाही. याउलट, हवी ती किंमत मोजायची तयारी असलेल्या पैसेवाल्या लोकांच्या तुलनेमध्ये हिऱ्यांची उपलब्धता फारच कमी असल्यामुळे हिऱ्यांची किंमत फारच जास्त असते.

उपयोगिता आणि मूल्य यांमध्ये कार्यकारणभाव नसतो, नाहीतर लोखंडाची किंमत सोन्यापेक्षा जास्त झाली असती, या युक्तिवादामध्ये वैचारिक गोंधळ दिसून येतो. कारण “ एखाद्या क्रयवस्तूचे मूल्य ठरवताना तिचा संपूर्ण साठा आणि वेगवेगळा विकला जाणारा प्रत्येक नग [उदा॰ बुटांचा प्रत्येक जोड] यांमध्ये येथे गल्लत केल्याचे दिसून येते. एखाद्या क्रयवस्तूच्या विविध उपयोगांचा एकत्रितपणे विचार केला तर...केअर्न्स

म्हणतात त्याप्रमाणे लोखंड जर अजिबात उपलब्ध नसेल तर जगाची फारच पंचाईत होईल, परंतु सोने अजिबात उपलब्ध नसेल तर काही एवढी पंचाईत होणार नाही. परंतु उपयोगितेचा विचार करताना जर आपण वस्तूच्या संपूर्ण साठ्याचा विचार करणार असू तर तिच्या मूल्याच्या बाबतीतही तसाच विचार करावा लागेल. तसे केले की वस्तूची उपयोगिता आणि तिचे मूल्य यामधील तथाकथित विरोध तात्काळ नाहीसा होतो. याचे कारण असे की, ' सगळे लोखंड एकदम विकत घ्या किंवा अजिबात घेऊ नका ' आणि ' सगळे सोने एकदम विकत घ्या किंवा अजिबात घेऊ नका ' असे दोन पर्याय जगासमोर ठेवले तर जग निश्चितपणे सोन्यापेक्षा लोखंडालाच अधिक किंमत मोजायला तयार होईल. मग (सर्व) लोखंडाचे मूल्य (सर्व) सोन्याच्या मूल्यापेक्षा अधिक होईल.

" एका हिऱ्याची जेव्हा कोळशाबरोबर तुलना केली जाते तेव्हा क्रयवस्तूचा संपूर्ण साठा आणि एक नग यामध्ये केली जाणारी गल्लत स्पष्टपणे दिसून येते. समधर्मीयांची तुलना करणेच योग्य असते : कोळशाच्या संपूर्ण साठ्याची उपयोगिता हिऱ्यांच्या संपूर्ण साठ्यापेक्षा अधिक असते एवढेच नव्हे, तर कोळशाच्या साठ्याचे मूल्यही अधिक असते. "

पण अर्थतज्ज्ञांनी काहीही म्हटले—इतर प्रश्नांप्रमाणेच या प्रश्नाबाबतही त्यांच्यामध्ये अनंत वाद आहेत—आणि कोणताही सिद्धांत तात्पुरता प्रभावी ठरला, तरी भांडवलदारांना एक गोष्ट कळून चुकली. कारणे काहीही असली तरी जर एखाद्या वस्तूचा पुरवठा नियंत्रित करता आला तर तिची किंमत नियंत्रित करणेही त्यांना शक्य होते. एखाद्या क्रयवस्तूच्या उत्पादनासाठी कमी काळ लागल्यामुळे तिचे मूल्य कमी होईल किंवा तिचा साठा वाढल्यामुळे तिची सीमान्त उपयोगिता कमी होईल. यापैकी काहीही असले तरीही एक गोष्ट मात्र निश्चित की पुरवठ्यावर नियंत्रण प्रस्थापित केल्यास उत्पादकांना किंमती ठरवण्याची क्षमता प्राप्त होते; आणि किंमती ठरवण्याच्या क्षमतेवर नफ्याचे प्रमाण अवलंबून असते.

प्रत्येकी १०० रुपये उत्पादनखर्च याप्रमाणे ५,००० क्रयवस्तूंचे उत्पादन करून त्या प्रत्येकी ११० रुपयांना विकल्या तर एकूण नफा ५०,००० रुपये होईल, म्हणजे गुंतविलेल्या भांडवलावर दहा टक्के नफा होईल. प्रत्येकी १०५ रुपये उत्पादनखर्च याप्रमाणे जर ४,००० वस्तूंचे उत्पादन केले आणि किंमत वाढवून प्रत्येकी १२५ रुपये केली तर एकूण नफा ८०,००० रुपये किंवा एकोणीस टक्के होईल. म्हणून पुरवठा नियंत्रित करण्याची क्षमता असलेली कंपनी जास्तीत जास्त नफा मिळेल अशाच प्रकारे पुरवठा नियंत्रित करील. नफा वाढण्याची शक्यता नसल्यास ती कंपनी विस्तारित मागणीला कमी किंमतीत पुरवठा करण्यासाठी उत्पादन वाढविण्याच्या फंदात पडणार नाही. उदाहरणार्थ प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या महाकाय उद्योगांमध्ये नगास ७० रुपये याप्रमाणे उत्पादनखर्च नियंत्रित करून १,००,००० वस्तूंचे उत्पादन करणे आणि ते नगास ८० रुपये याप्रमाणे बाजारपेठेमध्ये विकणे शक्य होईल. परंतु अशा व्यवहारातून फक्त चौदा टक्केच नफा मिळेल !

सोळाव्या शतकामध्ये, किंमती वाढविण्यासाठी डच व्यापाऱ्यांनी मसाल्याच्या पदार्थांचे उत्पादन कसे कमी केले ते जरा आठवून पाहा. ही पूर्वीची एकाधिकारशाही तोडण्यात आली असली तरीही आधुनिक जगामध्ये नवीन आणि अधिक सामर्थ्यशाली मक्तेदारी सत्ता कशा अस्तित्वात आल्या ते आपण आता पाहूया. या काळात वस्तूंच्या उत्पादनाची पातळी एवढी वाढली की वस्तूंच्या किंमती कोसळून नफे कमी होण्याचा धोका निर्माण झाला.

औद्योगिक क्रांतीमध्ये अग्रेसर असल्यामुळे इंग्लंडच्या उद्योगपतींनी चांगलाच फायदा उठवला होता. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये, उत्पादित माल कुठे विकायचा ही समस्या इंग्लंडसमोर नव्हती. जगाच्या पाठीवर दूरवर पसरलेल्या बाजारपेठांमधून येणाऱ्या मागणीला पुरवठा करण्यासाठी अधिकाधिक वेगाने उत्पादन कसे वाढवायचे ही तेव्हा समस्या होती. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांमध्ये एक महत्त्वपूर्ण बदल घडून आला. इंग्लंडने ज्या खुल्या (आंतरराष्ट्रीय) व्यापाराचा पुरस्कार केला होता त्या धोरणाने अमेरिकेमध्ये कधीही मूळ धरले नाही. अगदी सुरुवातीपासूनच अमेरिकेमध्ये संरक्षणात्मक जकातींची तटबंदी उभारण्यात आली होती. रशियामध्ये १८७७ साली, जर्मनीमध्ये १८७९ साली, तर फ्रान्समध्ये १८८१ साली सर्वसाधारण संरक्षणात्मक जकात अस्तित्वात आली. इंग्लिश उद्योगपतींना आता घोडदौड करण्यासाठी मैदान मोकळे नव्हते, जकातींच्या तटबंदीवरून उड्या टाकणे त्यांना भाग होते. इंग्लंडच्या पूर्वीच्या सर्वोत्कृष्ट ग्राहकांना आता इंग्लंडच्या मालाची जरुरी नव्हती, स्वतःला लागणारा माल स्वतःच निर्माण करून ते गरज भागवू शकत होते. जकातींच्या तटबंदीच्या आड बाल्यावस्थेतील उद्योगधंदे द्रुतगतीने "अजस्र" रूप धारण करत होते.

हे वर्णन म्हणजे लेखनशैलीचा आविष्कार नव्हे, तर अक्षरशः असेच घडत होते. १८७० नंतरचा काळ अमेरिकेमध्ये "ट्रस्ट्स" आणि जर्मनीमध्ये "कार्टेल्स" यांचा काळ म्हणून ओळखला जातो. आता स्पर्धेची जागा मक्तेदारीने घेतली. बड्या उद्योगपतींनी उद्योगधंद्यांमधून छोट्या उद्योजकांची हकालपट्टी केली. बड्या उद्योगपतींनी छोट्या उद्योजकांवर वरवंटा फिरवला किंवा त्यांचे उद्योग बड्या उद्योगांमध्ये समाविष्ट करून अधिकच बडे उद्योग निर्माण करण्यात आले. सगळीकडे उद्योगधंद्यांची वाढ होत होती, एकत्रीकरण होत होते, भांडवलाची तीव्रता वाढत होती.— अजस्र उद्योग अस्तित्वात येत होते आणि हे अजस्र उद्योग मक्तेदारीच्या दिशेने वाटचाल करीत होते.

मक्तेदारीने हळूहळू स्पर्धेची जागा घेणे हा काहीं बाह्य आक्रमणाचा प्रकार नव्हता तर ते स्पर्धेचेच विकसित रूप होते. स्पर्धेतून मक्तेदारीचा जन्म झाला. प्रत्येक व्यवस्थेच्या पोटामध्येच तिच्या बदलाची बीजे असतात या सत्याचाच तो एक आविष्कार होता. मक्तेदारी म्हणजे स्पर्धेवर हल्ला चढवून स्पर्धेला पराजित करणारा बाह्य आक्रमक नव्हता. नैसर्गिक विकासप्रक्रियेमध्येच स्पर्धेचे रूप पालटून मक्तेदारीचा जन्म झाला होता.

अमेरिकेतील यादवी युद्धानंतर दळणवळण आणि वाहतूक यांच्या साधनांमधील क्रांतीची कथा तर सर्वश्रुतच आहे. तेथे व्यापक प्रमाणावर चांगले लोहमार्ग टाकण्यात आले, नद्यांतून आणि महासागरांमधून महाकाय अग्नयावत जहाजे संचार करू लागली, तारायंत्रामध्ये सुधारणा घडवून त्याचा व्यापक प्रमाणावर विस्तार होऊ लागला. दळणवळण आणि वाहतूक यांसाठी उपलब्ध झालेल्या जलद, नियमित आणि स्वस्त साधनांमुळे उत्पादनासाठी लागणारी सामुग्री एकाच ठिकाणी आणून केंद्रित करणे आता शक्य तसेच किफायतशीर बनले. तंत्रज्ञानातील अफाट प्रगती, अधिकाधिक कार्यक्षम यंत्रांचे वाढते शोध यामुळे प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणे, आणि व्यापक प्रमाणावर श्रमविभागणी करणे शक्य झाले. उत्पादनामध्ये वाढ होत असतानाच प्रत्येक नगामागे उत्पादनखर्च कमी करणाऱ्या महाकाय उद्योगांच्या आगमनासाठी परिस्थिती परिपक्व बनली होती. युद्धभूमीवर पदार्पण करून विजय संपादन करणे आता महाकाय उद्योगाला शक्य झाले होते.

जे शक्य होते ते प्रत्यक्षात उतरवण्यात आले.

धंदा म्हणजे एक युद्धच असते. त्यात सहभागी होणाऱ्या कोणालाही विचारा. युद्धामध्ये जंगलचा कायदाच प्रमाणभूत असतो. एका विशिष्ट उद्योगधंद्यामध्ये दोन कंपन्या स्पर्धा करतात. आपल्या वस्तूंच्या किंमती कमी करून एक कंपनी दुसरीला टोला हाणते. दुसरी कंपनी किंमती आणखी कमी करून प्रतिटोला देते. किंमती अधिकाधिक कमी करून टोले-प्रतिटोले दोन्ही बाजूंनी चालूच राहातात. परिणामतः किंमती उत्पादनखर्चापेक्षाही कमी होतात. या स्पर्धेमध्ये जीत कोणाची होईल ? ज्या कंपनीचा उत्पादनखर्च कमीत कमी असेल तिची सरशी होईल हे तर उघडच आहे. उत्पादनाची व्याप्ती जितकी जास्त तेवढा उत्पादनखर्च कमी हेही स्पष्टच आहे. म्हणजे 'मोठा मासा'च मुक्यातील फायदा मिळवतो. पण अशा युद्धामध्ये तग धरून राहण्याच्या क्षमतेला महत्त्व असते. ही क्षमता भांडवलाच्या साठ्यावर अवलंबून असते. ज्या कंपनीकडे भांडवल जास्त असते ती कंपनी म्हणजे 'मोठा मासा' असतो. किंमती कमी केल्यामुळे मोठ्या कंपनीची ओढाताण होते, पण छोटी कंपनी डबघाईलाच येते, आणि लवकरच निकालात काढली जाते. मार्क्स यांनी दोन योद्धयांचे द्वंद्व बहुधा पाहिले नसावे. परंतु धंद्यामधील द्वंद्वांचे त्यांनी बारकाईने निरीक्षण केले होते. त्यांनी केलेले वर्णन असे : " क्रयवस्तू अधिकाधिक स्वस्त करून स्पर्धेचे युद्ध लढण्यात येते. क्रयवस्तू स्वस्त करणे श्रमाच्या उत्पादकतेवर अवलंबून असते, आणि श्रमाची उत्पादकता उत्पादनाच्या व्याप्तीवर अवलंबून असते.... त्यामुळे मोठे भांडवल छोट्या भांडवलाला नेस्तनाबूत करते...स्पर्धेमुळे छोटे भांडवलदार धुळीस मिळतात, त्यांचे भांडवल अंशतः जेत्यांच्या हाती येते तर अंशतः जप्त होते. "

सर्वसामान्य द्वंद्व आणि उद्योगधंद्यांमधील द्वंद्व यांच्यातील फरक या शेवटच्या वाक्यामध्ये स्पष्ट केला आहे. पहिल्या प्रकारामध्ये पराभूत योद्धयास धुळीस मिळवून जेता नव्या आणि अधिक पैसे मिळवून देणाऱ्या झुंजींसाठी निघून जातो. दुसऱ्या प्रकारातही जेता तेच करतो. परंतु द्वंद्वाचे रिंगण सोडण्यापूर्वी तो नरमांसभक्षकाचीही भूमिका बजावतो

तो पराभूताचे लचके तोडतो आणि पूर्वीपेक्षाही अधिक मोठा होऊन सामोऱ्या येणाऱ्या सर्वांना तोंड देण्यास तयार होतो.

तो जितका मोठा होतो तितके त्याला हरविणे अधिकाधिक कठीण होऊ लागते. बाकीचे योद्धे प्रयत्न करतात, पण हार खातात. मोठा मासा अजिंक्य बनतो काही काळ तरी त्याच्यासमोर उभे राहण्याची कोणालाही हिंमत होत नाही.

खुल्या स्पर्धेमधून 'ट्रस्ट्स' जन्माला आले. काही काही वेळा हे युद्ध नीतिनियमांना धरून असे. पण अनेक वेळा (कमरेखाली वार करण्याची सवय असलेल्या धंदेवाईक जगाच्या दृष्टिकोनातूनही) त्यात बनवेगिरी चाले. पण नीतिनियमांना धरून असो वा बनवेगिरीने केलेले असो, ते युद्ध कडवटच असे. अनेकदा ज्यांचे उद्योगधंदे बुडीत निघाले ती माणसे आयुष्यातून उठत. त्यांची पुन्हा संघर्ष करण्याची हिंमत नष्ट होई. अशा युद्धांमध्ये काही जण टार वेडे झाले, तर काही जणांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला.

परंतु या विषयामागील एक जाणकार, एका महान ट्रस्टनिर्मात्याचे कनिष्ठ चिरंजीव श्री. जॉन रॉकफेलर यांच्या मते या युद्धाची फलनिष्पत्ती विचारात घेता, जे घडले ते चांगलेच घडले. ब्राऊन विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोर 'ट्रस्ट्स'संबंधी बोलताना ते म्हणाले, "सभोवताली वाढणाऱ्या कोवळ्या कळ्यांचा बळी देऊनच मोहकता आणि सुगंध यांनी युक्त असा अमेरिकन सौंदर्यशाली गुलाब निर्माण करता येतो."

ट्रस्टच्या क्षेत्रातील पहिले "अमेरिकन सौंदर्य" होते खनिज तेल. १९०४ सालाच्या सुमारास युनायटेड स्टेट्समध्ये शुद्धीकरण करण्यात येणाऱ्या खनिज तेलाच्या ८६% भागावर स्टँडर्ड ऑईल कंपनीचे नियंत्रण होते. खनिज तेलाच्या क्षेत्रात घडलेल्या नाट्याचाच आविष्कार पोलाद, साखर, व्हिस्की, कोळसा आणि इतर क्षेत्रांमध्येही झाला. स्पर्धेच्या सावळ्या गोंधळामधून मक्तेदारी व्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये ट्रस्ट्सची निर्मिती करण्यात आली.

हे ट्रस्ट अजस्र होते, कार्यक्षम होते आणि सामर्थ्यशाली होते. असे असल्यामुळेच उत्पादन, वितरण आणि व्यवस्थापन या तिन्ही क्षेत्रांमध्ये खर्च कमी करणे त्यांना शक्य झाले. निरर्थक स्पर्धा टाळण्यासाठी त्यांनी शक्य ते सर्व प्रयत्न केले. उत्पादनाची पातळी आणि किंमती ठरविण्याची सूत्रे हाती यावीत यासाठी त्यांनी क्रयवस्तूंच्या उत्पादनावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. ज्या मार्गाने अधिक नफा मिळणार होता तो मार्ग त्यांनी स्वीकारला. ट्रस्ट मोहिमेच्या अभ्यासकांच्या मते, त्यांना अधिक नफा मिळवण्यात रस होता : "स्वतःच्या फायद्यासाठी क्रयवस्तूच्या किंमतीमध्ये फेरबदल करण्यासाठी त्या वस्तूच्या पुरवठ्यावर पुरेसे नियंत्रण प्रस्थापित करू शकणारी उत्पादन क्षेत्रातील किंवा वितरण क्षेत्रातील औद्योगिक संघटना म्हणजे ट्रस्ट होय."

"स्वतःच्या फायद्यासाठी किंमतीमध्ये फेरबदल घडवणे" ट्रस्टला शक्य होते. तीच गोष्ट इतर महाकाय संघटनांच्याही बाबतीत खरी होती. ट्रस्ट हा अमेरिकन प्रकार होता. अमेरिकेमध्ये आणि इतरत्र, 'पूल', 'कंबाईन', 'ॲसोसिएशन,' 'कार्टेल' हे मक्तेदारीचे इतर प्रकारही सुरू झाले. 'कार्टेल' हा प्रकार जर्मनीमध्ये विशेष रूढ होता.

" बाजारपेठेवर मक्तेदारी प्रभाव पाडण्याच्या दृष्टीने, एकाच धंद्यातील उद्योजक स्वतःचे कायदेशीर स्वातंत्र्य अबाधित राखूनही एकत्र येतात आणि परस्पर करारावर आधारित एक संघ निर्माण करतात. अशा संघाला ' कार्टेल ' असे म्हणतात. "

किंमती खाली खेचत एकमेकांशी जीवघेणी स्पर्धा करून अखेर एकाच कंपनीमध्ये विलीन होण्याऐवजी, आपली कंपनी वेगळी ठेवूनही एकमेकांशी स्पर्धा न करण्याचा निर्णय वेगवेगळे बडे उद्योगपती घेतात; किंमती ठरवण्याचा आणि बाजारपेठेमधील वाटा ठरवण्याचा ते करार करतात असा याचा सरळ साधा अर्थ आहे.

या संदर्भातील एक उदाहरण म्हणजे ' रुहर कोल कार्टेल ' : " वेगवेगळ्या कंपन्या भागधारक असलेला एक केंद्रीय विक्री संघ किंवा कंपनी स्थापन करण्यात आली. कोळशाच्या विक्रीचे सर्व हक्क या संघाकडे होते. कोळसा क्षेत्रातील विविध कंपन्यांकडून या संघाने आकडेवारी गोळा केली. कोळशासाठी एकच समान किंमत मोजण्यात येईल अशी व्यवस्था करण्यासाठी या संघाने एक प्रशासन समिती नेमली. कोळशाच्या खाणींचे मालक आपला सर्व कोळसा आणि कोक या संघाला विकत .. करारनाम्यातील कलमांचा भंग करणाऱ्यास दंड निश्चित करण्यात आला, तसेच एक समान धोरण राबविण्यात आले. प्रत्येक खाणीला उत्पादनाचा एक विशिष्ट हिस्सा ठरवून देण्यासाठी संघाने एका आयोगाची स्थापना केली ... एक किमान विक्री – किंमत निश्चित करण्यात आली. स्पर्धायुक्त विभागात कोळसा त्या किंमतीला विकण्यात येई. स्पर्धा नसलेल्या विभागामध्ये मागणी आणि उत्पादन यांचा विचार करून या किंमतीपेक्षा अधिक किंवा कमी किंमतीला कोळसा विकण्यात येई. "

इंग्लंडमध्ये देखील स्पर्धा करणाऱ्या गटांनी आपापसातील स्पर्धा संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने ॲसोसिएशन्स स्थापन केल्या. ' ट्रस्ट्स संबंधी समितीसमोर देण्यात आलेल्या वेगवेगळ्या साक्षींवरून हे स्पष्ट होईल : " व्यापाराचे नियंत्रण करून अनावश्यक स्पर्धा टाळण्याच्या उद्देशानेच आमच्या असोसिएशनची स्थापना करण्यात आली ...

" किंमतीसंबंधी समान धोरण अंगीकारण्याचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून आमच्या ॲसोसिएशनची स्थापना करण्यात आली. यापूर्वी एकमेकांशी स्पर्धा करताना किंमती खाली खेचण्याचा उद्योग इतक्या प्रमाणावर चाले की बहुतेक कंपन्यांना अजिबात नफा होत नसे किंवा तो फारच थोडा होई. आमचे असोसिएशन हे प्रकार थांबविण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. ...

" स्पर्धा इतकी जीवघेणी असे ... की व्यापारधंद्यामधून कोणालाही फायदा होत नसे. उत्पादक आवश्यकतेपेक्षा जास्त उत्पादन करीत आणि एकमेकांच्या नरडीचा घोट घेण्यासाठी ते आसुसलेले असत. "

या साक्षी ऐकल्यानंतर या समितीने हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढला : " सध्या (१९१९ साली) युनायटेड किंग्डमच्या प्रत्येक महत्त्वपूर्ण उद्योगधंद्यामध्ये ' ट्रेड ॲसोसिएशन्स ' आणि ' कॉम्बिनेशन्स ' करण्याकडे कल असल्याचे आम्हाला आढळते. स्पर्धा मर्यादित करून किंमतीवर नियंत्रण प्रस्थापित करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. "

" स्पर्धा मर्यादित करून किंमतीवर नियंत्रण प्रस्थापित करणे " या शेवटच्या ओळी-वरून सर्व काही स्पष्ट होते. क्रयवस्तूंचे वेगवेगळे उत्पादक, विक्रेते यांच्यामधील स्पर्धेमुळे किंमती उत्पादनखर्चाएवढ्या (यामध्ये नफ्याचा वाजवी दर समाविष्ट आहे) मर्यादित राहतात; प्रत्येक व्यक्तीने स्वतःचे हितसंबंध पुढे रेटण्याचा प्रयत्न केला की मागणी आणि पुरवठा यामध्ये योग्य किंमतीला समतोल प्रस्थापित होतो या अभिजात अर्थशास्त्रीय सिद्धांतापासून वरील व्यवहार शेकडो कोस दूर होता.

मक्तेदारीच्या वाढीबरोबर मागणी आणि पुरवठा यामधील ' नैसर्गिक ' समतोल नष्ट झाला आणि तो कृत्रिमरीत्या प्रस्थापित केला जाऊ लागला. मक्तेदारीच्या वाढीबरोबर बाजारपेठेत खुल्या स्पर्धेमुळे किंमती ठरणे बंद झाले. बाजारपेठ खुली राहिली नाही आणि किंमती हेतुपुरस्सर निश्चित करण्यात येऊ लागल्या.

उद्योगधंद्यातील मक्तेदारीप्रमाणे, तेवढीच किंवा अधिक महत्त्वाची मक्तेदारी बँकिंग क्षेत्रामध्ये निर्माण झाली. मार्क्सनी हे भाकित वर्तविले होते. त्यांच्या म्हणण्यानुसार, महाकाय " भांडवली उत्पादनाबरोबर एक संपूर्णतया नवी शक्ती अस्तित्वात येते. ती म्हणजे पतपुरवठा–यंत्रणा. स्पर्धेच्या युद्धातील हे नवे सामर्थ्यशाली शस्त्र आहे एवढेच नव्हे, तर समाजाच्या विविध थरांमध्ये लहानमोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या खर्चासाठी असणारा पैसा या यंत्रणेच्या अदृश्य धाग्यांनी गोळा करण्यात येतो आणि एकएकट्या किंवा संघटित भांडवलदारांच्या हाती जमा होतो. भांडवलदारांच्या केंद्रीकरणाची ही एक वैशिष्ट्यपूर्ण यंत्रणा आहे. "

उद्योगधंदे फार मोठ्या प्रमाणावर पतपुरवठ्यावर अवलंबून होते. यामुळे पतपुरवठा यंत्रणेवर नियंत्रण असणारे लक्ष्मीपती सत्तास्थानी विराजमान झाले होते. स्वतःच्या उद्योगधंद्याचा विस्तार करण्याची इच्छा असलेल्या उद्योगपतींना—मग ते छोटे असोत की मोठे, मक्तेदार असोत किंवा नसोत—भिक्षांदेही करत झोळी घेऊन या लक्ष्मीपतींकडे —बँकर्सकडे—जावे लागे. जेव्हा काही जणांना उद्योगधंदा सुरू करण्याची इच्छा असे आणि पैसे उभे करण्यासाठी ते भागभांडवल विक्रीस काढीत तेव्हा झोळी घेऊन त्यांना बँकर्सकडे जावे लागे. हे बँकर्स भाग-भांडवलाच्या विक्रीचे रोखे काढीत. पैशाची सर्वत्र गरज होती आणि राष्ट्रातील पैसा या लक्ष्मीपतींच्या तिजोऱ्यांमध्ये असे किंवा फक्त त्यांनाच उपलब्ध होई.

बँकर्सकडे पैसा जितका जास्त तितकी त्यांची सत्ता जास्त. प्रत्येक प्रगत उद्योगप्रधान देशामध्ये ' मनी ट्रस्ट ' अस्तित्वात येऊ लागले. उद्योगधंद्यांमधील मक्तेदारीच्या काळात बँकिंग क्षेत्रातही मक्तेदारी अस्तित्वात आली. १९११ सालापर्यंत ही अवस्था आली होती हे त्या काळचे न्यू जर्सीचे गव्हर्नर वूड्रो विल्सन यांच्या उद्गारांवरून स्पष्ट होते. " पैशाची मक्तेदारी या देशातील सर्वात प्रभावशाली मक्तेदारी आहे. ही मक्तेदारी अस्तित्वात आहे तोपर्यंत आपल्या जुन्या पद्धती, स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत विकास प्रेरणा यांना काडीचीही किंमत नाही. एका महान उद्योगप्रधान राष्ट्रावर तेथील पतपुरवठा यंत्रणेचीच अधिसत्ता असते. आपल्या पतपुरवठा-यंत्रणेचे केंद्रीकरण झाले आहे. या राष्ट्राची प्रगती

आणि पर्यायाने आपल्या सर्व कृती यांची सूत्रे काही मूठभर व्यक्तींच्या हाती एकवटली आहेत. ''

अनेकदा या " मूठभर व्यक्ती ", हे लक्ष्मीपती आणि औद्योगिक मक्तेदाऱ्यांचे प्रमुख या व्यक्ती एकत्र असत. अनेकदा " संयुक्त संचालन मंडळांचा " अवलंब करण्यात येई. ज्या मोठ्या ट्रस्टमध्ये किंवा अजस्र कॉर्पोरेशन्समध्ये बँका पैसे गुंतवीत, ते ट्रस्ट किंवा कॉर्पोरेशन यांच्या संचालक मंडळावर बँकिंग क्षेत्रामधील प्रतिष्ठित व्यक्तींची नियुक्ती केली जाई.

परंतु हे संबंध इतके आंतरिक असणे काही अत्यावश्यक नव्हते. पैशांच्या थैल्यांवर बँकर्सचा ताबा असणे पुरेसे होते. औद्योगिक कंपन्यांना विशिष्ट धोरणे अंगीकारण्यास भाग पाडण्याचे सामर्थ्य त्यांना त्यामुळे प्राप्त होई. जर्मन सिमेंट सिंडिकेटच्या संचालक-मंडळाला, बर्लिनमधील " चार बड्या " बँकांपैकी एका बँकेने १९०१ साली लिहिलेल्या पत्रावरून हे स्पष्ट होते : " आम्हाला असे समजते की...तुमच्या कंपनीच्या पुढील सर्वसाधारण सभेमध्ये तुमच्या कंपनीत काही बदल करणाऱ्या उपाययोजना तुम्ही संमत करून घेणार आहात. या बदलांशी आम्ही सहमत नाही. त्यामुळे तुम्हाला देण्यात आलेले कर्ज त्वरित काढून घेणे आम्हाला भाग पडत आहे. आम्हाला या कृतीचा अत्यंत खेद होतो. आम्हाला अमान्य असलेली कोणतीही गोष्ट उपर्निर्देशित सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर करण्यात येणार नसेल, तसेच यासंबंधी भविष्यकाळाबद्दलही आम्हाला हमी मिळणार असेल, तरच नव्या कर्जासंबंधी तुमच्याशी वाटाघाटी करण्यास आमची तयारी आहे. ''

जर एका बड्या सिंडिकेटला आपल्या तालावर नाचायला भाग पाडणे या लक्ष्मी-पतींना शक्य होते तर औद्योगिक क्षेत्रातील कच्च्याबच्च्यांवर त्यांचे किती नियंत्रण असू शकेल याची कल्पनाच केलेली बरी.

' अदर पीपल्स मनी ' (इतर लोकांचा पैसा) असे समर्पक नाव असलेल्या पुस्तकामध्ये, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती लुई डी. ब्रॅन्डाइस यांनी १९१२ साली या परिस्थितीचे यथायोग्य वर्णन केले आहे : " गुंतवणूक करणारे बँकर्स म्हणजे आपल्या वित्तक्षेत्रातील मनगटशाहीचे सर्वेसर्वा आहेत. असोशिएटेड बँका, ट्रस्ट कंपन्या, जीवन-विमा कंपन्या म्हणजे केवळ त्यांच्या हातातील साधने आहेत. नियंत्रित रेल्वे, सार्वजनिक सेवा आणि औद्योगिक कॉर्पोरेशन्स यांवर त्यांची अधिसत्ता चालते. वास्तविक मध्यस्थ असूनही हे बँकर्स अमेरिकेतील उद्योगक्षेत्राचे सम्राट बनले आहेत. त्यांच्या संमतीशिवाय किंवा सहभागाशिवाय कोणताही मोठा उपक्रम हाती घेणे अशक्यप्राय झाले आहे. अर्थात, हे बँकर्स म्हणजे गडगंज संपत्ती असलेले कर्तृत्ववान लोक आहेत. परंतु प्रचंड धनदौलत किंवा असामान्य कर्तृत्व ही काही त्यांच्या उद्योगधंद्यांवरील नियंत्रणाची गुरुकिल्ली नव्हे. अत्यंत सघन आणि सर्वंकष केंद्रीकरण असलेले संघटन हीच त्यांच्या सत्तासामर्थ्याची गुरुकिल्ली आहे. ''

अशा रीतीने, १८७० नंतर जुन्या धर्तीची भांडवलशाही जाऊन नव्या धर्तीची भांडवलशाही अस्तित्वात आली. खुली स्पर्धा असलेल्या भांडवलशाहीची जागा मक्तेदारी भांडवलशाहीने घेतली. या बदलाचे महत्त्व अनन्यसाधारण होते

महाकाय मक्तेदारी उद्योगधंद्यांमुळे पूर्वी कधीही झाला नव्हता इतक्या प्रमाणात उत्पादक शक्तींचा विकास झाला. देशातील नागरिकांच्या उपभोगक्षमतेपेक्षा वस्तूंचे उत्पादन करण्याची उद्योगपतींची क्षमता अधिक वेगाने वाढू लागली. (येथे उपभोग म्हणजे भांडवलदारांना नफा मिळवून देऊ शकेल असा उपभोग —अधिक वस्तू वापरणे लोकांना नक्कीच शक्य होते, परंतु त्या विकत घेण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसा पैसाही नव्हता.)

देशांतर्गत मागणीशी मेळ बसेल अशा पद्धतीने पुरवठ्याचे नियमन करणे मक्तेदारी भांडवलदारांना शक्य होते. आणि त्यांनी तसेच केले. उद्योगधंद्यामध्ये ही पद्धत व्यवहार्य होती आणि त्यामुळे भरपूर नफाही झाला. परंतु कारखान्याच्या उत्पादनक्षमतेचा बराचसा भाग त्यामुळे निष्क्रीय बनला. अशी स्थिती उद्योगपतींना डोकेदुखी निर्माण करते. फक्त देशांतर्गत बाजारपेठेला पुरेल एवढ्याच प्रमाणावर वस्तूंचे उत्पादन मर्यादित करण्यात त्यांना रस नव्हता. वस्तूंचे जास्तीत जास्त उत्पादन करण्यासाठी त्यांना अहोरात्र कारखाने चालवायचे होते. याचा अर्थ स्वतःच्या देशाबाहेर विक्री करणे त्यांना भाग होते. त्यांनी निर्माण केलेला अतिरिक्त माल खपवण्यासाठी परदेशी बाजारपेठा शोधण्याशिवाय त्यांना **गत्यंतरच नव्हते.**

आता या बाजारपेठा शोधायच्या कुठे? इंग्लंडने इतर श्रीमंत देशांमध्ये आपल्या वस्तूंची विक्री करण्याचा वर्षानुवर्षे जो मार्ग चोखाळला, तोच मार्ग इतर देशांनीही अवलंबला. परंतु आता संरक्षणात्मक जकातीच्या उंच तटबंदी त्यांना अडथळा निर्माण करीत होत्या आणि त्या तटबंद्यांच्या आड त्यांचे स्पर्धक आपापल्या देशांतर्गत बाजारपेठेवर कबजा मिळवून बसले होते. १८८५ साली फ्रान्सचे पंतप्रधान जूल्स फेरी यांनी नोंदवलेली ही तक्रार पाहा : " आपल्या उद्योगधंद्यांसमोरील अधिकाधिक तीव्र होत जाणारी अडचण म्हणजे बाजारपेठांची कमतरता. यामागचे कारण काय? कारण जर्मनीने स्वतःभोवती [जकातींचे] कडे उभारले आहे; सागरापलीकडे अमेरिकेने आत्यंतिक स्वरूपाच्या संरक्षणात्मक जकाती उभ्या करण्याचे धोरण स्वीकारले आहे. "

जर्मनी आणि अमेरिका यांसारखी राष्ट्रे आता इतर राष्ट्रांच्या मालाला खुली बाजारपेठ पुरवायला तयार नव्हती; उलटपक्षी, जगातील बाजारपेठांसाठी त्यांचीही स्पर्धा चालू होती. प्रगत उद्योगप्रधान राष्ट्रांमधील उत्पादनक्षमतेने उपभोगक्षमतेला मागे टाकले होते, त्यामुळे गंभीर परिस्थिती ओढवली होती. या सर्वच राष्ट्रांमध्ये अतिरिक्त उत्पादन होऊ लागले आणि त्यासाठी परदेशी बाजारपेठा शोधणे निकडीचे बनले होते.

पण या बाजारपेठा शोधायच्या कुठे?

या प्रश्नाला एकच उत्तर होते—वसाहती.

वेगवेगळ्या युरोपियन राष्ट्रांची मालकी दाखविण्यासाठी, विविध रंगांनी रंगवलेला आफ्रिकेचा नकाशा पाहण्याची आपल्याला इतकी सवय झाली आहे की ही पूर्वापार चालत आलेली परिस्थिती नव्हे हे आपण पार विसरण्याचीही दाट शक्यता आहे. सुमारे सत्तर वर्षांपूर्वी (म्हणजे १९३७ पूर्वी सत्तर वर्षे; १८६५ च्या सुमारास) जवळपास संपूर्ण आफ्रिका खंडावर तेथील स्थानिक लोकांचीच मालकी होती. मक्तेदारी भांडवलशाहीच्या काळात सगळीकडे उद्योगपतींच्या समोर अतिरिक्त उत्पादनाची समस्या

उभी टाकली आणि वसाहतींच्या रूपात या प्रश्नाचे उत्तर आपल्याला गवसले असे त्यांना वाटले. यानंतरच आफ्रिकेचा नकाशा बदलण्यात आला.

डेव्हिड लिव्हिंग्स्टन हे प्रसिद्ध धर्मोपदेशक-शोधक आफ्रिकेच्या अंतर्भागात हरवले होते. 'न्यूयॉर्क हेराल्ड'चे मालक जेम्स गॉर्डन बेनेट यांनी हेन्री मॉर्टन स्टॅनली यांना त्यांच्या शोधार्थ आफ्रिकेस पाठविले. केवढी महान कामगिरी ! आणि महदाश्चर्य म्हणजे स्टॅनली त्यामध्ये यशस्वी झाले. त्यांनी लिव्हिंग्स्टनना शोधून काढले एवढेच नव्हे, तर आणखीही काही शोध लावले. नंतर स्वतःच्या शोधांबद्दल त्यांनी अनेक व्याख्याने दिली. त्यांनी श्रोतृवर्गाला जागच्या जागी खिळवून ठेवले असणार याबद्दल शंकाच नको. परंतु आफ्रिकेसंबंधी मँचेस्टरचे कापसाचे व्यापारी आणि बर्मिंगहॅमचे लोखंडाचे उत्पादक यांच्यापेक्षा अधिक रस दाखविणारा श्रोतृवर्ग त्यांना नक्कीच मिळाला नसणार. त्यांच्यासमोर त्यांनी सांगितले : " काँगोच्या प्रवेशद्वारापलिकडे चार कोटी लोक राहातात आणि त्यांना वस्त्रांकित करण्यासाठी मँचेस्टरचे कापड-विणकर वाट पाहात आहेत. त्यांना लोखंडाच्या वस्तू पुरवण्यासाठी आणि त्यांच्या धुळीने माखलेल्या वक्षःस्थळांवर छोटेमोठे दागिने चढवण्यासाठी लागणारा धातू लालबुंद करण्यासाठी बर्मिंगहॅममधील भट्ट्या पेटल्या आहेत. आणि त्या अज्ञानी रानटी लोकांना खिस्ती धर्माची दीक्षा देण्यासाठी खिस्ती धर्मोपदेशक अतिशय उत्सुक आहेत."

अतिरिक्त उत्पादनाचे काय करायचे या पेचप्रसंगात सापडलेल्या उद्योगपतींना एकच मार्ग दाखवीत होते, वसाहती—हाच तो मार्ग होता.

इतर उद्योगप्रधान देशांतील उद्योगपतींना त्याच सुमारास त्या प्रश्नाचे नेमके तेच उत्तर सापडले. १८७० नंतर इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, इटाली आणि जर्मनी या देशांमध्ये अतिरिक्त उत्पादनासाठी वसाहतींच्या बाजारपेठा मिळवण्यास चढाओढ सुरू झाली. अमेरिकेने १८९८ साली या शर्यतीमध्ये पदार्पण केले. बोस्टन येथील उद्योगपतींच्या एका गटाला रिपब्लिकन सेनेटर अल्बर्ट जे. बेव्हरिज यांनी त्या वर्षी सांगितले : " अमेरिकन कारखाने अमेरिकन लोकांच्या आवश्यकतेपेक्षा जास्त उत्पादन करीत आहेत. त्यांच्या जरुरीपेक्षा जास्त पिके अमेरिकन भूमीमधून निघत आहेत. दैवानेच आपले धोरण ठरविले आहे. जागतिक व्यापार आपल्याच हाती आला पाहिजे आणि तो येईलच. इंग्लंडच्याच पावलावर पाऊल टाकून आपण ते साध्य करू. अमेरिकन वस्तूंच्या वितरणासाठी आपण जगभर व्यापार-स्थानके स्थापन करू. आपल्या व्यापारी गलबतांनी आपण सारा महासागर व्यापून टाकू. आपल्या महत्त्वाला शोभा देईल असे आरमार आपण उभे करू. आपला झेंडा फडकावत मोठ्या वसाहती आपल्याबरोबर व्यापार करतील आणि आपली व्यापारस्थळे म्हणून वृद्धी पावतील."

वसाहती अतिरिक्त उत्पादनासाठी एक बाजारपेठ पुरवितात, त्याचप्रमाणे आणखीही एका कारणासाठी वसाहतींचा उपयोग होता. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या महाकाय उद्योगांसाठी भरमसाठ कच्च्या मालाची गरज भासते. सगळीकडच्या मक्तेदार भांडवलदारांना रबर, खनिज तेल, नायट्रेट्स, साखर, कापूस, अन्नधान्य, खनिजे वगैरे विविध प्रकारच्या कच्च्या मालाची आवश्यकता असते. स्वतःला लागणाऱ्या कच्च्या

मालासाठी इतर देशांवर अवलंबून राहणे उद्योगधुरिणांना परवडणारे नव्हते. आवश्यक कच्च्या मालाच्या उगमस्थानांवर त्यांना मालकी किंवा नियंत्रण प्रस्थापित करावयाचे होते. इटालीची इथिओपियावरील स्वारी हे अशा साम्राज्यवादी मोहिमांचे एक अगदी अलीकडचे (१९३७ च्या सुमाराचे) उदाहरण होय. ८ ऑगस्ट १९३५ च्या 'न्यूयॉर्क टाइम्स' च्या मते या स्वारीचे उद्दिष्ट असेच होते.

इटाली इथिओपियामध्ये कापसाची लागवड करणार

कॉफी आणि कापूस या पिकांमुळे या मोहिमेचा खर्च भरून निघेल.

मोठ्या प्रमाणावर आयात दृष्टीक्षेपात.

रोम, ऑगस्ट ७ : उत्तर आणि दक्षिण अमेरिकेबरोबरील व्यापारावर परिणाम करतील अशा दोन पिकांची लागवड इथिओपियामध्ये करण्यावर इटालीचा नफ्याबद्दलचा आशावाद अवलंबून आहे.

सोने, लोखंड, प्लॅटिनम, तांबे आणि इतर खनिजांबद्दलच्या इटालीच्या अपेक्षांची पूर्ती होवो अथवा न होवो. परंतु कापूस आणि कॉफी या पिकांची लागवड करून पूर्व आफ्रिकेमध्ये खर्ची पडलेल्या कोट्यवधी लिरांचा खर्च भरून काढता येईल ही इटालीची अपेक्षा रास्तच आहे.

इटालीचा कापूस आयातीवरील खर्च प्रतिवर्षी ७४ कोटी लिरा एवढा असून त्यातील बहुतेक सगळा भाग अमेरिकेलाच जातो. कॉफी आयातीसाठी त्यांच्या प्रतिवर्षी १८.५ कोटी लिरा खर्ची पडतात. या दोन वस्तूंसाठी सुमारे १०० कोटी लिरा खर्च होतात. इटालीच्या एकूण आयातीच्या १२·५ % भाग या दोन वस्तूंसाठी खर्च होतो.

म्हणजे कच्च्या मालाच्या उगमस्थानांवर नियंत्रण प्रस्थापित करणे ही साम्राज्यवादामागील दुसरी प्रेरणा होती. अतिरिक्त उत्पादनासाठी बाजारपेठा शोधणे ही पहिली प्रेरणा होती हे आपण पाहिलेच आहे. बाजारपेठांच्या शोधामध्ये असलेले अतिरिक्त भांडवल ही साम्राज्यवादामागील तिसरी आणि सर्वांत महत्त्वाची प्रेरणा होती.

मक्तेदारी उद्योगांमधून मालकांनी भरपूर नफा कमावला. त्याचे काय करावे हे मालकांना कळेनासे व्हावे इतका हा पैसा होता. हे अविश्वसनीय वाटेल, पण काही काही वेळा हा नफा इतका प्रचंड होता की कितीही प्रयत्न केला असता तरीही तो खर्च करणे 'ट्रस्ट'च्या निर्मात्यांना जमले नसते.

सगळे पैसे खर्च करण्याचा त्यांनी मुळीच प्रयत्न केला नाही. त्यांनी आपल्या पैशाची बचत केली. त्याचप्रमाणे बँका, गुंतवणूक-कंपन्या, विमा कंपन्या वगैरे ठिकाणी पैसा साठवून लक्षावधी लहान-सहान लोकांनीही बचत केली. याचा परिणाम होता -- **अत्याधिक** भांडवलसंचय.

हा प्रकार गंमतीदार वाटतो. अत्याधिक प्रमाणावर पैसा जमा होणे कसे शक्य आहे ? भांडवलाचा उपयुक्त वापर करण्याचे मार्ग शोधणे शक्यच नव्हते का ? खरोखरच रस्ते बांधण्याची, इस्पितळे उभारण्याची, झोपडपट्ट्या पाडून त्या जागी लोकांना चांगली घरे पुरवण्याची गरज नव्हती का ? देशामध्येच पैशाच्या विनियोगासाठी हजारो मार्ग उपलब्ध असायला हवे होते, नाही का ?

असे मार्ग उपलब्ध होते. ग्रामीण भागांना चांगल्या रस्त्यांची आवश्यकता होती, कामगारांना राहण्यास सोयीची घरे हवी होती आणि छोट्या उद्योगधंद्यांना आपले पाय पसरण्याची इच्छा होती. तरीही अर्थतज्ञांनी "अतिरिक्त" भांडवल निर्माण झाल्याचा घोशा लावला होता आणि त्याबद्दल काहीही शंका असण्याचे कारणच नव्हते. लक्षावधी डॉलर्स (फ्रॅन्क्स, पाऊंडस, मार्क्स वगैरे) इतर देशांमध्ये पाठविले जात होते. का ! कशासाठी ?

"कशाची गरज आहे ?" असा प्रश्न भांडवल कधीच विचारत नाही. भांडवलाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न असतो, "मला नफा किती मिळेल ?" या प्रश्नाच्या उत्तरा-वरूनच अतिरिक्त भांडवल गुंतवणुकीचे स्थान ठरवले जाते. मार्क्सचे अनुयायी आणि रशियन क्रांतीचे नेते लेनिन यांनी १९१६ साली लिहिलेल्या 'इंपिरिअलिझम' [साम्राज्यशाही] या पुस्तकामध्ये यासंबंधी स्पष्टीकरण केले आहे. "आज उद्योग-धंद्यापेक्षा अतिशय मागास अवस्थेमध्ये असलेल्या शेतीचा विकास करणे, सर्वसामान्य लोकांचे जीवनमान उंचावणे, यांसारख्या गोष्टी जर भांडवलशाहीला शक्य असत्या तर अतिरिक्त भांडवलाचा प्रश्नच उद्‌भवला नसता ... पण तसे झाले तर ती भांडवलशाही कसली .... भांडवलशाहीला स्वतःचे अस्तित्व टिकवायचे असेल तर जनसामान्यांचे जीवन-मान उंचावण्यासाठी अतिरिक्त भांडवलाचा उपयोग कधीच केला जाणार नाही, कारण त्यामुळे भांडवलदारांचे नफे कमी होतात, याउलट इतर देशांमध्ये, मागास देशांमध्ये भांडवलाची निर्यात करण्यासाठी या अतिरिक्त भांडवलाचा उपयोग करण्यात येतो. या देशामध्ये भांडवलांची टंचाई असते, जमिनीची किंमत तौलनिकदृष्ट्या कमी असते, मागास वेतनाची पातळी कमी असते, कच्चा माल स्वस्त असतो आणि म्हणूनच नफे जास्त असतात."

नेमके असेच घडले. मागास देशांमध्ये, वसाहतींमध्ये अतिरिक्त भांडवलाला मुसंडीला मार्ग सापडला. रेल्वे, वीज, जळणवायू, रस्ते इत्यादींची नितांत गरज असलेल्या, मुबलक निसर्गसंपत्ती असलेल्या प्रदेशांमध्ये खाणींसाठी आणि मळ्यांसाठी विशेष 'सवलती' मिळवण्यात आल्या. या वसाहतींमध्ये नफा मिळवण्याची संधी अतिरिक्त भांडवलाला उपलब्ध झाली.

एवढ्यावरच सगळे संपत नव्हते. प्रत्यक्ष गुंतवणुकीवर मिळणाऱ्या नफ्याप्रमाणेच कर्जांची व्यवस्था करतानाही बहुतेक कर्जे स्वतःच्याच देशामध्ये खर्च केली जातील याची खबरदारी घेण्यात येई. उदाहरणार्थ, अर्जेंटिनाला रेल्वे बांधण्यासाठी जेव्हा इंग्लंडने कर्ज दिले तेव्हा बहुतेक लोहमार्ग आणि इतर सामानसुमान यांची खरेदी इंग्लंडमध्येच केली जाईल आणि त्यामधून इंग्लिश उत्पादकांना नफा होईल याची खबरदारी घेण्यात आली.

या ठिकाणी अतिरिक्त भांडवलाबरोबरच अतिरिक्त उत्पादनाचीही निर्यात झाली. अशा तऱ्हेने वसाहतीवर कब्जा करणे किंवा नियंत्रण प्रस्थापित करणे यामध्ये गुंतवणूक करणारे लक्ष्मीपती आणि उद्योगधंदे उभारणारे उद्योगपती या दोघांचेही हितसंबंध जुळणारे होते. आधुनिक अर्थव्यवस्थेला ' वित्तभांडवलाचे युग ' म्हणण्यात येते, कारण वित्त आणि उद्योग यांच्या संयोगाला या अर्थव्यवस्थेमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. भांडवलाचे प्रचंड साठे आणि नफा मिळवण्यासाठी या भांडवलाचा उपयोग करणारे उद्योगधंदे यांच्या संयोगातून तयार होणारे वित्त-भांडवल ही आज जगातील सर्वात प्रभावी शक्ती आहे.

उत्पादित माल आणि भांडवल यांच्यासाठी बाजारपेठा शोधत नफ्याच्या लालसेने भरधाव सुटलेली वित्त व उद्योग यांची जोडगोळी ही साम्राज्यवादामागील प्रमुख प्रेरक शक्ती होती. या विषयावरील पहिल्यावहिल्या अभ्यासनिबंधामध्ये जे. ए. हॉब्सन यांनी १९०२ साली लिहिले : " देशांतर्गत बाजारपेठेमध्ये आपला माल विकणे किंवा भांडवल उपयोगात आणणे जेव्हा उद्योगधुरिणांना शक्य होत नाही तेव्हा परदेशी बाजारपेठा आणि गुंतवणुकीच्या संधी शोधून स्वतःच्या अतिरिक्त संपत्तीला राजमार्ग उपलब्ध करून देण्याचा उद्योगधुरिणांनी केलेला प्रयत्न म्हणजेच साम्राज्यशाही. "

साम्राज्यशाही अस्तित्वात का येते या प्रश्नाचे हे उत्तर आहे उद्योगधुरीण " स्वतःच्या अतिरिक्त संपत्तीला राजमार्ग कसा उपलब्ध करून देतात. " याची कथा तर बहुतेकांना ठाऊकच आहे. याचे मार्ग अनेक आहेत आणि इटालीची ॲबिसिनियातील " संस्कृतीची मोहीम " [म्हणजे इथिओपियावरील आक्रमण] किंवा जपानचा चीनमधील " शिरकाव " ही त्याची अगदी अलीकडची उदाहरणे होत. जुन्या काळी म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या २५ वर्षांच्या कालखंडामध्ये, विशेषतः आफ्रिकेमध्ये अंमलात आणलेली पद्धत फारच सोपी होती. " युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिकन प्रदेशाची आपापसात विभागणी केली तेव्हा जवळपास प्रत्येक वेळी शोधकांच्या नाहीतर स्वतःच्याच दलालांच्या सहकार्याने व्यापाऱ्यांनी किंवा भांडवली कंपन्यांनी पहिली पावले टाकलेली असत. किनाऱ्यापासून काही मैल अंतरावरील अंतर्भागात शिरकाव करायचा, कपडे किंवा दारू यांच्या भेटी देऊन जमाती टोळ्यांच्या नायकांना वश करून घ्यायचे आणि समाईक भांडवल कंपन्यांबरोबर तथाकथित करार करण्यास त्यांना उद्युक्त करायचे अशी नेहमीची पद्धत होती. सही म्हणून एका निशाणीचा वापर करून आफ्रिकन टोळ्यांचे नायक या करारान्वये, काही वार कापड किंवा दारूच्या काही बाटल्या यांच्या मोबदल्यात, आपला सगळा मुलूख त्या कंपन्यांच्या स्वाधीन करीत. युरोपियन राष्ट्रांनी मध्ये आफ्रिकेमध्ये मिळवलेले बहुतेक प्रदेश अशाच प्रकारे बळकावलेले आहेत... केवळ वीस वर्षांच्या कालावधीत संपूर्ण मध्य आफ्रिकेची विभागणी करून ते प्रदेश ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, बेल्जम, पोर्तुगाल आणि इटाली यांच्या साम्राज्यामध्ये सामील करून घेण्यात आले. "

या प्रदेशांतील मूळ रहिवाशांकडून हे प्रदेश बळकावण्यामध्ये त्या लोकांचेच हित असून आपण एक ईश्वरदत्त कार्य पार पाडत आहोत असेही या धूर्त शोधक-व्यापारी-

भांडवलदारांना प्रामाणिकपणे वाटे. अशी साम्राज्ये उभारण्यामध्ये सिंहाचा वाटा असलेल्या सेसिल ऱ्होड्स यांनाही असेच वाटे. किमानपक्षी त्यांचे म्हणणे तरी तसेच होते : " आपला वंश जगामध्ये सर्वश्रेष्ठ असून आपण जितका भूभाग व्यापू तितके मानवजातीचे अधिकच कल्याण होणार आहे असा माझा दावा आहे....देव जर अस्तित्वात असेल तर आफ्रिकेचा शक्य तितका सर्व नकाशा मी इंग्लंडच्या ध्वजाने चितारावा अशीच त्याची इच्छा असेल. "

पादाक्रांत करण्यात आलेल्या या प्रदेशांतील स्थानिक लोक अगदी विचित्रच होते. गोरा माणूस सगळे काही त्यांच्या भल्यासाठीच करतो हे त्यांच्या ध्यानातच येत नसे. एका प्रकारच्या गोऱ्या माणसांनी म्हणजे धर्मोपदेशकांनी दिलेली शिकवण आणि दुसऱ्या प्रकारच्या गोऱ्या माणसांनी म्हणजे भांडवलदारांनी दिलेली वागणूक यामध्ये विरोध असल्याचे वाटून ते गोंधळून जात. काही काही वेळा, अज्ञानीपणे ते बंड करीत ! मग दुर्दैवाने, त्यांना धडा शिकवणे भाग पडे ! लवकरच मायदेशाकडून प्रचंड जहाजे तेथील बंदरांमध्ये येऊन दाखल होत. या जहाजांमधील सैन्य रायफली, बॉम्ब आणि मशिनगन्स ही संस्कृतीची शस्त्रास्त्रे वापरून त्यांना धडा शिकवी !

मायदेशातील सरकारच्या लष्करी सामर्थ्याच्या मदतीने हा धडा शिकवण्यात येई. देशातील लोकांचे " जीव आणि मालमत्ता यांचे संरक्षण " करण्यास तयार असलेले सरकार इतर मार्गांनीही मदत करी. उदाहरणार्थ, प्रशासनाच्या खर्चाची व्यवस्था करण्यासाठी, वसाहतींमध्ये चांगले रस्ते, इस्पितळे, शाळा वगैरे बांधण्यासाठी मूळ रहिवाशांवर सरकार एक कर बसवी आणि तो कर पैशाच्या रूपात द्यावा लागे. त्या रहिवाशांजवळ पैसा नसे. परंतु त्यातूनही मार्ग होता. गोऱ्या मालकांच्या ताब्यातील खाणीमध्ये किंवा मळ्यामध्ये काम करून पैसे मिळविणे आणि कर भरणे त्यांना शक्य होते. आता त्या कामासाठी अगदी तुटपुंजी मजुरी मिळे आणि या खाणींमध्ये किंवा मळ्यांमध्ये काम न करता स्वतःचे पोट भरणे त्यांना शक्य होते हे खरे आहे. परंतु कर देण्याशिवाय गत्यंतरच नव्हते आणि त्यासाठी (खाणींमध्ये किंवा मळ्यामध्ये) काम करणेही भागच होते. हे काम आणि कर त्यांनी नाकारले तर काय होई ? कर न भरण्याबद्दल फ्रान्सच्या पश्चिम आफ्रिकेतील वसाहतींमध्ये १९३५ साली काय उपाययोजना केली जाई याबद्दल एक निरीक्षक आपल्याला माहिती पुरवतो : " दक्षिण सुदानमधील एका खेड्यातील लोक कर भरू शकले नाहीत म्हणून रक्षक सैनिक खेड्यामध्ये पाठवून सर्व स्त्रिया आणि मुले यांना बाहेर काढण्यात आले, त्यांच्या झोपड्या जाळून टाकण्यात आल्या आणि कर भरेपर्यंत कुटुंबातील माणसे ओलीस ठेवण्यात येतील असे खेड्यातील पुरुषांना सांगण्यात आले. "

वसाहतींमधील लोकांशी कशा प्रकारे व्यवहार करण्यात आला याबद्दल सरसकट बोलणे कठीण आहे. कारण स्थलकालानुसार या व्यवहारामध्ये फरक पडे. परंतु अत्याचार मात्र सार्वत्रिक होते; एतद्देशीय लोकांच्या रक्ताने प्रत्येक साम्राज्यवादी राष्ट्राचे हात बरबटले होते. या विषयावरील एक अभ्यासक श्री. लिओनार्ड वूल्फ यांनी याबद्दल लिहिले आहे :

" ज्याप्रमाणे युरोपच्या राष्ट्रीय समाजजीवनामध्ये, गेल्या शतकात भांडवलदार व कामगार, शोषक व शोषित अशी सुस्पष्ट वर्गीय विभागणी घडून आली त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय समाजजीवनामध्ये, पश्चिमेकडील साम्राज्यवादी राष्ट्रे आणि आफ्रिका व पूर्वेकडील प्रदेशांमधील पराजित लोक, एक शासक व शोषक तर दुसरे शासित व शोषित अशी सुस्पष्ट वर्गीय विभागणी उदयाला आली आहे. "

" शासित आणि शोषित " होण्यासाठी एखाद्या देशाचे वसाहतीमध्येच रूपांतर होण्याची आवश्यकता नव्हती. जे मागास देश प्रत्यक्षपणे साम्राज्यामध्ये सामावून घेण्यात आले नाहीत त्यांचे वेगवेगळ्या " प्रभावक्षेत्रांमध्ये " तुकडे पाडण्यात आले. उदाहरणार्थ, चीनमध्ये जवळपास सर्व साम्राज्यवादी राष्ट्रांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. (हे उल्लेख १९३७ सालच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीबद्दलचे आहेत.) किंवा दक्षिण अमेरिकेची विभागणी इंग्लंड व युनायटेड स्टेट्स (अमेरिका) यांच्यामध्ये करण्यात आली आहे. एकाही दक्षिण अमेरिकन देशावर वासाहतिक कब्जा न मिळवता, काही करारान्वये किंवा अधिकृत सवलती मिळवून नफ्याची सोय करून घेण्याच्या उद्देशाने त्या देशांना भांडवलाचा पुरवठा करण्यास ही दोन्ही राष्ट्रे नेहमीच तयार होती. या सवलती टिकवण्यासाठी, हक्क बजावण्यासाठी किंवा व्यापाराची संपूर्ण मक्तेदारी कायम ठेवण्यासाठी लढाऊ गलबते, विमाने आणि लष्कर सदैव तयार असल्याची पुरेपूर जाणीव या देशांना करून देण्यात येई.

उत्पादित माल आणि भांडवल यांच्यासाठी बाजारपेठा शोधणाऱ्या उद्योगपती व लक्ष्मीपती यांच्या जोडगोळीला मदत करण्यास सरकार पुढे सरसावत होते हा काही अपघात नव्हता. १९२१ सालच्या इंग्लंडमधील घडामोडींचे निरीक्षण करणाऱ्या एका निरीक्षकाच्या मते असे घडणे अपरिहार्यच होते : " आज १९२१ साली ब्रिटनचा व्यापार मोठ्या कॉर्पोरेशन्सच्या नियंत्रणाखाली असून बँकांच्या बड्या ट्रस्ट्सकडून त्याचे सूत्रसंचालन केले जाते...व्यापाराला गतिमान करण्याचे सर्व उपाय योजता येण्याइतके या ट्रस्ट्सचे सामर्थ्य आहे. एवढेच नव्हे, तर सद्यःकालीन सरकारला सल्ला देण्याची त्यांच्यामध्ये एवढी क्षमता आहे की....(आज पैसेवाल्या वर्गांनीच बनलेल्या) सरकारला या व्यापाराला पैसे पुरवणाऱ्या बँक-ट्रस्ट्सच्या सल्ल्याप्रमाणेच कृती करावी लागते. "

ही झाली इंग्लंडची कथा. अमेरिकेच्या बाबतीत विचार करायचा तर अध्यक्ष टॅफ्ट यांच्या मते, न्यायाचा मार्ग सरळसाधा होता, पण तरीही तो संकुचित नव्हता. " आपल्या भांडवलदारांच्या " वतीने त्यामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी जागा होती : " आपले परराष्ट्रीय धोरण न्यायाच्या सरळ मार्गापासून तसूभरही ढळता कामा नये हे खरे असले तरीही आपल्या उत्पादित मालासाठी बाजारपेठ मिळेल आणि आपल्या भांडवलदारांसाठी भांडवल-गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध होऊन त्यांना नफा मिळेल यासाठी आवश्यक अशा कृतिशील हस्तक्षेपाचा त्यात अंतर्भाव करणे चांगले होईल. "

एकदा " आपल्या भांडवलदारांच्या " वतीने हस्तक्षेपाच्या मार्गावर पाऊल ठेवण्यात आल्यावर मग प्रदीर्घ प्रवासास सरकारची सुरुवात होऊ लागली. कसरतीच्या झुल्यावरील माणसाप्रमाणे भांडवलही " हवेतून सहज तरंगत जाऊ शकत असल्याने " त्याचा

प्रवास सुरक्षित चालला आहे हे पाहण्याचे काम अत्यंत जिकिरीचे होऊन बसते. अशाच प्रकारचे काम मेजर-जनरल स्मेडली डी. बटलर यांच्यावर सोपविण्यात आले होते. त्यांनी या कामाचे अतिशय सुरेख वर्णन केले आहे. बड्या भांडवलदारांसाठी हस्तक्षेपाचे काम करत असताना न्यायाच्या मार्गावर घट्ट पाय रोवणे शक्य आहे या अध्यक्ष टॅफ्ट यांच्या मताशी ते सहमत नाहीत : " आपल्या देशाच्या लष्करी विभागांपैकी अत्यंत चपळ अशा आरमारी सेनेचा एक सभासद म्हणून मी ३३ वर्षे आणि ४ महिने कामगिरी बजावली. दुसऱ्या दर्जाचा लेफ्टनंट म्हणून सुरुवात करून मेजर जनरल या स्थानापर्यंतच्या सर्व हुद्द्यांवर मी क्रमाक्रमाने काम केले. या संपूर्ण कालखंडामध्ये वॉल स्ट्रीटचे बडे उद्योगपती आणि लक्ष्मीपती यांच्यासाठी मी एका कसलेल्या मल्लाचेच काम बजावले. थोडक्यात म्हणजे मी भांडवलशाहींचा भाडोत्री गुंड म्हणून काम केले....

" १९१४ साली अमेरिकन तेल कंपन्यांच्या हितसंबंधांसाठी मी मेक्सिको आणि विशेषतः टॅपिको सुरक्षित करण्याचे काम केले. नॅशनल सिटी बँकेच्या लोकांना मनमुरादपणे पैसे वसूल करता यावेत यासाठी हैती आणि क्युबा या प्रदेशांमध्ये मी सुव्यवस्था निर्माण केली....१९०९–१९१२ या काळात ब्राऊन ब्रदर्सच्या आंतरराष्ट्रीय बँकिंग व्यवहारासाठी मी निकारागुआचे शुद्धीकरण करण्यास मदत केली. १९१६ साली अमेरिकन साखर सम्राटांसाठी मी डोमिनिकन रिपब्लिक खुले केले. १९०३ साली अमेरिकेतील फळ कंपन्यांचा होंडुरासमधील ' हक्क ' प्रस्थापित करण्यासाठी मी झटलो. १९२७ साली स्टँडर्ड ऑइल कंपनीला चीनमध्ये विनाउपद्रव शिरकाव करता येईल याची मी दक्षता घेतली.

" काही खवचट लोक म्हणतात त्याप्रमाणे त्या काळात मला गुंडागिरीबद्दल इनामे मिळाली. माझे अनेकदा मानसन्मान करण्यात आले, पदके बहाल करण्यात आली आणि अनेक बढत्याही देण्यात आल्या. आता सिंहावलोकन करताना मला असे वाटते की अल कॅपोनला मी सहज काही युक्त्या सांगू शकलो असतो. त्याची सर्वोत्तम कामगिरी म्हणजे त्याने तीन शहरांमध्ये त्याची गुंडसेना राबवली. आरमारातील आम्ही लोकांनी तीन खंडांमध्ये काम केले. "

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस उदयाला आलेली साम्राज्यशाही आजही आपल्या सभोवार आहे हे मेजर-जनरल बटलर यांच्या अनुभवांवरून आपल्याला समजते. या साम्राज्यशाहीची तीव्रता अधिकच वाढली आहे. असे होणे अटळ का आहे हे आपल्याला सहज समजू शकते. उद्योगधंद्यांमधील मक्तेदारी कमी होत नसून वाढतच आहे आणि या मक्तेदारी भांडवलशाहीबरोबर साम्राज्यशाही ही सावलीसारखी असते.

या विषयातील दोन तज्ञमंडळींनी लिहिलेल्या ' मॉडर्न कॉर्पोरेशन अँड प्रायव्हेट प्रॉपर्टी ' (आधुनिक कॉर्पोरेशन आणि खाजगी मालमत्ता) या उद्बोधक अभ्यासनिबंधामधून अमेरिकेतील आजच्या [१९३७ सालच्या] आधुनिक अजस्र कॉर्पोरेशनचे आकारमान, संपत्ती आणि नियंत्रणशक्ती याविषयी आपल्याला काही आश्चर्यकारक माहिती मिळते. अमेरिकेमध्ये बँकिंग क्षेत्र वगळता ३ लाख कॉर्पोरेशन्स आहेत. परंतु यातील केवळ २०० कॉर्पोरेशन्सकडे कॉर्पोरेट क्षेत्रातील निम्मी संपत्ती आहे !

या २०० पैकी १५ कॉर्पोरेशन्सची मालमत्ता प्रत्येकी १०० कोटी डॉलर्सपेक्षा अधिक आहे आणि त्यापैकी अमेरिकन टेलिफोन अँड टेलिग्राफ कंपनीची मालमत्ता "देशाच्या २१ घटकराज्यांच्या एकत्रित मालमत्तेपेक्षाही अधिक आहे."

परंतु मक्तेदारीची झोटिंगशाही किती प्रमाणात चालते हे समजण्यासाठी वर उल्लेखलेल्या तज्ज्ञांच्या पुस्तकामधील या २०० बड्या कॉर्पोरेशन्सपैकी काही कॉर्पोरेशन्स अमेरिकन लोकांच्या दैनंदिन जीवनावर सदोदित कसा परिणाम घडवतात याबद्दल केलेल्या वर्णनाकडे लक्ष पुरवणे अधिक उपयुक्त ठरेल. "या महान कंपन्या म्हणजे अमेरिकन औद्योगिक क्षेत्राची पोलादी चौकटच आहे. प्रत्येक माणसाचा त्याच्याशी सतत संबंध येतो...तो सतत त्यांच्या सेवेचा लाभ घेतो. थोडासा प्रवास केला तर बड्या रेल्वेयंत्रणांपैकी एकीशी तरी त्याचा संबंध नक्कीच येतो. उदाहरणार्थ, त्याची गाडी खेचून नेणारे इंजिन बहुधा अमेरिकन लोकोमोटिव्ह कंपनी किंवा बाल्डविन लोकोमोटिव्ह वर्क्स यांनी तयार केलेले असते. ज्या गाडीमधून तो जातो ती गाडी बहुधा अमेरिकन कार अँड फाऊंड्री कंपनी किंवा तिच्याच अंकित कंपन्यांनी तयार केलेली असते...लोहमार्गांचा पुरवठा खात्रीलायकरीत्या बड्या अकरा पोलाद कंपन्यांपैकी एकीने केलेला असतो आणि कोळशाचा पुरवठा चार कोळसा कंपन्यांपैकी एकीने तरी केलेला असतो किंवा रेल्वेच्या स्वतःच्याच खाणीमधून झालेला असतो. त्याने जर मोटारीने प्रवास केला तर ती मोटार फोर्ड, जनरल मोटर्स, स्टुडबेकर किंवा क्रायलर कंपन्यांपैकी कोणीतरी तयार केलेली असते आणि तिचे टायर्स फायरस्टोन, गुडरिच, गुडइयर किंवा युनायटेड स्टेट्स रबर कंपनीने पुरवलेले असतात.

"कदाचित एखादा माणूस स्वतःच्याच घरात अलगपणे, एकांतात राहणे पसंत करील. मग घरामध्ये या २०० बड्या कंपन्यांशी त्याचा संबंध कसा येतो? त्याच्या घरातील वीज आणि जळणवायू यांपैकी सार्वजनिक सेवा पुरवणाऱ्या एका कंपनीने पुरवलेली असते. त्याच्या स्वयंपाकघरातील ॲल्युमिनियमची भांडी बहुधा ॲल्युमिनियम कंपनी ऑफ अमेरिका हिने पुरवलेली असतात. त्याचा विजेवर चालणारा रेफ्रिजरेटर जनरल मोटर्स कंपनी किंवा विद्युत्साधने पुरवणाऱ्या दोन बड्या कंपन्या म्हणजे जनरल इलेक्ट्रीक आणि वेस्टिंग हाऊस इलेक्ट्रीक यांपैकी कोणीतरी निर्माण केलेला असतो. घरातील पाण्याच्या सोयीची साधने क्रेन कंपनीने उपलब्ध करून दिलेली असतात, तर खोली उबदार राखण्यासाठी आवश्यक असलेली उपकरणे अमेरिकन रेडिएटर आणि स्टँडर्ड सॅनिटरी कॉर्पोरेशन यांनी पुरवलेली असतात. आपले किरकोळ सामान तो ग्रेट ॲटलांटिक अँड पॅसिफिक टी कंपनीकडून खरेदी करतो...तर औषधे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या युनायटेड ड्रग कंपनीकडून मिळतात. ज्या डब्यांमध्ये तो सामान भरून आणतो ते डबे अमेरिकन कॅन कंपनीने तयार केलेले असतात. तो वापरत असलेली साखर एका बड्या कंपनीने उत्पादित केलेली असते. स्विफ्ट, आर्मर किंवा विल्सन कंपनी त्याला मांस पुरवते. तर, बिस्किटे नॅशनल बिस्किट कंपनीने तयार केलेली असतात.

"त्याने जर कधी रेडिओ ऐकून स्वतःची करमणूक करून घेण्याचा प्रयत्न केला तर रेडिओ कॉर्पोरेशन ऑफ अमेरिकाच्या परवान्याने मिळालेला रेडिओच तो वापरतो.

बाहेर पडून एखादा सिनेमा बघायचे ठरवले तर पॅरॅमाऊंट, फॉक्स किंवा वॉर्नर ब्रदर्स यांपैकी कोणाचा तरी सिनेमा (इस्टमन कोडॅक फिल्मवर तयार केलेला) तो पाहातो. ज्या सिनेमागृहामध्ये तो जातो ते सिनेमागृहदेखील या तिघांपैकी कोणाचे तरी असते. सिगरेटींच्या कोणत्याही एका मोहक जाहिरातीला तो बळी पडला तरी 'बड्या चार' तंबाखू कंपन्यांनी विक्रीस काढलेली कोणती तरी एक सिगरेट तो ओढतो आणि ती विकत घेण्यासाठी कोपऱ्यावरच्या युनायटेड सिगार स्टोअर्सपाशी थांबतो."

अशी असते मक्तेदारी—जिकडे तिकडे चहूकडे व्यापून राहिलेली. जगामधील इतर उद्योगप्रधान राष्ट्रांच्या बाबतीतही हेच खरे आहे. आपापल्या राष्ट्रीय बाजारपेठांवर नियंत्रण ठेवणारे हे अजस्र मक्तेदार आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये आमनेसामने येतात तेव्हा काय होते ? धूमधडाका उडतो ! प्रदीर्घ, कठीण आणि कडवट अशी स्पर्धा होते. आणि त्यानंर आंतरराष्ट्रीय पातळीवर करार होतात आणि ॲसोसिएशन्स व कार्टेल्स तयार केले जातात. मक्तेदार "भांडवलदार जगाची विभागणी करतात ती व्यक्तिगत आकसामधून नव्हे. भांडवलाची तीव्रता एवढी वाढलेली असते की नफे मिळवण्यासाठी ही पद्धत अंगीकारणे त्यांना भागच पडते. ही विभागणी 'भांडवलाच्या प्रमाणात', 'सामर्थ्याच्या प्रमाणात' होते... हे सामर्थ्य आर्थिक व राजकीय विकासाच्या पातळीवर अवलंबून असते."

आंतरराष्ट्रीय पातळीवरील सिंडिकेट्सनी कंबाईन्सनी जागतिक बाजारपेठेची विभागणी केल्यावर स्पर्धा थांबून दीर्घकालीन शांततेची सुरुवात होईल असे वाटण्याची शक्यता आहे. परंतु असे घडत नाही, कारण सामर्थ्यसंबंध सतत बदलत असतात. काही कंपन्यांची वाढ होऊन त्यांचे सामर्थ्य वाढते, तर इतरांचे कमी होते. तसे झाले की पूर्वी वाजवी असलेली विभागणी आता अवाजवी बनते. अधिक सामर्थ्यशाली बनलेला गट आक्रमक बनतो आणि अधिक हिश्श्यासाठी संघर्ष सुरू होतो. अनेकदा याची परिणती युद्धामध्ये होते.

वसाहतींवरील राजकीय नियंत्रणाबाबतही तोच प्रकार घडतो. सुमारे सत्तर वर्षांपूर्वी (म्हणजे १८६५ पूर्वी) कोणत्याही साम्राज्यामध्ये समाविष्ट न केलेले बरेच "मुक्त" प्रदेश होते. आजची परिस्थिती वेगळी आहे. पुनर्विभागणी होण्यासाठी नाही-रे साम्राज्यवादी राष्ट्रांना आहे-रे साम्राज्यवादी राष्ट्रांकडून हव्या असलेल्या गोष्टी बळकावणे आता भाग आहे. इटाली आणि जपान आज हाती लागतील त्या वसाहती बळकावत आहेत. भविष्यकाळात वसाहती बळकावण्यासाठी जर्मनी आज शस्त्रसज्ज होत आहे. अशा रीतीने साम्राज्यवादाची, साम्राज्यशाहीची परिणती युद्धामध्ये होते.

परंतु युद्धामुळे कोणत्याही गोष्टीवर कायम स्वरूपाचा तोडगा निघत नाही. टेबलापाशी बसून सौदा करून ज्या शत्रुत्वावर तोडगा काढता येत नाही त्यावर स्फोटक द्रव्ये, विषारी वायू, दळीपांगळी माणसे आणि छिन्नविच्छिन्न प्रेते यांच्या युक्तिवादाने केलेल्या सौद्यामुळेही तोडगा निघू शकत नाही हे निश्चित. मक्तेदारी भांडवलशाहीला अतिरिक्त उत्पादन आणि अतिरिक्त भांडवल यांच्यासाठी वाट ही शोधावीच लागते. ही मक्तेदारी भांडवलशाही

अस्तित्वात असेपर्यंत शत्रुत्व कायम राहील. बाजारपेठा मिळवण्यासाठी धडपडाट अखंडपणे चाललाच पाहिजे.

सेसिल ऱ्होड्स या असामान्य साम्राज्यवाद्याला याची अत्यंत तीव्र जाण होती. नव्या बाजारपेठा मिळवणे हा त्यांचा स्वभावधर्मच बनला. त्यासाठी नवे प्रदेश बळकावणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येयच बसले. त्यांनी एका मित्राजवळ केलेल्या एका विधानामध्ये साम्राज्यवादी मनोप्रेरणा अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झालेली आहे : " जगातील बहुतेक सर्व भूभागाची विभागणी करण्यात आलेली आहे. उर्वरित भागाची वाटणी करून, त्यावर कब्जा करून, त्याचे वसाहतींमध्ये रूपांतर करण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी आकाशामध्ये चमचमणाऱ्या ताऱ्यांकडे पाहिल्यावर वाटते की या अफाट विश्वाचा आपण कधीच वेध घेऊ शकणार नाही. अनेकदा माझ्या मनात विचार येतो की शक्य झाले तर या ग्रहमालेला मी गवसणी घालीन. ही ग्रहमाला इतकी स्वच्छ दिसत असूनही ती इतक्या दूर असल्यामुळे मी दुःखात बुडून जातो. "

श्री. ऱ्होड्स लवकरच मरण पावले. केवढे दुर्दैव ! कारण मेक्सिकोच्या वाळवंटामध्ये एका प्रयोगशाळेत प्राध्यापक आर. एच. गोडार्ड चंद्रावर सफर करण्यासाठी वापरता येईल अशा अवकाशयानाबद्दल प्रयोग करीत आहेत. वेल्समधील पर्वतांच्या सान्निध्यात, ग्रहांवर जाण्याची क्षमता असलेला अग्निबाण पूर्णत्वाला नेण्यासाठी ब्रिटिश इंटरप्लॅनेटरी सोसायटी (ब्रिटिश आंतरग्रह मंडळ) धडपड करत आहे. श्री. ऱ्होड्स जगले असते तर किती बरे झाले असते !

परंतु त्यांची मनोप्रेरणा अजूनही जिवंत आहे. पूर्वीपेक्षाही अधिक प्रभावशाली झाली आहे हे समजल्यास त्यांच्या आत्म्याला शांती मिळेल. चंद्रावरील मानव जेव्हा पहिल्या अवकाशयानातून उतरलेल्या प्रवाशाला अभिवादन करील तेव्हा तो प्रवासी त्याच्या कानाजवळ कुजबुजत प्रतिसाद देईल, " तुमचे जुने कालवे दुरुस्त करण्यासाठी आणि नवे कालवे बांधण्यासाठी काही पैसे कर्जाऊ घेण्याची कल्पना तुम्हाला कशी वाटते ? आता फक्त इथे सही करा, म्हणजे माझी बँक इतर सर्व तपशील पाहून घेईल... हे चांगले झाले—धन्यवाद. "

◇ ◇ ◇

२०

अत्यंत कमकुवत दुवा

" अशा आर्थिक अरिष्टांच्या काळात अस्तित्वात असलेले उत्पादनच नव्हे, तर आधी निर्माण केलेल्या उत्पादनशक्तीही बऱ्याच प्रमाणात वेळोवेळी नष्ट केल्या जातात. यापूर्वीच्या कोणत्याही कालखंडामध्ये असंभाव्य वाटली असती अशी अतिरेकी उत्पादनाची भयंकर साथ या अरिष्टांच्या काळात पसरते. समाज अचानक रानटी अवस्थेत गेला आहे असे लोकांना भासू लागते. एखाद्या महाभयानक दुष्काळामुळे किंवा सार्वत्रिक महायुद्धामुळे निर्वाहाच्या सर्व साधनांचा पुरवठा तोडून टाकला आहे, उद्योग आणि व्यापार यांचे उत्तुंग मनोरे भुईसपाट झालेले आहेत, अशी भयप्रद जाणीव लोकांना होते. आणि याचे कारण ? याचे कारण, संस्कृतीचा अतिरेक, निर्वाहाच्या साधनांचा अतिरेक, उद्योगधंद्यांचा अतिरेक, व्यापाराचा अतिरेक, सर्वासर्वांचा अतिरेक. "

आजच्या परिस्थितीचे हे अलिकडेच केलेले वर्णन आहे का ? छे, छे! हे शब्द कालपरवा कागदावर उतरवलेले नाहीत !

सुमारे शंभर वर्षापूर्वी, १८४८ साली लिहिलेल्या, मार्क्स व एंगल्स यांच्या ' कम्युनिस्ट मॅनिफेस्टो ' [कम्युनिस्ट जाहीरनामा]मध्ये लिहिलेले हे शब्द आहेत. हे काही धाडसी भविष्यकथन नव्हते. त्या काळी काही वर्षांच्या कालावधीने भांडवली समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचेच ते चित्रण होते. १९२९ सालपर्यंत वयात आलेल्या सर्वांना समाजामध्ये आजही हेच चाललेले आहे याची प्रचिती आली आहे. मानवी समाजाने यापूर्वी कधीही न अनुभवलेल्या अशा महाभयंकर आर्थिक अरिष्टाच्या काळात आपण जगत असल्यामुळे वरील शब्द आपल्याला अगदी ओळखीचे वाटतात.

इतिहासाच्या सर्वच कालखंडांमध्ये मानवी समाजात अरिष्टे उद्भवली. परंतु भांडवलशाही अस्तित्वात येण्यापूर्वीच्या आणि त्यानंतरच्या अरिष्टांमध्ये एक लक्षणीय फरक आहे. अठराव्या शतकापूर्वी, पिके बुडाल्यामुळे, युद्धामुळे किंवा काही तरी अघटित घटनेमुळे अरिष्टे उद्भवत. अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे दुर्भिक्ष्य आणि त्यामुळे होणारी भाववाढ ही या अरिष्टांची लक्षणे होती. परंतु भांडवली व्यवस्थेबरोबरच अस्तित्वात आलेली, तुम्हा आम्हाला ठाऊक असलेली अरिष्टे अघटित घटनांमुळे घडत

नाहीत. ती या अर्थव्यस्थेचा एक अविभाज्य घटक आहेत. दुर्भिक्ष्य नव्हे तर अतिरेकी उत्पादन या अरिष्टांचे लक्षण आहे. या अरिष्टांच्या काळात किंमती वाढत नाहीत, तर कोसळतात.

श्रम आणि भांडवल या दोन्ही गोष्टी पडून राहणे, नफ्यांमध्ये घट होणे आणि उत्पादन व व्यापार अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये उद्योगधंदे डबघाईला येणे, ही आर्थिक अरिष्टे आणि मंदी यांची इतर लक्षणे सर्वांनाच ज्ञात आहेत. समृद्धी असूनही दारिद्र्य हा विरोधाभास आज सगळीकडे दिसून येतो.

कच्च्या मालाची कमतरता आहे का? बिलकूल नाही. कापूस-उत्पादक त्यांचा कापूस विकण्यास आतुरलेले आहेत. उत्पादन साधनांची कमतरता आहे का? छे, छे! बंद पडलेल्या गिरण्यांमधील मागांचा खडखडाट पुन्हा ऐकण्यासाठी गिरणीमालक अधीर झाले आहेत. मग श्रमांची वानवा आहे का? मुळीच नाही. सुती कापड तयार करण्यासाठी पुन्हा गिरणीमध्ये जायला बेकार गिरणी कामगार अतिशय उत्सुक आहेत.

उत्पादनासाठी आवश्यक असलेला कच्चा माल, उत्पादनसाधने आणि श्रम या सर्व गोष्टी उपलब्ध असूनही उत्पादनाचे गाडे अडलेलेच आहे का?

या प्रश्नाच्या उत्तराबद्दल अर्थतज्ज्ञांमध्ये एकवाक्यता नाही.

परंतु एका वस्तुस्थितीबद्दल त्या सर्वांचे एकमत आहे ही वस्तुस्थिती आपण अगोदरच समजून घेतली नाही तर आर्थिक अरिष्टामागील कारणे आपल्याला अज्ञातच राहतील.

भांडवली व्यवस्थेमध्ये उपभोगासाठी नव्हे तर विनिमय करून नफा कमावण्यासाठी क्रयवस्तूंचे उत्पादन केले जाते, हे अत्यंत महत्त्वाचे सत्य आपण समजून घेतले पाहिजे. उत्पादनसाधनांच्या मालकांना-म्हणजेच भांडवलदार वर्गाला – नफा मिळवण्याची संधी दिसते, तेव्हाच या समाजामध्ये, भूगर्भातून खनिजे काढली जातात, पिकांची कापणी केली जाते, उद्योगधंद्यांची चक्रे गतिमान होऊन माणसांना कामधंदा मिळतो आणि वस्तूंचा विनिमय घडून येतो. 'हेराल्ड ट्रिब्यून'च्या १३ जुलै १९३४ च्या अंकामध्ये वॉल्टर लिपमॅन यांनी यथार्थ भाष्य केले आहे : जोपर्यंत लहान मोठे भांडवलदार नफा मिळवण्याच्या हेतूने उद्योगधंद्यामध्ये भांडवलाची गुंतवणूक करत नाहीत, तोपर्यंत सद्यःपरिस्थितीतून पूर्वस्थितीला येण्यासंबंधी चर्चा करून काहीच उपयोग नाही. मानसिक समाधानासाठी ते ही गोष्ट करणार नाहीत. देशसेवेसाठी किंवा जनसेवेसाठी ते भांडवल -गुंतवणूक करणार नाहीत. नफा मिळविण्याची संधी असेल तरच गुंतवणूक करतील. ही भांडवली व्यवस्था आहे आणि ती अशीच चालते."

प्रा. एफ. ए. फॉन हायेक यांच्या मते लिपमॅन यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे : "या विनिमयावर आधारलेल्या आधुनिक अर्थव्यवस्थेमध्ये एखादी मागणी पुरवण्यासाठी म्हणून उद्योजक उत्पादन करत नाही. या मागणीचा अनेक वेळा उल्लेख करण्यात आला तरीही नफ्याची शक्यता लक्षात घेऊनच उद्योजक उत्पादन करतो." प्राध्यापक हायेक हे एक अग्रेसर अर्थतज्ज्ञ आहेत. कामगारवर्गाच्या दृष्टिकोनातून समाजाचा विचार करणाऱ्या अर्थतज्ज्ञांशी त्यांचे फारसे जुळत नाही. परंतु, केवळ नफाच उत्पादनाची चक्रे

गतिमान करतो या महत्त्वाच्या सत्याबद्दल त्यांचे फ्रीडरिश एंगल्स यांच्याशी एकमत दिसते. १८६५ साली एंगल्स यांनी लिहिलेल्या एका पत्राचा काही भाग पहा : " फारच थोडे उत्पादन केले जात आहे ... पण का ? उत्पादनाची क्षमता संपुष्टात आली आहे म्हणून ? मुळीच नाही. भुकेल्या पोटांच्या संख्येनुसार नव्हे तर ग्राहकांच्या खरेदी करण्याच्या क्षमतेवरून, त्यांच्यापाशी असलेल्या पैशाचा विचार करूनच उत्पादनाची मर्यादा निश्चित केली जाते. नफ्यासाठी ज्याच्या श्रमाचा उपयोग केला जात नाही अशा निर्धन माणसाला काहीही विकत घेता येत नाही व तो मरणाच्या खाईत लोटला जातो. "

थॉर्स्टाइन फेब्लेन या एका अत्यंत प्रतिभाशाली अमेरिकन अर्थतज्ञाच्या लिखाणामध्ये हेच सत्य त्यांच्या खास शैलीमध्ये सांगितलेले आढळते : " नैसर्गिक अर्थव्यवस्थेमध्ये उद्योजकाची भूमिका वस्तूंचे उत्पादन करण्याची नसते तर पैसे मिळवण्याची असते.... आवळा देऊन कोहळा काढणे हेच धंद्यातील महत्कृत्य असते...नफा मिळवण्यासाठी अत्यंत किफायतशीर सौदा, अत्यंत किफायतशीर विक्री करणे हेच कोणत्याही धंद्याचे अंतिम उद्दिष्ट असते हे आपण लक्षात घेतले पाहिजे...औद्योगिक उत्पादनामुळे नफ्याची निर्मिती होते आणि नफाच औद्योगिक उत्पादनाचा नियंत्रक असतो, नफ्याच्या शक्यतेनुसारच उद्योगधंद्यांना चालना मिळते किंवा ते थंड पडतात. "

भांडवली व्यवस्थेमध्ये उपभोगासाठी नव्हे, तर नफ्यासाठी वस्तूंचे उत्पादन केले जाते यासाठी हा आणखी एक पुरावा. वेस्ली मिशेल या एका महान अर्थतज्ञाच्या ' बिझिनेस सायकल्स ' (आर्थिक व्यवहारातील चढउतार) या एका अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तकामधून घेतलेला हा उतारा पाहा : " जेथे धंदेवाईक अर्थव्यवस्था असते, तेथे उत्पादकांना नफ्याची शाश्वती नसेल तर निसर्गसंपत्तीचा विकास केला जात नाही, कामगारांच्या कौशल्याचा वापर केला जात नाही, शास्त्रीय शोधांचा व्यवहारात उपयोग केला जात नाही. "

भांडवली व्यवस्थेमध्ये, नफ्याची शाश्वती असल्याशिवाय उत्पादन केले जात नाही याची ग्वाही देणाऱ्या विविध अर्थतज्ञांची ही मालिका आपण पाहिली. परंतु वेळोवेळी नफ्याची शक्यता धुळीस का मिळते या प्रश्नाला उत्तर देताना अर्थतज्ञांमध्ये अशी एकवाक्यता आढळणार नाही. ही व्यवस्था कशी चालते याबद्दल अर्थतज्ञांमध्ये एकमत असले तरीही या चालीला खीळ कशी बसते याबद्दल त्यांच्यामध्ये अजिबात एकवाक्यता नाही. आर्थिक अरिष्टाच्या काळात या व्यवस्थेमध्ये बिघाड उद्भवतो, नफ्याची पातळी कोसळते. या बिघाडामागची कारणे कोणती ? ही आर्थिक अरिष्टे का निर्माण होतात ? यासंबंधी अर्थतज्ञांनी दिलेली काही उत्तरे आपण तपासून पाहूया.

एक शतकाहून अधिक काळ, एका विशिष्ट प्रकारे आर्थिक अरिष्टे पुनः पुन्हा उद्भवली असूनही या अरिष्टांची कारणे व्यवस्थेमध्ये अंतर्भूत नसून त्याबाहेर ती शोधली पाहिजेत असा आग्रह धरणारे काही अर्थतज्ञ आजही आहेत. या विचारप्रणालीसंबंधी प्रा. मिशेल म्हणतात : " सर्व अरिष्टांची कार्यकारणमीमांसा करू शकेल असा सिद्धांत शोधण्यात अपयश आल्यामुळे काही अर्थतज्ञ हताश झालेले दिसतात. या अर्थतज्ञांच्या

मते, क्रांतिकारक शोधांचा अवलंब, जकातीमधील बदल, चलनविषयक बदल, पिकांचा नाश, लोकांच्या आवडीनिवडीतील बदल वगैरेसारख्या अघटित, अस्वाभाविक कारणांमुळे अरिष्ट निर्माण होते. प्रत्येक अरिष्टामागे त्याच काळातील काही खास कारणे असतात आणि आधीच्या एक-दोन वर्षांच्या घटनांमध्ये ती शोधली पाहिजेत असा निष्कर्ष या युक्तिवादामधून निघतो. ”

दुसऱ्या एका गटाच्या मते, अरिष्टांमागची कारणे नैसर्गिक आहेत. सूर्यावरील डाग, भारतामधील दुष्काळ आणि इंग्लंडमधील आर्थिक अरिष्टे एकाच वेळी आली असे डब्ल्यू. स्टॅनली जेव्हॉन्स यांनी १८७५ मध्ये जाहीर केले. या गोष्टींचा एकमेकांशी काय संबंध होता? नीट लक्ष द्या. सूर्याच्या किरणोत्सर्जनाचा हवामानावर परिणाम होतो; हवामानाचा पिकांवर परिणाम होतो; पिकांचा शेतकऱ्यांच्या मिळकतीवर परिणाम होतो, आणि शेतकऱ्यांच्या मिळकतीचा औद्योगिक उत्पादनाला असलेल्या मागणीवर परिणाम होतो. म्हणजे सूर्याच्या माथ्यावर या सगळ्याचे खापर फोडायला हरकत नाही!

किंवा या सगळ्याचा दोष शुक्र ग्रहाला द्यायलाही हरकत नाही. आठ वर्षांच्या “ कालचक्राच्या ” सिद्धान्ताचे जनक श्री. हेन्री एल. मूर असेच म्हणतात. पण शुक्रच का? कारण दर आठ वर्षांनी पृथ्वी आणि सूर्य यांच्यामध्ये शुक्र येतो आणि शुक्र मध्ये आल्यामुळे सूर्यदेवांचे किरण पृथ्वीवर पोहोचू शकत नाहीत हे तर उघडच आहे!

हे झाले अरिष्टांच्या नैसर्गिक कारणांबद्दल! केंब्रिज विद्यापीठातील प्रा. ए. सी. पिगू आर्थिक क्षेत्रातील तेजी आणि मंदी यांची कारणे मानसिक आहेत असे मानतात. उद्योगधंद्यांमधील अध्वर्यूंच्या आशावादी किंवा निराशावादी चुकांमुळे, या “ धंदेवाईक लोकांच्या अपेक्षांमधील बदलामुळे ” उद्योगधंद्यांमध्ये चढउतार घडून येतात असे प्रा. पिगू यांना वाटते. जेव्हा सगळे सुरळीत चाललेले असते तेव्हा अधिक नफा मिळवण्याबद्दल उद्योगपती आशावादी बनतात. उत्पादन वाढवण्यासाठी ते बँकांकडून अधिक पैसे कर्जाऊ घेतात आणि यंत्रसामग्रीसाठी मुक्त हस्ताने गुंतवणूक करतात—असलेल्या कारखान्याची वाढ करतात किंवा नवी यंत्रसामग्री आणून नवे कारखाने काढतात. “ या अपेक्षा चांगल्या असतात, तेव्हा उद्योगपती बँकांकडून अधिक कर्जे घेतात. त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणून व्याजाचा दर वाढतो आणि चलनपुरवठा वाढल्यामुळे अप्रत्यक्षरीत्या किंमती वाढायला मदत होते. ” नंतर या आशावादाच्या लाटेवर निर्माण झालेल्या क्रयवस्तू बाजारपेठेच्या परीक्षेत उतरणे आवश्यक असते. पण त्या वाढीव किंमतीला निश्चित विकल्या जातील का? नाही. असे झाले की आधीचा आशावाद निराधार होता हे हर एक क्षेत्रामध्ये दिसून येऊ लागते. निराशावाद आणि मानसिक वैफल्य औद्योगिक जगताला ग्रासून टाकते आणि उत्पादन मंदावते. “ अवाजवी आशावादाच्या चुकांमुळे औद्योगिक जगात करण्यात येणारे उपक्रम अखेर बाजारपेठेच्या शोधात असलेल्या क्रयवस्तूंचे रूप धारण करतात. जोपर्यंत नवनवीन बाजारपेठा उपलब्ध होतात, तोपर्यंत उद्योगधंदे गतिमान राहतात. (नंतर असे लक्षात येते की आधीचा आशावाद अवाजवी होता; म्हणजेच बाजारपेठेच्या परीक्षेत तो आशावाद टिकाव धरू शकत नव्हता.) जेव्हा एकामागून एक विविध क्षेत्रांमध्ये बाजारपेठेच्या परीक्षेत या आशावादाला अपयश येते तेव्हा

आत्मविश्वासाला धक्के बसतात. आशावाद चुकीचा होता आणि अपेक्षित नफा अतिशयोक्त होता हे सत्य उघडकीस येते आणि सर्वत्र मान्य केले जाते...परिणामतः उद्योगधंद्यांची गती रोखली जाते."

आता आत्यंतिक आशावादाची जागा आत्यंतिक निराशावाद घेतो. उत्पादन प्रचंड प्रमाणात मंदावते. उद्योगधंद्यांतील गुंतवणूक जवळपास थंडावते आणि केवळ पूर्वीचा साठलेला मालच विक्रीस काढला जातो. मग कालांतराने पुन्हा मागणी वाढते, नफे वाढतात, उद्योगपती उत्साहित होतात आणि आत्यंतिक आशावादाला चालना मिळते.

प्रा. पिगू आणि मानसशास्त्रीय विचारसरणी मानणारे इतर जण, धंद्यातील तेजी आणि मंदी या बाबतीत उद्योगपतींच्या अपेक्षांवर किती भर देतात हे पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल : "या वेगवेगळ्या अपेक्षा मुळात **कशामुळे** तयार होतात याच्या खोलात आपण आता शिरलो नाही तरीही आपल्याला खात्रीलायकरीत्या सांगता येते की औद्योगिक चढउतारामागची कारणे दुसरीतिसरी काहीही नसून या वेगवेगळ्या अपेक्षाच आहेत."

अर्थतज्ञांच्या दुसऱ्या एका गटाच्या मते, "पैसा हेच सर्व दुःखाचे मूळ आहे" या जुन्या म्हणीमध्ये खरोखरच तथ्य आहे. त्यांच्या मते आपली विनिमयपद्धती म्हणजे चलनव्यवस्थाच सदोष आहे. या सदोष व्यवस्थेचे नियमन केले पाहिजे असे त्यांना वाटते. "चलन-नियमना"वर विश्वास असणाऱ्या विचारप्रणालीचे एक अग्रेसर अर्थतज्ञ प्रा. जे. एम. केन्स लिहितात : "बेकारी, कामगाराचे अनिश्चित जीवन, अपेक्षा-भंग, बचतीचा व्यय, काही व्यक्तींना, सट्टेबाजांना, नफेखोरांना होणारा प्रचंड नफा या सगळ्या गोष्टींचे मूळ प्रामुख्याने मूल्याचे परिमाण अस्थिर असण्यामध्ये आहे."

"मूल्याचे परिमाणच अस्थिर आहे" हे वरील उताऱ्यामधील सर्वांत महत्त्वाचे शब्द आहेत. आपण व्यवहारामध्ये वापरत असलेला पैसा अस्थिर आहे हे पटवून देण्यासाठी पुराव्याची गरज नाही, अनुभवातूनच आपल्याला ते समजलेले आहे. या महिन्यात एका रुपयामध्ये इतके लोणी विकत घेता येत असेल तर त्यापेक्षा कमी किंवा जास्त लोणी पुढच्या महिन्यात एका रुपयामध्ये येईल हे ग्राहकांना ठाऊक असते. अनेकदा अशा गोष्टी आपल्या कानावर येतात : "आज पूर्वीपेक्षा रुपयाची किंमत फारच कमी झाली आहे" किंवा "पहिल्या वेळेला मी पॅरिसला गेलो तेव्हा एका डॉलरमागे पंचवीस फ्रॅन्क्स मिळत, पण या वर्षी मला फक्त सतरा फ्रॅन्क्स मिळाले."

"पैसा हे केवळ विनिमयाचे एक माध्यम आहे" असे आपल्याला अर्थशास्त्रावरची प्राथमिक पुस्तके सांगतात. पैसा अस्थिर असल्याने विनिमयाचे ते चांगले माध्यम नाही असा युक्तिवाद चलननियमन या विषयातील तज्ज्ञ मंडळी करतात. इतर मोजमापांप्रमाणे पैशाला स्थैर्य नाही. एक डझन म्हणजे आज पंधरा आणि उद्या आठ असे नसते; डझन म्हणजे बारा वस्तू असाच नेहमी अर्थ होतो. पण आपल्या चलनाचे मूल्य बदलते. ही गोष्ट वाईट असून त्यामध्ये सुधारणा केली पाहिजे असे या अर्थतज्ञांना वाटते. उत्पादित वस्तू आणि ग्राहकांकडील पैसा यांमध्ये स्थिर संबंध प्रस्थापित होतील अशाप्रकारे चलन आणि पतपुरवठा यावर नियंत्रण ठेवले पाहिजे असा त्यांचा युक्तिवाद आहे.

एका उदाहरणाने हे स्पष्ट होईल. उद्योगधंदे आणि उत्पादन यांच्या वाढीने कारखान्यांमध्ये अधिक माल तयार होतो. ज्या प्रमाणात वस्तूंचा पुरवठा वाढला आहे त्या प्रमाणात जर चलन पुरवठा वाढला नाही तर किंमती घसरतील. कसे काय? समजा, बाजारपेठेमध्ये ५०० शर्ट आहेत आणि त्यासाठी ग्राहकांकडे ५०,००० रुपये आहेत. म्हणजे प्रत्येक शर्ट १०० रुपयांना विकला जाईल. आता शर्ट तयार करणाऱ्या उद्योजकांनी अधिक चांगल्या यंत्रसामुग्रीचा वापर करून १,००० शर्टचे उत्पादन केले. आता बाकीच्या गोष्टी कायम राहिल्याने, ग्राहकांच्या हाती आणखी ५०,००० रुपये आले नाहीत, तर प्रत्येक शर्टची किंमत ५० रुपये होईल.

चलनपुरवठ्यामध्ये होणारी वाढ किंवा घट यानुसार सर्वसाधारण किंमतींमध्ये चढउतार घडून येतात आणि किंमतींमधील या चढउतारांमुळे आर्थिक अरिष्टे ओढवतात असा चलनवादी अर्थतज्ञांचा दावा आहे. धंद्याला जेव्हा बरकत असते तेव्हा बँका अधिकाधिक पतपुरवठा करतात आणि चलनफिरतीचा वेग वाढतो. धंद्याच्या बरकतीच्या काळात अधिकाधिक नफा मिळवण्याची इच्छा असलेल्या उद्योगपतींना व्याजाच्या दरात वाढ करून कर्ज घेण्यापासून रोखता येत नाही. अशा तऱ्हेने सुबत्तेमुळे धंद्याला तेजी येते.

असे झाले की पतपुरवठा करणाऱ्या बँका धास्तावतात आणि त्यांना पतपुरवठा डोईजड झाला असे वाटू लागते. “ चलन फुगवटा निर्माण झाला आहे ” असे त्या म्हणतात. मग त्या हात आखडता घेऊन नवी कर्जे देणे बंद करतात आणि आधी दिलेल्या कर्जाच्या परतफेडीकरता तगादे लावतात. पण उद्योगपतींनी धंद्यामध्ये ते पैसे गुंतवलेले असल्यामुळे आणि नव्या धंद्यांमधून पुरेसा पैसा अजून परत न आल्यामुळे बऱ्याचशा उद्योजकांना ती कर्जे फेडणे शक्यच नसते. कर्जाची परतफेड करता आली नाही की त्यांचे दिवाळे वाजते. मग त्यांचे कारखाने बंद पडतात, कामगारांची नोकरी जाते आणि एखाद्या रोगाप्रमाणे समाजाला दुर्दशेची लागण होते. कच्च्या मालाच्या उत्पादकांकडे केलेल्या मागण्या रद्द होतात आणि कामगार बेकार झाल्यामुळे उत्पादित मालाला असलेली मागणी रोडावते. उत्पादन मंदावणे, मागणी थंडावणे, त्या पाठोपाठ किंमती कोसळणे यामुळे एखाद्या साथीच्या रोगाप्रमाणे संपूर्ण राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर अवकळा पसरते. गुंतवणूक करायला लोक घाबरतात आणि पैसे कर्जाऊ देण्याची बँकांना धास्ती वाटते. परिणामी उद्योगधंदे आणि व्यापार यांसाठी उपयोगात येणारा पैसा बँकांमध्ये पडून राहतो.

उद्योगपतींना किंमती सतत चढत जाणार आहेत असे वाटले नाही तर पतपुरवठा इतका डोईजड होणार नाही, असे चलनवादी अर्थतज्ञांना वाटते. घेतलेल्या कर्जावर व्याज भरूनही अधिक नफा हाती येईल इतक्या प्रमाणात किंमती वाढतील या अपेक्षेमुळेच उद्योगपती भरमसाठ व्याजाने कर्जे काढतात. किंमती जर स्थिर राहिल्या तर उत्पादनामध्ये अवाजवी वाढ करण्याचा आक्रस्ताळेपणा ते करणार नाहीत. म्हणून उत्पादनातील चढउताराच्या प्रमाणात चलनपुरवठा निश्चित केला पाहिजे, चलनाचे मूल्य निश्चित केले पाहिजे असा उपाय हे अर्थतज्ञ सुचवतात. येल युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक अर्व्हिंग फिशर यांनी “ प्रमाणित डॉलर ”ची एक योजना आखली असून त्यामुळे प्रश्न

सुटतील असा त्यांचा दावा आहे. असे केल्यास कालच्याप्रमाणे आज आणि उद्याही तेवढ्याच वस्तू त्याच किंमतीला मिळू शकतील.

फिशर आणि केन्स यांच्या मते, संपूर्णतया निर्दोष चलनव्यवस्था शोधून काढणे शक्य असतानाही सदोष चलनव्यवस्थेलाच चिकटून राहणे मानवजातीच्या दृष्टीने धोकादायक आणि मूर्खपणाचे आहे. प्रा. केन्स म्हणतात : " किंमती निश्चितपणे कमी किंवा निश्चितपणे वाढतील अशी अपेक्षा करण्यास वाव मिळणार नाही अशा तऱ्हेने चलन पुरवठा आणि पतपुरवठा यावर नियंत्रण ठेवणे हाच तेजी आणि मंदी यांना कारणीभूत होणाऱ्या किंमतींमधील चढउतारावरचा—या व्यक्तिवादाच्या रोगावरचा—सर्वोत्तम उपाय आहे ...

" नैसर्गिक कारणामुळे जसे हवामान ठरते किंवा वेगवेगळ्या व्यक्तींच्या स्वतंत्र कृतींमधून जसे जननप्रमाण ठरते किंवा क्रांती करून जशी राज्यघटना बदलण्यात येते, त्या प्रकारे मूल्याचे परिमाण ठरवले जावे ही गोष्ट काही आपल्याला परवडणारी नाही. "

तथापि, उत्पादनाच्या प्रमाणात चलनपुरवठ्यामध्ये बदल करणे हे हितकारक आहे याबद्दल इतर काही अर्थतज्ज्ञांची खात्री पटलेली नाही. प्रा. हायेक यांचे हे विरोधी मत पहा : " उत्पादनातील चढउतारानुसार चलनपुरवठा कमी–जास्त व्हावा यासाठी पुरावा म्हणून देण्यात येणारी कारणे बिनबुडाची आहेत. चलनपुरवठा कायम राहून, उत्पादन वाढल्यावर किंमती खाली येणे हे निरुपद्रवी आहे, इतकेच नव्हे तर उत्पादन योग्य दिशेने कायम ठेवण्याचा, वास्तविक पाहाता, हाच एकमेव मार्ग आहे. "

आर्थिक अरिष्टांची कारणमीमांसा करणाऱ्या या सिद्धांतापेक्षा जॉन ए. हॉब्सन यांचा सिद्धांत सर्वाधिक लोकप्रिय आहे. सुबत्तेच्या काळात भांडवलाची मिळकत कामगारांना मिळणाऱ्या मजुरीपेक्षा वेगाने वाढते हा त्यांचा सिद्धांत अनेकांच्या परिचयाचा आहे. कल्पनातीत वेगाने श्रीमंतांची श्रीमंती वाढू लागते. स्वतःसाठी पैशाची कितीही उधळपट्टी केली तरीही पैसा शिल्लकच राहील इतक्या प्रमाणात त्यांचे उत्पन्न वाढते. जे पैसे खर्च करता येत नाहीत त्यांची ते बचत करतात. त्यांच्या या प्रचंड धनसाठ्यांची गुंतवणूक उद्योग-धंद्यांमध्ये करण्यात येते. आणि वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उत्पादनसाधनांमध्ये उत्पादन-क्षमतेमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ घडून येते. ही नवी आणि अद्ययावत यंत्रसामग्री आपले काम पार पाडते. वस्तूंचा लोंढा कारखान्यामधून बाहेर पडून बाजारपेठेत शिरतो. पण या सतत वाढणाऱ्या उत्पादित वस्तू खरेदी करण्यासाठी कामगारांना पुरेशी मजुरी मिळत नाही. वस्तूंची विक्री होऊ शकत नाही. गोदामांमध्ये माल पडून राहतो. आणि किंमती कोसळतात. त्यामुळे उत्पादनातून नफा मिळेनासा झाल्यावर, उत्पादनात घट करण्यात येते. परिणामी बेकारी ओढवते. मंदीची लाट येते आणि श्रीमंतांचे उत्पन्न रोडावते. आत्यंतिक प्रगतीला आळा बसतो.

मग हळूहळू साठलेल्या मालाला उठाव येऊ लागतो. नव्या, अद्ययावत साधनसामग्री-शिवाय आपले चालणार नाही असे उद्योगपतींच्या लक्षात येते, आणि हळूहळू उत्पादन पुन्हा वाढीस लागते. सुबत्ता, तेजी, अरिष्ट, मंदी यांचे चक्र पुन्हा चालू होते.

श्रीमंती आणि गरिबी यातील दरीमुळे अस्वस्थ होणाऱ्या लोकांना हॉब्सन यांचे विश्लेषण रुचते. कारण "आत्यंतिक बचतीचा" सिद्धांत म्हणून याचा विचार केला काय किंवा "अपुऱ्या उपभोगाचा" सिद्धांत म्हणून विचार केला काय, संपत्तीचे विषम वाटप हेच आर्थिक अरिष्टांमागील मूलभूत कारण असल्याचे यावरून स्पष्ट होते.

हॉब्सन यांच्याच शब्दांत सांगायचे तर, "कराच्या रूपाने हा 'बरकड भाग' काढून घेतला नाही तर अर्थव्यवस्थेमध्ये तो नासधुशीचा आणि अहितकारक ठरतो. उत्पन्न म्हणून या बरकड भागाला नैतिक किंवा आर्थिक, कसलाच अधिकार नसतो. उपभोगासाठी किंवा चैनीसाठी त्याचा फारसा उपयोग करता येत नसल्यामुळे त्याची बचत केली जाते आणि अर्थव्यवस्थेमध्ये फाजील गुंतवणुकीसाठी त्याचा वापर होतो. हे बरकड उत्पन्न उद्योगधंदे थंडावणे, किंमती कोसळणे आणि बेकारी उद्भवणे यांसारख्या आर्थिक मंदी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या घटनांना कारणीभूत होते. कामगार आणि सर्वसाधारण समाज यांची उपभोगक्षमता वाढवण्यासाठी या बरकड उत्पन्नाचा उपयोग करून, वाढत्या उत्पादक शक्तींशी उपभोगशक्तीचा मेळ घालता येईल. मंदी आणि त्यातून उद्भवणारी बेकारी यांचा ज्या उद्योगधंद्यांमध्ये वारंवार प्रादुर्भाव होतो. त्या धंद्यांमध्ये रोजगाराची पातळी कायम राखण्यासाठी, अधिक मजुरीच्या रूपाने किंवा अधिक सामाजिक सेवांच्या रूपाने कामगारांच्या उत्पन्नाची पातळी वाढवणे अत्यावश्यक आहे."

हॉब्सन यांनी अगदी पद्धतशीरपणे त्यांचा युक्तिवाद मांडला आहे. आपल्यापैकी अनेकांना समाजातील दुर्दशेबद्दल आस्था वाटत असल्याने, अधिक मजुरी देण्याचा आणि अधिक सामाजिक सेवा उपलब्ध करण्याचा त्यांचा युक्तिवाद बरोबर आहे असे वाटेल. पण भावनेच्या भरात वाहून जाऊन आपण मान डोलावता कामा नये. या ठिकाणी, भांडवली व्यवस्थेमध्ये, नफा मिळवणे हेच उत्पादनाचे उद्दिष्ट असते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. भांडवलदार आत्यंतिक गुंतवणूक करतात, भांडवलाचे प्रमाण वाढलेल्या उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या वस्तू विकत घ्यायला कामगारांना पुरेशी मजुरी मिळत नाही आणि त्यामुळे नफ्याचे प्रमाण घटून आर्थिक अरिष्ट ओढवते असे हॉब्सन म्हणतात.

परंतु प्रा. हायेक यांच्या मते हे खरे नाही. त्यांच्या मते, पुरेशा प्रमाणावर गुंतवणूक न केल्यामुळेच नफ्याचे प्रमाण घटते. सामाजिक सेवा आणि मजुरी वाढवू नयेत तर कमी कराव्यात असा त्यांचा दावा आहे : "उत्पादनसाधनांकडून उपभोगसाधनांकडे मागणीचा होरा वळवण्याचा प्रयत्न शासनसंस्थेच्या विशिष्ट प्रकारच्या कृतींनी होणार असेल तर उत्पादनाची भांडवली संरचना आकसून प्रदीर्घ मंदी येण्याची शक्यता उद्भवते ..मंदीवर उपाय म्हणून ग्राहकांना पतपुरवठा करावा असा सध्या फार आग्रह धरण्यात येतो, परंतु त्याचा परिणाम उलटाच होईल. उपभोग वस्तूंच्या मागणीतील सापेक्ष वाढीमुळे परिस्थिती अधिकच बिघडेल."

प्रा. हायेक यांच्या गुंतागुंतीच्या सिद्धांतावर त्रोटकपणे लिहून त्यांना न्याय देता येणार नाही. परंतु सध्या एका गोष्टीकडे लक्ष वेधणे जरुरीचे आहे. अरिष्टांची म्हणजेच

नफ्याचा दर कोसळण्यामागची हॉब्सन आणि हायेक यांनी दिलेली कारणे अगदी परस्पर-विरोधी आहेत. घसरणाऱ्या नफ्यासंबंधी ज्या उपाययोजना ते सुचवतात त्याही अगदी परस्परविरूद्ध आहेत.

गंमतीदार प्रकार म्हणजे ते दोघे बरोबर आहेत. आणि चूकही आहेत. सामाजिक सेवा आणि मजुरी यात वाढ केल्यामुळे क्रयवस्तूंच्या वाढत्या पुरवठ्याला मागणी तयार होईल हे हॉब्सन यांचे म्हणणे बरोबर आहे. परंतु मजुरी वाढवली की उत्पादनामुळे मिळणारा नफा तात्काळ कमी होत असल्यामुळे हॉब्सन यांचे बाकीचे प्रतिपादन चुकीचे आहे. कमी वेतन आणि मर्यादित सामाजिक सेवा असल्या की हा नफा वाढतो हे हायेक यांचे मत बरोबर आहे. परंतु वेतन कमी केले की क्रयवस्तूंच्या वाढत्या पुरवठ्याला मागणी देऊच शकत नाही आणि म्हणून हायेक यांचे उरलेले प्रतिपादन चुकीचे ठरते. जनतेची क्रयशक्ती वाढवून मागणी (आणि नफा) वाढवावी असे हॉब्सन यांना वाटते. तर जनतेची क्रयशक्ती (आणि वेतन) घटवून नफ्याची पातळी वाढवावी असे हायेक यांना वाटते.

कार्ल मार्क्स यांच्या अनुयायांच्या मते, हा भांडवलशाहीला पडलेला पेच आहे **या दोन्ही गोष्टी करणे भांडवलशाहीला शक्य नाही.** म्हणूनच भांडवलशाही-मध्ये आर्थिक अरिष्टे येणे अपरिहार्यच आहे असा त्यांचा युक्तिवाद आहे. या अरिष्टांमागे हे किंवा ते कारण असून एखादी विशिष्ट उपाययोजना केली तर सगळीकडे आबादीआबाद होईल असेच इतर सर्व अर्थतज्ञ सांगतात. परंतु भांडवली व्यवस्था कायम ठेवून या अरिष्टांमधून सुटका शक्य नाही असे मार्क्स यांचे म्हणणे होते. या अरिष्टां-पासून सुटका करून घेण्यासाठी, भांडवलशाहीच संपुष्टात आणली पाहिजे.

मार्क्स यांच्या संपूर्ण सिद्धांतामध्येच अरिष्टाविषयीचे त्यांचे विश्लेषण अंतर्भूत आहे. भांडवली उत्पादनाविषयीचा आणि भांडवली उत्पादनामध्ये येणाऱ्या बिघाडांचे स्पष्टीकरण देणारा त्यांचा सिद्धांत एकच आहे. त्यांचे मूलाधार एकच आहेत.

नफा मिळवणे हेच भांडवली उत्पादन व्यवस्थेचे उद्दिष्ट असते. **नफ्याचा दर कमी कमी होत जाण्याची प्रवृत्ती** भांडवली उत्पादन-प्रक्रियेत असते हे मार्क्स यांनी सिद्ध केले. हा काही योगायोग नसतो. असे होणे क्रमप्राप्तच असते. भांडवली उत्पादन पद्धतीच्या संरचनेमध्येही ही गोष्ट अपरिहार्यच असते. हे कसे होते ते पाहू या. (या ठिकाणी मार्क्सच्या श्रममूल्य सिद्धांतासंबंधी माहिती देणारा, या पुस्तकाच्या अठराव्या प्रकरणातील भाग पुन्हा एकदा वाचणे वाचकांच्या हिताचे होईल.)

मार्क्स यांच्या मते भांडवलाचे दोन भाग असतात – चल भांडवल आणि अचल भांडवल. कारखाना, यंत्रसामुग्री, अवजारे, कच्चा माल इत्यादी गोष्टींवर खर्च होणारा भाग म्हणजे अचल भांडवल. श्रमशक्ती विकत घेण्यावर म्हणजेच मजुरीवर खर्च होणारा भाग म्हणजे चल भांडवल. उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये, यंत्रसामुग्री, कच्चा माल वगैरे गोष्टींचे मूल्य जसेच्या तसे उत्पादित मालामध्ये उतरते, म्हणून या गोष्टींना अचल भांडवल असे म्हणतात. उत्पादन-प्रक्रियेमध्ये श्रमशक्तीच्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य उत्पादित

मालामध्ये उतरते म्हणून तिला चल भांडवल असे म्हणतात. उत्पादन प्रक्रियेमध्ये, नवे मूल्य तयार करण्याची क्षमता अचल भांडवलात नसते. म्हणून अचल भांडवल वांझ असते. याउलट, उत्पादनप्रक्रियेमध्ये नवे मूल्य निर्माण करण्याची क्षमता चल भांडवलात असल्यामुळे ते (आणि केवळ चल भांडवलच) उत्पादक असते. स्वतःच्या मूल्यापेक्षा अधिक मूल्य म्हणजेच वरकड मूल्य, निर्माण करण्याची क्षमता चल भांडवलामध्ये असते. या चल भांडवलामधूनच (म्हणजेच सजीव शक्तीमधूनच) नफ्याचा उगम होतो.

म्हणजेच उत्पादनामध्ये भांडवलदाराच्या भांडवलाचे दोन भाग पडतात :

भ (एकूण भांडवल) = अ (अचल भांडवल) + च (चल भांडवल)

आता भ या एकूण भांडवलापैकी अ या अचल भांडवलावर किती भाग जाईल आणि च या चल भांडवलावर किती भाग जाईल ? मार्क्स यांच्या मते भांडवलशाहीच्या विकासाबरोबर एकूण भांडवलापैकी अधिकाधिक भाग अचल भांडवलावर खर्च केला जाईल. त्यांच्या या दाव्याबद्दल सर्वांचे एकमत होईल. आधुनिक उद्योगांमध्ये सतत अधिकाधिक चांगली यंत्रसामुग्री वापरात आणतात हे सर्वपरिचितच आहे. ही यंत्रसामुग्री चमत्कार करून दाखवते खरी, पण त्यासाठी प्रचंड प्रमाणावर पैसा लागतो. अशा यंत्रसामुग्रीमुळे श्रमाचा वाटा कमी होतो, म्हणजेच अधिकाधिक प्रमाणात चल भांडवलाचे (च) एकूण भांडवलाशी (भ) असलेले प्रमाण घटू लागते. तसेच अचल भांडवलाचे (अ) एकूण भांडवलाशी (भ) असलेले प्रमाण वाढू लागते. थोडक्यात म्हणजे,

$$\frac{\text{च}}{\text{भ}} \text{ कमी होते, तर } \frac{\text{अ}}{\text{भ}} \text{ वाढते.}$$

सापेक्षदृष्ट्या अचल भांडवल वाढते तर चल भांडवल कमी होते, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. कारण ' च ' म्हणजे फक्त चल भांडवलच वरकड मूल्याचे आणि नफ्याचे उगमस्थान असते. म्हणूनच ' च ' कमी झाल्यास नफ्याचा दर कमी कमी होण्याची शक्यता निर्माण होईल. अचल भांडवलाचे एकूण भांडवलाशी असलेले प्रमाण वाढल्यामुळे, " शोषणाचा दर किंवा वरकड मूल्याचा दर कायम राहिल्यास, नफ्याचा दर कमी होतो...भांडवलाच्या घडणीमध्ये हळूहळू घडत जाणारा हा बदल केवळ एकाच उद्योगधंद्यापुरता मर्यादित न राहता जवळपास सर्व उद्योगधंद्यांमध्ये घडतो असे गृहीत धरले तर....अचल भांडवलाच्या सापेक्ष वाढीमुळे, जोपर्यंत वरकड मूल्याचा दर बदलत नाही तोपर्यंत, **नफ्याचा साधारण दर हळूहळू खाली येणे** अपरिहार्यच बनेल. " असे मार्क्स म्हणतात.

नफ्याच्या दरामध्ये घट होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सर्वाधिक नफा कमावण्याच्या भांडवलदारांच्या मुख्य उद्दिष्टलाच त्यामुळे धक्का पोहोचतो. पण भांडवलदारांना त्यामधून तात्पुरता मार्ग काढता येतो. नफ्याचा दर कमी झाला तरीही एकूण नफा त्यांना वाढवता येतो. हे एक उदाहरण पहा (वरकड मूल्य ' व ' असून वरकड मूल्याचा दर दोन्ही वेळेला १०० टक्के आहे) :

तक्ता ११

भ	अ	च	व	
१,५००	१,०००	५००	५००	रुपये
४,०००	३,०००	१,०००	१,०००	रुपये

'व' हे वरकड मूल्य फक्त चल भांडवलातूनच (च) निर्माण होत असल्याने वरकड मूल्याचा दर $\frac{व}{च}$ असाच असतो. परंतु नफा जरी फक्त वेतनावर खर्च होणाऱ्या चल भांडवलातून निर्माण होत असला, तरीही एकूण भांडवलावर (भ) नफा मिळाला असेच भांडवलदार धरतो. म्हणूनच त्याचा नफ्याचा दर $\frac{व}{भ}$ असा असतो.

वरील उदाहरणामध्ये, पहिल्या वेळेला नफ्याचा दर $\frac{रु.\ ५००}{रु.\ १५००}$ म्हणजे ३३⅓ टक्के आहे, तर दुसऱ्या वेळेला तो $\frac{रु.\ १,०००}{रु.\ ४,०००}$ म्हणजे केवळ २५ टक्के आहे. अशा तऱ्हेने नफ्याचा दर कमी झाला तरीही एकूण नफा ५०० रुपयांऐवजी १,००० रुपये झाला आहे.

परंतु शक्य होण्यासाठी काय करावे लागते त्याकडे नीट लक्ष द्या. केवळ ज्यामधून नफा निर्माण होऊ शकतो ते चल भांडवल दुप्पट करावे लागते. उत्पादनाच्या आधुनिक तंत्रज्ञानामध्ये चल भांडवलापेक्षा अचल भांडवलाचे प्रमाण जास्त असल्याने चल भांडवल जरी केवळ दुप्पट करावे लागले तरी अचल भांडवल तिप्पट करावे लागते. आणि खरी गोम इथेच आहे. एकूण नफा वाढविण्यासाठी भांडवलदारांना अधिकाधिक भांडवलसंचय करणे भाग पडते. त्यापासून सुटका नसते. भांडवलसंचय थंडावल्यास, एकूण नफा (आणि नफ्याचा दर, दोन्हीही) घटतात.

प्रत्येक भांडवलदाराला हे ठाऊक असते. बाजारपेठेतील स्पर्धेमुळे अधिकाधिक पैसा वाचवून वाढत्या प्रमाणात गुंतवणूक करणे किंवा नाक घासून शरण येणे याखेरीज आणखी पर्याय नाही हे तो शिकलेला असतो. सतत भांडवलसंचय करणे त्याला भागच असते. अशा तऱ्हेने पुरेशा प्रमाणात एकूण भांडवल वाढवले तरच नफ्याचा दर कमी होऊनही त्याला पुरेसा नफा कमावणे शक्य होते.

कामगारांना अधिक वेतन द्यावे असा सल्ला देणाऱ्या भल्या माणसांनी हा मुद्दा विचारात घेतलेलाच नाही. परंतु कामगारांना अधिक वेतन दिल्यास आपल्याला कमी नफा मिळतो हे भांडवलदाराला पक्के ठाऊक असते. अशा वेतनवाढीमुळे, नफा कायम ठेवण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या भांडवल-संचयाला चालना मिळत नाही, तर खीळ घातली जाते. हे त्याला परवडणारे नसते, कारण भांडवलसंचय थांबला की नफे संपुष्टात येतात.

कमीत कमी वेतन देऊन तो हा प्रश्न सोडवतो. त्यामुळे सतत वाढत्या भांडवल-संचयाचे आपले धोरण राबवायला तो मोकळा होतो. पण वाढत्या भांडवल-संचयामुळे बाजारपेठेमध्ये क्रयवस्तूंचा पुरवठा वाढत्या प्रमाणावर होऊ लागतो. आणि असे झाले की, कामगारांकडे हा वाढता पुरवठा सामावून घेईल एवढी क्रयशक्ती नसल्यामुळे, आर्थिक विसंगतीच्या पात्याची दुसरी बाजू त्याला घायाळ करते. कामगारांना कमी वेतन दिल्यामुळे, भांडवलदारांनी बाजारपेठेत आणलेल्या मालाचा उठावच होत नाही.

मार्क्स यांच्या विश्लेषणाचा सारांश असा : वेतनमान खाली ठेवून नफे कायम ठेवणे भांडवलदारांना भागच असते. परंतु असे केल्यामुळे नफे प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आवश्यक असलेल्या क्रयशक्तीवरच आघात होतो. कमी वेतनामुळे अधिक नफ्याची शक्यता निर्माण होते, परंतु त्याच वेळी कमी वेतनामुळे वस्तूंची मागणी कमी होऊन नफे कमावणेच अशक्यप्राय होते.

या विसंगतीवर तोडगा नाही.

....

भांडवली व्यवस्थेसमोर उभ्या ठाकलेल्या अरिष्टावर, सुमारे नव्वद वर्षांपूर्वी कार्लाईल थॉमस यांनी नेमके बोट ठेवले होते : "तुमच्या या विणलेल्या शर्टांचा उपयोग काय ? लाखोंच्या संख्येने ते पडून आहेत, त्यांची विक्री होऊ शकत नाही म्हणून ! आणि दुसरीकडे ते शर्ट मिळू न शकल्याने लाखो लोक वस्त्रहीन अवस्थेत वावरत आहेत. माणसांचे शरीर झाकण्यासाठीच शर्टांचा उपयोग असतो; नाही तर ते निरुपयोगी असतात. थोडक्यात येथील वास्तव ही एक असह्य कुचेष्टा ठरते. आणि तुम्ही नेमके तेच करत आहात, माणुसकीच्या मार्गावर तुम्ही हजारो वर्षे मागे आहात !"

"माणुसकीच्या मार्गावर तुम्ही हजारो वर्षे मागे आहात !" हे कार्लाईल यांचे वचन त्या काळी खरे असेल, तर जगाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या अरिष्टाच्या काळात ते त्यापेक्षा शतपटीने जास्त खरे आहे.

या प्रश्नाला उत्तर शोधण्याचा सर्व लोक प्रयत्न करीत आहेत. सोव्हिएट युनियनमध्ये भांडवलशाहीला पर्याय म्हणून मार्क्सवादी पद्धतीने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जात आहे. जगामध्ये इतरत्र थोडीफार मलमपट्टी करून आणि भांडवलशाहीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करून लोक या प्रश्नाचे उत्तर शोधत आहेत.

◇ ◇ ◇

२१

रशियाकडे एक योजना आहे

एकोणिसावे शतक संपायला सतरा वर्षे असताना कार्ल मार्क्स यांचा अंत झाला. विसावे शतक सुरू झाल्यानंतर सतरा वर्षांनी त्यांना नवे जीवन लाभले.

लेनिन व इतर बोल्शेव्हिक या मार्क्सच्या अनुयायांनी १९१७ साली सत्ता काबीज करताना मार्क्सचा सिद्धांत प्रत्यक्षात उतरवला. ही घटना घडेपर्यंत मार्क्सची शिकवण निष्ठावंत अनुयायांच्या एका छोट्या गटापर्यंतच मर्यादित होती. ह्यानंतर मात्र सर्व जगाचे लक्ष मार्क्सच्या शिकवणीकडे वेधले गेले. आपले सिद्धांत प्रत्यक्षात आणले असता एक नवे आणि अधिक सुखावह जग निर्माण करता येईल अशी केवळ आश्वासनेच ह्यापूर्वी कम्युनिस्ट देऊ शकत. ह्यानंतर मात्र जगाच्या एक-षष्ठांश भू-भागाकडे बोट दाखवून ते म्हणू शकत होते, " हे पहा आमच्या सिद्धांतांचे प्रात्यक्षिक ! "

परंतु मुळात सत्ता काबीज करणे बोल्शेव्हिकांना शक्य कसे झाले ? क्रांती यशस्वी होण्यासाठी अशी कोणती परिस्थिती अस्तित्वात होती ? या संदर्भात आपण एक गोष्ट ठामपणे सांगू शकतो. ती म्हणजे, यशस्वी क्रांती घडवून आणणे ही काही सोपी गोष्ट नव्हे. कोणा सोम्यागोम्याला कुठेही आणि केव्हाही क्रांती घडवून आणता येत नाही. क्रांती ही एक कला आहे या महत्त्वपूर्ण सत्यावर बोल्शेव्हिकांचे नेते लेनिन यांनी भर दिला आहे.

" कोणताही उठाव एखाद्या कटकारस्थानामुळे किंवा एखाद्या पक्षामुळे यशस्वी होत नाही. तर त्याला एका प्रगत वर्गाच्या भरभक्कम पाठबळाची आवश्यकता असते. हा पहिला मुद्दा झाला. दिवसागणिक अधिकाधिक व्यापक आणि परिपक्व होत जाणाऱ्या क्रांतीच्या इतिहासामध्ये जनतेच्या अग्रदूतांची कृतिशीलता शिगेला पोहोचण्याचा क्षण येतो. त्याचप्रमाणे शत्रूपक्षातील **अनिश्चितता** आणि **क्रांतीच्या कमकुवत पाठीराख्यांमधील चलबिचल टोकाला पोहोचलेली असते.** अशा **नेमक्या निर्णायक क्षणी** उठावाची आखणी करणे हा तिसरा मुद्दा झाला. ... परंतु एकदा का अशी परिस्थिती साकार झाली की अशा उठावाचा एक कलाकृती म्हणून आविष्कार करण्यास नकार देणे म्हणजे मार्क्सवाद आणि क्रांती या दोन्हींशी बेइमानी करणेच होय. "

बोल्शेव्हिकांनी सत्ता काबीज करण्याच्या एक महिना अगोदर वरील शब्द लिहिले गेले. क्रांती यशस्वी होण्यासाठी लेनिन यांनी नमूद केलेली परिस्थिती आवश्यक आहे याविषयी त्यांच्या बऱ्याच अनुयायांमध्ये एकवाक्यता होती. परंतु अशा परिस्थितीत उठावासाठी निर्णायक क्षण नेमका कोणता याबद्दल ते लेनिनबरोबर सहमत नव्हते. हा नेमका क्षण टिपण्यामध्येच लेनिनची असामान्य बुद्धिमत्ता दिसून येते. परिस्थितीतील परिपक्वता दाखवणारा क्षण कोणता, यशासाठी चढाई करण्याचा क्षण कोणता आणि कोणत्या क्षणानंतर वेळ दवडल्यास अपयश पदरी पडेल हे लेनिन यांनी अचूक हेरले.

सत्तासंपादनाची घटका जवळ आलेली असतानाही बार उडवण्याची वेळ आता आलेली आहे हे आपल्या अनुयायांना पटवून देण्यासाठी लेनिन यांना स्वतःचे सर्वस्व पणाला लावावे लागले. **शासनसत्ता टिकवून धरणे बोल्शेव्हिकांना जमेल काय ?** अशा मथळ्याचा एक लेख ७ ते १४ ऑक्टोबरच्या दरम्यान लेनिन यांनी लिहिला. त्यामध्ये क्रांतिकारी कृतीसाठी तात्काळ पाऊल उचलण्याच्या विरोधात दिल्या गेलेल्या सर्व मुद्द्यांचे विश्लेषण त्यांनी केले. त्यावेळी घेण्यात आलेल्या विविध हरकतीं-पैकी एका हरकतीला त्यांनी दिलेले उत्तर असे होते : " परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची असल्यामुळे ' सत्ता टिकवून धरणे बोल्शेव्हिकांना जमणार नाही असा युक्तिवाद केला जातो.

" अत्यंत गुंतागुंतीची परिस्थिती " टाळून क्रांती होत असेल तरच क्रांतीशी मिळते-जुळते घ्यायला हे दीडशहाणे तयार आहेत.

" अशा तऱ्हेची गोड, गुलाबी क्रांती कधीच होत नसते. अशी स्वप्ने पाहण्यामागे खरे तर भांडवली विचारवंतांची प्रतिगामी वृत्तीच असते. क्रांतीची सुरुवात जरी फारशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत झाली नाही तरीही विकासाच्या क्रमात क्रांती नेहमीच अत्यंत गुंतागुंतीची परिस्थिती घडवण्यास कारणीभूत होते. तळागाळातून उभी राहिलेली खरी-खुरी क्रांती, मार्क्सच्या शब्दांमध्ये सांगायचे तर ' जनतेची क्रांती ' म्हणजे जुन्या समाजव्यवस्थेच्या मृत्युघंटांच्या निनादातच लाखो लोकांच्या आयुष्याची घडी बसवणाऱ्या नव्या समाजव्यवस्थेला जन्म देणारी, अतिशय गुंतागुंतीची आणि मनस्वी कष्टदायी प्रक्रिया असते. क्रांती म्हणजे वर्गसंघर्ष आणि यादवी युद्ध यांचा एक अत्यंत, आकस्मिक, जहाल आणि भीषण आविष्कार असतो. आजवरच्या इतिहासातील कोणतीही मोठी क्रांती यादवी युद्धाशिवाय घडलेली नाही. स्वतःच्याच बंदिस्त कोषामध्ये राहणारा माणूस वगळता इतर कोणीही ' अत्यंत गुंतागुंतीची परिस्थिती ' टाळून यादवी युद्ध करता येते अशी स्वप्ने रंगवू शकणार नाही.

" परिस्थिती गुंतागुंतीची नसेल तर क्रांती संभवनीय नाही. लांडग्यांना घाबरणाऱ्या माणसाने जंगलामध्ये जायचे धाडस करू नये. "

पुढे कोणत्या प्रसंगांशी मुकाबला करावा लागेल आणि त्यासाठी काय किंमत मोजावी लागेल याचे भान असलेल्या पण तरीही न डगमगणाऱ्या क्रांतिकारकाचे हे बोल होते. कामगारवर्गाने कामगारवर्गासाठी राबवायच्या समाजवादी शासनसत्तेच्या ध्येयपूर्तीसाठी भाग पडणारी जबरदस्त किंमत मोजायला या क्रांतिकारकाची तयारी होती. क्रांतीची कला साधल्यामुळेच लेनिन यशस्वी झाले.

कम्युनिस्ट ज्याला नवसमाज म्हणून संबोधतात त्या समाजनिर्मितीच्या ऐतिहासिक घटनांना जॉन रीड यांच्यासारखा जबरदस्त वकूबाचा वार्ताहर साक्षीदार होता आपले भाग्यच म्हटले पाहिजे. 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' [जगाला हादरवणारे दहा दिवस] या आपल्या पुस्तकामध्ये त्यांनी त्या खळबळजनक परिस्थितीचे एक अविस्मरणीय चित्र रेखाटले आहे. नोव्हेंबर १९१७ मध्ये पेट्रोग्राड येथे झालेल्या सोव्हिएट काँग्रेसच्या एका बैटकीचे त्यांनी वर्णन केले :

"आणि आता लेनिननी व्यासपीठावरील वाचनस्थानाची कडा पकडली व समोरील समुदायावर नजर फिरवत ते उभे राहिले. बराच वेळ चाललेल्या टाळ्यांच्या कडकडाटाची त्यांना कल्पनाही नसावी. तो टाळ्यांचा गजर थांबल्यावर ते उद्गारले, "समाजवादी सुव्यवस्थेच्या निर्मितीला आता आपण सुरुवात करू या !"

ही घटना १९१७ साली घडली. "समाजवादी सुव्यवस्थेच्या" निर्मितीला सुरुवात करण्याची नाट्यपूर्ण घोषणा लेनिननी केल्यानंतर १५ वर्षांनी 'न्यूयॉर्क टाइम्स'चे वार्ताहर वॉल्टर ड्यूरान्टी ह्यांनी त्या व्यवस्थेची चौकट पूर्ण झाल्याची बातमी दिली : "ज्या समाजवादी सुव्यवस्थेचे ध्येय क्रांतीसमोर होते त्या व्यवस्थेची चौकट उभारण्याचे काम १९३२ साली पूर्ण झाले असे म्हणता येईल.

"संपूर्ण इमारत उभी राहण्यासाठी बराच कालावधी लागेल. परंतु समाजवादाच्या भव्य इमारतीचा डोलारा पेलू शकेल अशा पोलादी चौकटीची रूपरेषा मात्र आता पूर्वक्षितिजावर दिसू लागली आहे. वित्त, उद्योगधंदे व वाहतूक-व्यवस्था, सार्वजनिक आरोग्य व करमणूक, कला आणि विज्ञान, व्यापार आणि शेती ही राष्ट्रजीवनाची विविध अंगे होत. वैयक्तिक नफ्यासाठी करण्यात येणारे वैयक्तिक परिश्रम संपून सामूहिक हिता-साठी सामूहिक परिश्रमांच्या चौकटीत आता राष्ट्रजीवनातील विविध क्षेत्रांची जुळणी करण्यात आली आहे."

ड्यूरान्टी यांनी त्यांच्या शेवटच्या वाक्यात सोव्हिएट कार्यक्रमातील अत्यंत महत्त्वपूर्ण भागावर बोट ठेवले आहे. "वैयक्तिक" ऐवजी "सामूहिक" हे ते कळीचे शब्द होत. समाजवादी व्यवस्थेच्या निर्मितीसाठी कार्ल मार्क्सच्या अनुयायांनी आखलेल्या कार्यक्रमा-तील पहिल्यावहिल्या पावलांमध्ये उत्पादनसाधनांच्या खाजगी मालकीला मूटमाती देण्याचा निर्णय असणार अशीच कोणाचीही अपेक्षा असेल आणि अगदी तसेच घडले. आता सोव्हिएट युनियनमध्ये जमीन, कारखाने, खाणी, गिरण्या, यंत्रसामुग्री, बँका, रेल्वे इत्यादी गोष्टी कुणाही व्यक्तींची खाजगी मालमत्ता राहिलेल्या नाहीत. उत्पादन आणि वितरण यांची बहुतेक सर्व साधने सरकारच्या किंवा सरकारने संमत केलेल्या संस्थांच्या अखत्यारीत आहेत.

ही गोष्ट अत्यंत मूलभूत आहे.

या कृतीचे खरेखुरे महत्त्व जाणून घेण्यासाठी भांडवली समाजाच्या तुलनेत आपण ही गोष्ट ताडून पाहिली पाहिजे. रशियन लोकांच्या मते, कोणीही व्यक्ती आता दुसऱ्या व्यक्तीचे शोषण करू शकणार नाही असा त्याचा अर्थ होतो. म्हणजेच एका माणसाने केलेल्या श्रमाच्या जोरावर दुसरा कोणीही माणूस नफा कमवू शकणार नाही. म्हणजेच

आता कोणीही " आपल्या " कामगारांच्या पाठीवर पाय देऊन धनसंचयाच्या शिडीवर उंच उंच चढू शकणार नाही. आता कोणाही मोटारउत्पादकाला एक दिवस वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन लोकांना नोकरीचे आमिष दाखवायचे आणि दुसऱ्याच दिवशी कारखान्यामधील ७५,००० कामगारांची हकालपट्टी करायची असले उद्योग करता येणार नाहीत. असे त्याला करता येणार नाही, कारण तो कारखाना आता **त्याचा** राहिलेला नसून त्यावर जनतेची सामूहिक मालकी प्रस्थापित झालेली आहे. म्हणजेच रशियन लोकांच्या मते आता वर्गभेद नष्ट झालेले आहेत. मालक आणि मजूर, भांडवलदार आणि सर्वहारा, श्रीमंत आणि गरीब यांच्यामधील तफावत नष्ट झाली आहे. " लुटारूंनाच आता लुटण्यात आले आहे. "

२२ एप्रिल १९३६ रोजी 'न्यूयॉर्क टाईम्स'चे मॉस्को येथील वार्ताहर, हॅरॉल्ड डेनी यांनी कम्युनिस्टांच्या अभिमानास्पद दाव्यासंबंधी एक विशेष तार पाठवली :

समाजातील वर्गांच्या अंताचे रशियन्स स्वागत करतात.
सोव्हिएटचे पहिले ध्येय साध्य झाले आहे.
अँड्रीफची कम्युनिस्ट युवकांना ग्वाही
उत्पादनाचे ध्येय दृष्टिपथात
' सोव्हिएट युनियन 'च्या उत्पादनापैकी केवळ दीड टक्का
उत्पादन खाजगी उद्योगधंद्यांचे असेल.

हॅरॉल्ड डेनी यांची 'द न्यू यॉर्क टाइम्स'ला विशेष तार.

मॉस्को, एप्रिल २१ : युनियन ऑफ सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक्सच्या कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय समितीचे सचिव अँड्रेई अँड्रीफ यांनी 'यंग कम्युनिस्ट लीग' (कॉम्सोमॉल)च्या परिषदेत आज सांगितले की सोव्हिएट सत्तेने कम्युनिझमकडील वाटचालीतील पहिले उद्दिष्ट जवळपास साकार केले आहे. देशातील बहुतेक सर्व उत्पादनसाधनांवर आता सामूहिक मालकी प्रस्थापित करण्यात आली असून वर्गभेदांचे उच्चाटन करण्यात आल्याचे त्यांनी ठासून सांगितले.

सोव्हिएट युनियनमधील उत्पादित वस्तूंपैकी ९८·५% वस्तूंचे उत्पादन सार्वजनिक क्षेत्राचे असेल तर केवळ १·५% उत्पादन शिंपी, चांभार वगैरेंच्या खाजगी हस्तोद्योगांचे असेल असेही त्यांनी पुढे सांगितले. आणि श्री. अँड्रीफनी नमूद केले नसले तरीही अशा प्रकारचे खाजगी उत्पादन नव्याने लागू केलेल्या प्रतिबंधक करांमुळे झपाट्याने बुडीत निघू लागले आहे.

उद्योगधंद्यांच्या सामाजीकरणामुळे आणि जवळपासपूर्ण सामूहिक शेतीमुळे आता एकमेव कामगारवर्ग उरलेला आहे हे श्री. अँड्रीफ यांनी घोषित केले.

सामाजीकरण न झालेले असे केवळ १.५ टक्के उद्योगधंदे सोव्हिएट युनियनमध्ये बाकी आहेत! आणि हे सुद्धा रूढ अर्थाने भांडवली उद्योगधंदे नव्हेत. कारण ह्यामध्ये उत्पादक स्वतःसाठीच श्रम करतात, दुसऱ्या लोकांना ते मजुरीवर ठेवत नाहीत. देशातील इतर सर्व उत्पादनयंत्रणा सामूहिक मालकीची असून त्याचे व्यवस्थापन सरकारच्या हाती आहे.

उत्पादन साधनांच्या सामूहिक मालकीमुळे कोणत्या वस्तूंचे किती आणि कोणासाठी उत्पादन करायचे हे महत्त्वाचे आर्थिक प्रश्न आता सोव्हिएट युनियनच्या सरकारसमोर उभे राहिले आहेत. त्यांना संपूर्ण देशासाठी हे निर्णय घ्यावे लागतील. भांडवली देशांमध्ये कुठल्याही धंद्यामध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी अशाच प्रकारचे निर्णय प्रत्येक भांडवलदाराला घ्यावे लागतात. आपला पैसा त्याने कुठे गुंतवावा? मोटार-कारखान्यामध्ये, रेल्वे बांधण्यामध्ये की कापडगिरणीमध्ये? उत्पादनाचा आकार केवढा असावा? त्याच्या कामगारांना त्याने काय वेतन द्यावे? अशा छोट्या छोट्या निर्णयांमधूनच एकंदर उत्पादनाचे स्वरूप निश्चित होते. परंतु उत्पादनयंत्रणेचे हे सुटे भाग एकमेकांमध्ये नीट बसतीलच याची खात्री नसते. जेव्हा या सुट्या भागांची सांधेजुळणी व्यवस्थित होत नाही तेव्हा उत्पादनयंत्रणेमध्ये बिघाड होतो हे तुम्हाआम्हाला अनुभवावरून ठाऊक आहे.

भांडवलदारांच्या जागी येणारे समाजवादी सरकार भांडवलदारांपेक्षा हजार पटींनी महाकाय असते. म्हणजे सरकारच भांडवलाचा एकमेव मालक असते आणि प्रत्येक निर्णय घेणे त्याला भागच असते. हे सारे नेटकेपणाने करण्यासाठी गुंतागुंतीच्या महत्त्वाच्या आर्थिक कृतींना संकलित करून सुट्या भागांची व्यवस्थित सांगड घालण्याचा समाजवादी सरकार प्रयत्न करते.

रशियाकडे एक योजना आहे

" केवळ मूठभरांच्या नफेखोरीमध्ये भर पडावी म्हणून नव्हे, तर संपूर्ण समाजाचे राहाणीमान सुधारावे यासाठी संपूर्ण राष्ट्रातील उत्पादन, वितरण आणि विनिमय यांचे पद्धतशीर नियोजन ही सोव्हिएट कम्युनिझमच्या विविधांगांमधील सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची बाब होय ...

" एकदा का खाजगी मालमत्ता आणि नफ्याच्या उद्दिष्टाने स्पर्धात्मक बाजारपेठेसाठी केलेले उत्पादन यांना मूठमाती दिली की प्रत्येक कारखान्याने कशाचे उत्पादन करावे यासंबंधी निश्चित निर्देशन करणे आवश्यक बनते. ह्या गरजेपोटीच सामूहिक सत्ता असलेल्या समाजामध्ये एक ' सर्वसमावेशक योजना ' अत्यावश्यक बनते. "

रशियाच्या पंचवार्षिक योजनेसंबंधी बरेच काही तुमच्या आमच्या कानावर पडते. पहिली योजना पूर्ण झाल्यावर त्यांनी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात केली आणि रशियामध्ये समाजवाद असेपर्यंत हे चालूच राहील. सिडनी आणि बीट्राइस वेब यांच्या

वरील उताऱ्यात म्हटल्याप्रमाणे सामूहिक शासनसत्ता असलेल्या देशामध्ये योजना असावीच लागते. समाजवादी अर्थव्यवस्था ही नियोजनबद्ध अर्थव्यवस्थाच असते.

संपूर्ण जगात [१९३६ सालापर्यंत] नियोजनबद्ध अर्थव्यवस्था असलेला रशिया हा एकमेव देश असल्यामुळे अशा व्यवस्थेचे कामकाज कसे चालते हे समजून घेण्यासाठी रशियन अर्थव्यवस्था तपासायला हवी.

एखाद्या योजनेमध्ये कशाकशाचा अंतर्भाव होतो ? जेव्हा आपण एखादी योजना आखतो तेव्हा कशासाठी आणि कशाप्रकारे या दोन गोष्टींचा त्यात समावेश होतो. म्हणजेच उद्दिष्ट काय आणि मार्ग कोणता ? योजनेचे उद्दिष्ट हा एक भाग झाला आणि ते साकार करण्याचा मार्ग हा दुसरा भाग.

हीच गोष्ट समाजवादी योजनेच्या बाबतीतही लागू होते तिचे देखील एक उद्दिष्ट असते आणि ती राबवायची एक पद्धत असते. भांडवली देशांतील उद्दिष्टांपेक्षा समाजवादी योजनांचे उद्दिष्ट पूर्णपणे वेगळे असते ही गोष्ट सुरुवातीलाच ध्यानात घेणे आवश्यक आहे. सोव्हिएट युनियन संबंधीच्या 'सोव्हिएट कम्युनिझम : ए न्यू सिव्हिलायझेशन?' [सोव्हिएट साम्यवाद : एक नवसमाज ?] या उत्कृष्ट पुस्तकामध्ये सिडनी व बीट्राइस वेब यांनी ही गोष्ट व्यवस्थितपणे सांगितली आहे. "भांडवली समाजातील अगदी महाकाय खाजगी उद्योगधंद्यांचे उद्दिष्टसुद्धा त्यांच्या मालकांना किंवा भागधारकांना नफा मिळवून देणे हे असते ... कामगारवर्गाची [सर्वहारावर्गाची] हुकूमशाही असलेल्या सोव्हिएट युनियनमध्ये अंमलात आणलेल्या योजनांचे उद्दिष्ट पूर्णपणे वेगळे असते. मालक किंवा भागधारक अस्तित्वातच नसल्यामुळे त्यांच्या नफ्याचा विचारच उद्भवत नाही. दूर पल्ल्याच्या दृष्टीने संपूर्ण समाजाला अधिकाधिक सुरक्षितता आणि स्वास्थ्य मिळवून देणे हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट असते.

येथवर ठीक झाले. हे एक ढोबळमानाने ठरवलेले व्यापक उद्दिष्ट झाले. परंतु त्याला मूर्त रूप देण्यासाठी, ईप्सित ध्येयाशी सुसंगत अशी नेमकी धोरणे आखली पाहिजेत. परंतु या धोरणांच्या शक्याशक्यतेचा विचार व्हायला हवा आणि संपूर्ण देशाचे सुस्पष्ट चित्र डोळ्यांसमोर असल्याशिवाय त्याबद्दल आडाखे बांधता येणार नाहीत.

आणि 'स्टेट प्लानिंग कमिशन'ची (गॉस्प्लान) [सरकारी नियोजन मंडळ] हीच जबाबदारी अस

सोव्हिएट युनियनमधील सर्व गोष्टींबाबत विविध प्रकारची माहिती मिळवणे हे या मंडळाचे पहिले काम. कामगारवर्गाची संख्या किती ? सामूहिक यंत्रसामुग्री कोणत्या अवस्थेत आहे ? देशामध्ये कोणती निसर्गसंपत्ती उपलब्ध आहे ? आत्तापर्यंत काय काम केले गेले आहे ? काय करता येणे शक्य आहे ? काय उपलब्ध आहे ? कशाची आवश्यकता आहे ?

घटनांच्या नोंदी. आकडेवारी या संबंधी टनावारी माहिती.

सोव्हिएट युनियनमधील प्रत्येक कारखाना, शेत, गिरणी, खाण, दवाखाना, शाळा, संशोधनगृह, ट्रेड युनियन, सहकारी संस्था, नाटकवर्ग, हरेक संस्थेकडून या विस्तीर्ण प्रदेशातील कानाकोपऱ्यामधून या प्रश्नांची उत्तरे येतात : गेल्या वर्षी तुम्ही काय केलेत ?

या वर्षी काय करत आहात ? पुढील वर्षी काय करण्याचा मनसुबा आहे ? कसल्या मदतीची तुम्हाला गरज आहे ? तुम्ही काय मदत देऊ शकता ? एक ना अनेक. शेकडो प्रश्न.

ही सर्व माहिती गॉस्प्लानच्या कचेऱ्यांमध्ये जमा होते. तेथील तज्ञ मंडळी ही माहिती संकलित करतात, संगतवार लावतात आणि आत्मसात करतात. "सोव्हिएट युनियनच्या 'गॉस्प्लान'मध्ये आता काही हजार संख्याशास्त्रज्ञ आणि विविध तंत्रक्षेत्रांमधील तज्ञ काम करतात. तसेच जवळपास तेवढेच कारकून त्यांना मदत करतात. आकडेवारीचे विश्लेषण करणारी ही जगातील सर्वात व्यापक तसेच अत्यंत सुसज्ज स्थायी यंत्रणा आहे."

जमा केलेली माहिती तपासून, वर्गीकरण करून तिची निवडकपणे सुसंगत मांडणी केल्यावर सद्यःपरिस्थितीचे वास्तव चित्र तज्ञांच्या डोळ्यासमोर उभे राहाते. परंतु एवढ्यानेच सगळे काम संपत नाही. परिस्थिती कशी असावी याबद्दल पुढे विचारविनिमय करणे आवश्यक असते. यासंबंधी सरकारमधील प्रमुख व्यक्तींशी ते सल्लामसलत करतात. "सरकारी नियोजन मंडळाचे निष्कर्ष आणि प्रकल्पांचे आराखडे सरकारच्या अनुमतीसाठी पाठवण्यात येतात. नियोजनाचे काम नेतृत्वापासून अलग करण्यात आले होते आणि नेतृत्व केवळ नियोजन मंडळाची री ओढण्याचे काम करत नव्हते..."

नियोजनामुळे धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज नष्ट होत नाही तर या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी योजना असतात. सरकारमधील प्रमुख व्यक्ती धोरण निश्चित करतात आणि जमा केलेल्या माहितीच्या आधारे अधिकाधिक कार्यक्षमरीत्या हे धोरण राबवण्याचा मार्ग शोधणे हे काम नियोजनकारांचे असते. नेते मंडळी आणि 'गॉस्प्लान' यांच्या चर्चेमधूनच योजनेचा पहिला मसुदा तयार होतो.

परंतु हा पहिला मसुदा म्हणजे काही अंतिम योजना नव्हे. कारण समाजवादी नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेमध्ये केवळ बुद्धिमार्तंडांनी केलेली योजना पुरेशी नसते. लोकसंमतीसाठी आम जनतेपुढे ती मांडणे हे पुढचे पाऊल असते. इंग्लंडमधील रशियन राजदूत आय. मायस्की यांनी योजना-निर्मितीच्या या दुसऱ्या टप्प्याचे केलेले वर्णन पहा : "लहानमोठे उद्योगधंदे, अंतर्गत व विदेशी व्यापार, वाहतूकव्यवस्था वगैरेंशी संबंधित जनप्रतिनिधी मंडळांकडे निरिक्षणासाठी महत्त्वपूर्ण आकडेवारी पाठवण्यात येते आणि त्याबद्दल त्यांच्या प्रतिक्रिया मागवण्यात येतात. प्रत्येक केंद्रीय संस्था आपल्या अखत्यारीमधील खालच्या संस्थांकडे या योजनेचे विविध भाग पाठवते आणि अशा तऱ्हेने योजनेचे विशिष्ट भाग त्या त्या कारखान्याकडे किंवा शेतीसंस्थांकडे येऊन पोहोचतात. प्रत्येक पातळीवर या महत्त्वपूर्ण आकडेवारीचा सूक्ष्म अभ्यास केला जातो. सरकारी नियोजन मंडळापासून थेट एक एक कारखाना किंवा सामूहिक शेतीसंस्था या शेवटच्या टप्प्यावर योजनेचे भाग पोहोचले की सर्व उत्सुक कामगार व शेतकरी त्या योजनेवर चर्चा करतात आणि त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्यासंबंधी सूचना करतात. त्यानंतर ती महत्त्वाची आकडेवारी सुधारित किंवा विस्तारित स्वरूपात पहिल्याच मार्गाने सरकारी नियोजन मंडळापर्यंत जाते."

कारखान्यांमध्ये कष्ट करणारे कामगार आणि शेतांमध्ये राबणारे शेतकरी योजनेतील बऱ्यावाईट गोष्टींबद्दल आपली मते स्पष्टपणे मांडतात याबद्दल रशियन लोकांना क्वचितच अभिमान वाटतो. अनेकदा असे घडते की हे शेतकरी व कामगार ज्या ठिकाणी काम करतात तेथील उत्पादनाची आकडेवारी काय असावी यासंबंधी त्यांचे मत वरून आलेल्या योजनेपेक्षा वेगळे असते. अशा वेळी आपल्या आकडेवारीच्या सहाय्याने ते त्यांच्या कारखान्यापुरती किंवा शेतापुरती प्रतियोजना मांडतात आणि उत्पादन वाढवणे शक्य असल्याचे दाखवून देतात. लाखो सोव्हिएट नागरिकांनी त्या योजनेच्या मसुद्यावर केलेल्या अशा चर्चांमधून रशियन लोकांना खऱ्याखुऱ्या वास्तव लोकशाहीचा प्रत्यय येतो. कामाची उद्दिष्टे आणि योजना वरून लादलेली नसतात. तर कामगार व शेतकरी यांच्या मताला किंमत असते. या प्रक्रियेमुळे साध्य झालेल्या परिणामाविषयी एका निरीक्षकाने आपल्याला बोलकी माहिती पुरवली आहे : " मी रशियामधील ज्या ज्या भागांमध्ये फिरलो त्या त्या भागांमध्ये कामगार ' हा **आमचा** कारखाना आहे, हे **आमचे** इस्पितळ आहे, हे **आमचे** विश्रांतीगृह आहे ' असे अभिमानाने सांगताना आढळतात. याचा अर्थ वैयक्तिकरीत्या त्यांची त्या त्या गोष्टींवर मालकी होती असे नव्हे तर त्या संस्था त्यांच्या हितासाठी काम करत होत्या आणि कोणत्याही परिस्थितीत त्या संस्थांची कार्यक्षमता कायम राखणे ही काही प्रमाणात तरी त्यांची जबाबदारी असल्याची त्यांना जाणीव होती. "

परत आलेल्या आकडेवारीची अंतिम तपासणी ही योजनानिर्मितीमधील तिसरी पायरी होय. सरकार-प्रमुख आणि नियोजनकार वेगवेगळ्या सूचनांचा अभ्यास करून त्यानुसार योजनेत आवश्यक ते बदल करतात आणि योजनेचे अंतिम स्वरूप निश्चित होते. आता पुन्हा एकदा ही योजना सर्व कामगार व शेतकरी यांच्याकडे पाठवण्यात येते आणि ठरवलेली उद्दिष्टे गाठण्यासाठी संपूर्ण राष्ट्र आपली सर्व शक्ती पणाला लावते. सामूहिक कृती हे वास्तव बनते.

परंतु सामूहिक कल्याण म्हणजे नेमके काय ? कोणत्या धोरणांना प्राधान्य देणे सरकारी प्रमुखांना अत्यावश्यक वाटले ? या संदर्भात काही सर्वसाधारण उद्दिष्टे सहजगत्याच सामोरी आली. सोव्हिएट युनियनमधील बहुतेक लोक निरक्षर, अशिक्षित होते म्हणूनच शिक्षणाचा सार्वत्रिक कार्यक्रम हा योजनेचा भाग असणे अत्यावश्यकच होते. सर्वांना मोफत शिक्षण आणि विश्वविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची बिनामोबदला उदरनिर्वाहाची सोय करण्यात आली. रशियामधील बहुसंख्य जनतेला आरोग्यशास्त्रासंबंधी जवळपास काहीच माहिती नव्हती. यावर उपाय म्हणून लोकांचे जीवनमान सुधारण्याबरोबरच तज्ञ डॉक्टर, परिचारिका तसेच शिक्षक यांनी परिपूर्ण अशा इस्पितळांची, प्रसूतिगृहांची, बालवाड्यांची सोय आवश्यक होती. कामगारांसाठी विश्रांतिगृहे, उद्याने, वस्तुसंग्रहालये वगैरे अनेक बाबींचा योजनेमध्ये समावेश होण जरूरीचे होते. वैज्ञानिक संशोधन करता यावे म्हणून संशोधनसंस्था व प्रयोगशाळा यांची उभारणी आवश्यक होती. या आणि अशा अनेक गोष्टी आवश्यक असल्याने योजनेमध्ये त्यांचा अंतर्भाव करण्यात आला. परंतु काही प्रश्नांची उत्तरे शोधणे सोपे नव्हते. उदाहरणार्थ :

१. लोकांना तावडतोबीने लागणारे खाद्यपदार्थ, कपडेलत्ते वगैरे वस्तूंच्या उत्पादनावर आज भर देणे योग्य होईल का? की लोकांना आज कमी मिळाले तरी भविष्यकाळाकडे नजर ठेवून कारखाने, वीजनिर्मिती केंद्रे, रेल्वे इत्यादींच्या उभारणीवर लक्ष केंद्रित करणे अधिक योग्य ठरेल? उपभोगाच्या वस्तूंचे उत्पादन वाढवणे याचा अर्थ लोकांना आज सुखसोयी उपलब्ध करून देणे; तर उत्पादनसाधनांचे उत्पादन वाढवणे म्हणजे भविष्यकाळातील सोयींची तरतूद करून ठेवणे. यापैकी कोणती गोष्ट अधिक हितावह होती?

२. सहजरीत्या ज्या मालाचे उत्पादन करता येते त्याचे उत्पादन वाढवण्यावर भर द्यावा व ज्या वस्तूंचा तुटवडा असेल किंवा ज्यांचे उत्पादन खर्चिक होईल त्याची आयात करावी का? की देशातील साधनसामुग्रीनेच आपल्याला लागणाऱ्या वस्तू तयार करण्याचा प्रयत्न करावा?

समाजवादी देश असल्यामुळे सोव्हिएट रशियाला भांडवली जगाच्या आक्रमणाचा धोका वाटत होता आणि वरील प्रश्नांची उत्तरे बऱ्याच अंशी यावर अवलंबून होती. असा धोका वाटणे हा काही विनबुडाचा तर्क नव्हता, तर यापूर्वीच असे घडले होते. १९१८ ते १९२० च्या दरम्यान अमेरिकेसकट अर्धा डझन भांडवली देशांनी लष्करी बळ वापरून बोल्शेव्हिकांना उलथवण्याचा घाट घातला होता. असा प्रयत्न पुन्हा करण्यात येईल याची रशियन लोकांना खात्री वाटत होती. विशेषतः समाजवादाची उभारणी करण्यात बोल्शेव्हिक सफल झाले तर हा धोका अधिकच वाढणार होता. कारण आपल्या देशातील कामगारवर्गसुद्धा रशियातील कामगारवर्गाच्या पावलावर पाऊल टाकून आपल्याला सत्ताभ्रष्ट करील ही भीती इतर देशांमधील भांडवलदारांच्या मनात येण्याची शक्यता होती.

लोकांना उद्योगप्रधान समाजाइतके जीवनमान शेतीप्रधान समाज पुरवू शकत नाही. याणि इतर अनेक कारणांमुळे रशियन लोकांनी औद्योगिकीकरणाच्या कार्यास स्वतःला वाहून घेतले.

हे काम सोपे नव्हते. तावडतोबीने मिळणाऱ्या स्वास्थ्याचा त्याग करून भविष्यकाळाची सोय करून ठेवणे असा त्याचा अर्थ होता. देशातील साधनसंपत्तीचा एक मोठा भाग उत्पादनसाधनांच्या उत्पादनासाठी वापरला म्हणजे पर्यायाने लोकांना तातडीने भरपूर अन्न, कपडे व प्रशस्त घरे पुरवता येत नाहीत. श्रम आणि उत्पादनसाधने यांचा ठराविक पुरवठाच देशापाशी असतो. विटा बनवून घरे बांधण्याच्या, गहू पिकवून पाव बनवण्याच्या आणि कापसाची लागवड करून कपडे तयार करण्याच्या कामावर देशातील सर्व कामगारांना लावता येणे शक्य आहे. त्यामुळे सर्वांनाच या गोष्टी भरपूर प्रमाणात मिळतील. **पण मग आजच्यापेक्षा जास्त प्रमाणात या वस्तूंचा पुरवठा कधीही होऊ शकणार नाही.** हा पुरवठा जर वाढवायचा असेल तर देशातील काही कामगारांना यंत्रसामग्री तयार करण्याचे, रेल्वेमार्ग टाकण्याचे, कारखाने बांधण्याचे, थोडक्यात म्हणजे उत्पादनसाधनांचे उत्पादन करण्याचे काम करावे लागेल. यामुळे पुढील वर्षी किंवा पुढील काही वर्षांमध्ये अधिक जास्त प्रमाणात पाव, कपडे, घरे यांचा पुरवठा शक्य होईल. भविष्यकाळासाठी करण्याच्या गुंतवणुकीवरून लोकांना आज मिळणारे जेवणखाण आणि

कपडेलत्ते यांचे प्रमाण निश्चित होते. कोळशाचा अधिक वापर करून घरे उबदार करणे शक्य होईल किंवा तोच कोळसा 'ब्लास्ट फर्नेस'मध्ये वापरून अधिक पोलाद उत्पादन करता येईल. त्या पोलादाची यंत्रसामग्री बनवून त्या यंत्रसामग्रीने स्वयंचलित मागांची निर्मिती करता येईल व या मागांवर कापडाचे उत्पादन अधिक झपाट्याने व मोठ्या प्रमाणावर करता येईल हे रशियन लोकांच्या लक्षात आले. परंतु दोन्ही मिळणे शक्य नव्हते. त्यांनी दुसरा पर्याय स्वीकारला. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाऐवजी उत्पादन-साधनांचे उत्पादन करण्याचे त्यांनी ठरवले. औद्योगिकीकरणाचा मार्ग असा होता आणि तो सोपा नव्हता.

१ मार्च १९३६ रोजी स्क्रिप्स-हॉवर्ड प्रेसच्या रॉय हॉवर्ड यांना दिलेल्या मुलाखती-मध्ये, औद्योगिकीकरणाचा मार्ग बिकट असला तरी सोव्हिएट उद्दिष्टांशी सुसंगत असल्याचे जोसेफ स्टालिन यांनी सांगितले. "नवे घर बांधण्यासाठी त्याग आणि काटकसर करावीच लागते आणि जर नवा समाज घडवायचा असेल तर ही गोष्ट अधिकच जास्त खरी ठरते.

"आवश्यक साधनसामुग्री जमा करण्यासाठी आम्हाला आज आमच्या मागण्यांना मर्यादा घालणे भाग आहे. मुक्तीचे उद्दिष्ट मनाशी बाळगूनच आम्ही हा त्याग केला आहे."

उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनास मर्यादा घालून उत्पादनसाधनांचे उत्पादन वाढवण्याचे ठरवल्यावर रशियन लोकांना कोणते "त्याग" करावे लागले? तात्काळ लागणाऱ्या उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी कामगार व उत्पादनसाधने यांचा तुटवडा असा त्याचा अर्थ होता. सर्व उपभोग्य वस्तूंचा रशियामध्ये तुटवडा होता ही गोष्ट सोव्हिएट युनियनला भेट देणाऱ्या हितशत्रूंच्या नजरेतून सुटली नाही हे सर्वांना माहीत आहे. तेथे किटलीपेक्षा ट्रॅक्टर मिळवणे आणि ब्लँकेटपेक्षा रेल्वेमध्ये बिछाना मिळवणे अधिक सोपे होते. आता रशियन लोक काही ट्रॅक्टरमध्ये चहा करू शकत नव्हते किंवा रेल्वेचे बिछाने ब्लँकेट म्हणून पांघरू शकत नव्हते. म्हणजेच त्या वेळी उभारण्यात येत असलेल्या ट्रॅक्टर्स, कारखाने, रेल्वेइंजिने, वीजनिर्मिति केंद्रे वगैरे गोष्टींसाठी त्यांना स्वतःच्या पोटाला चांगलाच चिमटा घ्यावा लागत होता.

'**न्यूयॉर्क टाइम्स**'च्या २७ मार्च १९३६ च्या वृत्तानुसार आता मात्र सोव्हिएट नागरिकांना चांगले दिवस येण्याची चिन्हे दिसत आहेत. "समाजवादी अर्थव्यवस्थेची निर्मिती करण्याच्या सुरुवातीच्या काळात उत्पादनसाधनांच्या उत्पादनाला प्राधान्य देण्यात आले. परंतु ह्या वर्षी क्रांतीनंतर प्रथमच उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाला प्राधान्य देण्यात येणार असे सांगण्यात येते.

"या वर्षीच्या योजनेमध्ये उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनामध्ये २३ टक्के तर उत्पादन-साधनांच्या उत्पादनामध्ये २२ टक्के वाढ करण्यात येणार आहे."

येथे एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. पूर्वी उपभोग्य वस्तूंऐवजी उत्पादनसाधनांना प्राधान्य दिले हा काही राष्ट्रीय नियोजनाचा नैसर्गिक पैलू नव्हे. उदाहरणच घ्यायचे तर अमेरिकेमध्ये समाजवादी राष्ट्रीय नियोजन करताना त्याची अजिबात गरज भासणार नाही. सोव्हिएट युनियनमधील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीमुळे सोव्हिएट योजनेचा तो एक

अत्यावश्यक भाग बनला. अमेरिकेत उत्पादनसाधने मुबलक असल्यामुळे जबर त्याग करून झपाट्याने उत्पादनसाधने निर्माण करण्याची जरुरी येथील योजनेत भासणार नाही.

याउलट रेल्वे, यंत्रसामग्री, कारखाने इत्यादी सर्वच गोष्टींची रशियाकडे कमतरता होती. [पहिल्या] महायुद्धापूर्वी जी थोड्याफार प्रमाणात ही साधने उपलब्ध होती ती देखील त्या युद्धात, यादवी युद्धात आणि [परकीय] हस्तक्षेपाच्या काळात बेचिराख झाली होती. त्यामुळे क्रांतीनंतर रशियाला फिनिक्स पक्ष्याप्रमाणे या राखेतूनच नवनिर्मिती करणे भाग पाडले. इंग्लंड, जर्मनी आणि अमेरिका तर सोडूनच द्या, पण इटाली, स्वीडन आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांची बरोबरी करण्यासाठी देखील त्यांना अशक्य कोटीतील वाटावा इतका दूरचा पल्ला गाठायचा होता; परंतु या देशांशी बरोबरी करण्याचा आणि ती देखील झपाट्याने करण्याचा रशियन लोकांनी निर्णय घेतला. हा पल्ला त्यांनी अजूनही [१९३६ सालापर्यंत] गाठलेला नाही, परंतु निःपक्षपाती निरीक्षकांच्या मते या मार्गावर त्यांची नक्कीच आगेकूच चालू आहे. केंब्रिज येथील एका अनन्यसाधारण अर्थतज्ञाने १९३२ मध्ये मत व्यक्त केले : (ज्या वेगाने रशिया प्रगती करत आहे तो वेग लक्षात घेता १९३२ साली म्हणजे फार फार पूर्वी असेच म्हणावे लागेल.) : " रशियन लोकांनी एवढे भव्य ध्येय डोळ्यांसमोर ठेवले होते की संपूर्ण भांडवली जगाने त्यांची कुचेष्टाच करावी. भांडवली जगाच्या तुलनेने ती उद्दिष्टे म्हणजे शेखमहंमदी स्वप्नेच होती. युद्धपूर्व काळात ब्रिटनसारखा श्रीमंत देश देखील राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ १४ टक्के भाग नवीन भांडवल–गुंतवणुकीसाठी वापरीत असे. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये सोव्हिएट रशियाने प्रतिवर्षी राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळजवळ ३० टक्के भाग नवीन गुंतवणुकीसाठी वापरण्याचे ठरवले—रशियासारख्या गरीब देशासाठी हे प्रमाण प्रचंडच होते. भांडवली देशांमध्ये औद्योगिक उत्पादनात सर्वसाधारणपणे प्रतिवर्षी ३ टक्के वाढ होई. १९०७ ते १९१३ मधील सहा वर्षांमध्ये ब्रिटनच्या औद्योगिक उत्पादनवाढीचा वेग प्रतिवर्षी १½ टक्क्यांहूनही कमी होता. १९२५ ते १९२९ या तेजीच्या काळात झपाट्याने विकास होणाऱ्या पोलंड व फ्रान्स या देशांमध्ये ही वाढ प्रतिवर्षी ९ टक्के होती तर अमेरिका आणि ब्रिटन या देशांत ती ४ टक्क्यांपेक्षाही कमी होती. रशियाच्या पंचवार्षिक योजनेत शासकीय महाकाय उद्योगांत प्रतिवर्षी २० टक्के तर लहानमोठ्या सर्व उद्योगांत १७ ते १८ टक्के वाढीची तरतूद करण्यात आली होती. "

ह्या औद्योगिकीकरणाच्या काळात नेहमीप्रमाणे इतर देशांकडून कर्जांचा पुरवठा होत नव्हता हे लक्षात घेता हा वाढीचा वेग अधिकच कौतुकास्पद ठरतो. जगातील जवळपास इतर सर्व देशांना औद्योगिकीकरणाचा मार्ग अनुसरताना परकीय भांडवलाची मदत झाली आहे. परदेशी भांडवलामुळे त्यांना पोलाद, यंत्रसामुग्री वगैरे गोष्टींची खरेदी करून उद्योगधंदे उभारता आले. युनायटेड स्टेट्सच्या [अमेरिकेच्या] औद्योगिकीकरणामध्ये ब्रिटिश भांडवलाचा फार मोठा सहभाग होता. दक्षिण अमेरिकेला ब्रिटिश, जर्मन आणि अमेरिकन कर्जपुरवठा करण्यात आला. आपण एकोणिसाव्या प्रकरणात पाहिल्याप्रमाणे विकसित देशातील भांडवलदार अतिरिक्त भांडवल गुंतवणुकीसाठी संधी शोधत होते. अपवाद केवळ रशिया. दुष्ट बोल्शेव्हिकांसाठी भांडवलदारांकडे

अजिबात पैसा नव्हता. त्यांना बोल्शेव्हिकांचा काहीएक उपयोग नव्हता. या बहिष्कारामधून बाहेर पडून काही प्रमाणात कर्जे मिळवण्यामध्ये रशियन लोक अखेर जेव्हा यशस्वी झाले तेव्हादेखील या कर्जांच्या अटी अतिशय कडक होत्या.

परदेशातून आयात केलेल्या या वस्तूंची परतफेड कशी करण्यात आली? सोव्हिएट युनियनमधील उद्योग उभारणीसाठी अत्यावश्यक असलेल्या भांडवलसंचयाची निर्मिती कशी करण्यात आली? हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे आणि त्याचे उत्तरही तितकेच महत्त्वाचे आहे.

यासाठी आवश्यक असलेला पैसा काही प्रमाणात सोव्हिएट उद्योगांमधूनच पुरवण्यात आला.

भांडवली समाजामध्ये संचय हा वैयक्तिक (येथे "वैयक्तिक" यामध्ये वेगवेगळ्या कंपन्या, बँका यासारख्या संस्थांचा समावेश होतो.) असतो, तर समाजवादी समाजामध्ये उत्पादनाप्रमाणेच संचयदेखील सामाजिक असतो. प्रत्येक उद्योगधंद्याच्या निव्वळ उत्पादनापैकी काही भाग केंद्रीय वित्तसंस्थांकडे पाठवण्यात येतो. अशा रीतीने उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी उपलब्ध असणाऱ्या संपूर्ण साधनसामुग्रीवर या वित्तसंस्थांचे एकछत्री नियंत्रण असते. सोव्हिएट युनियनच्या योजनेमध्ये, भांडवली समाजात नफ्यावर आयुष्यभर चैनीत राहणाऱ्या, वित्त-भांडवलाचा पुरवठा करणाऱ्या सर्वपरिचित भागधारकांना स्थान नव्हते. सोव्हिएट युनियनमध्ये शासनसंस्थाच सामाजिक वाढावा जमा करून अगोदर आखलेल्या योजनेनुसार तो विविध कार्यासाठी उपलब्ध करते.

"प्रत्येक उद्योगाचा काही प्रमाणात विकास आपोआप होतो आणि त्यासाठी त्या उद्योगामधील वाढाव्याचा काही भाग राखून ठेवण्यात येतो. परंतु प्रत्येक उद्योगधंद्याच्या वाढाव्याचा उरलेला भाग (इतर केंद्रीय संचयित निधींसमवेत) संपूर्ण व्यवस्थेत उत्पादन आणि वितरण यांचा जाणीवपूर्वक विकास करण्यासाठी उपयोगात आणला जातो. केंद्रीय नियोजनाच्या यंत्रणेत आर्थिक विकासाचे सूत्रचालन हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे."

छोट्या प्रमाणात व्यक्तिगत बचतही केली जाते. भांडवली समाजात बहुतेक बचत ही नफ्यामधूनच होते आणि सोव्हिएट युनियनमध्ये वैयक्तिक नफ्याला स्थान नसल्यामुळे तेथील बचत ही सार्वजनिक असते. ही बचत म्हणजे भांडवलाची मगरमिठी नसते.

भांडवल-संचयाचा हा एक मार्ग झाला. औद्योगिक मालाच्या पुरवठ्यासाठी लागणारा पैसा जमा करण्याचा आणखी एक महत्त्वाचा मार्ग होता विदेश-व्यापार.

स्वयंनिर्भर होण्यासाठी रशियाला आवश्यक असलेल्या मोटारी, ट्रॅक्टर्स, रेल्वे इंजिने आणि उत्पादनसाधने तयार करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री वगैरे गोष्टी रशियातील गहू, खनिज तेल, इतर खनिजे, लाकूड, कातडी वगैरे गोष्टींच्या बदल्यात इतर देशांकडून मिळू शकत होत्या. सघन औद्योगिकीकरणाचा अर्थ रशियन लोकांनी गव्हाची लागवड करणे, खनिज तेल व इतर खनिजांसाठी खाणींत खोदकाम करणे, लाकूडतोडणी करणे किंवा कातडीसाठी जनावरांना पकडणे हे उद्योग थांबवावेत असा नव्हता. याउलट या क्षेत्रांत वाढ करून बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या. एकोणिसाव्या

शतकातील अकार्यक्षम पद्धतीची जागा विसाव्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानाने घेतली. ज्याप्रमाणे उद्योगधंद्यांमध्ये यांत्रिकीकरण आणि वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करण्यात येऊ लागला, त्याचप्रमाणे शेती आणि खाणी यातही त्यांचा अवलंब करण्यात येऊ लागला. उत्पादनवाढीसाठी सर्व शक्ती पणाला लावण्यात आल्या. यामुळे रशियातील "नैसर्गिक" उत्पादनाची निर्यात करून उद्योगधंद्यांसाठी आवश्यक अशा औद्योगिक मालाची आयात करणे शक्य झाले.

यासाठी विदेश-व्यापारावर नियंत्रण आणि संपूर्ण योजनेमध्ये त्याचा समावेश करणे आवश्यक होते. आणि तसेच करण्यात आले.

परदेशांमधून सोव्हिएट युनियनमध्ये कोणत्या वस्तू याव्यात आणि कोणत्या वस्तू बाहेर जाव्यात हे ठरवण्याचे सर्वाधिकार गॉस्प्लानलाच असतात. संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार न करता जर सामूहिक शेतीसंस्थांनी शेतीची अवजारे अमेरिकेमधून, विद्युत् कारखान्यांनी आवश्यक ती यंत्रसामुग्री जर्मनीमधून, कापडगिरण्यांनी त्यांना लागणाऱ्या चाती इंग्लंडमधून आणायचे ठरवले तर सगळेच मुसळ केरात जाईल. संपूर्ण उत्पादनाबद्दल गॉस्प्लानकडे एक योजना असते आणि विदेश व्यापार या योजनेचाच एक भाग असतो. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विविध गरजांचा विचार न करता स्वतःला हव्या त्या वस्तूंची खरेदी-विक्री करण्याचे अधिकार वेगवेगळ्या गटांना देता येत नाहीत. म्हणूनच ज्याप्रमाणे बँका, रेल्वे आणि इतर सर्वसाधारण उत्पादनसाधनांवरील नियंत्रणाची तरतूद योजनेमध्ये केलेली असते, त्याचप्रमाणे विदेश-व्यापारावरील शासनसंस्थेच्या एकाधिकारशाहीची तरतूदही त्यात केलेली असते.

फ्रेंच क्रांतीच्या वेळी बॅब्यूफनी जेव्हा कम्युनिस्ट शासनसंस्थेची योजना केली होती तेव्हा त्यांनाही विदेश-व्यापारावरील शासनसंस्थेच्या एकाधिकारशाहीची गरज भासली होती ही उल्लेखनीय गोष्ट आहे. "परदेशांबरोबरील खाजगी व्यापारावर बंदी घालण्यात येईल. राष्ट्रातील सर्व नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने देशामध्ये अशा प्रकारे येणाऱ्या वस्तू जप्त करण्यात येतील. राष्ट्राला ज्या वस्तूंची गरज भासेल त्या वस्तू शासनसंस्था देशातील वरकड उत्पादनाच्या विनिमयातून मिळवील."

परंतु समाजवादी नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेचा एक मूलभूत भाग म्हणून विदेश-व्यापारावर एकाधिकारशाही असूनही सोव्हिएट युनियनच्या सरकारला आयात-निर्यातीमध्ये कोणत्या वस्तू असाव्यात आणि एकंदर विदेश-व्यापार किती असावा यावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे शक्य नव्हते. आणि जोपर्यंत योजनाविरहित अर्थव्यवस्था असलेल्या परकीय देशांशी त्यांना व्यवहार करावा लागतो तोपर्यंत असे नियंत्रण ठेवणे त्यांना कधीच जमणार नाही. रशियामध्ये घडणाऱ्या गोष्टींवर रशियन लोकांचे नियंत्रण असले तरी जगामध्ये इतरत्र घडणाऱ्या गोष्टींवर ते नियंत्रण ठेवू शकत नाहीत. पंचवार्षिक योजना राबवताना ही वस्तुस्थिती त्यांना चांगलीच उमगली.

काही विशिष्ट प्रकारची यंत्रसामुग्री परदेशांमधून विकत घेण्याचे गॉस्प्लानने ठरवले होते. त्यावेळी प्रचलित असलेल्या किंमती लक्षात घेऊन या यंत्रसामुग्रीकरता त्यांनी परदेशात मागणी नोंदवली होती आणि त्यानुसार काही वर्षांच्या कालावधीसाठी

देशांतर्गत उत्पादनाचा काही भाग निर्यातीकरता राखून ठेवला होता.

आपल्याला हव्या असलेल्या वस्तूंसाठी त्यांनी करार केला होता आणि त्याची किंमत मोजण्यासाठी योग्य ती तरतूदही केली होती. सगळे काही टीकठाक होते.

परंतु या कराराच्या कालावधीतच १९२९ च्या आर्थिक अरिष्टाचे भूत भांडवली देशांच्या मानगुटीवर बसले. रशिया ज्या वस्तूंची निर्यात करत होता त्या वस्तूंच्या किंमती धडाधड कोसळल्या. ज्या यंत्रसामुग्रीची मागणी केली होती त्यासाठी १०,०००,००० डॉलर्स मोजण्याचा करार गॉस्प्लानने केला होता असे धरून चालू. त्याच्या मोबदल्यात खालील वस्तूंची निर्यात करण्याचे गॉस्प्लानने ठरवले होते असेही धरून चालू.

तक्ता १२

२,०००,०००	बुशेल्स गहू	प्रति बुशेल १ डॉलरप्रमाणे	२,०००,००० डॉलर
१,०००,०००	फर कातडी	प्रत्येकी ३ डॉलरप्रमाणे	३,०००,००० डॉलर
२,५००,०००	बॅरल तेल	प्रति बॅरल २ डॉलरप्रमाणे	५,०००,००० डॉलर
		एकूण...	१०,०००,००० डॉलर

आता जर आर्थिक अरिष्टामुळे गव्हाची किंमत ५० सेन्ट्सवर उतरली, तर जवळपास फुकट विकल्याशिवाय लोक फरकातडी विकत घेणार नाहीत आणि तेलाची किंमत न भूतो न भविष्यति अशी घसरली.

या परिस्थितीमध्ये सोव्हिएट सरकार काय करू शकणार होते? त्यांना यंत्रसामुग्रीची गरज होती आणि निर्यात करूनच त्याची भरपाई करणे त्यांना शक्य होते. (करारनामा जरी पूर्वीच्या किंमतींवर केलेला नसला तरीही रशिया विकत असलेल्या वस्तूंच्या प्रमाणात किंवा तितक्या वेगाने औद्योगिक वस्तूंच्या किंमती घसरल्या नसल्यामुळे अशीच परिस्थिती ओढवली असती.) योजनेत टरवलेल्या निर्यातीपेक्षा जवळपास दुप्पट निर्यात करणे त्यांना भाग पडले. रशियन जनतेला असे सांगण्याची पाळी सरकारवर आली : "पोटाला अधिकच चिमटा घेणे तुम्हाला आता भाग आहे. त्या भांडवलदारांनी इतका सावळा-गोंधळ घातला आहे की जागतिक किंमती धडाधड कोसळत आहेत, त्यामुळे आपल्या गव्हाची किंमत निम्मी झाली आहे. तेव्हा आपल्या गरजा भागवण्यासाठी दुप्पट निर्यात करणे आपल्याला भाग आहे."

ढोबळमानाने अशा घटना घडून आल्या. देशांतर्गत आर्थिक अरिष्ट उद्‌भवू नये यास्तव नियोजन करणाऱ्या सोव्हिएट युनियनला भांडवली देशांमधील आर्थिक संकटाच्या परिणामांना तोंड द्यावे लागले. रशियाबाहेरील आर्थिक अरिष्टामुळे रशियांतर्गत योजनेमध्ये असमतोल निर्माण झाला.

परंतु अंतर्गत घटकांमुळे निर्माण होणारे असमतोल त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे आहेत. त्यातील काहींचे नियंत्रण करता येते तर काही नियंत्रणाबाहेर असतात. जेव्हा सर्व आर्थिक व्यवहार जाणीवपूर्वक नियोजित केलेले असतात, तेव्हा प्रत्येक भाग दुसऱ्या भागाला जोडलेला असतो. त्यामुळे एका चक्राचा एक दाता सटकला तर सर्व चक्रांवर

त्याचा परिणाम होतो. समजा, रशियातील कापसाचे बहुतेक पीक कीड लागून नष्ट झाले. त्याचा कापडगिरण्यांवर तात्काळ परिणाम होईल. कापसाची निर्यात करावी असे जर योजनेमध्ये ठरवलेले असेल तर विदेश-व्यापारावर त्याचा परिणाम होईल. जर अपेक्षेपेक्षा कमी प्रमाणात बाजारपेठेमध्ये कापडाचा पुरवठा झाला तर वेतन आणि किंमती यांमधील परस्परसंबंधावर त्याचा परिणाम होईल. "राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या परस्परसंबंधांमुळे योजनेतील एका आघाडीवर माघार घेण्याचा किंवा साखळीतील एक दुवा निखळण्याचा परिणाम इतर सर्व आघाड्यांवर होतो. मग ज्या विभागातील काम सुरळीतपणे चालले असेल त्यांनाही परिणाम भोगावाच लागतो. योजनेच्या एका भागामध्ये जर असमतोल निर्माण झाला तर सुसंगती साधण्यासाठी इतर भागांमध्ये फेरबदल करावे लागतात."

सोव्हिएट अर्थतज्ज्ञांना ही गोष्ट अनुभवावरून ध्यानात आली. म्हणजे येथे धोका आहे आणि त्यावर उपाययोजनाही आहे. एखाद्-दुसऱ्या धक्क्यातून सावरण्यासाठी आधीच पावले उचलण्याची तरतूद नियोजनकारांना करावी लागली. वेगवेगळ्या उत्पादन-क्षेत्रातील पूर्वीचे चढउतार लक्षात घेऊन त्या आधारे काय घडू शकेल त्यांना याचा अंदाज बांधावा लागतो. परंतु हे पुरेसे नसते. गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडल्या नाहीत तर त्यांना 'सुसंगत फेरबदल' करण्याची तयारी ठेवावी लागते.

असे सुसंगत फेरबदल कागदावर सोपे वाटतात, परंतु ते व्यवहारात उतरवणे कठीण असते. आर्थिक व्यवहाराच्या विविध क्षेत्रांमध्ये सुसूत्रता नसण्याची किंमत रशियन लोकांना पुनः पुन्हा मोजावी लागली. वेब्जनी दिलेले एक उदाहरण पहा : "(गॉर्की येथील मोटारी बनवण्याच्या) कारखान्याचे उद्घाटन १ मे १९३२ रोजी होणार असल्याबद्दल प्रचंड बोलबाला झाल्यानंतर तो सगळा प्रकल्प ठप्प झाला. डेट्रॉइट येथील फोर्ड कारखान्याच्या धर्तीवर उभारलेल्या महाकाय इमारती महागड्या यंत्रसामुग्रीने सुसज्ज करण्यात आल्या होत्या. हजारोंच्या संख्येने कामगारांची भरती करण्यात आली होती...परंतु सरकपट्ट्याने पुढे सरकायला नकार दिला. ज्या ओट्याच्या आधारावर हा पट्टा बसवला होता त्या ओट्याचा पाया कमकुवत होता, त्यामुळे तो ओटा जागोजागी खचला होता...परंतु तो पट्टा चालूनही फारसा उपयोग नव्हता. कारण तो अजस्र पट्टा पुढे सरकताना त्यावर मांडण्यासाठी वेळोवेळी लागणारे विविध सुटे भागच पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हते."

अकार्यक्षमतेचे, दिशाहीनतेचे, सूत्रहीनतेचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. परंतु राष्ट्रीय नियोजनावरच याबद्दलचे सारे खापर फोडणे योग्य ठरेल का? किंबहुना उद्योगधंदे उभारण्यामधील रशियन लोकांच्या अपुऱ्या अनुभवाचेच हे द्योतक नाही का? यापासून रशियन लोक योग्य धडा लौकरच शिकले आणि आता रशियामध्ये उभारण्यात येणारे कारखाने ठरलेल्या दिवशी व्यवस्थित चालू होतात अशी माहिती वेब्ज यांनी दिली आहे. अमेरिकेमधे जर राष्ट्रीय नियोजनाचा अवलंब करण्यात आला तर गोष्टी सुसूत्रपणे हाताळल्या जातील याबद्दल शंकाच नको. यु. एस. स्टील कॉर्पोरेशनच्या अधिपत्या-खालील केवळ दोन कंपन्याच "इंग्लंड आणि जर्मनी या दोन देशांच्या १९३४ मधील

पोलाद उत्पादनाइतके पोलाद उत्पादन करू शकतात. " असा निर्वाळा 'फॉर्च्युन'च्या संपादकांनी दिला आहे. व्यवस्थित सूत्रचालन करण्याची क्षमता आज आपल्याकडे आहे याबद्दलचा हा पुरावा पुरेसा आहे. तसे नसते तर औद्योगिक संघटन करण्यामधील अत्यंत कठीण प्रश्न उकलण्याची क्षमता यु. एस. स्टील कॉर्पोरेशनकडे येऊच शकली नसती. म्हणूनच वेगवेगळ्या मुख्य भागांना एकत्रित करणे मोठे काम आहे आणि त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर नियोजन करणे अशक्य आहे हा दावा बिनबुडाचा आहे.

पण राष्ट्रीय नियोजनाविरुद्ध आणखीही काही मुद्दे उपस्थित केले जातात. "सामाजिक राष्ट्रीय नियोजन" या शब्दप्रयोगातील "सामाजिक" या शब्दाबद्दल एक, तर "राष्ट्रीय नियोजन" याबद्दल दुसरा मुद्दा उपस्थित केला जातो.

नफा कमावण्याची प्रेरणा अस्तित्वात नसल्यामुळे, नव्या पद्धतींचा अवलंब करण्याची, धोके पत्करण्याची, स्वतःचे कौशल्य पणाला लावण्याची लोक धडपड करत नाहीत आणि त्यामुळे समाजवादाचे गाडे पुढे सरकत नाही, आर्थिक व्यवहार ठप्प होतो, असा युक्तिवाद केला जातो.

असले युक्तिवाद निरर्थक आहेत असे रशियन लोकांना वाटते. भांडवली समाजामध्ये, नफा न मिळणारे आणि केवळ मजुरीवर अहोरात्र राबणारे लोकच बहुतेक कामे करतात, असे ते दाखवून देतात. स्वतःचे पोट भरणे भागच असल्यामुळे बहुतेक लोक काम करतात. रशियात काय किंवा भांडवली देशांमध्ये काय, ही गोष्ट सगळीकडेच लागू होते. त्यात भर म्हणून रशियामध्ये (कर्तव्याचे) सामाजिक दडपण, समाजातील मानसन्मान आणि चांगल्या कामगारांना मिळणारी आदराची वागणूक यामुळे स्वतःचे कौशल्य पणाला लावण्यास कामगारांना प्रोत्साहन मिळते. भांडवली समाजात मिळणाऱ्या प्रोत्साहनापेक्षा समाजवादी समाजात मिळणारे प्रोत्साहन अधिक उत्पादक असते असे समाजवाद्यांचे म्हणणे आहे. (येथे समाजवादी याचा अर्थ मार्क्सवादी असा होतो.) आर्थिक आघाडीवरील एखादी ढासळती बाजू सावरण्यासाठी स्वखुशीने विनामोबदला काम करणाऱ्या कामगारांबद्दल रशियन लोकांना रास्त अभिमान आहे. अशा तऱ्हेने काम करणाऱ्या "सबोट्निक्स"बद्दल गौरवोद्गार काढताना लेनिननी १९१९ साली लिहिले :

"या कम्युनिस्ट 'सबॉट्निक्स'चे ऐतिहासिक महत्त्व फारच मोठे आहे.... नवी सामाजिक घडी बसवण्याच्या प्रक्रियेमध्ये अंतिमतः श्रमाच्या उत्पादकतेचे स्थान लाख मोलाचे आहे. सरंजामशाहीला टाऊकही नव्हती एवढ्या प्रमाणावर भांडवलशाहीने श्रमाची उत्पादकता वाढवली. समाजवादामध्ये श्रमाची उत्पादकता यापेक्षाही फार मोठ्या प्रमाणावर वाढते या सत्यपरिस्थितीमुळेच अखेर भांडवलशाही उलथवणे शक्य होईल... या सगळ्या प्रक्रियेसाठी बराच काळ लोटावा लागेल... स्वखुशीने, जाणीवपूर्वक एकजुटीने काम करणाऱ्या कामगारांनी प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे श्रमाची उत्पादकता भांडवलशाहीपेक्षा अपरिमित प्रमाणात वाढते आणि साम्यवाद साकार होतो."

श्रमाची उत्पादकता वाढवण्याचा, "समाजवादी स्पर्धा" हा आणखी एक उपाय आहे. उत्पादन वाढवण्यासाठी मैत्रीच्या भावनेने कामगारांचे वेगवेगळे गट एकमेकांशी स्पर्धा

करतात. स्पर्धा संपली की जगामध्ये इतर कुठेही न घडणारा प्रकार रशियामध्ये घडतो. जिंकणारा गट हरलेल्यांना मदत करतो आणि पुढच्या वेळी कसे जिंकायचे ते सांगतो. म्हणजे नफा मिळणार नसतानाही लोक काम करतात! अर्थातच, समाजवादी नियोजन-बद्ध अर्थव्यवस्थेमध्ये चांगल्या कामाला बोनस, भरपगारी सुट्या वगैरेसारखी बक्षिसे मिळू नयेत असे रशियन लोकांना मुळीच वाटत नाही. अशा गोष्टी रशियामधील आर्थिक व्यवहाराचा नित्याचाच भाग आहे.

नफ्याची प्रेरणा नसतानाही काम करायला लोकांना उद्युक्त करण्यामध्ये रशियन लोकांना यश मिळू लागले आहे या बाबतीत कमीत कमी 'मॅन्चेस्टर गार्डियन'ची तरी चांगलीच खात्री पटलेली आहे. २० फेब्रुवारी १९५६ च्या अंकामधील संपादकीय म्हणते : "सामूहिक मालकी चांगलीच टिकली असून श्रम करण्यासाठी नव्या प्रकारचा उत्साह आणि उमेद तयार करण्यामध्ये ती यशस्वी झाली आहे हे शंकेखोर जगालाही मान्य करावे लागेल. एखाद्या द्रष्ट्याने नाही तर प्रचलित मानलेला हा समाजवाद नसेल, परंतु [सामूहिक मालकीवर आधारलेली.] ही व्यवस्था चांगली जोमात चालली आहे."

स्पर्धेअभावी वेगवेगळे प्रयोग करण्यास, धोका पत्करण्यास, नव्या पद्धतींचा वापर करण्यास लोक उद्युक्त होणार नाहीत या युक्तिवादाला उत्तर देताना रशियन लोक म्हणतात, "हातच्या कांकणाला आरसा कशाला?" वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रयोगांवर जेवढा पैसा आणि परिश्रम रशियात खर्च केले जातात तेवढे इतरत्र कुठेही केले जात नाहीत हे ते दाखवून देतात. आर्थिक व्यवहारावर संपूर्ण नियंत्रण **असल्यामुळेच** नव्या कल्पना, नव्या पद्धती यांचा अवलंब करण्याचा धोका ते पत्करू शकतात, याउलट एकमेकांशी स्पर्धा करणारे भांडवली उद्योग अनेकदा असे धाडस करत नाहीत. त्यांच्या या युक्तिवादाला तज्ज्ञांनी पाठिंबा दिला आहे : "छोट्या मोठ्या गोष्टींमध्ये पुढाकार घेण्याबाबत कांकू करणे या नव्या प्रयोगांचा धोका पत्करण्याबद्दल बाऊ करणे तर दूरच राहू द्या, उलट सर्व क्षेत्रांमध्ये धडाक्याने पुढे जाण्याची वृत्ती सोव्हिएट कम्युनिझमने दाखवलेली दिसते ... उद्योगधंदे, विज्ञान, कला, सामाजिक संस्था, हरएक क्षेत्रामध्ये साहस आणि नाविन्य याबद्दल जी आत्यंतिक ओढ सोव्हिएट युनियनमध्ये दिसून येते तिचे प्रमाण अमेरिके-पेक्षाही जास्त असल्याचे रशियाच्या कोणत्याही अभ्यासकाला हमखास जाणवते."

राष्ट्रीय नियोजनाला अर्थतज्ज्ञ वेगळ्याच प्रकारची हरकत घेतात. जिथे राष्ट्रीय नियोजन असते तिथे खुली बाजारपेठ नसते; खुली बाजारपेठ नसते तिथे किंमतींची विशिष्ट चौकट असत नाही; अशी चौकट नसल्यास तर्काधिष्ठित अर्थव्यवस्थेला रामराम ठोकावा लागतो; मागणी-पुरवठ्याच्या सापेक्ष तुटीवरून किंमती ठरतात आणि या किंमतींची चौकट अस्तित्वात नसल्यास वस्तूंच्या उत्पादनाविषयीचे निर्णय घेतल्यास काहीच आधार उरत नाही. यामुळे फारशी निकड नाही अशा गोष्टींचे उत्पादन होऊन आवश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. कारण दिशा दाखवण्यास किंमतींची चौकट तेथे नसल्यामुळे प्रचंड गोंधळ निर्माण होईल, अर्थव्यवस्थेचा बोजवारा उडेल असा युक्तिवाद अर्थतज्ज्ञ करतात. दूर पल्ल्याचा विचार करता, भांडवली व्यवस्थेमध्ये बाजारभावांमुळे उत्पादनाची दिशा निश्चित होते. एखाद्या वस्तूला अधिक मागणी असल्यास किंमती

वाढतात, मागणी कमी असल्यास किंमती उतरतात म्हणजे लोकांच्या गरजानुसारच उत्पादन केले जाते. अशी किंमतीची चौकट अस्तित्वात नसेल, तर लोकांच्या गरजा भागवण्यासाठी भांडवलाची गुंतवणूक नेमकी कुठे करावी हे कसे ठरवता येईल, असा सवाल अर्थतज्ञ करतात.

या टीकेला राष्ट्रीय नियोजनकार काय उत्तर देतात? किंमतींच्या चौकटीच्या दगडाला चढवलेला देवत्वाचा शेंदूर खरवडून काढण्यापासूनच ते सुरुवात करतात. लोकांच्या गरजानुसार नव्हे, तर काही लोकांच्या पैसे मोजण्याच्या कुवतीवरून किंमती निश्चित होतात असा युक्तिवाद ते करतात. स्वतःला लागणाऱ्या वस्तूंसाठी पैसे मोजण्याची कुवत असलेल्याच लोकांच्या गरजा भागवण्याचे काम किंमतींच्या चौकटीचे असते असे ते दाखवून देतात.

यापुढे जाऊन ते असे म्हणतात की भांडवली व्यवस्थेत साधनसामुग्रीच्या सुयोग्य वापराला दिशा देणारे बाजारभाव, वेगवेगळ्या प्रकारच्या जकाती, सवलती, मक्तेदारी वगैरेंमुळे बऱ्याच प्रमाणात बदललेले असतात. म्हणजेच किंमतींच्या प्रक्रियेमधून सर्व काही सुरळीतपणे घडते अशी भांडवली व्यवस्था प्रत्यक्षात कुठेच नसते, ती केवळ भांडवली अर्थतज्ञांच्या पुस्तकांमध्ये असते. सगळ्या गोष्टी जर सुरळीत चालल्या असत्या तर आर्थिक अरिष्टे उद्भवलीच नसती.

परंतु केवळ दुसऱ्यांचा शेंदूर खरवडूनच राष्ट्रीय नियोजनकार थांबत नाहीत. मागणीला पुरेसा पुरवठा करण्यासाठी आपल्यापाशी मार्ग उपलब्ध आहेत हे ते दाखवून देतात. देशातील कानाकोपऱ्यातून दर दिवशी, दर आठवड्याला, दर महिन्याला गॉस्प्लानकडे माहिती जमा होत असते आणि लोकांच्या गरजा व वेगवेगळ्या गोष्टींची उपलब्धता यातील संबंध त्यातून स्पष्ट होतो. समजा, वीस लाख बुटांचे जोड आणि पाच लाख नवी घरे यांची सोय करण्याची योजनेत तरतूद आहे. परंतु पुरेसे बुटांचे जोड उपलब्ध नाहीत, आणि नव्या घरांमध्ये जाण्यासाठी लोक काही फारसे उत्सुक नाहीत, अशा तक्रारी आल्या तर योजनेमध्ये बदल करता येतो. आधीच्या प्रत्येक गोष्टीला चिकटून राहिलेच पाहिजे असा काही नियम नाही. अधिक घरे बनवण्याऐवजी अधिक बुटांचे जोड तयार करण्याकडे, श्रम आणि उत्पादनसाधने यांचा ओघ वळवता येईल. अगदी एका झटक्यात नव्हे, पण भांडवली समाजाइतक्या वेगाने तरी हे नक्कीच घडू शकेल.

पण भांडवली टीकाकार आणखीही काही शंका उपस्थित करतात. स्वयंचलित माग आणि कोळसा खणण्यासाठी विद्युत्चलित यंत्रे या दोन्ही गोष्टी घेण्यासाठी पुरेसा पैसा उपलब्ध नसेल, तर गॉस्प्लान काय निर्णय घेईल? एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या उद्दिष्टांपैकी कशाच्या पूर्तीसाठी मर्यादित साधनसामुग्रीचा वापर करायचा हे ठरवणे केंद्रीय व्यवस्थापनाला **भागच पडेल.** ही गोष्ट रशियन लोकांना मान्य करावीच लागते. समाजवादी राष्ट्रीय नियोजन आणि खुली बाजारपेठ एकत्र नांदू शकत नाहीत आणि खुल्या बाजारपेठेच्या अभावामुळे उपलब्ध साधनसामुग्रीचा अगदी सुयोग्य उपयोग होत नसला तरीही इतर अनेक गोष्टी त्यामुळे मिळतात असा त्यांचा दावा आहे. बहुजन समाजाचे शोषण न होणे, त्यांना चांगल्या जीवनाची शाश्वती मिळणे आणि

समाजामध्ये समानता प्रस्थापित होणे या गोष्टी मूठभरांना मिळणाऱ्या प्रचंड नफ्यापेक्षा जास्त महत्त्वाच्या आहेत असे त्यांना वाटते. एकाच समाजामध्ये " दोन राष्ट्रे " अस्तित्वात असण्यापेक्षा संपत्तीचे शक्य तितके समान वितरण त्यांना अधिक हितावह वाटते. योजनाशून्य अर्थव्यवस्थेच्या तेजी आणि मंदी यांच्या चक्रापेक्षा, त्यातून उद्‌भवणाऱ्या आर्थिक अरिष्टांपेक्षा नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेमध्ये सुरक्षित, सुसंस्कृत आणि सुविहीत जीवन जगणे ते अधिक पसंत करतात.

१९२९ साली उद्‌भवलेले आर्थिक अरिष्ट सर्व जगाला ग्रासणारे मानले जाते. त्यावेळी उत्पादनप्रक्रियेत झालेला बिघाड आणि त्यामुळे उद्‌भवलेल्या बेकारी व दैन्यावस्था या राहूकेतूंनी पृथ्वीतलावरील सर्व जनतेला ग्रासल्याचे सांगण्यात येते. परंतु हे खरे नसल्याचे रशियन लोक दाखवून देतात. या अरिष्टाने उंच उफाळणाऱ्या लाटांप्रमाणे एक सोडून इतर सर्व देशांना पोटात घेतले. रशियाच्या सीमारेषेवर या लाटांनी धडका दिल्या, पण त्यांना माघार घ्यावी लागली. समाजवादी नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेच्या बंधाऱ्याआड रशियन लोक सुरक्षित राहिले.

हे प्रकरण लिहिले जात असताना सोव्हिएट युनियनची नवी घटना पूर्ण झाल्याची बातमी हाती आली आहे. ही नवी घटना तात्काळ अंमलात आणण्यात आली नाही. चर्चा, टीकाटिप्पणी आणि आवश्यक फेरबदल यासाठी सोव्हिएट युनियनमधील सर्व लोकांसमोर ती सादर करणे आवश्यक होते. या घटनेच्या पहिल्या मसुद्यामधील काही महत्त्वाची कलमे अशी आहेत :

" कलम १ : युनियन ऑफ सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक्स ही कामगार व शेतकरी यांची शासनसंस्था आहे.

" कलम ४ : भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये असलेली उत्पादनसाधनांची खाजगी मालकी नष्ट करून, माणसाकडून होणारे माणसाचे शोषण संपुष्टात आणून, उत्पादन-साधनांवर प्रस्थापित करण्यात आलेली समाजवादी मालकी हा सोव्हिएट युनियनचा आर्थिक पाया आहे.

" कलम ११ : सोव्हिएट युनियनमधील आर्थिक व्यवहार राष्ट्रीय पातळीवरील शासकीय आर्थिक नियोजनातून निश्चित केले जातात. सार्वजनिक मालमत्ता वाढवून, श्रमिकांची भौतिक आणि सांस्कृतिक पातळी सतत वाढावी आणि सोव्हिएट युनियनचे स्वातंत्र्य व संरक्षणव्यवस्था या गोष्टींना मजबुती आणावी या दृष्टीने या नियोजनाची आखणी केली जाते.

" कलम ११८ : सोव्हिएट युनियनच्या नागरिकांना निश्चित काम मिळण्याचा आणि कामातील कौशल्य व एकूण काम या नुसार पैसे मिळण्याचा हक्क आहे.

" राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या समाजवादी पायावर केलेल्या उभारणीमुळे सोव्हिएट समाजात उत्पादनशक्तीत सतत वाढ, आर्थिक अरिष्टे व बेकारी यांचा नायनाट आणि लोकांना काम करण्याचा हक्क या गोष्टींची हमी मिळते. "

◇ ◇ ◆

२२

साखरेचा मोह त्यांना टाळता येईल का ?

समृद्धी असूनही दारिद्र्याचा सामना करण्याची पाळी पाश्चिमात्य देशांवर आली होती.

त्याबद्दल काय करता येणे शक्य होते ?

भांडवलशाहीमध्ये उद्भवलेल्या बिघाडामधून निर्माण झालेला सावळागोंधळ दूर करून सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी काहीतरी करणे आवश्यकच होते. अरिष्टाचे स्वरूप सार्वत्रिक होते—पतपुरवठायंत्रणा कोलमडली होती, उद्योगधंदे लुळेपांगळे झाले होते, लाखो माणसे बेकार झाली होती, शेतकरी देशोधडीला लागले होते, सगळीकडे समृद्धी असूनही दारिद्र्याचा घाला आला होता. या सगळ्यावर काही तरी तोडगा काढणे अत्यावश्यक झाले होते. जुनी व्यवस्था खुल्या व्यवहारावर आधारित होती आणि ती भुईसपाट झाली होती. बदलाचे वारे वाहू लागले होते. खुल्या व्यवहाराच्या जागी सुसंबद्ध नियमन आणि नियंत्रण आणणे निकडीचे बनले होते. आर्थिक व्यवहार भरधाव वारूसारखे मोकळे सोडल्यामुळे तोंडघशी पडायची पाळी आली होती. त्या वारूला लगाम घालून दिशा दाखवणे अगत्याचे झाले होते.

" आपल्याला नियोजन केलेच पाहिजे ! "

समृद्धी असूनही दारिद्र्याचे दशावतार पाहण्याची पाळी आलेल्या पाश्चिमात्य देशांनी रशियाप्रमाणे नियोजनाकडे आपला मोहरा वळवला. पण दोहोंमध्ये फरक होता.

सोव्हिएट युनियनमध्ये उपभोगासाठी उत्पादन करण्यात येते, तर भांडवली देशांत नफ्यासाठी उत्पादन करतात. सोव्हिएट युनियनमध्ये उत्पादनसाधनांच्या खाजगी मालमत्तेला मूठमाती देण्यात आली आहे, तर भांडवली देशांत उत्पादनसाधनांची खाजगी मालमत्ता अत्यंत पवित्र समजली जाते. सोव्हिएट युनियनमधील नियोजन सर्व-समावेशक आहे, सर्व आर्थिक क्षेत्रांना सामावणारे आहे; तर भांडवली देशांमधील नियोजन म्हणजे जुन्या कपड्यांना ठिगळे लावण्याचाच प्रकार आहे. तेथे एका आर्थिक क्षेत्रामध्ये नियोजन करताना दुसऱ्या क्षेत्राचा विचारच केला जात नाही. सोव्हिएट युनियनमध्ये

ग्राहकच ग्राहकांसाठी नियोजन करतात; तर भांडवली देशांमध्ये उद्योजक उद्योजकांसाठी नियोजन करतात.

समृद्धी असूनही दारिद्र्याचा सामना करण्याची पाळी आल्यावर, हा प्रश्न सोडवण्यासाठी भांडवली देशांनी एक योजना आखली.

समृद्धीच नामशेष करण्याची ती योजना होती.

वृत्तपत्रांतील ते मथळे आठवा : “कापसाच्या लागवडीत कपात,” “हजारो डुकरांचे शिरकाण,” “गव्हाखाली असलेल्या जमिनींमध्ये घट”, “ऊसमळेवाल्यांनी साखरेचे उत्पादन कमी केले.” या सर्व गोष्टी योजनेनुसारच करण्यात येत होत्या. अमेरिकेमधील हजारो उत्पादकांबरोबर ॲग्रिकल्चरल ॲड्जस्टमेंट ॲडमिनिस्ट्रेशनने (ए. ए. ए.) [ती–तडजोड व्यवस्थापन] कापूस, गहू, मका, डुकरे, तंबाखू, साखर याबाबत करार केले. **समृद्धी नामशेष करण्याच्या** योजनेमध्ये सहभागी होण्यास जे उत्पादन तयार होते त्यांना उत्पादन कमी करण्याबद्दल पैसे देण्यात आले.

इतर देशांमध्येही अशाच प्रकारच्या विध्वंसाच्या किंवा नियंत्रण–योजना अंमलात आणण्यात आल्या. ३ जुलै १९३६ च्या ‘न्यूयॉर्क टाइम्स’च्या अंकामध्ये दक्षिण अमेरिकेसंबंधी अशी बातमी आहे :

ब्राझील ३० टक्के कॉफी उत्पादन नष्ट करणार.
प्रत्येक पोत्यामागे उत्पादकांना ५ मिलिरिज मिळणार.
सरकारने ६६ लाख पोती ताब्यात घेतली.

रिओ द जानेरो, जुलै २ : १९३६–३७ साली कॉफीचे उत्पादन २ कोटी २० लाख पोती होईल असा अंदाज आहे. तसेच गेल्या वर्षीच्या पिकातील ४० ते ५० लाख पोती शिल्लक आहेत. म्हणून ३० टक्के कॉफी नष्ट करण्यात यावी असे नॅशनल कॉफी डिपार्टमेंटने ठरवले आहे. नष्ट केलेल्या कॉफीच्या प्रत्येक पोत्यामागे उत्पादकांना पाच मिलरिज रक्कम देण्यात येईल.

समुद्रापलीकडे, युरोपमध्येही तेच चालले आहे. इंग्लंडमधील पहिल्या पानावरची ही बातमी पहा :

अमेरिकेप्रमाणेच ब्रिटन उत्पादनकपात करणार;
किंमती वाढवण्यासाठी कापड–उत्पादन गोठवावे असे विधेयक
चार्ल्स् सेल्डेन यांजकडून

लंडन, फेब्रुवारी ४ – कापडधंद्यातील अतिरिक्त यंत्रसामुग्री बाद करण्यासंबंधीच्या विधेयकाचे आज लोकसभेमध्ये दुसरे वाचन करण्यात येईल. या विधेयकाच्या मंजुरीबरोबरच .... किंमती वाढवण्यासाठी कायद्यानेच उत्पादन कमी करण्याच्या अध्यक्ष रुझवेल्ट यांच्या धोरणाचेच ग्रेट ब्रिटन आता अनुकरण करत आहे. ....

या देशातील नौकाबांधणी आणि कोळसा उद्योगात यापूर्वी अतिरिक्त उत्पादन कमी करण्याचे प्रयत्न झालेले आहेत, परंतु या प्रयत्नांमागे कायद्याचे बळ नव्हते. ही गोष्ट कापडधंद्यातील यंत्रसामुग्रीविषयक नव्या कायद्यामुळे आता साध्य होणार आहे. संपूर्ण कापडउद्योगाचे हितसंबंध लक्षात घेऊन आवश्यकते-पेक्षा अधिक चात्या बाजूला काढून त्या खरेदी करण्याचा अधिकार सरकारच्या एका मंडळाला या कायद्याद्वारे मिळणार आहे.....

तात्पुरत्या अंदाजानुसार धंद्यामध्ये वापरत असलेल्या चात्यांपैकी एक चतुर्थांश म्हणजे सुमारे १ कोटी चात्या अशा रीतीने निकालात काढल्या जातील.....

लॅन्केशायरच्या बहुतेक उद्योगपतींचा या विधेयकाला पाठिंबा आहे. परंतु कामगार आणि लेबर पार्टीचे लोकसभेतील सभासद त्याला विरोध करत आहेत. या प्रकारामुळे ज्या लोकांना नोकऱ्या गमवाव्या लागणार आहेत त्यांच्यासाठी काहीच तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

पण हे कशासाठी ?

समृद्धी नष्ट करणाऱ्या या योजनांचे उद्दिष्ट काय आहे ?

नफा मिळवणे हेच खुल्या व्यवहारावर विश्वास असणाऱ्या भांडवलशाहीचे उद्दिष्ट होते हे आपण पाहिले आहे. खुल्या व्यवहारावर आधारलेल्या भांडवलशाहीमध्ये बिघाड निर्माण झाल्यामुळे नियोजन करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या नियोजनबद्ध भांडवलशाहीचे उद्दिष्टही नफा कमावणे हेच आहे. उपभोगापेक्षा उत्पादन अधिक असलेल्या, मुबलकता असलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये, पुरवठ्यावर नियंत्रण ठेवूनच हे करता येते. उपभोगासाठी अधिक वस्तू निर्माण केल्या तर किंमती खाली येतील. याउलट, उत्पादनावर नियंत्रण प्रस्थापित करून किंमती व नफाही वाढवता येतो. म्हणजेच तुटवडा निर्माण करण्याकरता केलेले नियोजन असेच भांडवली नियोजनाचे स्वरूप आहे.

हे खरे असल्यामुळेच स्टोलबर्ग आणि विन्टन यांनी 'न्यू डील'बाबत [नवा करार] घेतलेल्या आक्षेपामध्ये बरेचसे तथ्य आहे : "एखाद्या भूकंपासारखाच परिणाम या 'न्यू डील'ने केला आहे. अमेरिकेच्या या किनाऱ्यापासून त्या किनाऱ्यापर्यंत सगळी-कडे, तुटवडा निर्माण करण्याचे आणि सर्वांना बड्या उद्योगपतींच्या दावणीला बांधण्याचे काम एखाद्या जबरदस्त भूकंपाने अत्यंत परिणामकारक पद्धतीने केले असते; आणि 'न्यू डील'पेक्षा अधिक झपाट्याने व कमी बोलबाला करून हे काम उरकले असते."

भांडवली नियोजनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. भांडवली नियोजन म्हणजे ठिगळे लावण्याचाच प्रकार आहे.

वॉशिंग्टनमध्ये एन. आर. ए. चे काम चालले होते तेव्हा 'अमेरिकन गार्डियन' या वृत्तपत्राच्या ऑस्कर अमेरिंगर या अत्यंत धूर्त संपादकासंबंधी एक अत्यंत मनोरंजक

पण तितकीच बोधपर कथा प्रचलित होती. एन. आर. ए. च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कचेरीतील सकाळच्या कामकाजावर ते अत्यंत बारीक नजरेने देखरेख करीत. आपले धंदे डबघाईला आल्याच्या कथा सांगणारे उद्योगपती त्या कचेरीत सतत येत असल्याचे त्यांना दिसे. त्यांच्या भुईसपाट झालेल्या धंद्यांना पुन्हा उभे करण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या "योजना" त्यांच्या कानावर पडत. काही तास हे सगळे प्रकार शांतपणे पाहिल्यावर त्यांना राहवेनासे झाले. ते तिरीमिरीत उठले आणि त्या अधिकाऱ्यावर खेकसले : "रोग्याला झाला आहे देवीचा रोग आणि तुम्ही प्रत्येक पुटकुळीवर इलाज करत बसला आहात!"

संपूर्ण राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे सर्वसमावेशक नियोजन करण्याची गरज आहे असे श्री. अमेरिंगर यांना वाटत होते. याउलट, त्याठिकाणी त्यांना, "नौकाउद्योगाच्या मदतीची एक योजना," "शेतकऱ्यांच्या मदतीची एक योजना," "कामगारांची क्रयशक्ती वाढवण्याची एक योजना" असा प्रकार आढळला. अमेरिकेमध्ये किंवा तशाच प्रकारच्या इतर कोणत्याही देशामध्ये रशियन योजनेशी दूरान्वयानेही साधर्म्य असलेली, राष्ट्रातील वेगवेगळ्या हजारो आर्थिक कृतींना जाणीवपूर्वक एकत्र गुंफून त्यांची सुसंबद्ध मालिका तयार करणारी योजना नव्हती.

रशियामध्ये उत्पादनसाधनांच्या खाजगी मालमत्तेला मूठमाती देण्यात आली असल्यामुळेच अशा तऱ्हेचे नियोजन करणे शक्य होते. ही किंवा ती गोष्ट केल्यामुळे मालमत्ताधारी लोकांचा जीव कासावीस होतो म्हणून नियोजनकारांना हवी ती पावले ज्या ठिकाणी उचलता येत नाहीत, त्या देशामध्ये सर्वसमावेशक नियोजन करणे अशक्यच असते. सोव्हिएट युनियनमधील गॉस्प्लानने घेतलेले निर्णय परिणामकारक ठरतात, कारण संपूर्ण सोव्हिएट राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी, कोणीही स्पर्धक नसलेल्या एकाच संघटनेतर्फे ते निर्णय घेतलेले असतात. भांडवली देशातील नियोजनकारांनी घेतलेले निर्णय परिणामकारक ठरत नाहीत; कारण मालमत्ताधाऱ्यांच्या एका गटाला उदा. क्युबामधून साखर आयात करणाऱ्यांना त्याचा फायदा झाला तर मालमत्ताधाऱ्यांच्या दुसऱ्या एका गटाला, अमेरिकेत साखर तयार करणाऱ्यांना त्याचा त्रास झाल्यामुळे ते त्याला विरोध करतात. शिवाय लोकांना आज्ञापालन करण्याची सक्ती शासनसंस्था करू शकत नसल्याने आज या गटाला तर उद्या त्या गटाला मलिदा चाखायला द्यायचा असा प्रकार होतो.

उत्पादनसाधने ही खाजगी मालमत्ता असल्यास नियोजनाचे तीन तेरा कसे वाजतात हे श्रीमती बार्बरा वूटन यांनी त्यांच्या 'प्लान ऑर नो प्लान' [नियोजन किंवा निर्नियोजन] या पुस्तकामध्ये दाखवून दिले आहे : "उत्पादनसाधनांचा वापर करून, उत्पादित माल विकून मिळणाऱ्या पैशावर नजर असणाऱ्या लोकांची जोपर्यंत या उत्पादनसाधनांवर आणि उत्पादित मालावर खाजगी मालकी असते तोपर्यंत ती कंपनी किंवा तो उद्योग चालवणारे लोकच स्वतःला जास्तीत जास्त फायदा होईल अशा पद्धतीने आर्थिक निर्णय घेतात .... पोलाद-कारखानदारांची चंगळ होईल अशा पद्धतीनेच पोलादाचे उत्पादन किती असावे ते ठरवण्यात येते. दारू गाळणाऱ्या कारखानदारांना स्वर्ग दोनच बोटे उरावा अशा पद्धतीने बीअरचे उत्पादन ठरवण्यात येते, कलाकारांना

पृथ्वीवरच नंदनवन उपलब्ध व्हावे अशा पद्धतीने चित्रपटांच्या निर्मितीचे प्रमाण ठरते. या संपूर्ण प्रकारामध्ये नियोजनाच्या विरुद्ध समाजाच्या सर्व व्यवहारांचे नियोजन होते. ”

भांडवलदारांचा स्वतःचा फायदा होणार असला तरीही खाजगी मालमत्ता केंद्रीय नियोजनाच्या मार्गात अडथळा ठरते. मग सर्व लोकांच्या फायद्याच्या केंद्रीय नियोजनामध्ये अडथळे निर्माण करणे अधिकच अगत्याचे बनते! झोपडपट्टया काढून टाकण्याच्या एका प्रश्नाचेच उदाहरण घ्या झोपडपट्ट्या असू नयेत याबद्दल सर्वांचेच एकमत असते. मग, त्या काढल्या का जात नाहीत? या सार्वजनिक गरजेमध्ये कसला अडथळा येतो? उत्तर अगदी सोपे आहे. खाजगी मालमत्ता—वैयक्तिक नफा, झोपडपट्टीवासियांकडून भाडे घेणारे काही घरमालक असतात. झोपडपट्टीवासियांना अधिक चांगली आणि नवी घरे दिली तर आपले भाडे कमी होईल अशी भीती वाटणारे काही घरमालक असतात. म्हणून झोपडपट्ट्या काढल्या जात नाहीत. आणि त्या काढण्याचा प्रयत्न झालाच तर ते काम हळूहळू, रडतखडत करण्यात येते आणि अपूर्णच सोडले जाते. अशा तऱ्हेने, खाजगी मालमत्ता सार्वजनिक हिताच्या आड येते.

समाजवादी समाजाच्या नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेमध्ये याच गोष्टी किती वेगळ्या प्रकारे करण्यात येतात! शहराचा नकाशा नियोजनकारांच्या पुढ्यात असतो. रहिवाशांच्या आरोग्यास अपायकारक अशा झोपडपट्ट्या ज्या भागात असतात तो भाग नकाशात ठळक करून दाखवलेला असतो. काय केले पाहिजे? झोपडपट्ट्या हटवल्याच पाहिजेत. ठीक आहे, ठळक भागावरून एक काट मारा. झोपडपट्टीनिर्मूलनाचे काम तात्काळ चालू होते. जेथे खाजगी मालमत्ता मार्गात आडवी येत नाही तेथे गरज जाणवली की योजना आखण्यात येतात आणि तात्काळ कृती करण्यात येते.

जेथे खाजगी मालमत्ता मार्गात उभी असते तेथे तिचे हितसंबंध प्रथम जोपासले जातात आणि राष्ट्रीय हितसंबंध बाराच्या भावात जातात. ‘लंडन टाइम्स’च्या २८ ऑगस्ट १९३५ च्या संपादकीयामध्ये याविषयी खेद प्रकट करण्यात आला होता. इंग्लंडच्या उत्तर भागात रोजगार शोधणारे अनेक बेकार असूनही तेथे उद्योगधंदे बंद पडत होते. तर “शेती, कुरणे, जंगले” यांच्यावर होणाऱ्या कारखाना व्यवस्थेच्या हल्ल्यामुळे इंग्लंडच्या दक्षिण भागातील “ग्रामीण सौंदर्य” विद्रूप करण्यात येत असल्याबद्दल ‘द टाइम्स’ला काळजी वाटत होती. यासंबंधी ‘द टाइम्स’ने अशा प्रकारे कोरडे ओढले होते : “आधीच्या औद्योगिक वसाहती आणि जनसमुदाय यांना आर्थिकदृष्ट्या वाऱ्यावर सोडून देऊन नव्या औद्योगिकीकरणाद्वारे दुसऱ्या ठिकाणच्या लोकांचे भाग्य फळफळू लागते तेव्हा, थोडेफार अस्पष्ट पण मूलभूत राष्ट्रीय हितसंबंध कशात आहेत हे ठरवण्याची दिशाच नक्की नाही असे म्हणावे लागते.

“उत्पादनाच्या अंगभूत गुणधर्मांमुळेच विशिष्ट ठिकाणी वसवले पाहिजेत अशी बंधने नसलेले आणि बऱ्याच लोकांना कामधंदा पुरवू शकणारे उद्योगधंदे वैज्ञानिक शोधांमुळे शक्य झाल्यास रोजगाराची आत्यंतिक गरज ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी ते वसवणे हे सामाजिकदृष्ट्या हितावह ठरेल. **परंतु उद्योगधंदे कुठे वसवावेत**

याबद्दलचे निर्णय घेणाऱ्या लोकांवर सामाजिक हित वगैरेंचा काहीही परिणाम होत नाही."

खरी मेख येथेच आहे. खाजगी मालमत्तेमुळे प्रत्येक बाबतीत समाजहिताच्या गोष्टी वेशीवर टांगण्यात येतात. काही लोकांच्या मते यात वाईट असे काहीच नाही. उत्पादन साधनांची खाजगी मालमत्ता आणि नियंत्रण यापासून मिळणारे फायदे तोट्यांपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत. गेल्या १५० वर्षांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि एवढ्या प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन करण्यात आणि (विशेषतः अमेरिकेमध्ये) जनतेचे जीवनमान उंचावण्यात भांडवलशाहीने जे विस्मयकारक यश मिळवले आहे त्याकडे ते बोट दाखवतात. खाजगी मालमत्तेचा झेंडा उंच फडकवत नॅशनल ॲसोसिएशन ऑफ मॅन्युफॅक्चरर्स, तिच्या "प्लॅटफॉर्म फॉर अमेरिकन इंडस्ट्री"मध्ये [अमेरिकेतील उद्योगधंद्यांचे व्यासपीठ] असे घोषित करते. वैयक्तिक स्वातंत्र्य आणि प्रगती यांसाठी उत्पादन, वितरण आणि निवासस्थानावरील खाजगी मालकी आणि नियंत्रण अत्यावश्यक आहे. या गोष्टींची मालकी किंवा नियंत्रण सरकारच्या हाती असल्यास अर्थव्यवस्था नियोजनबद्ध होते आणि समाज स्थितिशील बनून सुलतानशाहीला वाव मिळतो ...

"संपूर्ण राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे नियोजन सरकारच्या हाती आल्यास, उत्पादन आणि उपभोग यामध्ये संतुलन राखण्याचे अधिकार काही मूठभरांच्याच हाती केंद्रित होतात. सर्व लोकांचे कौशल्य, बुद्धिमत्ता आणि ज्ञान यांचा वापर करून असंख्य लोक जेव्हा उत्पादनासंबंधी निर्णय घेतात तेव्हाच आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची परमावधी गाठली जाते. सर्व लोकांच्या कामाचे नियोजन करून, त्यांना प्रेरणा आणि दिशा देण्यासाठी लागणारी विद्वत्ता, दूरदर्शीपणा आणि चोखंदळपणा मूठभर लोकांकडे असूच शकत नाही ..."

स्वतःच्या विशिष्ट उद्योगधंद्याच्या बाबतीत जगातील सर्वात महान नियोजनकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उद्योगपतींकडून हे बोल बोलले जावेत ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट म्हटली पाहिजे. उद्योगधंद्यांचे नियोजन आणि संघटना चातुर्य याबाबतीत हे उद्योग-महर्षि समजले जातात. यातील प्रत्येकाकडे जगातील अनेक राष्ट्रांपेक्षा अधिक भांडवल आहे आणि यांचे हात जगभर पसरलेले आहेत. जगातील प्रमुख भांडवली देशांमधील हे अग्रगण्य नियोजनकार स्वतःच्या उद्योगांमध्ये अतिशय कौशल्यपूर्वक नियोजन करूनही संपूर्ण राष्ट्राच्या उद्योगधंद्यांसाठी नियोजन नसणे कसे योग्य आहे हे पटवून देण्यासाठी जीवाचा आटापिट करत आहेत.

राष्ट्रीय नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेला भांडवलदारांचा एवढा विरोध का?

राष्ट्रीय नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेमुळे खाजगी मालमत्तेला—त्यांच्या खाजगी मालमत्तेला मूठमाती देण्यात येईल हे जाणवल्यामुळे ते एवढा विरोध करतात का? 'द प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक प्लानिंग' (आर्थिक नियोजनाची मूलतत्त्वे) या पुस्तकामध्ये श्री. जी डी. एच्. कोल यांनी असेच मत प्रदर्शित केले आहे: "बहुतेक सर्व भांडवलदार नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या त्यांच्या भांडवलदारबंधूंना

धोकादायक पाखंडी समजतात... बहुतेक स्पष्टवक्ते भांडवली नेते नियोजनविरहित अर्थ-व्यवस्थेचा हिरिरीने पुरस्कार करतात. कारण सगळे दोष मान्य करूनही मालमत्तेचे हक्क खात्रीलायकपणे उचलून धरणारी तीच एक अर्थव्यवस्था आहे. "

अगदी हीच गोष्ट स्टोलबर्ग आणि व्हिन्टन यांनी आपल्या बोचऱ्या शैलीमध्ये मांडली आहे : " इतर सर्वांविरुद्ध फक्त स्वतःच्याच फायद्याचे निर्णय घेता यावेत म्हणून उद्योगधंद्यांवरील समाजविरोधी खाजगी नियंत्रण बड्या उद्योगपतींना कायम ठेवायचे असते. म्हणूनच ते समाजावरील त्यांचा ताबा सोडू इच्छित नाहीत.

' सामाजिक नियोजनाचे ' अत्यंत थातुरमातुर प्रयत्नही उधळून लावले पाहिजेत हे वेअर्स, टीगल्स आणि स्लोन्स यासारख्या उद्योगपतींना पक्के ठाऊक असते. समाजातील त्यांचा व्यवहार पशुतुल्य असला आणि आर्थिक बाबींमधील त्यांचे अज्ञान अगाध असले तरीही, खरेखुरे सामाजिक नियोजन म्हणजे भांडवली पुनर्स्थापना नसून समाजवादी उभारणीची नांदीच असते हे सत्य ते पुरेपूर ओळखून असतात. "

राष्ट्रीय नियोजनामुळे राष्ट्रीय उत्पादनाचे वितरण चर्चेचा विषय होणे अपरिहार्य बनते हे देखील भांडवलदारांच्या राष्ट्रीय नियोजनाला असलेल्या विरोधामागचे एक कारण असू शकेल. उत्पन्नाचे वाटप कितीही विषम असले तरीही हा " नैसर्गिक नियमाचा " परिणाम असल्याचा भांडवली सिद्धांतांचा दावा होता. अमेरिकेतील एक अग्रेसर अर्थतज्ञ प्रा. जॉन बेट्स क्लार्क आपल्याला त्याची ग्वाही देतात. आपल्या ' द डिस्ट्रिब्युशन ऑफ वेल्थ ' [संपत्तीचे वाटप] या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये प्रा. क्लार्क म्हणतात : " समाजातील उत्पन्नाचे वाटप एका नैसर्गिक नियमाद्वारे घडून येते हे सिद्ध करणे हे या पुस्तकाचे उद्दिष्ट आहे. कोणत्याही अडचणी न येता हा नियम प्रत्यक्षात उतरल्यास, उत्पादन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस मिळणारे उत्पन्न तिने निर्माण केलेल्या संपत्तीएवढे होते...

" खुल्या स्पर्धेमुळे श्रमिकांनी निर्माण केलेली संपत्ती श्रमिकांना मिळते, भांडवलाने निर्माण केलेली संपत्ती भांडवलदारांना मिळते आणि नियंत्रणात्मक कामामुळे निर्माण होणारी संपत्ती उद्योजकांना मिळते....उत्पादन करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस विशिष्ट वाटा मिळणे, प्रत्येकाला त्याच्या कामाखातर विशिष्ट बक्षिस मिळणे हाच संपत्तीच्या वाटपाचा नैसर्गिक नियम आहे. "

उत्पन्नाचे हे वाटप अत्यंत अन्यायकारी आहे असा आरोप केल्यास, भांडवलदार खांदे उडवत म्हणू शकतात, " आम्हाला कशाला दोष देता ? प्रत्येकाला त्याचा वाटा मिळतो तसा नैसर्गिक नियमच आहे. " परंतु राष्ट्रीय नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेमध्ये उत्पन्नाच्या वाटपाचा प्रश्न इतका सहजासहजी निकालात काढला जात नाही. तो विषय अदृश्य अमानवी शक्तींच्या हातचा न राहाता केंद्रीय सूत्रधारांनी ठरवायचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ज्वलंत प्रश्न बनतो. लोकशाही देशांमध्ये त्या सूत्रधारांवर जनतेच्या भावनांचा प्रभाव पडत असल्याने आज विविध लोकांच्या उत्पन्नामध्ये असलेली प्रचंड विषमता फार मोठ्या प्रमाणावर कमी करता येईल यात शंकाच नाही. जनते

उत्पन्न वाढेल, तर भांडवलदारांचे उत्पन्न कमी होईल — सगळे कसे योजनेबर-हुकूम होईल.

त्यामुळे अशा कोणत्याही प्रक्रियेला विरोध करणाऱ्यांमध्ये भांडवलदारच अग्रभागी असतात यात नवल ते काहीच नाही.

पण तरीही काही देशांमध्ये त्यांचा अजिबात इलाजच नसतो. तेथे आर्थिक जीवनाचा गाडा इतका मोडकळीला येतो आणि कामगारवर्गाची वाढती शक्ती त्यांच्या मनात इतकी जबरदस्त भीती निर्माण करते की केंद्रीय सूत्रचालनाची गरज भांडवलदारांनाही जाणवू लागते. परंतु असे सूत्रचालन करणारी यंत्रणा आपल्याच अखत्यारीत राहून आपलेच हितसंबंध जोपासेल अशी ते खबरदारी घेतात. कामगारवर्गाच्या लढाऊ शक्तींवर वरवंटा फिरवल्यावरच हे शक्य होते. म्हणूनच भांडवलदार फॅसिझमची कास धरतात.

रशियामध्ये कामगारवर्गीय क्रांती यशस्वी झाली होती. परंतु सर्व जगभर पहिल्या महायुद्धामुळे दैन्यावस्था ओढवलेल्या, भुकेकंगाल बनलेल्या हजारो नववंचितांना क्रांतीच्या वायुवेगाने थरारून सोडले. स्वतःची परिस्थिती सुधारण्याची शक्यता दिवसेंदिवस क्षीण होत चाललेली पाहून मध्यमवर्गीय लोकांमध्येही असंतोष फैलावला. या सर्व प्रकारांमुळे प्रस्थापित व्यवस्था जरी उलथून पडली नाही, तरीही ती डगमगू लागली.

इटाली आणि जर्मनी या देशांच्या बाबतीत हे विशेषच खरे होते. भांडवलदारांच्या सत्तेला आव्हान देणारा कामगारवर्ग या देशामध्ये त्यांच्या सामोरा ठाकला होता. म्हणूनच त्यांनी मुसोलिनीचे ब्लॅकशर्ट आणि हिटलरचे ब्राऊनशर्ट यांना पैसा आणि मदत देऊ केली—अर्थातच भविष्यकाळातील मलिद्यावर नजर ठेवूनच. संघटित कामगार-वर्गीय चळवळीचे कंबरडे मोडणे हा त्या मलिद्यातला सर्वात महत्त्वाचा भाग होता. या दोन्हीही नेत्यांनी चोख काम बजावले. इटालीमधील 'फॅसिझम' आणि जर्मनीतील 'नॅशनल सोशॅलिझम' या प्रतिक्रांतिकारी चळवळी होत्या. त्यामुळे प्रस्थापित व्यवस्था म्हणजे भांडवली सत्ता आणि संपत्ती सुरक्षित राहिली.

ही कामगिरी मोठी कठीण होती. समाजवादी विचारांकडे झुकणाऱ्या जनतेला नकळत गाडीचे रूळ बदलण्यासाठी अतिशय हुषारीने प्रचार करणे आवश्यक होते आणि तसाच प्रचार करण्यात आला. असंतोषाने खदखदणाऱ्या जनसमुदायांना आकृष्ट करण्यासाठी नॅशनल सोशॅलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीकडे अनेक 'समाजवादी घोषणा' होत्या. २५ कलमी, प्रसिद्ध नाझी कार्यक्रमातील ही तीन कलमे पहा;

"कलम ११. काम न करता कोणालाही उत्पन्न मिळणार नाही.

"कलम १२. पहिल्या महायुद्धात [दोस्तांनी] जिंकलेल्या सर्व गोष्टींवर पुन्हा [जर्मनीचा] कबजा.

"कलम १३. आजवर कंपनी (किंवा ट्रस्ट) म्हणून रजिस्टर करण्यात आलेल्या सर्व उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात यावे."

अशा प्रकारची आश्वासने देण्यात आली. ती प्रत्यक्षात आली का? 'द इकॉनॉमिस्ट'च्या बर्लिनमधील वार्ताहराने १ फेब्रुवारी १९३६ रोजी काय उत्तर दिले ते पाहू : "पक्षाचा कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्याचा जोरदार प्रयत्न केला असता तर वर्गीय

हितसंबंधांमधील विरोधाचा भडका उडाला असता. या कार्यक्रमाविषयी जाणूनबुजून उदासीनता दाखवल्यामुळेच गेले वर्ष शांततेमध्ये पार पडले. ... समाजवाद विरुद्ध भांडवलशाही या वादाने हजारो नाझींना पक्षाकडे आकृष्ट करण्यात यश आले होते. लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करण्यासाठी ओरडण्याच्या घोषणांच्या बुजबुजाटाचे स्वरूप आज या वादाला आले आहे. एकीकडे समाजवादाची आगेकूच चालू आहे असे सांगण्यात येते (खरे तर, याच आठवड्यात भांडवलशाहीचे थडगे उभारण्यात आल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली) तर दुसरीकडे, शेती आणि उद्योगधंदे यामध्ये खाजगी भांडवलाचे स्थान टिकून राहिले पाहिजे एवढेच नव्हे तर त्यांनी नफाही मिळवला पाहिजे असे ठासून सांगण्यात येते. ''

नाझी कार्यक्रमातील सर्वग्राही आश्वासने प्रत्यक्षात आणण्यासाठी नाझी राजवटीचा तीन वर्षांचा कालावधी फार अपुरा आहे असा युक्तिवाद काहीजण करू शकतील. या युक्तिवादामध्ये काहीच अर्थ नाही असे नाही, परंतु राजवटीच्या कालावधीत घडलेले बदल डोळ्यांत भरण्याजोगे आहेत. ट्रेड युनियन्सचे निधी जप्त करून, संघटना निकालात काढून, नेत्यांना गजाआड करण्यासाठी नाझी राजवटीला तीन वर्षे पुरेशी वाटली. या तीन वर्षांमध्ये वेतन आणि सार्वजनिक सेवा कमी करणे—थोडक्यात म्हणजे बड्या भांडवलदारांच्या इच्छेनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे वाटप करणे नाझींना शक्य झाले.

इटालीमधूनही तीच कथा कानांवर येते. फॅसिझमच्या कौतुकाचे मुसोलिनीने गायलेले हे गोडवे ऐका. '' या अर्थव्यवस्थेमध्ये समान हक्क आणि समान कर्तव्ये असलेले कामगार आणि भांडवल यांचे मीलन घडून येईल. '' अशी मुक्ताफळे यापूर्वीही उधळली गेली आहेत.

आता ही झाली उक्ती. कृती काय होती ते समजण्यासाठी जॉन गुंथर यांच्या ' इन्साइड युरोप ' (युरोपचे अंतरंग) या पुस्तकाकडे आपण वळूया. '' या शासनसंस्थेच्या भांडवलविरोधी धोरणांची एक प्रचंड जंत्री तयार करणे शक्य आहे असे वरवर पाहाता वाटेल. सरकारच्या परवानगीशिवाय कोणीही मालक कामगारांना काढून टाकू शकत नाही. कोणाही भांडवलदाराला स्वतःचा कारखाना वाढवण्यासारखा मामुली निर्णयही शासनाच्या संमतीशिवाय घेता येणार नाही. वेतनमान सरकार निश्चित करील.... शासनाच्या मान्यतेशिवाय कोणाही उद्योजकाला धंदा बंद करता येणार नाही. त्याला पतपुरवठा करण्याचे अधिकार सरकारचे असतील आणि त्याच्या उत्पन्नातील प्रचंड हिस्सा भरमसाठ कर लादून सरकार बळकावील.

'' परंतु वास्तविक पाहाता, फॅसिस्ट राजवटीमध्ये श्रमिकांच्या वाट्याला येणारे तोटे तर असंख्यच आहेत. सौदा करण्याचा त्यांचा हक्क त्यांनी गमावला आहे, त्यांच्या ट्रेड युनियन्स मोडीत काढण्यात आल्या आहेत. .... त्यांचे वेतन कायद्याने कमी करण्यात आले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संप करण्याचा त्यांचा अधिकार त्यांनी गमावला आहे. याउलट, भांडवलदारांची थोडीफार गैरसोय होत असली तरीही खाजगी मालमत्तेवर नफा मिळवायचा त्यांचा मूलभूत हक्क शाबूत आहे. भांडवली व्यवस्थेची तळी उचलून धरण्याच्या उद्देशाने मुद्दाम मुसोलिनी यांनी फॅसिस्ट राजवट आणलेली नसली तरीही

तिचा परिणाम तसाच झाला आहे. ' श्रमिकांच्या मागण्यांपासून मिळणाऱ्या संरक्षणाच्या बदल्यात भांडवलाच्या चलनावरील निर्बंध सोसायला ' भांडवलदारांची हसतखेळत तयारी होती. फॅसिस्ट क्रांतीचा सगळा रंग आणि आवेग, रशियाच्या नेमका उलटा म्हणजे प्रतिगामी आहे. ''

मुसोलिनी '' समान हक्क आणि समान कर्तव्ये '' यांचे नारे लावतात, पण श्री. गुंथर यांचे सत्यचित्रण वेगळीच कथा सांगते. भांडवलदारांना काही गैरसोयी सहन कराव्या लागत असल्या तरीही खाजगी मालमत्तेवर नफा मिळवण्याच्या त्यांच्या मूलभूत हक्काला जराही धक्का लागलेला नाही. याउलट कामगारांच्या ट्रेड युनियन्सचे थडगे उभारण्यात आले असून वेतनमान खाली खेचण्यात आले आहे आणि संप करण्याचा हक्क नाकारण्यात आला आहे.

तरीही इटाली आणि जर्मनी या दोन्ही देशांमध्ये भांडवल आणि कामगार या दोघांच्याही दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना घडत आहेत. दोन्ही देशांमध्ये सर्वशक्तिमान शासनसंस्था, न भूतो न भविष्यति अशा प्रकारे, भांडवलदारांना आपल्या दावणीला बांधत आहे. खाजगी मालमत्ता शाबूत असून नफा मिळवणे हीच अजूनही उद्योगधंद्यांमागील प्रेरणा असली तरीही वैयक्तिकदृष्ट्या प्रत्येक भांडवलदाराचे पंख कापण्यात आले आहेत. भांडवलदारांचे हक्क मर्यादित करण्यामागची उद्दिष्टे काय आहेत ? या दोन्ही फॅसिस्ट देशांमध्ये शेतीला देण्यात येणाऱ्या मदतीची, स्वयंपूर्णत्वाकडे झेपावण्याची, आयातीवरील कडक निर्बंधांची, निर्यातीला देण्यात येणाऱ्या सुटीची आणि वित्तसंपत्तीवरील नियंत्रणाची कारणे तरी कोणती ? उत्तर छोटेच पण भयावह आहे, युद्ध !

शासनसंस्थेचे एवढे प्रस्थ माजण्यामागची प्रेरणा युद्धाच्या तयारीची, लष्करीकरणाची आहे ही गोष्ट सर्वांना स्पष्टपणे कळून चुकली आहे. फॅसिस्ट सरकारे ही गोष्ट नाकारत नाहीत तर उलट त्याचा टेंभा मिरवतात.

मुसोलिनी आणि हिटलर या दोघांनीही उघडपणे युद्धाची प्रशंसाच केली आहे. मुसोलिनीचे यासंबंधीचे वक्तव्य ऐका : '' सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कायमची शांतता नांदू शकते किंवा तशी ती नांदून काही उपयोग आहे असे फॅसिझमला अजिबात वाटत नाही. ... केवळ युद्धामुळेच मानवी शक्तीची परमावधी गाठता येते आणि ही उंची गाठण्याची ज्यांची तयारी असते अशाच लोकांना त्यामुळे मानाचे स्थान मिळते ... म्हणूनच शांततेच्या गृहितावर आधारलेला कोणताही सिद्धांत फॅसिझमला घातकच होय. ''

परंतु हे देखील केवळ शब्दच आहेत आणि या माणसाच्या शब्दांवर विश्वास ठेवणे योग्य नाही हे आपण अगोदरच पाहिले आहे. मग वास्तव काय आहे ?

हे शब्द १९३२ साली उच्चारण्यात आले होते. १९३५ आणि १९३६ साली फॅसिस्ट सेना इथिओपियावर आक्रमण करत होत्या. या आश्वासनाची पूर्ती करण्यात आली.

आता याच विषयावरचे हिटलरचे वाक्ताडन ऐका : '' सतत चाललेल्या युद्धांमुळेच मानवसमाज उन्नतावस्थेला पोहोचला आहे. चिरकालीन शांततेमुळे मानवसमाज रसातळालाच जाईल. ''

हे पुस्तक लिहिताना नाझी सेनांचे आक्रमण चाललेले नाही, परंतु ते लौकरच होईल हे सर्वांनाच ठाऊक आहे. लष्करीकरणासाठी आणि त्यानंतर युद्धासाठी कंबर कसलेले, लागेल तो त्याग करायला तयार असलेले आणि सर्व कृती त्याच दिशेने वळवणारे राष्ट्र म्हणून जर्मनी सर्वांच्या पोटात गोळा उभा करते. 'न्यू यॉर्क टाइम्स'च्या वार्ताहराने २२ मार्च १९३६च्या अंकाला पाठवलेल्या वार्तापत्रात हे सारांशरूपाने सांगितले: "जर्मनीमधील आर्थिक घडामोडी केवळ एकाच उद्दिष्टाकडे झेपावत आहेत. ते उद्दिष्ट म्हणजे लष्करीकरण..."

फॅसिझम म्हणजे युद्ध.

दोन्ही फॅसिस्ट देशांमधील नेत्यांना लढण्याची आवड आहे म्हणूनच फॅसिझममुळे युद्ध उद्भवते असे नव्हे. साम्राज्यशाहीच्या अवस्थेला पोहोचल्यावर जगभरच्या नवनव्या बाजारपेठांच्या सतत विस्ताराच्या आत्यंतिक ओढीने भांडवलशाही पुढे झेपावते. फॅसिस्ट अर्थव्यवस्था म्हणजे अशा प्रकारची अर्थव्यवस्था असल्यामुळे तिच्या विकासप्रक्रियेमध्ये युद्ध अटळ बनते.

भांडवली अर्थव्यवस्था कोलमडल्यावर जेव्हा कामगारवर्ग सत्तासंपादनाचा प्रयत्न करतो तेव्हा त्यातून बचावण्यासाठी भांडवलदार फॅसिझमचा मार्ग चोखाळतात. पण फॅसिझममुळे त्यांचे प्रश्न सुटत नाहीत, कारण आर्थिकदृष्ट्या कोणताही मूलभूत बदल त्यामुळे घडून येत नाही. इतर कोणत्याही भांडवली अर्थव्यवस्थेप्रमाणे फॅसिस्ट अर्थ-व्यवस्थेमध्ये उत्पादन-साधनांची खाजगी मालकी आणि नफ्याची प्रेरणा या गोष्टी मूलभूत असतात.

ईस्ट इंडियन (म्हणजे दक्षिण आशियातील) लोक माकडे कशी पकडतात याबद्दलच्या आर्थर मॉर्गनच्या गोष्टीमध्ये भांडवलदारांना शिकण्यासारखे काही आहे का? "या कथेनुसार, ते लोक नारळामध्ये माकडाचा रिकामा हात जेमतेम जाईल एवढे एक भोक नारळाला पाडतात. मग नारळात साखर ठेवून एका झाडाला नारळ बांधून ठेवतात. माकड नारळात हात घालते आणि साखरेने भरलेली मूठ बाहेर काढण्याचा प्रयत्न करते. परंतु त्याची बंद मूठ बाहेर येईल एवढा त्या भोकाचा आकार नसतो. पण साखर सोडून द्यायची त्याची तयारी नसते आणि ही लालसा त्याच्या सर्वनाशाला कारणीभूत होते."

◇ ◇ ◇

सूची